मा. 2015
82 8

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — कन्याशिक्षण

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९२७, १९२८

अंक — ३·४·५·६·७·८·९·१०·११·१२ / १९२७

(महिने) १·२· = १९२८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

[illegible]

# कन्याशिक्षक.

वर्ष १३ वें ] मार्च ते जून १९२७ [अंक १।२।३।४

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें, यांनी पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हा. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत १२ आणे.

२१ जून १९२७.

# अनुक्रमणिका.


| विषय | पान |
|---|---|
| १ मनांतील वाचन. | १–१५ |
| २ महाराष्ट्र–साहित्य–संमेलन. | १६ |
| ३ कृष्णाकुमारी. | १७–३७ |
| ४ एकमानपद्धति व त्रैराशिक. | ३८–४४ |
| ५ सोन्याचा पक्षी. | ४४–५१ |
| ६ वानर व माकड. (गोष्ट) | ५२–५८ |
| ७ आईला मदत (कविता). | ५८–५९ |
| ८ प्रवासास या जाऊं चला (कविता). | ६०–६१ |
| ९ पावस्याचा वेल. (गोष्ट) | ६२–६६ |
| १० पहिल्या इयत्तेकरितां धडे. | ६७–६९ |
| दिवाळी. | |
| ११ मी शाळेंत जाईन. | ६९–७१ |
| १२ आठवड्याचा बाजार.... | ७१–७३ |
| १३ राष्ट्रसंघ. | ७४–८४ |
| १४ ख्रिस्ती शक अथवा इसवी सन. | ८५–८८ |
| १५ तिबेटसंबंधीं कांहीं नवीन माहिती. | ८८–९३ |
| १६ वर्तमानसार. | ९४–९६ |
| १७ पोंच व अभिप्राय. | ९७–९९ |
| १८ अद्भुत कथा. | ९९–१०० |
| १९ मुलींच्या व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेचा निकाल १९२७.... | १०१–१०५ |
| २० सरकारी जाहिराती. | |

अ. मा. २-७१९३

कन्याशिक्षक मंडळानें चालविलेलें मासिक पुस्तक.

# कन्याशिक्षक.

३३

वर्ष १३ वें.

( मार्च १९२७ ते फेब्रुवारी १९२८ )

हें पुस्तक पुणें येथें 'आर्यभूषण' छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें व मिस् आर. नवलकर, बी. ए. लेडी सुपरिंटेंडेंट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

१९२८

किंमत १॥ रु.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पाने. | लेखक. |
|---|---|---|
| १ अंकगणित. | | |
| एकमानपद्धति व त्रैराशिक. | ३८--४४ | म. का. कारखानीस |
| संक्षिप्त गुणाकार व भागाकार | १०५-१०९ | ” ” |
| अंकाचे खेळ | १०९-१११ | ” ” |
| २ शिक्षण व मानसशास्त्र. | | |
| मुलांचीं पहिलीं पांच वर्षे | २७४-२७९ | म. का. कारखानीस |
| खेडे गांवांतील मुलींच्या शाळा | २२७-२३२ | म. शि. निंबकर |
| जोडवर्ग | १९३-१९८ | म. का. कारखानीस |
| ३ भाषा. | | |
| मनांतील वाचन | १-१५ | म. का. कारखानीस |
| व्याकरण | १००-१०४ | ” ” |
| ४ मुलांकरितां धडे. | | |
| दिवाळी | ६७-६९ | म. का. कारखानीस |
| मी शाळेंत जाईन | ६९-७१ | ” ” |
| आठवड्याचा बाजार | ७१-७३ | ” ” |
| देवाची दया | २३२-२३४ | ” ” |
| गुलाब | २३५-२३८ | ” ” |
| ५ मुलांकरितां कविता. | | |
| आईला मदत | ५८-५९ | म. का. कारखानीस |
| प्रवासास या जाउं चला | ६०-६१ | ” ” |
| कोण त्यांना सकलासि ओळखीतो. | २०४-२०५ | ” ” |
| वायूनें धडा शिकविला | १२६-१२७ | ” ” |
| कीटक सृष्टि | २०९ | ” ” |
| चिऊताईचीं मुलें | २३८-२४० | ” ” |
| प्रार्थना गीतें | १८८-१८९ | का. प. साने |
| साध्वी मीराबाई | २५०-२५३ | ” ” |
| ६ मुलांकरितां गोष्टी. | | |
| सोन्याचा पक्षी | ४४-५१ | गो. ब. मोकाशी |

| विषय. | पानें. | लेखक. |
|---|---|---|
| पावट्याचा वेल | ६२–६६ | म. का. कारखानीस |
| दगडू पाथरवट | ११२–११५ | म. का. कारखानीस |
| दहींभाताचें झाड | १२१–१२५ | गो. ब. मोकाशी |
| रंगीबेरंगी शालू | १३९–१४४ | ,, ,, |
| साध्वी सौदामिनी | १८१–१८७ | सौ. पार्वतीबाई देसाई |
| शेरास सव्वाशेर | २०२–२०३ | रा. भा. ठोसर |
| कुरकुरें कोंकरू | २४०–२४२ | गो. ब. मोकाशी |
| लहान देवदूत | २५७–२६१ | म. का. कारखानीस |
| ७ सृष्टिशास्त्र | | |
| वानर व माकड | ५२–५८ | प्रोफेसर देशपांडे ( शेतकी कॉलेज पुणें. ) |
| ८ इतिहास व चरित्रें | | |
| राष्ट्रसंघ | ७४–८४ | गो. ब. मोकाशी |
| ख्रिस्तीशक | ८५–८८ | का. प. सानें |
| ब्रिटिश वसाहतीची स्थापना | १३१–१३८ | रा. भा. ठोसर |
| खलाशी हेन्री | १६१–१६३ | ,, ,, |
| साडेतीन राव | १९० | |
| ने० नां. लेस्ली वुइलसन | २२५–२२६ | रा. भा. ठोसर |
| कोलंबस | २६५–२६७ | ,, ,, |
| ८ भूगोल व प्रवास वर्णनें. | | |
| तिबेटसंबंधीं कांहीं माहिती | ८८–९३ | ज्ञानप्रकाश |
| आजचा इराण | १६२–१६५ | रा. भा. ठोसर |
| चीन | १६८–१७१ | ,, ,, |
| अफगाणिस्थान | २१०–२१४ | ,, ,, |
| ,, | २५४–२५६ | ,, ,, |
| आधुनिक भूगोल—त्याची उत्पत्ति व व्याप्ति | १९८–२०२ | स. वि. घैसास |
| ,, | २४२–२४६ | ,, ,, |
| पुणें ते क्वेटा | २६७–२७१ | मिस् नवलकर |
| ९ मुलांकरितां नाटकें. | | |
| कृष्णाकुमारी | १७–३७ | म. का. कारखानीस |
| बंडू अथवा खोडकर भाऊ | २८५–२९७ | ,, ,, |

| विषय. | पानें. | लेखक. |
|---|---|---|
| फुलें | २८२–२८४ | ” ” |
| १० आरोग्य. | | |
| लहान मुलांची झोंप | १६५–१६७ | रा. भा. ठोसर |
| प्रकाश व डोळ्याची काळजी | २०६–२०८ | ” ” |
| प्रा. शाळांतील मुलांची वैद्यकीय तपासणी. | २६१–२६४ | ” ” |
| ११ किरकोळ. | | |
| महाराष्ट्र साहित्य संमेलन | १६ | म. का. कारखानीस |
| स्फुट विचार | ९७–१०० | ” ” |
| कन्यासंघ | ११२–१०५ | ” ” |
| फ्रान्समधील हिंदी वीरांचें स्मारक | १२८ | ” ” |
| डॉ. बोस यांची प्रयोगशाळा | १२९–१३० | रा. भा. ठोसर |
| मुंबई इलाख्यांतील प्रा. शिक्षण परिषद् | १४५–१६० | ज्ञानप्रकाश |
| दिवाण साहेबांची भेट | २०५ | ” |
| मु. स्कूल बोर्डाचा अभ्यासक्रम | १७२–१८० | ” |
| लीलावती | २१५–२१८ | का. प. साने |
| बुलबुल संघ | २४६–२४९ | म. का. कारखानीस |
| मुलींचे खेळ | २९९ | |
| वनितासमाजाचा वार्षिक उत्सव | ३०० | |
| १२ वर्तमानसार | ९४–९६ | रा. भा. ठोसर |
| १३ पोंच व अभिप्राय | ९७–९९ | |
| | १९१–१९२ | |
| | २१३ | |
| | २९८–२९९ | |
| १४ परीक्षा सरकारी जाहिराती. | | |
| मुलींच्या व्ह. फा. चा निकाल | १०१–१०५ | |
| ट्रे. कॉलेज परीक्षांचा निकाल | २२०–२२४ | |
| मुलींचा फॉयनलचा १९२८ चा अभ्यासक्रम. | | |
| सरकारी जाहिराती | १०६–२१९ व २७२ | |
| अंकगणिताचा नवीन अभ्यासक्रम पुरवणी | १–६ ( दिसेंबर. ) | |

33 ... ४
२
ता...........
१९ ...

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥.

वर्ष १३ वें. ] मार्च, एप्रील, मे, जून १९२७. [ अंक १।२।३।४

## मनांतील वाचन.

आपण कधीं कधीं स्वतांकरितां वाचतों व कधीं कधीं दुसऱ्याकरितां वाचतों. आपण स्वतांकरितां जेव्हां वाचतों तेव्हां पुस्तकांतील अर्थ पूर्णपणें व भरभर आपल्या लक्षांत यावा हा आपला मुख्य उद्देश असतो. जेव्हां आपण दुसऱ्याकरितां वाचतों, तेव्हां आपण जें कांहीं वाचीत आहोंत तें ऐकणाराचे मनावर बिंबावें हा आपला मुख्य उद्देश असतो. ज्ञान मिळविण्याकरितां व स्वतांचें मनोरंजन करण्याकरितां पहिल्या प्रकारचें वाचन अत्यंत आवश्यक असतें. मनांत वाचीत असतांना, आपणांला मजकूर भरभर वाचतां आला पाहिजे व त्याचा अर्थ झटकन ग्रहण करतां आला पाहिजे. जो मनुष्य स्वतांकरितां वाचीत असतांनाही मोठमोठ्यानें वाचतो त्याला अक्षरओळख नीट झाली नाहीं व त्याला वाक्याचा अर्थ भराभर ग्रहण करितां येत नाहीं, ही गोष्ट उघड उघड दिसून येते. आपल्या शाळांतून मनांतील वाचनाकडे जितकें लक्ष द्यावयास पाहिजे तितकें दिलें जात नाहीं. वाचन म्हणजे दुसऱ्याकरितां

मोठ्यानें वाचन असाच अर्थ घेतला जातो व मनांतील वाचन हा एक वाचनाचा महत्त्वाचा भाग आहे, ही गोष्ट बहुतेक शिक्षक विसरतात.

दुसऱ्याकरितां मोठ्यानें वाचतां येणें ही एक आनंददायक कला आहे, ही गोष्ट खरी आहे. आई एकादी गोष्ट वाचीत असतांना, मुलें तिजभोंवतीं जमून ती वाचीत असलेली गोष्ट एकाग्र चित्तानें ऐकतात व त्या गोष्टींत तल्लीन होऊन जातात. खेडेगांवांत एकादा चांगला वाचणारा पोथी वाचीत असतो. त्याच्या भोंवतीं त्याचे श्रोते बसलेले असतात. श्रोते व वक्ता यांचें तादात्म्य झालेलें असतें. श्रोत्यांच्या आनंद, दुःख, खेद वगैरे सर्व भावना वक्त्याचे स्वाधीन असतात. पोथींतील कथा ऐकून कधींकधीं श्रोत्यांच्या डोळ्यांतून दुःखाच्या अश्रुधारा चालतात, तर कधीं कधीं त्यांचे डोळ्यांत आनंदाश्रु चमकतात. हरिविजयांतील अक्रुराबरोबर मथुरेला श्रीकृष्णाचें प्रयाण हा अध्याय एक सहृदय वृद्ध गृहस्थ वाचीत असतांना वाचणारे गृहस्थ व त्यांच्या भोंवतीं जमलेले श्रोते गहिंवरून अश्रु गाळतांना प्रस्तुत लेखकानें पाहिलेले आहेत. दुसऱ्याकरितां वाचतां येणें ही कला प्रत्येक मनुष्याला अवश्य साध्य झाली पाहिजे.

दुसऱ्याकरितां मोठ्यानें वाचतां येणें ही जरी उपयुक्त व आनंददायक कला आहे, तरी स्वतांकरितां मनांत वाचतां येणें ही त्याहीपेक्षां अधिक महत्त्वाची व उपयुक्त कला आहे. ज्ञानसंग्रह करून स्वतांच्या बुद्धीचा विकास करण्याला मनांतील वाचनासारखें दुसरें साधन नाहीं. थकल्याभागल्या मनाला खरी विश्रांति देण्याला व प्राचीन व अर्वाचीन ग्रंथकारांच्या उत्कृष्ट कल्पना व उदात्त विचार आपलेसे करून घेण्याला मनांतील वाचन हेंच उत्कृष्ट साधन आहे. मनांतील वाचन हें जर ज्ञान मिळविण्याचें व मनोरंजनाचें उत्कृष्ट साधन आहे, तर प्राथमिक शाळांतून या वाचनाकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे ही गोष्ट उघड आहे. पण वाचन म्हणजे मोठ्यानें वाचन, हाच अर्थ बहुतेक शाळांतून समजला

जातो. यामुळें मनांतील वाचनाकडे मुळीं लक्षच पुरविलें जात नाहीं. याचा परिणाम असा होतो कीं, प्राथमिक शाळांत मुलें जरी चार पांच वर्षे राहिलीं, तरी त्यांना वाचनाची गोडी लागत नाहीं. पुस्तकांतील मजकुरावरून भराभर दृष्टी टाकून, त्याचा अर्थ ग्रहण करण्याची शक्ति न वाढल्यामुळें वाचनांत त्यांना आनंद वाटत नाहीं. अर्थातच शाळा सोडल्यानंतर त्यांचें पुढील वाचन बंद होतें व संवय मोडल्यामुळें साधारण मजकूर वाचणें व लिहिणें हेंही या मुलांना अवघड जातें.

आतां सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाला सुरुवात झाली आहे. आतां प्रत्येक मूल निदान ५ वर्षें तरी शाळेंत राहील. या अवधींत मुलांना मनांत वाचून स्वतांचें मनोरंजन करण्याची व नवीन ज्ञान मिळविण्याची शिक्षकानें संवय लाविली पाहिजे. ही गोष्ट जर साध्य झाली नाहीं, तर मुलांचीं हीं पांच वर्षें फुकट गेलीं असें होईल व शिक्षणाचा उत्साह व काळ आणि मुलांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ झालेला खर्च हीं सर्व व्यर्थ गेलीं असें उघड उघड दिसून येईल. आतांपर्यंत मुलांना वाचण्याला योग्य अशीं पुस्तकें मराठी भाषेंत फारच थोडीं होतीं, पण सुदैवानें आतां तशी स्थिति राहिली नाहीं. मुलांना योग्य अशा पुस्तकांचा संग्रह दिवसानुदिवस वाढत आहे, तेव्हां आतां पुस्तकांची अडचण शिक्षकाला भासणार नाहीं.

भरपूरसा शब्दसंग्रह, झटकन अर्थग्रहण करण्याची शक्ति, मागचा पुढचा संबंध लक्षांत ठेवणारी स्मरणशक्ति हीं असल्याशिवाय मनांतील वाचन चांगलें येत नाहीं. या सर्व गोष्टी संवयीनें साध्य होतात, म्हणून प्रारंभापासून शिक्षकानें या विषयाकडे चांगलें लक्ष दिलें पाहिजे. शिशुवर्गांत मुलें जेव्हां अक्षरें शिकत असतात, तेव्हां अक्षरांचा चांगला परिचय न झाल्यामुळें, प्रत्येक अक्षर सावकाश व मोठ्यानें वाचण्याचा त्यांना मोह होतो व हीच संवय त्यांना पुढें लागते. या संवयीमुळें-

मुलांचें अर्थाकडे लक्षच जात नाहीं. अक्षरें ओळखून त्यांचा उच्चार करण्याकडेच त्यांचें सर्व अवधान लागतें.

या इयत्तेंत शिक्षकानें पुढें दिलेल्या गोष्टींकडे लक्ष पुरविल्यास मुलांना मनांत वाचनाची संवय लागेल. मुलांच्या वाचनाचे धडे मनोरंजक असावे. त्यांतील कल्पना व त्यांतील नवीन शब्द यांच्याशीं प्रारंभींच मुलांचा चांगला परिचय करून द्यावा. या धड्यांतील वाक्यें लहान असावीं व तीं मिश्र नसावीं. शिक्षकानें शिकवावयाचा धडा— धडा मोठा असल्यास त्यांतील भाग— फळ्यावर मोठ्या अक्षरांनीं लिहावा व शब्दावर पट्टी फिरवीत एक एक वाक्य मुलांना सावकाश वाचून दाखवावें. वाक्य वाचीत असतांना अर्थाला योग्य व मुलांना झेपेल इतका लहान भाग एकदम वाचण्याची खबरदारी घ्यावी. शिक्षकानें याप्रमाणें फळ्यावर लिहिलेला धडा किंवा धड्याचा भाग वाचून दाखविल्यावर त्यानें तो मुलांना मनांत वाचण्यास सांगावा. मुलांनीं तो मनांत वाचल्या-नंतर एक एक मुलास बोलावून दोन दोन तीन तीन वाक्यें त्याजकडून वाचून घ्यावीं. आपण एका धड्याचें उदाहरण घेऊन वर सांगितलेल्या गोष्टी स्पष्ट करूं. ' च ' या अक्षराचा धडा मुलांना शिकवावयाचा आहे अशी आपण कल्पना करूं. 'च' हें अक्षर मुलांना ओळखण्यास व लिहिण्यास येत आहे आणि आकाराचीही ओळख मुलांना झाली आहे, व पुढें दिलेला धडा मुलांना वाचण्यास शिकवावयाचा आहे.

( शिशुपाठमाला धडा १९ पान १९ )

चहा.

आई चल.

बाबांला चहा कर.

बाळ, वर चढ

मा. ...



व चहाचा डबा काढ.

बाळ, चटकन साखर आण.

हा पहा चहा तयार झाला.

चहाला चमचा आण.

मुलांना धड्यांत गोडी वाटावी व त्यांना धड्यांतील कल्पनांचा परिचय व्हावा, म्हणून शिक्षकानें पुढें दिल्याप्रमाणें या धड्यासंबंधीं गोष्ट सांगावी. रामराव कचेरींतून घरीं आले. त्यांनीं आपला मुलगा गणू याला सांगितलें, ' गणू जा, तुझ्या आईला मला चहा करावयास सांग, ' गणूची आई शेजारच्या बाईकडे कांहीं कामाकरितां गेली होती. तेथें गणू गेला व त्यानें सांगितलें, 'आई चल, बाबांला चहा कर.' मग गणूची आई घरीं गेली. तिनें चूल पेटविली. ती गणूला म्हणाली, 'गणू, वर चढ व चहाचा डबा काढ.' मग गणूनें चहाचा डबा काढला. चहाला साखर नव्हती, तेव्हां गणूची आई त्याला म्हणाली, ' गणू, चटकन जा व साखर आण. ' मग गणूनें शेजारच्या वाण्याकडून साखर विकत आणली. आईनें ती साखर चहांत घातली व ती म्हणाली, ' हा झाला चहा तयार, चहाला चमचा आण.' गणूनें चमचा आणला व मग त्यानें तो चहाचा कप बापाला नेऊन दिला.

धड्याचे प्रारंभीं अशा प्रकारें गोष्ट सांगितल्यानें मुलांना त्या धड्यांत गोडी वाटते व त्याच्यांतील कल्पना त्यांना चांगल्या कळतात. चहा, चढ, चटकन, चमचा, चहाचा हे नवीन शब्द या धड्यांत आले आहेत. हे शब्द मुलांना चटकन ओळखतां यावे, म्हणून त्यांच्याशीं मुलांचा चांगला परिचय करून दिला पाहिजे. गोष्टीमध्यें हे शब्द आल्यामुळें त्यांचा अर्थ मुलांना माहीत होतो. यांपैकीं एक एक शब्द जाड कागदाच्या तुकड्यावर स्पष्ट व मोठ्या अक्षरांनीं लिहावा.

एक एक कार्ड वर्गांत मुलांच्या पुढें सावकाश फिरवावें व त्यावर लिहिलेला शब्द मनांत वाचून लक्षांत ठेवण्यास त्यांना सांगावें. मुलांनीं तो शब्द सांगितल्यानंतर दुसरा शब्द घ्यावा. अशा रीतीनें हे सर्व शब्द मुलांकडून वाचून घ्यावे. मग शब्दांचे पत्ते भुईवर पसरावे व मुलांना एक एक शब्द सांगून त्याचा पत्ता उचलण्यास सांगावें; नंतर फळ्यावर हे शब्द लिहावे व ते मुलांकडून ओळखून घ्यावे. सर्व वर्गाला पुरतील इतके नवीन शब्दांचे पत्ते आधीं तयार करावे व ते वर्तुळांत ठेवावे. या वर्तुळाचे भोंवतीं मुलांना पळण्यास लावावें. टाळी वाजवितांच मुलांनीं थांबावें व आपल्या समोर जो पत्ता येईल त्यावरील शब्द वाचावा. मग शिक्षकाचे खुणेबरोबर आणखी पळण्यास सुरुवात करावी. अशा प्रकारें शब्द ओळखण्याच्या पांच सहा पाळ्या शिक्षकाला सहज करून घेतां येतील. वर सांगितल्याप्रमाणें आणखीही कांहीं युक्तींनीं शिक्षकाला या नवीन शब्दांशीं मुलांचा निकट परिचय करून देतां येईल.

शिक्षकानें मुलांकडून वाचून घ्यावयाचा धडा अगोदरच फळ्यावर लिहून ठेवावा. नवीन शब्द मुलांना चांगले ओळखतां येऊं लागले कीं, धडा शिक्षकानें सावकाश मुलांना वाचून दाखवावा. नंतर मुलांनीं तो धडा मनांत वाचावा. धड्यांतील गोष्ट मुलांना माहीत झाली असल्यामुळें, धड्यांतील सर्व कल्पना त्यांना कळलेल्या असल्यामुळें व नवीन शब्दांशीं त्यांचा दृढ परिचय झालेला असल्यामुळें त्यांना तो धडा मनांत वाचण्यास अवघड जाणार नाहीं. सुमारें पांच सात मिनिटांत वर दिलेला धडा मुलें सहज वाचतील. यानंतर शिक्षकानें एक एक मुलास फळ्यावरील दोन दोन अगर तीन तीन वाक्यें वाचण्यास सांगावें. मूल वाचतांना अडखळलें, तर त्याला तें संपूर्ण वाक्य पुन्हा मनांत वाचण्यास सांगावें, म्हणजे ई-श्व आ-ण असें अडखळत वाचण्याची पाळी मुलाला येणार नाहीं व अर्थ समजून वाचण्याची संवय त्याला लागेल.

शिशुवर्गांत मुलें अडखळत वाचतात याचीं कारणें बरींच असतात. कांहीं मुलांना अक्षरओळखच चांगली झालेली नसते, यामुळें अक्षर ओळखून त्याचा उच्चार करण्याला त्यांना त्रास पडतो व वेळही फार लागतो. कित्येक मुलांना अक्षरें चांगलीं ओळखतां येतात पण अक्षरां-वरून दृष्टि झटकन फिरवून शब्द काय आहे हें त्यांना ओळखतां येत नाहीं. यामुळें त्यांना प्रत्येक अक्षराचा व शब्दाचा तुटक तुटक उच्चार करीत अडखळत वाचावें लागतें. या मुलांनीं अक्षरें ओळखून शब्द व वाक्य जरी वाचलें, तरी मुलांचें सर्व लक्ष अक्षरें ओळखून त्यांचा उच्चार कर-ण्याकडे असल्यामुळें वाचलेल्या वाक्याचा अर्थ त्यांच्या लक्षांत येत नाहीं. अर्थ लक्षांत येण्यास त्या मुलांना तें वाक्य दोनदा तरी वाचावें लागतें. कित्येक वेळां धड्यांतील कल्पना मुलांना अगदींच अपरिचित असल्यामुळें अर्थबोध मुलांना होत नाहीं. यामुळें तीं कशीतरी शब्दां-चा व अक्षरांचा उच्चार करीत असतात. कित्येक वेळां वाचावयाच्या पुस्तकांतील अक्षर बारीक असल्यामुळें व शब्दांत भरपूर अंतर न सोडल्यामुळें मुलांच्या नेत्रेंद्रियाला झटकन अक्षरें, शब्द व वाक्यें ओळ-खण्याचें कार्यच करितां येत नाहीं.

मुलांनीं वाक्यांतील प्रत्येक अक्षराचा व शब्दाचा थांबत थांबत व तुटक तुटक उच्चार न करितां प्रथम तें वाक्य मनांत वाचावें व नंतर तें मोठ्यानें न अडखळतां स्पष्ट वाचावें, हीच गोष्ट मुख्यत्वेंकरून शिशु-वर्गांत शिक्षकाला साध्य करावयाची असते. ' ताई हा हरण पहा, हें वाक्य वाचावयाचें असल्यास मुलांनीं त्या वाक्यावर झटकन दृष्टि फेंकावी व मनांत अर्थ समजून मग तें मोठ्यानें स्पष्ट व न अडखळतां वाचावें. ता-ई ताई हा प-हा पहा आ-प-ला आपला ह-र-ण हरण, ताई हा पहा आपला हरण. अशाप्रकारें अडखळत जीं मुलें वाचतात त्यांना वाचण्याची गोडी लागणें शक्यच नसतें. कारण त्यांचें सर्व अवधान खुणांचें निरीक्षण करणें, त्या खुणा कोणत्या अक्षरांच्या

आहेत हें ओळखणें, मग त्या अक्षरांचा उच्चार करणें, नंतर तीं अक्षरें जुळवून त्यांचा शब्द बनवून. त्याचा उच्चार करणें या सर्व क्रियांत खर्च होतें. अर्थाकडे लक्ष देण्यास त्यांना सवडच नसते.

मुलांना मनांत वाक्य वाचून त्याचा अर्थ ग्रहण करण्याची संवय लागावी, म्हणून शिक्षकानें एकादें प्रश्नार्थक किंवा आज्ञार्थी वाक्य फळ्यावर लिहावें व त्याचें उत्तर देण्यास मुलांना सांगावें. नांव काय ? पाटीवर आपलें नांव लिहा, तुझे भावाचें नांव काय ? भावाचें नांव पाटीवर लिहा. आपले गांवचे नदीचें नांव काय ? तुला किती भाऊ आहेत ? शेजारचे डोंगरावर तूं गेला होतास काय ? गांवचा बाजार कोणते वारीं भरतो ? तुला लहान भाऊ आहे कीं बहीण ? तूं किती वाजतां निजतोस ? वगैरे अनेक प्रश्नार्थी किंवा आज्ञार्थी वाक्यांचा या कामीं उपयोग करितां येईल. एका वेळीं फळ्यावर एकच वाक्य लिहावें. मुलांनीं तें मनांत वाचावें व झटकन त्याचें उत्तर पाटीवर लिहावें. शिक्षकानें मुलांच्या पाट्या तपासाव्या; नंतर दुसरें वाक्य फळ्यावर लिहावें. ज्याचें उत्तर थोडक्यांत सांगतां येईल असेंच वाक्य देण्याची खबरदारी शिक्षकानें घ्यावी.

शिशुवर्गांत मुलांना चांगलें वाचतां येऊं लागलें कीं, शिक्षकानें धडा मुलांना वाचून दाखविला नाहीं तरी मुलें तो मनांत वाचूं शकतात. धडा मात्र लहान असावा. त्यांत तेच ते शब्द बरेच वेळां आलेले असावे. शिक्षकानें मुलांना त्यांतील गोष्ट सांगितली व नवीन शब्दांचा परिचय करून दिला कीं, शिक्षकानें फळ्यावर लिहिलेला धडा शिक्षकाचे मदतीशिवाय मनांत वाचण्यास मुलें फार उत्सुक असतात. 'शिशुपाठमाला,' 'मुलांकरितां मनोरंजक धडे' हीं पुस्तकें या इयत्तेंत मनांतील वाचनाकरितां फार उपयोगी पडतील.

पहिल्या इयत्तेंतही वाचन शिकविण्याचा क्रम मागील इयत्तेप्रमाणेंच ठेवावा. पुस्तकांतील धडा गोष्टीचा असल्यास शिक्षकानें ती गोष्ट प्रथम सांगावी. धडा माहितीचा असल्यास ती माहिती संभाषणरूपानें मुलांना द्यावी. नंतर एक प्यारेग्राफ घ्यावा, त्यांत कांहीं, नवीन शब्द किंवा कल्पना असल्यास तिचें स्पष्टीकरण करावें. नंतर तो फळ्यावरील प्यारेग्राफ मुलांना मनांत वाचण्यास सांगावा व प्रश्न विचारून तो मुलांना वाचतां येत आहे कीं नाहीं हें पहावें; नंतर शिक्षकानें तो मोठ्यानें, सावकाश, अर्थाच्या अनुरोधानें योग्य भाग पाडून वाचावा व प्रत्येक मुलाकडून वेळ असेल त्या मानानें अर्धा अगर संपूर्ण प्यारेग्राफ वाचून घ्यावा. सगळा धडा समजावून दिला व वाचून झाला कीं पुन्हा एकदा तो सगळा धडा मुलांना मनांत वाचण्यास सांगावा व एखादा दुसरा मजेदार व ज्याचें उत्तर थोडक्यांत लिहितां येईल असा प्रश्न मुलांना घालावा व त्याचें उत्तर त्यांना लिहिण्यास सांगावें.

या इयत्तेंत मुलांना मिश्र व संयुक्त वाक्यें मनांत वाचण्याची संवय झाली पाहिजे. त्याचप्रमाणें मागील वाक्यांचा संबंध लक्षांत ठेवून सबंध प्यारेग्राफ मनांत वाचण्याची व त्याचा अर्थ ग्रहण करण्याची संवय त्यांना लागली पाहिजे.

मनांतील वाचनापासून मोठ्यानें वाचण्यास मदत होते. मनांत वाचीत असतां मुलांना प्रत्येक शब्दाकडे लक्ष पुरवावें लागतें, वाक्यांचा संबंध लक्षांत ठेवावा लागतो व वाक्यांचा अर्थ कळून येण्याकरितां प्रयत्न करावा लागतो. या कारणांमुळें वाचावयाच्या मजकुराशीं मुलांचा चांगला परिचय होतो. आपण नेहमीं पाहातों कीं, वर्गांत मोठ्यानें वाचन चाललें असतां, मुलें वाचनाच्या धड्याकडे लक्ष देत नाहींत. वाचावयाची आपली पाळी आली कीं, कशा तरी चार ओळी वाचाव्या व खालीं बसावें अशी स्थिति

असते, पण मनांत वाचावयास सांगितलें कीं, मुलांना लक्षपूर्वक वाचावें लागतें.

शिक्षकानें वर्गात कधीं कधीं मुलांना मनोरंजक गोष्ट अगर सुंदर साधी लहान कथनपर कविता वाचून दाखवावी व ती गोष्ट मुलांना सांगण्यास लावावें. या योगानें वाक्यांचा परस्पर संबंध लक्षांत ठेवून अर्थ ग्रहण करण्याची संवय मुलांना लागेल व मनांतील वाचनाला मदत होईल.

कधीं कधीं फळ्यावर तीन चार वाक्यांचा एकादा लहानसा प्यारेग्राफ लिहून ठेवावा व तो झाकून ठेवावा. मग तो प्यारेग्राफ मुलांना ३।४ मिनिटें दाखवून वाचूं द्यावा व मग एकदम पुसून टाकावा. नंतर जें काय मुलांनीं वाचलें असेल तें त्यांना पाटीवर लिहिण्यास सांगावें.

दुसऱ्या इयत्तेंत कांहीं दिवसांनीं मुलांना सोपे धडे शिक्षकाच्या वाचनाशिवाय मनांत वाचतां येतील. धडा गोष्टीचा व सोपा असल्यास शिक्षकानें तो वाचून दाखवूं नये. मुलांना धड्याची साधारण दिशा कळण्याकरितां थोडासा उपोद्घात करावा व नंतर त्यांना तो धडा मनांत वाचण्यास सांगावा. मुलांनीं तो धडा वाचल्यानंतर मुलांना प्रश्न विचारून त्यांना तो धडा किती समजला हें पहावें. धडा जर भूगोलविषयक अगर सृष्टिज्ञानविषयक असेल, तर प्रारंभीं त्यांतील सर्व माहिती शिक्षकानें संभाषणद्वारां द्यावी व मग मुलांनीं तो धडा मनांत वाचावा. धडा अगदींच कठीण असल्यास तो शिक्षकानें मुलांना वाचून दाखवावा. मग त्या धड्याचें स्पष्टीकरण करावें व नंतर तो सर्व धडा मुलांना मनांत वाचावयास सांगावा. हीच पद्धति तिसऱ्या व चवथ्या इयत्तेंत चालू ठेवावी.

या इयत्तांतून शिक्षकानें एकाद्या पुस्तकांतून चांगली गोष्ट, वर्णन अगर कविता वाचून दाखवावी व मुलांनीं ती लक्षपूर्वक ऐकावी. शिक्ष-

काला जर स्वतः वाचनाची गोडी असेल, तर त्याच्या या वाचनाचा मुलांवर अत्यंत इष्ट परिणाम घडतो. मुलांना वाचनाची गोडी लावावयाची असेल, प्राथमिक शाळेंतील त्यांच्या काळाचा सद्व्यय व्हावा अशी इच्छा असेल, पुढील आयुष्यांत मुलांनीं आपल्या स्वतांच्या प्रयत्नानें ज्ञानार्जन करावें असें वाटत असेल, तर प्राथमिक शाळेंत मुलांना वाचण्यास योग्य अशा पुस्तकांचा लहानसा संग्रह असणें अगदीं आवश्यक आहे. प्रत्येक वर्गाला स्वतंत्र अशी लहानशी लायब्ररी असावी. याशिवाय सर्व शाळे-करितां एक पुस्तकसंग्रह असावा. शिक्षकानें आठवड्यांतून एक किंवा दोन तास ( ३० मिनिटांचे खालील इयत्ताकरितां व ४५ मिनिटांचे वरील इयत्ताकरितां) इतर वाचनांकरितां ठेवावे. प्रत्येक मुलाला एक एक पुस्तक द्यावें व त्यानें त्या वेळांत होतील तितकीं पानें वाचावीं. शिक्षकानें वर्गांत हिंडून मुलांना जें अडेल तें समजावून द्यावें व मुलें लक्षपूर्वक वाचीत आहेत कीं नाहींत इकडे लक्ष द्यावें. तास झाल्यावर थोडेसे प्रश्न विचारून मुलांनीं आपल्या वेळचा योग्य उपयोग केला आहे कीं नाहीं, हें पाहावें. वाचनांत ज्यांची प्रगति बरोबर होत नसेल त्यांना शक्य ती मदत करावीं व उत्तेजन द्यावें. अशा मुलांना आठवड्यांतून एक दोन वेळां एकादें पुस्तक घरीं वाचण्यास द्यावें.

पांचव्या व सहाव्या इयत्तेंत जो धडा वर्गांत वाचावयाचा असेल तो मुलांनीं घरीं वाचून यावें. धडा समजण्यास कठीण असल्यास शिक्षकानें ज्याच्या योगानें तो धडा समजण्यास मुलांना मदत होईल असा थोडा उपोद्घात करावा.

इंग्लंड, अमेरिका, जर्मनी वगैरे सुधारलेल्या देशांत मुलांच्या मनांतील वाचनाला मोठ्यानें वाचण्याइतकेंच महत्त्व दिलें जातें. आपल्याइकडील शाळांतून आतां या विषयाकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे. आपल्याइकडील पुष्कळ शिक्षकांना धड्यांतील सारांश अगर कवितेचा सारांश स्वतांच

सांगण्याची वाईट खोड असते. यायोगानें मुलांचें कुतूहल व जिज्ञासा हीं नष्ट होतात व स्वतांच्या प्रयत्नानें ज्ञानामृताचें सेवन करण्याची त्यांची हौस कमी होते. स्वतांचे प्रयत्नानें ज्ञानामृताचें पान करण्यांत जें सुख व जो आनंद आहे, तें सुख व तो आनंद दुसऱ्यानें धरून बांधून ज्ञानामृताचे चमचे पाजल्यानें कधीं होणार नाहीं. शिक्षकानें स्वतां धड्याचा सर्व गोषवारा सांगावयाचा, नंतर शब्दांचें पृथक्करण करून सर्व व्युत्पत्ति सांगावयाची, मग स्वतांच सर्व स्पष्टीकरण करावयाचें व नंतर मुलांनीं चार चार, पांच पांच ओळी वाचावयाच्या, अशीच जर वाचन शिकविण्याची पद्धति ठेविली, तर मुलांना या धड्यांत मौज ती कशी वाटणार व त्यांच्या बुद्धीला व्यवसाय कसा मिळणार ? वर्गातील क्रमिक पुस्तकांशिवाय एक दोन पुस्तकें शिक्षकानें पुरवणी वाचनाकरितां घेतलीं पाहिजेत. हीं पुस्तकें मुलांनीं भराभर वाचावीं. शिक्षकानें अगदीं अवश्य तेवढेंच थोडें स्पष्टीकरण करावें. मुलांना भराभर मनांत वाचतां यावें, त्यांचा शब्दसंग्रह वाढावा, त्यांना वाचनाची गोडी लागावी हे हेतु या पुरवणीवाचनानें साधावयाचे असतात. प्रत्येक वर्गास पुरवणीवाचनाकरितां लहानसा तरी पुस्तकसंग्रह असल्याशिवाय मुलांना मनांत वाचतां येणें शक्य नाहीं व त्यांना वाचनाची गोडी लागणेंही शक्य नाहीं. शालाधिकारी, म्युनिसिपालिटीचें व लोकलबोर्डाचें स्कूलबोर्ड यांनीं या गोष्टीकडे लक्ष दिलें पाहिजे.

आपल्या मराठी भाषेंत लहान मुलांना वाचण्यास योग्य अशीं पुस्तकें फार थोडीं आहेत, पण दिवसानुदिवस हा संग्रह वाढत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे. पुढें इयत्तावार अगदीं सोप्या व चांगल्या छापलेल्या ५० पुस्तकांची यादी दिलेली आहे. ही यादी आणखीही वाढवितां येईल. पुढील अंकांत या यादीची पुरवणी देण्याचा विचार आहे.

## शिशुवर्ग.

| पुस्तकाचें नांव. | लेखक अगर प्रकाशक. | किंमत आ. पै. |
|---|---|---|
| १ शिशुपाठमाला ( हें पुस्तक टेक्स्ट बुक म्हणून मंजूर झालें आहे. ) | म. का. कारखानिस | २–६ |
| २ मनोरंजक पाठ | ,, ,, | ४–० |
| ३ बालबोध बाल पुस्तक | रा. फफे | १–९ |
| ४ सोपे धडे | रा. साने | ३–० |
| ५ प्रवेशिका ( नागपूर व वऱ्हाड एथील शिशुवर्गाकरितां लिहिलेलें ) | ऑक्सफोर्ड प्रेस | २–९ |
| ७ मुलांचें मनोरंजन भाग १।२ | | २–० |

## पहिली इयत्ता.

| | | आ. पै. |
|---|---|---|
| १ मनोरंजक पाठ | म. का. कारखानीस | ४–० |
| २ चिमकुली इसापनीति | रा. ग. गडकरी | २–० |
| ३ अद्भुत कथा | मिस्. आर. नवलकर | ६–० |
| ४ बालबोध गोष्टी भाग १ ला | रा. महाजन | ३–० |
| ५ ,, ,, ,, २ रा. | ,, ,, | ३–० |
| ६ मध्यप्रांताचें पहिलें पुस्तक | ऑक्सफोर्ड प्रेस मुंबई | ३–६ |
| ७ निर्णयसागर पहिलें पुस्तक | निर्णयसागर प्रेस ,, | १–६ |
| ८ लहान प्राण्यांच्या गोष्टी | चित्रशाळा | |

| पुस्तकाचें नांव. | लेखक अगर प्रकाशक. | किंमत. |
|---|---|---|
| | | आ. पै. |
| ९ मुलांकरितां कविता | म. का. कारखानीस | ८—० |
| १० बालगीत | रा. लिमये | ४—० |
| ११ बालगीत संग्रह | रा. कुलकर्णी | ४—० |
| | इयत्ता २ री. | ५—० |
| १ मध्यप्रांताचें दुसरें पुस्तक | ऑक्सफोर्ड प्रेस | |
| २ बाल रामायण | रा. वा. गो. आपटे | ४—० |
| ३ बालभारत | ,, ,, ,, | ५—० |
| ४ निर्णयसागर दुसरें पुस्तक | रा. ओक | २—० |
| ५ सुबोध रामायण | रा. करमरकर | ५—० |
| ६ सुबोध भारत | ,, ,, | ६—० |
| ७ अगदीं सोपें रामायण | रा. वा. गो. आपटे | ६—० |
| ८ बालगीत | रा. लिमये | १४—० |
| ९ मुलांकरितां कविता | रा. कारखानीस | ८—० |
| १२ मुलांकरितां बोधपर गोष्टी भाग १।२।३ | रा. दामले | ६—० |
| १३ नऊ रत्नें | ,, | २—० |
| १४ मुलांस नवी देणगी | ,, | २—० |
| १४ आमचे भाऊबंद | रा. गोखले | ३—० |
| १६ माझा मुंबईचा प्रवास | ,, | ३—० |
| १७।१८ इसापनीति भाग १।२ | किताबखाना पुणें. | ७—० |

इयत्ता ३ री.

| | | |
|---|---|---|
| १ मध्यप्रांत तिसरें पुस्तक | ऑक्सफोर्ड प्रेस | |

| पुस्तकाचें नांव. | लेखक अगर प्रकाशक. | किंमत. आ. पै. |
| --- | --- | --- |
| २ निर्णयसागर तिसरें पुस्तक | रा. ओक | |
| ३ रामायणांतल्या सोप्या गोष्टी | रा. वा. गो आपटे | ६-६ |
| ४ भारतांतील सोप्या गोष्टी | ,, ,, | ६-६ |
| ५ मनी आणि मोत्या | ,, ,, | ६-६ |
| ६ बालरंजनमाला भाग १ला | रा. करमरकर | ५-० |
| ९ मुलांकरितां बोधपर गोष्टी. भाग १।२।३ | ,, ,, | ५-० |
| १० एक दिवसाचे सुटींत | रा. वा. गो. आपटे | ६-६ |
| १२ महर्षींचा प्रसाद द्रोण १ ला व २ रा. | ,, ,, | ६-० |
| १३ पंचतंत्र | रा. आंबेकर | १-०-० |
| १५ इसाबनीति | रा. दामले | १४-९ |
| १५ ,, | चित्रशाळा | १-०-० |
| १६ मुलांकरितां कविता | रा. म. का. कारखानीस | ८-० |
| १७ आनंदाची फूलबाग | ( आनंद प्रेस ) | ५-० |

इयत्ता ४ थी

| | | |
| --- | --- | --- |
| १ पंचतंत्र | रा. आंबेकर | १-०-० |
| २ इसाबनीति | | ०-१४ |
| ३ सायंकाळची करमणूक | रा. दामले | ६-० |
| ५ बाळमित्र भाग १ ला. व २ रा. | | |
| ६ इनामदारांचा बाळू | रा. बा. भा. जोशी | १-८-० |
| ७ हिंदुस्तानच्या इतिहासांतील गोष्टी | रा. मोडक | ८-० |
| मध्यप्रांत चवथें पुस्तक | ऑक्सफोर्ड प्रेस | |
| निर्णयसागर चवथें पुस्तक | रा. ओक | |

# महाराष्ट्र–साहित्य–संमेलन.

—— :०: ——

१२ वें महाराष्ट्र-साहित्य-संमेलन पुणें येथें मे महिन्याच्या २२, २३, २४ तारखांस भरलें होतें. संमेलनाकरितां महाराष्ट्र, इंदूर, ग्वाल्हेर, नागपूर, वऱ्हाड वगैरे भागांतून बरेच प्रतिनिधि आले होते. या वर्षींच्या संमेलनाचें अध्यक्षस्थान प्रसिद्ध मराठी नाटककार व विनोदी लेखक रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांस दिलें होतें. संमेलनाच्या सकाळची बैठक किर्लोस्कर नाटकगृहांत असे व दुपारीं नूतन मराठी विद्यालयाच्या प्रशस्त दिवाणखान्यांत असे. संमेलनाला सुरुवात रविवारीं सकाळीं झाली. प्रारंभीं स्वागतमंडळाचे अध्यक्ष रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं जमलेल्या प्रतिनिधींचें स्वागत केलें व महाराष्ट्र साहित्य-संमेलनाचा पूर्वींचा इतिहास थोडक्यांत सांगितला. यानंतर इचलकरंजी संस्थानचे विद्वान् अधिपति श्री. बाबासाहेब घोरपडे यांचें सुश्राव्य भाषण झालें. त्यांत त्यांनीं मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ कोणत्या दिशेनें प्रयत्न झाले पाहिजेत याचें दिग्दर्शन केलें. यानंतर संमेलनाचे अध्यक्ष रा. कोल्हटकर यांचें सुमारें दीड तास भाषण झालें. मागील वर्षीं शारदासंमेलनाच्या उत्सवप्रसंगीं त्या उत्सवाचे अध्यक्ष रा. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं मराठी भाषा मृत्युपंथाला लागली आहे असें विधान केलें होतें तें योग्य नाहीं, हें रा. कोल्हटकर यांनीं सप्रमाण दाखविलें. मराठी भाषेची थोडीफार अभिवृद्धिच होत आहे, तिच्यांत हळू हळू उत्कृष्ट ग्रंथरचना होत आहे, गेल्या २५ वर्षांत कांहीं उत्कृष्ट मराठी लेखकांनीं आपल्या मातृभाषेची महत्त्वाची सेवा केली आहे, मराठी भाषेंत गेल्या २५ वर्षांत कांहीं प्रतिभासंपन्न कवि व नाटककार निपजून त्यांनीं मराठी भाषेच्या साहित्यांत रमणीय भर टाकिली आहे वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितल्या व मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ कोणते प्रयत्न होत आहेत व झाले पाहिजेत याचें त्यांनीं उत्कृष्ट विवेचन केलें. दुपारीं विषयनियामक सभा भरून कांहीं महत्त्वाचे ठराव पास करण्यांत आले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं कांहीं निबंध वाचण्यांत आले. तिसऱ्या दिवशीचाही कार्यक्रम याचप्रमाणें होता. संमेलनांत बऱ्याच स्त्रियांनींही भाग घेतला होता. बीभत्स वाङ्मयाचा निषेध करण्याचे कामीं दोघा भगिनींनीं जें धैर्य दाखविलें तें खरोखरच वर्णनीय होतें. साहित्यसंमेलनाच्या ठरावांपैकीं कांहीं महत्त्वाचे ठराव दुसरीकडे दिले आहेत. यंदांचें साहित्यसंमेलन मोठ्या आनंदानें पार पडलें. मराठी साहित्यपरिषदेला याप्रसंगीं पन्नास हजार रुपयांची देणगी मिळाल्याची आनंददायक बातमी याच वेळीं प्रसिद्ध करण्यांत आली.

———

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
ता..........

# कृष्णाकुमारी.

---

## एक अंकी नाटक.

---

**पात्रें:**

| | |
|---|---|
| भीमसिंग— | उदेपूरचा राजा. |
| विजयसिंग— | त्याचा धाकटा भाऊ. |
| प्रधान. | |
| अजितसिंग— | भीमसिंगाचा सरदार. |
| कृष्णाकुमारी— | भीमसिंगाची मुलगी. |
| राणी— | तिची आई. |
| जसवंती, जयमती, किशोरी | कृष्णेच्या मैत्रिणी. |
| मालती— | कृष्णेची दासी. |

# कृष्णाकुमारी

## एक अंकी नाटक.

### प्रवेश १ ला.

**स्थलः**—राजवाड्याच्या बागेंतील देऊळ.

( जयमती, किशोरी, जसवंती वगैरे सख्यांसह कृष्णाकुमारी शंकरापुढें प्रार्थना करीत असतांना पडदा उघडतो. )

**मुलीः**— ( हात जोडून )

पद.

( भो परमेश्वर या चालीवर. )

हे प्रभु पावन तूं जगजीवन परमेशा
नमुं तुज हे जगदीशा
भालीं चंद्र शिरीं तव गंगा
अघहर शुभकर
सुधवल तनु तव
शिवहर शंकर ॥ ध्रु. ॥

नमिति बालिका तव चरणांला
सुमनें अर्पिति
तुजला विनविति
दे तूं सन्मति ॥ ध्रु० ॥

**जयमतीः**—भगवान् एकलिंगजी आमच्या कुमारीला दीर्घायु करो.

**किशोरीः**—भगवंताच्या कृपेनें कुमारीची कीर्ति भरतखंडांत पसरो.

**जसवंतीः**—भगवंताच्या कृपेनें आमच्या सखीला उत्तम वर लाभो आणि गौरी शंकराला माळ घालून सुखी झाली तशी आमची सखी सुखी होवो.

**जयमतीः**—अग जसवंती, तुला माहीत नाहीं. आपल्या कुमारीला आतांपासून मागण्या सुरू झाल्या आहेत. आजच मारवाडचे राजे मानसिंह व अंबरचे राजे जगत्सिंह यांच्याकडून दिवाण व ब्राह्मण आले आहेत.

**किशोरी**:—वाहवा ! वाहवा ! मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. लवकरच हें नगर ताईसाहेबांच्या लग्नाकरितां आलेल्या पाहुण्यामंडळींनीं गजबजून जाईल व आमची सखी आम्हांला सोडून मरुदेशाची अगर अंबरची स्वामिनी होईल. सखे, तूं राणी झालीस म्हणजे आम्हां गरीब मैत्रिणींची तुला आठवण होईल का ग ? तूं आम्हांला भेटशील का ग !

**जसवंती**:—अग, एकदां लग्न झाल्यावर कसल्या गांठी अन् कसल्या भेटी ! एका पर्वतापासून निघालेल्या दोन नद्या पुन्हा ज्याप्रमाणें एकमेकींना भेटत नाहींत त्याप्रमाणें रजपूत कुमारीही विवाह झाल्यावर एकमेकींना भेटत नाहींत. त्यांत आपली सखी तर राणी होणार. लग्न झाल्यावर ती उदेपूरला येईल कीं नाहीं याचीच वानवा, अग, या रजपुतांच्या राजकारणांत त्यांच्या पोरींची नेहमीं दैनाच उडते. पण कुमारी. गडे तूं अगदीं गप्प कां बसली आहेस ?

**जयमती**:—आज किनई तूं नेहमींसारखी आनंदांत नाहींस. आज तुझा वाढदिवस. आईसाहेबांनीं आम्हां सर्व मैत्रिणींना बोलाविलें व आनंदांत दिवस घालवावयास सांगितलें. पण ताई, तूं जशी आनंदांत दिसावयास पाहिजे तशी दिसत नाहींस.

**किशोरी**:—अग तिच्या मनांत सारखे विचार चालले असतील कीं अंबर पसंत करावं कीं जोधपूर पसंत करावं.

**कुमारी**:—जयमती खरं सांगूं का तुला ? सकाळपासून एकसारखी माझ्या मनाला हुरहुर लागली आहे. मीं काल देवी पद्मिनीचें चरित्र वाचलं. त्या सतीचें चरित्र वाचून माझ्या मनाला भारीच आनंद झाला. त्या महासतीचें शौर्य, स्वाभिमान, पतिभक्ति, धर्मनिष्ठा इत्यादि गुण पाहून मला तिजबद्दल अत्यंत पूज्यबुद्धि वाटली. मीं तिचें तें चरित्र पुन्हा पुन्हा वाचलें. देवी पद्मिनी आपल्या बरोबर ३०० रजपूत स्त्रिया घेऊन जेव्हां अग्नींत शिरली त्या वेळचें तिनें म्हटलेलें गाणें अजून माझ्या कानांत कोणी गात आहे असें मला वाटतें.

( पद—चंद्रकांत रायाची कन्या या चालीवर )

**रजपुतबाला या मृत्यूला कधिंही नच भीती**
**संकटिचा हा मित्र जिवाचा ऐसें त्या गणती**
**मानरक्षणा यशोरक्षणा धर्माचे साठीं**
**देशहितास्तव मृत्यूचा तो आश्रय त्या घेती**

खरंच. आपल्या रजपूत मुलींचें आयुष्य किती दुःखद आहे. मुलगी जन्मास आल्याबरोबर आईबापांस अत्यंत दुःख होतें. तिच्या लग्नाच्या काळजीनें ते झुरणीला लागतात बरं लग्न झाल्यावर तरी तिला सुख आहे का ? सवतीच्या मेळ्यामध्यें तिला कसंतरी आपलं आयुष्य घालवावं लागतं.

**जयमतीः**—कुमारी, या मंगलकालीं असल्या अमंगल विचारांनीं तूं आपल्या मनाला कां वाईट वाटून घेत आहेस ? तुला देवानें अप्रतिम रूप दिलें आहे. बाप्पा रावळाचे उच्च घराण्यांत तूं जन्माला आलेली आहेस. महाराज व आईसाहेब तुला जीव कीं प्राण करीत आहेत. सर्व सुखें तुजपुढें आज हात जोडून उभीं आहेत. ईश्वरानें तुला कांहीं कमी केलें नाहीं.

**कुमारीः**—खरंच. जयमती ईश्वरानें मला कांहीं कमी केलें नाहीं. पण आज किनई काय असेल तें असो. माझ्या मनाला एकसारखी हुरहुर लागली आहे. मी तुमच्या बरोबर आनंदी होण्याचा प्रयत्न करीत आहें. पण पुनः पुन्हा भयंकर व खिन्न विचारांनीं माझें मन भरून जात आहे.

**जसवंतीः**—कुमारी, तूं अलीकडे भारी वाचूं लागली आहेस, त्याचा हा परिणाम आहे. तुला वाटतें कीं मी आतां प्रौढ झालें आहें. आतां माझे खेळण्याचे, गाणीं गाण्याचे दिवस गेले. पण सखे, अद्यापि तूं बालिका आहेस ही गोष्ट विसरतेस यामुळें भलत्याच विचारांनीं तुझं मन उदास होतें. चल मी तुला गाणीं म्हणून दाखवितें. किशोरी आपल्या विनोदानें तुला रमवील, जयमती तुला आनंदीआनंद असणाऱ्या गोष्टी सांगेल. चल आपण हसूं, खेळूं, गाऊं. चला आपण आतां बागेंत जाऊं. तेथें तुझ्या मनाला आनंद वाटेल. किशोरी, पण आईसाहेब अद्यापि कशा आल्या नाहींत ? त्या कुमारीला प्रोक्षण करणार आहेत व दिवा ओवाळणार आहेत.

**जयमतीः**—या पाहा, आईसाहेब आल्या.

( राणी येते. )

**राणीः**—मुलींनो, तिकडे जेवणाची सर्व तयारी झाली आहे. मी कुमारीला आतां प्रोक्षण करितें व दिवा ओवाळतें. बाळ, चौरंगावर बस. या पवित्र गंगोदकानें मी तुला प्रोक्षण करितें. गंगामातेच्या धवल जलाप्रमाणें तुझी कीर्ति विमल राहो. ( दिवा ओवाळते व अक्षता डोक्यावर टाकते. ) ईश्वर तुला उदंड आयुष्य देवो.

**जसवंतीः**—आईसाहेब, आमच्या प्रियसखीला आजच्या मंगलप्रसंगीं देण्याकरितां आम्ही कांहीं वस्तु आणल्या आहेत. आमची गरीबीची पण प्रेमानें दिलेली भेट आमची सखी आनंदानें स्वीकारील. खरं ना ताई ?

**राणीः**—मुलींनो, हें कांहीं सांगावयास पाहिजे काय ? तुमचें तिच्यावरील हें प्रेम पाहून मला अतिशय आनंद होत आहे. ( मुली कुमारीला निरनिराळ्या भेटी देतात. ) चला, मुलींनो, तिकडे पानें वाढलीं असतील. जाण्याचे आधीं आपण श्रीएकलिंगजीला आरती ओवाळून जाऊं. मग तुम्ही जेवा व बागेंत खेळावयास जा.

( आरती ओवाळतात )

पद

जय त्रिपुरारे, जय मदनारे, जय अघनाशा दुरितहरे।
तव नामानें, गुणगानानें, तुझिया ध्यानें ताप सरे।
मुनिजन ध्याती सुरगण गाती, पन्नग पूजिति तुजशि हरा
तारागण तव गुणगणं गाती नाभें आक्रमती पथ सारा
माता त्राता भवभयहर्ता सर्व सुखाचा तूं दाता
संकटमाला—

( एकदम एक दासी प्रवेश करिते. )

**दासीः**—सुरू झाली, सुरू झाली. जोरांत सुरू झाली.

**सर्व मुलीः**—काय म्हणतेस ! ही काय भानगड आहे !

**राणीः**—मालिनी, काय झालें ! अशी घाबरलीस कां !

**दासीः**—बाईसाहेब, आपल्या वाड्यासमोर जोधपूरचे आलेले पाहुणे व अंबरचे सैनिक यांच्यामध्यें एकदम लढाई सुरू झाली. त्यांना सोडविण्याकरितां आपले सरदार मध्यें गेले असतां त्यांजवर दोन्ही बाजूच्या लोकांनीं हल्ला केला. यामुळें आपल्या नगरचे लोकहि लढाईंत सामील झाले. अशी एकच दंगल वाड्यापुढें माजली आहे.

**राणीः**—काय म्हणतेस !

( राणी घाबऱ्या घाबऱ्या निघून जाते. मुलीहि तिच्या मागोमाग जातात. )

पडदा पडतो.

## प्रवेश २ रा.

प्रधान राजवाड्याचे समोरून येत आहे.

**प्रधानः**—आमच्या उदेपूरला सध्यां फार वाईट ग्रह आले आहेत. आज आठ महिने झाले एक दिवस देखील आम्हांला सुखाचा व शांततेचा गेला नाहीं. राजकुमारीला मागणी घालण्याकरितां जगत्सिंहानें आपले सरदार व उपाध्याय धाडले. ती मंडळी ज्या दिवशीं उदेपूरला आली त्याच दिवशीं मानसिंहाची मंडळी कुमारीला मागणी घालण्याकरितां आली, आणि उभयपक्षांची राजवाड्याचे समोरच चकमक झाली, तींत त्यांचे व त्यांना सोडविण्याकरितां गेलेले आमचे सरदार कांहीं ठार झाले व कांहीं जखमी झाले. अशा प्रकारें राजकन्येच्या वाङ्निश्चयाचेच दिवशीं या नगराला रक्ताचा सडा घातला. मानसिंह म्हणतो, ' राजकन्या मला न दिली, तर मी उदेपूरची धुळधाण करीन. ' जगत्सिंह म्हणतो, " राजकन्या मला न दिल्यास मी उदेपूर शहर जमीनदोस्त करीन. ' रजपुतांची आपसांत यादवी चाललेली पाहून बाहेरच्या शत्रूंस अनायासेंच फावलें व मराठे लोक धावून आले. त्यांनीं मानसिंहाचा पक्ष धरला व

उदेपुरावर स्वारी केली. अशा पेंचांत आम्ही सांपडलों आहों. आम्हां रजपुताचा पूर्वीचा अभिमान व शौर्य हीं नाहींशीं झालीं आहेत. आपसांतील यादवीमुळें वाटेल तो आम्हांस दडपीत आहे. आम्ही रजपूत गोगलगाईपेक्षां गोगलगाई झालों आहों. मी म्हणतों, आम्ही अजूनही पूर्वींच्या शौर्यानें लढलों, पूर्वींचा अभिमान धरला, तर शत्रु आमच्या वाटेस जाणार नाहीं. या मराठ्यांनीं, त्यांच्या पेंढाऱ्यांनीं व पठाणांनी आम्हांला त्रस्त केलें आहे. आमच्या पोराबाळांनाही हे लोक सुखानें राहूं देत नाहींत. मानसिंहाला व जगत्सिंगाला हा लग्नाचा उपद्व्याप करण्याची जरूर तरी काय आहे ? प्रत्येकास दहा वीस बायका असतांना आणखी एक लग्न करून एक गरीब मुलगी सवतींच्या घोळक्यांत घालण्याची दुर्बुद्धि यांना कां व्हावी ? बरें, महाराजांनीं मला या वेळेला कां बरें बोलाविलें असेल ? अरे वा ! मी आपल्या विचारांचे भरांत राजवाड्याजवळ येऊन ठेपलों. आतां आंत जावें. हे पहा महाराज व अजितसिंग बोलत बसले आहेत.

[ भीमसिंग व अजितसिंग बोलत असतांना पडदा उघडतो. ]

**भीमसिंगः**—यावें प्रधानजी, आम्ही तुमचीच वाट पाहात आहोंत. हे अजितसिंग आतांच मानसिंगाकडून आले आहेत. मानसिंगानें अमीरखानास आपल्या मदतीस बोलाविलें आहे व तो आपल्या सैन्यासह उदेपुरावर चाल करून येत आहे. एका बाजूनें मानसिंगाचें सैन्य व दुसऱ्या बाजूनें अमीरखानाचें सैन्य या दोहोंचे तडाख्यांत उदेपूर सांपडलें आहे. अमीरखानानें उदेपूर जाळण्याची प्रतिज्ञा केली आहे. जयपूरचे लोक आतां आमच्यावर रागावले आहेत व ते आमच्या मदतीस येत नाहीत. या संकटांत आतां काय करावें हें मला बिलकूल सुचत नाहीं.

**प्रधानः**—मला वाटतें आपण आपले लोक जमवून एकदा निकराचा हल्ला करावा व संकटाला तोंड द्यावें. उदेपूरवर एवढें मोठें संकट आलेलें पाहून भोंवतालचे रजपूत आपल्या मदतीला धावून येतील व कोणी मदतीला आलें नाहीं, तरी आपण लढून धारातीर्थीं पडूं व उदेपूरचें नांव राखूं.

**अजितसिंगः**—प्रधानजी, आपण म्हणतां ती गोष्ट खरी आहे, पण आपणांजवळ सैन्य फार थोडें आहे. अमीरखान, मराठे व मानसिंगाच्या चाळीस पन्नास हजार सैन्याशीं आपण टक्कर कशी देणार ? आपण धारातीर्थीं पडल्यावर आपल्या मुलीबाळींची स्थिति काय होणार ? अमीरखान हा अत्यंत पाषाणहृदयी मनुष्य आहे. तुम्ही शांतपणें विचार करा. रजपूत कधींही मृत्यूला भीत नाहींत. उदेपूरचे रक्षणार्थ धारातीर्थीं आपला देह विसर्जन करण्यास कोणता रजपूत तयार होणार नाहीं ? पण अशा प्रकारें साहस करण्यांत उदेपूरचें कोणचें हित होणार आहे ? खानापाशीं मोठा जय्यत तोफखाना आहे. त्या तोफखान्याचे हल्ल्यापुढें आपला निभाव कसा लागणार ! उदेपूरवर

तोफांचा हल्ला करून अमीरखानाचें सैन्य शहरांत शिरलें, तर आपल्या साहसाचा उपयोग काय?

**प्रधानः**—अजितसिंग, रजपुतांच्या मुली आपलें संरक्षण करण्यास समर्थ असतात. त्याची काळजी आपणांस नको.

**अजितसिंगः**—अमीरखानाचे दहावीस हजार बेफाम शिपाई शहरांत शिरले, तर नगरांतील मुलीबाळींवर कठीण प्रसंग गुदरणार आहे. शत्रूंनीं आपल्या मुलीबाळीं पकडून त्यांना दूरदेशीं दासी म्हणून विकाव्या यापेक्षां त्यांना आपल्या हातानें स्वर्गलोकीं धाडून त्यांच्या काळजींतून मुक्त होणें बरें नव्हे काय? कुळाला काळिमा लावण्यापेक्षां मृत्यूला मिठी मारणें हेंच आपणां रजपुतांना अधिक श्रेयस्कर वाटतें. महाराज, प्रसंग कठीण आला आहे. रजपुतांच्या स्त्रियांच्या व मुलींच्या अब्रूचा हा प्रश्न आहे.

**भीमसिंगः**—अजितसिंग या बाप्पा रावळाच्या कुळाची कीर्ति माझ्या हातून रक्षण होईल कीं नाहीं याची मला भीति वाटूं लागली आहे.

**अजितसिंगः**—महाराज, मला असें वाटतें कीं, आपण कांहींतरी घोर उपाय केला पाहिजे. राजकुमारी शत्रूंच्या हातीं लागली, तर आपली दुष्कीर्ति अजरामर होईल. शत्रूला एथून निराश होऊन लावण्याचा एक उपाय आहे. महाराज, आपण आपलें मन घट्ट केलें पाहिजे. शत्रूच्या हातून राजकुमारीचे धिंडवडे होऊं नयेत, तिचा पवित्र चेहरा शत्रूच्या दृष्टीस पडूं नये, देवलदेवी व कमलदेवी यांजवर जो प्रसंग गुदरला तो तिजवर येऊं नये म्हणून महाराजांनीं आपल्या हातानें अगर राजकुलांतील दुसऱ्या कोणाच्या हातानें तिला स्वर्गीं धाडावी व मग आपण शत्रूवर तुटून पडावें एवढाच काय तो या संकटांत मला उपाय दिसतो.

**भीमसिंगः**—काय म्हणतां अजितसिंग! कुमारीला मारण्याशिवाय दुसरा कांहीं उपाय राहिला नाहीं? येथपर्यंत ही गोष्ट येऊन ठेपली आहे!

**अजितसिंगः**—महाराज, अमीरखानानें राजवाड्यांत शिरावें, त्याच्या शिपायांनीं राणीवशांत शिरून कुमारीला धरून न्यावें यापेक्षां आपल्याच हातानें तिच्या पवित्र देहाचें रक्षण करणें बरें नव्हे काय? आपल्या कुलाच्या कीर्तीपेक्षां आयुष्याची व सुखाची काय मातब्बरी आहे. महाराज, विचार करा, मी सरळ अंतःकरणाचा व मोकळ्या मनाचा रजपूत आहें.

**भीमसिंग** ( विचार करीत स्तब्ध बसतो ):—अजितसिंग, तुम्ही म्हणतां ही गोष्ट खरी आहे. या शिवाय दुसरा उपाय राहिला नाहीं. पण हें निष्ठुरपणाचें घोर कृत्य कोण करील?

**अजितसिंगः**—विजयसिंगाखेरीज दुसरें कोणी योग्य दिसत नाहीं. प्रसंग आला

आहे, आपण त्यास समजावून सांगितलें असतां कुलाच्या कीर्तीच्या रक्षणार्थ तो हें काम करील.

**भीमसिंगः**—प्रधानजी, तुम्ही व अजितसिंग आतां जा. अजितसिंग, विजयसिंगाला मी बोलाविलें आहे म्हणून सांगा.(दोघे जातात.) ईश्वरा, काय हा प्रसंग मजवर आणला आहेस! खजिन्यांत पैसा नाहीं, राज्यांत दुष्काळ पडला आहे, शत्रु चोहोंकडून वेढा देऊन बसले आहेत. प्राणापेक्षांहि प्रिय अशा अब्रूची धूळधाण होण्याचा प्रसंग आला आहे. रजपूत राजकन्या—बाप्पारावळच्या घराण्यांतील राजकन्या—शत्रूंच्या हातीं सांपडावी, या पेक्षां ती शुद्ध कीर्तीनें स्वर्गास गेलेली बरी! पण हें मी चांगलें करीत आहें का? हा भित्रेपणाचा मार्ग नव्हे काय? हें राक्षसी कृत्य नव्हे काय? काय करूं मला हें कळत नाहीं. उदेपुराच्या रक्षणार्थ हाच एक उपाय आहे. मी दगडापेक्षांही मन घट्ट केलेलें आहे. ( विजयसिंग येतो. ) हा पहा विजयसिंग आला. विजय, मी तुला एका महत्त्वाच्या कामाकरितां बोलविलें आहे. तुझें माझ्यावर अत्यंत प्रेम आहे. तूं उदेपूरचा एकनिष्ठ सेवक आहेस. तुला आपल्या कुळाचा अत्यंत अभिमान आहे. कुळाच्या कीर्तीच्या रक्षणार्थ मी तुला एक साहसाची गोष्ट सांगणार आहें. तुझ्याशिवाय ती दुसऱ्या कोणी करणें योग्य नाहीं. ती तूं करशील असें वचन दे.

**विजयसिंगः**—दादा तुम्हीं सांगितलेलें काम मी करणार नाहीं अशी शंका तुम्हांला कां येते? आपल्या कुळाची व राज्याची कीर्ति रक्षण करण्याकरितां वाटेल तें धाडसाचें काय करण्यास मी तयार आहें. ( वचन देतो. )

**भीमसिंगः**—ऐक तर, मग मी सांगणार आहें तें काम भयंकर आहे. तुला वज्राप्रमाणें मन कठोर केलें पाहिजे. आपल्या उदेपुरावर काय संकट आलें आहे हें तुला माहीत आहेच. अमीरखान पंधरा वीस हजार सैन्यानिशीं जवळ येऊन ठेपला आहे. एक दोन दिवसांत उदेपुरावर तोफांचा मारा करून तें धुळधाणीस मिळविण्याची त्यानें प्रतिज्ञा केली आहे. मानसिंगाचें सैन्य त्याचे मदतीला तयार आहे. कृष्णाकुमारीला धरून नेण्याचा अमीरखानानें विचार केलेला आहे. मानसिंग अमीरखानाच्या हातांतील बाहुलें आहे. अमीरखानाचे सैनिक कोणत्या प्रकारचे आहेत हें तुला माहीत आहेच. आपण सर्व लढून धारातीर्थी पडण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. पण बाप्पा रावळाच्या कुळांतील राजकन्या, तुझी आवडती कृष्णा अमीरखानाचे हातीं पडणें तुला आवडेल काय?

**विजयसिंग**:—दादा असा कठीण प्रसंग आल्यास रजपुत कुमारांच्या हातांतील खंजीर त्यांना स्वतांला स्वर्गलोकीं नेण्यास तयार असतो.

**भीमसिंग**:—कृष्णा लहान आहे. पद्मिनीसारख्या प्रौढ स्त्रियांनीं जी गोष्ट केली ती ती स्वतां कशी करील? आपणांलाच कठोर झालें पाहिजे. आपली कृष्णा

शत्रूंच्या हातीं लागून तिची विटंबना व्हावी यापेक्षां आपणच आपल्या हातानें तिला स्वर्गलोकीं धाडावें हें बरें. कृष्णेला अमीरखानाच्या तावडींतून सोडविण्याचा हाच एक उपाय आहे. तूं किंवा मीं हें काम केलें पाहिजे. दुसऱ्या कोणाचा अपवित्र हात तिच्या पवित्र शरिरास लागतां कामा नये.

**विजयसिंग**:-- दादा, हें कठीण काम माझ्या हातून कसें होईल ? कृष्णेला मारण्याच्या नुसत्या कल्पनेनें माझ्या अंतःकरणांत कालवाकालव होत आहे.

**भीमसिंग**:--विजय, माझ्या मनाला किती वेदना होत असतील याची कल्पना कर. कृष्णेला वांचविण्यास हा एकच उपाय आहे व तो तूं किंवा मीं केला पाहिजे. विजय, बोल तूं कबूल आहेसना हें करण्याला? विजय,विजय, बोल. माझें डोकें बिचारांनीं भडकून गेलें आहे. मी वेडा झालों आहें. तूं हें काम करीत नसशील, तर तें मला केलें पाहिजे व तें मध्यरात्रीं पार पाडलें पाहिजे.

**विजयसिंग** :—दादा, हें कार्य नशिबीं आलें आहे ! होय; करितों मीं हें काम.

**भीमसिंग** :—जा, मनघट्ट कर. कुळाची अब्रू बचाव. एवढें झालें म्हणजे तूं व मी मरावयाला आनंदानें तयार होऊं.

**विजयसिंग** :—बरें तर मी जातों.

**भीमसिंग** :—देवा, देवा, असा प्रसंग वैऱ्यावरही आणूं नको. मी वेडा झालों आहें. माझें डोकें फुटत आहे. ( पडदा पडतो ).

## प्रवेश ३ रा.

( कृष्णाकुमारी पलंगावर बसली आहे व जवळ दासी उभी आहे. )

**दासी**:—ताईसाहेब, आतां रात्र बरीच झाली आहे. जिकडे तिकडे सामसूम झालें आहे. राजवाड्यांत पहारेकऱ्यांच्या आवाजाशिवाय दुसरा कोणताही आवाज ऐकूं येत नाहीं. अजून आपणांस झोप कशी येत नाहीं ?

**कृष्णा**:—मालती, अलीकडे किनई माझी झोपच उडाली आहे. पूर्वीं मला किती चांगली झोप यायची. एकदां पडलें कीं सकाळ शिवाय जागी व्हायची नाहीं. आतां मला लवकर झोप लागत नाहीं व लागलीच तर अनेक भयंकर स्वप्नें पडतात. मग मला असें वाटतें कीं उठावें व बागेंत हिंडावें. मी अलीकडे लवकर निजतच नाहीं. पृथ्वीराजरासे, तुळशीदासाचें रामायण किंवा मीराबाईचीं भक्तिपर पद्यें वाचीत बसतें.

**दासी**:—पण ताईसाहेब, वाचनांत तरी कोठें तुमचें लक्ष आहे ? मी मघांपासून पाहातें आहें. तुम्ही एक पुस्तक घेतां त्याचीं कांहीं पानें चाळतां. पुन्हा तें ठेवून देतां व दुसरें घेतां. असें तुमचें सारखें चाललें आहे. आतांच रामायण वाचतांना तुमच्या

डोळ्यांतून अश्रु पडूं लागले. मग तुम्ही सचिंत बसलां व तें पुस्तक तुम्हीं ठेवून दिलें.

**कृष्णा:**—मालती, रामचंद्र वनांतून परत आले. त्यांना राज्याभिषेक झाला. ते सीतादेवीसह आनंदांत काळ घालवूं लागले. पण लोकांना सीतादेवीच्याबद्दल शंका वाटूं लागली. मग रामचंद्रानें ती गर्भवती असतांनाही तिला घोर अरण्यांत सोडिलें. पुढें तिला वाल्मीकि ऋषीनें आश्रमांत नेलें. तेथें तिचें व तिच्या पुत्रांचें संगोपन केलें. पुढें रामानें अश्वमेध केला. घोडा लवानें धरला. रामचंद्र घोडा सोडविण्यास तेथें आले. वाल्मिकीनें त्यांची, सीतेची व लवकुशाची भेट करविली. सीतेला रामचंद्रानें अयोध्येस नेलें. पण प्रजाजनांला आपणाबद्दल शंका वाटत आहे असें पाहून तिनें पृथ्वीला आपणास पोटांत घेण्याविषयीं प्रार्थना केली. मग पृथ्वी दुभंग झाली व सीता पृथ्वीच्या पोटांत अदृश्य झाली. सीतादेवीनें पृथ्वीच्या पोटांत उडी घेण्यापूर्वी रामचंद्राचा जो निरोप घेतला तो वाचून माझ्या डोळ्यांत अश्रु आले. मालती, तुझा आवाज गोड आहे. हें गाणें मला म्हणून दाखव पाहूं.

**दासी:**— ( पुस्तक घेते व गाणें म्हणते. )

( चंद्रकांत राजाची कन्या या चालीवर. )

**मत्प्रियकांता श्रीरघुनाथा निरोप द्या मजला**
**सांभाळा या पुत्रांना मी जातें स्वर्गाला**
**दुःखासाठीं जन्मा आलें दुःखित मी झालें**
**जनकजननिला पतिलाही म्यां शोकीं बुडवीलें**
**राज्य सोडुनी आपण गेलों वनवासा जेव्हां**
**प्राण सोडिती शोकीं बुडुनी मामंजी तेव्हां**
**रावण नेई कपट करोनी मजला लंकेला**
**मम दुःखानें नाथा तुम्ही शोकीं बहु बुडला**
**विलाप केला आपण ऐकुनी पशुपक्षी रडले**
**दुष्टेनें म्यां दुःख आपणां ऐसें बहु दिधलें**
**परतुनि येतां अयोध्येस या नगरीचे जन ते**
**पाहुनि मजला साशंकित बहु दुःखित झाले ते**
**सोडुनि आपण घोर वनीं मज दुःखित बहु झाला**
**ब्रह्मज्ञानी जनक तरीही दुःखें मम रडला**
**जन्मभरी मी रडलें प्रियजन सारे रडवीले**
**नाथा आतां निरोप द्यावा विसरुनियां सगळें**

**कृष्णा:**—( अश्रु पुसून ). किती गोड गाणें म्हटलंस ! मालती, मला देखील असें वाटूं लागलें कीं, सीतादेवीप्रमाणेंच मी स्वतः दुःख भोगण्यास आणि मजकरितां दुस-

त्याला त्रास देण्यास जन्मास आलें आहे. माझ्याकरितां चाललेल्या या लढाया, त्यांचेमुळें लोकांना होत असलेलीं दुःखें, आईला व बाबांला मजकरितां होत असलेल्या यातना मला पाहवत नाहींत. सीतेप्रमाणेंच ही धरणी मला पोटांत घेईल, तर किती चांगलें होईल!

**मालतीः**—( बोटें कानाशिलावर मोडून ) इडा पिडा टळो आणि अमंगळ पळो, असें अभद्र आपण कां बोलतां? ईश्वरदयेनें सर्व कांहीं चांगलं होईल आणि आपण राज्याचा, ऐश्वर्याचा आणि सुखाचा उपभोग घ्याल.

**कृष्णाः**—मालती, खरं म्हणशील तर या ऐश्वर्याचा व सुखाचा मला कंटाळा आला आहे. मला असें वाटूं लागलं कीं गरीबी फार बरी. मी जर एकाद्या शेतकऱ्याचे पोटीं आलें असतें व मला हें सौंदर्य परमेश्वरानें दिलं नसतं तर प्रेमळ आईबापांच्या सहवासांत त्यांचे बरोबर कष्ट करीत मी सुखानें आयुष्य नेलं असतं आणि एकाद्या गरीब परंतु प्रेमळ,अडाणी परंतु सद्गुणी,अर्धांगीला जीव कीं प्राण मानणाऱ्या पतीची पत्नी होऊन सुखानें संसार केला असता. शेकडों सवतींच्या घोळक्यांत श्रीमंतीनें नटून निष्प्रेम असा संसार करण्यांत काय गोडी आहे! मालती, तुझें आतां वीरसेनाशीं लग्न होणार आहे. वीरसेन गरीब आहे, पण शूर, सद्गुणी, पापभीरू असा आहे. त्यांच्या सहवासांत, अंबरच्या किंवा जोधपूरच्या राण्यांच्या पत्नीला कधींही न मिळणारें सुख तुला मिळेल. मालती, तूं गेलीस कीं मला बिलकूल करमणार नाहीं.

**दासीः**—ताईसाहेब आपणही योग्य पति मिळून सुखी व्हाल. आपण इतक्या निराश कां होतां?

**कृष्णाः**—मालती, तुला आम्हां श्रीमंतांच्या दुःखाची बिलकुल कल्पना नाहीं. मला सुखाची बिलकुल आशा राहिली नाहीं. मजवर जीव कीं प्राण करणाऱ्या, माझ्या सुखाकरितां तिळतिळ तुटणाऱ्या, मजकरितांच जगणाऱ्या माझ्या आईला माझ्या मृत्यूनें अत्यंत दुःख होईल, म्हणूनच मला जगावेंसें वाटतें. नाहींतर या आयुष्यांत सुखदायक असें दुसरें कांहींही नाहीं.

( मध्यरात्रींचा चौघडा होतो. )

खरंच, बोलतां बोलतां रात्र किती तरी झाली! तुझ्याशीं बोलल्यानें माझ्या दुःखाचा भार जरा हलका झाला आहे. आतां मला झोप येत आहे. तूंही नीज जा.

( दासी जाते व कृष्णाकुमारी निजते. )

[ हातांत खंजीर घेतलेला विजयसिंग येतो. ]

**विजयः**—दादानें मजजवळून वचन घेतलें. मी उदेपुरच्या अब्रूच्या बचावासाठीं, चितोडच्या राजघराण्याचा नाश न व्हावा म्हणून, रजपूत स्त्रिया अमीरखान पठाणाच्या ताब्यांत न जाव्या म्हणून मीं हें घोर कृत्य करण्याचें कबूल केलें. पण आतां माझें

हृदय धडधड करूं लागलें आहे. माझे पाय थरथर कापत आहेत. माझ्या हातांतून सर्व अवसान निघून गेलें आहे. या विजयसिंगानें मोठमोठ्या बलाढ्य शत्रूंला पाणी पाजलें आहे. अनेक वीरांना धुळीस मिळविलें आहे. अनेक व्याघ्र व सिंह यांना आपला पराक्रम दाखविला आहे. पण आजच्या सारखी माझी स्थिति कधींही झाली नाहीं. असो, मीं वचन देऊन चुकलों आहें आणि रजपुतांच्या कल्याणाकरितां मी जें भयंकर कृत्य करणार आहें तें केल्याशिवाय इलाज काय? ( घुबडाचा आवाज होतो ) वाहवा! वाहवा! या अमंगल व घोर कृत्याला हीं अशुभ घुबडें आपली संमति देत आहेत. हा कृष्णेचा महाल. एकदां मन घट्ट करून हें भीषण व घोरकृत्य पार पाडलें पाहिजे. ही पहा कृष्णा कशी शांत निजली आहे. जवळ दासीही कोणी नाहीं. आपलें काम आटोपून एथून झटकन निघून जावें. ( कृष्णाकुमारी झोपेंत वळते. ) अरे ही जागी तर होत नाहींना? नाहीं ही गाढ झोपेंत आहे. हिचा हा चेहरा किती हसरा आहे. जणू काय झोपेंत ही हसत आहे. बाळपणापासून ही भारी आनंदी आणि प्रेमळ. मला पाहिलें कीं हिला किती आनंद व्हावयाचा. काका काका करून आपल्या चिमुकल्या हातांनीं माझ्या गळ्यांत मिठी घातल्याशिवाय तिला चैनच पडावयाचें नाहीं. एकदां भीमसिंग थट्टेनें माझ्या अंगावर तरवार घेऊन धावले तेव्हां या पोरीनें काय आकांत केला. माझ्या गळ्यांत घट्ट मिठी मारून ही रड रड रडली. भारी प्रेमळ पोरगी. मायाळू तरी किती. वेलीवरील फूल देखील तोडावयाची नाहीं. मी एकदा शिकारींत मारलेलें हरणें हिनें पाहिलें तेव्हां पाण्यानें हिचे डोळे भरून आले व मला म्हणाली 'काका, तुम्ही इतके निष्ठुर असाल असं मला वाटलें नाहीं. मीं आतां तुमच्यांशीं बोलणारच नाहीं.' मीं तिची किती समजूत केली. पुन्हां मी शिकार करणार नाहीं असें तिला सांगितलें. तेव्हां ती माझ्याशीं बोलूं लागली. बाळपणापासून माझा हिला भारी लळा. माझ्यांबरोबर जेवल्याशिवाय तिचें पोट भरावयाचें नाहीं. माझी कृष्णा भारीच गुणी, भारी प्रेमळ, भारी कोमल हृदयाची. कधीं कोणाला कठोर बोलायची नाहीं, स्वप्नांत देखील कधीं कोणाला दुखवावयाची नाहीं. पण अरे, माझे विचार कोणीकडे वाहात चालले? मी ज्या कृत्याकरितां आलों तें मी पारच विसरलों. माझ्या बाळा, तुला मला एकदां निरखून पाहूं दे. या हतभाग्याच्या दृष्टीस तूं पुन्हा पडणार नाहींस. एकच क्षण तुला पाहतों व दुसऱ्या क्षणांत मी आपला हा खंजीर—काय या माझ्या बाळाचा मी आपल्या हातानें घात करणार! हे माझे पाडसा, मी तुला आपल्या हातानें कापणार! शिव शिव शिव शिव! गिरिजानाथा? काय हा विचार! स्वतांच्या पोराचा गळा कापण्यास मी तयार झालों. हरहर, माझ्यासारखा पापी दुसरा कोणी नाहीं. व्याघ्र सिंह देखील आपल्या पिलाला ठार मारीत नाहींत आणि मी बाप्पारावळाच्या कुळांत जन्मास आलेला हा विजयसिंग आंगाखांद्यावर वाढविलेल्या जिवापेक्षांही प्रिय, कोमल, निष्कपट, निरपराधी, अशा माझ्या बाळाचा प्राण घेण्यास तयार झालों आहें! धिक्कार असो मला! देव मला

या पापाबद्दल रौरव नरकांत टाकील. मी हें पाप कशाकरितां करावयास तयार झालों? तर म्हणे रजपुतांची अब्रू वांचविण्याकरितां. ज्या रजपुतांना आपल्या पोटच्या पोरींचें रक्षण करितां येत नाहीं, अमीरखाना सारख्या पेंढाऱ्याला जे भिऊन लपून बसतात, त्यांची अब्रू तरी राहिली आहे कोठें? भित्र्या भागूबाईच्या अब्रूच्या गोष्टी हास्यास्पद आहेत. आम्ही जर खरे रजपूत असतों, तर आज या बाळाच्या रक्षणाकरितां हजारों तरवारी बाहेर निघाल्या असत्या व त्यांनीं शत्रूच्या छातीचा अंत पाहिला असता. आतांच्या रजपुतांचें शौर्य पोटच्या गोळ्याचा गळा दाबण्यांत दिसत आहे! धिक्कार असो अशा नामर्दांना! अशांनीं जगावें तरी कशाला? कृष्णा, माझ्या बाळा हा तुझा काका किती भयंकर कृत्य करीत होता! तुला हें समजलं तर तूं त्याच्याशीं एक शब्द तरी बोलशील का! माझ्या बाळाचा वध करण्याकरितां आणिलेलें हें शस्त्र मी हें असें मोडून भिरकावून देतों.

( कृष्णाकुमारी जागी होते. )

**कृष्णा**—कोण आहे तें? आतां कशाचा आवाज झाला?

**विजयसिंग**—बाळ, हा तुझा काका तुजजवळ उभा आहे.

**कृष्णा**—काका, या वेळीं तुम्ही इकडे कोणीकडे.

**विजयसिंग**—बाळ, तुला बरेच दिवस भेटलों नाहीं म्हणून पहाऱ्यावरून तुला भेटावयास आलों. ( स्वतांशीं ) वेडे पोरी, हा तुझा काका आज भयंकर कृत्य करणार होता, पण ईश्वरानें त्याला आयत्यावेळीं सद्बुद्धि दिली. ( स्वस्थ उभा राहतो. )

**कृष्णाः**—काका, नेहमींप्रमाणें तुम्ही माझ्याशीं बोलत नाहीं,आज तुम्ही चिंताक्रांत दिसतां. तुमचे डोळे पाण्यानें भरले आहेत. आज तुम्हांला काय होत आहे हें मला सांगाल का?

**विजयसिंगः**—( स्वतःशीं ) मीं या मुलीला खोटें सांगून कधींही फसविलें नाहीं ( उघड ) बाळे, आज मी एक भयंकर कृत्य करीत होतों, पण तूं दृष्टीस पडल्यावर माझा विचार पार बदलला व मीं आपलें शस्त्र भिरकावून दिलें. बाळ, तुला मी काय करणार होतों हें सांगितलें तर तूं माझा धिक्कार करशील व या पापी काकाच्या वाऱ्यास देखील उभी राहाणार नाहींस.

**कृष्णाः**—असें कधींही होणार नाहीं. बाप्पा रावळाच्या कुळांत जन्मलेला माझा शूर, सद्गुणी व मायाळू काका दुष्ट कृत्य कधींही करणार नाहीं.

**विजयसिंगः**—बाळे, तूं फार भोळी आहेस. ऐक तर. आज तुझ्या बापानें मला बोलाविलें व मजजवळून राज्याचे रक्षणाकरितां, रजपूत स्त्रियांच्या रक्षणाकरितां एक कृत्य करण्याचें वचन घेतलें. नंतर तुझ्याकरितां मानसिंग व जगत्सिंग यांनीं कसा धुमाकूळ घातला आहे, मानसिंगानें मराठ्यांचें साहाय्य घेऊन पठाण व पेंढारी रज-

पुतान्यांत कसे भरले आहेत, अमीरखानानें मानसिंहाकरितां उदेपूर जाळण्याची कशी धमकी दिली आहे हें सर्व मला सांगितलं व या सर्व भांडणाचें मूळ नाहींसें करण्याकरितां तुला म्यां मारावें असें मला सांगितलें. म्यां दुष्टानें ती गोष्ट कबूल केली व तुला मारण्याकरितां एथें आलों. पण ईश्वरानें मला सद्बुद्धि दिली व तें घोर पातक, माझ्या हातून घडलें नाहीं. कृष्णे, या बालघातकी पापी काकाशीं तूं पुन्हा बोलशील कांय !

**कृष्णाः**—काका, या उदेपूरच्या कल्याणाकरितां माझा बळी घ्यावा असें जर अवश्य आहे तर मी केव्हांही तयार आहें. बाप्पा रावळाच्या व सिद्धराजाच्या कुळांत जन्मलेली ही रजपूत कन्या मरणाला कधींही भिणार नाहीं. आणि काका, तुमच्या हातून जर मला मृत्यु येत असेल, तर याजपेक्षां थोर भाग्य कोणतें ! तुमच्या मांडीवर डोकें ठेवून, तुमच्या नेत्राकडे दृष्टी लावीत मी स्वर्गाचा रस्ता धरीन. काका, तुम्हांला मी खंजीर देतें. तुम्ही झटकन् हें काम आटपा व माझ्या वधानें रजपुतांची सर्व चिंता दूर करा. ( खंजीर पुढें करिते. )

**विजयसिंगः**—बाळे, तुझ्या या शब्दांनीं माझ्या अंतःकरणाला वेदना होत आहेत. ज्या रजपुतांना आपलें स्वतःचें रक्षण करवत नाहीं त्यांनीं जगावें तरी कशाला ? पोराबाळांना ठार करून जगूं पहाणाऱ्या या भेकड रजपुतांना धिःकार असो ! केशरी पोषाक करून कृतांतकाळाप्रमाणें शत्रूवर तुटून पडणारे यांचे पूर्वज कोणीकडे आणि पेंढाऱ्यांना भिऊन पळणारे हे भेकड कोणीकडे ? रजपूत स्त्रियां आपलें पातिव्रत्य चांगलें रक्षण करूं शकतात. त्याची काळजी या भित्र्यांना करण्याचें कारण नाहीं. बाळे, आतां यापुढें कोणी तुझ्या केसाला धक्का लावण्याचा शब्द काढील, तर विजयसिंगाची तलवार एका क्षणांत त्याला स्वर्गाची वाट दाखवील. मग तो उदेपूरचा राजा असो किंवा सेनापति असो. जा स्वस्थ नीज. माझ्या बाळाला ईश्वर सुखी राखील. मी पाहाऱ्यावर जातों. आतां माझ्यानें बोलवत नाहीं. नीज. माझ्या बाळा, स्वस्थ नीज. ( जातो ).

**कृष्णाः**—असेच जर उदेपूरचे सर्व लोक असते, तर या राज्याकडे पाहाण्यास प्रत्यक्ष काळही भ्याला असता. देवा माझ्या नशीबीं काय काय आहे हें तुलाच माहीत. ( निजते. )

## प्रवेश ४ था.

अजितसिंह रस्त्यानें जात आहे.

**अजितः**—या कृष्णाकुमारीच्या लग्नाच्या भानगडीनें आम्ही अगदीं त्रस्त झालों. ही राजकन्या नव्हे तर आम्हां रजपुतांना लागलेली ही पुरी साडेसाती आहे. ही जाईल ते दिवशीं राजस्थानला खरी विश्रांति मिळेल. आमचे शहाणे प्रधानजी व शूर

विजयसेन म्हणतात ' आपल्या पूर्वजांनीं मिळविलेली कीर्ति लक्षांत घ्या. आपण शत्रूंवर तुटून पडूं, मरून जाऊं पण आपला मान राखूं ' अहो शहाणे, तुम्ही मरून गेल्यावर तुमची मान तुम्ही राखणार कशी. पुरुषांनीं केशरी पोषाख करून मरून जाण्याचे व स्त्रियांनीं जोहार करण्याचे वेडेपणाचे दिवस आतां गेले. लोकांच्या मानाच्या किती वेडेपणाच्या कल्पना असतात. एका राजकन्येकरितां एवढा उपद्व्याप करण्याची जरूर काय ? तें कांहीं नाहीं. ही राजकन्या गेल्याशिवाय आम्हांला सौख्य व शांति कधींच मिळावयाची नाहीं. उदेपूरच्या संरक्षणाकरितां, रजपूत स्त्रियांचें पातिव्रत्य राखण्याकरितां कृष्णाकुमारीचा बळी देणें किती आवश्यक आहे ही गोष्ट महाराजांना मीं समजून सांगितली. अमीरखान पठाण आपल्या पेंढाऱ्यांचे साहाय्यानें मानसिंहाकरितां उदेपूर जाळील व रजपुत स्त्रियांची अब्रू घेईल ही दहशत मी त्यांना घातली. कृष्णेनें विषप्राशन करून देहत्याग केल्यानें सर्वांना शांति व सौख्य कसें मिळेल हेंही मी त्यांना समजून सांगितलें. कृष्णेला त्यांचे नांवानें पत्र लिहून त्यावर त्यांची सही महत्प्रयासानें मिळविली. आतां हा जालिम विषाचा तयार केलेला पेला राजकन्येकडून पिववावा म्हणजे उदेपूरच्या विपत्तीचा शेवट होईल. ( पेला काढून पाहातो ) किती काळजीपूर्वक मीं हा तयार केला आहे. या पेल्यांत किती जादू आहे. या अमृताचे सेवनानें एका घटकेंत मनुष्य इहलोकीचा प्रवास आटोपून स्वर्गाला जातो. आज राजकन्येची आई व विजयसिंग एथें नाहींत ही गोष्ट फार चांगली आहे. आतां आपण राजवाड्यांत जावें. ( जातो.

( कृष्णाकुमारी व मालती बोलत बसल्या आहेत. )

**कृष्णाः**— मालती, आज सकाळपासून आई कोठें दिसली नाहीं. आतां प्रहर दिवस झाला. इतक्यांत म्हटलं, तर आईच्या तीनचार खेपा मजकडे व्हावयाच्या.

**मालतीः**—ताईसाहेब, आईसाहेब सकाळींच एथून चार कोसांवरील गांवीं एका साधूच्या दर्शनाकरितां गेल्या आहेत. बरोबर विजयसिंह काका गेले आहेत. हा सत्पुरुष काशीकडून आला आहे व भूत भविष्य सर्व कांहीं जाणतो. आपल्याच संबंधीं विचारण्याकरितां त्या गेल्या आहेत. आतां थोड्या वेळानें त्या परत येतील.

**कृष्णाः**—मालती, माझें भविष्य मला दिसतंच आहे. आईला किनई माझ्याकरितां भारी कष्ट होत आहेत. व्रत उपास करून ती अगदीं क्षीण झाली आहे. माझ्या काळजीनें तिची झोप देखील नाहींशी झालेली आहे.

( एक दासी येते.)

**दासीः**—ताईसाहेब आपणाला भेटावयास अजितसिंग आले आहेत. त्यांनीं आपणास निरोप आणला आहे.

**कृष्णाः**—जा त्यांना आंत बोलाव.

**मालती**:—या दुष्टाची स्वारी आज इकडे कोणीकडे आली ! हें कांहीं ठीक दिसत नाहीं. ताईसाहेब, या मानभावी अजितसिंगाचें बोलणें बिलकूल खरें मानूं नका. ही पहा आलीच स्वारी.

**कृष्णा**:—अजितसिंहजी, बसा आज आपण इकडे कां आलांत ?

**अजितसिंहजी**:—महाराजांकडून निरोप घेऊन मी आलों आहें. (हळूच) निरोप फार महत्त्वाचा आहे तेव्हां म्हटलं तिसऱ्या कोणी ऐकतां उपयोगी नाहीं.

**कृष्णा**:—मालती, आईच्या महालांत जा व आई आली आहे कीं नाहीं पाहून ये

( मालती जाते. )

**अजितसिंह**:—राजकुमारी, महाराजांनीं आज अत्यंत महत्त्वाचे कामाकरितां मला धाडलेलें आहे. आज पांच सहा महिने आपल्या या उदेपुरांत काय गडबड उडाली आहे ती तुम्हांला माहीतच आहे. लढायावर लढाया चाललेल्या आहेत. शेंकडों माणसें मारलीं गेलीं. शेंकडों कुटुंबें अन्नान्न दशेला लागलीं आहेत. राजस्तानांत मारवाड, जयपूर व उदेपूर यांच्या लढायांमुळें भयंकर दुष्काळ पडला आहे. अमीरखान आपल्या सैन्यासह एथें येऊन बसला आहे व जयपूरचें सैन्यही येत आहे. अशा या कचाटींत सांपडलेल्या उदेपूरची राख रांगोळी होण्याची वेळ आलेली आहे. अमीरखान महा दुष्ट आहे. रजपूत स्त्रियांना व मुलींना अत्यंत संकटाची वेळ आलेली आहे. उदेपूरचा खजिना रिता झालेला आहे. सैन्य कमी झालें आहे. आहेत तीं माणसें लढण्यास कबूल नाहींत. महिना पंधरा दिवसांत उदेपूरची राखरांगोळी होऊन त्यांतील स्त्रियांची व मुलींची भयंकर स्थिति होईल ही कल्पना डोळ्यासमोर आली कीं अंगावर रोमांच उभे राहातात. या संकटांतून या राज्याला वांचविणें सर्वस्वीं तुमच्या हातीं आहे असें महाराजांनीं सांगितलें आहे.

**कृष्णा**:—अजितसिंगजी ! बाबांचा निरोप मला समजला. बाबांची जी आज्ञा असेल त्याप्रमाणें मी वागण्यास तयार आहें.

**आजितसिंह**:—ताईसाहेब, माझ्या नशिबीं आपल्याला महाराजांचा निष्ठुर निरोप कळविण्याचें आलेलें आहे. पण आम्हां चाकरांना आपल्या राजाकरितां, देशाकरितां मन घट्ट करून वाटेल तें काम करावेंच लागतें. राजाज्ञा कितीही निष्ठुर असो, ती प्रत्यक्ष पोटच्या पोराविरुद्ध असली तरी पाळणें हा आमचा धर्म आहे. परमेश्वरा, आजच्यासारखा प्रसंग मजवर आणण्यापेक्षां तूं मला या जगांतून नाहींसें कां केलें नाहीं ! ताईसाहेब, माझें मन घाबरत आहे, माझ्या घशाला कोरड पडली आहे, तोंडांतून शब्दही निघत नाहीं. परमेश्वरा, काय हा मजवर प्रसंग आणलास !

**कृष्णा**:—अजितसिंगजी, तुम्ही रजपूत आहां, उदेपूरचे स्वामिनिष्ठ सरदार आहां. तुम्ही धैर्य धरा व बाबांचा निरोप सांगा.

33

अजितसिंग पत्र काढून तिला देतो.

( कृष्णा, वाचते. )

माझ्या बाळे, मी हें पत्र कांपऱ्या हातानें लिहीत आहें. उदेपूरवर आलेला प्रसंग तूं जाणत आहेस. आपल्या घराण्याची अब्रू वांचविण्याकरितां व उदेपूरकरितां आपल्या कुटुंबांतील अनेक माणसांनीं बळी दिलेले आहेत. आतां पाळी तुजवर आलेली आहे. तूं स्वतां मन घट्ट करून स्वर्गाची तयारी केली पाहिजे. तुझ्या आईला यांतील कांहीं कळूं देऊं नको. विषाचा पेला तुजकडे तयार करून पाठविला आहे. तुला तुझें कर्तव्य माहीतच आहे. आणिक काय लिहूं? तुझ्या पाठोपाठ तुझा पिताही तुला भेटण्यास थोड्याच वेळांत येईल. बाळे, या निठुरपणाबद्दल तुझ्या कठोर पापी पाषाण हृदयी बाप क्षमा कर. भीमसिंग

अजितसिंग, आणा तो पेला. बाबांच्या आज्ञेप्रमाणें मी वागण्यास तयार आहें. (पेला हातांत घेते) ईश्वरा, माझ्या बाबांची चिंता दूर कर, उदेपुरावर आलेलें संकट नाहींसें कर, माझ्या आईला व काकाला माझा वियोग सहन करण्यास धैर्य दे–( पिते ) –अजितसिंग, जा. बाबांला सांगा. कृष्णा मोठ्या आनंदानें आपल्या आज्ञेप्रमाणें स्वर्गलोकीं निघाली आहे. तिनें केलेले अन्याय क्षमा करा व तिला विसरून जा. जा. शवटचें ईश्वरचिंतन मला करूं द्या.

( अजितसिंग जातो व मालती येते. )

**मालती**:—आईसाहेब अजून आल्या नाहींत.

**कृष्णा**:—बरें, मालती आज माझें मन प्रसन्न झालें आहे. किती दिवसांत मला झाप आली नाहीं, आतां येईलसें वाटतें. मजजवळ बस. तें मागील गाणं म्हण पाहूं म्हणजे मला झोप लागेल. मला झोप आली म्हणजे मी निजेन, मग तूं जा.
( मालती गाते. )

( राणी व विजयसिंग बोलत येतात. )

**राणी**:—भावोजी, त्या साधूनें सांगितलें कीं कृष्णेवर सध्यां मोठें संकट येणार आहे हें ऐकून मी फार घाबरलें आहें आणि काय करावें हें मला अगदीं सुचत नाहीं. कृष्णेचे जिवाला अपाय होण्याची मला एकसारखी भीति वाटत आहे. तिला दृष्टीआड ठेवण्याचें देखील माझ्या जिवावर येतें. आज सकाळपासून ती मला भेटली नाहीं यामुळें मी तिच्या भेटीला फार उत्सुक झालें आहें. ही पहा कृष्णा येथें बसली आहे व मालती गात आहे. बाळ, काय चाललें आहे!

**कृष्णा**:—आई बस. काका बसा, मी तुमच्या दोघांची एकसारखी वाट पहात आहें. मला तुम्हांला कांहीं सांगावयाचें आहे.

( दोघें बसतात. )

**कृष्णाः**—आई, आजपर्यंत तुला न विचारतां कोणतीही गोष्ट मीं केली नाहीं हें तुला माहीत आहेच. आज एका गोष्टींत मी तुला विचारलें नाहीं त्याची तूं मला क्षमा करशील ना ?

**राणीः**—होय बाळ, केली तुला क्षमा, बोल पाहूं तूं काय केलें ?

**कृष्णाः**—आई, माझ्याकरितां आज एक वर्षपर्यंत या उदेपूरची काय काय अवस्था झाली हें तुला माहीतच आहे. माझ्यासाठीं या उदेपुरावर भयंकर प्रसंग गुदरला आहे. अमीरखान एथें येऊन सैन्यासह बसला आहे.

**राणीः**—बरं मग तुझं काय म्हणणं आहे बाळ ?

**कृष्णाः**—माझ्यामुळें या उदेपूरचा नाश होणार आहे. तेव्हां मीं विचार केला आहे कीं हें सर्व वांचविण्यास आपलाच बळी द्यावा.

**राणीः**—इडा पिडा टळो आणि अमंगळ पळो. बाळ, तूं हें भलतेंच आज काय बोलत आहेस ?

**कृष्णाः**—माझी आई सिद्धराज व कुमारपाल यांच्या कुळांतील आहे. माझे बाबा बाप्पा रावळाचे वंशज आहेत. अशा आईबापांचे पोटीं येणारी मी मृत्यूला कशी भिईन ! रजपुतांच्या मुलींना मृत्यु पांचवीलाच पूजला आहे. अंथरुणावर पडून मरण्यापेक्षां देशावर आलेली विपत्ति टाळण्याकरितां आनंदानें मरणें बरें नव्हे काय ?

**विजयसिंगः**—पण बाळे, उदेपूरचे क्षत्रियवीर आजच नाहींसे झाले नाहींत. त्यांच्या हातांत आपल्या पोरीबाळींचें रक्षण करण्याचें सामर्थ्य भरपूर आहे. सगळे रजपूत वीर मेल्यावर स्त्रियांना जोहार करण्याची संधि आहेच. तिचा आजच कशाला विचार करावयास पाहिजे !

**कृष्णाः**—काका, तुम्ही खरे शूर आहांत म्हणून तुम्हांला असें वाटतें. उदेपूरचे लोक युद्धाला कंटाळले आहेत आणि शत्रु तर नाश करण्याला टपला आहे. या वेळेस माझा बळी दिल्याशिवाय ही विपत्ति टळावयाची नाहीं. बाबांनींही मला असेंच कळविलें आहे.

**राणीः**—काय म्हणतेस बाळ ? मला नाहीं खरें वाटत.

**कृष्णाः**—आई हें पत्र पहा. काका तुम्हीही वाचा.

( दोघेंही वाचतात. )

**विजयसिंगः**—कृष्णे, हें उदेपूर तुला कंटाळलें असेल, पण तुझा काका तुला कंटाळला नाहीं. चल आपण हें उदेपूर सोडून जाऊं. माझ्या तरवारीच्या जोरावर आपण शत्रूला फोडून पलीकडे जाऊं.

**राणीः**—खरंच बाळ. एथें आतां तुझ्या जिवाला अपाय होण्याची भीति आहे. तूं आपल्या काकाबरोबर जा.

**कृष्णाः**—आई, काय म्हणतेस ? मी एकून मरण्याचे भीतीनें पळून जाऊं व आपल्या कुळाला कलंक लावूं ? आई, अशाप्रकारें जगण्यांत तरी काय अर्थ आहे ! आई, काका, मीं मरणाचा निश्चय करून विषाचा प्याला आधींच प्यालें आहें.

**राणीः**—कृष्णे, कृष्णे, हें काय केलेंस तूं ! कोणी चांडाळानें तुझा नाश केला ! बाळे, बाळे, या चांडाळणीला तूं अखेर सोडून जाणार. बोल बाळे कोणी तुला विष दिलं. देवा देवा, ज्यानें माझ्या पाडसाची व माझी ताटातूट केली त्याचा सत्यानाश कर. देवा देवा, मजवर काय प्रसंग आणलास ! कृष्णे बाळे, एकदां मला भेट. कशी तुला दुर्बुद्धि झाली ! (रडूं लागते.)

**विजयसिंगः**—बाळे, दुष्टांनीं आपला बेत तडीस नेला. आम्हांला तूं अखेर अंतरलीस.

**कृष्णाः**—आई, काका, मजवर तुमची ममता आहेना ! माझा शेवट चांगला होत आहे. मी कुळाच्या कीर्तिकरितां, देशाच्या रक्षणाकरितां मरत आहें. आतां तुम्ही मजजवळ शांतपणें बसा. माझ्या शेवटच्यावेळीं तुमच्या शोकानें माझ्या अंतःकरणाला तीव्र वेदना होत आहेत. आई, या शेवटच्यावेळीं मजजवळ बस. माझ्याशीं ममतेनें बोल, मला तुझ्याकडे सारखी पाहूं दे. काका, तुम्ही जवळ बसा. अश्रु गाळूं नका.

**राणीः**—देवा देवा, आतां मी काय करूं ! बाळे, बाळे, हें तूं काय केलेंस !

(कृष्णा निजते.)

**विजयसिंगः**—वहिनी, कठीण प्रसंग आहे. वज्रासारखें मन घट्ट करा. बाळेच्या मनाला वाईट वाटेल. अगदीं रडूं नका. साऱ्या आयुष्यभर आपल्याला रडावयाचेंच आहे. या तिजजवळ बसा. अश्रु आवरा.

**कृष्णाः**—आई, रडूं नकोस,वाईट वाटूं देऊं नकोस. तुझ्या कृष्णेची कीर्ति जगभर पसरेल. काका, मला विसरून जा. आईला धीर द्या. या पहा मला भेटण्याकरितां वरून पद्मिनी व देवता पंचारती घेऊन येत आहेत. आलेंच, ही निघालें पहा!

(पडदा पडतो.)

## प्रवेश ५ वा.

(एका बाजूनें जयमती व दुसरीकडून जसवंती प्रवेश करते.)

**जयमतीः**—सखे जयवंती, आज किती दिवसांनीं भेटलीस. आज कार्तीकी सोमवार तेव्हां एकलिंगजीचें दर्शन घ्यावें म्हणून आईला विचारून आलें.

**जसवंतीः**--आणि मीही आज जवळ जवळ एक वर्ष या देवालयांत आलें नाहीं. तेव्हां म्हटलं आज श्रीशंकराचे दर्शनास यावें. वा! ही किशोरीही इकडेच यत आहे. ( किशोरी येते. ) वाहवा! किशोरी आज एक वर्षानें आपणां तिघींची गांठ पडली. तुला तो दिवस आठवतो ना ! कृष्णाकुमारीच्या वाढ दिवसाकरितां आईसाहेबांनीं आपणांस बोलाविलें होतें.

**किशोरीः**--हो हो चांगला आठवतो. तो मी कसा विसरेन ! आणि या वर्षांत काय काय घडून आलें पाहिलंस ना !

**जसवंतीः**--आपली सखी मोठी भाग्याची व थोर अंतःकरणाची होती. ती गेल्यापासून या उदेपूरच्या राज्याला प्रेतकळा आली आहे.

**जयमतीः**--त्या मेल्या अजितसिंगानें कृष्णेला विष देण्याविषयीं महाराजांचें मन वळविलें. एक वर्षांत त्याची काय स्थिति झाली आहे ! एका पाठोपाठ एक त्याचीं मुलें गेलीं. बायकोही गेली आणि आतां तो वेडा होऊन शहरांत हिंडत आहे.

**किशोरीः**--अग असंच आहे. या लोकींचे झाडे या लोकींच यावे लागतात.

**जसवंतीः**--किशोरी, आईसाहेबांचा किती प्रेमळ स्वभाव. कृष्णेचा वियोग झाल्यापासून त्यांनीं अंथरूण धरलं आणि अखेर त्यांतच त्यांचा शेवट झाला.

**किशोरीः**--आणि महाराजांची स्थिति काय आहे ? वेड्यासारखे नगरांतून हिंडतात व प्रत्येकाला माझी कृष्णा पाहिली आहे काय विचारतात. आज वर्ष झालं, तरी कुमारीची मला जेव्हां जेव्हां आठवण येते तेव्हां तेव्हां माझ्या डोळ्यांतून अश्रूंची धार चालते व गळा भरून येतो. कुमारी तुझी धन्य आहे ! तूं पद्मिनीप्रमाणेंच या चितोडला भूषण झाली आहेस. या राजपुतान्यांत तुझी विस्मृति कधीं होणार नाहीं. जयमती जसवंती, या आपण बागेंत बसून आपल्या प्रियसखीचें मीं एक गाणें रचिलें आहे तें गाऊं या.

( सर्वजणी बसतात व गातात. )

( उद्धवा शांतवन कर जा त्या या चालीवर )

**या भारतवर्षी अपुल्या ती धन्य कुमारी झाली**
**आसेतुहिमाचल अपुली कीर्ती ती करुनी गेली**
**देवता जणू स्वर्गीची भूलोकीं जन्मा आली**
**बाला ती रतिची मूर्ती**
**सौजन्यें बहु शोभे ती**
**कलिकाचि पारिजाताची**

( चाल बदलून )

हाय ती दग्ध गे झाली
ध्रु ॥ कीर्ती ती करुनी गेली
मागणी घालती राजे भांडाया सिद्धहि झाले
रणकंदन बहु ते करिती रक्ताचे पूरहि गेले
बलि द्यावा कृष्णेचा तो दुर्दैवें ऐसें ठरलें
देशाचे कल्याणाला
कुलकीर्ती रक्षायाला
गुरुवचना पाळायाला
( चाल बदलून, ) तात्काल सिद्ध ती झाली
कीर्ति ती करुनी गेली ॥ ध्रु ॥
नवनीत कोमला हृदयीं मधुवचनें ती सुख देई
परदुःखें दुःखित होई अश्रूंनीं भिजुनी जाई
ती लक्ष्मीच जणू या कुलिंची जन्माया नगरीं येई
वज्रापरी मन दृढ करुनी
आनंदें विष प्राशोनी
कर्तव्य कठोरहि करुनी
(.चाल बदलून.) हाय गे सखी ती गेली
ती धन्य कुमारी झाली ॥ध्रु॥

( विजयसिंग येतो. )

**विजयः**—कृष्णेची कीर्ति या राजस्तानांत या भारतवर्षांत अखंड राहील आणि आमची दुष्कीर्ति कायम राहील. धिःकार असो आह्मां रजपुतांना. खोट्या मानाकरितां एकमेकांच्या माना कापणाऱ्या, पोराबाळाचे बळी घेणाऱ्या, शत्रूंना भिऊन त्यांच्या पिशव्या भरणाऱ्या, अमीरखानासारख्या दुष्टाच्या पायांवर लोळण घेणाऱ्या आह्मां रजपुतांना धिःक्कार असो. आम्हां रजपुतांची राजलक्ष्मी व स्वातंत्र्यलक्ष्मी कृष्णेच्या रूपानें नाहींशी झाली. रजपुतांची राज्यलक्ष्मी गेली ती गेली. आतां परत येण्याची आशा दिसत नाहीं. मुलींनों, तुम्हांला पाहून मला पुन्हां कृष्णेची आठवण झाली. ( देवळांत नगारा वाजतो. ) चला आरती सुरू झाली. आपण आंत जाऊन दर्शन घेऊं. कृष्णेची ही करुण कहाणी सगळ्यांच्या डोळ्यांना पाणी आणील.

जातात.

---

# एकमानपद्धति व त्रैराशिक.

---:०:---

एकमानपद्धतीचा आपल्या शाळांतून जितका प्रसार व्हावयास पाहिजे तितका अद्याप झाला नाहीं. तालुक्यांतील शेंकडा एक दोन शाळांतूनच एकमानपद्धति मुलांना शिकविली जाते. कित्येक ठिकाणीं मुलांना त्रैराशिक शिकवितात; नंतर एकमानपद्धति हा गणिताचा एक स्वतंत्र निराळा भाग समजून व परीक्षकांनीं विचारलेंच, तर मुलांना एकमानपद्धति येत आहे, हें दाखविण्यासाठीं ती शिकवितात.

त्रैराशिकानें जीं मुलें उदाहरण करितात तीं बहुतेक त्यांतील पदांचा एकमेकांशीं असलेला संबंध न ओळखतांच केवळ यांत्रिक पद्धतीनें आंकडे मोडून करीत असतात. मुलांना तीं करीत असलेलें त्रैराशिक वाचण्यास सांगावें म्हणजे ताबडतोब त्यांना प्रमाणाची कल्पना आली आहे कीं नाहीं हें समजतें. आपण एक उदाहरण घेऊं. १७ माणसांची १ दिवसाची मजूरी ३१ रुपये आहे, तर १८७ मनुष्यांची १ दिवसाची मजूरी काय ? मुलांनीं पुढें दिल्याप्रमाणें त्रैराशिक मांडलें.

म म रु

१७: १८७:: ३१

व १७ मनुष्यांला जर ३१ रु. तर १८७ मनुष्यांला किती असें जर तें वाचलें, तर प्रमाणाची कल्पना मुलांना आली नाहीं व तीं केवळ यांत्रिक पद्धतीनें आंकडे मोडून उदाहरणाचें उत्तर आणणार ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येते. उलटपक्षीं जर मुलांनीं पुढें लिहिल्या-प्रमाणें हें त्रैराशिक लिहिलें

म म रु

१७ : १८७ :: ३१ : इष्ट रुपये.

व १७ मनुष्यांस जशीं १८७ मनुष्यें तसेच ३१ रुपयांस येणारे रुपये असें वाचलें, तर मुलांना प्रमाणाची कल्पना आली आहे व ते उदाहरण समजून करीत आहेत ही गोष्ट उघड होईल.

एकमानपद्धतीनें मुलांना आपण काय करीत आहों व तसें कां करीत आहों हें चांगलें समजतें, त्यांना कार्यकारण भाव चांगला समजतो व आपली विचारसरणी सोप्या व स्पष्ट रीतीनें मांडण्याची त्यांना संवय लागते. एकमानपद्धतीवर पुष्कळ शिक्षकांचा असा आरोप आहे कीं, या पद्धतीनें मुलांचा फार वेळ निष्कारण जातो व या म्हणण्यांत कांहीं तथ्यही आहे. त्रैराशिक शिकविण्याचेपूर्वी एकमानपद्धति शिकवावी. एकमानपद्धतीनें मुलें उदाहरणें करीत असतांनाच मुलांना गुणोत्तराची व प्रमाणाची कल्पना द्यावी. कित्येक शिक्षकांची अशी कल्पना असते कीं, एकमानपद्धतीनें उदाहरणें मुलें करूं लागलीं कीं, त्यांना गुणोतर, प्रमाण, समप्रमाण किंवा व्यस्तप्रमाण हीं समजावून सांगण्याची आवश्यकता राहात नाहीं, त्यांना त्या गोष्टी आपोआपच समजतात. पण त्यांचा हा समज चुकीचा आहे.

मुलें एकमानपद्धतीनें उदाहरणें करीत असतांना शिक्षकाच्या थोड्याशा मदतीनें त्यांना पटीची व हिश्शाची व प्रमाणाचीही चांगली कल्पना येते. ३७ घोड्यांना रोज ७४ शेर हरभरा लागतो, तर ५९ घोड्यांना किती हरभरा लागेल ? १ घोडा हा ३७ घोड्यांचा $\frac{1}{37}$ आहे, म्हणून त्याला हरभरा ही ७४ शेराचा $\frac{1}{37}$ लागेल हीं गोष्ट मुलांना हें उदाहरण करितांना सांगता आली पाहिजे. त्याचप्रमाणें ५९ घोडे हे १ घोड्याच्या ५९ पट आहेत म्हणून त्यांना हरभराही १ घोड्याचा ५९ पट लागेल, हीही गोष्ट मुलांना सांगतां आली पाहिजे. ज्या मुलांना अशा रीतीनें सांगतां येतें त्यांना गुणोत्तर व प्रमाण समजण्यास बिलकूल जड जाणार नाहीं.

३७ माणसें एक काम १२३ दिवसांत करतात, तर ४२ माणसें तेंच काम किती दिवसांत करतील? हें उदाहरण एकमानपद्धतीनें करितांना १ मनुष्य हा ३७ मनुष्यांचा $\frac{१}{३७}$ वा हिस्सा आहे, म्हणून त्याला काम करण्यास १२३ दिवसांच्या ३७ पट दिवस लागतील, ही गोष्ट मुलांना सांगतां आली पाहिजे. त्याचप्रमाणें ४२ मनुष्यें १ मनुष्याच्या ४२ पट आहेत म्हणून त्यांना दिवसही १ मनुष्याला लागणाऱ्या दिवसांचा $\frac{१}{४२}$ वा हिस्सा लागेल, हीही गोष्ट मुलांना सांगतां आली पाहिजे. ज्या मुलांना हें सांगतां येतें त्यांना व्यस्त प्रमाण सहज कळेल.

मुलांना पटीची व हिश्शाची चांगली कल्पना आली कीं प्रत्येक वेळीं त्यांनीं एक वस्तूची किंमत काढलीच पाहिजे असा आग्रह धरण्याचें कारण नाहीं. १ वस्तूची किंमत काढण्यानें पुष्कळ वेळां उदाहरणें निष्कारण लांबतात व मुलांचा वेळही फुकट जातो. दरसाल दरशेंकडा ६ रु. व्याजानें ४० रुपयांचें ९ महिन्यांचें व्याज काय होईल? हें उदाहरण आपणांस एकमानपद्धतीनें करावयाचें आहे, अशी आपण कल्पना करूं. एकही पायरी न गाळतां हें उदाहरण पुढीलप्रमाणें करतां येईल.

| | |
|---|---|
| १०० रुपयांचें १२ म. चें व्याज ६ रु. | |
| ∴ १ रु. .................... $\frac{६}{१००}$ रु. | $६ \div १०० = \frac{६}{१००}$ रु. |
| ∴ ७५ रु. .................... $\frac{९}{२}$ रु. | $\frac{६}{१००} \times \frac{७५}{१} = \frac{९}{२}$ रु. |
| ∴ ७५ रु. चें १ म. चें $\frac{३}{८}$ रु. | $\frac{९}{२} \div १२ = \frac{९}{२} \times \frac{१}{१२} = \frac{३}{८}$ |
| ∴ ७५ रु. चें ९ म. चें $\frac{२७}{८}$ रु. | $\frac{३}{८} \times \frac{९}{१} = \frac{२७}{८}$ रु. |

उ. ३ रु. ६ आणे.

ज्या मुलांना ७५ रुपये हे १०० रुपयांचा $\frac{३}{४}$ हिस्सा आहेत, म्हणून त्यांचें व्याजही १०० रुपयांच्या व्याजाचे $\frac{३}{४}$ येईल ही गोष्ट माहीत आहे त्यांना १ रुपायाचें व्याज काढण्याची आवश्यकताच

राहात नाहीं. त्याचप्रमाणें ज्यांना ९ महिने हे १२ महिन्याचा $\frac{३}{४}$ आहेत म्हणून ९ महिन्यांचें व्याज १२ महिन्यांच्या व्याजाच्या $\frac{३}{४}$ इतकें ही गोष्ट सांगतां येते त्यांना १ महिन्याचें व्याज काढण्याची जरूरच राहात नाहीं. आणि म्हणूनच त्या मुलांनीं हें उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें थोडक्यांत करण्यास हरकत नाहीं.

| | |
|---|---|
| १०० रु. चें १२ महिन्याचें व्याज ६ रु. येतें. | रु. रु. |
| ∴ ७५ रु. चें ... ... $\frac{९}{२}$ रु. | ७५ ÷ १०० = $\frac{३}{४}$ |
| ∴ ७५ रु. चें ९ महिन्याचें $\frac{२७}{८}$ रु. | ∴ $\frac{६}{१} \times \frac{३}{४} = \frac{९}{२}$ रु. |
| उ. ३ रु. ८ आ. | म. ९ ÷ १२ म. = $\frac{३}{४}$ |
| | $\frac{९}{२} \times \frac{३}{४} = \frac{२७}{८}$ रु. |

आपण आणखी एक उदाहरण घेऊं. १७ माणसें १० तास काम करून एक काम ३६ दिवसांत संपवितात, तर ९४ माणसें ८ तास काम करून तें काम किती दिवसांत संपवितील? एकही पायरी न गाळतां एकमान पद्धतीनें हें उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें करावें लागेल.

| | |
|---|---|
| १७ माणसें १० ता. काम करून ३६ दि. संपवितात. | ३६ × १७ = ६१२ दि. |
| ∴ १ माणस ... ६१२ दि. | ६१२ ÷ ३६ $\frac{६१२}{३६}$ = १७ दि. |
| ∴ ३६ माणसें ... १७ दि. | |
| ∴ ३६ माणसें १ तास १७० दि. | १७ × १० = १७० दि. |
| ∴ ३६ माणसें ८ तास २१$\frac{१}{४}$ दि. | १७० ÷ ८ = $\frac{१७०}{८} = \frac{८५}{४}$ दि. |

३६ मनुष्यें हीं १७ माणसांच्या $\frac{३६}{१७}$ पट आहेत, म्हणून १७ माणसांना काम करण्यास जितके दिवस लागतात त्यांचा $\frac{१७}{३६}$ हिस्सा दिवस ३६ माणसांना लागतील. तसेच ८ तास हे १० तासांचा $\frac{४}{५}$ हिस्सा आहेत, म्हणून १० तासांप्रमाणें काम करण्यास जितके दिवस लागतील त्यांच्या $\frac{५}{४}$ पट दिवस दररोज ८ तास प्रमाणें काम केल्यानें लागतील. ज्या मुलांना या दोन्ही गोष्टी स्पष्टपणें समजल्या आहेत

त्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें थोडक्यांत हें उदाहरण करण्यास मुळींच हरकत नाहीं.

१७ माणसें १० तासाप्रमाणें ३६ दि. संपवितात
∴ ३६ माणसें ... १७ दि.
∴ ३६ ... ८ ता. २१$\frac{१}{४}$ दि.

३६ माणसें १७ माणसांच्या $\frac{३६}{१७}$ पट
∴ दिवस $\frac{१७}{३६}$ हिस्सा.
∴ $\frac{३६}{१} \times \frac{१७}{३६}$ = १७ दि.
८ दि. तास हा १० तासांचा $\frac{४}{५}$.
∴ $\frac{५}{४}$ पट दि.
$\frac{१७}{१} \times \frac{५}{४} = \frac{८५}{४}$ दि.

याप्रकारें उदाहरण मांडण्याची व रीत करण्याची संवय झाली कीं मुलांनीं एकमानपद्धतीनें उदाहरणें सोडवावीं किंवा त्रैराशिकानें सोडवावीं हा वादच राहात नाहीं. कारण दोन्ही पद्धतींत आपण प्रमाणानेंच उदाहरण सोडवीत असतों व आपली विचारसरणीही सारखीच असते. जसें, १७ तोळे सोन्याला ३५७ रुपये पडतात, तर ३१ तोळे सोन्याला काय पडेल ?

त्रैराशिकानें आपण हें उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें मांडतों व करितों.

तो. तो. रु.
१७ : ३१ : : ३५७ : इ. रु.

३१ तोळे हे १७ तोळयांच्या $\frac{३१}{१७}$ पट आहेत, म्हणून येणारें उत्तर हीं ३५७ रु. च्या $\frac{३१}{१७}$ पट येईल, अशी आपली विचारसरणी असते, म्हणून आपण ३५७ रु. ची $\frac{३१}{१७}$ पट करितों व ६५१ रु.

$\frac{३५७}{१}$ रु. $\times \frac{३१}{१७}$ = ६५१ रु.

हें उत्तर काढितों. ज्यांना एकमानपद्धतीची चांगली कल्पना आली आहे व ज्यांना गुणोत्तर व प्रमाण हीं चांगलीं समजलीं आहेत, तीं मुलें एकमानपद्धतीनें हेंच उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें मांडतील व करतील.

१७ तोळयांची किंमत ३५७ रु. येते.
∴ ३१ ... ... ६५१ रु.

तो. तो.
३१ ÷ १७ = $\frac{३१}{१७}$ पट
रु.
∴ $\frac{३५७}{१} \times \frac{३१}{१७}$ = ६५१ रु. किं.

त्रैराशिकांत जे आंकडे आलेले आहेत तेच आकडे एकमानपद्धतीनें केलेल्या रीतींत आहेत, मात्र त्रैराशिकांतील प्रमाण एका ओळींत मांडलें आहे.

तो. तो. रु.

१७ : ३१ :: ३५७ : इ. रु. ६५१

हेंच प्रमाण एकमानपद्धतीच्या रीतींत दोन ओळींत मांडलें आहे.

१७ तोळ्यांना ३५७ रु.

∴ ३१ तोळ्यांना ६५१ रु.

पण त्रैराशिकांत काय किंवा एकमानपद्धतींत काय प्रमाणाची कल्पना एकच आहे. ३१ तोळे हे १७ तोळ्यांचा $\frac{३१}{१७}$ पट आहेत म्हणून येणारें उत्तर ३५७ रुपयांच्या $\frac{३१}{१७}$ पट येईल, म्हणून उत्तर काढण्यास $\frac{३५७}{१}$ रु. याला $\frac{३१}{१७}$ नें गुणिलें पाहिजे हीच कल्पना दोन्ही पद्धतींत आहे. आपण आणखी उदाहरण घेऊं. २० दिवसांत १ काम करावयाचें असल्यास ६३ माणसें कामावर लावावीं लागतात. तेंच काम ४२ दिवसांत करावयाचें असल्यास किती माणसें कामावर लावावीं? हें उदाहरण त्रैराशिकांत पुढें दिल्याप्रमाणें मांडावें लागेल.

दि. दि. माणसें

२० : ४२ :: ६३ : इष्ट माणसें ३०, व्यस्त.

एकमानपद्धतींत हें उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें मांडतील.

२० दिवसांत काम करण्यास ६३ माणसें लागतात.

∴ ४२ दिवसांत .... ३० माणसें ,,

त्रैराशिकांत ४ राशी एका ओळींत मांडल्या आहेत. एकमानपद्धतींत त्याच राशी दोन ओळींत घेतल्या आहेत. ४२ दिवस हें २० दिवसांच्या $\frac{४२}{२०}$ पट आहेत म्हणून येणारीं माणसें ६३ माणसांच्या $\frac{२०}{४२}$

हिस्सा येतील, हीच कल्पना दोन्ही पद्धतींत आहे. वरील विवेचनावरून हें उघड होईल कीं,

१ प्रारंभीं उदाहरणें मुलांनीं एकमानपद्धतीनें करावीं.

२ मुलें एकमानपद्धतीनें उदाहरण करीत असतांना त्यांना पटीची, हिश्शाची व प्रमाणाची कल्पना द्यावी.

३ मुलांना एकमानपद्धतीची व गुणोत्तराची आणि प्रमाणाची चांगली कल्पना आली कीं, मुलांनीं एक वस्तूची किंमत न काढतां पटीनें व हिश्शानें उदाहरणें करावीं.

४ या पद्धतींत व त्रैराशिकानें उदाहरण करण्याच्या पद्धतींत कांहीं अंतर नाहीं.

---

## सोन्याचा पक्षी.

एक होता राजा. त्याचा एक सुंदर बाग होता. त्या बागेंत आंब्याचें एक झाड होतें. त्या झाडाला सोन्याचे आंबे येत असत. एकदा त्याला बरींच फळें आलीं, व तीं पिकायला लागलीं, पण दररोज रात्रीं एक आंबा नेमका नाहींसा व्हावयाचा! तें पाहून राजा माळ्यावर खूप रागावला, व रात्रीं चांगली राखण करीत जा म्हणून त्याला बजावलें. त्या दिवशीं रात्रीं राखण करण्याकरितां माळ्यानें आपल्या थोरल्या मुलाला ठेवलें. पण रात्रीं बारा वाजतां त्याला लागली झोप, व सकाळीं पाहातो तों आणखी एक फळ गेलें. तेव्हां माळ्यानें दुसरे दिवशीं आपल्या दुसऱ्या मुलाला राखण करण्याकरितां बागेंत ठेविलें. पण रात्रीं त्यालाही झोप लागली, व सकाळीं पाहातो तों आणखी एक फळ नाहींसें झालें. तेव्हां माळ्यानें आपल्या धाकट्या

मुलाला पहारा करावयास सांगितलें. तो मात्र सारखा जागत बसला. रात्रीं बाराचे ठोके पडतांच तेथें एक सोन्याचा पक्षी आला, व तो एका फळाला चोंच मारूं लागला. तें पहातांच त्या मुलानें त्या पक्ष्याला नेमका एक बाण मारला, पण त्या बाणानें त्या पक्ष्याला कांहीं इजा झाली नाहीं! मात्र त्याचें एक सोन्याचें पीस खालीं गळून पडलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्या मुलानें तें पीस राजाला नेऊन दाखविलें. तें पाहातांच सगळी मंडळी चकित झाली व जो तो त्याची किंमत करूं लागला! सगळ्या राज्यापेक्षां या एका पिसाची किंमत जास्त आहे, अशी सर्वांची खात्री झाली, पण राजा म्हणाला, 'या एका पिसाचा मला काय उपयोग! मला तो पक्षीच पाहिजे.' तेव्हां तो पक्षी शोधून आणण्याकरितां माळ्याचा थोरला मुलगा निघाला.

जातां जातां त्याला एक मोठें अरण्य लागलें. तेथें त्याला एक कोल्हा दिसला. त्याला पाहातांच मुलगा त्याला गोळी घालायला लागला! तेव्हां कोल्हा म्हणाला, 'बाळा, मला मारूं नकोस. मी तुला हिताची गोष्ट सांगतों. तूं सोन्याचा पक्षी आणायला निघाला आहेस! हें बघ, तुला जातां जातां एक खेडें लागेल. तेथें एक सुंदर बंगला तुला दिसेल, व त्या बंगल्याचे समोर एक झोपडी आहे. तूं रात्रीं त्या झोपडींत राहा. बंगल्यांत पाऊल टाकूं नको.' पुढें जातां जातां कोल्ह्यानें सांगितल्याप्रमाणें त्याला एक खेडें लागलें. तेथें एक सुंदर बंगला होता, व त्या बंगल्यासमोर एक झोपडी होती. परंतु बंगल्याकडे पाहातांच मुलगा म्हणाला, 'असा सुंदर बंगला टाकून त्या भिकार झोपडींत कोण राहातो! कोल्ह्यानें कांहींतरी सांगितलें झालें. त्याला काय कळतें,' असें म्हणून तो त्या बंगल्यांत गेला. तेथें खाण्यापिण्याचा सर्व कांहीं थाटमाट होता. त्याची अगदीं चैन झाली. चैन करीत तो तेथेंच राहिला व आपण सोन्याचा पक्षी आणण्याकरितां निघालों आहों हेंही तो विसरून

गेला. याप्रमाणें पुष्कळ दिवस गेले. या मुलाचा तर पत्ता नाहीं, हें पाहून माळ्यानें आपल्या दुसऱ्या मुलाला सोन्याचा पक्षी आणण्याकरितां पाठविलें.

जातां जातां त्याला तें अरण्य लागलें. तेथें त्याला तो कोल्हा भेटला. कोल्ह्यानें त्याला उपदेश केला, तो त्या खेड्यांत गेला, पण थोरल्या भावाप्रमाणें तो त्या बंगल्यांतच गेला; तेथें चैन करीत राहिला, व सर्व कांहीं विसरून गेला. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर दुसऱ्याही मुलाचा पत्ता नाहीं, हें पाहून माळ्यानें आपल्या धाकट्या मुलाला पाठविलें. जातां जातां त्याला तें अरण्य लागलें, तो कोल्हा भेटला, व त्या कोल्ह्यानें त्यालाही उपदेश केला. तेव्हां मुलगा म्हणाला, 'कोल्हेदादा, तूं किती दयाळू आहेस, तुझे मजवर मोठे उपकार झाले.' तेव्हां कोल्हा म्हणाला, 'मुला, तूं फार मायाळू आहेस. तर आतां माझ्या शेपटावर बस. मी तुला घेऊन जातों.' नंतर तो मुलगा कोल्ह्याच्या शेपटावर बसला. कोल्हा अगदीं वाऱ्यासारखा पळूं लागला. तेव्हां सूं सूं असा आवाज होऊं लागला. पुढें संध्याकाळीं ते त्या खेड्यांत आले, तेव्हां तो मुलगा कोल्ह्यानें सांगितल्याप्रमाणें बंगल्यांत न जातां झोपडींत गेला व तेथें त्यानें रात्र काढली. उजाडल्यावर तो झोपडीच्या बाहेर पडला, तेव्हां कोल्हा त्याचे जवळ आला, व म्हणाला, 'हें पहा. येथून लांब लांब एक किल्ला आहे. त्या किल्ल्याचे पुढें पुष्कळ शिपाई निजलेले तुला दिसतील. त्यांना पाहून तूं भिऊं नकोस, तसाच तूं किल्ल्यांत जा. आंत एक मोठा दिवाणखाना तुला लागेल. त्या दिवाणखान्यांत एक लाकडाच्या पिंजऱ्यांत तो सोन्याचा पक्षी आहे. तो पिंजरा घेऊन ये, मात्र एक गोष्ट लक्षांत ठेव. त्या लाकडाच्या पिंजऱ्याजवळ एका सोन्याचा पिंजरा आहे त्यांत मात्र त्या पक्ष्याला घालूं नकोस. हं बस आतां माझ्या शेपटावर.' मुलगा शेपटावर बसला. नंतर ते वाऱ्यासारखे पळत चालले. जातां जातां ते एका किल्ल्याजवळ आले. किल्ल्याचे

समोर पुष्कळ शिपाई घोरत पडले होते. मुलगा खालीं उतरला व हळूच किल्ल्यांत शिरला. आंत त्याला एक मोठा दिवाणखाना लागला, व तेथें लाकडाचा पिंजरा, त्यांत तो सोन्याचा पक्षी, जवळच तो सोन्याचा पिंजरा, व बागेंतुन नाहींसे झालेले सोन्याचे तीन आंबे इतकें त्याच्या नजरेस पडलें व त्याला मोठी गंमत वाटली. तो मनांत म्हणाला, 'सुंदर सोन्याचा पिंजरा टाकून लाकडाचा भिकार पिंजरा कशाला? सोन्याच्या पक्ष्याला सोन्याचाच पिंजरा पाहिजे.' असें म्हणून त्यानें लाकडाच्या पिंजऱ्यांतून त्या पक्ष्याला काढलें, व त्याला सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवलें. त्याबरोबर तो पक्षी मोठ्यानें ओरडला. त्यासरशीं सर्व शिपाई जागे झाले, व त्यांनीं त्याला कैद केलें, व आपल्या राजापुढें उभें केलें. तेव्हां त्याला ठार मारण्याचा राजानें हुकूम केला. मात्र जर मला सोन्याचा घोडा आणून देशील, तर मी फांशीची शिक्षा देणार नाहीं, उलट तुला सोन्याचा पक्षी देईन असें राजा म्हणाला. मुलानें होय म्हटलें, व तो सोन्याचा घोडा आणावयास निघाला, तेव्हां तो कोल्हा त्याजकडे आला व म्हणाला, 'हें पहा माझें ऐकलें नाहींस त्याचें हें फळ. बरें, तें असो. आतां तुला सोन्याचा घोडा पाहिजे. येथून दूर एक किल्ला आहे. त्या किल्ल्यांत तबेल्यामध्यें सोन्याचा घोडा आहे. घोडेवाला तुला घोरत पडलेला दिसेल. येथें एक कातड्याचें व एक सोन्याचें खोगीर आहे. कातड्याचें खोगीर घोड्यावर ठेव, व हळूच तो घोडा घेऊन ये. सोन्याचें खोगीर त्यावर घालूं नकोस हं. बस आतां माझ्या शेपटावर.'

मुलगा शेपटावर बसला व पळायला सुरुवात झाली. जातां जातां ते एका मोठ्या किल्ल्याजवळ आले. मुलगा खालीं उतरला, व किल्ल्यांत गेला. तों तबेल्यांत त्याला सोन्याचा घोडा दिसला. घोडेवाला निजला होता, व त्याचा एक हात सोन्याच्या खोगिरावर होता. सोन्याचा घोडा पाहून

मुलाला मोठें कौतुक वाटलें. तो मनांत म्हणाला, 'अशा सुंदर घोड्याला हें कातड्याचें भिकार खोगीर काय उपयोगी! त्याला तें सोन्याचेंच खोगीर पाहिजे.' असें म्हणून त्यानें तें सोन्याचें खोगीर उचललें. त्या बरोबर तो घोडेवाला जागा झाला व मोठ्यानें ओरडला. त्या सरशी शिपाई लोक तेथें आले, त्यांनीं त्या मुलाला कैद केलें, व आपल्या राजाकडे घेऊन गेले. तेव्हां त्याला ठार मारण्याचा राजानें हुकूम केला. मात्र जर मला सुंदर राजकन्या आणून देशील, तर मी तुला ठार मारणार नाहीं, उलट सोन्याचा घोडा व सोन्याचा पक्षी मी तुला देईन, असें राजा बोलला. मुलानें होय म्हटलें व तो राजकन्या आणावयास निघाला. तेव्हां तो कोल्हा त्याजकडे आला व म्हणाला, " हें पाहा. माझें ऐकलें नाहींस, त्याचें हें फळ! बरें, तें असो. आतां तुला सुंदर राजकन्या पाहिजे. येथून दूर एक किल्ला आहे. तूं संध्याकाळीं तेथें पोहोंचशील. रात्रीं १२ वाजतां तूं किल्ल्यांत जा म्हणजे राजकन्या एकटीच आपल्या महालांत असलेली तुझ्या दृष्टीस पडेल. तिला पाहातांच तूं आपला हात पुढें कर; म्हणजे ती आपला हात तुझे हातांत घालील. व आनंदानें तुझ्यामागें धांवयास तयार होईल. मात्र निघण्यापूर्वीं डोळ्यांत पाणी आणून ' मी माझ्या वडिलांचा निरोप घेऊन येतें, ' असें ती म्हणेल. तेवढें मात्र तिला करूं देऊं नकोस. हं. बस आतां माझ्या शेपटीवर. " मुलगा शेपटीवर बसला, व ते वाऱ्यासारखे धांवूं लागले. जातां जातां संध्याकाळीं ते एका किल्ल्याजवळ आले. मग रात्रीं १२ वाजतां तो मुलगा किल्ल्यांत शिरला. आंत गेल्यावर राजकन्या एकटीच आपल्या महालांत बसलेली त्याला दिसली. तिला पहातांच त्यानें आपला हात पुढें केला, तेव्हां राजकन्येनें आपला हात त्याचे हातांत घातला व ती त्याला म्हणाली, ' मी तुमच्याबरोबर आनंदानें येतें, पण तुम्ही थोडे येथें थांबा. मी आतां बाबांचा निरोप घेऊन येतें.' मुलानें प्रथम नाहीं म्हटलें; पण

डोळ्यांत पाणी आणून जेव्हां तिनें विनंति केली, तेव्हां त्यानें होय म्हटलें, मग ती राजकन्या आपल्या वडिलांकडे गेली, परंतु ती तेथें जातांच शिपाई जागे झाले, व त्यांनीं त्या मुलाला कैद केलें, व राजापुढें आणून उभें केलें, तेव्हां राजा म्हणाला. 'तुला माझी मुलगी मिळावयाची नाहीं, पण जर तूं माझ्या या खिडकीसमोरील टेकडी आठ दिवसांचे आंत खणून काढशील, तर मात्र ही मुलगी तुला मिळेल.'

ती टेकडी खूप मोठी होती. आठ दिवसांत तो कशी खणून काढील ! त्यानें सात दिवस खूप मेहनत केली, पण काम अगदीं थोडें झालें, तेव्हां तो दुःखी झाला. तितक्यांत तेथें कोल्हा आला, व म्हणाला, 'तूं येथें नीज, मी काम करतों.' मुलगा सकाळीं उठून पाहातो तों टेकडी नाहींशी झाली, व ठरल्याप्रमाणें ती राजकन्या त्या मुलाला मिळाली. तो मुलगा व ती राजकन्या किल्ल्याच्या बाहेर निघतांच कोल्हा आला व म्हणाला, 'हें पहा, ही राजकन्या, तो सोन्याचा घोडा व तो सोन्याचा पक्षी तिन्हीही तुला मिळतील; मात्र सांगतों असें कर. राजाकडे गेल्यावर ही घ्या राजकन्या असें त्यांना म्हण. मग तो राजा तुला सोन्याचा घोडा देईल. त्यावर तूं अगोदर बस, व सर्वांचा निरोप घे. मात्र शेवटीं राजकन्येचा निरोप घे. शेवटीं तिचा निरोप घेत असतांना तिला घोड्यावर उचलून घे व घोडा भरधाव पळव म्हणजे झालें.' पुढें कोल्ह्यानें सांगितल्याप्रमाणें अगदीं बरोबर काम झालें, व मुलाला ती राजकन्या व तो सोन्याचा घोडा मिळाला. नंतर कोल्हा त्याला म्हणाला, 'हें पहा, ज्या राजाच्या जवळ तो सोन्याचा पक्षी आहे, त्याच्याकडे आतां जावयाचें; मी व राजकन्या किल्ल्याच्या दरवाजाजवळ उभे राहूं, व तूं एकटाच घोड्यावर बसून आंत जा. पुढें घोडा पाहातांच ते तुला सोन्याचा पक्षी आणून देतील. तो तूं घोड्यावर असतांना पाहावयास म्हणून घे व मिळतांक्षणीच घोडा भरधाव पळव म्हणजे झालें.' कोल्ह्यानें सांगि-

तत्याप्रमाणें बरोबर काम झालें, व मुलाला राजकन्या, सोन्याचा घोडा व सोन्याचा पक्षी अशीं तिन्ही मिळालीं. त्यांना घेऊन तो जात असतांना कोल्हा त्याला म्हणाला, 'हें पाहा, आतां तूं दोन गोष्टींना जप. संकटांतून सोडण्याकरितां कोणाबद्दल पैसे भरूं नकोस, व दुसरें नदीचे कांठीं बसूं नकोस.' असें सांगून कोल्हा गेला. मग तो मुलगा घोड्यावर ती राजकन्या व तो पक्षी घेऊन निघाला. जातां जातां त्या पूर्वींच्या खेड्यांत आला. तेथें येतों तों माणसांचा घोळका जमलेला! ओरडाओरड! त्यानें तपास केला, तेव्हां असें कळलें कीं, दोघां चोरांना फाशीं देण्याकरितां नेत आहेत, व ते चोर दुसरे तिसरे कोणी नसून आपले थोरले भाऊच आहेत, असें त्याला दिसलें. तें पाहून त्याला वाईट वाटलें, व त्यांना सोडवण्याला उपाय काय म्हणून त्यानें विचारलें, तेव्हां जवळ असलेले सर्व पैसे दिले तर ते सुटतील, असें त्याला कळलें. मग त्यानें आपल्या जवळचे सर्व पैसे देऊन त्यांना सोडविलें. मग त्यांना घेऊन ती सर्व मंडळी चालली. जातां जातां त्यांना तें पूर्वींचें अरण्य लागलें. ती जागा गार व सुंदर होती, म्हणून ते सर्वजण नदीकांठीं बसले. इतक्यांत ते थोरले भाऊ हळूच धाकट्या भावाचे पाठीमागें आले व त्याला त्यांनीं नदींत ढकलून दिलें; व ती राजकन्या, तो सोन्याचा घोडा व तो सोन्याचा पक्षी हीं घेऊन ते आपल्या शहरांत आले, व आपण हें सर्व आणलें, असें त्यांनीं राजाला सांगितलें. शहरांत जिकडे तिकडे आनंदीआनंद झाला. पण तो घोडा कांहीं खाईना, पक्षी गाणें गाईना व राजकन्या हसेना.

इकडे धाकट्या भावाला नदींत ढकलून दिलें, असें मागें सांगितलें. नदीला पाणी होतें थोडें म्हणून तो वांचला, पण खडक उंच असल्यामुळें त्याला वर येतां येईना. इतक्यांत तो कोल्हा तेथें आला व त्याला म्हणाला, 'माझ्या शेपटीला धरव वर ये.' तेव्हां त्यानें शेपटीला धरलें व वर आला.

मग कोल्हा त्याला म्हणाला, 'हें पहा, या पोशाखांत असतांना तूं आपल्या गांवांत जाऊं नकोस. नाहींतर तुझे भाऊ तुला ठार मारतील. याकरितां भिकाऱ्याचा पोषाख कर, व गुप्त रीतीनें शहरांत जा. त्याप्रमाणें त्या मुलानें आपला वेष बदलला, व तो गुप्त रीतीनें शहरांत शिरला. तो त्या शहरांत येतांच घोडा खावयास लागला, पक्षी गोड गाणें गाऊं लागला, व राजकन्या हसूं लागली! ही मोठी गंमत झाली! पण असें कशानें झालें, हें कोणाला कांहीं समजेना. शेवटीं त्या मुलानें गुप्त रीतीनें राजाची गांठ घेतली, व आपणास थोरल्या भावांनीं कसें फसविलें वगैरे हकिकत त्यानें त्यास सांगितली. पुढें राजानें त्या दोघांस शिक्षा दिल्या व आपल्या मागें त्या धाकट्या मुलानें गादीवर बसावें असें त्यानें ठरविलें. पुढें राजा मेल्यावर तो मुलगा त्या देशाचा राजा झाला व ती राजकन्या राणी झाली. पुढें कांहीं दिवसांनीं तो कोल्हा आला व डोळ्यांत पाणी आणून त्यानें राजाला विनंती केली. 'हे राजा, मला गोळी घालून ठार मार' राजानें नाकारिलें, परंतु कोल्हा सारखा रडूं लागला व आपला हट्ट सोडीना. शेवटीं राजानें त्याला गोळी घातली व त्याला ठार मारलें, परंतु काय चमत्कार! कोल्हा मरतांच एक सुंदर पुरुष तेथें उत्पन्न झाला. तो पुरुष राजकन्येचा भाऊ होता. शेवटीं बरेच दिवस नाहींसा झालेला भाऊ पाहातांच राजकन्येला आनंदी आनंद झाला, पुढें त्या सर्वांनीं आपले दिवस सुखांत घालविले.

# वानर व माकड.

मराठी भाषेत वानर व माकड या शब्दांचा उपयोग विवक्षित जात दर्शविण्याकडे केला जातोच असें नाहीं. इंग्रजींत ज्याला एप्स् (Apes) म्हणतात अशा प्राणिवर्गासाठीं मराठींत स्वतंत्र शब्द-प्रयोग नाहीं; एप्स या शब्दांत सर्व वानर व माकड जातींचा समावेश केला जातो. आम्ही वानर व माकड या नांवानें निरनिराळ्या जाती दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे, तरी वानर वर्ग असा एकाच नांवाखालीं देणें प्राप्त म्हणून वानर जातीचें सर्वसाधारण वर्णन देऊन मग माकड, व वानर या विवक्षित प्राण्यांचें वर्णन स्वतंत्र देण्याचें योजिलें आहे.

**वानर जातः**—वानर जात ही सर्व सस्तन प्राण्यांमध्यें उत्क्रांतींत उच्च दर्जास पोहोंचली आहे. प्राणि—श्रेष्ठ असा जो मनुष्य त्याच्या खालोखाल वानर लागतें. चार्लस डार्विननें आपल्या उत्क्रांतितत्त्वांत मनुष्यप्राणी व वानर यांचे पूर्वज एकच होत असें प्रतिपादन केलें आहे.

वानर व माकड यांमध्यें बरेच गुण मनुष्याच्या गुणांशीं मिळतात तर कांहीं गुण खालच्या दर्जाच्या प्राण्यांशीं जुळतात असे सांपडतात. वानराचे हात, त्याच्या हातांपायांचीं ( पायांचें आंगठे खेरीज ) बोटें, सपाट नखें, आंखूड मान, खाद्य, खाद्य मिळविण्यास व खाण्यास लागणारा हातांचा उपयोग, पिलांचें संगोपन इत्यादि प्रकार मनुष्याप्रमाणेंच वानरांत सांपडतात; तर चालतांना शरिरास पोक देणें-म्हणजे तोंड जनावरां-प्रमाणें खालीं जमिनीकडे येणें, चालतांना हात टेकून (चारी अवयवां-वर ) चालणें, वरील ओठ वांकडे करून कुत्र्याप्रमाणें सुळे-दांत पांकुळ्या करून दाखविणें, व बऱ्याचशा जातींत शेपूट असणें इत्यादि प्रकार खालच्या दर्जाच्या प्राण्यांप्रमाणें आढळतात.

वानर वर्गाचे हात शरिराच्या मानानें पुष्कळ लांब असतात. हातांपायांचे तळवे मऊ असून झाडांच्या फांद्या धरण्यास सोईचे असतात. बोटें लांब लांब असून त्यांस मनुष्यां सारखीं सपाट नखें असतात, त्यामुळें पायानें त्यास झाडाची फांदी धरितां येते. पायाचे आंगठे इतर बोटांप्रमाणें सरळ नसून हाताच्या



६. माकडाच्या हात-पायांचे पंजे.

आंगठ्याप्रमाणें तिरपे असतात. चेहरा बहुतांशीं माणसांसारखा असून त्यावर केंस नसतात. नाक साधारणपणें फताकडें अथवा नकटें असतें. कित्येक जातींत खालच्या दाभाडांत खाद्य ठेवण्याच्या पिशव्या असतात. कान मनुष्याप्रमाणेंच असतात. चालतांना यांना ताठ उभें राहून चालतां येत नाहीं. ते पाठीस पुष्कळ पोक काढतात. कांहीं वानर मधून मधून जमिनीवर हात टेंकतात, परंतु बहुतेक जाती चारी अवयवांवर चालतात. वानर झाडांवर सरासर चढतात, व फांद्यांचे शेवटास लोंबकळून या फांदीवरून त्या फांदीवर लांब लांब उड्या मारतात. बहुतेक जाती लहान लहान कळप करून राहतात. प्रत्येक कळपांत एकदोन नर व बाकीच्या माद्या व पिलें असतात. वानर फळें, झाडांचीं कोंवळीं कोंवळीं पानें व कळ्या, पक्ष्यांचीं अंडीं, किडे वगैरे खाऊन राहातात. वानर शरीरानें बळकट असतात. ते सहसा जमिनीवर राहात नाहींत. दिवसभर झाडांवरून उड्या मारीत हिंडतात व रात्र पडली म्हणजे झाडांच्या फांद्यांत नीटशी जागा पाहून, किंवा दुबेळक्यांत चार दोन काटक्यांचें बसण्यापुरतें घरटें करून त्यावर रात्र काढतात. उजाडलें कीं पुन्हां उड्या मारीत निघून जातात. मादीस दर खेपेस एक पोर होतें. दोन पिलें झालेलीं क्वचितच आढळतात. आपल्या पिलांवर ती जिवापाड माया करिते. उड्या मारीत असतां पोर तिच्या पोटाशीं बिलगलेलें असतें. पिलास धरण्याचा आपण कितीही प्रयत्न केला तरी

मादी पिलूं आपल्या हातीं लागूं देत नाहीं. ती त्यास पटकन् उचलून पळून जाते.

अपुच्छ वानर हिंदुस्थानांत सांपडत नाहींत. हे बहुतेक आफ्रिकेंत व सुमात्रा, मलाया वगैरे बेटांत आढळतात. या प्राण्यांचें माणसाशीं जास्त साम्य असतें.

**गोरिला**:—हा वानर धिप्पाड असून ताकदवान् असतो. हा पकडून ठेविला असतां फार दिवस जगत नाहीं. याचे दांत बळकट असतात. वर्ण साधारणपणें काळाच असतो. चेहरा दुर्मुखलेला पण उग्र दिसतो. नर साधारणपणें सहा फूट उंच असतो व मादी साडेचार फूट उंच असते. हा जंगलांत मोठमोठ्यानें आरोळ्या मारतो.


**शिंपाझी**:—हा वानर जवळ जवळ माणसासारखाच असतो. याचा बांधा लहानसर असून नर व मादी यांच्या उंचीत फारसा फरक दिसून येत नाहीं. हा दिसण्यांत आनंदी व हुशार दिसतो. याच्या ढामाडांस पिशव्या नसतात. हा जमिनीवर व झाडांवर अशा दोन्ही ठिकाणीं राहूं शकतो.



७ शिंपाझी.

हा कळपाकळपानें न राहातां स्वतंत्र कुटुंब करून राहातो. नर व मादी यांची जोड एकदां जमली म्हणजे जन्मभर सहसा फुटत नाहीं. रात्रीं झाडावर मादी आपल्या पिलांची जोपासना करीत पडली असतां हा झाडाच्या बुंध्याशीं पहारा करीत बसतो. हा मोठा खेळकर प्राणी असतो.

**ऑरँग ओटँगः**—हा वानर सुमात्रा, बोर्निओ वगैरे बेटांत सांपडतो. याचा वर्ण तांबूस उदी असतो. तोंड व हातापायाचे तळवे निव्वळ काळे असतात. याची उंची साधारणपणें चार साडेचार फूट असते. मादी जरा ठेंगणी असते. हा दिसण्यांत सौम्य दिसतो, पण पकडून पिंजऱ्यांत ठेवला असतां दुर्मुखलेला असतो. आपला बहुतेक वेळ तो झाडांवरच काढतो. झाडांत वेडेवांकडे फांद्यांचें घरटें करून त्यांत राहातो. हा प्राणी कळपानें न राहातां एकटादुकटा राहिलेला पुष्कळ वेळां सांपडतो.



८ ऑरँग ओटँग.


**गिबनः**—हा वानर फारसा मोठा नसतो. चालतांना मनुष्यांप्रमाणें ताठ चालतो. हा हुशार असतो.

लघुपुच्छ वानरांत सर्व वानरांचा व माकडांचा समावेश होतो. यांतील पुष्कळ जाती हिंदुस्थानांत सांपडतात. यांत बबून, माकड, नीळ, वानर, हनुमान, वगैरे जाती मोडतात.

**बबूनः**—हा वानर आफ्रिकेंत सांपडतो. याचे ढुंगणावर लाल गिर्दीसारखा मांसल भाग असतो. हा जमिनीवर राहाणारा आहे. हा डोंगराळ प्रदेशांत कंद, मुळें, फळें, व किडे, इ. खाऊन राहातो.

## माकड.

शहरांतून व खेड्यांतून माकडांस मनुष्याप्रमाणें पोषाख देऊन दरवेशी लोक निरनिराळ्या प्रकारचे खेळ करून दाखवितात. माकडांना राजाराणीचा पार्ट देऊन त्यांचेकडून मनोरंजक नकला करवून घेतलेल्या कित्येकांनीं पाहिल्या असतील. लहान मुलें तर दरवेशी रस्त्यानें माकडें नेत असतां त्याचे मागोमाग किती तरी लांबपर्यंत जातात; माकडांचे असे खेळ पाहून मुलांना फारच गंमत वाटते यांत शंका नाहीं. माकडें हीं तांबूस-पिवळ्या रंगाचीं असतात. हातांपायांवरील व पोटांवरील रंग शरिरावरील रंगापेक्षां जरा फिकट असतो. यांचे ढुंगणावर बसण्याचे जागीं लाल रंगाच्या मांसल गिद्या असतात. नराचे तोंडावरसुद्धां लाल रंग चढतो. माकडाची उंची साधारणपणें दोन फुटांपर्यंत असते, शेंपूट जरा आंखूडच म्हणजे दहापंधरा इंच लांब असतें. हीं स्वभावानें गरीब असतात. माकडें जंगलांत, झाडींत अथवा डोंगराळ प्रदेशांत लहान लहान कळप करून राहातात. यांचें खाणें म्हणजे धान्य, कणसें, फळें इत्यादि होय.



९. माकड.

माकड फार चपळ व चळवळें असतें. तें लवकर माणसाळतें. पाळीव माकड सुद्धां बांधून ठेवलें, तरी सारखी धडपड करीत असतें. माकडास शिकवलें असतां तें चटकन शिकतें. मनुष्याचें अनुकरण करण्यांत तें फार पटाईत असतें, इतकें कीं लहान-मूल एकादे वेळीं मोठ्या माणसांप्रमाणें वागूं लागल्यास आपण त्यास माकडचेष्टा म्हणतों. माकड लवकर शिकतें म्हणून दरवेशी लोक त्यास खेळ वगैरे शिकवून त्यावर आपलें पोट भरतात. माकडांचा सर्कशींतही उपयोग केलेला आपण पाहातों.

मादीस दरखेपेस एक पोर होतें. ती त्याची जोपासना फार प्रेमानें करितें. माकड साधारणपणें १५–२० वर्षेंपर्यंत जगतें.

## वानर.

'वानरा वानरा हु-उप्प्' असें वानरांची टोळी झाडावरून अथवा घरावरून उड्या मारीत जात असतां मुलें नेहमीं ओरडतात. वरील प्रघात मोठे वानर 'हुउप्प्, हुउप्प्' असा अवाज काढून ओरडतात यांवरून पडलेला दिसतो.



१०. वानर किंवा हुप्या.

वानरांच्या टोळीचा म्होरक्या 'हुप्प्' असा आवाज करून खूपच जोरानें ओरडतो म्हणून त्यास 'हुप्या' असें ह्मणतात.

वानर शरीरानें मोठे ताकतवान् व उंच असे असतात. त्यांचें शेंपूट पुष्कळ लांब असतें. चालतांना ते शेपटीस कमानदार बांक देऊन (चार पायांवर) चालतात तेव्हां मोठी मौज दिसते. ते सरासर झाडें चढून जातात व या झाडांवरून त्या झाडांवर, या घरांवरून त्या घरांवर धडाधड उड्या मारितात. वानरांचा रंग पिवळट किंवा उदी असतो; पोटाचे बाजूस तो जरा पांढुरका असतो. वानराचें तोंड काळें असतें; तसेच हाताचे व पायाचे तळवेही काळे असतात. पायाचे आंगठे हाताच्या आंगठ्याप्रमाणें वांकडे असतात, यामुळे त्यास फांद्यांस चटकन् धरून लोंबकळतां येतें. वानर सहसा माणसाळत नाहींत व माकडाप्रमाणें चटकन् शिकत नाहींत. वानर झाडांवर राहातात. मादीला दर खेपेस एक पोर

होतें. आपले पिलांवर तिचा फार जीव असतो. पिलास कोणी पकडण्याचा प्रयत्न केल्यास ती पिलास हातीं लागूं देत नाहीं. पिलूं स्वतंत्रपणें वावरूं लागेपर्यंत ती त्यास पोटाशीं वागविते.

वानर घरांवरून धडाधड उड्या मारून कौलारांची फार नासाडी करितात, तसेंच बागांतून झाडांचीं फळें वगैरे खाऊन फार नुकसानी करितात.

लिमूरः—ही वानरांची जात मुख्यत्वेंकरून अमेरिकेंत सांपडते.

---

## मुलींकरितां कविता.

### आईला मदत.

( या गाण्यांतील अर्थाप्रमाणें मुलींनीं कृति करावी. )

( चाल. आज भेटली ताई ही. )

सर्व मुलीः— चला चला गे चला चला
मदत कराया आईला
काम कराया या या या
आईला गे सुखवाया

( चाल, सावी पदाची अगर कटावाची. )

एक मुलगीः—

केरसुणी मी घेउनि झर झर झर झर घर मी झाडीतें
हळू हळू तो केर भरूनी दूर नेउनी टाकीतें
पाणि आणुनी सडा अंगणीं भर भर भर भर शिंपीतें.
सुंदर ऐशी रांगोळी मी हळू हळू मग काढीतें
सर्व मुलीः— चला चला गे चला चला ....

[library stamp]

दुसरी मुलगीः––

पाटावरि मी धान्य घेउनी निवड निवड तें निवडीतें
सुपामधें तें घालुनि मग मी पाखड पाखड पाखडतें
दळुनी दळुनी बारिक मउ मी पीठ तयाचें तें करितें
चाळणिनें तें चाळुनि चाळुनि चाळ तयाचा काढीतें
सर्व मुलीः— चला चला गे चला चला .... ....

तिसरी मुलगीः––

पितळीमध्यें कणिक घेउनी हळू हळू ती मी मळतें
तेल घालुनी तूप घालुनी गोळा मग मी बनवीतें
लाटुनि लाटुनि सुंदर त्याची पोळी वाटोळी करितें
उलथुनि उलथुनि तव्यावरी ती खुसखुशीत मी भाजीतें
सर्व मुलीः — चला चला गे चला चला .... ....

चवथी मुलगीः––

घंगाळामधिं धुणें घालुनी आघळ आघळ आघळतें
शिळेवरी तें ठेवुनि मग मी चुबक चुबक तें चुबकीतें
बुचकळोनि तें शिळेवरी मी आपट आपट आपटितें
घंगाळामधिं पुन्हा घालुनी चुबक चुबक तें चुबकीतें
पिळा पिळोनी सोडवुनी तो झटक झटक मी झटकीतें
घडी करोनी साफ नीट ती दोरीवर मी घालीतें.

# प्रवासास या जाउं चला.

( चाल. आज भेटली ताई ही. )

सर्व मुलें:— चला चला रे चला चला

प्रवासास या जाउं चला
एका जागीं राहुनियां
कंटाळा हा बहु आला
चला चला रे चला चला

( पद. चाल—नरानें धैर्य न सोडावें. )

पहिलें मूल:—पहा ही गाडी बैलांची
तुम्हांसाठिं मीं जोडुनि अणिली सुंदर ही माझी
ढवळ्या पवळ्या जोडियले
जोडि पहा ही सुंदर माझी दुड दुड दुड चाले

सर्व मुलें:— चला चला रे चला चला. .... ....

( पद—युवराज शिवाजीस सुखी राख ईश्वरा या चालिवर. )

दुसरें मूल:—

घोड्याची गाडी ही आणिली पहा
मोत्या हा सुंदर किति शोभतो अहा !
जलद जलद झर झर झर पळत हा किती
टप टप टप टप टप टप पाय वाजती
घोड्याची गाडी ही आणिली पहा

सर्व मुलें:— चला चला रे चला चला.

तिसरें मूल:—( पद–'नृपममता रामावरती' या चालीवर )

मोटार तुम्हांसाठीं मीं
आणिली कशी ही नामी । कितितरी ।
पं पं पं पो पो करिते
रो रो रो धावत जाते । काशि बरें ।
चालली दूर व्हा सारे
धावे ही जणु कीं वारें । कशि पहा ।

सर्व मुलें:— चला चला रे चला चला.

चवथें मुल:—( चाल–आज भेटली ताई ही. )

आगगाडी ही तयार झाली
जाण्याची ती वेळ जहाली
घण घण घण घण घंटा होते
सों सों सों सों एंजिन करितें
शिटी पहा ही कशी वाजते
भक् भक् भक् भक् एंजिन करतें
गाडी जोरानें ही चाले
स्टेशन मागें किती राहिलें

सर्व मुलें:— चला चला रे चला चला.

( या गाण्यांत अर्थाप्रमाणें कृति करावयाची आहे. बैलगाडी, घोड्याची गाडी, मोटार व आगगाडी यांच्या गति कृतीनें दाखवावयाच्या आहेत. )


# पावट्याचा वेल.

एका बाईला पांडू या नांवाचा एक मुलगा होता. ती घरची फार गरीब होती. तिची एक गाय होती, तिचें दूध विकून ती बाई आपला व आपल्या मुलाचा निर्वाह करीत असे. पुढें ती गाय दूध देईना, तेव्हां आतां तिचा कांहीं उपयोग नाहीं असें समजून ती गाय विकून टाकण्याचा त्या बाईनें विचार केला. नंतर तिनें पांडूला सांगितलें, 'पांडू, ही गाय बाजारांत घेऊन जा व ती विकून पैसे घेऊन ये.' पांडू गाय घेऊन जात असतां त्याला वाटेंत एक मनुष्य भेटला. तो पांडूला म्हणाला, 'मुला, कोठें जातोस?' पांडू म्हणाला, 'ही गाय विकण्याकरितां मी बाजारांत जात आहें.' मग तो मनुष्य पुन्हा म्हणाला, 'तूं ही गाय मला दे. मी तुला मूठभर पावटे देतों' तसें पांडू म्हणाला, 'एवढ्या मोठ्या गाईबद्दल मूठभर पावटे का देतोस! वा! तूं तर मोठा शहाणाच दिसतोस!' तेव्हां तो मनुष्य बोलला, 'अरे पण हे पावटे जादूचे आहेत! ते तूं घेतलेस तर तुला मोठा लाभ होईल.' तें ऐकून पांडूला ते पावटे घ्यावेसे वाटलें. नंतर त्यानें गाय देऊन पावटे घेतले व तो घरीं गेला.





पांडूच्या आईनें गाईबद्दल त्याजजवळ पैसे मागितले, तेव्हां त्यानें ते आणलेले पावटे तिला दिले. ते पाहून तिला फारच राग आला व त्या रागाच्या सपाट्यांत तिनें ते सर्व पावटे खिडकीबाहेर फेंकून दिले व पांडूला ती खूपच टाकून बोलली. पांडू



त्या रात्रीं तसाच उपाशीं निजला!

सकाळीं उठून पांडू पाहातो तों खिडकीजवळ व खोलींत नेहमींपेक्षां जास्त अंधार पडला आहे! तेव्हां त्यानें बाहेर पाहिलें तों त्याला एक फारच मोठा, दाट व अतिशय उंच असा एक वेल खिडकीजवळ उगवलेला दिसला! तो इतका उंच होता कीं ढगापर्यंत पोहोंचला होता!

त्या जादूच्या पावट्यांपासून झालेल्या त्या वेलावर चढून पाहावें असें पांडूला वाटलें, म्हणून तो चढूं लागला. चढतां चढतां खूप उंच गेल्यावर त्याला पांढरा शुभ्र असा एक रस्ता लागला! त्या रस्त्यानें तो गेला तों एका राक्षसाच्या दाराजवळ येऊन पोहोंचला! दाराजवळ एक बाई होती तिला पांडू म्हणाला, 'बाई, मला फार भूक लागली आहे! तर मला घरांत येऊं दे व कांहीं तरी खावयास दे.' ती बाई जरी राक्षसाची बायको होती, तरी फारच दयाळू होती. म्हणून तिनें त्याला आंत घेतलें. पण 'तूं एथून लवकर जा. कारण राक्षस जर आला तर तुला तो खाईल,' असें तिनें त्यास बजाविलें. इतक्यांत तिचा नवरा तो राक्षस तेथें आलाच! त्याच्या पावलांचा आवाज ऐकतांच त्या बाईनें ताबडतोब पांडूला एका मोठ्या भांड्याखालीं लपविलें.

राक्षस धप धप पाय आपटीत आंत आला व ओरडूं लागला.

'माणूस कोठें लपुनी बसला
वास तयाचा मजला आला
लुच्च्याला मी शोधुन काढिन
खरपुस आतां मार देइन'

पण त्याची बायको म्हणाली, 'छे छे! एथें कोणी मनुष्य नाहीं. हा कसला तरी दुसराच वास असेल.' मग तो रोजच्याप्रमाणें जेवावयास बसला. जेवण झाल्यावर तो बायकोला म्हणाला, 'परवां मीं ज्या मोहरांच्या पिशव्या चोरून आणल्या त्या आण.' पुढें राक्षस त्या मोहरा मोजूं लागला, पण त्याला तेथेंच झोप लागली व ढगांच्या गडगडाटाप्रमाणें त्याच्या घोरण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. राक्षसाला



गाढ झोप लागली आहे, असें पांडूनें हळूच भांड्याखालून पाहिलें. मग आवाज न करितां तो बाहेर आला आणि त्या मोहरांच्या पिशव्या घेऊन तावडतोब तो वेलाखालीं उतरला व त्या पिशव्या त्यानें आपल्या आईस दिल्या.

पुढें कांहीं दिवसांनीं पांडू पुन्हा वेलावरून त्या राक्षसाच्या घरीं गेला. तेथें राक्षसाच्या बायकोनें त्यास ओळखलें, परंतु

# पहिल्या इयत्तेकरितां धडे.

[ आतांपर्यंत कन्याशिक्षकांत शिशुवर्गांकरितां पुष्कळ धडे दिले आहेत. पुढील धडे शिशुवर्गांतून पहिल्या इयत्तेंत गेलेल्या मुलांकरिता लिहिले आहेत. —संपादक. ]

## दिवाळी

| | | | |
|---|---|---|---|
| च् | या | च्या | घराच्या |
| ल् | या | ल्या | आपल्या |
| म् | ह | म्ह | म्हणाला |
| द् | या | द्या | उद्यांपासून |
| र | या | ऱ्या | दुसऱ्या |

पावसाळा संपला. दिवाळी जवळ आली. लोक आपलीं अंगणें साफ करूं लागले व घराच्या भिंती सारवून घराला रंग देऊं लागले. तें पाहून धाकटा गणू आपल्या बापास म्हणाला, 'बाबा, आपलें घर कधीं सारवणार? आपल्या अंगणांतलें गवत कधीं काढणार! दिवाळी जवळ आली. लोक पहा कशीं आपलीं घरें सारवीत आहेत.'

तें ऐकून रामराव म्हणाले, 'खरेंच बाळ, आतां आपणांला कामाला लागलें पाहिजे. मी आजच शेताच्या कामांतून मोकळा झालों आहें. उद्यांपासून दादा व मी कामाला लागूं. तूं आम्हांला

मदत करशीलना ?' गणू म्हणाला, 'बाबा उद्यांपासून आम्हांला दिवाळीची सुटी आहे. मी तुमच्याबरोबर काम करीन.'

दुसऱ्या दिवशीं सकाळींच रामराव व त्यांचा थोरला मुलगा गोविंदा यांनीं कामाला सुरुवात केली. धाकटा गणूही त्यांना मदत करूं लागला. त्यांनीं अंगणांतील गवत काढून तें साफ केलें. नंतर तें सारविलें. घराचा ओटा पावसानें पडला होता तो त्यांनीं लिंपला. घराच्या आंतील व बाहेरील भिंती सारवून त्यांना रंग दिला. इतकें काम करावयास त्यांना तीन दिवस लागले. गोविंदानें मग रंगीत कागदाचा एक दिवा केला व तो एका उंच बांबूला अडकविला. गणू म्हणाला, 'बाबा, आतां आपलें घर कसें सुंदर दिसत आहे.'

मग रामराव गणूला व गोविंदाला घेऊन बाजारांत गेले. बाजार लोकांनीं भरून गेला होता. साखर, खोबरें, गुळ, तूप, तेल, रवा लोक दिवाळीकरितां विकत घेत होते. वाण्यांनीं दारू-सामानही विकण्यास ठेविलें होतें, फटाक्यांच्या पेट्या, नळे, फुलबाज्या, बाण हे सारखे रांगेनें विकण्याकरितां ठेविले होते. रामरावांनीं दिवाळीला लागणारें सामान विकत घेतलें. त्यांनीं गणूकरितां फटाक्यांच्या पेट्या व फुलबाज्या विकत घेतल्या व गोविंदाला कांहीं नळे व बाण विकत घेतले. ते घरीं परतले आणि पाहतात तों चंपूताई सासऱ्याहून दिवाळीकरितां घरीं आली आहे. तिला पाहून गणूला फार आनंद झाला व त्यानें तिच्या गळ्याला मिठी मारली.

दुसऱ्या दिवसापासून दिवाळीला सुरुवात झाली. आईनें केलेल्या लाडू, पुऱ्या व करंज्या खाण्यांत, मुलांबरोबर खेळ खेळण्यांत, चंपूताईच्या गोष्टी ऐकण्यांत, संध्याकाळीं दिवे लावण्यांत व फटाके उडविण्यांत, दिवाळीचे चार दिवस कसे गेले तें गणूला कळलें देखील नाहीं.

---

## मी शाळेंत जाईन.

सूत त स्त मास्तरांनीं
त्र रा त्रा चित्रांचे

धाकटा रामू आपल्या थोरल्या भावाबरोबर शाळेंत गेला. ते दोघे भाऊ संध्याकाळीं परत आले तेव्हां आई म्हणाली ‘ विठोबा, रामू शाळेंत बसून कंटाळला असेल. त्याला सुटींत घरीं आणून कां नाहीं पोहोंचविलास ? ’ विठोबा म्हणाला, ‘ आई, सुटींत मीं त्याला म्हटलें चल, आतां घरीं जाऊं. ’ तो म्हणाला, ‘ मी नाहीं आतां घरीं जात, संध्याकाळीं मी तुझ्याबरोबर घरीं जाईन. ’ रामू वर्गांत मजजवळच बसला होता. मास्तरांनीं त्याला पाहिलें व आपल्याजवळ बोलाविलें व ‘मुला तुझें नांव काय म्हणून विचारिलें. हा म्हणाला, ‘ माझें नांव रामू, पण आई आणि बाबा कधीं कधीं मला बाळ म्हणतात. ’ तें ऐकून मास्तरांना हंसू आलें.’

रामू म्हणाला, ‘ आइ, दादाच्या शाळेंत किती तरी मुलें आहेत. आई, मास्तर शाळेंत मुलांना गोष्टी कशालाग सांगतात ?

दादाच्या मास्तरांनीं मुलांना कशी छान गोष्ट सांगितली. मला ती भारी आवडली. बाबा घरीं आले म्हणजे मी त्यांना ती गोष्ट सांगणार आहें. मास्तरांनीं मला सुंदर चित्रांचें एक पुस्तक पाहावयास दिलें. त्यांत किती तरी छान चित्रें होतीं. मीं तीं सगळीं पाहिलीं!'

विठोबा म्हणाला, 'आई आम्ही मधल्या सुटींत शाळेच्या मागें, वडाच्या झाडाखालीं लपंडाव खेळत होतों. मुलांनीं रामूला भोज्या केलें व त्याला गडयांचे डोळे झांकण्यास सांगितलें. आपला रामू असा लबाड आहे. तो गडयांचे डोळे घट्ट झाकीत असे. त्याला आमच्या खेळाची भारी गंमत वाटली. आई, रामू भारी धीट आहे. तो शाळेंत अगदीं भ्याला नाहीं. आम्ही कविता म्हणत होतों. मास्तर रामूला म्हणाले, 'तुला एकादें गाणें येतें का? म्हण पाहूं,' रामूनें लागलीच 'तांबू तांबू ये घरीं, झाली आतां सांज' म्हणण्याला आरंभ केला. तें ऐकून सगळ्या मुलांना भारी हसूं आलें. मास्तर म्हणाले, 'शाबास रामू, तूं भारी हुशार आहेस. तूं आमच्या शाळेंत येशील ना?' रामू म्हणाला, 'मला तुमची शाळा आवडते. मी उद्यांपासून तुमच्या शाळेंत येईन.'

रामू म्हणाला, 'आई, दादाच्या शाळेंत एक सुरेख बाग आहे. तेथें संध्याकाळीं मुलें झारीनें झाडांना पाणी घालतात. मास्तरांनीं मला झाडाचें एक सुरेख फूल तोडून दिलें. आई हें पहा तें फूल त्याला किती गोड वास येत आहे. आई, मी उद्यांपासून दादाचे शाळेंत जाऊं काय?'

आई म्हणाली, ' बाळ, परवा गुढीचा पाडवा आहे. त्या दिवशीं शाळेंत तुझें नांव घालूं. मग तूं व दादा रोज शाळेंत बरोबर जात जा.'

---

## आठवड्याचा बाजार.

न् हा • न्हा॰ उन्हाळ्याचे

जगूचा बाप पुण्यास रहात होता. उन्हाळ्याचे सुटींत त्यानें जगूला वडगांवास त्याचे मामाकडे धाडलें. जगूचा मामा यशवंतराव हा शेतकरी होता. त्याचे वडगांवास दोन मोठाले मळे होते. वडगांवपासून एक कोसावर असलेल्या मळ्यांत जगूचा मामा रहात असे. मामाचे बैल, गाई, वांसरें, शेळ्या व करडें. पाहून जगूला फार आनंद वाटला. मामाचे मळ्यांत दगडांनीं बांधलेली एक मोठी विहीर होती. तिला दोन मोटा असत. त्या मोटा ओढावयाला आठ बैल लागत. मोटांचें पाणी थारोळ्यांत धपदिशीं पडतांना व पाटांतून जोरानें वाहतांना पाहून जगूला फार मौज वाटे. मामाचा मुलगा सदू व मुलगी रंगू हीं जगूच्या वयाचींच होतीं; तीं त्याबरोबर नेहमीं खेळत असत.

तीं मुलें सकाळींच उठत व तोंड धूत. यशवंतराव गाईची धार काढून त्यांना पेला पेला दूध देत असे. मग तीं मुलें जाई, जुई व मोगऱ्याचीं फुलें तोडीत. यावेळीं वांग्याच्या झाडांना भर

आला होता. भेंड्यांच्या झाडांना सुंदर फुलें आलीं होतीं व त्यांना भेंड्या लागल्या होत्या. गोवारीचीं झाडें शेंगांनीं लवलीं होतीं. जगूला भाजी तोडण्यांत फार मजा वाटत असे. तो भाजी तोडून मामीला नेऊन देत असे. त्याची मामी सकवारबाई वांग्यांची, गोवारीची किंवा भेंड्यांची सुरेख भाजी करीत असे. ताजी भाजी व भाकरी घेऊन तीं मुलें यशवंतराव जेथें मळ्यांत काम करीत असे तेथें जात व ते सगळेजण विहीरीचे कांठीं बसून न्याहारी करीत. मामा व त्याचे गडी काम करीत असतांना जगू एकसारखा त्यांचें तें काम पहात बसे व ममाला मधून मधून हें काय व तें काय असें विचारीत असे. वासरांच्या बरोबर खेळण्यांतही जगूला भारी आनंद वाटत असे.

वडगांवचा बाजार गुरुवारीं भरत असे. बाजारचे दिवशीं सकाळींच जगूच्या मामानें दोन पोतीं वांगीं, पाटीभर भेंड्या व पाटीभर गोवारीच्या शेंगा तोडल्या. घरांत सांठवून ठेवलेल्या कांद्यांपैकीं दोन पोतीं कांदे त्यानें काढले. दहा वाजतां यशवंतरावानें आपली गाडी जुंपली. त्यानें तीं भाजी व कांदे गाडींत ठेविले व तो व त्याचा गडी गाडींत बसून बाजाराला निघाले. मामा जातांना जगूला म्हणाला, 'जगू, तूं दुपारीं तुझ्या मामीबरोबर बाजाराला ये. आमचा बाजार पाहून तुला फार मौज वाटेल. संध्याकाळीं आपण सगळेजण गाडींत परत येऊं.'

चार वाजतां जगू, सदू व रंगू यांना घेऊन सकवारबाई वडगांवचे बाजाराला निघाली. गांवाचे बाहेर नदीचे कांठीं बाजार

भरला होता. बाजाराजवळ जातांच त्यांना मोठा गोंगाट ऐकूं आला. बाजारांत आसपासच्या गांवच्या बायकांची, पुरुषांची व मुलांची एकच गर्दी झाली. बाजारांत एका बाजूला भाजीच्या टोपल्या घेऊन लोक बसले होते. शेजारींच माळिणी केळीं, संत्रें, व डाळिंबें विकावयास बसल्या होत्या. त्याच्या पलीकडे धान्याचीं दुकानें होतीं. त्याच्या पलीकडे मीठ, मसाला, गूळ, साखर, हळद वगैरे जिन्नस वाणी लोक विकीत होते. पलीकडे धोतर, खण, लुगडीं, आयत्या शिवलेल्या बंड्या सदरे वगैरे कपडे घेऊन शिंपी लोक बसले होते. त्यांच्या समोर हलवायाचीं दुकानें होतीं. तेथें मुलें पेढे, बर्फी, रेवड्या विकत घेत होतीं. तांबोळी पानसुपारी विकण्यांत गर्क झाले होते. जगूच्या मामीनें वाण्याच्या दुकानांतून बरेंच सामान विकत घेतलें. तिनें शिंप्याच्या दुकानांतून रंगूला परकर करण्याकरितां कापड विकत घेतलें.

संध्याकाळ होऊं लागली तसे लोक घराकडे निघाले. मग जगूच्या मामानें आपलें दुकान आटोपलें. त्यानें हलवायाच्या दुकानांतून मुलांकरतां ताजे पेढे विकत घेतले. मग यशवंतराव, सकवारबाई व मुलें गाडींत बसून मळ्याकडे निघालीं. गाडींत जगू मामाला म्हणाला, 'तुमच्या एथें बाजार रोज भरतो का?' मामा म्हणाला, 'नाहीं जगू, आमच्या गांवचा बाजार आठवड्यांतून एकदा भरतो. तुमच्या पुण्यास व दुसऱ्या मोठ्या शहरांत बाजार रोज भरतो.

---

# राष्ट्रसंघ.

गेलें महायुद्ध सर्वांच्या परिचयाचें आहे. या महायुद्धांत इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, इटली, जर्मनी, आस्ट्रिया, हंगेरी, सर्व्हिया, रशिया, तुर्कस्तान वगैरे राष्ट्रें पडलीं होतीं. हें युद्ध सर्व जगभर सतत पांच साडे वर्षे चालू होतें. या युद्धांत लक्षावधि माणसें प्राणास मुकलीं. कोटयावधि रुपयांचा चुराडा झाला. कित्येक प्रांत उध्वस्त झाले. एकंदरींत मनुष्य जातीचें अपरिमित नुकसान झालें. युद्धाची कथा ऐकावयास मोठी रम्य वाटते, परंतु युद्धामुळें केवढें भयंकर नुकसान होतें, व मनुष्याच्या प्रगतीला केवढा मोठा जबर धक्का बसतो, हें गेल्या महायुद्धावरून सर्वांच्या निदर्शनास आलें आहे. व्यक्तीनें किंवा राष्ट्रानें अहर्निश खटपट करून कोटयवधि रुपये मिळवावे, सुंदर प्रकारच्या संस्था स्थापाव्या, व जगाची प्रगति करीत असावें, तोंच युद्धाची ठिणगी पडून जिकडे तिकडे भडका उडावा, व सर्वस्वाची त्यांत होळी व्हावी, यासारखा दुःखकारक प्रसंग कोणता असूं शकेल? सबब महायुद्धासारखे अनिष्ट प्रसंग येऊन गेल्यावर असलीं युद्धें पुन्हा होऊं नयेत, व राष्ट्राराष्ट्रांतील भांडणें समोपचारानें मिटण्याकरितां कांहीं तरी तोड काढली पाहिजे, असें शहाण्या मनुष्यास वाटल्यास नवल नाहीं. जगांतून युद्धाची कायमची हकालपट्टी होणें कितपत शक्य आहे, हें आज सांगतां येणार नाहीं, परंतु प्रयत्न करणें हें मनुष्याचें काम आहे. अशाच हेतूनें प्रेरित होऊन गेल्या महायुद्धांत स्वित्सर्लंडमध्यें जीनिवा येथें जी अंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाली, तीच ही राष्ट्रसंघ होय. या राष्ट्रसंघामध्यें कोणतीं राष्ट्रें सामील झालीं आहेत, त्यांचा हेतु काय आहे, व तो हेतु तडीस नेण्याकरितां ते कोणते उपाय अमलांत आणणार यासंबंधीं माहिती देण्यापूर्वी प्राचीन कालापासून महायुद्धापर्यंत युरोप खंडाचें ऐतिहासिक दृष्ट्या अवलोकन करूं.

फार प्राचीन काळीं ग्रीस हें राष्ट्र सुधारलेलें होतें. तेथें एकेका शहरापुरतींच चिमुकलीं प्रजासत्ताक संस्थानें होतीं. अशा कित्येक संस्थानांतून शास्त्र व कला ह्यांची अतिशय अभिवृद्धि झाली. तत्त्वज्ञान, वाङ्मय, निरनिराळ्या कला वगैरे बाबतींत ग्रीसचें राष्ट्र धुरीण होतें. साक्रेटीस, प्लेटो, युक्लीड यांसारख्या महापुरुषांची कीर्ति जगभर दुमदुमली आहे, ते हे महापुरुष याच कालांतील होत. आजच्या युरोप-खंडाच्या सुधारणेचा पाया ग्रीसचीच मूळची संस्कृति होय. ग्रीसनें ज्ञानदीप पाजळून सर्व युरोपला प्रगतीचा मार्ग दाखविला, या दृष्टीनें पहातां युरोपखंड हें सदैव ग्रीसचें ऋणी राहील. आज सर्व जगांत प्रजासत्ताक राज्याची जी लाट उसळली आहे, तिचा पाया ग्रीसनेंच फार प्राचीन काळापूर्वीं घातला. याप्रमाणें ग्रीसनें कित्येक वर्षें युरोप-खंडावर आपलें नैतिक आधिपत्य गाजविलें. परंतु पुढें त्याला उतरती कळा लागली. याचें कारण निरनिराळ्या संस्थानांत एकी नव्हती. तीं संस्थानें परस्परांशी युद्धें करीत असत. सर्व संस्थानांना आपल्या कह्यांत ठेवणारी दुसरी मध्यवर्ती सत्ता नव्हती. त्यामुळें कालांतरानें ग्रीसचा अधःपात झाला, नंतर रोमचें साम्राज्य स्थापन झालें. त्या कालचें बहुतेक सर्व ज्ञात जग रोमच्या साम्राज्यांत मोडत असे. या साम्राज्याचा नाश झाल्यानंतर सर्व युरोप खंडास पुन्हा एका सत्ते-खालीं आणणें मोठें मुष्किलीचें झालें. परंतु हें अवघड कार्य कित्येक शतकें ख्रिश्चन धर्मानें केलें. सर्व राष्ट्रांचा धर्म एक असल्यामुळें त्यांच्यामध्यें परस्पर प्रेमभाव उत्पन्न झाला, व पोपच्या सत्तेखालीं हीं राष्ट्रें कित्येक शतकें गुण्यागोविंदानें नांदलीं, परंतु पुढें पोपची अरेरावी जसजशी वाढूं लागली, तसतशी त्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली, व युरोप-खंडाची घडी पुन्हा विसकटली. पोपचा जाच कित्येक दिवस सहन केल्यानंतर इंग्लंडसारख्या कित्येक राष्ट्रांनीं त्याची सत्ता झुगारून दिली, व ते देश आपापल्या परीनें स्वतंत्र झाले. पूर्वीच्या बंधुत्वाच्या कल्पना मावळल्या, व

प्रत्येक राष्ट्र आपल्याला वाटेल त्याप्रमाणें वागूं लागलें, व आपणच श्रेष्ठ, आपल्यांमानानें इतर देशचे लोक कनिष्ठ अशा प्रकारचा खोटा अभिमान निरनिराळ्या राष्ट्रांमध्यें उत्पन्न झाला. याप्रमाणें कित्येक शतकें गेल्यावर नेपोलियन बोनापार्टच्या युद्धाला आरंभ झाला. त्या युद्धांत युरोपचें पुष्कळ नुकसान झालें. कित्येक राजांचीं राज्यें गेलीं, व सर्व युरोपखंड नेपोलियननें पायाखालीं तुडविण्याचा बेत आणला, परंतु इ. स. १८१५ सालीं वाटर्लु येथें नेपोलियनचा पराभव होऊन युरोपवरची त्यावेळची आपत्ति टळली. पुढें असल्या प्रकारची आपत्ति येऊं नये, म्हणून कित्येक राष्ट्रांनीं आपसांत मैत्रीचा तह केला, परंतु तो तह सन १८२३ पर्यंत म्हणजे सारीं सात आठ वर्षेंच टिकला. पुढें पुढें युरोप खंडांतील राष्ट्रें जास्त जास्त स्वार्थी बनूं लागलीं, व आपल्या सत्तेचा प्रसार सर्व जगभर कसा होईल, याविषयीं त्यांच्यांत मोठी प्रतिस्पर्धा लागली.

अलीकडे गेल्या शंभर वर्षांत भौतिक शास्त्रामध्यें अनेक कल्पनातीत शोध लागले, यामुळें जगाचें एकंदर स्वरूप पालटलें. आगगाडी, तारायंत्र, वाफेच्या बोटी, बिनतारी तारायंत्र, टेलिफोन, विमानें वगैरे शोधांमुळें पृथ्वीवरील राष्ट्रांचें परस्परांशीं दळणवळण विशेष वाढलें. अमेरिकेंत एकादी महत्त्वाची गोष्ट घडली असतां ती दुसरे दिवशीं सकाळीं हजारों मैल असणाऱ्या गांवीं वर्तमानपत्रांत वाचावयास मिळते. लंडनमध्यें बसून टेलिफोनच्या साह्यानें न्यूयार्कमधील माणसाशीं बोलतां येतें. पूर्वीं रोमहून लंडनला जावयाला बारा ते चौदा दिवस लागत, हेंच अंतर आज दोन दिवसांत काढतां येतें. सारांश, पृथ्वीवरील सर्व स्थळें पूर्वीं जीं अत्यंत दूरवरचीं भासत असत, तींच आतां अगदीं जवळ आहेत, असें वाटतें. भौतिक शास्त्रांतील या अलौकिक शोधांमुळें निरनिराळ्या देशांचें दळणवळण पूर्वींपेक्षां शेंकडोंपट वाढलें, व त्यांचें परस्परांशीं

अनेक व्यवहार सुरू झाले. पूर्वींसारखी आपण बरें व आपला देश बरा अशा प्रकारची तुटक वृत्ति आजच्या काळांत ठेवणें शक्य नाहीं. याप्रमाणें भौतिक शास्त्रांतील अलौकिक शोधांनीं जगाच्या व्यवहारांत विलक्षण क्रांति घडून आली, तेव्हां आतां सर्व राष्ट्रांचा जिच्यामध्यें समावेश होईल,अशी एखादी मध्यवर्ति संस्थेची विशेष जरूरी भासूं लागली. जितकें राष्ट्राराष्ट्रांत दळणवळण जास्त तितके तितके त्यांच्यामध्यें अनेक व्यवहार होणार व ते गुंतागुंतीचें असणार अशी सर्वच देशांची स्थिति कित्येक वर्षांपासून होत चालली, व अनेक व्यवहार घडल्यामुळें वरचेवर भांडणतंट्याचे प्रसंग येतात, तेव्हां ते तंटे मिटविण्यास कोणी तरी तिराहित सत्ता सर्व राष्ट्रांना सामान्य अशी पाहिजे असें सर्वांना वाटूं लागलें. आपण ही गोष्ट स्पष्ट करण्याकरितां पोष्ट खात्याचें उदाहरण घेऊं. सर्व देशांतील पोस्टांचे दर जर कांहीं विशिष्ट नियमांनीं बांधले गेले नाहींत,व वाटेल त्या राष्ट्रानें वाटेल ते दर ठरवावेत अशी जर मोकळीक ठेविली, तर एका देशांतील पत्रें दुसऱ्या देशांत जाण्याच्या कामीं अनेक घोटाळे उत्पन्न होतील.तसेंच हल्लींच्या काळांतील दळणवळण अत्यंत जलद असल्यामुळें एकाद्या ठिकाणीं भयंकर रोगांची सांथ उत्पन्न झाली असल्यास त्या रोगाचें बीज दहा पांच दिवसांचे आंत हजारों मैलांवर जाऊन पडेल, व तेथें त्या सांथीचा उपद्रव होऊन हजारों जीव नाहक बळी पडतील. याप्रमाणें राष्ट्राराष्ट्रांतील अनेक संबंधांमध्यें कित्येक भानगडी उत्पन्न होण्याचा संभव असतो, तेव्हां या सर्व अडचणींना तोंड देऊन राष्ट्राराष्ट्रांतील संबंध प्रेमाचे करण्यास एकादी मध्यवर्ती संस्था असणें अपरिहार्य झालें, व या सर्व परिस्थितीचेंच राष्ट्रसंघ हें मूर्तिमंत फळ आहे. राष्ट्रसंघ १९२० मध्यें स्थापन झाला. त्यापूर्वीं सात आठ वर्षें कित्येक आंतर राष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या होत्या. इ. स. १८१५ मध्यें अशा प्रकारची अंतर–राष्ट्रीय संस्था एकही नव्हती, पण महायुद्धापूर्वीं १९१३ सालीं अशा संस्था ३३ होत्या. प्रथम पोस्टखा-

त्याचा संघ स्थापन झाला, व नंतर तारखात्याचा संघ, बिनतारी तारायंत्राचा संघ, आरोग्यखात्याचा संघ असे निरनिराळे आंतरराष्ट्रीय संघ निर्माण झाले.

भौतिक शास्त्रांतील शोधांनीं मानव जातीचें जसें अपरिमित कल्याण झालें आहे, तसाच युद्धासारख्या कांहीं बाबतींत थोडा तोटाही झाला आहे, असें म्हटल्यास कांहीं वावगें होणार नाहीं. पूर्वींच्या मानानें हल्लींचें युद्ध फार भयंकर असतें. लांब पल्ल्याच्या बंदुका, तोफा, टँक्स, विमानें, बांबगोळे, विषारी धूर, बेडर जहाजें, पाणबुड्या बोटी वगैरे भयंकर शस्त्रें मनुष्याच्या हातांत पडल्यामुळें आज थोड्या काळांतच लक्षावधि लोकांचा संहार करितां येतो. देशचे देश उध्वस्त होतात. नंदनवन सारख्या प्रदेशांना क्षणांत एखाद्या भयाण प्रदेशाचें स्वरूप प्राप्त होतें. उदाहरणार्थ, शंभर वर्षांपूर्वीं नेपोलियन बोनापार्टशीं वाटर्लु येथें झालेल्या लढाईत पस्तीस हजार इंग्लिश लोक पडले व दोस्त राष्ट्रांचे चाळीस हजार लोक पडले तेंच गेले महायुद्धाकडे पाहिलें असतां मनुष्य जातीचा भयंकर संहार झालेला दृष्टीस पडतो. गेल्या महायुद्धांत एकट्या इंग्रजांकडील नऊ लाख लोक पडले व सर्व महायुद्धांत एकंदर तीन कोटी लोकांचा संहार झाला. वर दिलेल्या गोष्टीवरून आधुनिक शस्त्रास्त्रांच्या साह्यानें युद्धाला केवढें भयंकर स्वरूप प्राप्त होतें, याची थोडी कल्पना येईल. अशा प्रकारचीं युद्धें जर वरच्यावर होऊं लागलीं, तर थोड्याच काळांत मनुष्यानें पिढ्यानपिढ्या मिळविलेल्या संस्कृतीचाच नाश व्हावयाचा, तेव्हां असलें भयंकर दृश्य मनापुढें आणलें म्हणजे विचारी माणसाच्या अंगावर शहारे येतात, व याला कांहीं तरी आळा घातलाच पाहिजे असें त्यास वाटूं लागतें. गेल्या महायुद्धामुळें जगाचें अतोनात नुकसान झालेलें पाहून ज्यांचा जीव अतिशय तळमळत असे, अशा अनेक व्यक्तींपैकीं अमेरिकेचे माजी अध्यक्ष वुड्रो वुईल्सन हे थोर पुरुष होत. राष्ट्रसंघ स्थापन करण्याचे कामीं या थोर पुरुषानें पुढाकार

घेतला, व या थोर कृत्यांत लॉर्ड सेसिल व जनरल स्मट्स यांनीं त्यांना मनापासून साह्य केलें. त्यांनीं प्रथम एक राष्ट्रसंघाचा करारनामा तयार केला, व तो करारनामा २८ एप्रिल १९१९ रोजीं पास झाला. हा करार मान्य असल्याबद्दल ३२ राष्ट्रांनीं ता. २८ जून १९१९ रोजीं त्याच्यावर सह्या केल्या. याप्रमाणें करारनामा मान्य झाल्यावर ता. १० जानेवारी १९२० ला राष्ट्रसंघाचें काम सुरू झालें. प्रत्येक राष्ट्रानें शांतता राखावी, व ती राखण्याचे कामीं इतर राष्ट्रांना मदत करावी. राष्ट्राराष्ट्रांतील तहास मान द्यावा. तंटा उत्पन्न झाल्यास राष्ट्रसंघाकडे आपण तक्रार करावी, व अंतरराष्ट्रीय कायदा जो असेल, तो पाळावा वगैरे महत्त्वाच्या गोष्टीबरहुकूम सर्व राष्ट्रांकडून वर्तन होत आहे किंवा नाहीं हें पाहणें राष्ट्रसंघाचें काम आहे. आपसांतील तंटे प्रेमानें मिटवून जगांत शांतता राखणें हा राष्ट्रसंघाचा मुख्य हेतु आहे. राष्ट्रसंघाच्या करारनाम्याचीं एकंदर २६ कलमें आहेत. निरनिराळ्या कलमांत निरनिराळ्या गोष्टींचा विचार केलेला आहे. पहिल्या एक ते सात कलमांमध्यें संघाची आंतर घटना कशी असावी यासंबंधानें नियम आहेत. आठ व नऊ या कलमांत प्रत्येक राष्ट्रानें आपली युद्धसामुग्री क्रमाक्रमानें कशी कमी करावयाची याचे नियम आहेत. दोन राष्ट्रांमध्यें भांडणें झाल्यास तीं कशीं मिटवावीं, व तह कसा घडून आणावा, व तह झाल्यानंतर त्या राष्ट्रांनीं परस्परांशीं कसें वागावें, या संबंधींचा विचार आठराव्या कलमांत केलेला आहे. येथून पुढें दोन राष्ट्रांमध्यें होणारा कोणताही तह गुप्त होता कामा नये, तो रजिस्टर करून प्रसिद्ध केला पाहिजे. याप्रमाणें अनेक गोष्टींचा कलमवार विचार करण्यांत आलेला आहे. उदाहरणार्थ, निरनिराळ्या राष्ट्रांतील मजुरांची स्थिति, स्त्रिया व मुलें यांचे हक्क, मादक द्रव्यें, मागसलेल्या जाती या बाबतींत प्रत्येक राष्ट्रानें कसें धोरण ठेवावें या संबंधींही कलमें आहेत. वर सांगितल्याप्रमाणें तारीख १० जाने-

वारी १९२० ला राष्ट्रसंघ स्थापन झाला. आरंभीं या संघाचे सभासद ४२ राष्ट्रें होतीं. आजला ५७ संख्या झाली आहे. जर्मनी नुकतांच या संघाला येऊन मिळाला. अद्याप अमेरिका व रशिया मात्र या संघाचे सभासद झाले नाहींत. पृथ्वीवरील तीन चतुर्थांश प्रदेशावर संघाचें स्वामित्व स्थापन झालें आहे. दिवसेंदिवस नवीन नवीन राष्ट्रें संघाला येऊन मिळत आहेत. अमेरिका व रशिया हीं राष्ट्रेंही कांहीं काळानें संघाला येऊन मिळतील अशी आशा आहे. आज तीं राष्ट्रें सुद्धां आरोग्यविषयक परिषदांना हजर असतात. तेव्हां दहा पांच वर्षांनीं भूतलावरील यच्चयावत राष्ट्रें या संघांत सामील होऊन संघाची सत्ता सर्व जगभर प्रस्थापित होईल अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

या राष्ट्रसंघांचे पांच भाग आहेत. १ न्यायकोर्ट २ असेंब्ली ३ कौन्सिल ४ सेक्रेटरीएट ५ मजुरसंघ. आतां प्रत्येक भागामध्यें काम कसें चालतें, याची थोडक्यांत माहिती पाहूं. न्यायकोर्ट—न्यायकोर्टामध्यें निरनिराळ्या राष्ट्रांनीं निवडलेले १५ न्यायाधीश असतात. त्यांपैकीं ११ मुख्य न्यायाधीश व त्यांना चार मदतनीस न्यायाधीश असतात. हे न्यायाधीश निवडतांना जगांतलि सर्व न्यायपद्धतींचा समावेश होईल अशी दृष्टि ठेवण्यांत आलेली आहे. एक जर्मन न्यायाधीश निवडला म्हणजे या राष्ट्रसंघामध्यें सर्व न्यायपद्धतीचा समावेश होईल. संघाच्या पहिल्या दोन वर्षांत या न्यायकोर्टानें बारा खटल्यांचा विचार करून निकाल दिला. सन १९२२ मध्यें ब्रिटन व फ्रान्स यांमध्यें आफ्रिकेंतील वसाहतींसंबंधीं वाद उत्पन्न झाला. त्याचा या कोर्टानें समाधानकारक निकाल दिला. या कोर्टाचें काम चालण्यास मुख्य अडचण म्हटली म्हणजे आंतर-राष्ट्रीय कायद्यांचा अभाव. हे कायदे वेळोवेळीं राष्ट्र-संघाच्या असेंब्लीमध्यें सर्व राष्ट्रांच्या संमतीनें जसजसे पास होतील तसतसे आंतरराष्ट्रीय कायदे वाढत जातील, व त्या मानानें न्याय-कोर्टाचें काम जास्त सुलभ होईल.

२. असेंब्लीः—असेंब्लीची बैठक वर्षातून एकदां जिनिवा येथें महिनाभर भरते. या बैठकीस संघाचे सभासद असलेल्या प्रत्येक राष्ट्रानें तीन सभासद पाठवावयाचे असतात. या बैठकीमध्यें निरनिराळ्या आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा खुल्या दिलानें विचार होऊन ठराव पास होतात. या बैठकीस प्रेक्षक या नात्यानें कोणालाही हजर राहातां येतें. असेंब्लीचें काम इंग्लिश व फ्रेंच या दोन भाषांतून चालतें. परंतु एकाद्या सभासदाला या दोन भाषांपैकीं एकही येत नसली, तर तो आपल्या मातृभाषेंतून भाषण करतो. त्या भाषणाचें तावडतोब वर सांगितलेल्या फ्रेंच किंवा इंग्लिश भाषेंत भाषांतर करण्याकरितां कित्येक दुभाषी ठेवलेले असतात. यामुळें कोणालाही भाषेची अडचण उत्पन्न होत नाहीं. असेंब्लीच्या बैठकीच्या निमित्तानें जगांतील सर्व राष्ट्रांचे प्रतिनिधि एके ठिकाणीं जमतात, यामुळें त्यांचा परस्परांशीं परिचय होतो. खाणेंपिणें, खेळ, हास्यविनोद एकत्र होत असल्यामुळें एकमेकांमध्यें प्रेमभाव वृद्धिंगत होतो. परस्परांशीं पुष्कळ गोष्टींमध्यें खुल्या दिलानें विचारविनिमय करावयास सांपडतो व त्यामुळें राष्ट्राराष्ट्रांतील पुष्कळसे तंटे प्रेमानेंच तुटतात. उदाहरणार्थ, १९२३ मध्यें इटलीच्या मुसलोनीनें तोफांचा मारा करून काफ्र्यु बेट घेतलें. त्यामुळें इटली व ग्रीस यांमध्यें तंटा उत्पन्न झाला. परंतु राष्ट्रसंघानें दोन्ही बाजूंचा विचार करून त्या तंटयाचा समाधानकारक निकाल दिला, व लढाईची आपत्ति टाळली. जर त्यावेळीं राष्ट्रसंघ अस्तित्वांत नसता, तर हें प्रकरण लढाईवर गेलें असतें, त्याशिवाय दुसरें गत्यंतरच नव्हतें, असे उद्गार इंग्लंडचे प्रधान बाल्डविन साहेब यांनीं या वेळीं काढले.

संघाच्या करारनाम्यामध्यें कलम ८ ते १७ पर्यंत निरनिराळ्या राष्ट्रांचें आरमार कमी कसें करावें यासंबंधीं विचार केलेला आहे. परंतु आरमार कमी करण्यासंबंधाचा प्रश्न जसा अत्यंत महत्त्वाचा,

तसाच अतिशय गुंतागुंतीचा आहे. वॉशिंग्टन येथें भरलेल्या परिषदेच्या ठरावानुसार निरनिराळ्या राष्ट्रांचीं थोडीं लढाऊ जहाजें कमी झालीं, ही गोष्ट खरी, परंतु या महत्त्वाच्या बाबतींत संघाला आजपर्यंत म्हणण्यासारखें यश आलेलें नाहीं. ही महत्त्वाची परंतु गुंतागुंतीची बाब सोडून दिल्यास संघाच्या इतर कामांत त्याला पुष्कळसें यश आलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ, १९२२ मध्यें आस्ट्रिया देशाची सांपत्तिक स्थिति खालावली व पैशाची किंमत भलतीच उतरली. सन १९१४ मध्यें जी वस्तु एक रुपयाला मिळणें शक्य असे, तीच १९२२ मध्यें एक हजार रुपये देऊनही तेथें मिळेनाशी झाली. अशा या हलाकीच्या स्थितींत राष्टसंघानें जर त्या देशाला साह्य केलें नसतें, तर त्या देशाची भयंकर दुर्दशा झाली असती. जी गोष्ट आस्ट्रियाची तीच गोष्ट हंगेरीची. तिलाही राष्ट्रसंघानें मदत करून त्या देशाची स्थिति सुधारली. या दोन देशांमध्यें जो अनुभव आला, तो लक्षांत घेऊन जर्मनीपासून खंडणी वसूल कशी करावयाची यासंबंधीं दयाळूपणानें नियम ठरविले गेले. त्यालाच ' डॉज प्लॅन ' असे म्हणतात. या उदार धोरणामुळें जर्मनीचीही व्यवस्था चांगले प्रकारें लागली. या वर सांगितलेल्या कामाशिवाय असेंब्लीनें जीं दुसरीं कित्येक महत्त्वाचीं कामें केलीं, त्यांचा थोडक्यांत खालीं निर्देश केला आहे.

१. व्यापार व प्रवासी यांच्या सोयी केल्या.

२. रशियांतून इतर देशांत पसरण्याला टायफस रोगाला बंदी केली.

३. गेले महायुद्धांत सांपडलेल्या ४२७००० कैद्यांना मोकळे करून आपापल्या राष्ट्रांत पोहोंचविलें.

४. मॅसिडोनियामध्यें गरीब लोकांकरितां रिलीफ वर्क सुरू केलें.

५. ग्रीसमध्यें १० लक्ष लोकांना कामधंदा मिळवून दिला.

६. रशियन कैद्यांकरितां रिलीफ वर्क सुरू केलें.

७. स्त्रिया व मुलें यांजवर व्यापार करून पैसा मिळविणाऱ्या लोकांना आळा घातला.

८. अफू व इतर मादक पदार्थ यांच्या व्यापारास बंधन घातलें.

९. गरीब देशांतील मजुरांस मदत केली.

याप्रमाणें संघानें कित्येक परोपकारांचीं कामें आजपर्यंत केलीं आहेत, व एथून पुढें संघाचा व्याप जसजसा वाढेल तसतशीं इतर कित्येक कामें संघाच्या हातून होतील, अशी आशा करण्यास कांहीं हरकत नाहीं.

**सेक्रेटरीएट**—सेक्रेटरीएट म्हणजे संघाचें ऑफिस. या ऑफिसाचें काम बारा महिने सतत चालू असतें. असेंब्लीनें जे ठराव केले असतील, ते अमलांत आणणें, त्यासंबंधीं पत्रव्यवहार करणें वगैरे सर्व कामें या ऑफिसनें करावयाचीं असतात. या ऑफिसमधील अधिकारी ३०।३५ राष्ट्रांतून आणलेले आहेत. एकंदर अधिकारी ४०० पेक्षां जास्त आहेत. अधिकारी निवडतांना त्यांच्या हुषारीकडे पाहून निवडलेले असतात, हें सांगणें नकोच.

**मजूरसंघ**—मजूरसंघाच्या बैठकीला सर्व राष्ट्रांनीं प्रतिनिधि पाठवावयाचे असतात. मग तें राष्ट्रसंघाचा सभासद असो वा नसो. मजूर संघाच्या या बैठकीला प्रत्येक देशाचे जे तीन सभासद पाठवावयाचे, त्यांपैकीं एक सरकारनें नेमावयाचा व दोन प्रतिनिधि त्या देशांतील कारखानदार व मजूर यांनीं निवडावयाचे असतात. मजूरसंघाच्या बैठकींत मजुरांच्या कल्याणाकरितां व दिवसानुदिवस त्यांची स्थिति सुधारत कशी जाईल, व त्यांचें जीवित सुखकारक कसें होईल, यासंबंधीं सर्वानुमतें नियम केले जातात व ते नियम प्रत्येक राष्ट्रानें पाळावे, असें नैतिक बंधन आहे. यामुळें मजुरांच्या स्थितींत थोडी थोडी सुधारणा दृष्टीस पडूं लागली आहे. उदाहरणार्थ, हिंदुस्थानांत

मजुरांनीं गिरणींत एक आठवड्यांत ७२ तास खपावें, असा जो पूर्वीं निर्बंध असे, त्याऐवजीं ६० तासांचा निर्बंध हल्लीं घालण्यांत आला आहे. हिंदुस्थानांप्रमाणें इतर देशांतही अशीच प्रगति होत आहे.

दरसाल जगांतील सर्व राष्ट्रें आपल्या आरमारावर एकंदर आठ नऊ अब्ज रुपये खर्च करितात. त्या मानानें राष्ट्रसंघाचा वार्षिक खर्च एक दीड कोटी म्हणजे कांहींच नव्हे. परंतु हा एक दीड कोटी रुपये खर्च केल्यानें जें कार्य होणार आहे, तें वर सांगितलेल्या आठ नऊ अब्ज रुपयांच्या कार्यापेक्षां किती तरी पटीनें सरस आहे.

याप्रमाणें राष्ट्रसंघाची एकंदर हकीकत आहे. वुड्रो वुइल्सन या थोर पुरुषाच्या डोक्यामध्यें ही कल्पना उत्पन्न झाली व तिला नंतर मूर्त स्वरूप देण्यांत आलें. या लेखाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें भौतिक शास्त्रांतील शोधामुळें आज सर्व जग हें एक राष्ट्र किंवा कुटुंब होऊं पहात आहे. तेव्हां जगाच्या आजच्या स्थितींत राष्ट्रसंघासारख्या संस्थेची अत्यंत जरुरी होती, याबद्दल तिळमात्र संशय नाहीं. परंतु असल्या संस्थांतील कामें यशस्वी रीतीनें पार पडण्यास त्या संस्थेंतील सभासदांमध्यें परस्परांशीं सहकार्य करण्याची आतुरता पाहिजे. जगाशीं फटकून आपला निभाव लागणें यापुढें शक्य नाहीं, पूर्वींचे तुटक वृत्तीचे दिवस गेले, हरघडीं राष्ट्राराष्ट्रांतील व्यवहार गुंतागुंतीचे झाल्यामुळें सहकार्य केल्याशिवाय पदोपदीं अडतें, व बंधुत्वाच्या नात्यानेच वागणें मनुष्याला भूषणास्पद आहे, अशा प्रकारच्या कल्पनांचा विजय दिवसेंदिवस होत जाणार असें भविष्य केल्यास वावगें होणार नाहीं. जगरूपीं कुटुंबांतील आपण एक घटक आहोंत, अशी प्रत्येक राष्ट्राची खात्रीं झाल्यावर तें इतराशीं प्रेमानें वागेल व सर्व जगांत शांततेचें साम्राज्य पसरेल व सर्व मानवजातीला सुखाचे दिवस येतील,, अशी शेवटीं आशा करून हा लेख पुरा करतों.

# ख्रिस्ती शक अथवा इसवी सन.

( लेखक—रा. काशीनाथ परशुराम साने, शिक्षक घोडें, जि. पुणें. )

इंग्रजी राज्य सुरू झाल्यापासून आपल्याकडे सरकार-दरबारीं व इतर सामान्य व्यवहारांतही हा शक म्हणजे सन विशेष प्रचारांत आला असून त्याचें महत्त्वही हल्लीं विशेष समजलें जातें, तेव्हां त्याच्या उत्पत्तीसंबंधानें प्रस्तुत लेखांत थोडीशी माहिती देतों.

येशू ख्रिस्ताच्या जन्मकाळापासून या ख्रिस्तीसनाची वर्षगणना सुरू झाली असल्यानें यास "येशूचा सन" अशा अर्थाचें 'इसंवी (येशूचा) सन' असें नांव आहे. म्हणूनच हा सन नमूद केल्यावर त्यापुढें तद्दर्शक 'इसवी' असें लिहिण्याची पद्धति आहे. तथापि हा ख्रिस्ती सन येशू ख्रिस्ताच्या अगदीं बरोबर जन्मदिवसापासून धरला गेला नसून त्यानंतर सुमारें २ वर्षांनीं धरला गेला असें कित्येकांचें मत आहे, तर तो ख्रिस्ताच्या-जन्मानंतर सहा शतकांनीं सुरू झाला असावा असाही कित्येकांचा तर्क आहे! मात्र एवढी गोष्ट खरी कीं ख्रिस्ताच्या नावानें ही वर्षगणना सुरू झाली आहे, म्हणूनच यास 'ख्रिस्तीशक' असें म्हणतात.

ही वर्षगणना प्रथम युरोपखंडांत सुरू झाली असून सर्व पाश्चात्य देशांतून ह्याच सन विशेष प्रचारांत आहे. या ख्रिस्तीसनांतील प्रत्येक महिन्यांत सारखे दिवस नसून ते कमजास्त मानलेले आहेत हें आपणास माहीत आहेच. ही प्रत्येक महिन्यास कमजास्त दिनगणना धरण्याची पद्धति ज्युलियस सीझर पूर्वीच्या रोमच्या बादशहांनीं सुरू केली. त्यानंतर ज्युलियस सीझरनें इ० स० पूर्वी (ख्रिस्तीसनापूर्वी) ४६ वर्षे या इंग्लिश क्यालेंडराचा पाया घातला, परंतु त्यानंतरच्या ४०।४५

वर्षांत या क्यालेंडराची पद्धति व्यवस्थितपणें पाळली गेली नाहीं व महिन्याचे दिवस मोजण्याबाबतही कांहीं किरकोळ फरक अमलांत आले, म्हणून इ० स० पूर्वी ४६ मध्यें सीझरची सुरू झालेली ही पद्धति बंद पडून हल्लीं प्रचलित असलेली व्यवस्थित पद्धति ख्रिस्तीशतकापासून ( इ० स० १ पासून ) सुरू झाली असें म्हणावयास हरकत नाहीं व या चालू झालेल्या पद्धतीस " ज्युलियन् पद्धति " असें नांव पडलें.

या प्रमाणें ही " ज्युलियन् पद्धति " ख्रिस्तीसनाच्या सुरुवातीपासून इसवीसनाच्या सोळाव्या शतकापर्यंत तशीच चालू होती, परंतु सोळाव्या शतकांत ( इ० स० १५८२ सालीं ) या ख्रिस्ती पंचांगाच्या वर्षीशीं खरें सौर वर्ष लावून पाहतां खरें सौर वर्ष या ख्रिस्तीसालापेक्षां ११¼ मिनिटें कमी आहे असें दिसून आलें व या हिशेबानें १२८ वर्षांत १ दिवसाची चूक पडून सोळाव्या शतकाच्या आरंभीं हें ख्रिस्तीपंचांग पूर्ण ११ सौरदिवस मागें पडल्याचें समजून आलें. ही पडलेली चूक भरून काढण्यासाठीं इ० स० १५८२ च्या आक्टोबर महिन्याच्या ४ थ्या तारखेस १५ वी तारीख धरावी असें सातवा पोप ग्रेगरी यानें ठरविलें व युरोपांतील बहुतेक देशांतून त्याप्रमाणें ख्रिस्ती-क्यालेंडरांत सुधारणा केली गेली. तथापि इंग्लंडमध्यें इंग्लिश पंचांगांत ही चूक इ० स० १७५३ सालीं दुरुस्त करण्यांत येऊन त्यासालीं इंग्लंडमध्यें ही योजना मान्य ठरून तारीख ३ सपटेंबर हा दिवस १४ सपटेंबर मानण्यांत आला. ग्रेगरीनें सुधारून सुरू केलेल्या या पद्धतीस " ग्रेगोरियन पद्धति " असें नांव देण्यांत आलें.

आपलेकडील ख्रिस्ती शक हा इंग्लिश कॅलेंडराप्रमाणें मानण्यांत आल्याकारणानें आपलेकडे व त्याचप्रमाणें सर्व ब्रिटिश साम्राज्यांत इ० स० १७५३ पासूनची पुढची पद्धति " ग्रेगोरियन पद्धति " मानितात व युरोपखंडांतील इतर देशांत त्यापूर्वीच सुरू करण्यांत

आलेली म्हणजे इ० स० १५८२ नंतरची पद्धति "ग्रेगोरियन् पद्धति" मानितात.

हीं "ग्रेगोरियन् पद्धति" सुरू होण्यापूर्वी झालेली ( दर १२८ वर्षांत १ दिवसाची ) चूक पुनः घडूं नये म्हणून ग्रेगोरियन् पद्धतीनें आणखी एक विशेष सुधारणा अमलांत आणिलीगेली ती अशी कीं, ज्या शतकदर्शक सालांचे शतकदर्शक अंक चोहोंनीं विभाज्य नाहींत ( उदाहरणार्थ– १७००, १८००, १९००, २१०० इ० ) त्या सालांत लीप वर्ष म्हणून फेब्रुवारी महिन्याचे २९ दिवस न धरितां तें साधें वर्ष समजून त्या वर्षांतील फेब्रुवारी महिन्याचे २८ दिवस धरावेत. म्हणजे या शतकवर्षांचे ( उदा०– १७००, १८०० इ०....) लीपवर्ष न धरल्यानें प्रत्येकी ११ प्रमाणें कमी होणारे दिवस–खर्ची न पडतां ते–दरवर्षीं जास्त होणाऱ्या ११। मिनिटांची चूक भरून काढण्यास उपयोगी पडतील व तेणें करून सूर्यसंपाताचा काळ ( मार्च ता. २१ रोजीं ) या खिस्ती पंचांगाप्रमाणें पूर्ण जुळेल असें गणितानें सिद्ध होऊन हीही सुधारणा मान्य ठरली.

आतां अतिसूक्ष्म मानानें हिशेब केल्यास या सुधारलेल्या "ग्रेगोरियन पद्धतीनेंही" १ वर्षांत सुमारें २६ सेकंदांची चूक सौरमानाशीं पडत आहे, तथापि ती फारच सूक्ष्म चूक असून तीमुळें ३००० वर्षांत १ दिवसापेक्षांही कमी चूक पडेल ह्यास्तव ही चालू पद्धति इ० स० ३००० पर्यंत चालू ठेवण्यास हरकत नाहीं. परंतु ही ३००० वर्षांत पडणारी १ दिवसाची सूक्ष्म चूकही राहूं नये म्हणून इं० स० ४००० पासून दर ४००० वर्षांनीं येणारी वर्षें ( म्हणजे इ० स० ४०००, ८०००, १२००० इ०....) हीं वर्षें लीप वर्षें न धरितां नेहमींप्रमाणें साधीं म्हणजे ३६५ दिवसांचीं धरावीं; असें केलें असतां ही अतिसूक्ष्म चूकही

राहणार नाहीं व इंग्रजी कॅलेंडराचें वर्ष हें अनंत कालापर्यंत बिनचूक सौर वर्षाबरोबर राहील असें गणितज्ञांचें व ज्योतिर्विदांचें मत आहे.

हा हल्लीं आपलेकडे सर्वत्र चालू असणाऱ्या ख्रिस्ती शकाचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. याशिवाय आपलेकडे जे शक प्रामुख्यानें पूर्वीं ऐतिहासिक-काळांत-चालू होते अगर हल्लीं व्यवहारांत चालू आहेत त्यांचीही माहिती यथावकाश यापुढील लेखांत देण्यांत येईल.

---

# तिबेटसंबंधीं कांहीं नवीन माहिती.

## लोकस्थिति व रीतीरिवाज.

——:०:——

### सर चार्लस बेल यांचें व्याख्यान.

तिबेट, भूतान व सिकिम या देशांतील माजी पोलिटिकल एजंट सर चार्लस बेल यांचें नुकतेंच म्हणजे ता. ८ एप्रिल रोजीं लंडन येथें रॉयल सोसायटी ऑफ आर्टस या संस्थेपुढें सर मायकेल ओड्वायर यांच्या अध्यक्षतेखालीं मनोरंजक व माहितीनें भरलेलें व्याख्यान झालें. सदर व्याख्यानाचा रिपोर्ट रॉयल सोसायटीकडून आमचेकडे आला आहे. त्यांतील कांहीं माहिती सारांशरूपानें पुढें दिली आहे ती आमच्या वाचकांना मनोरंजक वाटेल अशी आशा आहे.

सर चार्लस बेल म्हणतात कीं, तिबेट हा प्रदेश सुधारलेल्या राष्ट्रांच्या दळणवळणापासून अगदीं एकीकडे पडलेला असल्यामुळें तेथील भूमीची रचना, लोकांचे रीतिरिवाज वगैरेसंबंधानें फारच थोडी माहिती उपलब्ध होती. तिबेटी लोक परकी लोकांशीं फारच तुसडेपणानें व वैर बुद्धीनें वागत, यामुळें त्यांच्यासंबंधाचें जगाचें अज्ञान फार काळपर्यंत तसेंच राहिलें होतें. पण तें दूर करण्याचा पहिला मोठा प्रयत्न १९०४ सालीं सर चार्लस

यंगहजबंड यांनीं केला. त्यांनीं तिबेटच्या अंतर्गत प्रदेशांत-प्रवेश केला व इा वेळपर्यंत ज्या ठिकाणीं जाण्याला परदेशी लोकांना मनाई होती त्या ठिकाणींही जाऊन त्यांनीं बरीच माहिती उजेडांत आणली. तथापि तिबेटसंबंधानें त्यानंतरही मला जी कांहीं नवीन माहिती मिळाली ती या निबंधाच्याद्वारें मी आपणापुढें मांडीत आहें.

## प्रदेश मोठा पण वस्ती थोडी.

तिबेट देशाचे भौगोलिक दृष्ट्या तीन मोठाले भाग पडतात. यापैकीं कांहीं प्रदेश डोंगराळ असून त्याची उंची ११ ते ३० हजार फूट इतकी आहे. अगदीं पूर्वेकडील ब्रह्मपुत्रेच्या कांठचा टापू बराच सखल असून तेथें शेती व बागबागाईत बरेंच होतें व लोकवस्ती मुख्यतः याच भागांत आहे. तिबेट हा प्रदेश इंग्लंडच्या वीसपट मोठा आहे. पण त्याची एकंदर लोकसंख्या पाहिली तर ती एकट्या लंडन शहराच्या लोक संख्येपेक्षांही कमी आहे. यावरून हा प्रदेश किती निर्जन आहे याची कल्पना येईल.

## व्यापाऱ्यांचे तांडे.

हिमालयाची मुख्य रांग ओलांडून खिंडींतून तिबेटकडे जाऊं लागले असतां प्रथम तिबेटी व्यापाऱ्यांचे तांडे दृष्टीस पडतात. हे लोक खेचरें, याक व कोळया मेंढ्या यांच्या पाठीवरून माल वाहून नेतांना आढळतात. ल्हासापासून मंगोलियनपर्यंत या व्यापाऱ्यांच्या खेपा चालू असतात व हा प्रवास सुमारें चार महिन्याचा आहे. खेचरांच्या पाठीवर दोन्ही बाजूंला लहान लहान पेटारे घट्ट बांधलेले असतात व त्यांतून लहान मलेंही बसविण्यांत येतात.

## वैराग्यांच्या झुंडी.

व्यापाऱ्यांप्रमाणें रस्त्यानें जातां येतां भटकणारे दुसरे लोक म्हटले म्हणजे साधू व बैरागी होत. ते तीर्थयात्रा करून शेंकडों मैल फिरत असतात. मला एक मंगोलियन साधु आढळला. तो रस्त्यानें दंडवत घालीत तीर्थयात्रा करीत होता. हाताला जमीन लागूं नये म्हणून त्यानें दगडाच्या पातळ चिपा आपल्या दोन्ही हातांच्या तळव्यांस बांधल्या होत्या. हा मनुष्य लहानपासून यांबू येथील बौद्ध देवस्थानापर्यंत म्हणजे ७१० मैल दंडवत घालीत जाणार असून ही यात्रा पुरी करण्यास त्याला दोन वर्षें लागतील असें म्हणतात.

यापैकीं साडेतीन महिन्यांचा प्रवास त्यानें उरकला होता. पूर्व तिबेटमधून पश्चिम तिबेटांतील सुप्रसिद्ध मानस सरोवरापर्यंत म्हणजे दोन हजार मैल लांब अशाच रीतीनें दंडवत घालीत जाणारेही लोक आहेत. व ते ७ ते १० वर्षांत ही यात्रा पुरी करतात. बुद्धाच्या मूर्ति भरलेले पेटारे गळयांत अडकवून गांवोंगांव फिरणारेही कित्येक भिक्षु आढळतात. ते लोकांना या मुर्ती दाखवून त्यांची कथा सांगतात व भिक्षा मिळवितात. भिक्षूप्रमाणेंच भिक्षुणीही मोठाले प्रवास करतांना आढळतात. कित्येक भिक्षू उंच उंच डोंगरावर कायमचे राहाणारे आहेत व अशाच प्रकारें भिक्षुणीचेही कित्येक स्वतंत्र विहार आहेत. पण दरोडेखोर लोकांच्या टोळयांपासून विहारांत रहाणाऱ्या लोकांना बराच उपद्रव पोहोंचतो.

## साधे भिक्षेकरी.

धार्मिक भिक्षेकऱ्यांशिवाय साधे भिक्षेकरीही या देशांत पुष्कळच आढळतात व पिढ्यानुपिढ्या भीक मागण्याचाच धंदा करणारेही पुष्कळ लोक त्यांच्यांत आहेत. ल्हासा शहर तर स्त्रिया, भिकारी व कुत्रीं यांनींच भरलेलें आहे! भीक मागण्याची वहिवाट तिबेटमध्यें प्राचीन काळीं मुळींच नसावी असें दिसतें. कारण भिक्षेकऱ्यांच्या अभावीं दानधर्म कोणास करावा हीच लोकांना पंचाईत पडत असे. म्हणून पक्ष्यांना धान्य घालण्याचा प्रघात मुद्दाम रूढ करण्यांत आला.

## चोरांचा सुळसुळाट.

वाटमारी व चोऱ्या करणारे लोक तिबेटांत जितके आढळतील तितके दुसऱ्या कोणत्याही देशांत आढळत नाहींत. वाटेनें कित्येक मैल चाललें तरी माणूस सहसा आढळत नाहीं. असे निर्मनुष्य प्रदेशच फार आहेत व तशांतून दरोडेखोरांच्या टोळीची गांठ पडली म्हणजे प्रवाशाचे पुरे बाराच वाजले असें समजावें. दूरदूरच्या मजला मारून दरोडे घालणारे चोरांचे थवेच देशाच्या बहुतेक भागांत आढळतात. कित्येक व्यापारी टोळयांचाही चोऱ्या करणें हाच दुय्यम धंदा असतो. वेळ पडेल त्याप्रमाणें ते व्यापारी किंवा लुटारू बनतात. व्यापाऱ्यांचा फिरता तांडा एकाद्या गांवीं गेला आणि तेथील गांवकरी जर जबरदस्त दिसले, तर हे व्यापारी तेथें साळसूदपणानें मालाची देवघेव करून पुढें चालते होतात. पण गांवकरी थोडे व कमकुवत

आहेत असें त्यांना वाटल्यास ते तेथील व घरें व दुकानें लुटून पसार होतात. ल्हासा येथील दलाईलामानें अलीकडे अशा दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्यासाठीं बरेंच कडक उपाय योजिले असल्यामुळें कांहीं भागांतील त्यांचा उपद्रव अलीकडे बराच कमी झालेला आहे.

याक व शेळ्यामेंढ्या यांचे कळप घेऊन वरचेवर थारेपालट करीत हिंडणाऱ्या धनगरांच्या टोळ्याही पश्चिम तिबेटच्या पहाडी मुलखांत पुष्कळ आढळतात. याक जातीची केसाळ गाय, बैल हें त्यांचें मुख्य आवडतें जनावर होय. ते याकच्या केसांचेच दोर वळतात. कापड विणतात व त्यांच्याच राहुट्या करून त्यांत राहतात. एकेका राहुटींत सात आठ माणसें राहूं शकतात. याकचें वाळलेलें शेण हेंच त्यांचें मुख्य सर्पण होय. डोंगरावर वाळलेलें व खुरटें असें गवत मुबलक असतें. त्यावर ते आपलीं जनावरें जगवितात. सकाळीं डोंगरावर सोडलेलीं जनावरें संध्याकाळीं वस्तीवर परत येतात. जनावरें रानांत गहाळ होऊं नयेत यासाठीं जादू टोणा म्हणून त्यांच्या गळ्यांत कांहीं मंत्रातंत्राच्या चिठ्या बांधण्यांत येतात. संध्याकाळीं गुरें मुक्कामास परत न आल्यास त्यांचा मालक आपल्या झोपडींत धूप पेटवितो. असें केल्यानें गुरें सुखरूप परत येतील असा त्यांचा विश्वास असतो.

## चहाचें प्रस्थ.

तिबेटी लोकांमध्यें चहा पिण्याचें प्रस्थ फारच भयंकर आहे. दररोज १५ ते २० कप चहा न घेणारा एकही मनुष्य त्यांच्यांत सांपडणार नाहीं. दिवसांतून ७० व ८० कप चहा पिणारेही पुष्कळ लोक आढळतील. तिबेटला चहाचा पुरवठा मुख्यतः चीन देशाकडून होतो.

## निर्यातीचा मुख्य जिन्नस लोकर.

तिबेटांतून परदेशास मुख्यतः हिंदुस्थानास जो माल पाठविण्यांत येतो त्यापैकीं मुख्य तीनचतुर्थांश माल म्हटला म्हणजे लोकर होय. व्यापारी लोक लोकरीचे गठ्ठे याकवर लादून हिंदुस्थानास आणतात. वाटेंत मैदानावर ते रात्रींचा मुक्काम करतात, तेव्हां निवाऱ्यासाठीं ते या लोकरीच्या गठ्यांची एक भिंतच वाऱ्याच्या बाजूला रचतात. रात्रीं ते घोंगड्या पांघरून उघड्या आकाशाखालीं निजतात. पारा शून्याच्या खालीं वीस अंश उतरला असताही

हे लोक अशा मोकळ्या मैदानांत खुशाल झोंप काढतात व पहाटें चाराला उठून पुढचा प्रवास सुरू करतात.

कांहीं कांहीं देवस्थानेंही मोठा व्यापार करतात. ल्हासा येथील सुप्रसिद्ध शीडे या देवस्थानाचा १९१२ सालीं चिनी लोकांनीं विध्वंस केल्यावर त्याचा जीर्णोद्धार करण्याचें काम हातीं घेण्याचें ठरलें. तेव्हां द्रव्य जमविण्याकरितां त्या देवालयाच्या मुख्य पुजारानें दलाई लामापासून कांहीं रक्कम भांडवल म्हणून घेतली व पांच वर्षांपर्यंत तिच्यावर मोठा व्यापार करून पुष्कळ पैसा मिळविला व देवस्थानाचा जीर्णोद्धार केला. खासगी रहातें घर मोडकळीस आलें असतां तें पुन्हा बांधणें हें काम मात्र अपशकुनी व अनिष्ट मानतात. मोडकळीस आलेलें घर दुरुस्त केल्यास त्या घरांतील कर्ता मनुष्य लौकरच मरण पावतो अशी तिबेटी लोकांत सर्वसाधारण समजूत आहे.

## हिंदुस्थानांतील भिक्षूनें बांधलेलें देवस्थान.

रेटिंग येथील बुद्ध मंदिर हें तिबेटमधील एक अतिशय प्रख्यात व पवित्र देवस्थान मानलें जातें. तें १५ हजार फूट उंचीवर अगदीं अवघड अशा पहाडावर असून त्याच्या भोंवतालीं ५० ते ६० फूट उंचीचे मोठाले वृक्ष आहेत. इतक्या उंच डोंगरावर इतक्या उंचीचे वृक्ष दुसरीकडे कोठेंच आढळत नाहींत, यामुळें या ठिकाणच्या पवित्रपणाबद्दल तिबेटी लोकांचा विश्वास अधिकच वाढतो. या देवस्थानाची कथाही मनोरंजक आहे: इसवी सनाच्या सातव्या शतकांत होऊन गेलेला संग सेन गांपो नांवाचा तिबेटाचा राजा या डोंगरावर गेला असतां त्यानें आपले कांहीं केस उपटून तेथें टाकले व यांचे प्रचंड वृक्ष बनोत व त्यांच्या लाकडापासून देवस्थान बांधलें जावो अशी त्यानें प्रार्थना केली. नंतर त्या केसापासून तीन प्रचंड वृक्ष निर्माण झाले. त्यानंतर सुमारें तीनशें वर्षांनीं हिंदुस्थानांतील नालंदा येथील विहारांतील आतीश नांवाचा हिंदी बौद्ध भिक्षू तिबेटांत गेला असतां त्यानें रेटिंग येथील त्या वृक्षापासून त्यांचें बुद्धमंदिर बांधिलें व बुद्धाची मूर्ती त्यांत स्थापन केली. चो या ठिकाणीं असलेली बुद्धाची मूर्ती सर्वांत अधिक पवित्र मानण्यांत येते. कारण गौतमबुद्ध जिवंत असतांनाच त्यांच्या देहाचो ठेवण प्रत्यक्ष पाहून ही मूर्ती घडविण्यांत आलेली आहे असें म्हणतात.

## जमीनदार वर्ग.

तिबेटमधील लोकांचे मुख्य मुख्य वर्ग म्हणून व्यापारी, भिक्षू, भिकारी दरोडेखोर, धनगर वगैरेंची माहिती वर सांगितलीच आहे. आणखी एक मह-

त्याचा वर्ग म्हटला म्हणजे जमीनदार लोक होत. यांपैकीं कित्येक लोक चांगले श्रीमंत असून पांच पांच मजल्याच्या हवेल्यांतून रहातात. व लामाच्या खालोखाल राज्यकारभारांतही त्यांच्या हातीं बरीच सत्ता असते. मध्यम वर्ग म्हटला म्हणजे व्यापारी लोकांचाच वर्ग होय. पण त्यांच्या हातांत राज्यकारभारांतील सत्ता मुळींच नाहीं.

## तिबेटमधील स्त्रियांचा दर्जा.

तिबेटी लोकांत स्त्रियांचा दर्जा बराच मोठा आहे. हिंदुस्थानांतील स्त्रियांप्रमाणें त्या गोषा वापरीत नाहींत, घरांतील सर्व व्यवस्था बहुतेक त्यांच्याच हातीं असते. व त्या स्वतंत्रपणें व्यापारधंदाही करितात. मोठाल्या जागांवरील सरकारी अधिकारी राज्यकारभारांतही आपल्या स्त्रियांची सल्लामसलत घेतात.

विवाहाच्या चालीसंबंधानें पाहिल्यास एकपत्नीक पद्धतीच विशेषतः रूढ आहे. पण बहुपत्नित्व व बहुपतित्व यांचाही प्रघात कांहीं भागांत आढळून येतो. एकाद्या स्त्रीनें एकाद्या कुटुंबांतील कांहीं भावांपैकीं सर्वांत वडील भावाशीं लग्न केलें, तर त्याच्या पाठीवरील सर्व भावंडेंही त्या स्त्रीचे पती ठरतात. पण एकाद्या मधल्याच भावाशीं तिनें लग्न केल्यास वडील भावाकडे त्या स्त्रीचें पतित्व न जातां तें त्यांच्याहून लहान असणाऱ्या सर्व भावांकडे मात्र जातें. समाजांत स्त्रियांचा दर्जा जरी बराच मोठा आहे, तरी धार्मिक बाबतींत मात्र त्यांना पुरुष वर्गाहून कमी लेखण्यांत येतें. दलाई लामाच्या कोणी दर्शनास गेल्यास लामानें आशीर्वाद देण्याची पद्धत ज्याच्या त्याच्या दर्जानुसार कमी अधिक मानाची असते. मोठाले मानकरी व श्रेष्ठ प्रतीचे धर्मोपदेशक आल्यास लामा त्याच्या डोक्यावर दोन्ही हात ठेवून आशीर्वाद देतो. हलक्या प्रतीचे अधिकारी व सर्वसामान्य भिक्षू आल्यास त्यांच्या डोक्यावर एक हात ठेवून आशीर्वाद देण्यांत येतो व त्याहूनं कमी दर्जाचे सर्व वर्गाचे पुरुष व एकंदर स्त्रीवर्ग यांना आशीर्वाद देतांना त्यांच्या डोक्याला दलाईलामा फक्त आपल्या वस्त्राच्या गोंड्यानें स्पर्श करतो. डार्जे पामो या सुप्रसिद्ध स्त्रीचें जें एक घराणें तिबेटमध्यें आहे, त्यांतील स्त्रियांच्या बाबतींत मात्र हा नियम लागू नाहीं. त्यांना दलाईलामानें सुद्धां श्रेष्ठ प्रतीच्या पुरुषाप्रमाणें बहुमानानें वागविलें पाहिजे असा नियम आहे, पण ही पद्धत फक्त त्या एका घराण्यांतील स्त्रियांपुरतीच आहे.

ज्ञानप्रकाश.

# वर्तमानसार.

यंदा पुणें मुक्कामीं भरलेल्या १२ व्या साहित्यसंमेलनांत खालीं दिलेले महत्त्वाचे ठराव पास झाले.

(१) मराठी भाषा ही शिक्षणाचें माध्यम असावें.

(२) मुंबई विद्यापीठाच्या प्रवेशपरीक्षेंत मातृभाषा हा आवश्यक विषय असावा.

(३) मुलांमुलींच्या शिक्षणांत उपयोगी पडणारें वाङ्मय, शिक्षणखातें, शिक्षणसंस्था, शिक्षणशास्त्रज्ञ व लेखक यांनीं मराठींत तयार करण्याचा संघटित प्रयत्न करावा.

(४) मातृभाषा या विषयांतील प्रश्नपत्रिका व उत्तरें त्याच भाषेंत असावीं.

(५) सरकारी शिक्षणखात्यामार्फत तयार होणारे शिक्षणोपयोगी मराठी ग्रंथ मराठी शिक्षणसंस्था यांच्या मान्यतेनें तयार व्हावे.

अमेरिकेंतील कोटयधीश रॉकफेलर यांच्या देणगीवर चाललेल्या प्रसिद्ध वैद्यकीय संशोधन संस्थेंतील डॉ. कॅरेल यांनीं जिवंत कोंबडीच्या रक्तांतील पांढऱ्या रक्तपेशी, परीक्षा-नळींत त्या जिवंत स्थितींत ठेवून, विघातक जंतूंना कशा भक्षण करितात याचे फोटो घेतले व ते सिनेमॅटोग्राफच्या द्वारें सर्वांना दिसतील अशी व्यवस्था केली. यामुळें आपल्या शरिरांत प्रत्यहीं घडणारी पण आपणांस अदृश्य असणारी गोष्ट आज प्रत्यक्ष पहावयास मिळत आहे.

बुडापेस्ट शहरीं ( हंगेरींत ) डॉ. पॉल क्लीन यांनीं विद्युत्प्रवाहांनीं रबर तयार करण्याची नवीन कृती शोधून काढली असून तीमुळें पुष्कळ जास्त टिकाऊ व स्वस्त रबराचा जगाला भरपूर पुरवठा होणार आहे. रबराच्या झाडापासून चीक गोळा करून तो विस्तवावर ऊन केला म्हणजे घट्ट बनतो. नंतर त्याच्या वळकटया करून त्या चांगल्या

चाळल्या म्हणजे जहाजावर चढवून परदेशीं रवाना होत. गिरणींत येऊन पडल्यावर त्या वळकटया मऊ होण्यासाठीं पुनः मळाव्या लागत, व त्या मऊ झाल्या म्हणजे त्यांत निरनिराळ्या उपयोगांस लागणारे रबर बनविण्यास इतर पदार्थ मिसळीत. पण आतां झाडापासून निघणाऱ्या रसांतच एकदम पदार्थ मिसळतां येऊन विद्युच्छक्तीनें त्यांचे ताबडतोब जरूर त्या प्रकारचे रबर बनवितात व साच्यांत ओतून पाहिजे तो आकार देतात, यामुळें मधील कृतींतून जातांना जी घट होत असे ती वांचून शिवाय रबरही या कृतीनें सरस तयार होतो.

अलीकडे निरनिराळ्या कारणांनीं जगांतील अरण्यांची तोड वाढत चालली आहे. आगगाडीला जळण व रुळाखालीं शिलापाट, खाणींत व इमारतींस लाकूड, कागद व कृत्रिम रेशिम यांकरितां लाकडाचा उपयोग होतो. विशेषतः वर्तमानपत्रांची बेसुमार वाढ झाल्यानें कागदांसाठीं झाडांचा फन्ना उडूं लागला आहे. तज्ज्ञांनीं असें ठरविलें आहे कीं १९२६ सालीं तयार झालेल्या लाकडापेक्षां ३००० अब्ज घनफूट लाकूड जास्त तुटलें गेलें. ऑस्ट्रेलिया व अमेरिका या भागांत तोडीच्या मानानें नवीन लागवडीकडे जितकें जास्त लक्ष द्यावयास पाहिजे तितकें दिलें जात नाहीं असें तेथील लोकांच्या नजरेस आलें आहे. अशाप्रकारचें लांकुड तयार होण्यास निदान चाळीस वर्षें लागतात व पूर्ण जाडी येण्यास ६० वर्षें लागतात. पण अशी तोड होत चालल्यास जुन्य अरण्यांचा फन्ना उडणार. ह्या गोष्टीसंबंधी योग्य काळजी घेण्यासंबंधी विचार सुरू आहे. अरण्यांच्या तोडीनें पावसावरही अनिष्ट परिणाम होतो. म्हणूनही या अरण्यांची बेसुमार तूट न होऊं देण्याबद्दल प्रयत्न सुरू आहेत.

जपान देशांत स्त्रियांना वकिली करण्यास परवानगी देण्यासंबंधीं वाटाघाट सुरू आहे. बहुतेक त्यांना तो हक्क मिळेल.

घाणेरडें दूध पिण्यांत येत असल्यामुळें इंग्लंडांत दरसाल २००० लोक क्षयानें मरतात असें आढळून आलें आहे. दुधाच्या स्वच्छतेबद्दल फार काळजी घेणें जरूर आहे.

जगांतील लायब्रऱ्यांत जितकीं पुस्तकें आहेत, त्यांतील निम्मी इंग्रजी भाषेंत लिहिलेलीं आहेत असें म्हणतात. केवढा हा साम्राज्य विस्ताराचा फायदा !

जुने व टिकाऊ रेशमी कपडे कांहीं रासायनिक पदार्थांत बुडवून त्या पदार्थांपासून पुनः रेशमाचा धागा काढण्याची युक्ति एका जपानी शास्त्रज्ञानें शोधून काढली आहे. यामुळें रेशमाची पैदास वाढणार.

गहूं व इतर धान्यें यांत जितका साखरेचा अंश जास्त तितका त्यांस कीड लागण्याचा संभव कमी असें आढळल्यापासून पिकांची कीड मारण्यास साखरेचा कसा उपयोग करतां येईल या विषयाकडे शास्त्रज्ञांचें लक्ष वेधलें आहे.

क्ष-किरणांचा वैद्यकशास्त्रांत हल्लीं बराच उपयोग करून घेऊं लागले आहेत. या किरणांच्या योगानें कांहीं अपारदर्शक वस्तु पारदर्शक होतात. लाकूड, कागद, मांस हे पारदर्शक होतात. पण हाडें, धातू हे पदार्थ अपारदर्शक आहेत तसेच रहातात. एकाद्या पुस्तकांत सोन्याचीं अगर इतर नाणीं घालून तें क्षकिरणांसमोर धरलें तर पुस्तक न दिसतां आंतील नाणीं मात्र स्पष्ट दिसतील. अशा रीतीनें पुष्कळदां चोरी शोधून काढण्यास झाडा न घेतां फ्रान्समध्यें क्ष-किरणांचा उपयोग करतात. लढाईत शरिरांत घुसलेली गोळी कोठें गेली आहे हें या किरणांनीं तपासतां येतें. हाडांत कोठें बिघाड झालेला आहे हें ही यांनींच ठरवितां येतें.

[stamp]

# पोंच व अभिप्राय.

**प्राथमिक भूगोल पुस्तक १ रें:**—हें पुस्तक प्राथमिक शाळांच्या चवथ्या इयत्तेकरितां लिहिलें आहे. यांत मुंबई इलाख्याची व हिंदुस्तानची माहिती दिली आहे. वर्णनात्मक पद्धतीनें विषयविवेचन केलेलें असल्यामुळें मुलांना विषय कंटाळवाणा वाटणार नाहीं. लेखकानें कार्यकारणसंबंध मुलांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयन केला आहे. पुस्तकांत सर्व नकाशे एके ठिकाणीं दिले आहेत, यामुळें त्यांचा उपयोग मुलांना फारसा होणार नाहीं. या पुस्तकांत एकही चित्र नाहीं. मुलांच्या दृष्टीनें विषय मनोरंजक होण्यास हें एक वैगुण्य आहे. पुढील आवृत्तींत हे दोन्ही दोष नाहींसे होतील अशी आशा आहे. किं. ४ आणे.

ले. रा. **शिवराम विठ्ठल काळे**, शिक्षक फर्ग्युसन रोड म्यु. म. शाळा मुंबई.

**हिंदुस्तानची संक्षिप्त राज्यपद्धति:**—यांत प्रश्नोत्तर रूपानें हिंदुस्तानच्या राज्यपद्धतीची माहिती दिली आहे, ती विद्यार्थ्यांना उपयुक्त होईल. प्रश्नोत्तर पद्धतीपेक्षां निव्वळ वर्णनात्मक पद्धतीनें माहिती दिली असती, तर जास्त चांगलें झालें असतें. वर्णनात्मक पद्धतीनें विषयाची संगति तुटत नाहीं व तो जास्त मनोरंजक होतो. किंमत ५ आणे.

ले. रा. **अनंत दत्तात्रय दातार**, शिक्षक, शाळा वळसंग, जि. सोलापूर.

**अध्यापनाचे मुख्य नियम:**— एका आङ्ग्ल विदुषीच्या छापील लहान पुस्तकाचें हें भाषांतर आहे. यांत अध्यापनाच्या मुख्य मुख्य नियमांचा थोडक्यांत विचार केला आहे. भाषांतर बरेंच कठीण झालें आहे, यामुळें त्यांतील कल्पना विद्यार्थ्यांना समजण्यास कित्येक वेळां कठीण जाईल.

अभ्यासक्रम हा असंदिग्ध, स्पष्ट व व्यवस्थित पद्धतीप्रमाणें असावा.

अध्यापनासाठीं नवीन व अननुभविक शिक्षक मोठा व विस्तृत विषय घेतात.

विद्यार्थ्यांच्या मनांत शिक्षणप्रगतीबद्दल बौद्धिक आवड उत्पन्न करावी.

वर्गाचा उपयोग सुपरिणामकारक व योग्य व्हावा म्हणून वर्गव्यवस्था हें नाम यथार्थ होण्याकरितां उत्तम परिस्थिति वर्गात उत्पन्न करणें ही गोष्ट विचारार्ह आहे.

या व आणखी थोड्या वाक्यांचें जास्त स्पष्ट व सरळ भाषांतर होणें जरूर आहे व तें पुढील आवृत्तींत होईल अशी आशा आहे.

अध्यापनांतील महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवण्यास हें पुस्तक उपयोगी पडेल. किं. ४ आणे.

ले. **शंकर वि. लेले**. शिक्षक, एल्फिन्स्टन हायस्कूल मुंबई.

**बालगीतसंग्रहः**-- या पुस्तकांत शिशुवर्गाकरितां व पहिल्या इयत्ते-करितां सोप्या व गोड गाण्यांचा संग्रह केला आहे. पुस्तकांतील बरींचशीं पद्यें रा. लिमये यांच्या बालगीतांतील व रा. कारखानसि यांच्या 'मुलांकरितां कविता' या पुस्तकांतील आहेत. गाण्यांच्या चाली सोप्या आहेत व कल्पनाही गोड आहेत. राष्ट्रगीतें लहान मुलांच्या पुस्तकांत देण्याची आवश्यकता नव्हती. त्याचप्रमाणें कांहीं कठीण प्रार्थनागीतेंही लहान मुलांच्या पुस्तकांत अस्थानीं आहेत. 'जो जग-भावन करि मतिविकसन। करूनी चिंतन त्याचें अनुदिन' या पद्याचा अर्थ आम्हांला लागला नाहीं. रा. कुळकर्णी यांनीं हा छोटा संग्रह एकत्र करून मुलांच्या शिक्षकांची बरीच अडचण दूर केली आहे. छपाई सुरेख आहे. पुस्तक मुलांचे हातीं देण्यास योग्य आहे. किंमत ४ आणे.

संपादक व प्रकाशक— **महादेव नीलकंठ कुळकर्णी, शिक्षक, प्रॅक्टिसिंग स्कूल, धुळें.**

**उजळणीचें नवें पुस्तकः**—या पुस्तकांतील आंकडे मोठे, ठळक व सुबक आहेत. आकृतींच्या साहाय्यानें अंक समजावून देण्याचा प्रयत्न केला आहे. दशक आणि सुटे हे निराळे आहेत हें दाखविण्याकरितां ते निराळ्या रंगांत काढले आहेत. बेचा पाढा, निमकीचा पहिला पाढा व पावकीचा पहिला पाढा हे आकृतीचे साहाय्यानें स्पष्ट करून दाखविले आहेत. बार्कांची उजळणी इतर पुस्तकांप्रमाणेंच पण मोठ्या टाइपांत दिली आहे. आकरकी आणि एकोत्री हीं लहान मुलांना शिकविण्याची जरूर नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे, तेव्हां उजळणीचे हे दोन भाग पुढील आवृत्तींत गाळावे. उजळणी ही मुलांनीं नेहमीं काढलीच पाहिजे. त्याशिवाय मुलांना ती चांगली लिहितां येणार नाहीं व आठवणार नाहीं, म्हणून लेखकाचें 'हें पुस्तक वर्गांत प्रत्येक मुला-जवळ असल्यास मुलांकडून वारंवार धडे लिहून घेण्यांत निष्कारण वेळ खर्च करावा लागणार नाहीं.' हें विधान अतिशयोक्तीचें आहे.

अंकांचें उत्तम वळण लावण्यास व अंकांची चांगली समजूत पडण्यास हें पुस्तक उपयोगी पडेल. पुस्तकाची छपाई व बाह्यांग सुंदर आहे. किं. ३ आणे.

लेखक— **का. वि. आस्नीकर.** हेडमास्तर, मराठी शाळा, पुणें शहर.

**समाजसेवेचीं तत्त्वें व मार्गः**---लेखक. रा. **पुरुषोत्तम गोविंद नाईक,** मुंबई– धर्मादायबुद्धि व परोपकार या दोन गुणांबद्दल हिंदु समाजाची फार प्राचीन काळापासून ख्याती आहे. पण सध्याच्या बदललेल्या परिस्थितींत या परोपकारबुद्धीचें रूपांतर समाजसेवेंत होणें अत्यंत इष्ट आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं समाजसेवेचा उत्तम प्रकारें विचार करून ती अनेक प्रकारें व्यवस्थितपणें चाल-

विली आहे. आपणांकडे समाजसेवेची कल्पना आतां दृढ झाली आहे व समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्था निघत आहेत. तथापि सामान्य जनतेला व पुष्कळ सुशिक्षित व्यक्तींनाही समाजसेवेचीं तत्त्वें व तीं करण्याचे मार्ग यांची कल्पना स्पष्ट नसते. मराठी भाषेंत या महत्त्वाचे विषयावर अद्यापपर्यंत एकही पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं. रा. नाईक हे समाजसेवासंघाचे सभासद आहेत. त्यांनीं समाजसेवेचें स्वतः काम केलेलें आहे. यामुळें त्यांनीं या विषयावर लिहिलेलें प्रस्तुतचें पुस्तक बहुविध माहितीनें भरलेलें आहे. समाजसेवेचें स्वरूप, तिची आवश्यकता, दान आणि समाजसेवा यांतलि भेद, शहरांत व खेडेगांवांत समाजसेवेची आवश्यकता, समाजसेवेचे निरनिराळे मार्ग यांचें विवेचन फार मार्मिक आहे. लेखकाची भाषा साधी व सरळ आहे. पाश्चिमात्य समाजसेवेचीं कित्येक उदाहरणें वाचीत असतां आपण एकादी कादंबरी वाचीत आहोंत असें वाटतें. विषय अगदीं नवीन असतांनाही लेखकानें तो मनोरंजक केला आहे. यामुळें पुस्तक कोठेंही कंटाळवाणें होत नाहीं. रा. गोपाळराव देवधर यांनीं या पुस्तकास एक लहानशी पण मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे.

किं. १ रु.

**आनंदः**—या मासिकानें श्री छत्रपतींच्या त्रिशतसांवत्सरिक उत्सवाचे वेळीं २५० पानांचा एक सुंदर अंक प्रसिद्ध केला आहे. यांत लहान मुलांकरितां सोप्या भाषेंत शिवछत्रपतींचें संपूर्ण चरित्र दिलें आहे. पुस्तकांत भरपूर चित्रें दिलीं आहेत. हा अंक मजकूर, छपाई व चित्रें या तिन्ही बाबतींत सरस निघाला आहे.

**लोकमित्रः**—लोकमित्राचे उत्साही संपादक रा. सडेकर यांनींही या आनंदाचे प्रसंगीं एक मुद्दाम अंक काढिला. त्यांत निरनिराळ्या विद्वान् लेखकांचे शिवचरित्रासंबंधानें व तात्कालिक स्थितीसंबंधानें सुंदर लेख आहेत. हा अंक वाचनीय आहे.

**प्राणीशास्त्रः**–आमच्या भागांतील वानर व माकड हा लेख शेतकी कॉलेजचे प्रोफेसर देशपांडे यांनीं कन्याशिक्षकाकरितां दिला आहे. प्रोफेसर यांनीं प्राणीशास्त्र नांवाचें एक सुंदर पुस्तक आतां प्रसिद्ध केलें आहे. त्या पुस्तकाची कल्पना वरील लेखावरून होईल. या पुस्तकांत प्राणीशास्त्राची सामान्य माहिती अगदीं सोप्या भाषेंत व सामान्य वाचकालाही समजेल अशा प्रकारें दिली आहे. हिंदुस्थानांतील मुख्य प्राण्यांचीं सचित्र वर्णनें दिलेलीं असल्याकारणानें प्राथमिक शाळांतील शिक्षकांना सृष्टिज्ञान हा विषय शिकविण्यास या पुस्तकाचा चांगला उपयोग होईल. पुस्तकांत भरपूर चित्रें असल्यामुळें त्याची उपयुक्तता जास्त वाढली आहे. किं १॥ रुपाया. मिळण्याचें ठिकाण–नवीन किताबखाना, बुधवार पेठ, पुणें.

**शास्त्रीय विषयांचीं मूलतत्त्वें**:--लेखक–ना. गो. आगाशे. बी. ए. एल. टी. उमरावती. शास्त्रीय विषयावरील हें पुस्तक मध्यप्रांत व वऱ्हाड एथील अभ्यास-

क्रमाला धरून लिहिलेलें आहे. मुंबई इलाख्यांतील हायस्कूल्स व ट्रेनिंग कॉलेजें यांच्या अभ्यासक्रमाला धरून जरी सर्वस्वीं हें पुस्तक लिहिलें नाहीं, तरी इकडील विद्यार्थ्यांना हें पुस्तक बरेंच उपयोगी पडेल यांत संशय नाहीं. पुस्तकांतील आकृति प्रयोगांची स्थूल कल्पना देण्याला उपयोगी पडण्याजोग्या आहेत, तरी त्या असाव्या तितक्या सुबक नाहींत. छपाई चांगली आहे. पुस्तकांतील माहिती थोडक्यांत पण स्पष्ट अशी दिली आहे. छपाईच्या कांहीं कांहीं फारच ढोबळ चुका आहेत. शुद्धिपत्र दिलें असतें, तर वाचकांना त्या दुरुस्त करितां आल्या असत्या. सामान्य वाचकांस व विद्यार्थ्यांसही हें पुस्तक उपयुक्त व मनोरंजक वाटेल. किं १ रु.

---

## अद्भुत कथा

—:०:—

आजच्या अंकांत पावसाचा वेल ही गोष्ट दिली आहे ती मुलांना योग्य अशा जाड व मोठ्या टाइपांत छापिली आहे. ही व अशाच बारा गोष्टी दिलेलें **अद्भुत कथा** हें पुस्तक कन्याशिक्षकानें नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकाचा आकार कन्याशिक्षकाच्या दीडपट आहे. पुस्तकाला कागदही सुरेख वापरला आहे. यांत ४७ चित्रें आहेत. त्यांपैकीं कांहीं सबंध पानभर आहेत. चित्रें एका हुशार चित्रकाराकडून करवून घेतलेलीं आहेत. मनोरंजक गोष्टी, उत्तम छपाई, सुंदर व भरपूर चित्रें या योगानें पुस्तक फार आकर्षक झालें आहे. फक्त छपाईचा खर्च भागावा एवढाच हेतु असल्यामुळें किंमत अगदीं कमी ( ५ आणे ) ठेविली आहे. दोन हजार प्रति छापल्या. त्यांपैकीं ७०० एक महिन्यांतच खपल्या. पुस्तक खालील पत्त्यावर मिळेल:

म्यानेजर-**कन्याशिक्षक**,
ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

---

## जाहिरात.

मे. ए. इन्स्पेक्टर सो. मध्यभाग, पुणें यांचेकडील इंग्रजीपत्र नं. S.79-6. ता. ५-४-१९२७ अन्वयें कळविण्यांत येतें कीं १९२६ सालीं ज्या विद्यार्थिनी ज्युने २ रे वर्षाच्या सर्टिफिकेट.परीक्षेंत नापास झाल्या आहेत व ज्यांना एक विषयांत परिक्षेस बसण्यास परवानगी मिळू शकते, त्यांना मे. ए. इ. सा. म. भाग पुणें यांच्या स्पेशल परवानगीनें चालू सालीं होणाऱ्या सिनीअर १ ले वर्षाचे परिक्षेस बसण्याची परवानगी मिळेल. तरी अशा विद्यार्थिनींनीं आपले अर्ज आमचे मार्फत ताबडतोब पाठवावे. ता. १५-७-२७ चे नंतर येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाहीं. परिक्षेस बसून ज्या विद्यार्थिनी नापास होतील त्यांस पुन्हा परवानगी मिळणार नाहीं. कळावें.

R. Nawalkar,
**लेडी सुपरिंटेंडंट,**
ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

# मुलींच्या व्हर्नेक्युलर फायनल परीक्षेचा निकाल. १९२७

## पुणें सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | अनुसुया खरे. | ३१५ |
| २ | अनुसुया पाटोळे | ३३४ |
| ३ | अन्नपूर्णा काणविंदे | ३४३ |
| ४ | अन्नपूर्णाबाई दातार | २७१ |
| ५ | अन्नपूर्णाबाई केतकर | २८३ |
| ६ | अंबू गायतोंडे | २७१ |
| ७ | अंबू दाते | २८४ |
| ८ | इंदिराबाई अधिकारी | ३०० |
| ९ | इंदिराबाई परांजपे | २६६ |
| १० | इंदुमतीबाई जांभेकर | ३३१ |
| ११ | उमाबाई भिडे | २६५ |
| १२ | एलन निर्मळ | ३२६ |
| १३ | एस्तर चरकिर | ३०४ |
| १४ | कमळा भाटवडेकर | २६४ |
| १५ | कमळा चव्हाण | ३१२ |
| १६ | कावेरी ओक | ३०७ |
| १७ | कावेरी जोशी | २७० |
| १८ | कोंडू मोहिते | ३६१ |
| १९ | कृष्णा केतकर | २५० |
| २० | गोदू शिंत्रे | २९५ |
| २१ | गोदू जुवेकर | ३०४ |
| २२ | गंगू दौंडे | २७९ |
| २३ | चित्तकला नातू | ३१२ |
| २४ | चंपू बेट्टीगिरी | २६९ |
| २५ | चंपू साठे | ३०४ |
| २६ | छबू नगरकर | २६७ |
| २७ | तारा वाघमारे | ३७१ |
| २८ | तारा लेले | २७४ |
| २९ | तारा जोगळेकर | २६५ |
| ३० | दिना भोसले | २६७ |
| ३१ | दुर्गा कुकडे | २९० |
| ३२ | पार्वती कठारे | २५७ |
| ३३ | प्रिता उखाडे | २७२ |
| ३४ | फुलवंती साने | ३१३ |
| ३५ | बच्चू वाबळे | २७० |
| ३६ | बया गायकवाड | २८० |
| ३७ | मथू बर्वे | २५० |
| ३८ | मनकर्णिका चावरे | ३१० |
| ३९ | मनू कान्हेरे | २७२ |
| ४० | ममता साळवे | ३०७ |
| ४१ | माणिक विघवे | २५९ |
| ४२ | मालती राणे | २८५ |
| ४३ | माली वैद्य | २५८ |
| ४४ | मारगारेट हॅरिसन | २७२ |
| ४५ | मेरीबाई मद्रासी | २८७ |
| ४६ | यमू बापट | २८४ |
| ४७ | यमुना गितापाठी | २९६ |
| ४८ | यमुना पाटोळे | २९२ |
| ४९ | यमुना वाबळे | ३३९ |
| ५० | यशोमती आगाशे | २७३ |
| ५१ | रत्ना पेडणेकर | ३२६ |
| ५२ | राधा जोशी | २५६ |
| ५३ | राधा कुलकर्णी | ३९० |
| ५४ | रुक्मीणी गोकर्ण | ४२२ |
| ५५ | रेचेल चरकिर | ४०१ |
| ५६ | लक्ष्मी बाके | ३३१ |
| ५७ | लक्ष्मी सोहनी | ४४५ |
| ५८ | लक्ष्मी दलाल | २५१ |
| ५९ | लीलावती तिवारी | ३०५ |
| ६० | वत्सला पोतनीस | २८५ |
| ६१ | वाराणशी राजर्षी | ३०९ |
| ६२ | विमल गुप्ते | ३७२ |
| ६३ | विमल लाजणी | ३३३ |
| ६४ | वेणू आगाशे | २७६ |

| | | |
|---|---|---|
| ६५ | वेणू कानिटकर | २७३ |
| ६६ | शकुंतला मंहाडीक | २८५ |
| ६७ | शकुंतला देवधर | ३१५ |
| ६८ | शांताबाई कुलकर्णी | २८९ |
| ६९ | शांताबाई आपटे | २७७ |
| ७० | सरस्वती उंडे | २८५ |
| ७१ | सरस्वती धुमणें | २५९ |
| ७२ | सर्वमंगला नातू | २९६ |
| ७३ | सावित्री भालेराव | २६९ |
| ७४ | साळू सावकार | ३३९ |
| ७५ | सिता थिटे | ३५० |
| ७६ | सुंदर लेंढे | २६२ |
| ७७ | सुशिला कानिटकर | २७७ |
| ७८ | सुशिला वेदपाठक | २९४ |
| ७९ | सुशिला पेणकर | ३४३ |
| ८० | सोनू कानिटकर | २७७ |
| ८१ | सेरा अब्राहम | २८५ |
| ८२ | सोनु धत्ते | २६७ |
| ८३ | हिरा जाधव | २८६ |

## सातारा सेंटर

| | | |
|---|---|---|
| १ | मनोरमा हेरवाडकर | ३१४ |
| २ | सुभद्रा जोशी | २५० |
| ३ | राधा आठल्ये | ३४३ |
| ४ | शांता भुसारी | २७७ |
| ५ | अंबू पटवर्धन | ३९२ |
| ६ | शांता लिमये | ३२४ |
| ७ | पद्मावती घाणेकर | ३४१ |
| ८ | दुर्गा मोडक | २९८ |
| ९ | कृष्णा भिडे | २५८ |
| १० | अहल्या देव | २६० |
| ११ | सुमती खुपेरकर | ३०१ |
| १२ | सगुणा महाजनी | २६५ |
| १३ | रंगू सुतार | २९३ |
| १४ | बालका परीट | २६२ |
| १५ | इंदुमती गुणे | २५४ |
| १६ | येसू राजमाने | ३१४ |
| १७ | शकुंतला मिराशी | २८७ |

## सोलापूर सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | गोदू चव्हाण | २४८ |
| २ | काशी डोळे | ३३७ |
| ३ | वत्सला गाडवे | ३४३ |
| ४ | मंजुळा जवळे | २७२ |
| ५ | अंबू काकडे | ३६३ |
| ६ | कृष्णा कानडे | ३०३ |
| ७ | मनोरमा खराबस | २९३ |
| ८ | भिमा कुळकर्णी | ३०८ |
| ९ | वत्सला नरखेडकर | ३४६ |
| १० | मथुरा पोरे | ३१० |
| ११ | जम्ना शहा | ३०१ |
| १२ | अनुसुया श्रोत्रीय | २७२ |
| १३ | कृष्णा सागडे | ३२३ |
| १४ | गिता पुरंदरे | २५९ |

## उर्दू.

| | | |
|---|---|---|
| १५ | एलीस जेम्स | ३०४ |
| १६ | एलीझाबेथ नलबन्सी | ३२८ |
| १७ | एलीझाबेथ प्रेमसुख | ३५६ |

## अहमदनगर सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | आनंदी बंडसोडे | ३६५ |
| २ | ग्रेस दिवेकर | ३५४ |
| ३ | हरणा मकासरे | ३३८ |
| ४ | रंगू पाटेकर | ३१७ |
| ५ | कमल राठोड | ३२५ |
| ६ | सुलोचना म्हसके | ३१५ |
| ७ | ग्रेस पाटोळे | ३११ |
| ८ | इंदिरा पाटोळे | ३०८ |
| ९ | मेरी साळवे | ३०७ |
| १० | लीलावती सोनवणे | ३०३ |
| ११ | हरिणी शिंदे | ३०२ |
| १२ | लक्ष्मी कुंभारे | २९५ |
| १३ | ल्युसिआ साळवे | २८५ |
| १४ | ग्रेस लोखंडे | २८५ |

| | | |
|---|---|---|
| १५ | सारा सोनवणे | २८६ |
| १६ | शांता भोसले | २८३ |
| १७ | शकुंतला गायकवाड | २८० |
| १८ | मथुरा चक्रे | २७९ |
| १९ | ठकू पतंगे | २७५ |
| २० | इंदिरा नांदे | २७१ |
| २१ | मालन आवळे | २६६ |
| २२ | अवंतिका साळवे | २६२ |
| २३ | सोनू चांदेकर | २८९ |
| २४ | सुवार्ता आढाव | २६१ |
| २५ | पुतळ इंठे | २५८ |
| २६ | इंदिरा गायकवाड | २५६ |
| २७ | सुलोचना पोळ | २५४ |
| २८ | लीलावती साळवे | २६४ |
| २९ | कंठा मिसाळ | ३२५ |

## जळगांव सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | सुमती पोतनीस | २७२ |
| २ | लडका झोपे | २५९ |

## धुळें सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | विमल लेले | ३४८ |
| २ | सावित्री पाठक | ३४५ |
| ३ | द्रौपदी वर्तक | २९२ |
| ४ | माणिक सावळे | २८७ |
| ५ | मार्था आल्हाट | २७१ |
| ६ | शांता मुखेडकर | २८८ |
| ७ | प्रवरा नेने | २८१ |
| ८ | गंगू वैद्य | २८१ |
| ९ | कावेरी रानडे | २७३ |
| १० | पार्वती भिसे | २७० |
| ११ | शांता वैद्य | २५३ |
| १२ | सखू विदूर | २५८ |

## उर्दू

| | | |
|---|---|---|
| १ | जयतुनबी ज़हूर | २४९ |

## मुंबई भाग गिरगांव सेंटर

| | | |
|---|---|---|
| १ | वनमाला केसकर | २४३ |
| २ | अलक्षबबी धुरंधर | ३१५ |
| ३ | अंगू राणे | ३५७ |
| ४ | अनसूया राजाध्यक्ष | २६९ |
| ५ | आऊ दाते | २२७ |
| ६ | आवडा कळके | ३२१ |
| ७ | दुर्गा रेगे | ३८८ |
| ८ | द्वारका फाटक | ३१२ |
| ९ | गजरा राऊत | ३३९ |
| १० | गंगू दामूले | ३४३ |
| ११ | गीता गाडगीळ | २६५ |
| १२ | गुलाब कडू | २७६ |
| १३ | हिरा पाटील | २३९ |
| १४ | इंदू पाटील | २६७ |
| १५ | कांता पिळगांवकर | ३१७ |
| १६ | काशी जोशी | ३०६ |
| १७ | कृष्णा पेडणेकर | २५४ |
| १८ | कृष्णा चित्रे | २६९ |
| १९ | मजलतेव कोलटकर | ३६३ |
| २० | माणक गिधा | ३२८ |
| २१ | मथुरा पानसरे | २६२ |
| २२ | नलिनी देसाई | ३१४ |
| २३ | नलिनी धुरंधर | २९७ |
| २४ | पिलू पित्रे | ३१२ |
| २५ | पेनिन्ना कोलटकर | ३३४ |
| २६ | पेनिन्ना माजगांवकर | २९१ |
| २७ | प्रेमा राणे | २९० |
| २८ | प्रेमा वढावकर | ३०३ |
| २९ | पुतळा नाईक | ३१० |
| ३० | रखमा सहस्रबुद्धे | ३१४ |
| ३१ | रत्ना म्हात्रे | २९३ |
| ३२ | रुक्मिणी आरावकर | २५९ |
| ३३ | सरस्वती चिटणीस | ३०८ |
| ३४ | सीता जोशी | ३२३ |
| ३५ | सीता नाडकर्णी | २६७ |
| ३६ | सोनू पाटणकर | २९० |
| ३७ | सुशिला विश्वास | ३१७ |

| | | |
|---|---|---|
| ३८ | ठकू कुलकर्णी | ३२४ |
| ३९ | वसंति गुलगुले | २९३ |
| ४० | वत्सला हरमाळकर | २८७ |
| ४१ | यमुना सारंग | २७७ |
| ४२ | यमुना भिडे | २९० |
| ४३ | अंबू गोखले | ३४० |
| ४४ | बनू सुखठणकर | ३२८ |
| ४५ | भागीरथी निरगुडे | २७८ |
| ४६ | छबू गुप्ते | ३७२ |
| ४७ | चंपु महादेव गोरे | ३२४ |
| ४८ | चंपू रावजी गोरे | २६५ |
| ४९ | चंपु सिताराम | २४७ |
| ५० | धोंडी रेडकर | २६१ |
| ५१ | इंदिरा राऊत | २६१ |
| ५२ | इंदिरा गुप्ते | २६५ |
| ५३ | इंदू वैद्य | ३५५ |
| ५४ | कमला शिरके | ३३२ |
| ५५ | मंजुळा नेरूरकर | २३८ |
| ५६ | प्रभावती प्रधान | २७१ |
| ५७ | रत्नप्रभा नाबर | ३११ |
| ५८ | सुशिला म्हात्रे | २३३ |
| ५९ | शांता जावळे | ३५२ |
| ६० | शांता सावे | २५७ |
| ६१ | शांता आठले | २५३ |
| ६२ | शरयू मराठे | २५४ |
| ६३ | सीता देसाई | २६४ |
| ६४ | सुशीला रेडकर | २८२ |
| ६५ | सुशीला शिंदे | २७९ |
| ६६ | तारा जानोलकर | २८५ |
| ६७ | वाराणशी दांडेकर | ३१५ |
| ६८ | वत्सला घुगरे | ३०५ |
| ६९ | वत्सला देशपांडे | ३२५ |
| ७० | वत्सला गुप्ते | ३१५ |
| ७१ | गंगा राज्याध्यक्ष | ४१० |
| ७२ | गिरजा भट | ४६७ |
| ७३ | हिरा सामंत | २५६ |
| ७४ | शालिनी रामनाथकर | ३७६ |
| ७५ | सुशीला तेंडेलकर | २५८ |
| ७६ | सीता लेले | २७१ |

## टँक स्ट्रीट सेंटर उर्दू.

| | | |
|---|---|---|
| १ | अमीनबी उसमानमखमूर | २६६ |
| २ | नूरबी अलखान | ३२४ |
| ३ | कादिरून अबूमहंमद | २८२ |
| ४ | साहेब जादी बेगम सैयदवाली महंमद | २६० |
| ५ | विलायत बेगम सैयद जलालशहा | २९९ |

## ठाणे सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | शांता चौबळ | २६१ |
| २ | लीला गुप्ते | ३०६ |
| ३ | इंद्रायिणी हजारे | २६८ |
| ४ | चंपू खेडकर | ३८० |
| ५ | चंपू प्रधान | २५७ |
| ६ | शशीकिला साने | ३०२ |
| ७ | लीला वाघोलकर | ३०३ |
| ८ | गुलाब वैद्य | ३०४ |
| ९ | शरद् वेदक | ३५२ |

## नाशिक सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | शांता चित्राव | २५७ |
| २ | गंगू चुंबळे | २५४ |
| ३ | अवंतिका दाणी | २६१ |
| ४ | शांता धांडे | २७५ |
| ५ | द्वारका गोडबोले | ३०१ |
| ६ | सुमित्रा गोरे | २३३ |
| ७ | मनोरमा भिमले | ३२७ |
| ८ | गंगू गुरव | २९१ |
| ९ | वासंतिका जोशी | २८६ |
| १० | ॲनी केदार | २८१ |
| ११ | शरद् मणेरीकर | ४०५ |
| १२ | यशोदा मुजुमदार | २६२ |
| १३ | तारा सदावर्ते | ३४२ |

## मालेगांव सेंटर.

| | | |
|---|---|---|
| १ | कोंडी सालुके | २४० |
| २ | माई जडे | २५२ |

३ शांता गुजराथी २७०

## रत्नागिरी सेंटर.

१ बनू जोशी ३७१
२ चंपी राजापूरकर २८७
३ चंपू सामंत २८४
४ जानकी जोशी ३२४
५ कृष्णा करमरकर ४४०
६ कुसूम कद्रेकर ३०२
७ मथुरा जोगळेकर ३९१
८ सखु रेडीज ४४६
९ शांता चव्हाण ३२४
१० विठा पाटोळे २९३
११ विठा कोलगे २७२

## मालवण सेंटर.

१ हिरा मांजरेकर २७१
२ कृष्णा देऊळकर ३११
३ माणक कोचरेकर ३५६
४ मंजुळा गांवकर ३१९
५ पार्वती खानविलकर ३१९
६ सावित्री सारंग २८४

## अलिबाग सेंटर.

१ यमुना आठवले २८४
२ गंगू प्रधान २७०
३ शांता प्रधान २६९

## कराची सेंटर.

१ मुक्ताबाई गम्वडे ३२३
२ रूका मोझस २६९
३ रत्नाबाई जेकब २८१
४ सोनी बंदरकर २५०

## धारवाड सेंटर दक्षिण भाग.

१ नलिनी भांडारकर २५७

## कारवार सेंटर

१ सुशिला सुरुठणकर ३५८

## बेळगांव सेंटर.

१ गंगू जिनईकर ३३३
२ गंगू सडेकर ३१६
३ गंगू जांबोतकर ३०६
४ गंगू बेळगांव २९१
५ आकू जोशी २७१
६ सुभद्रा कदम २६८
७ चंपा पाटील २६३
८ वेणू मुदलियार २६०
९ रंगू कित्तूर २५१

## उर्दू.

१ खुदिजाबी बिनते मिरासाहेब मुल्ला ३१८

## कोल्हापूर सेंटर.

१ इंदू शिरगांवकर २८१
२ चंद्रा प्रधान ३७२
३ जयंती हजारे २६८
४ मालती काळे ३११
५ मालतीबाई गर्दे ३२०
६ रेचल काळे ३०६
७ रुक्मिणी गणेशाचार्य २७५
८ रंगू गुर्जर ३०४
९ विठाबाई मोकाशी २९२
१० श्रीमती दत्त माजगे ३०१
११ सरस्वती कांबळे २८०

# सरकारी जाहिरात.

—— :o: ——

(१)

## मुलींची देशभाषेंतील शेवटली परीक्षा.

### मध्यभाग.

सन १९२८ सालीं होणाऱ्या मुलींच्या देशभाषेंतील शेवटल्या परीक्षेसाठीं नेमिलेलीं पुस्तकें व विषय.

पहिलें सदर—देशभाषा ( मराठी ).

**गद्य**—शाळाखात्याचें मराठी सहावें पुस्तक ( १९२६ ची आवृत्ति ).
**धडे**—२, ५, ६, ११, १२, १३, १५, १७, १८, २२, २३, २५, २६, २७, २९, ३०, ३१, ३७, ३९, ४१, ४४, ४५, ४८, ४९ ५०, ५१, ५३, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६८, ६९, ७० व ७१. ( एकूण धडे ४० )

**पद्य**—शाळाखात्याचें मराठी सहावें पुस्तक ( १९२६ ची आवृत्ति ).

यांतिल १६, २१, २८, ३४, ३८ व ४७ या धड्यांतील कविता.

पहिलें सदर—उर्दू.

**गद्य**—मौलवी महमद इस्माइलकृत 'उर्दू पांचवें पुस्तक' ( १९२३ ची आवृत्ति ) यांतील धडे—२, ३, ५, ७, ९, ११, १२, १५, १८, २१, २३, २५, २८, ३१, ३२, ३३, ३४, ५२, ५३ आणि ५५. ( एकूण धडे २० ).

**पद्य**—मौलवी महमद इस्माइलकृत 'उर्दू पांचवें पुस्तक' ( १९२३ ची आवृत्ति ) यांतील १, ४, ६, ८, १३, १४, १७, १९ व २० या धड्यांतील कविता.

पुणें, ता. १२ एप्रिल १९२७. } **एस्. एन्. मूस.**
एज्यु. इन्स्पेक्टर, मध्यभाग.

( श्री. न. चिं. केळकर यांची मार्मिक प्रस्तावना. )

# महाराष्ट्र स्त्रीगीत.

---

**सरकारनें शाळाखात्यांत मंजूर केलें.**

या पुस्तकांत स्त्रियांच्या पाठांतरांतील जुनीं देवादिकांचीं, व कवि कवयित्री यांनीं रचलेलीं नवीं मोहक लोकप्रिय चालींचीं गाणीं, नोटेशन, चित्रें, यांसह असल्यामुळें तें अत्यंत प्रिय झालें आहे. किं. १॥ रु. ( पत्ता—किताबखाना पुणें. परचुरे पुराणीक मं. माधवबाग मुंबई. )

कृष्णराव गणेश मुळे.

---

टेक्स्ट म्हणून मंजूर झालेलीं. ] **मुलांचें अंकगणित.** [ कमिशन शें. २०.

---

**पुस्तक १ लें**, इ. २ करितां किं. ३ आ. **पुस्तक २ रें**, इ. ३ करितां किं. ३॥ आ. **पुस्तक ३ रें**, इ. ४ करितां किं. ५ आ. उदाहरण १५० उत्तरांसह मंजुरीकरितां पाठविलें आहे.

**लेखक—म. गो. मोडक**, एम्. ए. शिक्षक न्यू. कॉलेज पुणें व द. ज. गोखले बी. ए. हेडमास्तर प्र. स्कूल पुणें.

नवीन पद्धतीनें प्रथमच लिहिलेलीं, कन्याशिक्षक, इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स वगैरेनीं वाखाणलेलीं, अन्ट्रेन्डशिक्षकांसही मार्गदर्शक उदाहरणें भरपूर.

**नाट्यरूप महाराष्ट्र**—लेखक—वि. द. घाटे, एम्. ए. बी. टी. शिक्षक न्यू. कॉलेज पुणें. अस्सल कागद पत्रांचे आधारें लिहिलेला. तत्कालिन महाराष्ट्राचें चित्र यथावत् उभें करणारा, संवाद रूपानें लिहिलेला. इतिहासप्रवेश ४२. किं. १ रु.

**मिळण्याचें ठिकाण**—पुणें मुंबई येथील प्रसिद्ध बुकसेलर्स विशेषतः ल. ना. गोडबोले लक्ष्मीरोड पुणें. परचुरे पुराणिक कंपनी माधवबाग मुंबई, अगर मोडक ५०१ शनिवार पुणें.

Registered No. B 1195.

# पुस्तकांचें नवीन दुकान.

आमचेकडे सर्व तऱ्हेचीं इंग्रजी, मराठी व संस्कृत पुस्तकें मिळतात. स्त्रियांना उपयुक्त अशीं गाण्यांचीं, कहाण्यांचीं व गोष्टींचीं पुस्तकें आम्ही ठेवितों. आमच्या व्यवहाराबद्दल विद्वानांनीं उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन दिलें जातें.

ए. पी. बापट ॲन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स आणि पब्लीशर्स,
बुधवार पेठ, पुणें शहर.

---

संख्या, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, व भागाकार,
हा गणिताचा मुख्य अवघड व तात्त्विक भाग सोपे लहान
व क्रमवार ४७ धडे पाडून ट्रेनिंग कॉलेजमध्यें मी
शिकवितों तसा स्पष्ट करून समजावून देणारें.

कि. ०५ ] **सुबोध अंकगणित** [ तिकिटें
ट. ह. ०१ ] [ पाठवा.

ट्रेनिंगशाळा टेक्स्ट व शिक्षकांच्या लायब्ररीस मंजूर आहे. उदा० संग्रह जोडलेल्या प्रतीस ०१ अधिक २५ प्रतींस २५ % कमी.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें. } रा. स. जोशी,
B. A. S T. C. D.

# कन्याशिक्षक.

वर्ष १३ वें. ] जुलै ते आक्टोबर १९२७ [ अंक ५ ते ८

पुणें एथें 'आर्यभूषण' छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें. व मिस् आर. नवलकर, बी. ए., लेडी
सुपरिंटेन्डन्ट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें,
यांनीं पुणें एथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हां. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत १० आणे.

२४ आक्टोबर १९२७.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| १ स्फुट विचार. ... ... ... ... | ९७–१०० |
| २ व्याकरण. ... ... ... ... ... | १००–१०४ |
| ३ संक्षिप्त गुणाकार व भागाकार. ... ... ... | १०५–१०९ |
| ४ अंकाचे खेळ. ... ... ... ... | १०९–१११ |
| ५ मुलांकरितां गोष्टी. ... ... ... ... | ११२–११५ |
| ६ कन्यासंघ. ... ... ... ... ... | ११५–१२१ |
| ७ दहींभाताचें झाड. ... ... ... ... | १२१–१२५ |
| ८ मुलांकरितां कविता. ... ... ... ... | १२६–१२७ |
| ९ फ्रान्समधील हिंदी वीरांचें स्मारक.... ... ... | १२८ |
| १० बोस यांची संशोधनप्रयोगशाला. ... ... ... | १२९–१३० |
| ११ ब्रिटिश वसाहतींची स्थापना. ... ... ... | १३१–१३८ |
| १२ रंगीबेरंगी शालू. ... ... ... ... | १३९–१४४ |
| १३ मुंबई इलाखा प्राथमिक शिक्षण परिषद्. ... ... | १४५–१६० |
| १४ खलाशी हेनरी. ... ... ... ... | १६१–१६२ |
| १५ आजचा इराण. ... ... ... ... | १६२–१६५ |
| १६ लहान मुलांची झोप. ... ... ... ... | १६५–१६८ |
| १७ चीन. ... ... ... ... ... | १६८–१७१ |
| १८ मुंबई इलाख्यांतील पहिल्या स्कूलबोर्ड कान्फरन्सनें नेमलेल्या कमेटीनें आंखलेला अभ्यासक्रम. ... ... | १७२–१८० |
| १९ साध्वी सौदामिनी ... ... ... ... | १८१–१८७ |
| २० प्रार्थना गीतें. ( कविता ) ... ... ... | १८८–१८९ |
| २१ साडेतीन राव. ... ... ... ... | १९० |
| २२ पोंच व अभिप्राय. ... ... ... ... | १९१–१९२ |

३३ २.१८
२
५म्रा२

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीचि मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष १३ वें. ] जुलै, आगस्ट, सप्टेंबर, आक्टोबर १९२७. [ अंक ५।६।७।८

## स्फुट विचार.

मुंबई इलाख्यांत प्राथमिक शिक्षणाचा कायदा सन १९२३ सालीं पास झाला व इ. स. १९२५ च्या एप्रिल महिन्यांत या इलाख्यांतील कांहीं जिल्ह्यांत त्यांच्या अमलबजावणीस प्रारंभ झाला. या कायद्यान्वयें प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या यांजवर आली. आपल्या अमलाखालीं असणाऱ्या शाळांची व्यवस्था नीट राहावी, शिक्षण पद्धतींत इष्ट त्या सुधारणा कराव्या, सक्तीनें शिक्षण दिलें जावें वगैरे अतिशय महत्त्वाचीं कामें करण्याकरितां स्कूलबोर्ड या नांवाचें एक मंडळ स्थापून जिल्ह्यांतिल अगर म्युनिसिपालिट्यांतील शाळा खातें त्यांच्या ताब्यांत देण्यांत आलें. हें नवीन व महत्त्वाचें काम जेव्हां स्कूलबोर्डांचे अंगावर पडलें, तेव्हां इलाख्यांतील निरनिराळ्या स्कूलबोर्डांनीं एकत्र जमून आपल्या मार्गांतील अडचणी, आपलीं ध्येयें, तीं गांठण्याचे मार्ग, इत्यादि अनेक गोष्टींचा विचार केला तर चागलें होईल अशी कल्पना ठाणें म्युनिसिपल स्कूलबोर्डाचे चेअरमन रा. मुल्हेरकर यांच्या मनांत आली. ठाणें, मुंबई व पुणें वगैरे ठिकाणच्या स्कूलबोर्डांच्या अध्यक्षांनीं एकत्र जमून या प्रश्नाचा विचार केला व इलाख्यांतील सर्व स्कूलबोर्डांची एक परिषद मुंबई येथें भरविण्याचें ठरविलें. ही परिषद तारीख ५।६।७ फेब्रुवारी १९२६ रोजीं

मुंबई येथें भरली. या परिषद्‌चें अध्यक्षस्थान कराची म्युनिसिपालिटीचे प्रेसिडेंट मि. मेहता यांना दिलेलें होतें. ही परिषद् फार यशस्वी झाली. या परिषदेनें पहिल्या चार इयत्तांचा अभ्यासक्रम तयार करण्याकरितां एक कमिटी नेमिली व तिनें आपला अभ्यासक्रम तयार करून सन १९२७ सालीं भरणाऱ्या परिषद्‌पुढें ठेवावा असें ठरविलें.

* * *

हा अभ्यासक्रम तयार करणाऱ्या कमिटीच्या बैठकी पुण्यास करण्याचें ठरविलें व शिक्षणखात्यानें आपले तज्ज्ञ अधिकाऱ्यांची मदत या कमिटीला द्यावी अशी विनंती मे. डायरेक्टर साहेब यांना या कमिटीनें केली. मे. मध्यभागचे इन्स्पेक्टर, ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन या संस्थेचे प्रिन्सिपाल, ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन या संस्थेच्या लेडी सुपरिंटेंडंट मिस् नवलकर व पुणें जिल्ह्याचे डेप्युटी एज्युकेशनल इनस्पेक्टर रा. दीक्षित या सर्वांनीं कमेटीला मदत केली. या कमेटीनें तयार केलेला अभ्यासक्रम पुणें येथें गेल्या जुलैंत भरलेल्या इलाख्यांतील स्कूलबोर्डांच्या दुसऱ्या परिषदेनें मंजूर केला. हा अभ्यासक्रम या* अंकाचे शेवटीं दिला आहे तो शिक्षकांनीं अवश्य पाहावा.

मुंबई इलाख्यांतील स्कूलबोर्डांची दुसरी परिषद् पुणें येथें १८ व १९ जुलैस भरली होती. परिषद्‌चें अध्यक्षस्थान सिंध प्रांतांतील विद्वान् गृहस्थ भोजासिंग पहालाजानी यांस दिलें होतें. स्वागतमंडळाचे अध्यक्ष प्रिन्सिपाल कानिटकर, परिषदेचे अध्यक्ष मि. पाहलाजानी यांचीं भाषणें व परिषदेंत झालेले ठराव या अंकाचे शेवटीं दिले आहेत. परिषद्‌चें काम इंग्लिशमध्यें चालणें अपरिहार्य होतें, पण यामुळें परिषद्‌करितां मुद्दाम आलेल्या निव्वळ मराठी जाणणाऱ्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांची फार गैरसोय झाली. परिषद्‌पुढें येणारे ठराव व अध्यक्षांच्या भाषणांचा सारांश जर मराठींत छापला असता, तर शिक्षकांला परिषदेंत काय चाललें आहे हें समजलें असतें. या परिषदेला इलाख्याच्या पुष्कळ भागांतून प्रतिनिधि आले होते. परिषदेंत मोकळ्या मनानें पुष्कळ गोष्टींचाही विचार झाला. ही परिषद् फार यशस्वी झाली.

प्राथमिक शाळांच्या पहिल्या चार इयत्तांकरितां गणिताचा नवीन अभ्यासक्रम

* सध्यां सरकारकडे मंजुरीकरितां पाठविलेला असून त्याचा सरकार विचार करीत आहे.

नुकताच प्रसिद्ध झाला आहे. अद्यापि याचें मराठी भाषांतर सरकारनें प्रसिद्ध केलें नाहीं. तें लवकरच प्रसिद्ध होईल. या अभ्यासक्रमांत पुढें दिलेल्या नवीन गोष्टी आहेत.

१ संख्यालेखन व संख्यावाचन या भागांची वांटणी अधिक पद्धतशीर केली आहे.

शिशुवर्गांत १ ते १०० अंक लिहिणें व वाचणें.

१ ल्या इयत्तेंत दश सहस्रापर्यंत संख्या लिहितां व वाचतां येणें.

२ ऱ्या इयत्तेंत दशलक्षपर्यंत संख्यावाचन व लेखन.

३ ऱ्या इयत्तेंत कोटीपर्यंत संख्यावाचन व लेखन.

दुसऱ्या इयत्तेंत जे पाढे मुलांना येत आहेत त्यांतीलच गुणक व भाजक येतील असे गुणाकार व भागाकार करावयाचे आहेत, यामुळें लांबलचक गुणाकार व भागाकार घालून निष्कारण मुलांचा वेळ घालविण्याच्या शिक्षकाच्या प्रवृत्तीस आळा बसेल.

तिसऱ्या इयत्तेंत रेघी बेरीज व वजाबाकी एवढाच रेघी अपूर्णांकाचा भाग शिकवावयाचा आहे. रेघी गुणाकार व भागाकार घ्यावयाचा नाहीं. चढती व उतरती भांजणी, विविध परिमाणांचीं चारही कृत्यें, एकमानपद्धति ( फक्त सम प्रमाण ) व व्यवहारी अपूर्णांकांची ओळख हे भाग तिसऱ्या इयत्तेला आहेत.

चवथ्या इयत्तेला अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यांवर अगदीं साधीं व व्यवहाराला धरून असणारीं उदाहरणें शिकवावयाचीं आहेत. पुष्कळ शिक्षकांना अपूर्णांकाच्या भागजाति, प्रभागजाति, मिश्र वगैरे अनेक जाति सांगण्याचा, मोठमोठाल्या चेच्या प्रकाराच्या ओळी देण्याचा, मारुतीच्या शेपटाप्रमाणें छेदाला छेद देऊन वाढविलेल्या अपूर्णांकांच्या पंक्ति मुलांना सोडविण्यास देण्याचा मोह असतो. हे सर्व प्रकार आतां बंद होतील अशी आशा आहे.

चवथ्या इयत्तेला कोन, काटकोन, चौरस, काटकोन चौकोन, वर्तुळ यांची कल्पना, चौरस व काटकोन चौकोन यांचें पृष्ठफळ व अगदीं साधें घनफळ हे सर्व भाग आहेत. सरळव्याज या भागांतील फक्त व्याज काढणें हाही भाग या इयत्तेला आहे.

अगदीं प्रथमपासून उदाहरणें साधीं व व्यवहाराला धरून असावीं हें या अभ्यासक्रमांत ठिकठिकाणीं सांगितलें आहे.

भूमितींतील कोन, काटकोन चौरस, काटकोनचौकोन, वर्तुळ वगैरे आकृतींचें ज्ञान मुलांनीं प्रत्यक्ष वस्तूंच्या साहाय्यानें मिळवावें व या आकृति काढून पाहाव्या अशी योजना इयत्तावार या अभ्यासक्रमांत आहे.

---

# व्याकरण.

## सामान्यनाम व विशेषनाम.

गाय हा शब्द नाम आहे, कारण ' गाय ' हें एका जनावराचें नांव आहे. गाई पुष्कळ आहेत. आपल्या गांवांत गाई आहेत. दुसऱ्या गांवांत गाई आहेत. आपल्या देशांत गाई आहेत, विलायतेंत गाई आहेत, अमेरिकेंतही गाई आहेत. असा हा गाईचा मोठा जमाव किंवा समूह आहे. या गाईच्या समूहाला आपण गाईची जात म्हणूं. गाईच्या या समुहांतील किंवा गाईच्या या जातींतील प्रत्येक जनावराला आपण गाय म्हणतों.

कुत्रा हा शब्द नाम आहे, कारण कुत्रा हें एका जनावराचें नांव आहे. कुत्रे पुष्कळ आहेत. आपल्या गांवांत कुत्रे आहेत. शेजारच्या गांवांत कुत्रे आहेत. आपल्या देशांत कुत्रे आहेत, दुसऱ्याही अनेक देशांत पुष्कळ कुत्रे आहेत. असा हा कुत्र्यांचा एक समूह किंवा कुत्र्यांची एक मोठी जात आहे. या जातींपैकीं प्रत्येक जनावराला आपण कुत्रा असें म्हणतों.

याच प्रमाणें घोडा, बैल, गाढव, शेळी वगैरे प्रत्येक जनावराचा या पृथ्वीवर एक समूह किंवा जात आहे. घोड्याच्या जातींतील प्रत्येक जनावराला आपण घोडा म्हणतों, बैलाच्या जातीच्या प्रत्येक जनावराला आपण बैल म्हणतों. गाढवांच्या जातीच्या प्रत्येक जनावराला आपण गाढव म्हणतों. हीच गोष्ट वाघ, सिंह, शेळी, मेंढी वगैरे जनावरांना लागू आहे.

नदी हा शब्द नाम आहे, कारण नदी हें जमिनीवरून वहात जाणाऱ्या प्रवाहाचें नांव आहे. नद्या पुष्कळ आहेत. आपल्या जिल्ह्यांत नद्या आहेत,

दुसऱ्या जिल्ह्यांतही आहेत. आपल्या देशांत पुष्कळ नद्या आहेत, दुसऱ्या देशांतही नद्या पुष्कळ आहेत. अशा नद्यांचा पृथ्वीवर मोठा समूह आहे. या नद्यांच्या समूहाला आपण नद्यांची जात म्हणूं. या नद्यांच्या जातींपैकीं किंवा समूहांपैकीं प्रत्येक प्रवाहाला आपण नदी म्हणतों. याच प्रमाणें सरोवरें, बेटें, गांव वगैरे प्रत्येकाची,, एक एक जात आहे. सरोवरांचा जो समूह किंवा जात आहे त्यांपैकीं प्रत्येकाला आपण सरोवर म्हणतों. मूल हा शब्द नाम आहे. कारण मूल हें वयानें अगदीं लहान असणाऱ्या माणसाचें नांव आहे. आपल्या घरीं मुलें आहेत. आपल्या शेजारीं मुलें आहेत. आपल्या गांवांत मुलें आहेत. शेजारच्या गांवांत मुलें आहेत. विलायतेंत मुलें आहेत. सर्व देशांत मुलें आहेत. मुलांचा जो हा मोठा समूह त्याला आपण मुलांची जात म्हणतों. मुलांच्या या समुहांतील किंवा जातींतील प्रत्येकाला आपण ‘ मूल ’ असें म्हणतों. याचप्रमाणें पुरुष, स्त्री, मुलगी यांपैकीं प्रत्येकाचा एक एक समूह किंवा जात आहे.

खुर्ची हा शब्दही नाम आहे. कारण खुर्ची हें बसावयाच्या एका वस्तूचें नांव आहे. आपल्या घरीं खुर्च्या असतात. शाळेंत खुर्च्या असतात. गांवोगांव खुर्च्या आहेत. विलायतेंत खुर्च्या आहेत. दुसऱ्या देशांत खुर्च्या आहेत. खुर्च्यांचा जो हा समूह याला आपण खुर्च्यांची जात म्हणतों. या खुर्च्यांच्या जातींपैकीं प्रत्येक वस्तूला आपण खुर्ची म्हणतों, पुस्तक, दऊत, घड्याळ, पाटी हींही त्या त्या जातीच्या पदार्थांचीं नांवें आहेत. पुस्तकांच्या जातींपैकीं प्रत्येकाला आपण पुस्तक म्हणतों.

आतांपर्यंत आपण कांहीं नामें पाहिलीं. त्यांपैकीं प्रत्येक नाम एका जातीचें नांव आहे व तेंच नांव त्या जातीपैकीं प्रत्येकाला आपण देतों.

जें नाम एका जातीचें असतें व तें त्या जातीपैकीं प्रत्येकाला देतां येतें त्या नामाला सामान्य—म्हणजे जातिवाचक—नाम म्हणतात

रामचंद्रपंताला एक मुलगा आहे. त्याचें नांव त्यांनीं मधुकर असें ठेविलें आहे. मधुकर हा शब्द नाम आहे, कारण तें एका मुलाचें नांव आहे. आतां प्रत्येक मुलाला मधुकर म्हणतां येणार नाहीं. शेजारच्या घरांतील मधुकरा एवढ्याच वयाच्या मुलाला आपण मधुकर म्हणणार नाहीं, म्हणून मधुकर

हें मुलाच्या जातीचें नांव नाहीं. तें एकाच मुलाचें नांव आहे व तें नांव त्याला त्याच्या आईबापांनीं दिलेलें आहे.

'सह्याद्रि' हा शब्द नाम आहे, कारण सह्याद्रि हें एका पर्वताचें नांव आहे. प्रत्येक पर्वताला आपण सह्याद्रि म्हणत नाहीं. हिंदुस्थानांतील सह्याद्रिसारख्या पर्वताला सह्याद्रि असें कोणी नांव देत नाहीं. विलायतेंतील पर्वतांना कोणी सह्याद्रि म्हणत नाहीं. म्हणून सह्याद्रि ही कांहीं पर्वतांची जात नाहीं, तें एकाच पर्वताला लोकांनीं दिलेलें नांव आहे.

एका गृहस्थानें एक गाय विकत घेतली व तिचें नांव त्यानें 'तांबू' असें ठेविलें. तांबू हा शब्द नाम आहे, कारण तांबू हें एका गाईचें नांव आहे. आतां तांबू हें एका गाईला दिलेलें नांव आहे. शेजारच्या गाईला किंवा गांवांतील इतर गाईंना कोणी तांबू म्हणत नाहीं. इतर प्रांतांतील गाईंना आपण तांबू म्हणत नाहीं. विलायतेंतील गाईंना आपण तांबू म्हणत नाहीं. तांबू हें गाईच्या जातीचें नांव नाहीं. तें एका गाईला मालकानें दिलेलें नांव आहे.

गोविंदानें एक कुत्रा पाळण्यास आणला. तो त्याला फार आवडला. तो त्या कुत्र्याला वाघ्या अशी हाक मारतो. आतां वाघ्या हा शब्द नाम आहे, कारण तें एका कुत्र्याचें नांव आहे. वाघ्या हें या कुत्र्याला मालकानें दिलेलें नांव आहे. प्रत्येक कुत्र्याला वाघ्या हें नांव कोणी देत नाहीं. शेजारच्या कुत्र्याला वाघ्या असें म्हणतां येत नाहीं. दुसऱ्या प्रांतांतील अगर विलायतेंतील कुत्र्यांना आपण वाघ्या असें म्हणणार नाहीं. यावरून हें उघड दिसतें कीं वाघ्या हें कांहीं कुत्र्याच्या जातीचें नांव नाहीं. तें एका कुत्र्याला त्याच्या मालकानें दिलेलें नांव आहे.

आपण आतां नामाचा जो प्रकार पाहिला त्यांतील प्रत्येक नाम.

१ बुद्ध्या एकाच जनावराला अगर माणसाला दिलेलें असतें.

२ तें जातीचें नांव नसतें.

३ तें त्या जातींतील इतरांना देतां येत नाहीं.

अशा रीतीनें एकालाच बुद्ध्या दिलेल्या नांवाला विशेषनाम असें म्हणतात.

### प्रश्न १ ला

'गाय दूध देते' या वाक्यांत गाय हें सामान्यनाम आहे, कारण गाईची एक जात आहे. त्या जातींतील प्रत्येकीला गाय हें नांव देतां येतें.

'तांबू दूध देते' या वाक्यांत तांबू हें विशेषनाम आहे, कारण तें एका गाईला बुद्ध्या दिलेलें नांव आहे.

पुढें वाक्यांची एक एक जोडी आहे त्यांतील पहिल्या वाक्यांत सामान्यनाम घाला व पुढील वाक्यांत एक विशेषनाम घाला.

| | | |
|---|---|---|
| १ | ×× | सुंदर गातो |
| | ×× | सुंदर गातो |
| २ | ×× | ओझें वाहतो |
| | ×× | ओझें वाहतो |

झाड

फूल

पुस्तक

शाळा

### प्रश्न २ रा.

'नदी पाणी देते,' या वाक्यांत नदी हें सामान्य नाम आहे. या वाक्याऐवजीं कृष्णा पाणी देते असें लिहिलें, तर कृष्णा हें विशेषनाम आहे. कारण तें एका नदीचें नांव आहे. पुढील वाक्यांत सामान्यनाम असणाऱ्या वाक्याचे पुढें विशेषनाम असणारें वाक्य लिहा.

| सामान्यनाम असणारें वाक्य | विशेषनाम असणारें वाक्य |
|---|---|
| १ पोपट मधुर बोलतो. | |
| २ कुत्रा इमानी आहे. | |
| ३ मांजर चोरटें आहे. | |
| ४ घोडा जलद पळतो. | |
| ५ मुलाला खेळ आवडतो. | |
| ६ मुलगी धडा लिहिते. | |

### प्रश्न ३ रा.

मुलगा हें सामान्यनाम आहे. कारण तें एका जातीचें नांव आहे व तें त्या जातींतील प्रत्येकाला देतां येतें. गोविंदा हें विशेषनाम आहे. कारण तें एका मुलाला बुद्ध्या दिलेलें नांव आहे. पुढें सामान्यनामें दिलीं आहेत. त्यांतील प्रत्येक शब्दापुढें त्या सामान्यनामाच्या जातींतील एकाचें विशेषनाम लिहा. जसें

मांजर—मनी

| सामान्यनाम | विशेषनाम |
|---|---|
| घोडा. | |
| पोपट. | |
| मूल | |

## प्रश्न ४ था.

'मालती' हें विशेषनाम आहे. कारण तें एका मुलीचें नांव आहे पण मुलगी हें सामान्यनाम आहे कारण तें एका जातीचें नांव व त्या जातींतील प्रत्येकीला तें देतां येतें. 'मोगरा' हें सामान्य नाम आहे, कारण तें एका जातीचें नांव आहे, फूल हें सामान्य नाम आहे. कारण तेंही एका जातीचें नांव आहे व तें त्या जातींतील प्रत्येकाला देतां येतें. पुढें कांहीं विशेषनामें दिलीं आहेत. प्रत्येक विशेषनामापुढें त्याचें सामान्य नाम लिहा.

मोत्या
यमू
भीमा
हिमालय
पुणें
जुन्नर
ढवळ्या
कृष्णराव

## प्रश्न ५ वा.

पुढील नामांपैकीं सामान्यनामें असतील तीं एकाखालीं एक लिहा व वर सामान्यनामें असें लिहा; जीं विशेष नामें असतील तीं एकाखालीं एक लिहा व वर विशेषनामें असें लिहा.

गोदावरी, गांव, झाड, बंडू, लाडू, केळें, चांफा, पुस्तक, बहीण, ताई, दादा.

३ ×× दूध चोरून खातें.
×× दूध चोरून खातें.
४ ×× शेत नांगरतो.
×× शेत नांगरतो.
५ ×× पुस्तक वाचते.
×× पुस्तक वाचते.

# संक्षिप्त गुणाकार व भागाकार.

मुलांना अगदीं सोपीं उदाहरणें करण्यास देखील पाटी पेन्सिलीची गरज लागते. अगदीं सोपा असा हिशेब तीं त्रैराशिकानें पाटीवर करतात. सोपी बेरीज व वजाबाकी, सोपा गुणाकार किंवा भागाकार त्यांना कागद आणि पेन्सिलीशिवाय करतां येत नाहीं. अशी स्थिति असणें चांगलें नव्हे. ही जी स्थिति शाळांतून दिसत आहे तिचें कारण शिक्षक मुलांना तोंडी उदाहरणें करावयास सांगत नाहींत हें होय. तोंडीं आंकडे मोडण्याची संवयच नसल्यामुळें मुलांना तोंडीं हिशेब करणें अवघड जातें. याजकरितां गणिताच्या धड्याचे वेळीं पहिलीं थोडीं मिनिटें वर्गांत जो थोडा गणिताचा भाग चालत असेल त्याजवरील सोपीं उदाहरणें मुलांना तोंडीं करण्यास द्यावीं. पाटीवर किंवा वहीवर उदाहरणें करितांना मुलांना संक्षिप्त रीतीनें गुणाकार व भागाकार करण्याची संवय लावावी म्हणजे गणिताच हा भाग त्यांना मनांत करण्याची संवय लागेल. मुलें नेहमीं अगदीं सोपा भागाकार पुढीलप्रमाणें मांडतात व त्यामुळें त्यांचा पुष्कळ वेळ खर्च होतो. १५५२ रुपये तीन माणसांत वांटा. हा भागाकार पुढील लांबलचक पद्धतीनें मुलें करितात.

```
माणसें      रु.      रु.
  ३ )  १५५२ ( ५१७
       १५
       ---
       ००५
         ३
        --
        २२
        २१
        --
         १  रु. बाकी.
```

हा भागाकार असा न सोडवितां पुढील पद्धतीनें सोडविल्यास तो थोडक्यांत होईल व त्यांतील बराच भाग मनांत करावा लागेल.

```
   रु.        रु.
१५५२ ÷ ३ = ५१७  बाकी १ रु.
 २
```

१ पुस्तकाची किंमत १ आणा आहे. एकानें या पुस्तकाच्या २५०० प्रती विकत घेतल्यास त्याला किती रुपये द्यावे लागतील ? लांबलचक रितीनें केल्यास हा भागाकार पुढीलप्रमाणें मांडावा लागेल.

```
             आणे
   १६ ) २५००० ( १५६२ रु. ८ आ.
        १६
        ——
         ९०
         ८०
         ——
         १००
          ९६
         ———
           ४०
           ३२
           ——
            ८
```

हेंच उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें थोडक्यांत करितां येईल.

```
     आणे          रु.  आणे
  २५०००÷१६=१५६२–८
```

तिसऱ्या इयत्तेंत व पुढील इयत्तांत भाजक पाढ्यांतील असल्यास याप्रमाणें संक्षिप्त पद्धतीनें भागाकार करावे.

याशिवाय आणखी कांहीं भागाकार संक्षिप्त पद्धतीनें करितां येतात. आपणांला एकाद्या संख्येला १०० नें भागावयाचें आहे अशी कल्पना करूं. आपणाला एक एक शतकाचा एक भाग करावयाचा आहे. अर्थातच जितके शें अगर शतक असतील तितके भाग होतील व दशंस्थांनीं असणारा व एकंस्थांनीं असणारा अंक मिळून जी संख्या होईल ती बाकी राहील.

१५६२५ ÷ १०० = १५६ भागाकार व २५ बाकी

३७७२ ÷ १०० = ३७ भागाकार व ७२ बाकी

एकाद्या संख्येस २०० नें भागावयाचें असल्यास शेवटचे दोन आंकडे मिळून

होणारी संख्या बाकी राहील. आतां जे एकंदर शतक आहेत त्याला २ नें भागलें म्हणजे झालें. कारण आपणाला २।२ शतकांचा एक एक वांटा करावयाचा आहे.

१२६'२४ ÷ २०० = ६३ भागाकार २४ बाकी
२३३'३७ ÷ २०० = ११६ „ १३७ „

याच प्रमाणें

११'२७ ÷ ३०० = ३ भागाकार २२७ बाकी
२७९'३४ ÷ ३०० = ९३ भागाकार ३४ बाकी

२४३७७ याला १९२ नें भागावयाचें आहे. १९२ = १६ × १२

२४२७७ सुट्या काड्या आहेत अशी आपण कल्पना करूं. प्रथम आपण १६।१६ काड्यांची एक एक जुडी बांधूं व अशा जुडया किती होतील व सुट्या काड्या किती राहतील हें आपण पाहूं.

२४३७७ ÷ १६ = १५२३ जुड्या एक एक १६ काड्यांची; ९ सुट्याकाड्या.

या लहान लहान १२।१२ जुडया एकत्र घेऊन त्यांची मोठी जुडी बांधली तर या मोठ्या जुडींत १६ × १२=१९२ काड्या होतील. आपण लहान १२।१२ जुड्यांची एक एक मोठी जुडी बांधूं व अशा मोठ्या जुड्या किती होतील व लहान जुड्या किती शिल्लक राहातील तें पाहूं.

लहान जुड्या मोठ्या जुड्या लहान जुड्या सुट्या काड्या
१५२३ ÷ १२ = १२६ — ११ ११ × १६ = १७६

सुटया काडया लहान जुडया बाकी सुटया काडया
२४३७७ ÷ १६ = १५२३ ९
लहान जुडया बाकी
१५२३ ÷ १२ = १२६ मोठया जुडया ११ लहान जुडया. यांत प्रत्येकीं १६ काडया आहेत. ११×१६ = १७६

१७६ काडया व पहिल्या ९ सुट्या मिळून १८५ काडया शिल्लक राहिल्या.

म्हणून २४३७७ ÷ १९२ = १२६ भागाकार, बाकी १८५ हेंच उदाहरण थोडक्यांत पुढें दिल्याप्रमाणें मांडावें.

२४३७७ ÷ १९२

| | | |
|---|---|---|
| १६ | २४३७७ | बाकी ९ |
| १२ | १५२३ | |
| | १२६ | ११×१६=१७६ |
| | | १८५ |

आपणांस २४५ नें भागावयाचें आहे अशी कल्पना करूं.

२४५ = ५ × ७ × ७

१५३४२ ÷ २४५

| | | | बाकी |
|---|---|---|---|
| ५ | १५३४२ | | २ |
| ७ | ३०६८ | २ × ५ = | १० |
| ७ | ४३८ | ४ × ७ × ७ = | १९६ |
| | ६२ | | |
| | | | २०८ बाकी |

चवथ्या इयत्तेंत मुलांना अवयवांची चांगली माहिती झाल्यावर या रीतीनें त्यांना भागाकार सहज करतां येतील. ज्या भाजकांचे अवयव पडतात त्याच भाजकांचा भागाकार या रीतीनें करतां येईल.

गुणाकार करितांनाही पाढ्यांतील गुणक असतांना उदाहरण लांबलचक न करितां तें थोडक्यांत करण्याची संवय मुलांना लावावी.

५३४४ × ९ हें उदाहरण पुढें दिल्याप्रमाणें मांडावें.

५३४४ × ९ = ४८०९६

२५, ५०, ७५, २५० वगैरे गुणक असतांना थोडक्यांत गुणाकार करण्याची पद्धति मुलांना शिकवावी.

कोणत्याही संख्येला १०० नें गुणिलें म्हणजे गुण्याइतके शतक येतात म्हणूनच आपण गुणून आलेल्या संख्येवर दोन शून्यें गुणाकारांत देतों.

एखाद्या संख्येला ५० नें गुणावयाचें असल्यास या संख्येच्या निम्मे शतक गुणाकारें येतो. १२×५०=६००; १२ शतकाच्या निम्मे म्हणजे ६ शतक. २८ × ५० = १४००; २८ च्या निम्मे म्हणजे १४ शतक याचप्रमाणें

३९ × ५० = १९५० ३९ च्या निम्मे १९॥ शतक.
१७९ × ५० = ८९५० १७९ च्या निम्मे ८९॥ शतक.
अर्धा शतक = ५०

यावरून नियम निघतो कीं कोणत्याही संख्येला ५० नें गुणावयाचें असल्यास तिची निंपट करून तितके शतक उत्तर मांडावें. अर्ध्या शतकाबद्दल ५० धरावे.

याचप्रमाणें २५ नें गुणावयाचें असल्यास संख्येची पावपट करून ( किंवा तिला ४ नें भागून ) येतील ते शतक धरावे. पाव शतकाबद्दल २५, अर्ध्या शतकाबद्दल ५०, पाऊण शतकाबद्दल ७५ मांडावे. १६५ × २५ = १६५÷४= ४१। शतक = ४१२५. कोणत्याही संख्येला ४९ नें गुणावयाचें असल्यास ५० नें गुणून गुणाकारांतून ती संख्या वजा केल्यास उत्तर येतें हीही गोष्ट मुलांना सहजें समजेल.

१८४ × ४९ = १८४ × ५० = ९२०० − १८४ = ९०१६
संक्षिप्त गुणाकाराचे हे दुसरे प्रकार ४ थ्या इयत्तेंत मुलांना चांगले समजतील.

---

# अंकांचे खेळ.

मुलांना अंक शिकवितांना त्यांना निरनिराळ्या प्रकारचे हिशेब घालावे व ते त्यांनीं वस्तूंच्या साहाय्यानें करावे. हे हिशेब नेहमीं एकाच पद्धतीचे असूं नयेत. एकाच पद्धतीचे हिशेब घातल्यानें मुलांना त्यांचा कंटाळा येतो व त्यांत त्यांना गोडी वाटत नाहीं. हिशेब सांगतांना ते व्यवहाराला जोडून द्यावे म्हणजे त्यांत कांहीं कृत्रिमपणा राहाणार नाहीं. कधीं कधीं मुलांना स्वतांच हिशेब तयार करण्यास सांगावे म्हणजे त्यांना फार आनंद वाटतो व वस्तूंचे भाव त्यांचे चांगले लक्षांत येतात. आपण ही गोष्ट स्पष्टपणें लक्षांत येण्याकरितां एका अंकाचें उदाहरण घेऊं. मुलांना ४५ हा अंक आपण शिकवीत आहोंत अशी कल्पना करूं. प्रथम मुलांना सांगावें कीं आज आपणाला बाजार करावयाचा आहे. भाजी धान्य, कपडे, खेळणीं वगैरे जिन्नस आपणांला बाजारांतून आणावयाचे आहेत. आपला हिशेब मात्र आपण बरोबर केला पाहिजे. चूक होऊं देतां उपयोगी नाहीं.

पहिल्यानें आपण भाजीबाजारांत जाऊं. आपणाजवळ ४५ पैसे आहेत. आतां तुम्हांला जी भाजी घ्यावयाची असेल ती घ्या व बाकी किती पैसे राहातील तें सांगा. पहिल्यानें मुलांना हिशेबाची कल्पना येण्याकरितां आपण उदाहरण करून दाखवावें व तें मुलांना सांगावें. हें पहा मीं १२ पैशांचे बटाटे घेतले. ६ पैशांचे कांदे. १६ पैशांचीं केळीं घेतलीं. मजजवळचे ३४ पैसे गेले व मजजवळ ११ पैसे राहिले.' यानंतर आपणांला काय करावयाचें आहे याची मुलांना चांगली कल्पना येईल व तीं आपल्या त्रियांचे ढीग करून आपलें उदाहरण मनांतले मनांत तयार करतील. मग शिक्षकानें प्रत्येक मुलास आपलें उदाहण किंवा हिशेब मोठ्यानें वाचण्यास सांगावा. हिशेब तयार करण्यांत मुलांची कल्पनाशक्ति उत्तम प्रकारें दिसून येते. या हिशेबांच्या साहाय्यानें मुलांना व्यवहाराची चांगली कल्पना देतां येते. एकाद्या मुलानें दोन पैशांचे बटाटे, १६ पैशांची मेथीची भाजी, ८ पैशांची कोथिंबीर असा जर हिशेब सांगितला तर बटाटे इतक्या स्वस्त मिळत नाहींत. चांगले बटाटे १० पैशांला किंवा १२ पैशांला शेरभर मिळतात, मेथीची भाजी स्वस्त असते, कोथिंबीरही इतकी जास्त कोणी घेत नाहीं, पैशाची कोथिंबीर घेतली कीं पुरी होते वगैरे गोष्टी मुलांना समजावून देतां येतील.

भाजीबाजाराचे हिशेब झाल्यानंतर कापडाचे हिशेब घेतां येतील. यावेळीं पैसे घेऊन भागणार नाहीं, कारण कापड महाग असतें ही गोष्ट मुलांकडून काढून घ्यावी व नंतर त्यांना कापडांसंबंधींचा हिशेब तयार करण्यास सांगावें. हिशेब तयार करितांना मुलांच्या कल्पनाशक्तीला चांगला वाव मिळतो. लुगडीं, साड्या, पोलकीं, खण, पागोटीं, पीतांबर, घोंगड्या धाबळी वगैरें किती तरी वस्तूंचीं नांवें मुलें सांगतात. अशा हिशेबांतही किंमतीच्या संबंधानें जर मुलांच्या कांहीं चुकीच्या समजुती असतील, तर त्या शिक्षकाला दुरुस्त करण्याची चांगली संधि मिळते.

यानंतर आपण खाऊ घेण्याकरितां हलवायाच्या व वाण्याच्या दुकानीं जाऊं. आतां खाऊ घेण्याकरितां रुपये घेण्याची जरूर नाहीं, आणेल्या घेतल्या तर पुरेशा होतील ही गोष्ट मुलांकडून काढून घ्यावी. पेढे, बर्फी, साखरफुटाणे, जिलबी, खडीसाखर, बेदाणा, बदाम वगैरे अनेक खाऊचीं नांवें मुलें सांगतील.

यानंतर खेळण्यांचा हिशेब घ्यावा. कधीं कधीं मुलांना शिक्षकानें जिन्नसांचीं नांवें सुचवावीं. बाहुल्या, भोंवरे, चेंडू, वाघ, सिंह, घोडा, गाडी, कळीच्या बाहुल्या, धांवणाऱ्या मोटारी, वगैरे किती तरी जिनसांचीं नांवें मुलेंही सांगतील.

प्रत्येक हिशेबाचे वेळीं मजजवळ ४५ रुपये, पैसे, अगर आणे होते. मीं अमुक जिन्नस घेतले, तेव्हां इतके रुपये, पैसे अगर आणे खर्च झाले व इतके राहिले हें एका मुलानें सांगावें.

याचप्रमाणें, धान्य, मुलांना लागणारें पाटी, पेन्सिली, पट्टी, पुस्तकें, कागद, वह्या वगैरे सामान, कपडे वगैरे संबंधीं हिशेब मुलांकडून करवून घेतां येतील.

या इयत्तेंत मुलांना शब्दही लिहितां येतात, म्हणून कधीं कधीं मुलांकडून त्यांनीं तयार केलेला हिशेब पाटीवर लिहून घ्यावा. शब्द लिहितां येत नसतील, तर त्यांनीं शब्दाचें पहिलें अक्षर तरी लिहावें.

रुपये
१५ साडी
१० धाबळी
५ धोंगडी
१५ राहिले
—
४५

असें मुलांनीं लिहावें. असें लिहितां न आल्यास

रु.
१५ सा.
१० धा.
५ धों.
१५ रा.
—
असें लिहिलें तरी चालेल ४५.

# मुलांकरितां गोष्टी.

## दगडू पाथरवट.

दगडू पाथरवट एका डोंगराचे पायथ्याशीं राहात असे. तेथें त्याची एक लहानशी झोपडी असे. खाणींतून दगड काढावयाचे, ते घडावयाचे व आपल्या गाड्यांत घालून जवळच्या गांवांत पोहोंचते करावयाचे हा त्याचा नेहमींचा उद्योग असे. एकदां एका श्रीमंत सावकाराला एक विहीर बांधावयाची होती. त्याला पुष्कळ दगड पाहिजे होते म्हणून त्यानें दगडूला आपल्या वाड्यांत बोलावून नेलें. दगडू आंत गेला तेव्हां तो श्रीमंत गृहस्थ आपल्या दिवाणखान्यांत बसला होता. दगडूनें असला थाटमाट कधींहि पाहिला नव्हता. तेथील पलंग, त्यावरील मऊ स्वच्छ गाद्या, पांढरे शुभ्र पलंगपोस पाहून त्याला वाटलें कीं, श्रीमंत होण्यांत खरी मजा आहे. असल्या पलंगावर, असल्या गाद्यांवर काय सुरेख झोप येत असेल! तो परत आल्यावर रात्रीं आपल्या झोपडीचे बाहेर स्वस्थ बसला. त्याला त्याची झोपडी आतां अगदीं भिकार वाटूं लागली. तो म्हणाला, 'देवा देवा! काय माझी ही भिकार झोपडी? मला या झोपडीचा कंटाळा आला आहे. देवा,

दुःख किती या दगडूला<br>
सावकार तूं कर त्याला.'

तेथें जवळच एक देऊळ होतें. तेथून आवाज आला, 'बरें तर, तूं सावकार हो!'

एक क्षणांत दगडूची झोपडी जाऊन तेथें एक वाडा आला. तो वाडा चाकरनोकर, गाड्याघोडे यांनीं भरून गेला. दगडू

सावकार बनला. त्याला आतां फार आनंद झाला. तो पलंगावर मऊ गाद्यांवर निजूं लागला. दगडूला नेहमीं उद्योग करण्याची संवय असे. आतां तो स्वस्थ बसूं लागला. काम नसल्यामुळें त्याला करमेना, भूक लागेना व झोपही लागेना. त्याला वाटूं लागलें कीं सावकार होण्यांत कांहीं मौज नाहीं. एक दिवस तो खिडकीजवळ बसला असतां त्यानें तिकडून राजाची स्वारी येतांना पाहिली. राजा रथांत बसला होता. त्याच्याबरोबर किती तरी चाकर नोकर होते. तो थाटमाट पाहून दगडूला वाटलें कीं, राजा होण्यांत खरी मजा आहे. 'देवा देवा,

दुःख किती श्रीमंताला
राजा कर या दगडूला'

जवळच्या देवळांतून आवाज झाला, 'बरें तर तूं आतां राजा हो.' लागलीच दगडू राजा झाला. मग दगडूला फार आनंद झाला. कांहीं दिवसांनीं राजा होण्यांतही त्याला मौज वाटेना. एके दिवशीं सकाळीं तो बागेंत हिंडत होता. ते दिवस उन्हाळ्याचे होते. ऊन कडक पडलें होतें. उन्हानें फुलें, पानें सुकूं लागलीं. दगडूलाही उन्हाचा त्रास होऊं लागला व त्याचें डोकें दुखूं लागलें. तो म्हणाला, 'या राजाला देखील सूर्याचा त्रास होतोना! देवा,

'त्रास किती हा राजाला
सूर्य करीं या दगडूला'

जवळच्या देवळांतून आवाज आला, 'बरें तर तूं सूर्य हो' दगडू लगेच सूर्य झाला व आपल्या किरणांनीं झाडांना, माणसांना व पशूंना त्रास देऊं लागला. त्याला वरून सर्व पृथ्वी पाहून फार

गंमत वाटली, पण इतक्यांत एक मेघ आकाशांत लांबवर पसरला. तो मध्यें आल्यामुळें दगडूला खालचें कांहींच दिसेना. दगडू म्हणाला, 'सूर्याला देखील हा मेघ त्रास देतो ना! देवा,

त्रास किती या सूर्याला
मेघ करीं तूं दगडूला.'

जवळच्या देवळांतून आवाज आला. 'बरें तर तूं मेघ हो.' लागलीच दगडू एक मोठा मेघ बनला व खालची गंमत पाहूं लागला. त्यानें पाऊस पाडण्यास सुरुवात केली. धो धो धो पाऊस पडूं लागला. नद्यांना पूर आला. गांव वाहून जाऊं लागला. दगडूला वाटलें कीं आपण मोठी गंमत केली. आपल्यासारखा दुसरा कोणीच बळकट नाहीं. पण इतक्यांत त्याला एक मोठा खडक दिसला. तो पावसांत तसाच हसत होता. त्याला पावसाची बिलकूल भीति वाटत नव्हती. दगडू म्हणाला 'हा खडक मेघालाही भीत नाहीं, व सूर्यालाही भीत नाहीं मेघ होण्यांत कांहीं मजा नाहीं. माझें आंग मात्र सारखें झिजत चाललें आहे. कांहीं दिवसांनीं माझ्या सगळ्या आंगाचें पाणी होईल. मेघ होण्यांत फार त्रास आहे. त्यापेक्षां खडक होणें बरें. तो म्हणाला, 'देवा,

दुःख किती या मेघाला
खडक करीं तूं दगडूला,'

जवळच्या देवळांतून आवाज आला, बरें तर तूं खडक हो.' मग दगडू खडक झाला. त्याच्यावर सूर्याचें कडक ऊन पडूं लागलें. पावसाच्या धारा पडूं लागल्या. ऊन, पाऊस व वारा यांचा त्याला फार त्रास होऊं लागला. इतक्यांत एक पाथरवट आला व तो हातोडीनें खडक फोडूं लागला. तेव्हां दगडूला

वाटलें, खडकाला किती तरी त्रास आहे. यापेक्षां पाथरवटच होणें बरें. तो म्हणाला, ' देवा,

दुःख किती या खडकाला
दगडू कर तूं पुन्हा मला.'

जवळच्या देवळांतून आवाज आला, 'बरें तर आतां पुन्हा दगडू हो., दगडू पाहातो तों पुन्हा आपण आपल्या झोपडी-समोर बसलों आहोंत.

# कन्यासंघ.

बालचमू किंवा बॉयस्काउट ही संस्था मूळची इंग्लंडांतील आहे. हिंदुस्तानांत तिचा प्रवेश सुमारें आठ दहा वर्षांपूर्वी झाला, पण या अल्पावधींत तिचा प्रसार आपल्या देशांत जोरानें व कल्पनातीत झाला आहे, आतां प्रत्येक हायस्कूल-मधून बालचमूचें एकएक पथक आहे. एवढेंच नव्हे, तर प्राथमिक शाळांतूनही बालचमूंचीं पथकें तयार होत आहेत. आपल्या जिल्ह्याच्या प्रत्येक मोठ्या शाळेंत बालचमूचें एक तरी पथक असावें अशीही खटपट कांहीं जिल्ह्यांचीं स्कूल बोर्डे करीत आहेत. या चळवळीला इतकें महत्त्व येण्याला तिची उपयुक्तता व आवश्यकता या दोन गोष्टी कारण आहेत. बालचमूच्या पथकांत शिरल्यानें मुलाचे आंगीं धीटपणा येतो, व तो स्वावलंबी बनतो. जुटीनें काम करण्याची, आज्ञा पालनाची, परिस्थितीप्रमाणें वागण्याची त्याला संवय लागते. दररोजच्या आयुष्य क्रमांत लागणाऱ्या अशा कित्येक गोष्टी उत्तम रीतीनें तो शिकतो, व त्याला समाजसेवेचें वळण व गोडी लागते. या सर्व गोष्टीमुळें शिक्षकाला आपल्या शाळेंत बालचमूचें एक पथक असावें अशी इच्छा होते, व पालकालाही आपला मुलगा या पथकांत जावा असें वाटतें. बालचमू संस्था स्थापन करणारे प्रख्यात इंग्लिश सेनापति सर बेडेन पॉवेल यांच्या पत्नी यांनीं मुलींकरितां याच हेतूनें गर्ल्स गाइड किंवा कन्यासंघ नांवांची संस्था स्थापन केली आहे. या संस्थेचा प्रसार आपल्या देशांत फारसा झाला नाहीं. मुलींच्या कांहीं हायस्कूलमधून कन्या-

संघाचीं पथकें तयार झालीं आहेत. बालचमू संस्थेप्रमाणें कन्यासंघ ही संस्था आपल्याकडे सुरू करण्याला बऱ्याच अडचणी आहेत. इंग्लिश चालरीति व आपल्या चालरीति भिन्न आहेत, यामुळें आपल्या देशांतील परिस्थित्यनुरूप या संस्थेच्या बाह्यांगांत व अंतरंगांत बराचसा फेरफार केल्या-शिवाय ती चळवळ आपल्या इकडील शाळांत—विशेषतः खेडेगांवांतील शाळांत—सुरू करितां येणार नाहीं. या ट्रेनिंग कॉलेजनें कन्यासंघाचें एक पथक उभारण्याचा प्रयोग नुकताच करून पाहिला आहे. तत्संबंधींची हकीकत आमच्या वाचकांना मनोरंजक वाटेल म्हणून ती आम्हीं देत आहों. प्रथमतः कन्यासंघाचे उद्देश काय आहेत हें सांगूं.

मुलींचें शील उत्तम बनवावें, त्यांना पुढील आयुष्यांत आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें करण्यास शिकवावें, सूक्ष्म निरीक्षण, आज्ञाधारकता व स्वावलंबन हे गुण मुलींच्या आंगीं यावेत, दुसऱ्याबद्दल सहानुभूति व आदर वाटावा, आयुष्यांत उपयुक्त अशा कला त्यांना शिकवाव्या आणि थोडी फार समाजसेवा करण्यास शिकवावें, त्यांना शारीरिक शिक्षण द्यावें व त्यांची शरीरसंपत्ति सुधारावी, गृहिणी या नात्यानें येणारी जबाबदारी त्यांना उत्तम रीतीनें पार पाडण्यास शिकवावें,. शिशुसंगो-पनाचें त्यांना ज्ञान द्यावें हे सर्व कन्यासंघाचे हेतु आहेत. मुलींना खेळाच्या रूपाचे व्यवसाय देऊन हळूहळू त्यांना उपयुक्त कला शिकवाव्या असें या संघाचें धोरण आहे. थोरल्या व धाकट्या बहिणी एकत्र खेळत असतांना धाकट्या बहि-णींना ज्याप्रमाणें ज्ञान प्राप्ति होते, त्याप्रमाणें पथकाची मुख्य स्त्री व विद्यार्थिनी एकत्र येऊन विद्यार्थिनीस ज्ञान प्राप्ति व्हावी अशी ही योजना केलेली असते.

अकरा वर्षांच्या वरील कोणत्याही विद्यार्थिनीस या संघाचे पथकांत येतां येतें. ' तयार रहा ' हें या संघाचें ध्येय वाक्य आहे. या संघाच्या पथकांत शिरण्यापूर्वीं प्रत्येक विद्यार्थिनीस पुढील १० नियम व ३ प्रतिज्ञा चांगल्या समजून घ्याव्या लागतात.

### कन्यासंघाचे नियम.

१—सभासदाच्या शब्दावर विश्वास ठेविला पाहिजे.

२—सभासदांनीं राजनिष्ठ राहिलें पाहिजे.

३—दुसऱ्याचे उपयोगीं पडणें व दुसऱ्याला साहाय्य करणें हें सभासदाचें कर्तव्य आहे.

४– सभासदानें सर्वांशीं स्नेहानें वागलें पाहिजे. व संघांतील प्रत्येक सभासदांशीं भगिनीप्रेमानें वागलें पाहिजे.

५– सभासदानें सभ्यपणानें व मर्यादेनें वागलें पाहिजे.

६– सभासदानें मुक्या प्राण्यांशीं ममतेनें वागलें पाहिजे.

७– सभासदाचे आंगीं आज्ञाधारकता पाहिजे.

८– सभासदानें कसल्याही कठीण प्रसंगीं आपली वृत्ति आनंदी ठेविली पाहिजे.

९– सभासदानें काटकसरीनें वागलें पाहिजे.

१०– सभासदाचे आचार, विचार आणि उच्चार पवित्र असावे.

### प्रतिज्ञा

मी अशी प्रतिज्ञा करितें कीं—

१–ईश्वर व राजा यांच्यासंबंधीं माझें कर्तव्य मी बजावीन.

२– सर्वकाळीं मी दुसऱ्यास साहाय्य करीन.

३– मी संघाचे नियम पाळीन.

कन्यासंघांतील शिक्षण, त्याच्या पथकाची रचना, नियम, पोशाख या संबंधानें पुढील अंकांत माहिती देण्याचा विचार आहे, व त्याच वेळीं ट्रेनिंग कॉलेजनें स्थापन केलेल्या पथकाचे बाबतींत जो अनुभव आला व त्याला ज्या अडचणी आल्या त्यांचेंही आम्ही वर्णन देऊं. आम्हीं या संस्थेला पौर्वात्य व भारतीय रूप देण्याचा कसा प्रयत्न केला आहे याची कल्पना येण्याकरितां कन्यासंघाच्या पथकानें कांहीं विशिष्ट प्रसंगीं करावयाच्या क्यांप फायर किंवा सायंकाळचा प्रदीप्त केलेला अग्नि या विधीचें वर्णन पुढें दिलेलें आहे,

या विधिचे वेळीं संघाची मुख्य अधिकारी स्त्री, पथकाची अधिकारी स्त्री व पथकाच्या विद्यार्थिनी हजर असतात. प्रथमतः विद्यार्थिनी एक वर्तुळ करितात, व पुढील प्रार्थना म्हणतात.

### अभंग.

( चाल–कोठें गुंतलासी योगीयाचे ध्यानीं। आनंद कीर्तनीं पंढरीच्या )

संध्याकाळ झाला सूर्य अस्ता गेला । काळ हा पातला विश्रांतीचा ।
मंद मंद वाहे सुगंधित वारा । आनंद मनाला देई भारी ।
शांत काळीं ऐशा विश्रांतीस घेऊं । आनंदानें ध्याऊं जगदीशा ।

दयेचा सागर दीनांचा आधार । कृपेला तो पार नाहीं तुझ्या ।
बालिका या प्रेमें देवा तुज ध्याती । भावें वंदिताती पाय तुझे ।

यानंतर संघाची अधिकारी स्त्री व पथकाची अधिकारी स्त्री या दोघी वर्तुळाचे मध्यभागीं अग्नि प्रदीप्त करितात. अग्नि प्रदीप्त झाल्यावर विद्यार्थिनी पुढील प्रार्थना म्हणतात.

श्लोक ( शालिनी )

अग्नी हा जो स्वर्ग सोडोनि आला,
द्याया सौख्या पातला या प्रजांला,
हे अग्ने, तूं आमुचें सौख्य धाम,
त्वत्साह्यानें पूर्ण तें होत काम ॥ १ ॥
जो निर्मी या अग्निला या रवीला,
कल्याणाला द्यावया मानवाला,
त्या ईशाला प्रेमभावें नमोनी,
मांगल्याचें चेतवूं स्थान अग्नी ॥ २ ॥

एका पथकाचे चार भाग केलेले असतात. त्या प्रत्येकावर एक एक मुख्य विद्यार्थीण असते, ही त्या भागाची मुख्य होय. पहिल्या विभागाची मुख्य विद्यार्थीण पुढें येते. मध्यभागीं पेटविलेल्या अग्नीनें आपल्याजवळील दिवा पेटविते, व तो पुढें धरून पुढें दिल्याप्रमाणें प्रतिज्ञा करिते.

या संघाच्या सर्व कन्यांनीं ईश्वराशीं एकनिष्ठेनें वागावें, राजनिष्ठ राहावें व स्वदेशाशींही एकनिष्ठेनें वागावें; याची स्मृति हा पेटविलेला अग्नि आम्हांस देवो. नंतर दुसऱ्या भागाची मुख्य विद्यार्थीण येते. तीही आपला दिवा मध्यभागीं पेटविलेल्या अग्नीनें पेटविते. मग तो समोर धरून पुढें दिल्यामाणें प्रतिज्ञा करिते.

या संघाच्या सर्व कन्यांनीं परोपकारार्थ आपलें आयुष्य घालविण्याचा निश्चय केला आहे, याची स्मृति हा पेटविलेला अग्नि देवो.

यानंतर तिसऱ्या भागाची विद्यार्थीण येते, व तीही आपला दिवा पेटवून पुढें दिल्याप्रमाणें प्रतिज्ञा करिते.

उदात्त ध्येय दृष्टीपुढें ठेवून आयुष्य घालविण्याचे जे १० नियम कन्यासंघानें केले आहेत ते या कन्यांनीं मनःपूर्वक पाळावयाची स्मृति हा अग्नि आम्हांला देवो!

याचप्रमाणें चौथ्या विभागाची विद्यार्थीण पुढील प्रतिज्ञा करते.

या संघांतील कन्यांनीं इतरांशीं, मग त्या या संघांतील कन्या असोत अगर नसोत, दयाळूपणानें वागावें व प्रेमानें वर्तावें; याची स्मृति हा अग्नि आम्हांस देवो.

नंतर या विद्यार्थिनी प्रदीप्त अग्नींत इंधन घालून तो जास्त प्रदीप्त करतात, नंतर संघांतील मुख्य अधिकारी पुढें येते; ती आपला दिवा पुढें धरते, व ती पुढील प्रतिज्ञा करिते. तिजबरोबरच बाकीच्या सर्व विद्यार्थिनी त्या प्रतिज्ञेचा उच्चार करितात.

'आम्ही ईश्वरासमक्ष असें वचन देतों कीं आम्ही या प्रतिज्ञा पाळूं.'

नंतर विभागाच्या मुख्य विद्यार्थिनी एकदम म्हणतात, 'कन्यांनो, आपल्या नियमांना मान द्या, त्यांजवर प्रेम ठेवा. त्यांच्या आदेशाप्रमाणें वागा.'

नंतर या विद्यार्थिनी आपल्या जागेवर जातात; व नंतर पुढील श्लोक म्हणतात—–

श्लोक ( मालिनी )

हृदयिं विमल राहो सत्य निष्ठा सदा ती,
सतत अमल चित्तीं देशप्रीती वसो ती,
अढळ सतत राहूं एकनिष्ठ प्रभूला,
तशिच हृदयिं निष्ठा ठेवुं ती मानवाला ॥ १ ॥

सदय हृदय आम्हीं सर्व भूतीं असावें,
मुदित मन करोनी साह्य सर्वां करावें,
अढळ सतत राहूं एकनिष्ठ प्रभूला,
तशिच हृदयिं निष्ठा ठेवुं ती मानवाला ॥ २ ॥

व्यय मितहि करावा दूर दृष्टी असावी,
मन तनु कृति सारी आमुची शुद्ध व्हावी,
अढळ सतत राहूं एकनिष्ठ प्रभूला,
तशिच हृदयिं निष्ठा ठेवुं ती मानवाला ॥ ३ ॥

मन गुरुजनआज्ञापालनीं दक्ष राहो,
मुदित बहुत देवा चित्त हें नित्य राहो,

अढळ सतत राहूं एकनिष्ठ प्रभूला,
ताशिच हृदयें निष्ठा ठेवुं ती मानवाला ॥ ४ ॥

यानंतर पहिल्या विभागांतील दोन मुली येऊन पुढील पद्य म्हणतात—

पद.

निःस्वार्थाची देवी मजला स्वार्थत्यागिनी मज म्हणती,
परोपकारीं सदा झटें मी लोकहितीं मज बहु प्रीती,
भोगी जग हें दुःख आपदा स्वार्थापायीं तळमळतें,
स्वार्थिपणाला सोडूं टाकूं अग्नीमाजीं झणि त्यातें ॥

त्यानंतर या दोन मुली अग्नीमध्यें ओंजळभर इंधन टाकतात, व आपल्या जागेवर जातात. नंतर दुसऱ्या विभागांतील दोन मुली पुढें येतात, व पुढील पद म्हणतात—

विनयाची मी देवी मजला विनयवती या जनिं म्हणती,
विनय, नम्रता, प्रियवाक्पटुता मजला बहु हीं आवडती,
औद्धत्यानें अहंपणानें जग सारें हें बहु पिडिलें,
औद्धत्याला अहंपणाला टाकूं अग्नीमाजि बरें ॥

असें म्हणून या विद्यार्थिनी अग्नीमध्यें इंधन टाकून परत जातात. नंतर तिसऱ्या विभागांतील दोन विद्यार्थिनी पुढील पद्य म्हणतात—

आरोग्याची देवी मजला म्हणति स्वच्छता या जगतीं,
आज्ञा पाळिती जन जे माझे सुख तें सारें सेवीती
घाण अमंगळपणा जनांला पीडा देउनि बहु छळतो
भगिनींनो या दग्ध करूं गे मानवतेचा रिपु बहु तो ॥

पूर्वीच्या विद्यार्थिनींप्रमाणें कृति करून या विद्यार्थिनी जागेवर बसतात. नंतर शेवटल्या विभागांतील विद्यार्थिनी येतात व त्या पुढील पद्य म्हणतात—

सत्य देवि मज जनिं म्हणती या सत्यासाठीं मी झटतें
सत्यानें जग तरतें सत्याचि ईशाला बहु आवडतें,
असत्य राक्षस प्रबळ भयंकर नाश करी या जगताचा
असत्य फेकूं अग्नीमध्यें लोप होउं तो झणि त्याचा ॥

यानंतर शेवटची प्रार्थना सर्व विद्यार्थिनी करितात, व हा लहानसा विधि आटोपतो.

श्लोक ( शालिनी )

गेला आतां सूर्य अस्ताचलाला ।
विश्रांतीचा काल हा प्राप्त झाला ।
वंदोनीयां श्रीहरीच्या पदातें ।
चिंता सोडूं सेवुं निद्रासुखातें ॥ १ ॥
व्योमीं तारा शांत त्या डोलताती ।
गाती ध्याती त्या जणू ईश-कीर्ती ।
शांती आतां नांदते सर्व ठायीं ।
विश्रांतीची वेळ ही सौख्यदायी ॥ २ ॥

---

# दहींभाताचें झाड.

एक होता राजा. त्याला कमल या नांवाची एकुलती एक मुलगी होती. ती गोरी गोरी पान होती. तिचे केस काळेभोर, लांब व सडक होते. कपाळ मोठें व रुंद होतें. डोळे हरिणासारखे चपळ होते. नाक लांब व सरळ होतें. ओठ लालबुंद होते. ती रूपानें फारच देखणी होती. तशीच ती शहाणी होती. तिचा स्वभाव फार गोड होता. ती सर्वांवर प्रेम करीत असे. त्यामुळें सर्वांनाही ती भारी आवडत असे; बापाला तर कमल घटकाभर जवळ नसली तर हुरहुर वाटत असे. इतकी ती त्याची लाडकी होती. त्याचा तिच्यावर जीव कीं प्राण असे. कमल दररोज दहीं-भात जेवीत असे, व जेवल्यावर नेमानें ती बागेंत ठरलेल्या जागीं आंचवीत असे. ती केव्हांही दहींभात जेवो., ती बागेंत जाऊन आपलें तोंड व हात त्या एकाच जागीं धूत असे. असा तिचा नियम कित्येक दिवस चालला. कांहीं दिवसांनीं ती ज्या ठिकाणीं आंचवीत असे तेथें एक झाड उगवलें. तें झाड पाहून कमलला मोठी गंमत वाटली. तिनें त्याच्याभोंवतीं एक आळें केलें व कोणीं त्या झाडाला हात लावूं नये अशी सर्वांना ताकीद दिली. कमल दररोज त्या झाडाची व्यवस्था पाहात असे. पुढें कांहीं दिवसांनीं तें झाड मोठें व उंच झालें. त्याला डेरेदार पालवी आली, तें फार सुंदर दिसूं लागलें, नंतर पुढें थोड्या दिवसांनीं त्याला फळें आलीं. फळें नारिंगासारखीं वाटोळीं होतीं, पण त्याची साल मात्र दुधासारखी पांढरी व टणक होती. तीं फळें पाहून कमलला मोठा आनंद झाला. फळें पिकल्यावर एके दिवशीं एक फळ कमलनें तोडलें, व खाण्याकरितां चाकूनें

त्याच्या दोन फाका केल्या.तों काय गंमत! एका फाकेंत दहीं तर दुसऱ्या फाकेंत भात! ती गंमत पाहून कमलला मोठें नवल वाटलें.

कमल आतां मोठी झाली होती. तिचें लग्न करावें असें बापानें ठरविलें, परंतु ती कोणाला द्यावी असा त्याला विचार पडला. विचार करतां करतां त्याला एक युक्ति सुचली. आपल्या कमलच्या झाडाचें जो नांव सांगेल त्याला कमल द्यावी, असें त्यानें ठरविलें व झाडाचें नांव जो सांगेल त्याला माझी मुलगी माळ घालील असें त्यानें चोहोंकडे प्रसिद्ध केलें. स्वयंवराकरितां एक दिवस नेमला. बागेंत त्या दहींभाताच्या झाडाभोंवतीं एक सुंदर मंडप घातला. मंडपांत रेशमाचे सुंदर गालिचे पसरले. निरनिराळ्या देशच्या राजपुत्रांना बसण्याकरितां सिंहासनें ठेवलीं. मोठमोठ्या लोकांना बसण्याकरितां कोचें मांडलीं होतीं. तसेंच स्त्रियांना बसण्याकरितांही सुंदर व्यवस्था केली होती. मंडपाचे बाहेर कारंज्यांतून पाण्याचे बारीक फवारे उडत होते. चालतांना पायाला मळ लागूं नये म्हणून बागेंतील रस्त्यावर रुजामा अंथरला होता. शहरांतील रस्त्यांवर पाणी शिंपडलें होतें. ठिकठिकाणीं कमानी उभारल्या होत्या. मंडपाचे बाहेर मंजूळ गायन चाललें होतें, याप्रमाणें जिकडे तिकडे थाटमाट झाला होता. स्वयंवराचे वेळीं शेंकडों राजपुत्र तेथें आले, तसेच इतर लोकही आले. सर्व मंडळी आपआपल्या जागीं बसली. झाडाच्यां भोंवतालीं चोहोंबाजूंनीं मंडप घातलेला होता, तेव्हां प्रत्येकाला झाड आपल्या समोर मंडपाच्या मध्यभागीं दिसत होतें.

स्वयंवराची वेळ आली. नंतर कमल हत्तीवरून खालीं उतरली, व हतांत फुलांची माळ घेऊन उभी राहिली. तिचे वडील तिच्याजवळ उभे राहिले, व सर्वांना म्हणाले, "ऐका, सर्व लोक हो, ऐका. आपणां सर्वांचें समोर व या मंडपाचे मध्यभागीं जें झाड आहे, त्याचें नांव जो पुरुष सांगेल त्याला ही माझी मुलगी मी देईन, अशी माझी प्रतिज्ञा आहे हें तुम्हां सर्वांना माहितच आहे, तरी आतां विलंब न करितां क्रमानें नांव सांगण्याची सुरुवात करा;" पुढें सर्व लोकांनीं त्या झाडाचें नांव सांगण्याचा प्रयत्न केला. पण एकालाही तें झाड ओळखतां आलें नाहीं. कोणी म्हणतो आंबा, तर कोणी म्हणतो फणस; कोणी म्हणतो बेल, तर कोणी म्हणतो सफरचंद, कोणी म्हणतो कवठ तर कोणी म्हणतो पपनसच, अशी मोठी मौज उडाली. शेवटीं सगळे हरले. नांव कांहीं कोणाला सांगतां आलें नाहीं. नांवच सांगतां आलें नाहीं तर कमल माळ कशी घालणार! बिचारे सारे हिरमुष्टी झाले व आपापल्या गांवीं गेले.

समारंभाचे दुसरे दिवशीं धोंडू व पांडू या नांवाचे राजवाड्यांतील दोन नोकर गांवाबाहेर नदीवर कपडे धुण्याकरितां गेले. कपडे धूत असतांना धोंडू म्हणतो ' कायरे पांडू, काल मोठी गंमत झाली. नाहीं का ? शेंकडों राजे जमले होते, पण एका खुळ्याला सुद्धां तें दहींभाताचें झाड ओळखतां आलें नाहीं. तसें पांडू म्हणतो,' खरेंच कीं, हे स्वतांला मोठे शहाणे समजतात, पण एका शहाण्याला सुद्धां हें दहींभाताचें झाड आहे असें कांहीं सांगतां आलें नाहीं. नांव किती सोपें ! दहींभाताचें झाड ! लहान पोरानेंसुद्धां सांगितलें असतें ! सगळा खुळ्यांचाच बाजार ! त्या नदीच्या जवळच एक फकीर राहात होता. तो दररोज भीक मागून पोट भरीत असे. तो मोठा वस्ताद होता. धोंडू व पांडू बोलत असतांना तो फकीर जवळच होता. त्यानें त्यांचें सगळें बोलणें ऐकलें, व दहींभाताचें झाड हें नांवही त्या फकिरास कळलें. लागलीच तो नेहमींप्रमाणें भीक मागत मागत राजवाड्यांत आला, व राजासमोर येऊन म्हणाला, ' सरकार, आपला काय पण आहे ? तें ऐकून राजानें आपला पण त्यास सांगितला. त्यावर फकीर म्हणतो, ' सरकार, मला झाड दाखवा. मी त्याचें नांव सांगतों.' तेव्हां राजाला हसूंच आलें. फकीर तो काय व झाडाचें नांव तें तो काय सांगणार असेंच राजाला वाटलें. नंतर राजानें त्याला तें झाड दाखविलें. तें पाहातांच ' अं: यांत काय मोठें ! सरकार, हें दहींभाताचें झाड ! फकिराचे ते शब्द ऐकतांच राजा मनांत दचकला. नांव तर या फकिरानें सांगितलें. आतां आपण कबूल केल्याप्रमाणें याला कमल दिली पाहिजे. अरेरे ! माझी कमल किती नाजूक व सुंदर ! व हा फकीर तर म्हातारा व भिकारी ! आतां याला काय करावें ! वचन मोडावें तर लोक नांवें ठेवणार ! राजा याप्रमाणें विचार करीत आहे तोंच फकीर त्यास म्हणाला 'सरकार, आतां विचार कसला करतां ! आपल्या मुलीचें माझ्याशीं लग्न लावून द्या. राजा बिचारा गप्प बसला व थोड्या वेळानें म्हणाला, " बरें आहे. उद्यां तुमचें माझ्या कमलशीं लग्न लावून देतों. " तें ऐकल्यावर फकीर तेथून निघून गेला. पुढें ती बातमी कमलला कळली. ती ऐकल्यावर तिला फार वाईट वाटलें. इतकेंच नव्हे तर रडूंच आलें. फकिराची मी बायको होणार ? छे ! छे ! प्राण गेला तरी चालेल पण तें मला सहन होणार नाहीं. बाबांनीं तर त्याला लग्नाकरितां उद्यांच बोलावलें आहे. तेव्हां आतां काय करावें ! असा ती थोडा वेळ विचार करीत बसली, व शेवटीं काय करावयाचें तें तिनें ठरविलें.

रात्रीं बारा वाजले. ती रात्र अंधारी होती. राजवाड्यांत जिकडे तिकडे केला

गाढ झोपेंत होते. पहारेकरी सुद्धां गुंगले होते.अशा वेळीं सर्वांचा डोळा चुकवून कमल राजवाड्याचे बाहेर पडली ! चोहोंकडे दाट काळोख पडलेला ! चिन् चिन् चिन् चिन् असा आवाज ऐकूं येत होता. कमल चटकन शहराचे बाहेर पडली, व तिनें तडक अरण्याचा रस्ता धरला ! अंधारांत रस्ता दिसेना ! पायांत जोडा नाहीं, त्यामुळें चालून चालून तिचे पाय हुळहुळे झाले ! शिवाय वरचेवर कांटे टोचत होते ! अंधारांत पायाखालचा दगड सुद्धां दिसेना ! यामुळें वरचे-वर बिचारीला ठेंचा लागत ! जवळपास कोल्ह्या कुत्र्यांच्या व लांडग्यांच्या आरोळ्या ऐकूं येत होत्या ! शिवाय झाडांच्या पानांतून वारा सूं सूं वाहूं लागला कीं, कोणी तरी शीळ घातल्यासारखें ऐकूं येई, व त्यामुळें ती केव्हां केव्हां भीतीनें मट-कन खालीं बसे ! अशा रीतीनें चालतां चालतां ती एका मोठ्या वडाच्या झाडाखालीं आली, तें झाड फार मोठें असून त्याला दाट पालवी होती, त्यामुळें खालीं खूपच अंधार पडला होता. तेथें वाळलेल्या पानांचा पाचोळा पुष्कळ असल्यामुळें त्यांत पाय पडल्याबरोबर सळ सळ सळ सळ असा आवाज ऐकूं येई, व त्यामुळें प्रत्येक पाऊल टाकतांना सापाची भीति वाटे ! इतक्यांत पलीकडच्या. झाडावर बसलेल्या घुबडाचा घुघूघू, घुघूघू असा विचित्र आवाज तिच्या कानावर पडला ! असा आवाज तिनें पूर्वीं कधीं ऐकला नव्हता. त्यामुळें ती थरथर कांपावयास लागली व म्हणाली, ‘ देवा, आतां मी काय करूं ! मला कांहीं सुचत नाहीं ! झाडा, झाडा, तूं केवढा तरी आहेस ! मला गरिबाला आधार दे ! नाहींतर मी आतां मरतें ! ’ हे तिचे शब्द ऐकतांच झाड म्हणालें, ‘ कमल, कमल, भिऊं नकोस. मी तुला माझे पोटांत आधार देतों. हें पाहा, एका क्षणांत माझें खोड कलदिशीं उकलेल व त्याचे दोन उभे भाग होतील. खोड उकलल्यावर प्रकाश पडेल. माझ्या पोटांत पुष्कळ जागा आहे ! तेथें तूं जाऊन बैस. तुझ्या केसाला धक्का लागणार नाहीं. तूं कांहीं काळजी करूं नकोस ’ इतकें म्हणून त्या झाडाचें खोड कलदिशीं उकललें, व त्याचे दोन सारखे भाग झाले ! खोड उकलतांच लख्ख प्रकाश पडला ! कमल पाहाते तो आंत पुष्कळ जागा आहे. कमलनें आंत चटकन उडी मारली व झाडाचें खोड पटकन पहिल्यासारखें झालें. कमल सुखरूप आंत बसली.

त्या अरण्यापासून वीस पंचवीस कोसांवर एक शहर होतें. तेथें दुसरा एक राजा राज्य करीत होता. तो राजा तरुण व रूपानें फारच सुंदर होता. तसेंच त्याचा स्वभावही मोठा गोड होता. त्याला एक

नवा राजवाडा बांधावयाचा होता, त्याकरितां पुष्कळ लाकडें हवीं होतीं म्हणून जवळच्या अरण्यांतून लाकडें तोडून आणण्याकरितां त्यानें आपल्या लोकांना हुकूम केला. तेव्हां ते लोक त्या अरण्यांत आले व मोठमोठीं झाडें तोडावीं असें त्यानीं ठरविलें. प्रथम त्यांनीं एक फारच मोठें झाड पसंत केलें व तें तोडावयास सुरुवात केली. कुऱ्हाडीचे एक दोन घाव घातले नाहीं तोंच 'तोडारे तोडा, पण हळूच तोडा' असा त्या झाडांतून आवाज त्यांचे कानावर आला. तो आवाज ऐकतांच तोडणारे एकदम दचकले व थांबले! हा आवाज कुठला? तो कोणाचा असेल? एथें भूतबीत तर नाहीं! कीं तो वनदेवतेचा आवाज असेल? असा त्यांनीं पुष्कळ विचार केला, पण कांहीं समजेना. पुन्हा त्यांनीं झाडावर कुऱ्हाड मारली तों 'तोडारे तोडा, पण हळूच तोडा' असा तो पहिला आवाज पुन्हा कानावर आला. तेव्हां त्यांनीं आपलें काम थांबविलें, ते सर्व राजाकडे आले व त्यास सर्व हकीकत त्यांनीं सांगितली. राजालाही मोठें नवल वाटलें! व ही काय गंमत आहे, हें पाहाण्याकरितां त्यानें प्रधानाला त्या लोकांबरोबर त्या अरण्यांत पाठविलें. नंतर प्रधान त्या झाडाजवळ उभा राहिला. लोक तोडावयास लागले तों 'तोडारे तोडा पण हळूच तोडा' असे तेच पूर्वीचे शब्द सर्वांच्या कानावर पडले. ते ऐकून प्रधानही चकित झाला. पुन्हा त्यांनीं काम थांबविलें, ते राजाकडे आले व त्याला प्रधानानें सर्व हकिगत सांगितली. आतां मात्र स्वतांच तेथें जावयाचें असें राजानें ठरविलें. राजा, प्रधान, सरदार व इतर लोक अरण्यांत त्या झाडाजवळ आले. राजा झाडाजवळ उभा राहिला व तोडा म्हणून त्यानें हुकूम केला. कुऱ्हाडीचा घांव पडतांच 'तोडारे तोडा, पण हळूच तोडा' असे शब्द सर्वांना ऐकूं आले. राजा खूपच चकित झाला! व बराच विचार करून तो म्हणाला, 'जें कोणी आंत असेल त्यानें बाहेर यावें' ते शब्द ऐकतांच झाड कलादिशीं उकललें व झाडाचे दोन उभे सारखे भाग झाले ते भाग होतांच एक सुंदर मुलगी त्या झाडांतून बाहेर आली व राजासमोर उभी राहिली. तिचें रूप पाहून सर्व मंडळी थक्क झाली! राजा तर भांबावूनच गेला! तो त्या मुलीला म्हणाला, 'आपण कोण? गंधर्वकन्या कीं स्वर्गांतील अप्सरा कीं वनदेवता? कोण आहांत तें कृपा करून सांगा. नंतर कमलनें आपली सर्व हकीकत राजाला सांगितली. नंतर तो राजा कमलला घेऊन आपल्या शहरास गेला, व थोड्याच दिवसांत त्यानें तिच्याशीं लग्न केलें. शेवटीं आमची कमल मोठ्या राजाची पट्टराणी झाली. मग त्या राजाराणीनें आपले दिवस मोठ्या आनंदांत घालविले.

# मुलांकरितां कविता.

——:०:——

## वायूनें धडा शिकविला!

पद्य ( चाल साधी. )

राव एकले पहा चालले हिंडायाला ऐटींत
हातीं काठी सुंदर घेउनि गरगर तिजला फिरवीत
अधिकाराचा संपत्तीचा गर्व बहू तो रावाला,
श्रेष्ठ मीच तो गमे तयाला तुच्छ मानिती इतरांला
मार्गावरतीं जन विनयानें रामराम ते त्या करिती
राव देत ना लक्ष मुळीं ते तसेंच पुढती जाताती
उद्धट ऐसें वर्तन पाहुनि वायू देई भिरकवुनी
रावांची ती पगडी सुंदर राव धावती मागोनी
धावत असतां ठेंच लागुनी राव आडवे ते पडती
नमस्कार ते जनांस साऱ्या, करुनी विनया दावीती
सभ्यपणाची विनयाची ती रीत शिकवुनी रावाला
वायू गेला हासत हासत दूर आपुल्या कामाला

* * *

(२)

सूर्य किती हा वरतीं आला शाळा भरली सर्वांच ती
आळशि बाबूराव उठोनी डोळे चोळित ते निघती
टोपी मळकी पिशवी तुटकी बुकें फाटकीं घेउनियां
कागद कोंबुनि आंत निघाले लगबग शाळा गांठाया
त्रेधा झाली बहु जीवाची उशीर झाला किती तरी
गुरुजी आतां शिक्षा करतिल म्हणुनी भ्याली बहु स्वारी
उनाड ऐसा मुलगा पाहुनि वायू थांबे तिथें जरा

खोड मुलांची पुरी ? लवूं निश्चय त्यानें मग केला
वायू वाहे जोरानें तों पिशवी तुटुनी खालिं पडे
कागद् पळती बुकें धावती पानें उडती चहूंकडे
मुलें भोंवतीं जमुनि हासती गंमत म्हणती कशी अहा
बाबुरावची स्वारि चालली शाळेला हा थाट पहा!
आळस अपुला नसे चांगला सोडून देइन तो सारा
निश्चय ऐसा करी बाळ तो धडा चांगला मनिं शिकला
उद्योगाची नीटपणाची रीत शिकवुनी बाळाला
वायू गेला हासत हासत दूर आपुल्या कामाला

* * *

( ३ )

लाह्या ताज्या भाजुनि भरुनी पाटि घेउनी डोइवरी
विकण्यालागीं गणबा निघती माप घेउनी बाजारीं
गरिब बिचारा बाळ एकला रोड भुकेला दमलेला
वाटेवरतीं उभा राहिला हळूच विनवी गणबाला
'भूक लागली भारी दादा, थोडें द्या हो मज खाया
जीव होतसे बहू घाबरा' बाळ लागला रडावया
भिकार कुठलें दुष्ट कारटें लाज मुळीं ना मागाया
बापानें का तुझ्या ठेविलें वाढुनि एथें तुज खाया
बोलुनि ऐसें रागानें बहु गणबा जाती ते निघुनी
निष्ठुरता ती पाहुनि त्याची रागावे बहु वायु मनीं
जोरानें तो वाहूं लागे उडती लाह्या चहूंकडे.
भर भर भर भर उडती साऱ्या पाउस त्यांचा जणू पडे!
गरिबावरती दया करावी धडा शिकवुनी गणबाला
हासत हासत वायू गेला दूर आपुल्या कामाला

# फ्रान्समधील हिंदी वीरांचें स्मारक.

गेल्या महायुद्धांत हिंदी लोकांनीं अनेक रणांगणांवर जाऊन आपले पराक्रम दाखविले. पुष्कळ हिंदी वीरांनीं आपले देह धारातीर्थी ठेविले. अशांचीं निरनिराळीं स्मारकें हिंदुस्तानांत झालेलीं आहेत. खुद्द पुण्यास शनवार वाड्यासमोरील स्मारकाचा दगड प्रिन्स ऑफ वेल्स ह्यांचे हस्तें बसविण्यांत आला. शिवाय सासून हास्पिटल जवळचे चौकांत एक स्मारक झालेलें आहे. अखिल हिंदुस्तानचें म्हणून दिल्लीला स्मारक झालेलें आहेच. तरी पण फ्रान्समध्यें झालेलें स्मारक अनेक दृष्टींनीं महत्त्वाचें आहे. नोव्हाचापेल येथें चालू महिन्याच्या ७ व्या तारखेस सध्यांचे भारतमंत्री लार्ड बर्कनहेड ह्यांचे हस्तें या स्मारकाचा अनावरण समारंभ झाला. त्यावेळीं मार्शल फॉक, कपुरथळ्याचे महाराज, सर चार्लस अंडरसन वगैरे बडी मंडळी हजर होती. ज्यांच्या प्रेताचा पत्ता लागला नाहीं अशा ४८४७ सैनिकांचीं नांवें स्मारकाच्या सभोंवतालच्या भिंतीवर कोरलेलीं आहेत. स्मारक वर्तुळाकृति असून त्याच्या मध्यभागीं तृणाच्छादित भूमीवर स्मारकाचा दगड उभा आहे. त्याच्यापुढें ५० फूट उंचीचा दगडी स्तंभ असून त्यावर कमलाकृति मुकुट आहे. पायथ्याशीं दोन वाघ बसविले असून सभोंवार जाड भिंत घातलेली आहे. आरंभीं सर चार्लस अंडरसन ह्यांनीं प्रास्ताविक भाषण केलें; त्यांचे मागून मार्शल फॉक, कपुरथळ्याचे महाराज ह्यांनींही भाषणें केलीं. शेवटीं लार्ड बर्कनहेड ह्यांनीं भाषण करून स्मारकाचें अनावरण केलें. " १९१४ आणि १९१८ च्या दरम्यान फ्रान्स व बेल्जमच्या रणभूमीवर लढतांना मरण पावलेल्या हिंदी सैनिकांच्या चिरकाल स्मरणार्थ हें स्मारक उभारण्यांत आलें आहे." हें वाक्य स्मारकावर कोरण्यांत आलें आहे.

ह्या प्रसंगीं त्या स्मारकावर पुष्कळ पुष्पमाला अर्पण करण्यांत आल्या. आपले बादशाहा पांचवे जार्ज ह्यांनीं पुष्पमाला पाठविली होती. तसेंच लार्ड हार्डिंज ह्यांनीं हिंदुस्तानतर्फें हार घातला. इतर वसाहतींकडूनही हार अर्पण करण्यांत आले.

लार्ड बर्कनहेड ह्यांनीं आपल्या भाषणांमध्यें हिंदी सैनिकांनीं कमालीचा सहनशीलपणा दाखविल्याबद्दल तीन महत्त्वाचीं प्रमाणें दिलीं. हे शिपाई आपल्या मायभूमीपासून हजारों मैल लांबीवर अगदीं विचित्र व पूर्णपणें अपरिचित अशा ठिकाणीं लढले. हिंदुस्तानांतील कडक उन्हाळ्याइतकीच इकडे कडक थंडी असतांनाही त्यांनीं तो त्रास सहन केला व आपली स्फूर्ति कायम ठेविली. तसेंच त्यांना युरोपिअन शिपायांपेक्षां त्या लढाईचें ज्ञान वस्तुतः कमी होतें. इतकें सांगून अखेरीस ते म्हणाले, "त्यांनीं एक कर्तव्य पतकरिलें व तें तत्परतेनें बजावलें; ह्याहून अधिक सांगतां येत नाहीं व सांगण्याची जरूरीही नाहीं.

———

# बोस यांची संशोधनप्रयोगशाला.

प्रो. जगदीशचंद्र बोस यांचें नांव ठाऊक नाहीं असा हिंदुस्तानांतच काय पण पृथ्वीवरही सुशिक्षित माणूस सांपडणार नाहीं. जगांत चाललेल्या संशोधन-कार्यांपैकीं यांनीं वनस्पतिवर्गाचें संशोधनकार्य हातीं घेतलें असून त्यांत त्यांनीं जगाच्या फार पुढें आघाडी मारिली आहे. यांनीं केलेल्या कार्यासंबंधानें या मासिकांत पूर्वीं एकवार हकीकत दिलेली आहे. यांनीं या संशोधनकार्यास लागणारीं अत्यंत सूक्ष्म उपकरणें तयार करण्यासाठीं मोठाल्या उद्योगशाळा बांधिल्या असून त्यालगतच प्रयोगशाळाही आहेत. कलकत्त्याजवळील या प्रयोगशाळांशिवाय गंगेवर **सिजबेरा** या ठिकाणीं व **ग्लेंडेन** ( दार्जिलिंग ) येथेंही अशाच प्रकारच्या प्रयोगशाळा आहेत. या प्रयोगशाळांत हिंदुस्तानांतील अनेक विद्यार्थी मालकाप्रमाणेंच पोटापुरतें वेतन घेऊन काम करीत असून बाहेर देशांतील या कार्याबद्दल औत्सुक्य दाखविणाऱ्या लोकांनीं येथें येऊन काम करावें अशी प्रोफेसर साहेबांची इच्छा आहे. या इमारतींचें अंतरंग व बाह्यांग हीं दोन्ही हिंदी संस्कृतीची साक्ष देतात. प्रो. बोस यांनीं ' एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ' हें आपलें ध्येयवाक्य ठरविलें असून त्यांच्या मतें वरील वेदान्ताच्या सिद्धान्ताप्रमाणें जडाजड वस्तुमात्रामध्यें ईश्वरी तत्त्व ओतप्रोत भरलेलें असून त्यांची स्वयंक्रिया जाणण्यास लागणारी यंत्रसामुग्री मनुष्याजवळ आज तयार नाहीं, हें होय. आज वनस्पतिशास्त्रांत त्यांनीं लावलेल्या शोधांनीं जगांतील सर्व शास्त्रज्ञांना अगदीं थक करून सोडलें आहे. हे शोध लावण्यास लागणारी यंत्रसामुग्री त्यांनीं स्वतः आपल्या प्रयोगशाळेच्या उद्योगमंदिरांत तयार करविली असून त्या सूक्ष्मदर्शक यंत्रांच्या साह्यानें मूळ पदार्थाचें १ कोटी ते ५ कोटीपर्यंत मोठें स्वरूप डोळ्यांनीं पाहातां येतें. त्यामुळें वनस्पतींच्या शरिरांत चालणाऱ्या अनेक घडामोडींचे आलेख त्यांना तयार करितां आले असून त्यासंबंधानें त्यांनीं नुकतेंच एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. Plant autographs and their revalations. हें त्या पुस्तकाचें नांव आहे.

वनस्पति सजीव आहेत ही गोष्ट त्यांच्या वाढीवरून आपल्या लक्षांत येऊं शकेल; पण त्यांना आपल्याप्रमाणेंच मनोविकार आहेत, त्यांच्या अंतर्भागांत आपल्या रुधिराभिसरणाप्रमाणें कार्य चालू असतें, वनस्पतींवर मनुष्याप्रमाणेंच विषाचें

कार्य होतें, वनस्पतींना मनुष्याप्रमाणें गुंगी आणतां येते, त्यांना मनुष्याप्रमाणें काळीज असून त्यांचें अस्तित्व आलेखद्वारां दाखवितां येतें वगैरे गोष्टी त्यांच्या शोधाचें स्वरूप दाखविण्यास मदत करतील. या शोधांनीं मानसशास्त्र, कृषिशास्त्र, प्राणिविज्ञान व शारीरशास्त्र यांस फार मदत होणार असून त्यांच्या क्षेत्रांतही बरेच नवीन नवीन शोध लागण्याचा संभव आहे.

अलीकडे डॉक्टर बोस यांनीं अत्यंत उपयुक्त असा वनस्पतिसंबंधीं नवीनच शोध लावण्याची दिशा स्वीकारली आहे. ही दिशा म्हटली म्हणजे 'त्यांचे औषधिगुणधर्म काय आहेत हें शोधून काढणें' या प्रयत्नानें आपल्या देशांतील वनस्पतींचें संशोधन होऊन आर्यवैद्यकास नवीनच चालना मिळणार आहे व जुन्या ग्रंथांत वर्णिलेले गुणधर्म पुन्हा परीक्षण कसोटीस लागून त्या शास्त्रावरील बराचसा धुरोळा झाडला जाणार आहे. या त्यांच्या प्रयत्नास यश आल्यास जुन्या आर्यवैद्यकाचा उद्धार होऊन त्यापासून सर्व प्राणिमात्राचें हित होण्याचा संभव आहे.

युरोप, अमेरिका वगैरे पाश्चात्य देशांत जाऊन प्रो. बोस यांनीं तेथील शास्त्रज्ञांपुढें आपले प्रयोग दाखविले, व त्यांच्या तोंडून धन्योद्गार मिळविले. हिंदी लोक कल्पक आहेत याबद्दल प्रो. बोस यांनीं आपल्या शोधांनीं जगाची खात्री पटविली आहे, व त्यामुळें यांच्या हिंदुस्तानांतील कार्याकडे जगांतील शास्त्रज्ञांचें लक्ष वेधून राहिलें आहे. लोकार्नो येथें भरलेल्या अखिल जगशिक्षणपरिषदेंत त्यांनीं आपणांस या कार्यास जन्मभर वाहून घेतलें असल्याबद्दलचा उल्लेख केला.

प्रो. जगदीशचंद्र बोस यांनीं स्थापिलेल्या संस्थेला ब्रिटिश सरकारनें भरपूर मदत द्यावी यासंबंधानें युरोपियन शास्त्रज्ञांनीं गव्हर्नर जनरल यांजकडे लेखी विनंती अर्ज पाठविले होते. त्यांचा विचार होऊन या संस्थेस हल्लीं सरकारकडून दरसाल १ लाख रुपये मदत मिळते, पण हें काम भारी खर्चाचें असल्यामुळें यापेक्षां जास्त मदत मिळणें जरूर आहे, असें बहुतेकांचें मत आहे. पाहावें काय होतें तें.

# ब्रिटिश वसाहतींची स्थापना.

तुर्क लोकांचा चांद कान्स्टँटिनोपल शहरावर चमकूं लागल्यानें पूर्वेकडील देशांबरोबर चालणारा व्यापार त्यांचें हातीं आला व त्यामुळें त्यांजबरोबर लढाई करणें हा एक व पर्यटनें करून नवीन मार्ग शोधून काढणें हा दुसरा असे दोन मार्ग युरोपियन राष्ट्रांना मोकळे राहिले. पण त्यांतील पहिला त्यांना अशक्य वाटला; त्यामुळें त्यांनीं जारीनें दुसऱ्या मार्गाकडेच आपलें लक्ष वळविलें व त्या प्रयत्नांत त्यांना विजयश्रीनेंही माळ घातली.

या पर्यटनांत पोर्तुगाल व स्पेन या देशांनीं पुढाकार घेतला होता. आफ्रिकेंतील गुलाम व तेथील कच्चा माल युरोप खंडास पुरवून स्वतः श्रीमंत होणें हा त्यांचा उद्देश होता. पोर्तुगीजांनीं गुलामांच्या व्यापारांत अरबांचें अनुकरण केलें. १५ व्या व १६ व्या शतकांत जलपर्यटनांत स्पेन व पोर्तुगाल यांनीं अघाडी मारली. या वेळीं इंग्लंड हा देश अंतस्थ व्याधींनीं गांजून गेला असल्यामुळें त्याला आपल्या देशाबाहेरील चळवळीकडे फारसें लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. आपापसांतील युद्धें व धार्मिक बाबतींत उत्पन्न झालेले पक्ष या दोन व्याधि इंग्लंडच्या मागें लागल्या होत्या.

या दोन शतकांत पोर्तुगाल देशानें आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्याचा शोध लावून हिंदुस्तान देश गांठला व तेथें सर्व किनाऱ्यावर आपला अंमल बसविला. स्पेननें अमेरिकेचा बराचसा संपन्न असा भाग व्यापून टाकिला व तेथून सोन्याचांदीनें भरलेलीं जहाजें स्वदेशीं रवाना करून देशाला श्रीमंत करून सोडलें. कारण त्या वेळच्या अर्थशास्त्राच्या सिद्धांताप्रमाणें ज्या देशांत सोनेंनाणें जास्त तो देश श्रीमंत असें समजत असत. या तत्त्वाला अनुसरूनच इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीनें पूर्वेकडील देशांशीं व्यापार करतांना इंग्लंडच्या हद्दीच्या बाहेर अमुक एक ठराविक रकमेहून जास्त रक्कम पाठवूं नये, असा त्या वेळच्या प्रधान मंडळानें ठराव केल्याचें इतिहासज्ञांस माहीत आहेच. परंतु हळूहळू ही संपत्तीची खरी कल्पना नाहीं असें अर्थशास्त्रज्ञांचें मत बनत जाऊन ‘ अनिर्बंध व्यापारी तत्त्वाचा ’ उदय झाला. सोनेंनाणें या स्वरूपांतच फक्त संपत्ति वाढली तर त्या देशांतील लोकांचे आंगीं आळस शिरून तदनुषंगानें अनेक दुर्गुण तेथें वास करूं

लागतात व त्यामुळें जवळच्या एखाद्या चिमुकल्या पण उद्योगी व बुद्धिमान राष्ट्राचा त्यावर लवकरच पगडा बसतो.

प्रथमतः पोर्तुगीज व स्पॅनिश लोकांनींच नवीन देशांचा शोध लाविल्यामुळें दुसऱ्या युरोपियन राष्ट्रांनीं आपल्या भागांकडे वळूं नये व सर्व फायदा आपणांसच मिळावा असें त्यांस वाटणें स्वाभाविकच होतें. तेव्हां इतर राष्ट्रांना प्रतिबंध करण्याकरितां ख्रिस्तीधर्मगुरु जो पोप त्याजकडे त्यांनीं धांव घेतली. यावेळीं सर्व ख्रिस्तीराष्ट्रांत पोपच्या शब्दाला फार मान असे व तो म्हणेल ती पूर्व दिशा समजत. त्याचा हुकूम मोडण्याचें एखाद्या देशानें धारिष्ट केल्यास त्या देशावर इतर देशांकडून बहिष्कार घालून पोप त्यास *वठणीस आणीत असे. म्हणून त्यांनीं पोपमार्फत अटलांटिक महासागराच्या पश्चिमेकडील भाग पोर्तुगीजांस व पूर्वेकडील स्पेन देशाच्या ताब्यांत राहाण्याबद्दल व. इतर युरोपियन राष्ट्रांनीं त्या बाजूस बिलकूल न फिरण्याबद्दल फर्मान मिळविलें, व अटलांटिक महासागरावर या दोन राष्ट्रांशिवाय इतरांना फिरकण्याची बंदी केली.

इंग्लंड देशाला सोळाव्या शतकाच्या उत्तरभागांत थोडेसें अंतःस्वास्थ्य प्राप्त होऊं लागल्यावर इलिझाबेथ राणीच्या कारकीर्दींत इंग्लिश लोकांनीं या बाबतींत लक्ष घालण्यास सुरुवात केली. याचे पूर्वी त्यांनीं अटलांटिक महासागराच्या उत्तर भागानें वायव्य व ईशान्य मार्गांनीं पूर्वेकडे जाण्यास प्रयत्न केले होते. त्यांत त्यांना लॅब्रॅडोरचा किनारा व त्याजवळील मासे मारण्याचा धंदा एवढाच फायदा झाला. पण या दिशेनें केलेल्या प्रयत्नांत त्यांना पैशांच्या व माणसांच्या बाबतींत फारच नुकसान सोसावें लागलें. पण या दिशांनीं निराशा झाल्यामुळें व स्पेन व इंग्लंड या देशांत धार्मिक चुरस उत्पन्न होऊन भांडणास सुरुवात झाली. इंग्लिश खलाशांनीं स्पेनची जहाजें लुटून आणण्याचा तडाखा चालविल्यानें प्रकरण विकोपास गेलें. पुढें १५८८ च्या आरमारी विजयानें इंग्लंड देशाला अटलांटिक महासागराचा मार्ग कायमचा मोकळा झाला. यावेळीं संपादन केलेलें आरमारी वर्चस्व इंग्लंडनें आजतागाईत कायम ठेविलें असून ब्रिटिश साम्राज्यविस्ताराची तीच खरी गुरुकिल्ली आहे.

---

*१६ शतकापासून धर्मसुधारणेच्या काळाला सुरुवात झाल्यावर पोपचें महत्त्व अतिशय जोरानें कमी होत गेलें.

युरोपियन राष्ट्रांनीं हा मार्ग शोधून काढण्याचें मुख्य कारण पूर्वेकडील देशांशीं चालणारा व्यापार हें होय. मसाल्याच्या जिनसांसाठीं तुर्कस्तानच्या तोंडाकडे पाहावें लागूं नये हा त्यांचा मुख्य उद्देश. प्रथम या व्यापाराचा मक्ता पोर्तुगालकडे आला. त्याचा त्या देशानें एक शतकपर्यंत निर्वेधपणें उत्तम रीतीनें उपयोग करून घेतला. युरोपखंडांतील त्यांची सत्ता खालावल्यावर डच लोक या व्यापाराचे मालक बनले व इतर कोणांसही आपल्या भागांत फिरकूं न देण्याची त्यांनीं पूर्ण खबरदारी घेतली. आजतागाईत डच लोकच या मसाल्यांच्या बेटांचे मालक आहेत असें आपणांस दिसून येईल.

डच लोकांमागून इंग्लिश व फ्रेंच लोक इकडील व्यापार मिळविण्याची खटपट करूं लागले. पोर्तुगीजांचा मुख्य उद्देश व्यापार व नंतर धार्मिक प्रसार. डच लोकांचा मुख्य उद्देश व्यापार व त्याकरितां राजसत्ता. पण इंग्लिशांनीं प्रथम व्यापारी धोरण ठेवून हळूहळू राज्यविस्ताराचें धोरण स्वीकारलें. पूर्वींच्या युरोपियन राष्ट्रांच्या अनुभवाचा फायदा घेऊन धर्मप्रसार ही बाबत त्यांनीं अगदीं बाजूला ठेवली.

इ. सन १४९७ सालीं केबट यानें ×लॅब्रॅडोरचा किनारा शोधून काढल्यावर तेथील कच्चा माल विशेषत: केसाळ प्राण्यांचीं कातडीं आणून युरोपखंडांत विकण्यासाठीं त्यांनीं हडसनबे नांवाची एक कंपनी स्थापन केली. शिवाय किनाऱ्याजवळ सांपडणारे कॅाड वगैरे मासे पकडण्यासाठीं त्यांचे जहाजांचे काफिले रवाना होऊं लागले. या व्यापाराच्या व उद्योगाच्या निमित्तानें हळूहळू इंग्लिश लोक न्यू-फाउंडलंड वगैरे भागांत वसाहत करूं लागले. या निमित्तानें प्रथमत: या भागाकडे लोकांचा ओघ वाहूं लागला.

पुढें इलिझबेथ राणीच्या कारकीर्दींत रॅले नामक प्रसिद्ध मुत्सद्यानें व्हर्जीनिया येथें वसाहत स्थापन करण्याचा अनेकवार प्रयत्न केला, पण खाण्याची ददात व रेड इंडियन लोकांचे हल्ले यांमुळें ती वसाहत ह्या पद्धतीनें त्यांना कायमपणें टिक-वितां आली नाहीं.

यानंतर हळूहळू फ्रेंच लोक वसाहती करूं लागले व ते कदाचित हा प्रांत बळकावून बसतील व आपण मागें पडूं या चुरशीनें इंग्लिश लोक या भागांत वसाहत करण्यास जाऊं लागले. पण मुख्यत्वेंकरून देशांत टयूडर कारकीर्दींत

× उत्तर अमेरिकेंत कानडाच्या पूर्वेस हा भाग आहे.

( विशेषत: इलिझाबेथच्या कारकीर्दींत ) शांतता नांदू लागल्यानंतर लोकवस्ती झपाट्यानें वाढूं लागली.

या लोकवस्तीस कोठेंतरी देशाबाहेर जागा पाहिजे असें वाटूं लागलें. देशांतल्या देशांत राहून दारिद्र्यांत दिवस काढण्यापेक्षां परदेशांत जाऊन जास्त सुखांत कालक्रमणा करणें धाडसी लोकांनीं पसंत केलें. त्यामुळें अमेरिकेंतलि वसाहती सुरू झाल्या.शिवाय अमेरिकेंत.खंडोगणती सोनें सांपडतें असा एक सार्वत्रिक समज पसरल्यानें या धाडसी प्रवाशांना जास्तच उत्तेजन मिळालें. पण या लोकांच्या योगानें खऱ्या.व कायमच्या अशा फारशा वसाहती स्थापन झाल्या नाहींत.

फ्रेंचांशीं चुरस उत्पन्न झाल्यानें इंग्लिशांना काहीं भागांवर आपला ताबा प्रस्थापित करावा लागला असें वर सांगितलें. पण हे भाग ताब्यांत घेतल्यावर तेथें वसाहत करण्याची जबाबदारी उत्पन्न झाली. तेव्हां दक्षिणेकडील संपन्न भागांत सरकारनें लढाया व इतर आपत्तींनीं खालावलेल्या सरदारांना पूर्वस्थिति प्राप्त करून देण्याकरितां या भागांचा उपयोग केला. यावेळीं गुलामांचा व्यापार सर्रास सुरू असल्यामुळें या जमिनींची मेहनतमशागत करण्यास ते गलामांचा उपयोग करीत; व त्यांचे मदतीनें पुष्कळ पिकें काढीत. वसाहत होऊन देशांतील सरदारवर्गही संपन्न होऊं लागला. अशा रीतीनें एका दगडानें दोन पक्षी मारण्याचें श्रेय त्यांना मिळालें. पण पुढें गुलामांचा व्यापार बंद झाल्यावर या धनिक लोकांची फारच तारांबळ उडाली. तेव्हां देशांतील गोरगरीब लोकांना गुलामांच्या ऐवजीं शेतीचें काम करण्यास पाठविण्यांत आलें. त्यामुळें इंग्लंडांतलि वस्तीही बरीच पातळ झाली व त्यायोगानें देशाच्या पुढें नित्य उभा असलेला आर्थिक प्रश्न सहज सोडवितां आला.

गरीब लोकांप्रमाणेंच उत्तर–अमेरिकेच्या दक्षिणेकडील भागांत तेथील श्रीमंत शेतकरीवर्गाला मदत करण्यासाठीं सरकारनें फ्लॉरिडा वगैरे प्रांतांत कैदी पाठविण्यास सुरुवात केली. हे चांगले धष्टपुष्ट असल्यानें व यांजकडून सक्तीनें काम घेतां आल्यामुळें गुलामगिरी मोडल्यावर वसाहती वाढण्यास फार मदत झाली. हा क्रम सतत १७८३ सालापर्यंत अबाधितपणें कायम राहिला. पण या वर्षीं अमेरिकन वसाहतींनीं स्वातंत्र्य मिळविल्यावर या इंग्लिश कैद्यांना आपल्या देशांत पाठविण्याची त्यांनीं बंदी केली. यापूर्वी स्वदेशांत अपमानकारक स्थितींत आयुष्य घाल-

विण्यापेक्षां मुदत संपल्यावरसुद्धां ते कैदी या नवीन देशांतच आपखुषीनें राहाण्याचें पत्करीत असत. त्यामुळें वसाहतींची वस्ती वाढण्यास मदत होई. अमेरिकेनें कैदी येऊं देण्याचें बंद केल्यावर इंग्लंडनें ऑस्ट्रेलिया देशांत कैदी पाठविण्यास सुरुवात केली व तो देश या कैद्यांनींच राहाण्यालायक हळूहळू बनविला. या देशांत दरसाल कैदी पाठविण्याचें काम १७८३ ते १८२१ पर्यंत सतत सुरू होतें. अशारीतीनें इंग्लंडची ऑस्ट्रेलिया वसाहत कैद्यांनीं बनविली ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

जोंपर्यंत कच्चा माल आणून युरोपांत विकणें अगर अमेरिकेंत फावड्यांनें गोळा करण्याइतकें सोनें सांपडतें या गोष्टीवर विश्वास ठेवून लोक वसाहत करण्यास येत, तोंपर्यंत वसाहतींची व्हावी तशी वाढ झाली नाहीं. पण सोळाव्या शतकाचे मध्याचे सुमारास युरोपांत जी एक धर्मसुधारणेची चळवळ सुरू झाली त्या योगानें या वसाहतींचें दैव उघडलें.

युरोपखंडभर प्रस्थापित झालेल्या ख्रिस्तीधर्माचे आद्यगुरु पोपसाहेब यांची गादी इटली देशांत रोम शहरीं असे. सर्व युरोपियन राष्ट्रांना यांचा फार दरारा वाटत असून यांच्या हातीं धर्माचे बाबतींत ‘ कर्तुमकर्तुं ’ सर्व सत्ता होती. बायबल हा धर्मग्रंथ सुशिक्षित अशा लोकांनाच फक्त समजणाऱ्या लॅटिन भाषेंत लिहिलेला असल्यामुळें व तो धर्मोपदेशकांनाच फक्त वाचतां येत असल्यामुळें लोकांना त्यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवावा लागे. त्या वेळेस छापण्याची कला अवगत नसल्यानें सर्वांना हा ग्रंथ मिळून त्यांत काय लिहिलें आहे, हें समजणेंही दुरापास्त होतें. त्यामुळें पोप व त्याचे अनुयायी यांचा जुलूम लोकांना असह्य झाला होता. ते वाटेल त्या गोष्टी सांगून लोकांपासून पैसे उकळीत आहेत असें हळू हळू पुस्तकाच्या प्रसाराबरोबर लोकांच्या निदर्शनास येऊं लागलें; त्यामुळें या सत्तेस विरोध करण्याची वृत्ति उत्पन्न झाली. अशा रीतीनें प्रथमतः विरोध करणारा थोर पुरुष ‘ मार्टिन लूथर ’ हा होय. याजवर पोपनें बरेंच आकांडतांडव केलें व या नवीन मताचा उच्छेद करण्याचे जारीनें प्रयत्न झाले. पण सत्पक्ष नेहमीं खराच ठरणार या भावनेनें प्रेरित झालेल्या लोकांची संख्या कमी न होतां दिवसें दिवस वाढतच गेली; व बायबलमध्यें सांगितलेल्या गोष्टींवरच फक्त आम्ही विश्वास ठेवूं, पोप वगैरे कोणास जुमानणार नाहीं अशा निश्चयानें या लोकांनीं मार्ग आक्रमण्यास सुरुवात केली. या लोकांनीं देशत्याग केला, अनेक प्रकारचा छळ

येसला, पण स्व–धर्म व स्वतःचीं बनलेलीं मतें यांना केव्हांही सोडलें नाहीं. अशा कणखर वृत्तीचे लोक देशांतील छळ सोसण्यापेक्षां अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरून स्वतः जमीन कसून भाजी भाकरी मिळविण्यास प्रवृत्त झाले, तेव्हां वसाहतींना खरी ऊर्जित दशा आली व या देशांतील धर्मछळानें बनलेल्या नवीन वसाहती कधींहीं नामशेष झाल्या नाहींत. युरोपांतील घरदार, चीजवस्त सर्व सोडून देऊन नवीन वसाहतींचा मार्ग स्वीकारल्यानें त्यांना स्वतःचा देश पारखा झाला ही गोष्ट खरी, पण ते या वसाहतींत येऊन कायमचे रहिवासी बनल्यानें या अमेरिकन वसाहतींत नवजीवनाचा झरा उत्पन्न होऊन त्यांची खरी भरभराट होण्यास सुरुवात झाली. येथें ते सोन्याचांदीकरितां आले नसून येथेंच मिळेल ती मीठभाकरी गोड करून राहण्याचा व तेथें येणाऱ्या आपत्तींशीं झगडण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यामुळें वसाहती झपाट्यानें वाढल्या.

अमेरिकेनंतर आपण आफ्रिकेकडे वळल्यास आपणांस असें दिसेल कीं, या खंडाचा किनाऱ्या किनाऱ्यानें जरी शोध झाला होता, तरी अन्तर्भाग १९ व्या शतकाच्या मध्यकालापर्यंत पूर्णपणें अज्ञात होता. तेव्हां हा अन्तर्भाग शोधून काढणें ही पहिली गोष्ट व त्यानंतर तो वसाहतींस योग्य असल्यास त्या स्थापणें ही दुसरी गोष्ट करणें क्रमप्राप्तच झालें.

या देशाच्या अन्तर्भागाचा शोध लावण्याचें ज्या धाडसी प्रवाशांनीं श्रेय संपादन केलें, त्यामध्यें डॉ. लिव्हिंगस्टन, स्टॅनले व मंगोपार्क यांची प्रामुख्यानें गणना होते. यांनीं धर्मप्रसारार्थ व आपल्या राज्याची सीमा वाढविण्याच्या स्तुत्य उद्देशानें अत्यंत बिकट व त्रासदायक प्रवास केले व त्यासंबंधी सर्व माहिती युरोपखंडांत प्रसिद्ध केली. त्यामुळें या देशाचें वास्तविक स्वरूप लोकांच्या लक्षांत येऊन १८८५।८६ सालाचे सुमारास तो प्रदेश आपल्या ताब्यांत घेण्याची युरोपांतील राष्ट्रांची एकच दंगल उडून गेली. डॉ० लिव्हिंगस्टन सारख्या मिशनरी मनुष्याचा मुख्य उद्देश देशाचा अन्तर्भाग शोधून काढून तेथील रानटी लोकांना स्वधर्माची दीक्षा द्यावी असा होता. अशा प्रकारें निःस्वार्थी भावनेनें प्रेरित झालेल्या प्रवाशांना स्वतः त्रास व संकटें सोसावीं लागलीं ही गोष्ट खरी; पण त्यामुळें त्यांच्या देशाचें नांव प्रख्यात होऊन त्यांस विस्तृत प्रदेशाचा प्रत्यक्ष लाभ झाला.

जसजसा साम्राज्याचा विस्तार होत चालला तसतसें तें रक्षण करण्याच्या साधनांचाही विचार करणें भाग पडलें. या साधनांपैकीं आपल्या निरनिराळ्या भागांना जाण्याच्या वाटेवर गलबतांना सामुग्री व कोळसा पुरविण्यासाठीं नाक्यांचीं ठिकाणें असणें जरूर वाटूं लागलें. त्यामुळें राज्यास बळकटी आणण्यासाठीं अशीं नाक्याचीं ठिकाणें जिंकून अगर विकत घेऊन तेथें आरमारी बंदोबस्त करावा लागला. अशा वसाहतींना आरमारी वसाहती हें सार्थ नांव मिळालें. या ठिकाणीं अत्यंत कडक असा लष्करी अमल असतो. अशा वसाहतींत जिब्राल्टर, माल्टा, सायप्रस, असेन्शन, हेलीना, एडन वगैरे प्रमुख ठिकाणें येतात.

प्रथम शोध, मग व्यापार व मग वसाहती अशी ही वसाहतींच्या स्थापनेची त्रयी आहे. या शोधांच्या व वसाहतींच्या मागें लागल्यानें देशाचा विस्ताराच्या दृष्टीनें जसा फायदा झाला, तसाच इंग्लिश लोकांच्या अंगचे धारिष्टादि गुण विकास पावण्यासही त्यामुळें वाव मिळाला. आज एक देश शोधला, उद्यां दुसरा, परवां तिसरा असा युरोपियन लोकांचा जगभर व्याप वाढला आहे व तदनुषंगानें त्यांच्या अंगच्या अनेक गुणांचा विकास होण्यास भरपूर जागा मिळाली आहे. आजही विमानांतून एका दमांत ३००० मैलांचा प्रवास करणारे लिंडबर्गसारखे धाडसी वैमानिक पुरुष य. युरोपियन राष्ट्रांतच निर्माण होत आहेत.

अशा रीतीनें अनेक देश जिंकून अगर तेथें वसाहती स्थापन करून इंग्लंड देशाला अनंत फायदे झाले आहेत. त्याला आपल्या देशांत वाढणाऱ्या लोकवस्तीचा ओघ बाहेर वळवितां आला, व्यापाराचें क्षेत्र वाढलें, खालावलेल्या सरदार घराण्यांना ऊर्जित दशा प्राप्त करून देतां आली, देशांतील बदमाष लोकांना देशाबाहेर लांब पाठवितां आल्यानें देशाचा त्रास चुकून त्यांच्यामार्फत उलट वसाहती स्थापन करतां आल्या, देशांतील लोकांना नशिबाची परीक्षा पाहाण्यास विस्तीर्ण क्षेत्र सांपडलें, धर्म छळानें त्रस्त झालेल्या लोकांना शांततेनें आयुष्य घालविण्यास स्थान मिळालें, अपार खनिज संपत्तीचीं भांडारें हातीं लागलीं व देशाचें वैभव व दर्जा वाढून लोकांच्या कर्तृत्वशक्तीस भरपूर अवसर मिळाला.

सर्व युरोपियन राष्ट्रांच्या मनांत वसाहतींबरोबरच राज्यविस्तार ही प्रबळ भावना होती व तीं इंग्लंडच्या मनांतही होती याबद्दल शंका नाहीं. पण त्यापेक्षां स्वतःचें **स्वातंत्र्य रक्षण** ही जास्त प्रबळ भावना होतीं असें म्हणतां येईल.

या वसाहती स्थापून राज्यविस्तार करण्याचें काम इंग्लंडनें केलें नसतें तर तें कोणत्याही दुसऱ्या युरोपियन राष्ट्रानें केलेंच असतें ! त्यामुळें त्यांचें सर्वांगीण सामर्थ्य वाढून तीं राष्ट्रें इंग्लंडला डोईजड होऊन बसलीं असतीं व त्यामुळें नेपोलियन सारख्या एखाद्या महत्वाकांक्षी पुरुषानें इंग्लंडसारखें चिमुकलें पण स्वातंत्र्यप्रिय राष्ट्र तेव्हांच चिरडून टाकलें असतें. तेव्हां वसाहती स्थापन करण्यांतें इंग्लंडचा पैसा व व्यापार साधणें हाच केवळ मुख्य हेतु नसून स्वतःचें स्वातंत्र्यरक्षण हाच प्रमुख हेतु होता हें लक्षांत ठेविलें पाहिजे. वसाहती वाढल्याबरोबर भाषेचा फैलाव झाला; व एका भाषेनें व एकाच रक्तमांसानें निगडित झालेल्या इंग्लिश वसाहती मायदेशास चिकटून राहाण्यास स्वार्थानें का होईना, तयार झाल्या.

वसाहती स्वतःच्या पायांवर उभ्या राहूं लागल्या म्हणजे पक्व फळाप्रमाणें मूळदेशापासून गळून पडतील अशा प्रकारची कल्पना जरी अमेरिकेच्या बाबतींत खरी ठरली, तरी त्यावेळेपासून इंग्लंडच्या बदललेल्या दृष्टिकोनानें आतां तशी भीति उरली नाहीं, हें नुकत्याच झालेल्या युरोपियन महायुद्धानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें आहेच.

सारांश वसाहती स्थापन होण्यास खालीं दिलेलीं मुख्य कारणें आहेत.

( १ ) युरोपियन राष्ट्रांशीं स्पर्धा व शोध.
( २ ) मसाल्याचे पदार्थ मिळविण्याची अत्यंत जरुरी.
( ३ ) कच्च्या मालाची जरुरी.
( ४ ) गुलामांचा व्यापार व त्यांची मदत.
( ५ ) सोनें चांदी वगैरे खनिज संपत्तीची आशा.
( ६ ) कैद्यांस बाहेर पाठविण्यास जागा.
( ७ ) खालावलेल्या सरदारांस श्रीमंत करण्याचें साधन.
( ८ ) धर्मच्छळ.
( ९ ) आरमारी ठिकाणें—साम्राज्य रक्षणार्थ.
(१०) स्वातंत्र्यरक्षणासाठीं विस्तार.

# रंगीबेरंगी शालू.

एक होता राजा. त्याची बायको अतिशय देखणी होती. तिचे केस काळेभोर होते. डोळे कमळासारखे, भुवया धनुष्याप्रमाणें, नाक चांफ्याच्या कळी-सारखें, दांत कुंदकळ्याप्रमाणें व ओठ तोंडल्याप्रमाणें होते. ती दुसरी जणू कांहीं अप्सराच होती. पुढें कांहीं दिवसांनीं ती आजारी पडली. राजानें पुष्कळ उपाय केले. तिची मरणाची वेळ आली. मरणाच्या पूर्वीं तिनें नवऱ्याला जवळ बोलावलें, व मला एक वचन द्या म्हणून विनंति केली. राजानें होय म्हटल्यावर ती म्हणाली 'मी मेल्यावर हुबेहुब माझ्या रूपासारखी बायको मिळाली तरच तुम्हीं लग्न करावयाचें; नाहींतर नाहीं असें मला वचन द्या.' राजानें हातांत हात घालून वचन दिलें व तिनें प्राण सोडला. पुढें राजाला बायकोचें पुष्कळ दुःख झालें. पण आपण पुन्हा लग्न करावें, असा विचार कांहीं दिवसांनीं त्याच्या डोक्यांत आला, व तो मुलगी शोधण्याच्या खटपटीस लागला. सर्व राज्यांत मुलीच्या शोधाकरितां जासूद पाठविले, पण बायकोला वचन दिल्याप्रमाणें मुलगी कांहीं सांपडेना. शेवटीं तो निराश झाला व त्यानें लग्नाचा बेत रहित केला. त्याला एकुलती एक सुंदर मुलगी होती. ती आतां पंधरा सोळा वर्षांची झालेली होती. तिचें रूप आईप्रमाणें हुबेहुब अप्सरेसारखें होतें. ती कोणाला द्यावी, ह्याची राजाला पंचाईत पडली. शेवटीं एका म्हाताऱ्या सरदाराला द्यावयाची व त्याला आपल्या मागें राजा करावयाचें असें त्यानें ठरविलें. राजाचा बेत ऐकून त्या म्हाताऱ्या सरदाराला खूप आनंद झाला, पण ती गोष्ट राजकन्येला कळतांच ती खट्टू झाली, व तिनें ती गोष्ट साफ नाकारली. पण बाप कांहीं हट्ट सोडीना व बिचाऱ्या मुलीचें कांहीं चालेना. शेवटीं तिनें एक युक्ति योजिली. ती बापाजवळ आली व म्हणाली, 'बाबा, मी लग्नाला तयार आहें, पण माझ्या मनाप्रमाणें एक गोष्ट करा म्हणजे झालें. मी म्हणेन तशा लग्नाकरितां तीन साड्या व एक शालू मला द्या. सूर्याच्या किरणासारखी एक सोनेरी साडी, चंद्राच्या किरणासारखी एक रुपेरी साडी, व चांदण्यासारखी चम्‌चम् करणारी टिकल्या टिकल्यांची अशी तिसरी साडी. व जगांत वाघ, सिंह, हत्ती, लांडगा, कोल्हा, गाय, म्हैस, शेळी वगैरे जेवढीं जनावरें आहेत, त्या सर्वांच्या कातडींचा बनविलेला एक रंगीबेरंगी शालू मला पाहिजे.

एवढें झालें, म्हणजे मी लग्नाला तयार आहे.' आपण मागितलेल्या साड्या व शालू बनविणें शक्यच नाहीं, व शेवटीं लग्न फिसकटेल अशी राजकन्येची कल्पना होती पण राजा होता हट्टी, त्यानें राज्यांतील सर्व चतुर व कुशल स्त्रियांना साड्या करण्याचा हुकूम केला, व पारध्यांनीं राज्यांतील सर्व प्रकारचीं जनावरें मारून त्यांच्या कातडीचा एकेक तुकडा आणून द्यावा असें फर्मविलें. पुढें कांहीं दिवसांनीं साड्या तयार झाल्या व हजारों कातड्यांच्या तुकड्यांचा तो शालूही राजानें एका कारागिराकडून राजकन्येला पाहिजे होता तसा बनविला. नंतर त्या साड्या व तो शालू त्यानें तिला दाखविला, तिच्या ताब्यांत त्या वस्तु दिल्या, व उद्यां लग्न होणार असें तिला सांगितलें. आतां मात्र राजकन्या पंचाइतींत पडली. काय करावें हें तिला सुचेना. शेवटीं वेष पालटून रात्रींच्या रात्रीं आपण पळून जावें, असें तिनें ठरविलें. रात्रीं राजवाड्यांत जिकडे तिकडे सामसूम झाली. बारांचा ठोका पडला. पहारेकरी गुंगले आहेत असें पाहून आतां आपण बाहेर पडावें असें तिनें ठरविलें. ती चटकन उठली. तिनें हातांना व तोंडाला कोळशाचा रंग फासला. डोकीवरून तो कातडीचा रंगीबेरंगी विचित्र शालू घेतला. शिवाय त्या तीन साड्या व एक हिऱ्याची, एक माणकांची व एक पाचेची अशा तीन आंगठ्या इतकें सामान लपवून बरोबर घेतलें, व पहारेकऱ्याची नजर चुकवून ती राजवाड्याच्या बाहेर पडली व रस्ता सांपडेल तिकडे जाऊं लागली. रात्रीची वेळ, अंधार मी म्हणतो, रस्त्यांत कांटेकुटे, नद्यानाले, झाडेंझुडपें वगैरे तुडवीत तुडवीत ती सर्व रात्रभर चालली व उजाडतांना ती एका मोठ्या अरण्यांत आली. आतां मात्र ती फार दमली. ती शरिरानें फार नाज़ूक होती. चालून चालून ती थकली होती, व रात्रभर जागरण झाल्यामुळें तिला पाऊल उचलेना. त्या अरण्यांत एक मोठें वडाचें झाड होतें. त्याला मोठी ढोली होती. या ढोलींत बसून थोडा विसांवा घ्यावा असें तिनें ठरविलें. ती तेथें जाऊन बसली, तों क्षणांत तिला झोप लागली. पुढें कांहीं वेळानें तेथें दुसऱ्या देशाचा एक तरुण राजपुत्र त्या अरण्यामध्यें शिकारीकरितां आला. त्याच्याबरोबर पुष्कळ पारधी होते. मोठालीं कुत्रीं होतीं, व कित्येक जाळींही होतीं. शिकार करतां करतां कित्येक कुत्रीं त्या वडाच्या ढोलीजवळ येऊन मोठमोठ्यांनीं गुरगुरत व धावत; तें पाहून त्या ढोलींत एकादें जनावर असावें, असा त्या राजपुत्रानें तर्क केला. तें जनावर काय आहे हें पाहाण्याकरितां त्यानें पारध्याला सांगितलें. जरा दुरून त्या ढोलीकडे पाहातांच ते सर्व एकदम दचकले,

व राजपुत्राला म्हणाले, 'सरकार, कधींही कोणीं न पाहिलेलें असें विचित्र जनावर आहे. जवळ जावयाची छाती होत नाहीं.' त्यावर राजपुत्र म्हणाला, 'हळूच त्या जनावराला जाळ्यांत पकडा व गाडीला बांधून त्याला शहरांत घेऊन चला.' तेव्हां त्यांनीं जाळें टाकलें, व राजकन्येला बाहेर ओढलें. त्यासरशीं ती जागी झाली व घाबरली. मग केविलवाणें तोंड करून मोठ्यानें म्हणाली, 'मी एक गरीब मुलगी आहें. आईबापांनीं मला टाकून दिलें आहे. आपण मजवर दया करा व मला घेऊन चला. मी आपल्याबरोबर येतें.' तिच्या त्या पोषाखावरून त्यांनीं तिचें जंगली असें नांव ठेविलें व ते तिला राजवाड्यांत घेऊन आले. ही मोलकरीण बरी आहे, असें समजून त्यांनीं तिला राजांच्या स्वयंपाकघरांत एका आचाऱ्याच्या हाताखालीं ठेवून दिलें.त्या ठिकाणीं केर काढणें, चूल पोतेरें करणें, भांडीं घासणें, भाज्या चिरणें, डाळ तांदूळ निवडणें वगैरे अनेक कामें तिला दररोज करावीं लागत. ती अगदीं दमून जाई, पण काय करते बिचारी! मुकाट्यानें सर्व कांहीं करी. एके दिवशीं राजवाड्यांत मोठा समारंभ होता. त्या समारंभास पुष्कळ माणसें आलीं होतीं. स्त्रियाही पुष्कळ आल्या होत्या. तेथें खूप रोषनाई केली होती. अगदीं खूप बहार उडाली होती. तें पाहून राजकन्या त्या आचाऱ्यास म्हणाली, 'हें पहा, मी जरा गंमत पाहावयास जाऊं का? दाराबाहेर उभी राहूनच घटकाभर मौज पाहीन.' तेव्हां आचारी म्हणाला, 'भांडीं घासायचीं टाकलीस व चाललीस कुठें? भिकाऱ्याला हे चाळे पाहिजेत कशाला'? पण तिनें फारच विनंती केली तेव्हां तो म्हणाला, 'ठीक आहे, पण एक तासाचे आंत आलें पाहिजे. नाहींतर मग मी आहें, नी तूं आहेस!' नंतर ती एका खोलींत गेली. आपला तो शालू काढून ठेवला. तोंडाला लावलेला कोळसा धुवून टाकला. जवळ असलेलें गाठोडें सोडलें, व त्यांतून ती सोनेरी रंगाची साडी काढून नेसली, व अगदीं हुबेहुब अप्सरेप्रमाणें बनली. मग मोठ्या ऐटीनें त्या दिवाणखान्यांत सर्व मंडळीमध्यें जाऊन बसली. तिचें रूप व पोशाख पाहातांच सर्व मंडळी चकित झाली. राजपुत्र तर भांबावून गेला. त्याला काय करावें हेंच सुचेना. ही कोणी तरी अप्सरा, गंधर्वकन्या किंवा देवता असावी, असेंच त्याला वाटलें. राजकन्या तेथें थोडा वेळ बसून चटकन बाहेर पडली, व लगबगीनें आपल्या खोलींत येऊन तिनें आपला पूर्वींचा पोशाख केला. तोंडाला कोळसा फासला; अंगावर तो रंगीबेरंगी शालू घेतला व पुन्हा आपली जंगली बनली. तिला पाहून आचारी म्हणतो, हें पाहा

आतां गंमत पाहून आलीस, मी आतां थोडावेळ जातों. तूं आज राजाचें जेवण तयार कर; मात्र त्यांत केसबीस पडला, तर याद राख. खायला मिळायचें नाहीं. त्यानें सांगितल्याप्रमाणें तिनें राजाचें जेवण तयार केलें, व त्यामध्यें हळूच आपली हिऱ्याची आंगठी घालून ठेवली. त्या दिवशींचा स्वयंपाक राजपुत्रास फारच आवडला. व ती आंगठी पाहून तर तो चकितच झाला. व हें काय गौडबंगाल आहे, म्हणून त्यानें आच्याऱ्याला बोलावणें पाठविलें. बोलावतांच आचारी घाबरला. राजापुढें येतांच राजानें विचारलें, आजचा स्वयंपाक कोणीं केला ? आचारी म्हणाला, सरकार मीं केला. राजा म्हणाला, छे, हें शक्य नाहीं. हा तुझा हात नाहीं. इतकें सुंदर जेवण जेवलेलें मला आठवतच नाहीं. खरें सांग. तेव्हां आचारी म्हणाला, एक जंगली मोलकरीण आहे, तिनें आज अन्न तयार केलें, त्याबरोबर राजानें तिला बोलावण्याचा हुकूम केला. ती पुढें येतांच राजा म्हणाला, तूं कोण आहेस ? तेव्हां ती म्हाणाली, महाराज, आईबापांनीं टाकलेली मी एक गरीब मुलगी आहें. तेव्हां राजपुत्र म्हणाला, तूं या माझ्या राजवाड्यांत कशाकरितां आलीस ? तेव्हां ती म्हणाली, माझा जगांत कांहीं उपयोग नाहीं. लोकांच्या लाथा खाण्याकरितांच मी जन्मलें आहें. त्यावर राजा म्हणाला, बरें तें असो. तूं ही आंगठी कोठून आणलीस ? तेव्हां ती म्हणाली, मला आंगठीबद्दल कांहीं माहिती नाहीं एवढेंच बोलून ती गप्प राहिली. इतकें सांगितल्यावर तूं आतां जा, म्हणून राजा तिला म्हणाला. तेव्हां ती आपल्या खोलींत येऊन बसली. पुढें कांहीं दिवसांनीं पूर्वीसारखाच दुसरा एक समारंभ राजवाड्यांत होता. त्यावेळींही तिनें पूर्वीप्रमाणेंच दाराच्या बाहेर उभें राहून गंमत पाहूं का ? म्हणून आचाऱ्याला विनंती केली, व नाहीं होय म्हणतां म्हणतां शेवटीं परवानगी मिळविली. परवानगी मिळतांच आपल्या खोलींत आली, व रंगी बेरंगी शालू काढून ठेवला. तोंडाचा व हाताचा कोळसा धुवून टाकला, व गांठोडें सोडून चंद्रकिरणासारखी ती रुपेरी साडी नेसली, व हातांत पाचूची आंगठी घातली व पूर्वीप्रमाणेंच समारंभाला गेली. तेथें जातांच तिला पाहून सर्व मंडळी व तो राजपुत्र दिपूनच गेले. चंद्राच्या चांदण्यासारखी तिची ती साडी, अप्सरेसारखें तिचें रूप, तसेंच तिचें चालणें, बसणें, उठणें हें पाहून राजपुत्र अगदीं गुंगच झाला. पुढें ती राजकन्या थोडा वेळ तेथें बसून सर्वांची नजर चुकवून हळूच आपल्या खोलींत आली. व तो पोषाख उतरून पुन्हा पूर्वीप्रमाणें जंगली बनली. तिला

पाहून आचारी म्हणाला, तूं गंमत पाहिलीस, आतां मी पाहतों. तूं आज राजाचें जेवण तयार कर. असें म्हणून तो गेला. तिनें स्वयंपाक तयार केला व अन्नांत पाचूची आंगठी घालून ठेविली. जेवतांना राजाला तें अन्न अतिशयच आवडलें. व आंगठी पाहून तर राजा चकितच झाला. त्यानें ताबडतोब आचाऱ्याला बोलावलें. आचाऱ्याला विचारतांच त्यानें जंगलीचें नांव घेतलें, तेव्हां तिला हाक मारली. तिला विचारतांच ती पूर्वीप्रमाणेंच म्हणाली, आईबापांनीं टाकलेली मी एक गरीब मुलगी आहें. लोकांच्या लाथा खायाला मी जन्मलें आहें. आंगठीबद्दल मला कांहीं माहीत नाहीं. असें म्हणून ती आपल्या खोलींत आली. पुढें आणखी कांहीं दिवसांनीं राजवाड्यांत पूर्वीसारखाच आणखी एक समारंभ होता. त्या रात्रीं तिनें पूर्वीप्रमाणेंच दाराच्या बाहेर उभें राहून मी गंमत पाहातें, म्हणून आचाऱ्याला विनंती केली, व नाहीं होय म्हणतां म्हणतां त्यानें परवानगी दिली. नंतर ती आपल्या खोलींत आली, तो कातडीचा शालू काढून ठेवला. हाताचा व तोंडाचा कोळसा धुऊन टाकला. चांदण्यासारखी चमकणारी टिकल्या टिकल्यांची ती तिसरी साडी नेसली. व हातांत माणकाची लाल आंगठी घातली व पूर्वीप्रमाणेंच त्या समारंभांत सर्व मंडळीमध्यें जाऊन बसली. तिच्या साडीचा चमचमाट व आंगठीच्या माणकाचा लालबुंद प्रकाश पाहून तर सर्व मंडळी गारच झाली! खरोखरी ती स्वर्गांतील अप्सराच आहे असें सर्वांना वाटलें, तिचें रूप पाहून राजपुत्र तर वेडाच झाला. तिला पाहतांच सर्व लोक तिच्याकडे टकमकां पाहायाला लागले. पुढें कांहीं वेळानें ती बाहेर पडली. व सर्वांची नजर चुकवून आपल्या खोलींत आली, व तो पोशाख उतरून पूर्वीचा आपला पोशाख चढविला व लगबगीनें तोंडाला हाताला कोळसा फासला. कांहीं वेळानें आचारी तिला म्हणाला, आतां तूं गंमत पाहिलीस, आतां मी पाहून येतों. तूं राजाचें जेवण तयार कर. तिनें जेवण तयार केलें व त्यांत माणकाची आंगठी घालून ठेविली. राजाला तें जेवण फार गोड लागलें व ती आंगठी पाहून तो पुन्हा चकितच झाला. त्यानें पूर्वीप्रमाणें आचाऱ्यास बोलावलें व त्यानें सांगितल्यावरून त्या मुलीला राजपुत्रापुढें आणलें. राजपुत्रानें तिला विचारतांच तिचें आपलें एकच उत्तर. आईबापांनीं टाकलेली मी एक गरीब मुलगी आहें. लोकांच्या लाथा खाण्याकरितां मी जन्मलें आहें. आंगठीबद्दल मला कांहीं माहिती नाहीं हें आपलें तिचें ठरीव उत्तर! राजाला कांहीं तोडच सुचेना. ती बोलत असतां तो तिच्याकडे निरखून पाहात होता, तें तिच्या हाताचीं एकदोन बोटें गोरींपान दिसलीं. कारण लगबगीनें कोळसा फासतांना त्या दोन बोटांना काळा रंग लागला नव्हता. तेव्हां

तीं गोरींपान बोटें पाहून राजाला संशय आला व तो तिच्याजवळ आला, व त्यानें तिचा शालू हातानें धरला, व तो काढावयास लागला. ती कांहीं काढूं देईना. तेव्हां राजपुत्राला जास्तच संशय आला. व तो उतावळा झाला. त्यानें तिचा हात धरला, व जोरानें शालू काढून टाकला. तों आंत रात्रीं पाहिलेली टिकल्या टिकल्याची चमकणारी साडी. तें पाहून राजपुत्र म्हणाला, हे देवते, हें सोंग आतां पुरें झालें. तूं खरी जंगली नव्हेस. कोणीतरी अप्सरा आहेस. तेवढा तोंडाचा काळा रंग धुवून टाक. तीं तुझीं बोटें पाहा कशीं गोरींपान आहेत. एकदां आपलें खरें रूप प्रगट कर व माझी पट्टराणी हो. नंतर तिनें आपलें तोंड व हातपाय धुतले, काळा रंग घालविला, साडी नीटनेटकी नेसली, व राजपुत्रापुढें उभी राहिली. त्यावेळीं ती एकाद्या चांदणीप्रमाणें चमकत होती. तिला तशी पाहतांच राजपुत्र जवळ आला. त्यानें तिच्या हातांत हात घातला, व तिला आपल्या शेजारीं सिंहासनावर नऊन बसविलें. पुढें त्या दोघांचें थाटांत लग्न झालें, व त्यांनीं आपले दिवस आनंदांत घालविले.

---

# नीतिपाठाचीं बक्षिसें

त्रैवार्षिक होणाऱ्या नीतिपाठाच्या परीक्षेंत चालू सालीं ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें येथील विद्यार्थिनी रंगूबाई जोशी व गोदावरीबाई सोनवणी यांस प्रत्येकीं रु. १० चें बक्षीस पुस्तक रूपानें मिळालें आहे.

## मुंबई इलाखा.
# प्राथमिक शिक्षण परिषद्.

## अधिवेशन २ रें.
### स्वागताध्यक्ष व अध्यक्ष यांचीं भाषणें.

सोमवार ता. १८ रोजीं येथील किर्लोस्कर थिएटरमध्यें सकाळीं ८–३० वाजतां मि. भोजसिंग पहालाजानी, एम. एल. सी. यांच्या अध्यक्षतेखालीं प्राथमिक शिक्षण परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनास सुरुवात झाली. परिषदेकरितां किर्लोस्कर थिएटर सुशोभित करण्यांत आलें होतें. मुंबई इलाख्यांतील सर्व प्रांतांतून सुमारें ३०० शिक्षक प्रतिनिधि परिषदेकरितां आले होते. इलाख्यांतील चाळीस स्कूलबोर्डामार्फत सुमारें १०० प्रतिनिधि परिषदेस हजर होते. मुंबई कायदे-मंडळाचे प्रमुख सभासद् हजर असून स्वागत मंडळाचे ७५ सभासदही हजर होते. पुण्यांतील सर्व शिक्षणसंस्थांतील अध्यापक वर्ग, पालक वर्ग आणि विद्यार्थीसमूह प्रेक्षक या नात्यानें हजर होता. तसेंच येथील म्युनिसिपल मुलींच्या शाळेंतील अनेक शिक्षकिणीही हजर होत्या.

सुरवातीस सेवासदनांतील आणि म्युनिसिपल मुलींच्या शाळेंतील विद्यार्थिनींनीं ईशस्तवनपर पद्यें गाऊन दाखविलीं. श्रीमंत पंतप्रतिनिधि, डॉ. मॅन वगैरेंकडून परि-षदेस आलेले सहानुभूतिपर संदेश सेक्रेटरी मि. आर. एस. दीक्षित यांनीं वाचून दाखविल्यावर स्वागताध्यक्ष प्रि. के. आर. कानिटकर यांचें खालील आशयाचें भाषण झालें.

### स्वागत मंडळाचे अध्यक्ष
### प्रि. के. रा. कानिटकर

स्वागत मंडळाचे अध्यक्ष प्रि. के. रा. कानिटकर हे आपल्या भाषणांत म्हणाले, गेल्या वर्षी स्थापन झालेल्या स्कूलबोर्ड्स असोसिएशनच्या विद्यमानें भरणाऱ्या या परिषदेचें मनःपूर्वक अभिनंदन करण्याचा योग मला मिळाला याबद्दल मला अभिमान वाटतो. पुणें हें केवळ ऐतिहासिक महत्त्वाचेंच शहर आहे असें नव्हे, तर शिक्षणाविषयक चळवळीबद्दल त्याची सर्व हिंदुस्तानांत ख्याति आहे. प्राथ-मिक शिक्षणाची पहिली परिषद गेल्या सालीं फेब्रुवारी महिन्यांत मुंबईस भरली.

दुसरी परिषद पुण्यास भरावी हें उचितच होतें. येथें दुय्यम शिक्षणाच्या व उच्च शिक्षणाच्या कित्येक संस्था आहेत. पण त्यांत भूषण मानण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, त्या सर्व संस्था स्वार्थत्यागी माणसांनीं चालविलेल्या आहेत. प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम बसल्याशिवाय दुय्यम व उच्च शिक्षणाची सजावट नीट रीतीनें होणार नाहीं ही जाणीव येथील शिक्षणसंस्थांच्या चालकांच्या ठिकाणीं पूर्णपणें आहे

कायदे कौन्सिल, लोकल बोर्डें व म्युनिसिपालिट्या यांतील सभासदांची वृत्ति पाहिली म्हणजे हा विषय आज प्रत्येकाच्या तोंडीं असला तरी त्याचें महत्त्व या संस्थांच्या जितकें लक्ष्यांत यावें तितकें आलें नाहीं असेंच म्हणावें लागेल. प्राथमिक शिक्षणाकरितां पैशाची सिद्धता करणें हें काम या सभासदांचेंच आहे, पण त्या कामीं ते दाखवावा तसा निश्चय दाखवीत नाहींत ही मोठ्या खेदाची गोष्ट होय.

आज आपल्या शिक्षणाची अशी स्थिति आहे कीं, ज्याला आपण उच्च शिक्षण म्हणतों तें वस्तुतः दुय्यम शिक्षणच होय. त्याचप्रमाणें दुय्यम शिक्षण-तील बराच भाग प्राथमिक शिक्षणांत समाविष्ट करण्यालायक आहे. या शिक्षणांत दोष काय आहेत, व ते कसे सुधारावे वगैरे बाबतींसंबंधानें विवेचन करण्याचें हें स्थळ नव्हे तरी पण सामान्यतः इतकें म्हणतां येईल कीं, आमचें उच्च शिक्षण संशोधन व्यवसायास प्रोत्साहक नाहीं, आणि आमचें दुय्यम शिक्षण मुलांची जीवनकलहाकरितां योग्य तयारी करणारें नाहीं.

सुधारलेल्या देशांत प्राथमिक शिक्षणासंबंधानें जें वाङ्मय प्रसिद्ध होत आहे तें पाहिलें म्हणजे हा विषय किती महत्त्वाचा आहे हें दिसून येईल. तिकडे अगदीं खालच्या शिक्षणाचा विचार चांगले बुद्धिमान व तज्ज्ञ गृहस्थ करीत असतात. तिकडे सरकार, मोठमोठे मुत्सद्दी व सार्वजनिक कामें करणारे हे सर्वजण बहुजन-समाजाचें अज्ञान घालविण्याचे उपाय योजिण्याचे कामीं दक्षतेनें परिश्रम करीत असतात. आपल्या देशांतील लोक शिक्षणाच्या कामीं इतर देशांतील लोकांच्या बरोबरीचे नसतील तर जीवनकलहांत त्यांचा तरणोपाय लागणार नाहीं असेंच तिकडील देशांतील लोक समजतात. दुसऱ्या देशांतील अत्यंत तल्लख व हुशार माणसांशीं तुलना करण्यासारखीं आपल्या देशांत चार माणसें असलीं म्हणजे बस्स आहे असें तिकडे समजण्यांत येत नाहीं. राष्ट्राची कार्यक्षमता बहुजनसमाजाच्या कार्यक्षमतेवरच अवलंबून आहे हें तत्त्व त्या देशातील लोकांनीं आतां पूर्णपणें ओळखलें आहे.

आपल्या परिषदेस प्राथमिक शिक्षणाच्या सर्व घटनेचा विचार करावयाचा आहे. ही घटना सुधारण्यास व तींतील दोषांचें परिमार्जन करण्यास काय उपाय योजिले पाहिजेत याचाही आपण विचार केला पाहिजे. या संबंधांत मला कांहीं सूचना करावयाच्या आहेत.

पैसा, स्कूलबोर्डांची घटना व त्यांचे अधिकार व प्राथमिक शिक्षणाचा कार्यक्रम पार पाडण्याचें काम ज्या माणसांकडे आहे त्यांची स्थिति या तीन मुद्यांचा विचार अवश्य केला पाहिजे.

स्थानिक संस्थेनें प्राथमिक शिक्षणाकरितां एक रुपया जमवून त्याचा योग्य खर्च केला म्हणजे मुंबई सरकारनें २ रु. द्यावेत असें १९२३ च्या कायद्यांत सांगितलें आहे. स्थानिक संस्थांनीं प्राथमिक शिक्षणाचें महत्त्व जाणून जरूर तो कर बसविण्यास तयार व्हावें यासाठींच कायद्यांत ही योजना केली असावी असें म्हणण्यास हरकत नाहीं. २६ जिल्ह्यांपैकीं कांहीं जिल्ह्यांनींच शिक्षणपट्टी बसविली असल्याचें दिसतें. कर बसविण्यापासून येणारी अप्रियता सोसण्याची तयारी फार थोड्यांची आहे हें यावरून दिसून येतें. त्याचप्रमाणें शिक्षणाच्या बाबतींत सक्ति केल्यानेंही लोकांचा येणारा टपका टाळण्याची लोकल बोर्डाची प्रवृत्ति दिसून येते. याशिवाय या बाबतींत दुसरेंही एक वैगुण्य आहे. तें असें कीं, ज्यांना शिक्षणाचा अनुभव नाहीं अशा लोकांच्या हातीं त्याची व्यवस्था गेली आहे हें होय.

याला एकच उपाय आहे तो हा कीं, प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारनेंच सर्व पैसा खर्च करावा. हल्लींच्या कायद्याअन्वयें सरकारला जो खर्च करावा लागतो त्याच्यापेक्षां शेंकडा ५० खर्च सरकारला अधिक करावा लागेल. लोकांची सामाजिक व राजकीय स्थिति सुधारण्यास सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची योजना अवश्य आहे अशी जर सरकार व कायदे कौन्सिल यांची खात्री आहे तर स्थानिक संस्थांकडून खर्चाचा $\frac{1}{3}$ भाग उभारण्यांत येईपर्यंत त्यांनीं वाट पाहाणें केव्हांही सयुक्तिक ठरणार नाहीं.

कांहीं उद्योगधंदे मूलभूत असें समजण्यांत येतात. या धंद्यांचा संबंध देशांतील सर्वच भागांशीं येतो असें नाहीं. कांहीं भागांचा कदाचित त्यांच्याशीं संबंध नसतोही, तरी पण या उद्योगधंद्याच्या बाबतींत जवळच्या देशांशीं चढाओढ करतां यावी म्हणून त्यांच्यासाठीं राष्ट्राचा पैसा खर्च करण्यांत येतो. हीच दृष्टि प्राथमिक शिक्षणासंबंधांतही ठेविली पाहिजे. देशांतील लोकांच्या अंगीं कार्यक्षमता आणणारी

हीच मूलभूत गोष्ट आहे. राष्ट्राचें शारीरिक, नैतिक बलाबल हें सर्व या एकाच गोष्टीवर अवलंबून आहे. तर स्थानिक संस्थांसारख्या अडाणी व अनुभव नसलेल्या संस्थांवर याबद्दलची जबाबदारी टाकून मोकळें होणें कोणत्याही सरकारास किंवा कायदे कौन्सिलास शोभणार नाहीं.

स्कूलबोर्डांची हल्लींची घटना समाधानकारक नाहीं. शिक्षणाचा प्रसार व सुधारणा यासंबंधांत योजना घालून देण्याचें काम या संस्थेकडे आहे. अर्थात् शिक्षणकार्याचा ज्यांना प्रत्यक्ष अनुभव आहे असेच लोक या बोर्डांत असले पाहिजेत. सध्यांच्या बोर्डाच्या घटनेंत असा सभासद एकाददुसराच येऊं शकतो. त्यांतही सभासदांच्या निवडीसंबंधांत जातिविशिष्ट दृष्टीचें तत्त्व शिरत असल्यामुळें योग्य माणसांची निवड करणें अधिकच बिकट होतें. यामुळें शिक्षणप्रसाराचें मूळ कार्य बाजूला राहून आपल्या जातीच्या लोकांची वर्णी कशी लागेल इकडेच सभासदांचें चित्त लागतें. ही स्थिति मूलतः बदलून यांत शिक्षणाचा अनुभव असलेले असेच लोक आले पाहिजेत.

स्कूलबोर्डांचे अधिकारही वाढविण्यांत आले पाहिजेत. त्यांना स्थानिक संस्थांच्या लहरीवर अवलंबून राहाण्याचा प्रसंग येतां कामा नये. स्कूलबोर्डें हीं प्रत्यक्ष शिक्षण खात्याला जबाबदार असलीं पाहिजेत. त्यांचा स्थानिक संस्थांशीं कोणत्याही प्रकारचा संबंध असतां कामा नये. याकरितां सरकारनें एक मध्यवर्ती प्राथमिक शिक्षण बोर्डाची नेमणूक करावी व त्यांत शक्य असेल तेथें सरकारच्या शिक्षण खात्याच्या बाहेरील अनुभविक लोकांचा समावेश करण्यांत यावा. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर्स हे स्कूलबोर्डाचे नोकर असले पाहिजेत. या अधिकाऱ्यांना शिक्षकांच्या बदल्या करणें, त्यांच्यावर देखरेख ठेवणें वगैरे सारखे अधिकार ठेवण्यांत आले पाहिजेत.

आतां तिसऱ्या मुद्याचा विचार करूं. शिक्षणप्रसार करण्याचें काम हल्लीं ज्या पद्धतीनें करण्यांत येतें ती अत्यंत अयोग्य अशी आहे. प्राथमिक शिक्षण उत्कृष्ट रीतीनें देण्यांत येऊन खेड्यांतील लोकांना त्याचा पूर्ण फायदा व्हावा असा जर हेतु आहे तर सुपरवायझर्सची हल्लींची संख्या वाढविली पाहिजे व त्यांच्या नेमणुकीच्या पद्धतीसंबंधांतील कसोटींतही फरक झाला पाहिजे. हल्लीं सुपरवाझरच्या ताब्यांत त्याला न झेंपतील इतक्या शाळा देण्यांत येतात, ही संख्या कमी केल्यास बऱ्याच

कार्यभाग होणार आहे. सुपरवायझर्स नेमण्याची सध्यांची जी पद्धत आहे तींतही फरक केला पाहिजे. तसा फरक केल्याशिवाय त्यांची संख्या कमी करणें हें स्थानिक बोर्डांना रुचणार नाहीं. खेड्यांची स्थिति व त्यांची घटना हीं शहरच्यापेक्षां वेगळीं असतात, या दृष्टीनेंही हा फरक घडवून आणणें जरूर आहे.

एका शतकापूर्वी खेड्यांची सर्व व्यवस्था खेड्यांतील पाटील-कुळकर्णी यांकडूनच पाहाण्यांत येत असे असें म्हणतात. ब्रिटिश अंमल येथें सुरू झाल्यानंतर ही स्थिति नाहींशी झाली, पण या नवीन मनूचें रहस्य काय आहे याची मात्र खेड्यांतील लाकांना कल्पनाही नाहीं. आधुनिक आयुष्यक्रमांतील परिस्थितीनें खेड्यांत राहाणाऱ्या लोकांचा ओघ शहराकडे वळतो, यामुळें खेड्यांची स्थिति फारच मागासलेली असते. खेड्यांच्या हिताहिताबद्दल तादृश लक्ष्य कोणाहीं पुरवीत नाहीं. अलीकडे अलीकडे या महत्वाच्या बाबींकडे लोकांचें लक्ष्य लागत चाललें आहे म्हणूनच वरील सूचना लोकांना पटतील अशी आशा वाटते.

ज्या माणसांकडे शिक्षणप्रसाराचें काम द्यावें असें वर सांगितलें आहे त्या माणसांनीं आपण आपलें सर्व आयुष्य किंवा त्याचा बहुतेक भाग खेड्यांतील शिक्षणाप्रत्यिर्थच खर्च करूं असें स्वतःस बंधन लावून घेतलें पाहिजे. त्यांनीं आपलीं मंडळें तयार करून त्यास सर्व्हंट्स ऑफ रूरल इंडिया सोसायटी ( जनपद सेवासंघ ) असें नांव द्यावें. या सोसायटीच्या सभासदांच्या लायकीचें परिमाण पुढीलप्रमाणें असावें. ( १ ) तो ग्रॅज्युएट असावा. किंवा तेथपर्यंत त्याचें शिक्षण झालेलें असावें. ( २ ) त्याला पुढील बाबींचें ट्रेनिंग मिळालेलें असावें. ( अ ) शिक्षण, ( ब ) वैद्यक, ( क ) ग्रामस्थापत्य. ( ड ) खेड्यांना उपयोगीं पडणारा कायदा. (ई) सहकारिता व (फ) ग्रामक्षेत्रांतील आरोग्य या विषयांचें ज्ञान देणारा अभ्यासक्रम दोन किंवा अधिक महिन्यांचा करून या लोकांना या बाबींचें शिक्षण देण्यांत यावें असें झाल्यास या लोकांना खेड्यामध्यें तेथील परिस्थितीला अनुरूप असें शिक्षण देण्याची तजवीज करतां येईल. आज शिक्षण म्हटलें कीं खेड्यांतील लोक दचकून जातात व या शिक्षणाच्या योगानें आपलीं मुलें खेड्यांतील कामास नालायक होतील अशी जी त्यांना भीति वाटते ती वाटणार नाहीं. लोक खेड्यांतील लोकांच्या सुखसोयींसंबंधांत त्यांना योग्य सल्लामसलत देण्याचें कामही निरपेक्षपणानें करतील. प्रत्येक माणसाच्या ताब्यांत खेड्यांतील फार तर२५शाळा देण्यांत याव्यात. आणि त्याला साधारण चांगल्या रीतीनें राहातां येईल इतकें वेतन द्यावें. या माणसला दरमहा साधारण १०० ते१५०इतका पगार द्यावा लागेल व त्याचा बोजा सरका-

रला किंवा स्थानिक संस्थांना सोसावा लागेल. हा खर्च हल्लींच्या मानानें जास्त होणार नाहीं. व तो सरकारणींही लागेल. या माणसांना पगार मिळावयाचा तो ज्या संस्थेचे ते सभासद असतील त्या संस्थेकडून मिळावा. स्थानिक संस्थांकडून मिळूं नये. खेड्यांतील शिक्षण ज्या कायद्यांनीं नियमित केलेलें असते त्या कायद्यांत वरील सोसायटीच्या मंजुरीचें कलम असावें. त्याचप्रमाणें जरूर पडल्यास त्यांना फंड उभारतां येतील अशीही कायद्यांत तरतूद करण्यांत यावी. अशी मंडळें जिल्हानिहाय किंवा अशाच विवक्षित प्रदेशानिहाय स्थापन झालीं म्हणजे खेड्यांत आधुनिक कल्पनांचें ज्ञान पोंचविण्याचें काम तीं करतील आणि उलटपक्षीं त्यांना स्कूल-बोर्डाच्या लहरीचा व विक्षिप्तपणाचाही उपद्रव पोहोंचणार नाहीं.

अशीं तरुण माणसें पुढें येण्याचा संभव आहे काय? असा यासंबंधांत मला साहजिकच प्रश्न करण्यांत येईल आणि त्याचें मी होय म्हणूनच उत्तर देतों. हा प्रयोग थोडासा धाडसाचा आहे ही गोष्ट खरी आहे. तो अस्तित्वांत आणण्यास सरकारनें व कायदेकोन्सिलनें थोडेंसें धैर्य दाखविलें पाहिजे. इतकेंही धैर्य दाखविण्याचें काम त्यांच्या हातून होणार नाहीं तर राष्ट्रीय सुधारणा व स्वराज्य, वगैरेंची भाषा निष्फळ व अर्थहीनच ठरेल.

नंतर प्रि. शहा यांनीं मि. पहालाजानी यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना केली. मुंबईचे रा. ब. पै, नडियादचे रावसाहेब परेख, विजापूरचे रा. सा. देशमुख, अहमदनगरचे रा. थोरात, कराचीचे खा. ब. एफिंडी यांनीं प्रि. शहा यांच्या सूचनेस दुजोरा दिल्यावर मि. पहालाजानी हे अध्यक्ष स्थानापन्न झाले. प्रि. कानिटकर यांनीं अध्यक्षांना हार घातल्यावर अध्यक्ष मि. पहालाजानी यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें.

## अध्यक्ष
## मि. पहालाजानींचें भाषण.

प्रि. कानिटकर यांचेकडून या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल तार आली तेव्हां मी विस्मित होऊन गेलों. पुण्यासारख्या शिक्षणाचें केंद्र असलेल्या स्थळीं भरणाऱ्या परिषदेचें अध्यक्षस्थान आपल्याला झेपेल कसें याबद्दल माझें मन साशंक झालें, पण या निमंत्रणाच्या पाठीशीं स्वागतमंडळांतील सर्व सभासदांचें एकमत आहे हा विचार मनांत येऊन मीं ही जबाबदारी पत्करली. पहिल्या परिषदेचे अध्यक्षही मि. जमशेट एन. आर. मेथा हेही सिंधी गृहस्थ होते. तेव्हां

याही परिषदेचें अध्यक्षस्थान एका सिंधी गृहस्थास कां द्यावें याचा मला उलगडा पडेना. पण सिंधप्रांतांतील लोक आपले बांधवच आहेत, शिक्षणविषयक बाबतींत त्यांचे आपले हितसंबंध एकरूपच आहेत, हें निदर्शित करण्यासाठींच, तुम्हीं माझी निवड केली असली पाहिजे. आणि याबद्दल तुमचे मनःपूर्वक आभार मानणें हें मी आपलें कर्तव्य समजतों. चंद्रावरकर कमेटीचा मी एक सभासद होतों. या कमेटीच्या शिफारशी डॉ. परांजपे यांना प्रायः असंमतच वाटल्या, आणि त्यांनीं जें पुढें शिक्षणविषयक बिल केलें तें साहजिकच लोकांच्या किंवा लोकप्रतिनिधींच्या अपेक्षेप्रमाणें झालें नाहीं. पटेलबिलापेक्षां या बिलानें एका बाबतींतच मजल पुढें मारली. ती बाब म्हणजे शिक्षणविषयक खर्चांत सरकार व स्थानिक बोर्ड यांचे दरम्यान त्यांनीं ह्या बिलानें ठरविलेलें प्रमाण हें होय. ह्यामुळें प्रत्यक्ष परिणाम मात्र असा झाला कीं, सरकारच्या शिरावरचें ओझें कमी झालें आणि स्थानिक संस्थांच्या शिरावरचें ओझें अधिक वाढलें. ह्याबिलानें सक्तीच्या शिक्षणाची योजना अमुक मुदतींत झाली पाहिजे व ती अमलांतही आली पाहिजे असाही निर्बंध घालण्यांत आला. बिलाची ही स्थिति लक्ष्यांत घेतां त्यांतील योजनेचीं गति एकंदरीनें मंदच आहे ह्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण राहात नाहीं. कांहीं स्थानिक संस्थांनीं हा कायदा स्वतःस लागू करून घेतला आहे. पण याची प्रत्यक्ष प्रगति फारच थोडी झाली आहे. ह्या कायद्याच्या प्रगतीस नडणारी मुख्य गोष्ट म्हटली म्हणजे खर्चाचीच होय. हें बिल कायदेकौन्सिलांत आलें त्यावेळेस प्रधानांनीं जें आश्वासन दिलें होतें त्या आश्वासनाचा अर्थ मर्यादित करण्याचाच सरकारच्या बाजूनें प्रयत्न झाला. हें बिल कायदे कौन्सिलमध्यें मिनिस्टरनीं ता. २९ सप्टेंबर १९२२ रोजीं आणलें. त्यावेळीं त्यांनीं पुढील आशयाचें उद्गार काढले:—

" अलीकडे शिक्षणसंबंधांत स्थानिक संस्थांचा खर्च कायम राहून सरकारचा खर्च मात्र इतका वाढला आहे कीं, आज इलाख्यांतील प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चापैकीं शेंकडा १२ च खर्च लोकलबोर्डें करतात व शेंकडा ८८ खर्च सरकारला करावा लागतो. आज लोकलबोर्डांनीं शेंकडा ३३.३ इतका खर्च करावा असें ठरविल्यास ही व्यवस्था त्यांच्या सर्व उत्पन्नाच्या बाबी खाऊन टाकील, इतकेंच नव्हे तर शेंकडा २१ खर्चाची अधिक जबाबदारी झेपतांही येणार नाहीं. तेव्हां, शेंकडा ३३.३ हें प्रमाण लोकल

बोर्डाकडून शिक्षणाप्रीत्यर्थ होणाऱ्या नव्या खर्चासंबंधांत लावण्यांत येईल पण आज होणाऱ्या खर्चासंबंधांत सरकार आपल्या ग्रँट्स् कमी करणार नाहीं."

म्युनिसिपालिट्यासंबंधांत प्राथमिक शिक्षणाबाबत होणाऱ्या खर्चापैकीं शेंकडा ५० ग्रँट मिळत असते. ह्यांत ग्रँट इन् एड संस्थांचाही समावेश झालेला आहे.

डॉ. परांजपे यांनीं सरकातर्फे वरीलप्रमाणें स्पष्ट आश्वासन दिलें तरी सुद्धां सरकारकडून मिळणारी ही मदत अपुरी असेंच बिनसरकारी बाजूच्या प्राय: प्रत्येक वक्त्यानें आपलें मत दिलें. त्यावेळीं असलेले नॉमिनेटेड सभासद व डॉ. परांजपे यांच्या मागून शिक्षण मंत्र्याच्या जागेवर आलेले मि. जाधव यांचेंच मत येथें देणें मला श्रेयस्कर वाटतें. याप्रसंगीं मि. जाधव यांनीं पुढील आशयाचे उद्गार काढले:—

" शिक्षणाची ही राष्ट्रीय जबाबदारी सरकारनेंच आपल्या शिरावर घेतली पाहिजे. ती स्थानिक संस्थांवर टाकतां कामा नये. लोकल बोर्डांना प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारकडून आज जी मदत मिळत आहे ती कायमच राहील, पण ह्याप्रीत्यर्थ बोर्डाकडून जो जादा खर्च होईल त्याचा एकतृतीयांश बोर्डाकडून घेण्यांत येईल व २/३ सरकारकडून घेण्यांत येईल असें सांगण्यांत आलें. पण,सरकारचें हें धोरण उदारपणाचें आहे असें म्हणतां येत नाहीं. आतांपर्यंत प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चापैकीं ७/८ किंवा ९/१० येवढा सरकार सोशींत होतें व बाकीचा १/८ किंवा १/१० एवढाच खच लोकल बोर्डांना करावा लागत असे. हेंच प्रमाण यापुढेंही कायम ठेवून सरकारनें आपली पूर्वींचीच जबाबदारी घेण्यास तयार झालें पाहिजे. कारण शिक्षणाचा हा प्रश्न राष्ट्रीय असल्याकारणानें तो स्थानिक संस्थांच्या आवडीनिवडीवर सोंपविण्यांत येतां कामा नये.

तुमच्यापैकीं पुष्कळांना हें कदाचित् माहीत नसेल कीं, शिक्षण बिलावर जी सिलेक्ट कमिटी नेमिली तिनें शिक्षणमंत्र्यांच्या संमतीनेंच सरकारच्या ग्रँटचें हें प्रमाण २/३ पासून ३/४ पर्यंत वाढविण्यांत यावें आणि म्युनिसिपालिट्यांसंबंधांतही सरकारच्या ग्रँटचें प्रमाण शेंकडा ५० जरी ठरलें असलें तरी विवक्षित प्रसंगीं हें प्रमाण वाढविण्यासही हरकत असूं नये, अशी शिफारस केली. लोकल बोर्डांना सरकारकडून मिळणाऱ्या ग्रँटमध्यें कोणत्याही प्रकारें फरक करण्यांत येणार नाहीं असें त्यावेळीं आश्वासन देण्यांत येऊन बिलांत तसें कलमही घालण्यांत आलें.

शिक्षणमंत्र्यांनीं असें स्पष्ट आश्वासन दिलें. त्या आश्वासनानुरूप एका कलमाचाही कायद्यांत समावेश झाला. पण डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशन यांनीं सरकारच्या हुकुमावरून ता. ५ फेब्रुवारी १९२६ रोजीं एक प्रेसनोट काढली व स्थानिक संस्थांना १९२१–२२ सालीं, ज्या ग्रँट्स मिळत होत्या त्या तशाच पुढें चालू राहातील असा जो या कलमाचा अर्थ करण्यांत येतो तो चुकीचा आहे. दुसऱ्या कोणत्या कायद्यान्वयें स्थानिक संस्थांना ग्रँट्स मिळण्यासंबंधाचे जे हक्क मिळाले असतील त्यांस या कलमानें बाध येणार नाहीं, असाच या कलमाचा अर्थ असल्याचें सदर प्रेसनोटच्या द्वारें जाहीर करण्यांत आलें.

कायदे कौन्सिलमध्यें बिलावर चर्चा चालू होती त्या वेळीं ॲडव्होकेट जनरलनींही १९२२ च्या डिसेंबरमध्यें असा खुलासा केला होता असेंही ह्या प्रेसनोटमध्यें म्हटलें आहे.

ॲडव्होकेट जनरलनीं जो खुलासा केला आहे असें प्रेसनोटमध्यें म्हटलें आहे, तो खुलासा कायदे कौन्सिलच्या कामकाजांचें जें छापील पुस्तक काढलें आहे त्यांत त्यांचा मागमूसही सांपडत नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे !

डायरेक्टर ऑफ इन्फर्मेशनच्या प्रेसनोटमध्यें पुढील आशयाचा मजकूरही घातला आहे:--

लोकल बोर्डांना मिळणाऱ्या ग्रँट्स पुढेंही चालू राहातील असें सरकारनें बंधन लावून घेणें अन्यायाचें होईल. १९२२-२३ सालापूर्वीं लोकलबोर्डांनीं विशिष्ट हेतूनें केलेल्या खर्चाप्रीत्यर्थ त्यांना कांहीं सालींना जादा ग्रँट्स देण्यांत आल्या होत्या. नवीन प्राथमिक शाळा उघडणें, युद्धाप्रीत्यर्थ महागाई भत्ता देणें वगैरे उद्देशांकरितां सरकारकडून जादा ग्रँट्स देण्यांत आल्या. शिक्षकांचे पगार वाढविण्याप्रीत्यर्थही स्पेशल ग्रँट्स मंजूर झाल्या. सरकारनें ह्या जादा खर्चाची सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली. ह्या ग्रँटस सतत पुढें चालू राहतील असें सरकारवर केव्हांही बंधन नव्हतें, विशिष्ट हेतूप्रीत्यर्थ किती खर्च झाला ह्यावरूनच ह्या ग्रँट्सचें प्रमाण ठरविण्यांत येत होतें.

प्रेसनोटमधील हा मजकूर शिक्षणमंत्र्यांनीं दिलेल्या आश्वासनाशीं किंवा कलम १३ ( २ ) यांतील शब्दयोजनेशीं सर्वस्वीं विसंगत आहे. वरील कलमांतील शब्दयोजना इतकी स्पष्ट आहे कीं, त्याच्या अर्थासंबंधांत कोणत्याही प्रकारची चाळवाचाळव करणें शक्य नाहीं. स्थानिक संस्थांना १९२३ च्या फेब्रुवारींत ज्या

ग्रँटस देण्यांत आल्या त्या तशाच पुढें देण्यांत आल्या पाहिजेत. त्यांतील एक पैही त्यांना कमी करतां येत नाहीं. स्थानिक संस्थांनीं सोसावयाच्या शेंकडा १० अथवा बारा रकमेंत लोकल फंडांतून आलेल्या पैशापैकीं ज्या रकमेचा उपयोग झाला नसेल ती रक्कम सरकारास वजा करतां येत नाहीं. ह्यासंबंधांत हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ज्याचा निर्देश विशिष्ट ग्रँट्स म्हणून केला आहे, त्या विशिष्ट ग्रँट्स प्राथमिक शिक्षणाकरितांच होत्या. शिक्षणमंत्र्यांनीं आपल्या भाषणांत ग्रँट्स हा अनेकवचनी शब्द उपयोगांत आणला होता. त्यांत कलमामधील कोणतीही ग्रँट यांत त्यांचा समावेश होतो.

म्युनिसिपालिट्यांसंबंधांतही ही स्थिति अधिक चांगली आहे असें नाहीं. शिक्षणाचा कायदा अमलांत येण्यापूर्वीं प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारकडून खर्चाच्या शेंकडा ५० ग्रँट्स मिळत आहे. त्यांत सरकारची मदत मिळणाऱ्या ग्रँट्सचाही समावेश होतो. याशिवाय सरकारनें मंजूर केलेल्या शाळांना शिक्षण खात्यामार्फत ग्रँट्स मिळत असत. त्या वेगळ्याच शाळांना घेणाऱ्या अर्थात् एडेड स्कूल्सना म्युनिसिपालिट्या जितकी ग्रँट देतात त्याच्या निम्मे म्हणजे शेंकडा ५० ग्रँट्स सरकारनें देणें हें नैतिक दृष्ट्या अगदीं रास्त आहे. हें वरवर पहाणारासही दिसून येईल. रजिस्टर्ड लायब्रऱ्यांना म्युनिसिपालिट्यांकडून ज्या ग्रँट्स देण्यांत येत असत त्याचा निम्मे भागही सरकारकडून मिळत असे. त्याचप्रमाणें एका शाळेस ग्रँट इन् एडच्या कलमाप्रमाणें ग्रँट देण्यांत येऊन शिवाय तिला म्युनिसिपालिट्यांकडून जी ग्रँट मिळेल त्याचाही निम्मे भाग सरकारकडून देण्यांत येत असे. पण प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ म्युनिसिपालिटीनें प्रत्यक्ष केलेला खर्च चसरकारकडून जमेंत धरण्यांत येईल असें शिक्षणखात्याच्या डायरेक्टरांनीं ता. १८ फेब्रुवारी १९२५ रोजीं जाहीर केलें.

यानंतर कलम २७ खालीं सरकारनें त्याचप्रमाणें स्थानिक संस्थांनीं एडेड स्कूल्सना विद्यार्थ्यांच्या संख्येप्रमाणें ग्रँट्स द्याव्यात, खर्चाप्रमाणें देऊं नयेत असें ठरविलें. सरकारनें मंजूर केलेल्या एडेड स्कूल्सच्या ग्रँटस देण्याचें सरकारनें बंद केलें. कारण त्यांचें म्हणणें असें आहे कीं, शिक्षणाच्या कायद्यान्वें या शाळांना ग्रँटस् देणें हें म्युनिसिपालिटीचेंच कर्तव्य आहे. सरकारचें हें म्हणणें खरें असलें तरी म्युनिसिपालिटीकडून एडेड स्कूल्सना पूर्वीच्या ग्रँटची रक्कम कायम ठेवण्यासाठीं जितक्या अधिक ग्रँटस् देण्यांत येतील त्याचा निम्मा हिस्सा सरकारनें कायदेशीर रीतीनें सोसला पाहिजे.

कलम २७ मध्यें सरकारला असे नियम करतां येतात असें कोठेंही सांगितलें नाहीं. यानंतर सरकारनें ता. १२ मार्च १९२६ व ता. ३१ मे १९२७ रोजींचे दोन ठराव काढले. चालू सालांत सरकारनें आपल्या क्षेत्रांतील प्राथमिक शाळांना एकंदर जितक्या ग्रँट्स् दिल्या असतील त्यांतून या शाळांना म्युनिसिपालिटीनें सन १९२४-२५ सालीं दिलेल्या ग्रँटस्‌ची निम्मे रक्कम वजा करून बाकीची रक्कम म्युनिसिपालिटीला ग्रँट म्हणून द्यावयाची असें त्यांत म्हटलें आहे. हाही नियम म्युनिसिपालट्यांना बाधकच आहेत. कारण १९२४-२५ सालानंतर म्युनिसिपालिटीनें ज्या अधिक ग्रँटस् दिल्या असतील त्यांचा विचार झालेला नाहीं; त्याचप्रमाणें स्थानिक संस्थांकडूनच ज्या शाळांना मदत मिळते, पण सरकारकडून मदत मिळत नाहीं अशा शाळांचाही विचार यांत केला नाहीं. कायदा होण्यापूर्वी सरकार एडेड स्कूलसना प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा विवक्षित भाग ग्रँट्च्या रूपानें देत असे. पण, आतां प्रत्येक मुलाचा खर्च १० किंवा १२ किंवा ४ किंवा ६ धरून त्याच्या निम्मेच ग्रँट द्यावयाची अशी सरकारनें शिरत ठेविली आहे. ह्या सर्व हकीगतीवरून हें ध्यानांत येईल कीं, म्युनिसिपालिट्यांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या खर्चाचा निम्मे भाग सरकारकडून त्यांना मिळावा असें जरी कायद्यांत कलम आहे तरी मदत घेणाऱ्या शाळांच्यासंबंधांत पुष्कळ म्युनिसिपालिट्यांना शेंकडा ३० ग्रँटही मोठ्या मारामारीनें मिळते. म्हणजे या बाबतींत सरकारचा खर्च कमी झालेला आहे. आणि त्याचप्रमाणें म्युनिसिपालिटीचा वाढला आहे.

## शाळेच्या इमारती.

शाळेकरितां इमारती बांधण्यासाठीं स्थानिक संस्थांना ग्रँट देण्याच्या बाबतींत सरकारनें अलीकडे फारच कुंजूषपणाचें धोरण स्वीकारलेलें आहे. ता. १ सप्टेंबर १९२३ रोजीं मुंबई सरकारचा २३१ नंबरचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यांत असें स्पष्टपणें कबूल केलें आहे कीं, शाळेच्या सोयीची इमारत बांधण्यास सरकारी पब्लिक वर्कस खात्याला दर विद्यार्थ्यामागें १०० ते १५० रु. इतका खर्च येतो. शाळेच्या इमारतीसाठीं जो खर्च येतो. त्यांतील निम्मा खर्च देण्याला सरकार कायद्यानें बांधलें गेलें आहे. असें असतांही ता. २६ मे १९२६ रोजीं सरकारनें वरील ठरावाशीं विसंगत असा एक ठराव काढला आहे. स्थानिक संस्थांना शाळेच्या इमारतींसाठीं प्रत्यक्ष किती खर्च येतो, त्याचा विचार न करतां दर मुलामागें ४० रु. हा वट खर्च धरून निम्मा म्हणजे २० रु. एवढीच ग्रँट देण्यांत

येईल असें सरकारनें या ठरावाअन्यें जाहीर केलें आहे ! शहरांतून व खेड्यांतूनही दर विद्यार्थ्यामागें ४० रु. या खर्चानें शाळेच्या योग्य इमारत बांधणें अशक्य आहे, हें म्युनिसिपालिट्या व लोकल बोर्डें यांच्य सभासदांना मीं समजावून सांगावें असें नाहीं. नवीन शिक्षणमंत्र्यांना त्यांच्यां जिल्हा बोर्डाच्या कामाचा जो अनुभव आहे यावरूनही त्यांना ही गोष्ट सहज कळ-ण्यासारखी आहे. सरकारनें आपल्या पब्लिक वर्क्स खात्यामार्फत शाळेकरितां नमु-न्यादाखल कांहीं इमारती बांधून पाहाव्या, म्हणजे प्रत्यक्ष किती खर्च येतो हें समजून येईल. स्थासिक स्वराज्य संस्थांवर सध्यां खर्चाचा रोज नवीन नवीन बोजा पडत आहे. अशा स्थितींत शाळेच्या इमारती बांधण्याच्या बाबतींत सरका-रनें असें अनुदार धोरण स्वीकारणें केव्हांही श्रेयस्कर नाहीं. माजी शिक्षणमंत्री परांजपे यांनीं ता. २९ सप्टेंबर १९२२ च्या ठरावान्वयें जें धोरण जाहीर केलें तेंच सध्यांच्या शिक्षणमंत्र्यांनीं स्वीकारलें पाहिजे.

## अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकें.

प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीनें एक आनंददायक व उत्साह वाढविणारी गोष्ट म्हटली म्हणजे प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम व क्रमिक पुस्तकें ठरविण्याच्या पूर्वीच्या पद्धतींत नवीन कायद्यानें केलेला फरक होय. सरकारनें प्रथम पसंत केलेल्या पुस्तकांच्या यादींतूनच परंतु स्कूलबोर्डांनीं आपापल्या स्थानिक परिस्थितीला अनुकूल अशा पुस्तकांची निवड करण्याला कायद्यानें आतां मोकळीक दिलेली आहे. या भागांतील वाङ्मय कमिट्या सरकारच्या मदतीखेरीज स्वतंत्रपणें क्रमिक पुस्तकांची निवड करूं इच्छितात असें मी ऐकतों, पण आमचा प्रांत या बाबतींत फारच मागासलेला आहे. तेथें वाङ्मय इतकें कमी आहे कीं, क्रमिक पुस्तकें निवडून काढणेंही फार कठीण पडतें. प्रत्येक प्रांताकरितां वेगवेगळ्या कमिट्या असाव्या व त्यांनीं आपल्या पसंतीप्रमाणें क्रमिक पुस्तकांची निवड करावी किंवा नवीन तयार करवून घ्यावीं व त्यांना अखेरची मंजुरी देण्याचें काम सरकारकडे राहावें अशी व्यवस्था घडून येणें आवश्यक आहे.

गेल्या वर्षाच्या आपल्या परिषदेनें क्रमिक पुस्तकासंबंधानें जो ठराव केला होता त्याकडे शिक्षणखात्याचे लोकप्रिय डायरेक्टर मि. लोरी यांनीं लक्ष पुरवून विषयाची निवड करण्याच्या कमिटीवर शाळाखात्यांतील चार अधिकारी नेमिले व या कमिटीचा रिपोर्टही आपणांपुढें आलाच आहे. कमिटीनें केलेली विषयांची निवड

तत्त्वत: पसंत असली तरी आणखीही बरेच उपयुक्त विषय त्यांना घालण्यासारखे आहेत. परंतु नुसते विषय ठरविल्यानें हा प्रश्न सुटत नाहीं, मुख्य अडचण त्यापुढेंच असते. डॉ. परांजपे सन १९२१ मध्यें कायदे मंडळांत निवडून येऊन जेव्हां दिवाण झाले त्यावेळीं देशी भाषेंतील वाङ्मयाचे उत्तेजनासाठीं एक लाख रुपये एवढी रक्कम राखून तिचे खर्चासंबंधीं आपला विचार त्यांनीं मजजवळ बोलून दाखविला होता. परंतु तसें कांहींच घडून आलें नाहीं. डॉ. परांजपे यांच्यानंतर आलेल्या शिक्षण मंत्र्यांनीं देशभाषांतील वाङ्मयाला उत्तेजन देण्याकरितां अवघी ५ हजार रुपयांची तुटपुंजी रक्कम मंजूर केली. या रकमेंत तीन चार वाचनपाठ व (१) शेतकी शिक्षण, (२) इतिहास भूगोल, अर्थशास्त्र व शासन शास्त्र व (३) आरोग्यज्ञान, रुग्ण परिचर्या वगैरे पुस्तकें तयार करण्याची सोय केलेली होती ! परंतु तिचेंही पुढें काय झालें हें कळत नाहीं. खेडेगांवांतून शेतीच्या धंद्याचें प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था करणें जसें जरूर आहे त्याचप्रमाणें शहरांतील प्राथमिक शाळांतूनही मुलांना शारीरिक श्रमाचें निरनिराळ्या धंद्याचें शिक्षण देण्याची व्यवस्था ज्या त्या ठिकाणच्या स्थानिक परिस्थितीस अनुसरून करणें इष्ट आहे. इंडियन फिस्कल कमिशननें १९२४ मध्यें केलेल्या रिपोर्टांत लोकांमध्यें औद्योगिक शिक्षणासंबंधानें किती अज्ञान दिसत आहे ही गोष्ट सरकारच्या नजरेस आणली असून या बाबतींत सुधारणा करण्याची जोराची शिफारस केली आहे. शिवाय सध्यांची एकंदर परिस्थिति व लोकमत पाहिलें तर औद्योगिक शिक्षणाचा उपक्रम प्राथमिक शाळांतून करणें किती अवश्य आहे हें विस्तारानें सांगणें नलगे. नैतिक शिक्षणाचेंही महत्त्व मी कमी समजतों असें नाहीं. लहान मुलांच्या कोवळ्या मनावर नैतिक शिक्षणाचा संस्कार घडून येण्याकरितां योग्य अशीं पुस्तकें शाळांतून लाविलींच पाहिजेत. आपल्या इतिहासांतील थोर पुरुषांच्या उदात्त व बोधप्रद गोष्टी लहान मुलांना शिकविण्यांत आल्यास त्यांपासून मुलांचें शील बनण्यास फार उपयोग होईल यांत शंका नाहीं.

## पुणें येथील नवीन मराठी शाळा.

पुणें येथील डेक्कन एज्युकेशन सोसायटीची प्रो. जोग यांच्या नेतृत्वाखालीं चाललेली नवीन मराठी शाळा मीं नुकतीच पाहिली. सृष्टिनिरीक्षण व रंग ज्ञान यांच्या शिक्षणाची येथें उत्कृष्ट व्यवस्था केलेली असून शिक्षणक्रम कसा असावा यासंबंधानें आपल्या ज्या कल्पना आहेत त्या प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याचें कार्य या शाळेनें केलें आहे. या उपयुक्त संस्थेला भेट देण्यापासून शिक्षणप्रेमी गृहस्थांना

फायदा होण्यासारखा आहे. अशा प्रकारची निदान एक एक नमुनेदार शाळा दरएक जिल्हा बोर्डानें, व मोठ्या म्युनिसिपालिटीनें स्थापन करण्याचें ठरविल्यास त्यांना अशक्य नाहीं.

## शिक्षकांचे पगार.

शिक्षकांचे पगार वाढविले जावेत अशा मताचा मी कट्टा पुरस्कर्ता असून कायदे मंडळांत व कायदेमंडळाबाहेरही या दृष्टीनें माझ्याकडून प्रयत्न होत असतो शिक्षकांचे पगार वाढविण्यानें सरकार व स्थानिक संस्था यांचेवर खर्चाचा आणखी बोजा पडणार हें मी जाणून आहें; परंतु शिक्षक जर संतुष्ट व कर्तव्यदक्ष लाभतील तर हा होणारा खर्च सत्कारणी करण्यांत आला असेंच दिसून येईल. कारकून वर्गाचे पगार वाढविण्यापेक्षांही शिक्षकांचे पगार वाढविण्याची गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण शिक्षकाचें काम भावी पिढीला शिक्षण देऊन तयार करण्याचें असतें. सरकारनें या बाबतींत फारच हेळसांडीचें वर्तन चालविलें आहे; ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट आहे. सध्यांच्या शिक्षणमंत्र्यांना शिक्षकांच्या दुःस्थितीची माहिती असून त्यांना शिक्षकवर्गाबद्दल सहानुभूतिही वाटते ही गोष्ट त्यांनीं कृतीनें दाखविणें जरूर आहे. सरकारला हें काम आज ना उद्यां केव्हां तरी करावें लागणार हें उघड आहे. मग व्यर्थ दिरंगाई कां करावी ? पोकळ कमिट्या नेमण्यांत किंवा थोडासा अलौन्स देऊन सारवासारव करण्यांत सध्यांचे शिक्षणमंत्री आपली तीन वर्षांची कारकीर्द दवडणार नाहींत अशी मला आशा आहे. याबरोबरच मला असें सांगणें भाग आहे कीं, अलीकडे शिक्षक वर्गाचा दर्जा फारच खालावला आहे. शहरांतून व खेड्यांतून असणाऱ्या शिक्षकांकडे पाहिलें तर विद्यार्थ्यांना चांगलें शिक्षण देऊन तयार करण्याची काळजी ते विशेष घेत नाहींत व द्रव्यार्जनासाठीं इतर कांहीं धंदे करण्याकडेच त्यांचें लक्ष अधिक असतें असें दिसून येतें. सांपत्तिक अडचणी व फार वर्षांची होत असलेली निराशा यामुळेंही शिक्षकांचें लक्ष आपल्या कर्तव्यावरून उडत चाललें असेल हें संभवनीय आहे, तथापि कांहीं असलें तरी त्यांनीं आपल्या मुख्य कर्तव्याकडे दुर्लक्ष करणें केव्हांही इष्ट नाहीं. ते जर दुर्लक्ष करतील तर त्यांचेविषयीं आज जनतेला वाटणारी सहानुभूति नाहींशी झाल्यांवांचून राहाणार नाहीं.

## स्त्रीशिक्षण.

महाराष्ट्रांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार बराच झाला आहे. येथें मुलांप्रमाणेंच मुलीही शिक्षण घेण्याकरितां उत्सुक दिसतात व येथें शिक्षणाच्या सोयीही असून शिक्ष-

णाला खर्च फार येत नाहीं. परंतु आमच्या सिंध प्रांतांत याच्या अगदीं उलट स्थिति आहे. स्त्रीवर्गांत शिक्षणाची आवड कमी, त्यांतून शिक्षकिणी मिळण्याचीही पंचाईत असते. यामुळें स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत सिंध प्रांत फारच मागसलेला आहे. बरें, अशाही स्थितींत कांहीं उत्साही व शिक्षणाभिमानी स्त्रीपुरुष कांहीं प्रयत्न करूं म्हणतील तर सरकारी नियमांचीं बंधनें त्यांच्या आड येतात. मुलींच्या पहिल्या प्रतीच्या म्हणजे "अ" वर्गातील शाळेला दर मुलीमागें रु. १५ ते १८ व "ब" वर्गातील शाळेला ६ रु. प्रमाणें सरकार ग्रँट देतें. पण म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें यांना अशा शाळा चालविण्याला किती अधिक खर्च सोसावा लागतो याचा विचार सरकार करीत नाहीं. शिवाय हिंदी भाषेच्या शिक्षणासंबंधानेंही अडचण आहे ती निराळीच. आपल्या मुलींना हिंदी भाषेंतून शिक्षण मिळावें असा आईबापांचा आग्रह असतो. परंतु हिंदी भाषेच्या शिक्षणाला सरकारची मान्यता नाहीं. त्यामुळें हिंदींतून शिक्षण देणाऱ्या शाळांना सरकार मुळींच ग्रँट देत नाहीं व त्यांच्या खर्चाचा सर्वच बोजा स्थानिक संस्थांना पत्करणें भाग पडतें. या कारणांनीं सिंध प्रांतांत स्त्रीशिक्षणाची प्रगति व्हावी तशी होत नाहीं.

असो; मी आपलें भाषण पुरें करण्यापूर्वी त्याचा मथितार्थ थोडक्यांत सांगतों. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यांत अद्यापि कांहीं दोष आहेत व त्या कायद्याच्या अंमलबजावणीकरितां केलेले नियमही एकतर्फी व पक्षापातीपणाचे आहेत. ही गोष्ट या परिषदेनें स्पष्टपणें सरकारचे निदर्शनास आणून देणें जरूर आहे. इतकेंच नव्हे तर या कायद्यांतील व नियमांतील दोष ज्यांना अनुभवानें कळून चुकले आहेत अशा गृहस्थांची एक कमेटी नेमून सरकारनें त्यांची पुनर्घटना करावी अशी निकड आपण लाविली पाहिजे. स्थानिक संस्थांना द्यावयाच्या ग्रँटचें प्रमाण जोंपर्यंत वाढविण्यांत येत नाहीं तोंपर्यंत सरकारनें उत्पन्नाच्या बाबींच्या वांटणीसंबंधानें तरी फेर विचार करून स्थानिक संस्थांस अनुकूल अशा नवीन व्यवस्था अमलांत आणावयास पाहिजेत. त्याचप्रमाणें वाङ्मयास उत्तेजन देण्याची व सबंध इलाख्यांतील शिक्षणास योग्य व हितकर वळण लावण्याची संघटित चळवळ होईल असे प्रयत्न या परिषदेनें सुरू केले पाहिजेत मुलांचें आरोग्य चांगलें राखण्यासाठीं लोकलबोर्डें व म्युनिसिपालिट्या यांनीं आपले ताब्यांतील शाळांत शारिरिक शिक्षण देण्याचा उपक्रम ताबडतोब सुरू करावा. आपल्या न्याय्य मागण्यांना व आकांक्षांना उत्तेजन देतील अशा प्रकारचे गृहस्थ सध्यां शिक्षण खात्याचे डायरेक्टर म्हणून आपणांस लाभले आहेत. याकरितां सर्व स्कूलबोर्डांकडून वरील दिशेनें जर संघटित

प्रयत्न होईल तर या परिषदेच्या कार्यास यश आल्यावांचून राहाणार नाहीं, एवढें सांगून व आपले पुन्हा एकदां आभार मानून मी आपलें भाषण संपवितों.

परिषदेचे अध्यक्ष मि. पहालाजानी यांचें भाषण झाल्यावर रा. गोपाळराव देवधर यांनीं थोडें भाषण करून सेवासदन सोसायटीस सर्व प्रतिनिधींनीं भेट द्यावी अशी जाहीर विनंति केली. त्याप्रमाणेंच प्रो. जोग यांनींही सर्व प्रतिनिधींना डे. एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळेस भेट देण्याविषयीं विनंति केली. नंतर नानावाड्यांत लहान मुलांच्या हस्तकौशल्याचें जें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें तें सर्वांनीं घरीं जाण्यापूर्वी अवश्य पाहावें अशी विनंति नगराध्यक्ष डॉ. नायडू यांनीं केल्यावर परिषदेचें सोमवार रोजींचें सकाळचें काम संपलें.

---

—इटाली देशांत रोम शहरीं विमानांच्या बाबतींत हल्लीं कांहीं प्रयोग चालू आहेत ते यशस्वी झाल्यास विमानमार्गानें रोमहून लंडनला एक तासांत व न्यूयार्कला ६ तासांत जातां येईल. ती युक्ति अशी आहे कीं, पृथ्वीच्या पृष्ठभागापासून २५००० फूट उंचीवर हवा फारच विरळ असते; त्यामुळें त्या हवेपासून विमानाच्या गतीला फारच थोडा विरोध होतो. परंतु विरल हवेमुळें श्वासोच्छ्वासास अडचण पडते, ती दूर केली असतां विमानाचा वेग पुष्कळ वाढवितां येईल. त्यासाठीं खालच्या हवेइतक्या दाबाच्या हवेचा विमानांत भरपूर पुरवठा केला पाहिजे. हे प्रयोग यशस्वी झाल्यास जगाचे भाग एकमेकांना जास्तीच जोडल्यासारखे होतील !

---

# खलाशी हेनरी.

पंधराव्या शतकाच्या अगोदर पूर्वेकडील देशांच्या वैभवाच्या हकीगती प्रवाशांच्या तोंडून ऐकून या देशाशीं व्यापार करण्याची युरोपियन राष्ट्रांच्या मनांत इच्छा उत्पन्न झाली. जमिनीवरील मार्ग निरनिराळ्या देशांमधून गेले असल्यानें व ठिकठिकाणीं मालाची चढउतार होतांना अफरातफर होण्याचा फार संभव असल्यानें या मार्गानें माल पाठविण्यास व्यापारी फारसे धजत नसत, म्हणून नवीन जलमार्ग शोधून काढण्याच्या प्रयत्नांना पंधराव्या शतकाच्या थोडे अगोदरच सुरुवात झाली होती; पण १४५३ सालीं तुर्क लोकांनीं पूर्वेकडील रोमन साम्राज्याची राजधानी कॉन्स्टंटिनोपोल शहर जिंकून व्यापारी मार्ग बंद केल्यावर या प्रयत्नांना जास्तच प्रोत्साहन मिळालें.

" परिस्थिति धाडसी पुरुष निर्माण करते " असें म्हणतात तें पुष्कळ अंशीं खरें आहे. पोर्तुगालचा ' खलाशी राजपुत्र ' चौथा हेनरी याचा बाप पहिला जॉन राजा याच्या कारकीर्दींत नौकानयनाकडे पोर्तुगाल देशानें लक्ष देण्यास सुरुवात केली होती. हेनरी १३९४ सालीं जन्मला, व त्यानें आपल्या वयाच्या २०।२२ वे वर्षीं आरमारी आधिपत्य स्वीकारून आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील स्यूटा हें अरबांचें बंदर जिंकून घेतलें, व आपलें नांव युरोपखंडांत सर्वतोमुखीं केलें. कारण अरब लोकांनीं आरमाराच्या बाबतींत खरोखर तसाच दरारा सर्व युरोपखंडावर बसविला होता.

ह्या लढाईनंतर स्वदेशीं परत आल्यावर चौथ्या हेनरीनें नौकानयन व खगोलशास्त्रांत पूर्ण लक्ष घातलें, व पोर्तुगाल देशांत व्हिन्सेंट भूशिराजवळ आपली वेधशाळा बांधून नवीन शोध लावण्याच्या कल्पना या ठिकाणीं परिणतावस्थेस नेल्या. त्यानें नवें आरमार बनविलें व नवीन प्रदेश शोधण्यासाठीं त्याची रवानगी केली. या सफरींत पोर्टो सँटो या बेटाचा शोध लागला. या बेटावर नेमिलेल्या पहिल्या गव्हर्नरची मुलगी ती कोलंबसाची बायको ! ! नंतर मदिरा बेटें सांपडलीं. या बेटांत द्राक्षें, ऊंस, लाकूड व गहूं इतके जिन्नस पुढें पिकूं लागले, व या दृष्टीनें पोर्तुगाल देशाचा फायदा झाला. यानंतर क्रमानें केपव्हर्ड व अझोर्स ह्या भागांचा शोध लागला.

या राजानें स्यूटा हें ठिकाण घेतलें होतें, व याच्या समोरच्या गिनीच्या किनाऱ्यावरील सारवानांच्या मार्गाचें दुसरें टोंक आपल्या हातांत यावें याबद्दल त्याची खटपट सुरू होती. याच्या कारकीर्दींत पोर्तुगाल देशाचें वैभव वाढूं लागलें; व समुद्रावर धाडस करणारे लोक निर्माण झाले. या धाडसी लोकांनीं या राजाच्या कारकीर्दींत आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यापैकीं निम्मा म्हणजे गिनीच्या आखातापर्यंतचा भाग शोधून काढला; व या किनाऱ्यांवरून ते सोनें, हस्तिदंत व नीग्रो लोक युरोपखंडास विकूं लागले.

या कारकीर्दींत मिळालेला धडा पोर्तुगीज लोकांनीं चांगला गिरविला; व पुढील दुसऱ्या जॉन राजाच्या कारकीर्दींत त्यांनीं पश्चिम किनाऱ्यानें दक्षिणेकडे जात जात हिंदुस्तानाला जाण्याचा मार्ग शोधून काढला.

चौथा हेनरी हा इ. सन १४६० सालीं ६६ वर्षांचा होऊन मरण पावला.

या राजाच्या वेळेपासून नवीन युगाला सुरुवात झाली असें म्हणतां येईल. म्हणून या राजाची कारकीर्द युरोपच्या इतिहासांत फार महत्त्वाची आहे.

---

# आजचा इराण.

इराण हा देश आशिया खंडांतील निरनिराळ्या स्वतंत्र राष्ट्रांत गणला जात असून फार दिवसांपासून प्रसिद्ध आहे. या देशांत मुसलमानी धर्म स्थापन होण्यापूर्वीं या देशाचें साम्राज्य सबंध पश्चिम आशियांत पसरलें होतें. कॉकेशस पर्वत सोडल्यावर आर्य लोकांच्या टोळ्या प्रथमतः याच देशांत उतरल्य, व नंतर त्यांपैकीं कांहीं हिंदुस्तानांत आल्या. इराणांत पूर्वीं पार्शी लोक राहात असत, पण मुसलमानांची तरवार चमकल्यावर पुष्कळ पार्शी लोकांनीं हिंदुस्तानचा किनारा गांठला. तेच पार्शी लोक आज मुंबईस आपणांस दिसतात; या धर्माचे लोक थोड्या प्रमाणांत अद्यापही इराणांत पाहावयास मिळतात.

पुणें, मुंबई वगैरे शहरांत इराणी लोकांनीं काढलेलीं हॉटेल्स सर्वत्रांच्या पहाण्यांत येतात. त्यांवरून इराणी लोक कसे दिसतात, हें पुष्कळांना माहीत असेल.

हे लोक उंच, सशक्त व गोरे असतात. अंगांत लांब सद्रा, वर एक लहान जॅकीट, पायांत विजार व डोक्याला घट्ट बसणारी तसराळ्याच्या आकाराची लहान टोपी या पोशाखांत ते काम करतांना दिसतात; पण इराणांत या कपड्यांशिवाय ते वरून एक लांब झग्यासारखा अंगरखा घालतात व डोकीस ( पार्शी लोकांच्या सारखी ) उभट पातेल्याच्या आकाराची टोपी घालतात. मुसलमानी धर्मांत दाढी ठेवणें जरूर असलें तरी पुष्कळ लोकांना दाढी दिसत नाहीं. ते पायांत चढाव घालतात. या देशांत थंडी विलक्षण पडते म्हणून दिवसांत त्यांचे पोषाख लोकरीचे असतात. मुसलमानी धर्मानें स्त्रियांना बुरख्यांत ठेवल्या;त्यामुळें हा देशहीं स्त्रियांच्या या बाबतींत अपवाद नाहीं; तथापि वरून बुरखा असला तरी युरोप खंडाशीं हल्लीं तेथील लोकांचा परिचय वाढल्यामुळें तेथील फॅशन्स, पावडर्स, रंग वगैरे सर्व गोष्टी इराणांत स्त्रियांनीं स्वीकारल्या आहेत असें पाहून आलेले प्रवासी सांगतात.

कोणीही माणूस या देशांत प्रवासास निघाला तर त्याला बैलगाड्यांतून प्रवास करावा लागत असे. हल्लीं पुष्कळ भागांत मोटारी सुरू झाल्या आहेत. रस्ता बहुतेक रुक्ष असतो व वाटेनें बहुतेक भाग डोंगराळ लागतो. मधून मधून शहरें वसलेलीं आढळतात. ठिकठिकाणीं प्रवाशांना उतरण्यासाठीं धर्मशाळा आहेत. त्यांना खान म्हणतात. या ठिकाणीं प्रवाशांना बहुतकरून चहा मिळतो. वाटेनें चोर दरवडेखोर वगैरेंची फार भीति असे पण सरकारनें अशा लोकांना पकडून कडक शिक्षा दिल्यानें ही भीति अलीकडे बरीच मोडली आहे. एकादा दरवडेखोर धरून आणला म्हणजे त्याला शिक्षा देण्यासाठीं तेहेरान शहराबाहेर एक मोठें मैदान राखून ठेवलें आहे तेथें आणतात; व तोफेच्या तोंडासमोर बांधून स बत्ती देतात, म्हणजे त्याच्या शरिराचे राईएवढे तुकडे होतात. अशी दहशत असल्यानें कोणी फारसे दरवडे घालण्याच्या भानगडींत पडत नाहींत.

तेहेरान या राजधानीच्या शहरांत आपण आलों तर तेथील रस्ते व त्यांत पडलेली घाण पाहून आपणांस तेथील गलिच्छ राहाणीची किळस येईल. येथील लोकांच्या दुकानांतून अंधेर व गलिच्छपणा यांची समृद्धि असते, पण येथील अमेरिकन लोकांचीं दुकानें, इस्पितळें व इतर इमारती यांतील स्वच्छता प्रेक्षणीय असते. मोठ्या शहरांत चहापानगृहें, रोटीगृहें, स्नानगृहें व बर्फाचे कारखाने या गोष्टी हटकून असतात. येथील रोट्या अगर पोळ्या आपल्याप्रमाणें लहान नसतात. त्या मोठाल्या पत्रावळीएवढ्या विस्तीर्ण असून दुकानांत एकावर एक रचून ठेवतात,

व तेथून लोक विकत नेतात. या देशांत नेहमीं उष्णता फार असल्यानें जेवतांना थोडासा बर्फ खाण्याची पद्धति पडली आहे. रस्त्यांतून जातांना पुष्कळ ठिकाणीं सळ्यांना मांस लावून भाजीत असलेले लोक दिसतात व यांच्यापासून तें विकत घेऊन लोक तेथेंच खातात. या देशांत पाणी असणाऱ्या भागांत पुष्कळ फळफळावळ होते. द्राक्षें, कलिंगडें, खजूर वगैरे फळें येथें मुबलक होतात. पाणी आलेल्या भागांत बागांतून गुलाबाचे ताटवेच्या ताटवे लागून राहिलेले दिसतात. या देशांत शिराज येथील गुलाबी अत्तर तर प्रसिद्धच आहे. या देशांतील गाढवें व घोडे फार प्रसिद्ध आहेत. याशिवाय मेंढ्या, बकरीं व उंटही पुष्कळ आढळतात. येथील मेंढ्यापासून व बकऱ्यांपासून उत्तम लोकर निघते, व तिजपासून सुंदर गालीचे बनवितात. या देशाचे लोक कलाकौशल्यांत फार हुशार आहेत. येथें तरवारी वगैरे हत्यारें बनविण्याचे कारखाने आहेत. अलीकडे नवीन युगाबरोबर आलेल्या ट्रामगाड्या, मोटारी, विजेच्या बत्त्या, विमानें व आगगाड्या या देशांत आल्या आहेत. रेझाबेग नामक इराणी वकिलानें जहांगीर बादशहास आपल्या देशाचे २७ सुंदर घोडे, ९ मोठीं खेचरें, सात उंटभर मखमल, सात रेशमी गालिचे, एकवीस उंटभर द्राक्षासव, चौदा उंटभर गुलाबपाणी, ५ तरवारी वगैरे सामान नजर केलें होतें.

तेहेरान हें राजधानीचें शहर आहे. येथील लोकांनीं अलीकडे मूळच्या राजास गादीवरून काढून टाकलें असून या देशाच्या गादीवर स्वमतानें रेझाखान नांवाच्या प्रमुख सरदारास नेमिलें आहे. येथील राजास शहा असें म्हणतात. येथील व्यवस्था साधारणतः लोकसत्तात्मक पद्धतीवर स्थापन झाली असें म्हणतां येईल. दरबार भरण्याच्या जागेंतील संगमरवरी सिंहासनासमोर, दरबाराशिवाय इतर वेळीं, एक मोठा उंची मखमाली पडदा सोडलेला असतो. या पडद्यावर सिंहाचीं चित्रें असतात, यांच्या राष्ट्रीय निशाणावर सूर्य व सिंह यांचीं चित्रें काढलेलीं असतात, म्हणून या देशाला ‘ सूर्य व सिंहाचा देश ’ असें म्हणतात. या देशांतील शेंकडा ९८ लोक मुसलमानी धर्माचे आहेत. या देशांतील लोकांना मक्केच्या यात्रेला जातांना मैलचे मैल रुक्ष प्रदेश तुडवीत जावें लागतें, तेव्हां हे जमावानें निघतात व सामानसुमान गाढवाच्या पाठीवर लादून त्यावर आपण बसतात. हा प्रवास फार त्रासदायक असतो. रुक्ष व खरखित प्रदेशांतून प्रवास करण्यामुळें या देशांत पुष्कळ लोक आंधळे झाले आहेत.

आज हा देश स्वतंत्र आहे तरी एका बाजूनें रशिया व एका बाजूनें इंग्लंड

यांनीं त्याला आपल्या वर्चस्वाखालीं आणला आहे, म्हणून या देशांबरोबर इराणाला फार नमून वागावें लागतें.

---

# लहान मुलांची झोंप.

मनुष्य प्राण्याला ज्या अनेक ईश्वरी देणग्या मिळाल्या आहेत, त्यांत झोपे-इतकी अमूल्य देणगी दुसरी सांपडणार नाहीं. झोंपेच्या योगानें थकलेले सर्व अवयव पुनरपि ताजे तवाने होतात, व दुसऱ्या दिवशीं काम करण्यास भरपूर उत्साह असतो. यावेळीं शरीरयंत्रांत झालेली झीज भरून निघते. एकाद्याला जर शाल्योदन जेवण दिलें, व झोंप मिळाली नाहीं तर त्या अन्नाचा उत्तम पाक होणार नाहीं, व असें झालें म्हणजे प्रत्येक कामांत शैथिल्य येईल. 'घेतों झोप सुखें फिरोनि उठतों ही ईश्वराची दया' ही कवीची उक्ति यथार्थ आहे.

मोठ्या माणसांपेक्षां लहान मुलांना तर या झोंपेची अत्यंत जरुरी आहे. अगदीं लहान मुलें तर दिवसांतील बहुतेक तास निजण्यांतच घालवितात. लहानपणीं मुलांची वाढ फार झपाट्यानें होत असते, व खेळाबरोबरच त्यांच्या वाढीला झोंपेची फारच आवश्यकता असते. पुष्कळ वेळां घरांतील माणसें मुलांच्या जास्त वेळ निजण्यावर 'आळशी' म्हणून शिक्का मारतात, पण लहान मुलांना पुष्कळ झोंपेची जरुरी असते ही गोष्ट त्यांच्या लक्षांत येत नाहीं. आपल्या प्रमाणें मुलांनीं थोडा वेळ निजावें, पुष्कळ वेळ काम करावें अशी वडील माणसांची इच्छा व अपेक्षा असते, कांहींना तर थोडा वेळ निजून मुलांनीं एकसारखें काम करण्याची संवय लावून घेतलीच पाहिजे असें वाटतें. एक गृहस्थ आपल्या मुलांना रात्रीं ११ वाजतां निजूं देत, व अभ्यास फार करून त्यांनीं वर नंबर आणावा म्हणून पहांटे ३ वाजतां त्यांस उठवीत असत ! तीं मुलें नाइलाज म्हणून उठत व अभ्यासाचा देखावा करीत, पण एकंदरींत त्यांची बुद्धि मंद झाली, व पहिला तर राहूंद्याच, पण निदान १० च्या आंतही त्यांना वर्गांत नंबर ठेवणें दुरापास्त होऊन बसलें; कांहीं पालक अकबराचें अनुकरण मुलांकडून करवूं इच्छितात. अकबर बादशहा फक्त ३ तासच झोप घेत

असे, मग मुलांना तरी जास्त झोप कशाला ? सर्वांना वेळ २४ तासच. मग दुसऱ्यापेक्षां आपण जास्त प्रगति दाखववयाची असेल तर स्वाभाविक बुद्धिमत्ता तरी जास्त पाहिजे अगर कोठून तरी जास्त वेळ काढण्याची तजवीज केली पाहजे. मग लोक जेव्हां झोप घेतात तेव्हां आपण जागत बसावयाचें व जास्त अभ्यास अगर उद्योग करावयाचा हा स्वाभाविक सिद्धांत निघतो ! पण 'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी' ही गोष्ट जरी अक्षरश: पाळली तरी त्याच्या पुढची 'यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः' ह्या उक्तीप्रमाणें आचरण करण्याची पाळीही क्रमप्राप्तच येते, व दिवसा झोपेची जरुरी पडून सृष्टिनियमांचें उल्लंघन केल्याबद्दलचें शासनही भोगावें लागतें.

शाळेंतील लहान मुलांना झोपेची फार आवश्यकता आहे असें ठरल्यावर त्यांनीं ती किती घेणें आवश्यक आहे, याचा विचार ओघानेंच येतो. शाळेंत येणाऱ्या मुलांची प्रकृति कशी आहे, याकडे सुधारलेल्या देशांचें जितकें लक्ष आहे, त्याच्याइतकेंच आपल्याकडे या बाबतींत दुर्लक्ष केलें जातें ! शाळा भरून प्रथमत: प्रार्थना झाली म्हणजे वर्गात मुलांशीं संभाषण करण्याची सुधारलेल्या देशांत पद्धति आहे. या संभाषणाच्या विषयांपैकीं मुलांना आपले आईबाप व घरची स्थिति यासंबंधानें बोलणें फार आवडतें; म्हणून शिक्षकही मुलांशीं या बाबतींत बोलूं लागतात. म्हणजे मुलाच्या परिस्थितीची त्यांना चांगली कल्पना येते. संभाषणानंतर अगर अगोदर मुलांचा पोषाख, दांत, नखें, केस, कातडीची स्वच्छता यांकडे लक्ष देतात. व त्यांचें दरमहा वजन करून तें वाढत आहे यासंबंधीं पाहाणी होते. या पाहाणींत नियमापेक्षां किती मुलांचें वजन कमी आहे, हें पाहून त्यांची प्रकृति सुधारण्याची काय योजना करावी हें ठरवितात; व या बाबतींत पालकांचा व शिक्षकांचा निकट संबंध येतो. मुलेंही प्रकृति सुधारण्यास काय केलें पाहिजे, यासंबंधीं शिक्षकांनीं सांगितलेल्या गोष्टी लक्षांत बाळगितात; व घरीं आईबापांच्या बरोबर याबद्दल बोलतात; व सुधारणा करण्याचा प्रयत्न करितात. अशा प्रकारें जे नियम मुलांच्या मनावर बिंबविण्यांत येतात. त्यांनीं किती झोप घेणें जरूर आहे यासंबंधीं माहिती देणारा तक्ता त्यांच्यापुढें वर्गांत टांगून ठेवण्यांत येतो व त्याच्याकडे त्यांचें लक्ष कितपत आहे यासंबंधीं मधून मधून

चांचणी घेतली जाते. तसेंच त्यांचें वय व वजन यांचें प्रमाग दाखविणारा तक्ता टांगून ठेवतात; म्हणजे आपल्यांत किती सुधारणा व्हावयास पाहिजे, हें मुलांच्या लक्षांत येतें. वयाच्या मानानें वजन १० पौंडाच्या आंत कमी असलें तर तें विशेष कमी आहे असें समजत नाहींत, पण त्याहून कमी असल्यास त्याबद्दल ताबडतोब काळजी घेतली जाते. मुलें दरमहा वर्गाच्या तक्त्यांत आपलें वजन लिहीत असतात, व त्या वजनाची नमूद केलेल्या वजनाशीं तुलना करितात. घरींही यासंबंधीं चर्चा चालते, त्यामुळें मुलांचें या गोष्टीकडे विशेष लक्ष राहातें. ज्या मुलांची प्रकृति विशेष अशक्त असते, त्या मुलांना जास्त झोंप व दूध देण्यासंबंधीं पालकांस सूचना करितात व त्यांना शक्य नसल्यास शाळेच्या पैशांतून त्यांना दूध देण्याची व्यवस्था होते. कारण अमेरिकेंत हल्लीं सर्वांची पक्की समजूत बनली आहे व ती केव्हांही खरीच आहे कीं, आजचीं मुलें हीं उद्यांचे नागरिक आहेत. त्यामुळें लहानपणाच्या काळांत मुलांच्या ठिकाणीं दिसणारे शारीरिक दोष जर आज वेळींच नाहींसे केले तर देशांतील पुढली पिढी सशक्त निपजेल व राष्ट्रांत कार्यक्षम माणसें निर्माण होतील.

लहान मुलांच्या अन्नासंबंधीं जसें फार जपलें पाहिजे तितकेंच किंबहुना जास्त त्यांच्या झोपेबद्दल जपलें पाहिजे. योग्य अन्न व पुरेशी झोप मिळाली म्हणजे पाप्यांचीं पितरें सुद्धां गलेलठ्ठ बनतात, असा प्रयोगानें अनुभव आला आहे. प्राथमिक शाळेंतील मुलांनीं किती झोप घेणें जरूर आहे याबद्दल खालील कोष्टकांतील माहिती उपयुक्त होईल.

| | | | |
|---|---|---|---|
| ६ ते ७ वर्षें वय | —१२ तास झोप | ११ ते १२ वर्षें वय | –१०॥ तास झोप |
| ७ ते ८ ,, | —१२ ,, | १२ ते १३ ,, | –१० ,, |
| ८ ते ९ } ,, | —११॥ ,, | १३ ते १४ } ,, | –९॥ ,, |
| ९ त १० } ,, | —११॥ ,, | १४ ते १५ } ,, | –९॥ ,, |
| १० ते ११ ,, | —११ ,, | | |

यावरून १५ वर्षांपर्यंत मुलांना कमींत कमी ९३/४ तास तरी झोप मिळाली पाहिजे असें दिसून येईल.

मुलांना जितकी गाढ झोप मिळेल तितकी झीज लवकर भरून निघते. मुलांची निजण्याची जागा निवांत असली म्हणजे त्यांना गाढ झोप येते. नाहींतर

स्वप्नें पडणें, मध्येंच जागें होणें अशानें झोपमोड होऊन तिच्यापासून होणारा खरा फायदा मिळत नाहीं. यामुळेंच शहराच्या दाट वस्तीच्या भागांत राहणारीं मुलें मोकळ्या हवेंतील मुलांपेक्षां जास्त फिकट दिसतात. मुलांना निजण्यास हवाशीर जागा असावी. त्यांचा बिछाना व कपडे निर्मळ ठेवावे म्हणजे त्यांना अंथरुणावर पडल्याबरोबर झोप लागून दुसऱ्या दिवशीं उठल्यावर उल्हास वाटेल. पुष्कळदां जेवण झाल्याबरोबर निजल्यानेंही मुलांना चांगलीशी झोप येत नाहीं, व त्यामुळें त्यांच्या शरीरप्रकृतीवर अनिष्ट परिणाम होतो. रात्रीं १२ च्या पूर्वीची एक तास झोप ही १२ नंतरच्या दोन तास झोपेबरोबर आहे असें म्हणतात. पहाटे बरेंच लवकर उठलें तरी बाधणार नाहीं, पण रात्रीं लवकर निजण्याबद्दल मुलांच्या बाबतींत काळजी घ्यावयास पाहिजे. शिक्षकांनीं मुलांना घरीं करावयास फार अभ्यास देऊं नये म्हणजे त्यांना भरपूर झोप घेतां येईल.

या सर्व गोष्टी पालकांनीं लक्षांत घेऊन मुलांना आवश्यक असणाऱ्या झोपेच्या तासांत काटकसर करूं नये, म्हणजे त्यांचें शरीर व त्याबरोबरच मन-ही खंबीर बनेल व घेतलेल्या काळजीचा त्यांना सव्याज मोबदला मिळेल यांत बिलकूल शंका नाहीं.

---

# चीन.

प्राचीन काळीं संस्कृतीच्या उच्च शिखरास पोहोंचलेले बरेच देश प्रसिद्ध आहेत, पण त्यांपैकीं अनेक आपत्तींशीं झगडून जिवंत राहिलेले व स्वत्वाची कांहीं तरी खूण बाळगणारे जगाच्या पाठीवर आज फक्त दोनच देश शिल्लक राहिले आहेत. खाल्डिया, बॅबिलोन, असीरिया, ईजिप्त हे देश व त्यांची प्राचीन संस्कृति लयाला गेली. पण चीन व हिंदुस्थान यांचा आज जरी पडता काळ आला आहे, तरी हे दोन देश आपलेपणा बाळगून आहेत. या दोन देशां-ची प्राचीन संस्कृति इतकी प्राचीन आहे कीं तिचा आज नुसता अज-मासच करावा लागतो. चीनचा बुद्ध धर्म असून त्याची हिंदुस्थानांत स्थापना झाल्यानें हिंदुस्थानदेशाबद्दल चिनी लोकांच्या मनांत फार आदरबुद्धि वसत

असते. आज हे दोनही देश ' चक्रनेमिक्रमानें ' विश्वचक्राच्या अगदीं खालच्या बाजूला गेले आहेत, पण असेच टिकाव धरून राहिले तर त्यांचाही ऊर्जित काळ आल्यावांचून राहाणार नाहीं.

आजच चीन देश या मार्गानें एकेक पायरी वर चढूं लागला आहे. या देशाचाच सख्खा भाऊ, जपान आज पहिल्या नंबरचें राष्ट्र बनला आहे, पण १८४१-४२ या सालांकडे दृष्टि फेकली तर जपानं देशांतील यादवी, तेथील जुन्या व अडाणी चालीरीति या नजरेस आल्यावांचून राहात नाहींत. त्या स्थितींत असतांना जपानच्या बंदरांत गेल्या शतकांत अमेरिकेचा दर्यासारंग येऊन जेव्हां त्यानें जपानला दटावलें तेव्हां जपानी लोकांची मानी वृत्ति जागृत होऊन त्यांना भावी संकटाची जाणीव उत्पन्न झाली, व त्यांच्यापैकीं श्रीमंत सरदारांनीं स्वात्मसमर्पण करून देशाची उन्नति करण्याचा एकजात प्रयत्न केला. त्यामुळें हळू हळू मागसलेला जपान हा प्रबळ बनला, व १९०४-५ सालीं रशियासारख्या महा बलिष्ट राष्ट्राशीं असमान भूमिकेवर दोन हात यशस्वी रीतीनें करूं शकला. युद्धांत यशस्वी झाल्याबरोबर त्याच्या स्तुतिस्तोत्रांचा आवाज दशदिशांमध्यें दुमदुमून गेला, व आशियांतील हा एक चिमुकला देश ब्रिटनची थोरवी पावला.

या दिशेनें पुढें आल्यावर इतक्या अल्पावधींत इतकी मोठी तयारी केलेली पाहून जगानें तोंडांत बोट घातलें व ही एक अपूर्व गोष्ट घडली असें ज्यास त्यास वाटूं लागलें. या जपानच्या विजयानें जरी त्यावेळीं जपानलाच फक्त प्रत्यक्ष फायदा झाला, तरी आशिया खंडालाही थोडासा अप्रत्यक्ष असा फायदा झाला, हें आपण विसरतां कामा नये. युरोपखंडाशिवाय इतर खंडांतील लोकांना उच्च दर्जाची बुद्धिमत्ता नाहीं, असा जो समज पसरला होता त्यास थोडासा आळा पडला, व आशियांतील राष्ट्रें जर मनांत आणतील तर कोणत्याही इतर देशाची बरोबरी करूं शकताल, ' हें महावाक्य ' उदयास आलें. जवळचा चीन देश जपानपासून धडे घेऊं लागला. हिंदुस्थान देशांत विचारांचा ओघ बदलत जाऊन लोक आपल्या हक्कांची मागणी करूं लागले, व ती जोरानें केल्यामुळें १९०९ सालीं हिंदुस्थानला राजकीय प्रगतीच्या मार्गावरील एक हप्ता मिळाला, पण हिंदुस्थानांत १८ जाती व १८०० पंथ; त्यामुळें कोणत्याही प्रकारच्या गोष्टीसाठीं सर्वांची मोट बांधणें फारच कठीण किंबहुना अशक्यप्रायच आहे. पण आपण चीन देशाकडे पाहिल्यास या बाबतींत तेथें मात्र आज निराशाजनक स्थिति नाहीं.

एकीकरणाला जीं अत्यावश्यक बंधनें लागतात, त्यांपैकीं बरींचशीं आज चीन देशाला उपलब्ध आहेत. एक जात, एक धर्म व एक भाषा. याशिवाय रोटीबेटी-व्यवहारासंबंधीं निर्बंध नाहींत, व सर्वांत अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे दांडगी लोकवस्ती. तेथें जर कोणत्या गोष्टीची उणीव भासत असेल तर ती फक्त नेपोलिनसारख्या योद्ध्याची ! ! लोक राष्ट्रीय कल्पनेनें प्रेरित झाले आहेत, व १९१६ पासून लोकसत्तात्मक पद्धतीनें राज्य चालविण्यास शिकले आहेत. त्यांच्या हातांत भरपूर शस्त्रास्त्रें आहेत; त्यांच्या अंगांत सामर्थ्य आहे. त्या देशाचे लोक सर्व जगभर पसरले आहेत. त्यांच्या देशांत उद्योगधंदे आहेत व जमीन संपन्न आहे. व्यापारधंदा जोरांत चालतो व नवीन कारखाने निघूं लागले आहेत.

पुन्हा एकवार लोकसत्तात्मक राज्यपद्धति स्थापन होऊन यादवी मोडली म्हणजे जपानच्या दसपट सामर्थ्यवान असें राष्ट्र आशियांत तयार झालेंच म्हणून समजा. जपाननें पूर्वेकडून लोंढा चीनपर्यंत परतविला. चीन देशाची लाट थेट आशियाच्या मध्यापर्यंत जाऊन पोहोंचणार ! ! त्यापूर्वींच तुर्कस्तानच्या बाजूनें पश्चिमेकडून नवीन संस्कृतीची लाट आशियाखंडांत पसरूं लागली आहे. ह्या दोन्ही लाटा एकत्र मिळाल्या म्हणजे जी प्रचंड लाट उत्पन्न होईल, तिचें सामर्थ्य किती मोठें असेल, व त्या लाटेचा कोठें व केवढा धक्का बसेल याजबद्दल मोठाले तत्त्ववेत्ते पुरुष सुद्धां आज अजमास करूं शकत नाहींत. आतां आपण त्या देशांतील हल्लींच्या यादवीचा थोडासा विचार करूं.—

या देशांत मुख्यत्वेंकरून उत्तरेकडील व दक्षिणेकडील असे दोन मुख्य पक्ष लढत आहेत. उत्तरेकडील पक्षाचें मुख्य ठिकाण पेकिन व दक्षिणेकडील पक्षाचें मुख्य ठिकाण कँटन. या दोन्ही पक्षांचें मत चीनला पूर्ण स्वतंत्र बनविणें हें आहे. तेथील लोकमत चीनच्या किनाऱ्यावरील युरोपियन वसाहतींच्या विरुद्ध बनलें असून त्या वसाहतींवर व एकंदर युरोपियन घरें, संस्था, लोक यांवर चोहोंकडून हल्ले होत आहेत. त्यामुळें ज्यांचे तेथें हितसंबंध आहेत अशा इंग्लंड, अमेरिका वगैरे युरोपियन देशांचीं लढाऊ जहाजें दाखल झालीं असून जो तो आपले लोक तेथून बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहे. जरी या देशांनीं आपलीं आरमारी जहाजें व सैनिक आणून लढाईची तयारी केली आहे तरी सर्वांनीं तटस्थ राहण्याचें धोरण स्वीकारल्याचें जाहीर केल्यामुळें चीनला बाहेरून फारसा उपद्रव पोहोंचत नाहीं; कांहीं ठिकाणीं चवताळलेल्या चिनी लोकांनीं हल्ले चढविल्या-

मुळें जें युरोपियन लोकांचें नुकसान झालें तें कमिशननें ठरविल्यास भरून दे-ण्याचें चिनी राष्ट्रीय सरकारनें आश्वासन दिलें आहे. त्यामुळें युरोपियन राष्ट्रें शांत आहेत. मालमत्तेला धोका येणार या भीतीनें युरोपियन लोक चीनमधील आपल्या देशाच्या बँकेंत पैसे टाकीत आहेत. ह्यामुळें त्या बँकांत पैशांचा ढीग जमला आहे. किनाऱ्यावर युरोपियन राष्ट्रांना व्यापारासाठीं जीं बंदरें मोकळीं ठेवण्यांत आलीं आहेत, त्यांपैकीं शांघाय हें शहर वांगपू नदीच्या दोन्ही बाजूंनीं सुमारें ३॥ मैल पसरलें आहे. शंभरवर्षांपूर्वीं येथें फक्त २३ परस्थ कुटुंबें राहात होतीं. त्या ठिकाणीं आज परस्थांची २२००० लोकवस्ती आहे. यावरून हें ठिकाण किती भरभराटीस आलें आहे, याची कल्पना होईल. इंग्लंडच्या बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षांनीं आपल्या एका भाषणांत आपलें धोरण प्रदर्शित केलें:— ते म्हणाले, आमचें उदारपणाचें धोरण आहे. पण आम्हीं दंडेलीपुढें मान वांक-विणार नाहीं. चीनचे लचके तोडून ब्रिटिश साम्राज्य वाढविण्याची आमची बिलकूल इच्छा नाहीं. चीनला त्याचे वाजवी हक्क मिळावेत अशी आमची इच्छा आहे. पण त्यानें ब्रिटिशांचें जीवित व वित्त यांचें रक्षण केलें पाहिजे. यावरून ब्रिटिश धोरणाची कल्पना होईल.

चिनी सैन्य आधुनिक पद्धतीनें व शस्त्रास्त्रांनीं सज्ज आहे. व सर्व पक्षांचें आपसांत अधिकारासंबंधीं भांडण असलें तरी परकीय देशांचें प्रस्थ न माजूं देण्याब-द्दल एकमत आहे. कँटन पक्षानें शांघाय शहर हस्तगत केलें असून त्यानें पेकि-नच्या रोखानें आपला मोर्चा वळविला आहे. परकीय व्यापाऱ्यांपासून मालावर शेंकडा ५ व जादा शेंकडा २॥ अशी कस्टम ड्यूटी घेण्याचें चीन सरकारनें जाहीर केलें व त्याजला सर्व युरोपियन राष्ट्रांनीं मान्यता दिली आहे. आज तरी कँटन येथील सरकारची सरशी होत असून तेंच विजयी होईलसें दिसतें व तसें झाल्यास जगांत उत्पन्न झालेली ‘ लोकसत्तात्मक पद्धतीची ’ लाट चीन देशांत जोरानें घुसली असें म्हणतां येईल.

# मुंबई इलाख्यांतील पहिल्या स्कूलबोर्ड कानफ-रन्सनें नेमलेल्या कमेटीनें आंखलेला अभ्यासक्रम.

भाषा— ( सदर १ )---मार्क १००

शिशुवर्ग— मंजूर केलेलें कोणतेंही "लहान मुलांकरितां पुस्तक" वाचणें, वाचनपुस्तकांतील कविता वर्गानें एकत्र गाऊन दाखविणें.

इयत्ता १— पहिल्या इयत्तेकरितां मंजूर केलेलें कोणतेंही पुस्तक वाचणें; वाचलेल्या भागाचा सारांश समजणें; वाचनपुस्तकांतील कविता एकत्र मिळून सुरावर म्हणणें.

इयत्ता २— दुसऱ्या इयत्तेकरितां मंजूर केलेलें कोणतेंही पुस्तक वाचणें; वाचलेल्या भागाचा सारांश समजणें; वाचनपुस्तकांतील कवितांचा सारांश व त्या पाठ म्हणणें.

गद्य-पानें ८०, पद्य-ओळी १००, मो० वा०-क्रमिक पुस्तकांतील.

इयत्ता ३— तिसऱ्या इयत्तेकरितां मंजूर केलेलें पुस्तक वाचणें; वाचलेल्या भागाचा व शब्दांचा अर्थ समजणें; वाचनपुस्तकांतील कविता पाठ म्हणणें व समजणें.

गद्य-पानें १००, पद्य-ओळी १५०; मो० वाचन-क्रमिक पुस्तकांतील.

व्याकरण—शब्दांच्या चार जाती ओळखणें. ( नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद. )

इयत्ता ४— चवथ्या इयत्तेकरितां मंजूर केलेलें पुस्तक वाचणें; वाचलेल्या भागाचा व त्यांतील शब्दांचा अर्थ समजणें; वाचनपुस्तकांतील कविता पाठ म्हणणें व समजणें.

गद्य-पानें १००, पद्य-ओळी २००, मो० वाचन-क्रमिक पुस्तकांतील.

व्याकरण—शब्दांच्या आठ जाती ओळखणें, लिंग, वचन, विभक्ती; मुख्य काळ व प्रयोग.

सूचना— पुरवणी वाचनः—तिसऱ्या व चौथ्या इयत्तेकरितां ५० ते ६० पानांचें सामान्य-ज्ञान-विषयक पुरवणी-वाचन-पुस्तक वाचन घेणें.

मोडी वाचन—इ० १ ते ४ पर्यंत वाचनासाठीं लागणारा मोडी लिपीं-तील मजकूर क्रमिक पुस्तकांतून छापला जाणार आहे असें गृहीत धरलें आहे.

**लेखन व भाषारचना--( सदर २ )--मार्क १००**

शिशुवर्ग -- ( अ ) बालबोध मूळाक्षरें. बालबोध लिपींत मूळाक्षरांचे सांगितलेले शब्द मोठ्या अक्षरांनीं लिहिणें. वाचनपुस्तकांतील दोन ओळींचा उतारा मोठ्या अक्षरांनीं करणें.

( ब ) भाषा-रचना—आवडतीं खेळणीं, खेळ, पाळींव जनावरें व चित्रें ह्यांविषयीं बोलतां येणें.

शिक्षकानें अगदीं सोप्या भाषेंत सांगितलेली पुराणांतील किंवा कल्पित गोष्ट पुन्हा सांगतां येणें. ( ५० )

इयत्ता १— ( अ ) मोडी मूळाक्षरें—मोडी व बालबोध जोडाक्षरविरहित सांगितलेले शब्द लिहिणें, वाचनपुस्तकांतील २ ओळींचा उतारा करणें. ( ५० )

( ब ) भाषारचना—दाखविलेल्या वस्तूंचें व चित्रांचें वर्णन, परिचित खेळ, खेळणीं यांचें वर्णन तोंडीं करणें.

पुराणांतील योग्य अशा व कल्पित गोष्टी शिक्षकानें सांगितलेल्या पुन्हा सांगतां येणें. ( ५० )

इयत्ता २— (अ ) वाचलेल्या पुस्तकांतील २ ओळी ठळक अक्षरांनीं व शब्द सोडून बालबोध व मोडी लिपींत शुद्ध लिहिणें.

( ब ) ह्या इयत्तेकरितां मंजूर केलेल्या कित्याप्रमाणें लिहिलेल्या पुस्त्यांची वही दाखविणें.

( क ) भाषा-रचना—शाळागृह, शाळेंतील उपकरणें, शाळे-सभोंवतीं असलेले पदार्थ यांचें वर्णन करणें; वर्गांत मुलां-समोर ठेवलेल्या चित्रांचें किंवा वस्तूंचें वर्णन करणें. ( ३० )

इयत्ता ३— ( अ ) वाचलेल्या पुस्तकांतील सांगितलेल्या ३ ओळी बालबोध व मोडी लिपींत शुद्ध लिहिणें. ऱ्हस्व, दीर्घ, धातुसाधितें व क्रियाविशेषणें यांतील ठराविक अनुस्वार व जोडाक्षरें हीं शुद्ध लिहितां यावीं. ( ३० )

( ब ) ह्या इयत्तेकरितां मंजूर केलेल्या कित्त्याप्रमाणें लिहिलेल्या पुस्त्यांची वही दाखविणें. ( ४० )

( क ) भाषारचना—गांवांतील उद्योगधंदे व भोंवतालचे देखावे ह्यांचें वर्णन करणें. शिक्षकानें वाचून दाखविलेली किंवा सांगितलेली लहान गोष्ट आपल्या शब्दांत लिहिणें. वडिलांस व आपल्या शिक्षकांस स्वतांच्या हकिकतीचें पत्र लिहिणें.( ३० )

इयत्ता ४—( अ ) वाचनपुस्तकांतील सांगितलेल्या ४ ओळी मोडी व बालबोध लिपींत शुद्ध लिहिणें. ( झालेल्या व्याकरणाच्या नियमांप्रमणें शुद्ध असावें. )

( ब ) ह्या इयत्तेकरितां मंजूर केलेल्या कित्त्यांप्रमाणें लिहिलेल्या पुस्त्यांची वही दाखविणें.

( क ) मित्रांस व आपल्यापेक्षां वयानें मोठ्या व लहान अशा नातलगांस वर्णनपर पत्र लिहिणें. परिचित देखावे, स्थानिक महत्त्वाच्या जागा व परिचित संस्कार ह्यांचें वर्णन करणें; वर्गासमोर ठेविलेल्या चित्रांचें वर्णन करणें.
दिलेल्या सूचक शब्दांवरून गोष्ट रचणें. ( ३० )

## गणित–( सदर ३ )--मार्क १००

शिशुवर्ग— १०० पर्यंत अंक; १० पाढे; १० पर्यंत बेरीज व वजाबाकी.

सूचना— हें सर्व पदार्थांच्या साहाय्यानें शिकवावें व परवचा म्हणण्याचा प्रघात ठेवावा.

इयत्ता १—१००० पर्यंत संख्या; पाढे ११ ते २०, २४, २५, ३०; निमकीं व पावकीं ( ४० पर्यंत सर्व व १०० पर्यंत फक्त दशकांचीं ) ९९ पर्यंत उत्तर येईल अशी हातच्यावांचून होणारी बेरीज व वजावाकी शिकविणें.

चलनी नाणीं व त्यांचें कोष्टक.

मागच्या इयत्तेंत झालेल्या उजळणीवरून होणारें तोंडीं गणित.

सूचना—वरील सर्व भाग पदार्थांच्या साहाय्यानें शिकवावा व परवचा म्हणण्याचा प्रघात ठेवावा. ( ७५+२५ )

इयत्ता २— पाऊणकीं, सवायकीं, दिडकीं व अडीचकीं ( ४० पर्यंत सर्व व पुढील फक्त दशक. )

एक लाखपर्यंत संख्या शिकविणें; प्रत्येकीं चाराहून ज्यास्त नाहीं अशा आंकड्यांच्या संख्यांची बेरीज व वजाबाकी करणें; व अशाच प्रकारच्या संख्यांस प्रत्येकीं दोनहून ज्यास्त नाहींत अशा आंकड्यांच्या संख्यांनीं गुणणें व भागणें.

स्थानिक वजनें व मापें ह्यांची माहिती व कोष्टकें. मागील इयत्तेंत असलेल्या उजळणीवरून व कोष्टकांवरून तोंडीं गणित. पंचकडी, दसकडी, डझन, कोडी वगैरेची माहिती देणें. (७५+२५)

इयत्ता ३—(अ) वेळाचीं कोष्टकें (देशी व इंग्रजी); मोजाचीं (अंतरदर्शक) कोष्टकें (देशी व इंग्रजी); मांडणी आणि इंग्रजी चालीप्रमाणें विविध बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार; रेघी बेरीज, वजाबाकी व गुणाकार (गुण्य व गुणक ह्यांपैकीं एकच अपूर्णांक असावा.) एकमान पद्धतीनें त्रैराशिकाचीं सोपीं उदाहरणें; देशी नाणीं, मापें व वजनें ह्यांची रेघी मांडणी. मागील तीन वर्षांत झालेल्या उजळणीवरून व कोष्टकांवरून होणारें, व ८ आणि १६ या गुणोत्तरांवरून होणारें तोंडीं गणित.

(ब) घरगुती रोजचा जमाखर्च. (रोजकीर्द) (७५+२५)

इयत्ता ४—(अ) तिसऱ्या इयत्तेखेरीज स्थानिक गरजांस अनुसरून आणखी कोष्टकें—तिसऱ्या इयत्तेंत झालेल्या अंकगणिताखेरीज, अवयवांच्या साहाय्यानें दृढभाजक व लघुतम साधारण विभाज्य; व्यवहारी अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार, (ज्यांचा व्यवहारांत व प्रमाणगणितांत उपयोग होईल असेंच व्यवहारी अपूर्णांक योजणें). त्रैराशिकाचीं कठीण उदाहरणें व पंचराशिकाचीं सोपीं उदाहरणें (होतां होईल तों एकमानपद्धतीचीं), काटकोनचौकोनाकृतीचें क्षेत्रमापन व घनमापन (व्यावहारिक उदाहरणें घेणें). सरळव्याज—फक्त व्याज काढणें.

(ब) घरगुती व्यावहारिक जमाखर्च (सोपी कीर्द व खातेवही).

( क ) मागील झालेल्या उजळणीवरून, कोष्टकांवरून व १२, २०, ३०, आणि ४० ह्या गुणोत्तरांवरून होणारें तोंडीं गणित.

### इतिहास—( सदर ४ )—मार्क ५०

इयत्ता २—रामायणांतील सोप्या गोष्टी व महाभारतांतील सोप्या गोष्टी.

इयत्ता ३—मारुती, श्रीकृष्ण, गौतम, अशोक, विक्रम, हर्ष, चंद्रगुप्त, शंकराचार्य, शालिवाहन, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, रामदास, महावीर, पैगंबर, नानक, झरतुष्ट्र, कबीर, येशूख्रिस्त अशा प्रकारच्या सुमारें २० प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें.

इयत्ता ४—प्रांतांतील लोकांचा इतिहास.

### भूगोल—( सदर ५ )—मार्क ५०.

इयत्ता १— दिशा, वर्गाची खोली, शालागृह, सभोंवतालचें आवार, इमारती व रस्ते यांचा आराखडा.

इयत्ता २— शाळा ज्या गांवीं असेल त्या गांवच्या भूपृष्ठरचनेंतील ठळक गोष्टी, उद्योगधंदे, मुख्य पिकें, आपल्या तालुक्याचें मुख्य स्थान व अधिकारी, जिल्ह्याचा भूगोल, आराखडा भरणें.

इयत्ता ३—प्रांताचा, भूगोल इलाख्याची सामान्य माहिती, पृथ्वी व तिचा आकार, जमीन आणि पाणी यांचे मुख्य विभाग ( सोप्या भाषेंत सांगणें ), आराखडे भरणें.

इयत्ता ४— हिंदुस्थानची सामान्य माहिती, आयात निर्यात व्यापार, हिंदुस्थानचा ज्या देशांशीं व्यापार चालतो त्या देशांशीं दळणवळणाचे मार्ग, व्यापाराचीं बंदरें, आराखडे भरणें. पंचांग पाहातां येणें. ( व्यावहारिक माहिती. )

### आरोग्यशास्त्र —( सदर ६ )— मार्क ५०.

इयत्ता २—शरिराची स्वच्छता; कातडी, केस, दांत व नखें यांची निगा. स्वच्छ हवेबद्दल सामान्य माहिती.

इयत्ता ३—शरिराचे मुख्य भाग व त्यांचे उपयोग; कपडे, बिछाना व घर यांची स्वच्छता; घाणीपासून होणारे अपाय; भांड्यांची स्वच्छता; अन्नः— अपायकारक अन्न, खाण्याची क्रिया, किती व कसें खावें. पेयः— दूध व पाणी; अपायकारक पेय.

इयत्ता ४—हवा—श्वासोच्छ्वासाचीं इंद्रियें व त्यांचा उपयोग कसा करावा; घरांत व निजण्याच्या खोल्यांत खेळत्या हवेची आवश्यकता; अशुद्ध हवेपासून होणारे अपाय; डोक्यावरून पांघरूण घेऊन निजण्याचे दुष्परिणाम.

पाणी—पाण्याच्या पुरवठ्याचीं साधनें आणि तीं शुद्ध कशीं ठेवावीं; अशुद्ध पाणी पिण्यास योग्य कसें करावें; पाणी हें स्वच्छतेचें साधन कसें आहे ह्याची माहिती.

अन्न—अन्नाचे प्रकार; लहान व आजारी माणसांचें पथ्यपाणी यांची माहिती; खाण्याचे पदार्थ न बिघडावे म्हणून कोणती व्यवस्था करावी; माशा; पचनेंद्रियें.

स्वच्छता—रोमरंध्रें, स्नानाची जरूरी; संसर्गजन्य व सांथीचे मुख्य रोग; डांस व मलेरिया.

व्यायाम व त्याची जरूरी; सार्वजनिक आरोग्याबद्दल माहिती.

**व्यायाम—(सदर ७) – मार्क ५०.**

शिशुवर्ग—(अ) कवाईत—अंतर घेऊन उंचीप्रमाणें ओळ करणें; डावी उजवी बाजू वळणें, बाजूस व मागें वळणें. पाऊल मागें पुढें करणें, टाळी वाजविणें, सलाम करणें, लहान मुलांना योग्य असे कवायतीचे सोपे चार प्रकार. गाण्याची कवाईत.

(अ) लांकडी डंबेल्सच्या साहाय्यानें पहिले दोन हात, बारा नमस्कार.

(क) खेळ—पळण्याची शर्यत, लंगडी, चेंडूफेक. "मोडककृत लहान मुलांचे खेळ" या पुस्तकाचे विभाग ४ मध्यें सांगितलेल्या खेळांसारखे २ खेळ. मुलींकरितां झिम्मा.

इयत्ता १—(अ) कवाईत—शिशुवर्गाखेरीज २ रांगा करणें, ताठ उभें राहाणें व वांकणें. कवायतीचे धडे १ ते ३.

(ब) लांकडी डंबेलसच्या साहाय्यानें ४ हात व १२ नमस्कार (नवीन पद्धतीप्रमाणें बैठकींसह).

(क) साठ फूट धावणें, लंगड़त धावणें, चेंडूफेक. "मोडक कृत लहान मुलांचे खेळ" या पुस्तकांत दाखविलेल्या खेळांप्रमाणें चार विभागांपैकीं प्रत्येकीं २ खेळ, [बालवर्गाखेरीज]. मुलींकरितां—टिकलीपाणी, फुगड्या वगैरे योग्य खेळ.

इयत्ता २—( अ ) कवाईत—बसणें, उठणें, रांगेनें चालणें, शरीर बाजूस वांकविणें, कवायतीचे धडे १ ते ५.

( ब ) डंबेलसचे सहा हात. नमस्कार २४ [ नवीन पद्धतीचे ].

( क ) पळणें, लंगडी, खोखो, लांब उडी; मोडककृत पुस्तकांत दाखविल्याप्रमाणें विभाग ४ पैकीं प्रत्येकीं दोन खेळ.
मुलींकरितां फुगड्या, झिम्मा वगैरे.

इयत्ता ३—( अ ) मागील इयत्तेखेरीज कवायतीचे धडे १ ते ७, श्वास भरपूर घेणें व सोडणें; नमस्कार २४.

( ब ) डंबेल्सचे आठ हात, लाठी दोन हात, जोडी दोन हात. लेझीम आरंभ.

( क ) खोखो, आट्यापाट्या, लांब उडी, उंच उडी, सांखळी.
मुलींकरितां योग्य असे खेळ.

इयत्ता ४—( अ ) मागील वर्गाखेरीज ३ व ४ रांगा करणें. अनेक रांगांनीं सारखीं पावलें चालणें. हळू बसणें व उठणें. धडे १ ते ८.

( ब ) जोडी चार हात. लेझीम प्रकार ४. मल्लखांब २ उड्या. लाठी ४ हात.

( क ) अडचणींची शर्यत ( हर्डल्स ), खोखो, आट्यापाट्या ( कोंडी फोडणें ). फुटबॉल ( शक्य असेल तेथें ), लांब उडी, उंच उडी. मुलींकरितां योग्य असे खेळ.

सूचना—( १ ) शाळेंत वेळापत्रकाप्रमाणें दोन पाठ झाल्यानंतर ५ मिनिटें कवाईत घ्यावी. कवायतीचा उपयोग वर्गांतून जातांना येतांना व मुलांच्या हालचालींत दिसून आला पाहिजे.

( २ ) शाळेची एक वेळ झाल्यावर नमस्कार घ्यावे. व इतर खेळ संध्याकाळीं घ्यावे.

( ३ ) खेळांची व्यवस्था शक्य तितकी मुलांकडून करावी.

### हस्त-व्यवसाय (ऐच्छिक ) मातीकाम.

शिशुवर्ग—गोलाकृति व दंडगोलाकृति वस्तु तयार करणें.

उदा०—लिंबू, संत्रें, बटाटा, पेरू, जांभूळ, बोर, काड्याच्या पेटीच्या साहाय्यानें विटा पाडणें, विटी, फटाका, बत्ता इत्यादि.

इयत्ता १—एका बाजूस वर्तुळाकृति व वर टोंक आलेले असे पदार्थ तयार करणें—पेरू, केळें, गाजर किंवा मुळा, दौत, काकडी, अंजीर, मिरची, कौलें, ( थापटी ), झाडाचीं कुंडी, पणती.

इयत्ता २—मिश्र आकाराचे—कैरी, नळा, लगोऱ्या, रताळें, उसाचें पेरें कांदा, भेंडी, वांगें, विटा व कौलें यांच्या साहाय्यानें देखावा.

इयत्ता ३—भोंवरा, बाटली, सोंगटी, बैल, बरणी, गांवकूस व वेस, नदी व पूल.

इयत्ता ४—कपबशी, पानें व फुलें यांचे उठाव, डाळिंब, सीताफळ, मक्याचें कणीस, साप, पाल, उंदीर, बाहुली, तुळशीवृंदावन, गणपति-गौरी, किल्ला करणें, महाराष्ट्राचा उठावाचा नकाशा, शिपाई, छापाच्या वस्तु.

## ड्राइंग.

अलीकडे प्रसिद्ध झालेला सरकारी अभ्यासक्रम.

## सृष्टि—निरीक्षण.

शाळाखात्याचा नं. $\frac{४१९७}{१५-९-२१}$ नें प्रसिद्ध केलेला अभ्यासक्रम.

## शिवणकाम.

मुलींच्या शाळांतील हल्लीं चालू असलेला अभ्यासक्रम.

## सूतकाम.

शिशुवर्ग—कागदाच्या चटया विणणें, फितीनें ( एक बोट रुंदीच्या ) पाळण्याची चौकट विणणें.

इयत्ता १—दोरीनें किंवा जाड दोऱ्यानें आडवे उभे धागे विणण्यास शिकविणें, पिळ तयार करणें.

इयत्ता २—बारीक नवार तयार करणें ( १॥ इंच रुंदीची ), कांडी भरणें, सूत कांतणें.

इयत्ता ३—सरकी काढणें, कापूस पिंजणें, चातीवर सूत काढणें.

इयत्ता ४—चातीवर अगर चरक्यावर सफाईदार सूत काढणें. दोन तीन धागे एकत्र करून सुतास पीळ घालणें, सुताचा नंबर ओळखण्यास शिकविणें.

| | |
|---|---|
| टॉय-मेकिंग<br>बास्केट-वीव्हिंग<br>स्ट्रिंग-मेकिंग | ( स्थानिक परिस्थिति व साधनें यांवर अवलंबून ) हे विषय वर्गांत शिकविणें शक्य होईल. |

---

## कागदकाम

बालवर्ग—काठी, उलथणें, कुऱ्हाड, साप, बाहुली, टोपी, पुस्तक, कपाट, पंखा, पाकीट, नाव व खिडकी.

सूचना— सदर वस्तु कागद चुरमडून करावयाच्या असतात.

इयत्ता १—भिरभिरें, पाकीट, चमचा, कप, साधी चौकट, तसबिरीची फ्रेम; हांडा, घागर, बांक, क्रॉस, पक्षी, पवनचक्की, केरसुणी, मासा, छत्री व शिंकें.

सूचना—सदर वस्तूंपैकीं कांहीं कागद चुरमडून व कांहीं कागदाच्या घड्या घालून करावयाच्या असतात.

इयत्ता २—निरनिराळ्या आकाराचीं पाकिटें, निरनिराळ्या आकाराच्या चौकटी ( तसबिरीच्या ), पाणचक्की, पेटी ( उघडी ), पंखा, फुलांची परडी पुस्तकांचें कव्हर, टेबल, खुर्ची, कपाट, कप, बशी, चमचा, ग्लास, छत्री, पळी.

सूचना—सदर वस्तु कागदास घड्या घालून करावयाच्या असतात.

इयत्ता ३—पुस्तकांत घालावयाची खूण, टांचण्या ठेवण्याची पेटी, ( केस ), सँडपेपर, बैलगाडी, टेबल, तिकिटांची केस, पिक्चरफ्रेम, पाळणा, कातरीची केस, पलंग, तुळशीवृंदावन, घड्याळ, हातोडा, विळा, खेडेगांवचा देखावा.

सूचना—सदर वस्तु, चाकू, कातर व गोंद ह्यांच्या साहाय्यानें तयार करणें.

इयत्ता ४—वाटोळी पिक्चरफ्रेम, दिव्यावर ठेवण्याची शेड, कॅलेंडर, तिकिटांची केस, पेटी झांकणासह, हलवा ठेवण्याचा पुडा, इंचपट्टी, पोष्टाची पेटी, नोटबुक, साप, कप, कांसव, मगर, हलतें माणूस, झाडाचें पान, गुलाबाचें फूल, फुलाची माळ, एखादा देखावा ( घर, बाग व त्यांतील लोक वगैरे ).

सूचना—सदर वस्तु चाकू, कातर व गोंद ह्यांच्या साहाय्यानें तयार करतात. कार्डबोर्डाचा उपयोग करावा.

---

# साध्वी सौदामिनी.

[ लेखिका:—श्री. सौ. पार्वतीबाई सरदेसाई, हेड मिस्ट्रेस कन्याशाळा, फलटण ]

१

'पृथ्वीवरील नंदनवन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या काश्मिर प्रांतांत पूर्वी 'कमलपूर' नांवाचें एक संपन्न व सुंदर शहर होतें. तेथील राजा विजयसिंह हा शूर, पराक्रमी, हुषार व प्रजावत्सल होता. तो राज्यावर बसला तेव्हां अगदीं तरुण होता. आपली प्रजा निरंतर सुखांत राहून तिची चांगली भरभराट व्हावी, अशी त्याची फार इच्छा होती म्हणून त्यानें राज्यांतील निरनिराळ्या खात्यांत सुधारणा करून त्यांवर योग्य व हुषार अधिकाऱ्यांची नेमणूक केली. मुख्य प्रधानपदावर सुदर्शन नामक एका शहाण्या, दूरदर्शी व विश्वासू अधिकाऱ्याची योजना झाली होती. राज्यांतील सर्व कामें अगदीं सुरळीत चालूं लागलीं. त्यामुळें थोड्याच दिवसांत विजयसिंह अत्यंत लोकप्रिय झाला. त्याची प्रजा पूर्ण सुखी होती. परंतु तिला आतां एकच काळजी होती. विजयसिंहाला तारुण्यांत येऊन बरेच दिवस झाले होते, तरी तो अजून अविवाहित असून आपल्या लग्नाचा मुळींच विचार करीत नसे. त्यानें आतां विवाह करावा अशी सर्वांची इच्छा होती! अनुरूप पत्नी मिळून त्याला संसारसुखाचा लाभ कधीं होईल, हीच काय ती एक काळजी सर्व प्रजाजनांना लागून राहिली होती. म्हणून सर्व मंडळींनीं प्रधानामार्फत ही गोष्ट राजाला सुचविण्याचें ठरविलें.

त्याप्रमाणें एक दिवस दरबारचीं सर्व कामें आटोपल्यावर सुदर्शन प्रधान राजास म्हणाला, "महाराज, प्रजेची आपल्या चरणीं एक विनंति आहे, ती निवेदन करण्याची आज्ञा व्हावी."

विजयसिंह:— काय विनंति आहे ती कळूं द्या.

सुदर्शन:— सरकार, आपण आतां विवाह करून सुखानें संसार करावा अशी त्यांची इच्छा आहे. आपला सुखमय संसार पाहूनच त्यांना पूर्ण समाधान होणार आहे.

विजयसिंह:—वा:! आजची ही विनंति अगदींच नवीन व अकल्पित आहे. हल्लींचा माझा संसार सुखानें चाललेला नाहीं, असें आपणांस वाटतें काय! माझ्या प्रजेचा संसार तोच माझा संसार व प्रजेचें सुख तेंच माझें सुख. याखेरीज

वेगळ्या सुखाची कल्पना मला ठाऊक नाहीं म्हणून मी आजपर्यंत लग्नाचा विचारच केला नाहीं; आणि त्याची मला आवश्यकताही वाटत नाहीं.

सुदर्शनः—महाराज, आपले हे उदात्त विचार आपणांस अत्यंत भूषणावह आहेत! पण, महाराज! आपण विवाह करून आपणांस योग्य अशी सहधर्मचारिणी मिळाल्यास, आपलें हें उच्च ध्येय साधणें अधिक सुलभ नाहीं का होणार? आपण सध्यां जीं लोकहिताचीं कामें करीत आहां, त्यांहून दुप्पट कामें अनुरूप अशा अर्धांगीच्या मदतीनें, आपण खास करूं शकाल. ईश्वरकृपेनें आपण आमच्यावर दीर्घकाल राज्य करावें, अशीच आमची इच्छा आहे. परंतु आपण ह्या गादीला आपल्यासारखा प्रजाहितैकदक्ष असा एकादा वारस आपल्या शिकवणीखालीं तयार करावयास नको काय?

प्रधानाचा हा युक्तिवाद राजाला पटला व तो म्हणाला, "आपलें म्हणणें खरें आहे. त्याप्रमाणें मी लग्न करण्यास तयार आहें. पण माझी एक अट आहे कीं, मी कोणत्याही मुलीशीं लग्न केलें तरी ती माझी पत्नी या नात्यानें तिला सर्वांनीं योग्य मान दिला पाहिजे.

ही अट सर्व मंडळींनीं तावडतोब मान्य केली. कारण, राजाची निवड अयोग्य असणार नाहीं, ही सर्वांची खातरीच होती.

नंतर राजा प्रधानास म्हणाला, "ठरलें तर. आजपासून बरोबर एक महिन्यानें लग्न होईल. आपण सर्व तयारी उत्तम ठेवावी. मात्र माझी भावी वधू कोण आहे, तें लग्नाच्या दिवसापूर्वीं कोणास कळणार नाहीं. विवाहदिवशीं सकाळीं तिला येथें आणण्यांत येईल. त्यावेळीं तिच्या इतमामास योग्य असा लवाजमा असूं द्या."

* * * * *

२

सर्व लोक ज्याची मोठ्या उत्कंठनें वाट पहात होते तो दिवस एकदांचा आला! आज कमलपूर शहर कितीतरी शृंगारलें होतें! त्याची शोभा खरोखरी अवर्णनीय होती. प्रत्येकानें आपापलें मंदिर शक्य तितकें सुशोभित करून दारांत गुढ्यातोरणें लाविलीं होतीं.

रस्ते स्वच्छ झाडून, सारवून त्यांवर चित्रविचित्र रंगवल्ली काढिल्या होत्या. पुष्पपल्लवांच्या मनोहर माळा जिकडे तिकडे लटकत होत्या. सर्व रस्ते स्त्रीपुरुषांनीं गजबजलेले असून सर्वत्र आनंदीआनंद दिसत होता.

सूर्योदयाचे सुमारास, मोठ्या लवाजम्यासह विजयसिंहाची स्वारी, वधू आण-ण्याकरितां नगराबाहेर पडली. " आपली भावी स्वामिनी कोण बरें असेल ? " याबद्दल सर्व मंडळींत तर्कवितर्क चालले होते. इतक्यांत कमलपुरापासून ४।५ मैलांवर असलेल्या ' जंबुवन ' नांवाच्या खेड्यांतील एका झोंपडीजवळ राजा घोड्यावरून खालीं उतरला, व त्यानें सर्वांना तेथें थांबण्यास सांगितलें.

झोंपडीचा मालक पशुपाल नांवाचा एक गरीब पण सालस शेतकरी होता. त्याला सौदामिनी म्हणून एक १४।१५ वर्षांची अत्यंत सुस्वरूप, सद्गुणी व सुशील मुलगी होती. आई लहानपणींच वारल्यामुळें, घरांतील सर्व कामकाज तीच करीत असे. आज कमलपूरच्या राजाचा विवाहसमारंभ मोठा प्रेक्षणीय व्हावयाचा असल्यामुळें, तो पाहाण्यास सर्व गांवकरी जावयाचे होते. त्यांच्याबरोबर आपणही मौज पाहावयास जावें, म्हणून सौदामिनी सर्व काम लवकर आटोपून, नदीला पाणी आणायला गेली होती.

विजयसिंह पशुपालाची चौकशी करीत आंत गेला, इतक्यांत सौदामिनी घागर घेऊन घरीं आली. हा अनपेक्षित असा सर्व प्रकार पाहून ती अगदीं गोंध-ळून गेली.

राजा तिच्या बापाजवळ जाऊन म्हणाला, " पशुपाल, तुमच्या मुलीबरोबर लग्न करण्याची माझी इच्छा आहे. या गोष्टीला तुमची परवानगी आहे काय ? "

पशुपाल सुज्ञ व विचारी होता. त्यानें चटकन् उत्तर दिलें, " महाराज, माझ्या मुलीला ही गोष्ट पसंत असल्यास माझी मुळींच हरकत नाहीं. "

मग राजानें सौदामिनीस विचारिलें, " सौदामिनी, तूं माझ्याशीं लग्न करून, नेहमीं माझ्या इच्छेप्रमाणें वागण्यास तयार आहेस काय ? "

" बाबांची संमति असल्यास मी तयार आहें, " असें सौदामिनी म्हणाली. हें ऐकून विजयसिंहाला समाधान झाल्यासारखें दिसलें.

लगेच त्यानें अलंकार व उंची वस्त्रें तिला परिधान करावयास दिलीं. तिला व पशुपालाला बरोबर घेऊन तो कमळपुराला आला. सायंकाळीं मोठ्या थाटानें विवाहसमारंभ झाला. अपूर्व आनंदोत्सवाच्या कडाक्यांत व मंगलवाद्यांच्या गजरांत सौदामिनी राज्ञीपदारूढ झाली ! टोलेजंग मेजवान्या, थाटाच्या मिरवणुकी, देणग्या, दानधर्म वगैरे सर्व कांहीं विजयसिंहाच्या लौकिकास साजेसेंच झालें.

या समारंभांतून राजा मोकळा होतांच, त्यानें स्वतः सौदामिनीस शिक्षण देण्यास व तिला राजवराण्यांतील चालीरीति समजावून देण्यास सुरवात केली. साहजिकच तिला आजपर्यंत शिक्षणाचा गंधही ठाऊक नव्हता, तरी तिची बुद्धि जात्याच विशाल असल्यामुळें, ती कोणतीही गोष्ट तेव्हांच ग्रहण करीत असे, लवकरच तिनें नवीन आलेली जबाबदारी शिरावर घेण्याची पात्रता आंगीं येण्याजोगें शिक्षण संपादन केलें. गरजू व गरीब अशा लोकांचा योग्य परामर्श घेऊन ती आपला पत्नीधर्म उत्तम तऱ्हेनें बजावूं लागली. आपल्या राजाला पत्नी अगदीं अनुरूप मिळाली म्हणून सर्व प्रजाजन तिची वाखाणणी करूं लागले. विजयसिंग व सौदामिनी हीं दोघें एकमेकांला सुख देण्याकरितां फार झटत असत. त्या ठिकाणीं सौदामिनीचा काल आनंदांत जाऊं लागला.

लग्नानंतर एक वर्षानें तिला एक सुंदर व सुलक्षणी मुलगी झाली. राजानें कन्येच्या जन्माप्रीत्यर्थ मोठा आनंदोत्सव करून तिचें नांव ' प्रमोदिनी ' असें ठेविलें. खरोखर नांवाप्रमाणें ती सर्वांचा आनंद वृद्धिंगत करणारी होती. पण तिच्या जन्मापासून राणीच्या मात्र ग्रहदशेला प्रारंभ झाला ! काय असेल तें असो, विजयसिंह राणीशीं पूर्वीप्रमाणें प्रेमानें वागेनासा झाला. रोज कांहींना कांहीं निमित्तानें त्यानें तिला रागें भरावें. तिची नेहमींची सरळ वागणूक त्याला पसंत पडेना. ती मुकाट्यानें सर्व छळ सोशीत असे.

प्रमोदिनी दोन महिन्यांची झाल्यावर एके दिवशीं राजा राणीला म्हणाला, " सौदामिनी, तूं मूळचीच अशिक्षित. तुला कितीही शिकविलें तरी, तुझ्यामध्यें सुधारणा होत नाहीं. तुला माझ्या मुलीचें संगोपन मुळींच करतां येत नाहीं. तुझ्याजवळ राहिल्यास पुढें ती तुझ्याच वळणावर जाईल. यास्तव तिचें चांगलें संवर्धन होण्याकरितां व तिच्या थोर कुलाला योग्य असें शिक्षण तिला मिळण्याकरितां, मी तिला माझ्या कांचनद्वीपांतील एका मित्राकडे पाठविणार आहें. तूं आहेस का याला कबूल ? " राणीनें उत्तर दिलें, " महाराज, आपली इच्छा तीच माझी इच्छा. मी आपल्या बाहेर मुळींच नाहीं. " " ठीक आहे. " असें म्हणून राजा स्वतःच मुलीला घेऊन गेला.

प्रियकन्येची व आपली ताटातूट झालेली पाहून राणीला अत्यंत दुःख झालें ! राजाची वागणूक तिच्याशीं फार कठोरपणाची होत चालली होती; परंतु ती आपल्या पतीविरुद्ध एक चकार शब्द कधीं बोलली नाहीं.

असेंच आणखी एक वर्ष गेलें. राणीला एका पुत्ररत्नाचा लाभ झाला. राजानें पूर्वीप्रमाणेंच मोठा समारंभ करून पुत्राचें नांव 'प्रतापसिंह' ठेविलें. राजपुत्र एक महिन्याचा झाल्यावर, त्यालाही पूर्वीच्या सबबीवर दुसरीकडे पाठविण्यांत आलें. अजून राणीच्या दुःखाचा कळस व्हावयाचा होता. पण तोही प्रसंग आला.

विजयसिंह तिला म्हणाला, "सौदामिनी, तुझ्यासारख्या खेडवळ व हीन कुळांतील बायकोशीं लग्न करण्यांत मी मोठीच चूक केली. तुझ्यापासून मला गृहसौख्य तर मिळत नाहींच, पण बाहेर मित्र मंडळीमध्येंसुद्धां मला तुझ्यामुळें अपमान सोसावा लागतो. म्हणून तूं आपल्या बापाच्या घरीं निघून जा." सौदामिनीच्या अंतःकरणावर वज्राघातच झाला! क्षणभर तिला कांहीं सुचेना. पण लगेच चित्त स्थिर करून ती म्हणाली, "महाराज, आपल्या इच्छेप्रमाणें वागण्याचें वचन मीं लग्नापूर्वीच आपणांस दिलें आहे; व तसें वागणें माझा धर्मच आहे. आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे!" लगेच तिला तिच्या पित्याच्या घरीं पोहोंचविण्यांत आलें.

राजानें अकारण सौदामिनीचा त्याग केलेला ऐकून वृद्ध पशुपाल अत्यंत संतप्त झाला. परंतु सौदामिनीनें त्याला शांत करून, राजाच्या विरुद्ध त्याला कांहीं बोलूं दिलें नाहीं. तिचा पूर्वीचा आयुष्यक्रम पुन्हा सुरू झाला! तिच्या वृत्तींत बिलकूल फरक पडला नाहीं. वृद्ध पित्याची सेवा व पतिदेवतेचें मंगलचिंतन यांत तिनें कधीं अंतर पडूं दिलें नाहीं!

* * *

अशा खडतर तपश्चर्येंत, चौदा वर्षांचा दीर्घकाल केव्हांच निघून गेला. या अवधींत सांगण्यासारखें कांहींच घडलें नव्हतें. परंतु आतां सर्वांच्या आचारांत व विचारांत क्रांति घडविणारी अशी एक गोष्ट सर्वत्र चर्चेचा विषय होऊन बसली आहे. ती गोष्ट म्हणजे, विजयसिंहाचा ठरलेला द्वितीय विवाह ही होय. याबद्दल कोणी राजाची निंदा करीत तर कोणी स्तुतिही करीत. सौदामिनी मात्र या दोन्ही गोष्टींपासून अलिप्त होती.

कमलपुरांत मोठ्या जारीनें लग्नाची तयारी चालली होती. पूर्वीप्रमाणेंच आतांही राजाची भावी पत्नी विवाहदिवसापर्यंत अप्रसिद्धच राहिली होती.

विवाहदिवशीं सकाळीं, राजा लवाजम्यानिशीं तिला आणण्याकरितां गेला. तो परत येतांना, जंबुवन गांवावरूनच यावयाचा होता. सोळा वर्षांपूर्वीचा

सर्व देखावा सौदामिनीच्या मनश्चक्षूंसमोर उभा राहिला. त्या वेळच्या सर्व गोष्टी आपण आतां खऱ्याच अनुभवीत आहों, असा तिला क्षणभर भास झाला. इतक्यांत, खरोखरच सर्व परिवारासह राजाची स्वारी दारांत येऊन थडकली. विजयसिंह एका भव्य पांढऱ्या घोड्यावर बसला होता. जवळच एका शृंगारलेल्या रथांत, जणू काय स्वर्गीय सौंदर्याची पुतळीच अशी एक तरुणी, बहुमोल वस्त्रालंकारांनीं सजलेली बसली होती. सर्व जनांची दृष्टि तिच्या रूपावर खिळून राहिली होती. या तिच्या लावण्याबद्दल जिकडे तिकडे, आपापसांत प्रशंसा चालू होती. जे लोक एके काळीं सौदामिनीची वाखाणणी करीत होते, तेच आतां तिची निंदा व या नव्या स्वामिनीची स्तुति करूं लागले.

विजयसिंहानें तिला रथांतून खालीं उतरलें व तिच्यासह तो घरांत गेला. सौदामिनी क्षणभर देहभान विसरली. पण लगेच त्यांना बसावयास पाट देऊन ती दूर नम्रतेनें उभी राहिली. ती पूर्वीपेक्षां किंचित् कृश व गंभीर दिसत होती. बाकी तिच्या सौंदर्यांत बिलकूल फरक पडला नव्हता.

विजयसिंह तिला म्हणाला, " सौदामिनी, माझी भावी पत्नी तुला भेटण्याकरितां आलेली आहे. तुला ती कशी काय वाटते ? "

**सौदामिनी:**— महाराज, असें अप्रतिम लावण्य मीं कधींच पाहिलें नव्हतें. खरोखर यांना पाहून मला फार आनंद होत आहे. ईश्वर आपणा उभयतांना पूर्ण सुखी ठेवो, अशी माझी त्याचे चरणीं प्रार्थना आहे. पण— आपल्या चरणींहि माझी एक विनंति आहे—

**विजयसिंह:**— काय आहे ? बोल.

**सौदामिनी:**— आपण—पूर्वीं एकीची जशी कसून परीक्षा घेतली तसा प्रसंग या राणीसाहेबांच्यावर कधीं येऊं नये, एवढीच महाराजांचे चरणीं माझी नम्र विनंति आहे.

सौदामिनीचें हें निर्मत्सरयुक्त व कळकळीचें भाषण ऐकून राजा अत्यंत गहिंवरला. तो तिच्याजवळ जाऊन म्हणाला, "सौदामिनी, तूं खास कोणीतरी शापभ्रष्ट देवता आहेस! सहनशीलता व क्षमाशीलता हे तुझे अमोल गुण मानवी कोटींत आढळणें अशक्य आहे! मी तुला अत्यंत कठोरपणानें वागविलें आहे. माझ्या वर्तनाची मला लज्जा वाटते. मी सर्वस्वीं अपराधी आहें; तूं मला क्षमा करशील काय ? तुझ्या-

खेरीज कोणतीही स्त्री, माझ्या हृदयांत वास करण्यास समर्थ नाहीं. येथें असलेल्या या तरुणीशीं तर माझा विवाह होणें शक्य नाहीं; कारण ही आपली प्रियकन्या प्रमोदिनी आहे!" असें म्हणून राजानें तिचा हात राणीच्या हातीं दिला व बाहेर जाऊन एक १२–१३ वर्षांचा सुंदर राजबिंडा मुलगा बरोबर घेऊन तो आंत आला, आणि म्हणाला, " हा आपला कुमार प्रताप ! सौदामिनी, हीं दोन्ही मुलें मी तुझ्यापासून निर्दयपणानें हिरावून घेतलीं होतीं. त्यांचा व तुझ्या ह्या अपराधी पतीचा स्वीकार कर ! " विजयसिंहाचें हें भाषण ऐकून, सौदामिनी, पशुपाल व तीं दोन्ही मुलें फार बुचकळ्यांत पडलीं होतीं. त्यानें थोडक्यांत सर्वांचें शंकानिरसन केलें. मुलांचें संगोपन व शिक्षण, एका विश्वासू सरदाराकडून गुप्तपणें करविण्यांत आलें होतें. खरा प्रकार, आजपर्यंत त्यांनाही कळविलेला नव्हता. हें सर्व नाटक सौदामिनीची परीक्षा पाहाण्याकरतां केलें होतें, हें आतां उघडच झालें. साध्वी सौदामिनी त्या दिव्यांतून उत्तम तऱ्हेनें पार पडली. तिच्या सर्व दुःखाचा असा गोड शेवट झालेला पाहून, पशुपालाच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले !

प्रियपत्नी, राजकुमारी, युवराज व पशुपाल यांच्यासह विजयसिंह रथांत जाऊन बसला. बाहेरील मंडळींना हें कोडें उलगडण्यास थोडा वेळ लागला. पण लवकरच ही शुभवार्ता सगळीकडे पसरली व सर्वत्र आनंदीआनंद झाला.

सुखदुःखाच्या गोष्टी बोलत व एकमेकांचें समाधान करीत, राजकुटुंबांतील मंडळी राजवाड्यांत आली. सायंकाळीं, प्रमोदिनीचा विवाह, तिला अनुरूप अशा एका तरुण सरदारपुत्राशीं मोठ्या थाटानें झाला. तिच्या आईसारखा कठीण प्रसंग तिच्यावर मात्र कधीं आला नाहीं; व त्या नवीन दांपत्याचा संसार फार सुखाचा झाला. सौदामिनीचेंही पुढील सर्व आयुष्य पतिपुत्रांच्या सुखमय सहवासांत अत्यंत आनंदांत गेलें.

---

# प्रार्थना गीतें.

( लेखकः—काशीनाथ परशुराम साने, शिक्षक घोडें जि. पुणें )

(१)

( चालः—बाळा, जो जो रे० )

कृपाघना, भक्तवत्सला देवा, वंदन तवचरणा ॥ ध्रु० ॥

विनंति प्रभु तुजला । नम्रपणें
बालक आम्ही करितों । अक्षय ठेव कृपा ॥ कृपाघना० ॥ १ ॥

रक्षक दीनांचा । जगदीशा
कैवारी भक्तांचा । एकचि तूं असशी ॥ कृपाघना० ॥ २ ॥

प्रकाश देण्याला । आकाशीं
चंद्र, सूर्य आणि तारे । आम्हां दिधलेसी ॥ कृपाघना० ॥ ३ ॥

पाउस पाडोनि । चराचरां
जीवन[१] तूं देतोसी । देवा, जगण्याला ॥ कृपाघना० ॥ ४ ॥

ऐसी ही सृष्टी । निर्मियली
सुख देण्या आम्हांला । सदया तूं देवा ॥ कृपाघना० ॥ ५ ॥

अज्ञपणें नुमजे । बालांना
प्रमाद घडती देवा । 'क्षमस्व[२]' आम्हांला ॥ कृपाघना० ॥ ६ ॥

विद्यार्जन[३] करितों । सहाय तूं
दे निशिदिनीं[४] आम्हांला । निरसीं[५] अज्ञाना ॥ कृपाघना० ॥ ७ ॥

गुरु, जननी, जनिता । पूज्य असो
अक्षय या बाळांना । सुबुद्धि ही ठेवीं ॥ कृपाघना० ॥ ८ ॥

देई चिर आयू । स्वनृपाला[६]
सुखी ठेव दुनियेला । देवा, अक्षय तूं ॥ कृपाघना ॥ ९ ॥

देई हेंचि आतां । विसर तुझा
तसा मायदेशाचा[७] । आम्हां नच होवो ॥ कृपाघना० ॥ १० ॥

---

१ पाणी. २ क्षमा कर. ३ विद्या मिळविणें. ४ रात्रंदिवस. ५ नाहींसें कर. ६ आमच्या राजाला. ७ जन्मभूमीचा.

( २ )

## [ मुलींसाठीं ]

( चालः—दे दे दे दे गडे, दे लवकर झोका० )

या या या गडे, । प्रभुचरणां नमुं या ।
सर्वजणी प्रभुचरणीं लवुं या ॥ ध्रु० ॥

सर्व जगाचा जो । चालक प्रभु आहे ॥
म्हणिं नत व्हा । विनयानें । तच्चरणां ॥ या या या०॥१॥

ज्ञान-बुद्धि दाता । होय हरी साचा ॥
सुख देवो । अक्षय हा । सकलांना ॥ या या या० ॥ २ ॥

प्रभुचरणीं भावें । विनति करूं सगळ्या ॥
अज्ञ मुली । असति खऱ्या । देवा या ॥ या या या०॥३॥

हरघडि अज्ञानें । चुकत असूं आम्ही ॥
व्हावि क्षमा । प्रेमभरें । आम्हांला ॥ या या या० ॥ ४ ॥

आणिक वर ऐसा । प्रभु आम्हां द्यावा ॥
विसर तुझा । नच व्हावा । बालां या ॥ या या या॥५॥

हेंचि अतां द्यावें । करुणाघन प्रभु तूं ॥
श्रीविद्या । प्रसन्न हो । बालांना ॥ या या या० ॥ ६ ॥

# साडेतीन राव.

अठराव्या शतकांत सखाराम बापू बोकील, देवाजीपंत चोरघोडे, विठ्ठल सुंदर संगमनेरकर व नाना फडणवीस असे मोठे मुत्सद्दी झाले त्यांस साडेतीन शहाणे म्हणतात; त्याचप्रमाणें साडेतीन राव ह्या नांवानें दुसरीं चार माणसें प्रसिद्ध आहेत. राज्यकारभारास जशी मुत्सद्यांची गरज आहे तशीच वीर पुरुषांचीही आहे. वीर पुरुषांसच 'राव' हें नांव प्राप्त होणें योग्य आहे. गोपाळराव पटवर्धन हे एक राव होते. ह्याचे पराक्रमाविषयीं थोडीशी माहिती खालीं दिली आहे ती वाचली म्हणजे 'रावपणा' मिळविणें किती कठीण असतें व तो गोपाळराव ह्यांस कसा योग्य होता हें सहज समजून येईल.

इ. स. १७६४–६५ मध्यें श्रीमंत माधवराव पेशवे ह्यांनीं हैद्रावर स्वारी केली. त्यावेळीं गोपाळराव पटवर्धन हे त्यांचे बरोबरच होते. मराठी फौजेनें धारवाडास वेढा घालून तो किल्ला सर करण्याचा उद्योग चालविला, इतक्यांत हैदर हा मोठ्या सैन्यासह येत आहे असें वर्तमान श्रीं. माधवराव ह्यांस समजलें. आतां कदाचित् वेढा उठवावा लागेल व हातची शिकार जाईल असें त्यांस वाटलें. तेव्हां त्यांनीं आपल्या सर्व सरदारांचा विचार घेतला. गोपाळराव ह्यांस त्याचे तोंडावर पाठवावें म्हणजे ते हैद्रास अडवतील व आपणांस किल्ला सर करितां येईल असें सर्वांच्या विचारें ठरलें. त्याप्रमाणें गोपाळरावांची हैद्रावर रवानगी झाली. पटवर्धन आपल्यावर चाल करून येत आहेत असें समजतांच पुढें जाण्याचा आपला बेत रहित करून हैदर श्रीरंगपट्टणास परत फिरला!

श्री. माधवराव व राघोबादादा ह्यांचे भांडणांत जानोजी भोंसले ह्यानें राघोबास मदत केली. अर्थात् राघोबाचा बंदोबस्त केल्यावर पेशव्यानें वऱ्हाड, नागपूर घेऊन चांदा किल्यास वेढा घातला. तेव्हां जानोजीनें पुण्यावर स्वारीचा बेत करून तो पेशव्यांच्या मुलखांत शिरला. त्यास दामाजी गायकवाड ह्याचा मुलगा गोविंदराव ह्याची मदत होती. तसेंच निजाम सुद्धां त्यांस मिळत आहे अशी बातमी आली–तेव्हां वेढा उठवून त्याचा बंदोबस्त करणें पेशव्यास भाग होतें; हें काम अवघड असून तें मोठ्या धडाडीनें व्हावयास पाहिजे होतें. कारण जानोजीला थोडेसें यश आल्यास राघोबादादा गडबड करतील आणि मग बाजीराव व दाभाडे ह्यांच्या लढाईप्रमाणें आपसांतच लढाई करावी लागेल. ही सर्व आपत्ति टाळण्यासाठीं श्री. माधवरावांनीं सर्वांचे सल्यानें गोपाळराव पटवर्धन ह्यांची त्या कामावर नेमणूक केली. त्यांनीं काम फत्ते केलें हें सांगणें नकोच.

---

# पोंच व अभिप्राय.

**कुलाबा जिल्ह्याचें बालभूवर्णन:**—या पुस्तकांत प्रथमतः जिल्ह्याची माहिती दिली असून मग एकेक तालुक्याची माहिती दिली आहे. शहरें, पोस्ट ऑफिसें, खाड्या, नद्या, घाट यांच्या याद्या दिल्या असून त्या पाठ करण्याकडे मुलांची स्वाभाविक प्रवृत्ति होईल. वर्णनात्मक भाग जास्त दिला असता तर पुस्तक मनोरंजक झालें असतें. भूगोल मनोरंजक व्हावा याकडे तो लिहितांना जास्त लक्ष दिलें पाहिजे.

**कऱ्हाड:**—या गांवाच्या नांवाची पीठिका, तेथें झालेलीं निरनिराळीं राज्यें व तेथील जुन्या इमारती यांची ग्रंथकर्त्यानें २२०० वर्षांची थोडक्यांत माहिती साधार प्रसिद्ध केली असून हें पुस्तक भारत इतिहास संशोधक मंडळानें स्वखर्चानें प्रसिद्ध केलें आहे यावरून याचें महत्त्व लक्षांत येईल.

**पिंपळपान:**—हें छोटेखानी पुस्तक 'विहंगमवृंदानें' प्रसिद्ध केलें असून त्यांत निरनिराळ्या कवींचीं काव्यें ग्रथित केलीं आहेत निवड उत्तम असून कल्पना फारच चटकदार आहेत. 'खंडाळ्याच्या घाटांत,' 'प्रेमाचा प्रभाव,' 'माझी प्रभात' वगैरे नमुन्यादाखल देत आहोंत. पुस्तक संग्रहणीय आहे पण तें फक्त प्रौढांच्या उपयोगी आहे.

**आलेगांवकर यांची शाळा**—खडकी जिल्हा पुणें—

यांच्या शाळेचा रिपोर्ट पोंचला. त्यावरून काम बरें दिसतें.

**मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें:**—ह्यांचा ३४ वा वार्षिक अहवाल पोंचला. रा. ब साने, रा. भावे, प्रो. विजापूरकर, कवि गोविंद, रा. ब. पारसनीस, व वि० का. राजवाडे ह्यांचें मृत्यूमुळें संस्थेचें फार नुकसान झालें. संस्थेजवळ ७४७१ ग्रंथ आहेत. एकंदरीत काम चांगलें चाललें आहे असें दिसतें.

**कन्याशाळा मालवण:**—नववा वार्षिक अहवाल पोंचला. संस्थेच्या प्रसिद्ध झालेल्या परीक्षांच्या निकालावरून व अहवालांतील पान ९ वर दिलेल्या शिक्षणाच्या एकंदर स्वरूपावरून काम समाधानकारक चालल्याचें दिसतें.

**औद्योगिक निधि ऊर्फ पैसाफंड:**—या संस्थेचा एकविसावा वार्षिक अहवाल पोंचला. पैसाफंडाच्या साहाय्यानें तळेगांवीं एक काचेचा धंदा शिकविणारी शाळा

चाललेली असून तींतून निघालेल्या विद्यार्थ्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं काच कारखाने उत्तम रीतीनें चालविले आहेत. ह्या कारखान्यांत पुष्कळ नवीन प्रयोग चालू आहेत असें दिसतें.

**प्रश्नमालाः**—हें पुस्तक रा. कुळकर्णी यांनीं लिहिलें आहे. ह्यांत सन १९२४ ते २७ पर्यंतचे मुलींचे व्ह० फायनल परीक्षेस पडलेले प्रश्न व त्यांचीं उत्तरें छापिलीं आहेत. अशा प्रकारच्या पुस्तकांपासून घोकंपट्टीस उत्तेजन मिळतें, ह्यांत मुळींच संशय नाहीं असें आम्हांस वाटतें. तरीपण मुद्देसूद उत्तर कसें लिहावें हें ह्यापासून समजण्यासारखें आहे. किंमत ८½ आणे.

**गृहलक्ष्मीः**— ह्या मासिकाचे आतांपावेतों चार अंक आमचेकडे आले आहेत. त्यांवरून गृहलक्ष्मीनें आपलें ध्येय सतत डोळ्यांसमोर ठेवल्याचें स्पष्ट दिसतें. हिचें संपादकत्व दोन ग्रॅज्युएट विदुषींकडे असून सहसंपादक वसंत बळवंत मराठे हे आहेत.

महाराष्ट्रांत स्त्रियांसाठीं त्यांनींच चालविलेलें असें हें पहिलेंच नियत कालिक आहे. ह्यांतील विषय स्त्रीसमाजाला अत्यंत महत्त्वाचे आहेत. सामान्यतः स्त्रियांतील ज्ञान प्रसाराचा प्रश्न विचारांत घेणारांच्या मनांत ज्या ज्या कल्पनांचा प्रादुर्भाव होतो त्या सर्व कल्पनांचा निर्देश गृहलक्ष्मीचे ध्येयांत झालेलाच आहे. तेव्हां हें मासिक वाचकांना हितप्रद होऊन स्वतांला यशस्कर होईल अशी आम्हांस खातरी वाटते. चित्रयुक्त मासिकाची वार्षिक वर्गणी ३ रु. ही बेताचीच आहे.

**आशावादीः**—ही कादंबरी डॉ. केतकर यांनीं लिहिलेली असून तिचीं पृष्ठें २५१, किंमत २ रु. आहे. डॉ. केतकर यांनीं पाश्चात्य देशांत प्रवास करून समाजशास्त्राचें अध्ययन केलें. आतां आपल्या देशांतील चालीरितींत सुधारणा व्हावी म्हणून निरनिराळ्या तऱ्हेच्या तीन कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या. ह्यांचे विचार सर्वांनांच पटतील असें वाटत नाहीं. तरी पण डॉक्टरसाहेबांची चिकित्साबुद्धि, सूक्ष्मपणें निरीक्षण करण्याचें सामर्थ्य व स्पष्टवक्तेपणा हे गुण ह्या कादंबरींतही दिसून येतात. त्यांनीं आपले भगवद्गीतेबद्दलचे ब्रह्मगिरिच्या मुखांत घातलेले विचार प्रसिद्ध केले नसते तर बरें झालें असतें. ' तसेंच ' कल्चर ' प्रोपागांडा 'सिनिक' सारखे इंग्रजी शब्द निष्कारण योजणें बरें नव्हे.

वरील पुस्तकें पाठविणारांचे आम्ही आभारी आहों.

कमिशन शें. १५ टक्के. मुलींचे वाळवेकर यांना लिहा.

व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेची

छापून तयार किं. ८॥ आणे. पानें. सु.१००. ] **प्रश्नोत्तरमाला.** [ निकोटें १०॥ आण्याची

(१९२४ ते १९२७)

उत्तरें थोडक्यांत व मुद्देसूद. छपाई सुबक. मिळण्याचीं ठिकाणें-(१) को. ना. वाळवेकर. बुकसेलर नवीपेठ अहमदनगर (२) सेवासदन ट्रे. कॉ. विद्यार्थिनी-सहकार-मंडळाची ग्रंथशाला पुणें. बुधवार ५९५ पुणें.

---

(श्री. न. चिं. केळकर यांची मार्मिक प्रस्तावना.)

# महाराष्ट्र स्त्रीगीत.

सरकारनें शाळाखात्यांत मंजूर केलें.

या पुस्तकांत स्त्रियांच्या पाठांतांतील जुनीं देवादिकांचीं, व कवि कवयित्री यांनीं रचलेलीं नवीं मोहक लोकप्रिय चालींचीं गाणीं, नोटेशन, चित्रें, यांसह असल्यामुळें तें अत्यंत प्रिय झालें आहे. किं. १॥ रु. (पत्ता—किताबखाना पुणें. परचुरे पुराणीक मं. माधवबाग मुंबई.)

कृष्णराव गणेश फुल्टे.

---

टेक्स्ट म्हणून मंजूर झालेलीं. ] **मुलांचें अंकगणित.** [ कमिशन शें. २०.

पुस्तक १ लें. इ. २ करितां किं. ३ आ. पुस्तक २ रें, इ. ३ करितां किं. ३॥ आ. पुस्तक ३ रें, इ. ४ करितां किं. ५ आ. उदाहरणें ९५० उत्तरांसह मंजुरीकरितां पाठविलें आहे.

लेखक—म. गो. मोडक, एम्. ए. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें व द. ज. गोखले बी. ए. हेडमास्तर प्रॅ. स्कूल पुणें.

नवीन पद्धतीनें प्रथमच लिहिलेलीं; कन्याशिक्षक, इन्स्पेक्टिंग ऑफिसर्स वगैरेंनीं वाखाणलेलीं, अन्ट्रेन्डशिक्षकांसही मार्गदर्शक--उदाहरणें भरपूर.

नाट्यरूप महाराष्ट्रः—लेखक—वि. द. घाटे, एम्. ए. बी. टी. शिक्षक ट्रे. कॉलेज पुणें. अस्सल कागद पत्रांचे आधारें लिहिलेला. तत्कालिन महाराष्ट्राचें चित्र यथावत् उभें करणारा, संवाद रूपानें लिहिलेला. इतिहासप्रवेश ४२. किं. १ रु.

मिळण्याचें ठिकाणः—पुणें, मुंबई येथील प्रसिद्ध बुकसेलर्स विशेषतः ल. ना. गोडबोले लक्ष्मीरोड पुणें. परचुरे पुराणिक कंपनी माधवबाग मुंबई, अगर मोडक ५०१ शनिवार पुणें.

Registered No. B 1195,


लक्ष्मीबाई प्रधानकृत

## विणकला भाग १ ला.

अलीकडे स्त्रीशिक्षणाचा प्रसार झाल्यापासून त्याचेबरोबरच प्रत्येक सुशिक्षित कुटुंबांत विणकलेचा जारीनें प्रघात सुरू झाला आहे. त्या कलेवर आजपावेतों दोन तीन पुस्तकेंही प्रसिद्ध झालीं, परंतु या कलेचें पूर्ण ज्ञान होण्यास या पुस्तकासारखें पुस्तक झालें नव्हतें. यांत कर्त्रीनें इंग्रजी पुस्तकावरून उत्तम प्रकारचें ज्ञान संपादन करून एकंदर नमुने स्वतः विणून त्याचे फोटो घेऊन त्या फोटोचे ब्लॉक नेरॉय कंपनीकडून तयार करवून आर्टपेपरवर छापून पुस्तकांत घातले आहेत व त्या त्या आकृतीचें वर्णन छापिलें आहे. यांत पुढीलप्रमाणें तीस प्रकारच्या विणी, गळपटे (दुरंगी साधे, टॉय ३ प्रकारचे), पायमोजे चार प्रकारचे, टोप्या (गंधर्व, साधी, गलोर्ने, रुमी, गांधी, साहेबी, कमळाची, प्रवासी, बॉनेट, थंडीची, प्रवासी चार सुयांची), झबलीं ८ प्रकारचीं, गंजीफ्रॉक्स, साधे कोट, ओव्हरकोट, झुलं, झाली वगैरे विणण्याची माहिती असल्यामुळें ही कला अवगत करून घेण्याला फारच उपयुक्त असें हें पुस्तक झालें आहे. पुस्तकाचे खर्चाचे मानानें किंमतही अल्प म्हणजे फक्त रु. १। ठेविली आहे. ट. ख. व्ही. पी. सह रु. १॥०

**मिळण्याचें ठिकाणः—लक्ष्मण नारायण गोडबोले, बुकसेलर लक्ष्मीरोड, पुणें सिटी.**

---

**संख्या, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, व भागाकार,**

**हा गणिताचा मुख्य अवघड व तात्त्विक भाग सोपे लहान व क्रमवार ४७ धडे पाडून ट्रेनिंग कॉलेजमध्यें मी शिकवितों तसा स्पष्ट करून समजावून देणारें.**

कि. ०५ ] **सुबोध अंकगणित** [ तिकिटें
ट. ह. ०१ ] [ पाठवा.

ट्रेनिंगसाठीं टेक्स्ट व शिक्षकांच्या लायब्ररीस मंजूर आहे. उदा० संग्रह जोडलेल्या प्रतीस ०१ अधिक २५ प्रतीस २५ % कमी.

ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें. { रा. स. जोशी,
B. A. S. T. C. D.

# कन्याशिक्षक.

वर्ष १३ वें. ] नोव्हेंबर १९२७. [ अंक ९.

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व **मिस् आर. नवलकर**, बी. ए., **लेडी सुपरिन्टेन्डेन्ट** ट्रेनिंग कॉलेज फार वुइमेन पुणें यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

वार्षिक वर्गणी
ट. हां. सह १॥ रुपया.

या अंकाची
किंमत ३ आणे.

२९ नोव्हेंबर १९२७.

# अनुक्रमणिका.

| विषय. | पान. |
|---|---|
| १ जोडवर्ग. ... ... ... ... | १९३–१९८ |
| २ आधुनिक भूगोल, त्याची उत्पत्ति व व्याप्ति. ... | १९८–२०२ |
| ३ शेरास सवाशेर. ... ... ... ... | २०२–२०३ |
| ४ मुलांकरितां कविता. ... ... ... | २०४ |
| ५ दिवाण साहेबांची भेट. ... ... ... | २०५ |
| ६ प्रकाश.व डोळ्यांची काळजी ... .... ... | २०६–२०८ |
| ७ कीटकसृष्टि. (कविता) ... ... ... | २०९ |
| ८ अफगाणिस्तान ... ... ... ... | २१०–२१४ |
| ९ लीलावती व तिचा अल्प परिचय. ... ... | २१५–२१८ |
| १० पोंच व अभिप्राय.... ... ... ... | २१९ |
| ११ सर्टिफिकेट परीक्षेचा निकाल. ... ... | २२०–२२४ |

33 ९/२


# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

वर्ष १३ वें. ] नोव्हेंबर १९२७. [ अंक ९


## जोडवर्ग.

आपल्या इकडील प्राथमिक शाळांपैकीं शेंकडा ६० शाळांना एकच शिक्षक असतो, व त्याला तीन किंवा चार वर्ग शिकवावे लागतात. आतां सक्तीचा व मोफत शिक्षणाचा कायदा पास झाला आहे, तेव्हां या कायद्यान्वयें प्रत्येक जिल्ह्यांतून सक्तीचें व मोफत शिक्षण दिलें जाईल. या शिक्षणाकरितां पुष्कळ नव्या शाळा उघडाव्या लागतील. खेड्यापाड्यांतून शाळांची संख्या वाढेल. या शाळ.तूनही बहुधा एकाच शिक्षकाला दोन तीन वर्ग घ्यावे लागतील. एका शिक्षकाच्या हाताखालीं एकच वर्ग असला म्हणजे त्याला वर्गांतील सर्व मुलांकडे चांगलें लक्ष देतां येतें, व पद्धतशीर रीतीनें सर्व विषय शिकवितां येतात, ही गोष्ट जरी खरी आहे, तरी सध्यां आपल्या परिस्थितींत सर्वच प्राथमिक शाळांतून प्रत्येक वर्गाला एक स्वतंत्र शिक्षक देणें शक्य नाहीं. या परिस्थितीचा दोष कोणासही देतां येणार नाहीं. सध्यां असलेल्या शेंकडा ६० शाळांतून प्रत्येक शिक्षकाला एकाच वेळीं दोन तीन वर्ग शिकवावे लागतात ही गोष्ट दृष्टीआड करतां येणार नाहीं, व प्राथमिक शिक्षणाच्या शाळांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतसे जोडवर्ग असणाऱ्या शाळांचें शेंकडा प्रमाण वाढत जाईल हीही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे.

प्राथमिक शाळेंत निदान पांच वर्षे तरी मुलांनीं राहावें अशी नवीन कायद्याची योजना आहे. या पांच वर्षांत मुलांना लिहितां वाचतां यावें, त्यांना विद्येची गोडी लागावी, व शाळा सोडल्यावरही त्यांना स्वतःच्या प्रयत्नानें आपल्या ज्ञानांत भर घालण्याची आवड लागावी अशी सरकारची अपेक्षा आहे. शिकणाऱ्या मुलांपैकीं शेंकडा पन्नासांपेक्षां आधिक मुलें खेड्यांतील शाळांतून शिकत आहेत व या मुलांची संख्या दिवसानुदिवस वाढत जाईल. यांजकरितां या शाळांतून शिक्षण देण्याची योजना समाधानकारक असली पाहिजे, ही गोष्ट सध्यां अत्यंत अवश्य आहे. खेड्याच्या शाळांतून अभ्यास चांगला होत नाहीं, व जें कांहीं थोडेंबहुत मुलें शिकतात तेंही शाळा सोडल्यानंतर ताबडतोब विसरून जातात, असा अनुभव आहे. अशा रीतीनें सरकारचा व जनतेचा पैसा, शिक्षकांचा व विद्यार्थ्यांचा काळ व परिश्रम हे सर्व वायां जातात, व प्राथमिक शिक्षण यशस्वी होत नाहीं. ही स्थिति अनिष्ट आहे याबद्दल कोणाचाही मतभेद होणार नाहीं. ही स्थिति सुधारण्याचा प्रयत्न करणें हें अगत्याचें काम आहे. कांहीं शिक्षकांचें असें म्हणणें आहे कीं, जोंपर्यंत शिक्षकाला एकापेक्षां अधिक वर्ग संभाळावे लागतात, तोंपर्यंत ही स्थिति सुधारणें शक्य नाहीं. परंतु या विधानांत अतिशयोक्तीचा भाग बराच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोठमोठ्या सुधारलेल्या देशांतही अजून सुद्धां खेड्यापाड्यांतून एकाच शिक्षकाला जोडवर्ग शिकवावे लागतात, व जोडवर्ग घेतल्यानें मुलांची शिक्षणप्रगति थांबते, असा तिकडील अनुभव नाहीं. आज तीन वर्षे या ट्रेनिंग कॉलेजनें आपल्या प्रॅक्टिसिंग स्कूलमध्यें जोडवर्ग शिकविण्याचा प्रयोग करून पाहिला आहे. तेव्हां या बाबतींत आमचे विचार व अनुभव पुढें मांडण्याला आतां कांहीं हरकत आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

लहान मुलांना शिकविणें हें कांहीं सोपें काम नाहीं. या कामासाठीं शिक्षकाचे आंगीं चातुर्य, बाल स्वभावाचें चांगलें ज्ञान, मुलांच्याबद्दल प्रेम व कळकळ हे गुण अवश्य लागतात. या सर्व गोष्टी असल्याशिवाय लहान मुलांना शिकविण्याचें काम शिक्षकाचे हातून समाधानकारकपणें पार पडणार नाहीं. ज्या शिक्षकाला बालवर्गाला जोडून इतर वर्ग घ्यावयाचे असतात, त्याला तर जास्तच अनुभव व चातुर्य पाहिजे. अर्थातच जोडवर्ग, ज्याला आपल्या धंद्याची बिलकूल माहिती नाहीं, अशा अन्ट्रेंड शिक्षकाला घेणें शक्य नाहीं. आमचा अनुभव असा आहे कीं, पहिल्या वर्षांतल्या विद्यार्थिनीला देखील जोडवर्ग घेणें शक्य नसतें. एक वर्ष

## जोडवर्ग.

ट्रेनिंग कॉलेजांत राहिलेल्या विद्यार्थिनींस किंवा विद्यार्थ्यांस शिक्षणाच्या कामाची साधारण माहिती होते. ही माहिती व हा अनुभव हीं जोडवर्ग घेण्याला पुरेशीं पडत नाहींत. जोडवर्ग असणाऱ्या शाळा या नेहमीं दुसऱ्या वर्षाची परीक्षा पास झालेल्या शिक्षकांच्या ताब्यांत देणें हें मुलांच्या हिताच्या दृष्टीनें इष्ट आहे असें आम्हांस वाटतें. एका शिक्षकाच्या हाताखालीं दोन किंवा तीन वर्ग असले तरी या वर्गांचा अभ्यास चांगला होणें शक्य आहे, मात्र या वर्गांतून मुलांची संख्या जास्त असतां कामा नये. उत्तम शिक्षकाच्या हाताखालीं जोडवर्ग दिले असतां मुलांचें नुकसान तर होत नाहींच, पण उलट पक्षीं, मुलांना स्वतांवर अवलंबून राहाण्याची, स्वप्रयत्नानें ज्ञान मिळविण्याची व सांगितलेलें काम नेटानें व हुशारीनें करण्याची संवय लागते, असा आमचा अनुभव आहे. या कॉलेजांत चालविलेले जोडवर्ग दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थिनींनीं शिकविले होते. मुलांना भरपूर व्यवसाय मिळावा, त्यांनीं कामांत गढून जावें व स्वप्रयत्नानें ज्ञान मिळवावें, आणि अशा रीतीनें शिक्षकाला दुसरा वर्ग शिकविण्यास वेळ मिळावा अशी जर आपली इच्छा असली तर जोडवर्ग असलेल्या शाळांत पुस्तकें, नकाशे, चित्रें उत्तम अक्षरांचे तक्ते वगैरे साहित्य अवश्य असलें पाहिजे. अशा साहित्याशिवाय जोडवर्ग शिकविणें अशक्य आहे. शिक्षकाला ट्रेनिंग न देतां व त्याला पुस्तकें, चित्रें, नकाशे वगैरे साहित्य न पुरवितां त्यानें जोडवर्ग समाधानकारक रीतीनें शिकवावे अशी अपेक्षा करणें कधींही योग्य होणार नाहीं. शिक्षकाच्या अंगीं अशी कांहीं जादू नाहीं कीं, तिच्या योगानें आपल्या धंद्याचें ज्ञान न मिळवितांही व कोणत्याही तऱ्हेचें साहित्य नसतांनाही त्याला एकाच वेळीं दोन किंवा तीन वर्ग चांगल्या रीतीनें शिकवितां येतील व आपलें काम यशस्वी करितां येईल.

जोडवर्ग घेतांना एका वर्गाला काम देऊन दुसऱ्या वर्गाला शिकवावें लागतें, व थोड्या वेळानें या वर्गाला व्यवसाय देऊन पुन्हा पहिल्या वर्गाकडे वळावें लागतें. अशा रीतीनें दोन्ही वर्गांचा वेळ फुकट न जावा अशी योजना शिक्षकाला करावी लागते. जोडवर्ग जर घ्यावयाचे असतील तर वर्गांचा अभ्यास घेण्यापूर्वी तो आपण कसा घेणार याची योजना अगोदर शिक्षकानें करून ठेविली पाहिजे. शाळा सुरू होण्याचे पूर्वीं जाऊन पहिल्या तासाला मुलांना जें काम द्यावयाचें असेल, तें शिक्षकानें फळ्यावर लिहिलें पाहिजे. मधून मधून वरच्या वर्गांतील हुषार मुलांचीही थोडी फार मदत घेण्याचें चातुर्य त्याचे

आंगीं पाहिजे. या सर्व गोष्टींची कल्पना येण्याकरितां तीन वर्ग एकत्र जोडलेल्या वर्गाचा, एका दिवसाच्या दोन पाठांचा अभ्यासक्रम एकाच विद्यार्थिनीनें कसा घेतला होता याची हकिगत पुढें देत आहों, ती आमच्या वाचकास मनोरंजक वाटेल असें आम्हांस वाटतें. शिकविणारी विद्यार्थिनी दुसऱ्या वर्षांतील होती, व तिच्या हाताखालीं शिशुवर्ग, पहिली व चौथी असे तीन वर्ग होते. पहिल्या पाठाचे विषय पुढें दिल्याप्रमाणें होते.

शिशुवर्ग—वाचन
इयत्ता पहिली—गणित
इयत्ता चौथी—लेखन

शिक्षकानें पहिल्या इयत्तेकरितां सोपे तोंडचे हिशेब फळ्यावर लिहून ठेविले होते, व चौथ्या इयत्तेकरितां मोडीलेखनाच्या दोन ओळीही फळ्यावर लिहून ठेविल्या होत्या. प्रारंभीं शिक्षकानें चौथ्या इयत्तेंतील मुलींना आपल्या वह्या काढून फळ्यावरील दोन ओळी त्यांत लिहिण्यास सांगितलें, व पहिल्या इयत्तें-तील मुलींना फळ्यावर लिहिलेले हिशेब करून त्यांचें उत्तर आपल्या पाटीवर मांडण्यास सांगितलें. मुलींनीं आपल्या पाटीवर कंसांत १, २, ३, ४, ५ असे आंकडे लिहिले. नंतर शिक्षकानें ( " एकेक हिशेब करा व त्याचें उत्तर मांडा, मग दुसरा हिशेब करा " ) असें बजावून सांगितलें. नंतर शिक्षकानें शिशुवर्गाला एक लहानशी गोष्ट सांगितली, व ती गोष्ट मुलींकडून सांगून घेतली. त्या गोष्टींतील कठीण शब्द लिहिलेले पत्ते एका मागून एक तिनें मुलींकडून वाचून घेतले. नंतर हीच गोष्ट एका मोठ्या कागदावर सुंदर अक्षरांनीं लिहिलेली आहे, ती तुम्हीं मनांत वाचून ठेवा असें मुलींस सांगितलें. या ट्रेनिंग कॉलेजनें मुलांना योग्य असे लहान व मनोरंजक धडे मोठ्या कागदावर छापून घेतलेले आहेत. यांतील ओळी सुट्या आहेत, व शब्दांमध्येंही भरपूर अंतर ठेविलें आहे. अक्षर वाटोळें व दोन इंच लांबीचें आहे. हे तक्ते वाचण्यास मुलांना भारीच आनंद वाटतो. शिक्षकानें फळ्यावर लावलेला तक्ता यांपैकींच होता. शिशुवर्गांतील मुली फळ्यावरील लाव-लेल्या तक्त्यावरील गोष्ट वाचीत असतां शिक्षकानें पहिल्या इयत्तेंतील मुलींचे तोंडी हिशेब तपासले, व त्यांना गणिताचा नवीन भाग समजावून दिला. नंतर फळा उलटून या नवीन भागावर असलेलीं पांच उदाहरणें ( शाळा सुरू होण्याच्या पूर्वींच लिहून ठेविलीं होतीं. ) मुलींस करण्यास सांगितलें. मग शिशुवर्गांत

येऊन तिनें मुलींचें वाचन घेतलें. नंतर स्वतः चांगलें वाचून दाखवून पुन्हा ती गोष्ट दोनदां वाचून ठेवण्यास मुलींना सांगितलें, पहिल्या इयत्तेंतील मुलींचीं उदाहरणें पाहिलीं, व ज्यांना एकादें उदाहरण येत नव्हतें, त्यांना तें समजावून दिलें. हें झाल्यावर पुन्हा शिशुवर्गातील मुलींचें वाचन घेतलें. या सर्व गोष्टीला ३५।४० मिनिटें लागलीं. यानंतर शिशुवर्गाला पांच मिनिटांची तिनें सुटी दिली व चौथ्या इयत्तेंतील मुलींचें लेखन पाहून त्यांत सुधारणा केली. शिशुवर्गातील मुली परत आल्यावर तिनें पहिल्या इयत्तेंतील मुलांना पांच मिनिटांची सुटी दिली, व दुसऱ्या पाठास सुरुवात झाली. दुसऱ्या पाठाचे विषय खालीं लिहिल्याप्रमाणें होते.

इयत्ता ४ थी—भूगोल
इयत्ता १ ली—वाचन
शिशुवर्ग — वाक्यरचना व लेखन

शिशुवर्गात जी गोष्ट झाली होती, ती सुमारें १२ ओळींची होती, त्यांपैकीं प्रत्येक ओळीचे शब्द कापून ते एका पाकिटांत ठेविलेले होते. अशीं १२ पाकिटें आधींच तयार केलेलीं होतीं. हीं पाकिटें शिक्षकानें मुलींना दिलीं, व यांतील शब्द घेऊन फळ्यावर लावलेल्या तक्त्यांतील ओळीप्रमाणें ओळ बनवा असें तिनें मुलींस सांगितलें. मुलींना या खेळाची संवय होती. आपल्या पाकिटांतील तुकडे काढावे, ते जुळवून ओळ तयार करावी, फळ्यावरील ओळीप्रमाणें ती बरोबर आहे कीं नाहीं हें पाहावें, नंतर हे तुकडे पाकिटांत घालून खालच्या मुलीस तें पाकीट द्यावें व आपण वरच्या मुलीचें पाकीट घ्यावें अशा रीतिनें त्यांचा व्यवसाय सुरू झाला. चौथ्या इयत्तेंत आदल्या दिवशीं झालेल्या भागावरील एक प्रश्न शिक्षकानें मुलींना लिहिण्यास दिला. तिनें नंतर पहिल्या इयत्तेंतील मुलींचें वाचन घेण्यास प्रारंभ केला. प्रथमतः तिनें शिकवावयाचा धडा मुलींना सावकाश वाचून दाखविला, व त्यांना तो कळला आहे कीं नाहीं तें पाहाण्याकरितां कांहीं प्रश्न विचारले. यावर जोडाक्षरांचे शब्द त्यांना समजावून दिले, व तो सर्व धडा मनांत वाचून ठेवण्यास तिनें त्यांना सांगितलें. हें झाल्यावर चौथ्या इयत्तेनें लिहिलेला प्रश्न पाहून तिनें त्यांना नवीन भाग समजावून दिला, मग त्यांना आपले आराखडे नकाशांत पाहून भरण्यास सांगितलें. चौथ्या इयत्तेंतील मुली आराखडे भरीत असतांना पहिल्या इयत्तेंतील मुलींना दोन पॅरिग्राफ समजावून सांगितले, त्यांना ते वाचून दाखविले व ते मनांत वाचून ठेवण्यास त्यांना

सांगितले. नंतर चौथ्या इयत्तेतील मुलींचे आराखडे पाहून त्यांना पुढील भाग तिनें समजावून दिला, व तोही आराखड्यांत भरून ठेवण्यास सांगितलें. मुली आराखडे भरीत असतांना पहिल्या इयत्तेचें तिनें वाचन घेतलें. शिशुवर्गाला पाकिटें बंद करून ठेवण्यास तिनें सांगितलें, व त्या वर्गातील मुली आपल्या पाटीवर फळ्यावरील तक्त्यांतील ओळी पाहून शुद्धलेखन लिहूं लागल्या. याप्रमाणें दुसरा पाठ संपेतोंपर्यंत या तीनही वर्गांचा अभ्यासक्रम चालला होता.

वर दिलेल्या हकीगतीवरून जोडवर्ग चालविणें हें किती श्रमाचें व कुशलतेचें आहे याची कल्पना येईल. पण जोडवर्गाला उत्तम रीतीनें शिक्षण देणें ही गोष्ट कांहीं अशक्य नाहीं. ट्रेनिंग कॉलेजमध्यें पूर्ण शिक्षण घेतलेल्या उत्साही शिक्षकाला जोडवर्ग असलेल्या शाळा उत्तम चालवितां येतील. या शाळांतून पुस्तकें, नकाशे, छापील तक्ते वगैरे साहित्य मात्र भरपूर असलें पाहिजे. असलें साहित्य पुरविणें हें कांहीं विशेष खर्चाचें काम आहे असें नाहीं. आम्हीं नमुन्यादाखल वाचनाचे तक्ते व लहान लहान मनोरंजक पुस्तकें छापविलीं आहेत. तीं नमुन्यादाखल आम्ही लोकलबोर्डाच्या चालकांना आनंदानें धाडूं. ट्रेंड शिक्षकांच्या ताब्यांत खेडेगांवांतील शाळा दिल्या असतां व त्यांना लागणारें साहित्य पुरविलें असतां प्राथमिक शिक्षणाचें कार्य बऱ्याच अंशीं यशस्वी होईल अशी आमची खातरी आहे.

---

# आधुनिक भूगोल, त्याची उत्पत्ति व व्याप्ति.

( मिस् गियरी यांच्या " Modern geography; its sources and Scope ' या लेखाच्या आधारें खालील लेख लिहिला आहे )

प्राथमिक शाळांतून शिकविल्या जाणाऱ्या निरनिराळ्या विषयांपैकीं भूगोल या विषयाला अलीकडे विशेष महत्त्व दिलें गेलें आहे. तेव्हां ह्या विषयाला इतकें विशेष महत्त्व कां दिलें जातें, या विषयाच्या ज्ञानाची सुरुवात कोठें होते, तसेंच या विषयाच्या अनुषंगानें आणखी कोणत्या विषयांकडे नजर द्यावी लागते तें पाहूं.

भूगोल या शब्दाचा अर्थ मानवी प्राणी व त्याचे सभोंवतालची परिस्थिति यांचा संबंध होय. परिस्थिति या शब्दानें एकादा देश, त्याचें भूपृष्ठावरील स्थान, आजूबाजूला असलेल्या इतर देशांशीं या देशाचा संबंध, तसेंच ज्या प्राकृतिक

कारणांमुळें देश सुधारणेच्या मार्गावर जातो अशीं विशेष कारणें या गोष्टी समजावयाच्या. मिल नांवाच्या भूगोल शास्त्रज्ञाचें असें म्हणणें आहे कीं, मनुष्य व त्याची परिस्थिति, तसेंच भूपृष्ठावर आढळून येणाऱ्या चमत्कारांची विभागणी यासंबंधीं अगदीं बिनचूक व सुसंघटित ज्ञान म्हणजेच भूगोल होय. मानवी आयुष्यांतील निरनिराळ्या गोष्टींचा निकट संबंध व ते राहात असलेल्या देशांतील भौगोलिक कारणें या गोष्टींशीं भूगोलाचा संबंध येतो. त्याच्या ज्ञानानें अमेरिकन व्यापारी नवकोट नारायण कां झाले, स्वित्सर्लंडच्या शेतकऱ्यांनीं आपली स्थिति कशी सुधारली, मेसापोटेमियांत लोकांनीं लूट कां केली, दक्षिणेकडील लोक नरमांसभक्षक कां असतात, मुंबईतील व्यापारी गिरण्या कां सुरू करतात, व दक्षिण हिंदुस्तानचे लोक शेतकीमध्यें कुशल कशानें झाले वगैरे गोष्टी समजतात. तसेंच मासे मारणारा इंग्लिश कोळी व रशियन शेतकरी, मध्य आशियांतील मेंढपाळ, अमेरिकेंतील कापूस पिकविणारा शेतकरी व लँकाशायरमधील कापसाच्या गिरणीमधील मजूर, एस्कीमो व आस्ट्रेलियांतील मूळचे रहिवासी यांच्या राहाणीमध्यें आढळून येणारा फरक, याच विषयाच्या ज्ञानानें कळतो. या सर्व गोष्टींमुळें मानवी स्थितीवर मोठा परिणाम होऊन त्यांत निरनिराळे फेरबदल झालेले आढळतात, म्हणून हे सर्व विषय भूगोलांत आणावे लागतात.

भूगोल या विषयाचा विस्तार व महत्त्व अलीकडे फार वाढलें आहे. पुष्कळ वाचकांना शाळेंत ऐकलेल्या व भूगोलाच्या धड्यांत शिकविलेल्या भूशिरें व आखातें यांच्या नांवांच्या याद्या अद्यापि आठवत असतील. हिंदुस्तानासंबंधीं धड्याची माहिती देतांना हिमालय, सह्याद्रि, पूर्वघाट वगैरे पर्वतांच्या याद्या, तसेंच नद्या, पिकें, शहरें, लोकवस्तीचे आंकडे वगैरे गोष्टी यादीरूपानें पाहावयास मिळत. परंतु भिन्न प्रकारचे पर्वत भिन्न काळीं उत्पन्न होत असून त्यांवर हवा, उष्णता व पाऊस यांचा परिणाम होऊन त्यांचा आकारसुद्धां बदलतो, या गोष्टी समजावून सांगण्याचा प्रयत्नसुद्धां होत नसे. तसेंच दक्षिण हिंदुस्तानांत कोणत्या खाणी आहेत, दक्षिणच्या पठारावर शेतकी हा धंदा कां चालतो, तसेंच हिंदुस्तानची भूपृष्ठरचना कोणत्या कारणांमुळें अशी झाली याचीही माहिती कधीं मिळत नसे. अलीकडे २५।३० वर्षें या विषयाची व्याप्ति लक्षांत घेऊन भूपृष्ठाची खुलासेवार माहिती, परिस्थितीवर मानवी सुधारणेचें अवलंबन, प्राकृतिक कारणांमुळें घडणारे चमत्कार वगैरे विषयांचा भूगोल विष-

यांत समावेश करण्याचा प्रयत्न केला जातो. अगदीं अलीकडे भूगोल विषयाची झपाट्यानें प्रगति होण्याचीं कारणें म्हणजे रॉयल जॉग्रफिकल सोसायटीनें सुरू केलेलें भौगोलिक संशोधन, नवीन प्रदेशांचा शोध, निरनिराळे शास्त्रीय शोध आणि प्रयोग व त्यांच्या यशस्वी कृतींचें प्रकाशन हीं होत. तसेंच भूगोलशास्त्रज्ञ युरोपियन लोकांच्या परिश्रमांचाही उपयोग बराच झाला आहे. या लोकांनीं भूगोल विषयाचीं अंगें व उपांगें लक्षांत घेऊन त्यांसंबंधीं महत्त्वाची व आवश्यक माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे.

कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं, निरनिराळ्या जातींच्या लोकांची प्रगति व सुधारणा हीं त्यांच्या भिन्न परिस्थितीमुळें उत्पन्न झालीं. ही भिन्न परिस्थिति म्हणजे भूपृष्ठरचना, पाणी व जमीन यांची वांटणी व त्यामुळें भूपृष्ठावर उत्पन्न होणारे पाऊस, उष्णता, वाळवंटें, थंडी वगैरे चमत्कार, पृथ्वीचें परिभ्रमण व त्याचे परिणाम, पर्वत, डोंगर, दऱ्या, खोरीं, पठारें, ज्वालामुखी, बेटें वगैरे होत. ह्या गोष्टींचा परिणाम मानवी सुधारणेवर किती झाला आहे, हें सविस्तर सांगण्याची आवश्यकता नाहीं.

विशिष्ट प्रकारच्या भूप्रदेशाचा परिणाम मानवी सुधारणेवर कि[illegible] . कसा घडतो, हें पाहावयाचें झाल्यास त्याचें उत्तम चित्र प्राचीन काळीं आशियांताल लोक युरोपखंडांत गेले, त्याबद्दलच्या इतिहासांत सांपडेल. नकाशावर सहज नजर फेकली तर ही गोष्ट लक्षांत येईल कीं, आशिया, उत्तर आफ्रिका व यूरोप यांतलि पूर्व पश्चिम पर्वतांच्या ओळींनीं सुधारणेच्या मार्गांत मोठी अडचण उत्पन्न केली आहे. त्याचप्रमाणें हिमालय, कुएनलुन, थ्यानशान, अल्ताई वगैरे पर्वत, तसेंच मंगोलिया, इराण, एशिया मायनर वगैरे देशांतील डोंगर यांमुळें सुधारणेला अडथळाच झालेला आहे. याच डोंगरांच्या बाजूबाजूनें लोकांचे थवेच्याथवे दाट वस्तीच्या व नापीक मध्य आशियांतून कमी वस्तीच्या पण सुपीक अशा युरोपांतील मैदानामध्यें गेलेले आढळतात. हे लोक दोन मार्गांनीं गेले असावे. १ ला मार्ग म्हणजे अल्ताई व थ्यानशान या पर्वतांमधून मध्य आशियांतील गवताच्या प्रदेशांतून रशियामध्यें, व २ रा मार्ग मेसापोटेमिया व आशियामायनर मधून भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यानें किंवा ओसाड वाळवंटाचा प्रदेश, सिनाय व ईजिप्त यांमधून होय. आशिया खंडांतील पर्वतांची स्थिति हल्लींहून जर भिन्न प्रकारची असती, तर आशियांतील लोकांना यूरोपांत जातां आलें असतें कीं

नाहीं व त्यामुळें युरोपांतील लोकांच्या सुधारणेवर काय परिणाम झाला असता हें कोण सांगूं शकेल ?

भूप्रदेशाच्या विशिष्ट स्थितीमुळें झालेला हा परिणाम फक्त आशिया खंडांतच आढळतो असें नाहीं. आफ्रिका खंडांतही तोच प्रकार आहे. आफ्रिकेची भूपृष्ठ रचना पाहिली तर किनाऱ्यानजीक दक्षिणोत्तर लांब पर्वतांच्या ओळी आहेत. त्यांचा छेद करून जोरदार पण अरुंद नद्या वाहतात. त्यांत धबधबेही पुष्कळ आहेत. त्याचा परिणाम असा झाला कीं आफ्रिका खंडासारखें शोध लावण्यास कठीण असें दुसरें खंडच आढळलें नाहीं. अद्याप सुद्धां मध्य आफ्रिकेचा शोध पूर्णपणें तडीस गेला नाहीं, व त्यामुळें आफ्रिका खंड अत्यंत् मागासलेलें खंड असें समजलें जातें. अशा रीतीनें भूप्रदेशाची स्थिति व मानवी प्रगति यांचा संबंध किती जवळचा आहे, हें आढळून येईल.

तसेंच भूप्रदेशाचीं स्थित्यंतरें ज्या कारणांनीं घडून येतात, त्यांचाही विचार करणें जरूर आहे. त्यांतील महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे हवामान होय. या हवामानामुळें भूप्रदेशांतील मूळ स्वरूप अजिबात बदलतें, व मानवी प्रगतीवर त्यामुळें निराळाच परिणाम दिसूं लागतो. उष्णता, थंडी, पाऊस, नद्या, बर्फ व वारे यांच्या परिणामामुळें भूप्रदेशावरील पृथ्वीचें कठीण कवच फुटून त्यापासून माती उत्पन्न झाली, ती आजूबाजूच्या प्रदेशांत पसरली व जमीन सुपीक झाली. सुपीक जमीन व अनुकूल हवामान यामुळें वनस्पति व प्राणी यांची वाढ झपाट्यानें होऊं लागली, तेव्हां वनस्पतींच्या वाढीबरोबर मनुष्य जात सुधारणेच्या मार्गांत बरीच पुढें गेली. पण ही सुधारणा उच्च पायरीवर पोहोंचण्यास आणखी कांहीं गोष्टींची आवश्यकता आहे. ( १ ) आपली स्थिति कशी सुधारेल यासंबंधीं विचार करण्यास मनुष्य प्राण्यांना **स्वास्थ्य** मिळालें पाहिजे. ग्रीनलंड बेटांत हवामान भारी थंड असल्यामुळें व कोणतीहि पिकें होत नसल्यामुळें सारा दिवस शिकार करून उदरनिर्वाह करावा लागतो; व एक मिनिटभर सुद्धां स्वस्थपणा मिळत नाहीं. अशा ठिकाणीं उच्च प्रकारच्या मानवी सुधारणेची अपेक्षा करणें अगदीं चुकीचें होईल.

( २ ) **उद्योग करण्याची आवश्यकता** मानवी प्राण्यांस भासली पाहिजे. पश्चिम आफ्रिका, अंदमान बेटें, मलाया द्वीपसमूह वगैरे प्रदेशांत उदरनिर्वाहाचें

साधन मिळविण्यास फार श्रम करावे लागत नाहींत. या ठिकाणीं फळें, अन्न, प्राणी वगैरे विपुल असल्यामुळें थोड्या श्रमानें उदरनिर्वाह करितां येतो. अर्थात् लोकांना आपल्या अकलेचा व शोधक बुद्धीचा उपयोग करण्याचें प्रयोजन पडत नाहीं. त्यामुळें असल्या ठिकाणीं उच्च प्रकारची सुधारणा होईल अशी आशा करणें व्यर्थ होय.

( ३ ) **दळणवळणः**—भूप्रदेशाच्या विशिष्ट स्थितीमुळें ज्या ठिकाणीं दळणवळण सुरू नसतें असे प्रदेश सुधारणेच्या बाबतींत मागासलेले असतात. याचें उदाहरण कांगो व अमेझीन नदीच्या कांठचा प्रदेश व तिबेट वगैरे देश होत. हे देश दळणवळणाच्या अभावामुळें सुधारणेंत मागें आहेत. तरी पण कांहीं देशांनीं दळणवळणाच्या अभावीं सुद्धां आपली सुधारणा चालू ठेविली आहे. असे देश म्हणजे पेरू व मेक्सिको हे होत. पण ते अपवाद होत, असें म्हणणें जरूर आहे.

( अपूर्ण )

---

## शेरास सवाशेर.

**एकदां एक मुलगा एका विहिरीच्या कांठावर रडत बसला होता. त्या वाटेनें एक चोर चालला होता. त्यानें त्या मुलाला रडतांना पाहिलें व त्यास विचारलें, 'मुला तूं कां रडतोस?' तो मुलगा लहान होता, पण फार वस्ताद होता. याला कांहींतरी सबब सांगितली पाहिजे असा विचार करून तो चोराला म्हणाला 'अहो महाराज' मी या विहिरीजवळ विटीदांडू खेळत होतों. खेळतां खेळतां माझी विटी या विहिरींत पडली. ती काढण्यासाठीं मी आंत डोकावून पाहूं लागलों, तों माझ्या गळ्यांतील मोत्यांची कंठी विहिरींत पडली. मुलाच्या अंगावर उंची पोषाख होता व अंगावर थोडे दागिनेही होते, त्यामुळें त्या चोराला त्याचें**

म्हणणें खरें वाटलें. आपण विहिरींत उतरून प्रथम ती कंठी काढावी व मग या मुलाच्या अंगावरचे दागिनेही पळवावे असा त्यानें आपल्या मनाशीं बेत ठरविला. पण हा बेत मुलाला समजूं नये म्हणून तो त्यास म्हणाला, 'बाळ, तू माझे कपडे सांभाळशील तर मी तुला तुझी कंठी काढून देतों. मुलानेंही आपणास त्याचा संशय आल्याचें बिलकूल दाखविलें नाहीं. तो त्यास म्हणाला, 'असें कराल तर मजवर आपले फार फार उपकार होतील व घरीं गेल्यावर वडील माणसें मला रागें भरणार नाहींत.' चोरानें आपले कपडे काढून विहिरीच्या कांठावर ठेविले व तो आंत उतरून विहीर किती खोल आहे हें पाहूं लागला. इकडे चोर आंत गुंतला आहे अशी संधी साधून त्या मुलानें चोराचे कपडे काखेंत मारले व घराकडे पळ काढला. चोर पुष्कळ बुड्या मारून थकला, पण त्याला ती कंठी सांपडली नाहीं. खरी पडलेली नव्हतीच तर ती सांपडणार कोठून! अखेर दमून जाऊन वर येऊन तो पाहातो तों तेथें मुलगा नाहीं व आपले कपडेही नाहींत! तेव्हां त्यानें आजूबाजूस त्याचा शोध केला, पण व्यर्थ! थोड्याच वेळांत त्याची अशी खात्री झाली कीं, मुलानें आपणास पक्कें फसविलें! तो मनांत फार खजील झाला व आपल्याशीं म्हणाला, अखेर शेरास सवाशेर भेटला!

---

# मुलांकरितां कविता.

———:०:———

## कोण त्यांना सकलांस ओळखीतो?

### दिंडी.

तारका या बहु रम्य भासताती
नील आकाशीं मार्ग चालताती
शांत तेजें नयनांस तोष देती
विविध त्यांचे हे रंग मोहवीती
किती तारा? मोजील कोण त्यांना
कोण दावीतो मार्ग तो तयांना
कोण त्यांना सकलांसि ओळखीतो
कोण त्यांची काळजी नित्य घेतो
वृक्षलतिकांवर सुखें खेळताती
कशीं सुमनें चित्तास मोहवीती
रम्य सुंदर आकृती वास गोड
मनालाही लाविती कसें वेड
किती सुमनें डोलती वनीं रानीं
नदीतीरीं शेतांत दरींतूनी
कोण त्यांना सकलांस ओळखीतो
कोण त्यांची काळजी नित्य घेतो
खेळ स्वच्छंदें विहग खेळताती
गोड गाणीं तरुशिरावरीं गाती
उडति आकाशीं उंच उंच जाती
फिरुनि भूमीवर सुखें उतरताती
वनें रानें उपवनें नदीतीरें
भुवन विहगांनीं सर्व भरुनि गेलें

कोण साऱ्या विहगांस ओळखीतो
कोण त्यांची काळजी सदा घेतो

*　　　*　　　*

सुमें तारे ते सान थोर पक्षी
देव ओळखितो नित्य त्यांस रक्षी
कृपासागर देवास नमूनीयां
चला आतां आदरें आळवूं या

---

# दिवाण साहेबांची भेट.

गेल्या महिन्यांत ता. १२ रोजीं शिक्षण-मंत्री दिवाणबहादूर नामदार हरीलाल देसाई यांनीं बक्षिस समारंभानिमित्त या ट्रेनिंग कॉलेजास आपल्या पत्नीसह भेट दिली व बक्षिसें वाटल्यावर मुलींना बोधपर असे चार शब्द सांगितले. ते म्हणाले लहान मुलांचें शिक्षण पुरुष शिक्षकांपेक्षां स्त्रीशिक्षकांच्याच हातांत असावयास पाहिजे. त्यांच्या ठिकाणीं जात्याच मायाळूपणा जास्त असतो. अमेरिकेंत प्राथमिक शिक्षण सर्वस्वी स्त्रियांच्याच हातांत आहे. पुरुष शिक्षकांना लहान मुलांशीं तितक्या प्रेमळपणानें वागतां येणें शक्य नाहीं. प्रेमळपणानें वागविल्याशिवाय लहानपणीं मुलांच्या मनांत शिक्षणाची आवड उत्पन्न होत नाहीं आपल्याकडे दिवसेंदिवस शिक्षणाचा जास्त जास्त प्रसार होत चालला आहे. तेव्हां आपल्यावरील जबाबदारी ओळखून स्त्रीशिक्षकांनीं कसून काम करण्यास तयार झालें पाहिजे. स्त्रियांना जास्त प्रमाणांत शिक्षण मिळण्यास जितकी मदत देतां येईल तितकी देण्यास मी तयार आहें व या बाबतींत मी स्त्रियांचा पक्षपाती आहे असें म्हटलें तरी चालेल. मी आपल्या कारकीर्दींत स्त्रीशिक्षणाचें पाऊल पुढें पडावें याबद्दल शक्य तितकी खटपट करीन. याप्रमाणें लहान पण उत्तेजनपर भाषण झाल्यावर दिवाणसाहेबांचे आभार मानण्यांत आले व त्यांस पुष्पहार घालण्यांत येऊन समारंभ आटोपला.

---

# प्रकाश व डोळ्यांची काळजी.

सुधारलेल्या देशांत शिक्षण या विषयाकडे लोकांचें लक्ष असून गेल्या महायुद्धानें हा विषय फारच जोरानें लोकांच्या दृष्टीसमोर आला आहे. मनुष्याला या जगांत कार्यक्षम करणें हें शिक्षणाचें ध्येय असून मन व इंद्रियें हीं दोन्हींही अंगावर येणारा अवजड कार्यभार वाहण्यास खंबीर बनलीं पाहिजेत. एवढ्याकरितां मनाच्या शिक्षणाबरोबरच शारीरिक वाढ व सुस्थिति या गोष्टींकडे जास्त लक्ष लागत चाललें आहे. किंबहुना शरीरवर्धन व आरोग्य या दोन विषयांना हल्लीं फारच प्राधान्य मिळत चाललें आहे. चीनचे प्रसिद्ध डॉक्टर वू हे यूरोप खंडांत फिरत आहेत व आपला अनुभव व्याख्यानद्वारां ठिकठिकाणीं जाहीर करीत आहेत. त्यांनीं एका व्याख्यानांत असें सांगितलें कीं, सर्व यूरोप खंडांत महायुद्धानंतर आरोग्यरक्षणाकडे जुगोस्लाव्हिया या राष्ट्राप्रमाणें कोणींही लक्ष दिलेलें दिसत नाहीं. आज आपण या शरीरसंवर्धन व आरोग्य या विषयांपैकीं डोळ्याचें आरोग्य या भागाचा थोडासा विचार करूं.

आपल्या देशांत पूर्वींच्या पिढींतील लोकांचे डोळे चांगले सशक्त असत, व चाळीस वर्षांपूर्वीं त्यांना बहुधा चष्मा लावावा लागत नसे, असें चष्म्यास 'चाळिशी' अथवा 'चाळशी' हा शब्द आहे यावरून आपल्या लक्षांत येईल. परंतु अलीकडे प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या कांहीं मुलांनाही मोठ्या शहरांतून चष्म्यावांचून भागत नाहीं अशी स्थिति दिसूं लागली आहे. या मुलांचे डोळे अशा लहान वयांत अधू असण्याचें कारण त्यांचें दांडगें वाचन हें खास असूं शकणार नाहीं. मग याच्या मुळाशीं त्यांचा शारीरिक अशक्तपणा हेंच प्रमुख कारण असणार हें कोणासही उघड दिसेल, व तसें असण्याचीं जीं कांहीं अनेक कारणें असूं शकतील त्यांत आरोग्याच्या व खाण्यापिण्याच्या बाबतींत अव्यवस्था हें एक कारण आपणांस सांपडूं शकेल.

अलीकडे युरोप, अमेरिका वगैरे देशांत लहान मुलांची शारीरिक तपासणी करतात, व त्यांच्या ठिकाणचे दोष पालकांच्या नजरेस आणून वेळींच त्यांवर इलाज करावयास लावतात, म्हणजे ते विकार वाढत जाऊन मोठेपणीं त्यांस दुःसाध्य रोगांचें स्वरूप येत नाहीं.

अशा रोगांत डोळ्यांच्या रोगांचेंही प्रमाण कमी नाहीं. डोळे खराब असणाऱ्या निरनिराळ्या मुलांच्या संसर्गानें इतर मुलांचें डोळे बिघडतात, व डोळ्यांत खुपऱ्या होतात. या वाढून डोळ्यावर एक प्रकारचा कोशेरा उत्पन्न होऊन कमी दिसूं लागतें. तेव्हां वैद्यकीय परीक्षेनें हा भाग बराचसा कमी करितां येईल.

दुसरी गोष्ट, मुलें डोळ्यांची जितकी काळजी घ्यावयास पाहिजे तितकी घेत नाहींत, व त्याबाबत काय काळजी घ्यावी हें स्वतां शिक्षकांसही तितपतच माहिती असल्यानें त्यांजकडून या बाबतींत न कळत हेळसांड होते. तेव्हां त्यांनीं डोळ्यांच्या आरोग्याबद्दल कांहीं सामान्य सूचना लक्षांत ठेवणें अगत्याचें आहे.

मुलांची सुस्थिति राहावी म्हणून दररोज त्यांनीं कांहींना कांहीं व्यायाम अवश्य केला पाहिजे. ही गोष्ट तर सर्वमान्य आहेच. पण खुद्द दृष्टीसंबंधानें ज्या इतर गोष्टी आहेत, त्याही लक्षांत ठेवण्यापासून फायदा होईल. या बाबतींत शिक्षणखात्याच्या ताब्यांतील गोष्टींत त्यांजकडून प्रयत्न होत आहेत. मुलें जेथें शिकतात तेथें जागा हवाशीर असावी, जमीन ओली नसावी, तेथें भरपूर व मुलांच्या डाव्या बाजूकडून प्रकाश यावा, याबद्दल शक्य तितके प्रयत्न करण्यांत येत आहेत. तथापि अशा शाळा किती थोड्या सांपडतील, हें पाहिलें म्हणजे या कामीं खर्चाची पहिली मोठी नड आहे, हें लक्षांत येईल. तथापि शालागृहें उत्तम करण्याकडे प्रथम लक्ष दिलें पाहिजे, ही गोष्ट विसरतां यावयाची नाहीं.

प्रकाश कसा यावा, हें पाहिल्यानंतर येणारा प्रकाश हा मुलांचे डोळे दिपवणारा अगर अंधुक असा दोन्ही प्रकारचाही नसावा. तो उत्तरेकडून येत असला म्हणजे सूर्यकिरण प्रत्यक्ष त्या बाजूनें केव्हांही येणार नाहींत. शिवाय आंत येणारा प्रकाश भिंतीवर पडून परावर्तनानेंही डोळ्यांवर अस्पष्ट परिणाम होऊं नये म्हणून आंतील भिंतींनाही पण सौम्य असा रंग द्यावा. रा. कारखानीस यांच्या पुस्तकांत भाग १६ मध्यें वर्गांत प्रकाश कसा यावा, यासंबंधी उतारा व पुढील प्यारा याचा उल्लेख आला आहे, तो वाचावा. या प्रकारें भणभणीत प्रकाशामुळें होणारा त्रास दूर होऊन वर्गांत बसणाऱ्या मुलांचें मन प्रसन्न राहून त्यामुळें त्यांचें अभ्यासाकडे लक्ष लागेल. वर्गांत मुलांना वाचावयास सांगतांना तीं पुस्तकें कशीं धरतात व लिहीत असतांना कशीं लिहितात, याकडे वर्गांत शिक्षकानें जरूर लक्ष दिलें पाहिजे. या गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यानें मुलांचें डोळे बिघडण्याचा फार संभव असतो. पुस्तकें

हातात धरतांना मुलांनीं तीं आपल्या डोळ्यापासून १ फूट तरी दूर धरावीं. निदान एक मोठी वीत तरी दूर धरलीं पाहिजेत, याबद्दल खबरदारी घ्यावी, व अशा सूचना देऊन त्या अंमलांत आणाव्या. लिहितांना पुष्कळदां मुलें आपल्या पाट्या-वर अगदीं वांकून लिहीत असतात. नकाशे भरतांना, गणित करतांना, ड्रॉइंग काढतांना, जमिनीवर पाटी अगर कागद ठेवून आपलें डोकें अगदीं जमिनीजवळ घेतात. याचे योगानें डोळ्यांना ताण पडून डोळ्यांची शक्ति क्षीण होते, व डोळे बिघडण्यास एक सबळ कारण मिळतें.

डोळे बिघडण्यासंबंधाचें आणखी कारण म्हटलें म्हणजे बारीक टाईप असलेलीं पुस्तकें मुलांच्या हातीं देण्यांत येतात, हें होय. होत. होईल तों लहान मुलांच्या हातीं देण्याचीं पुस्तकें मोठ्या टाइपांत छापलेलीं असावीं, याबद्दल सरकारी रीत्या सक्ती करण्यांत यावी म्हणजे डोळे बिघडण्याचें एक मोठें कारण नाहींसें होईल. अलीकडे मुलांचीं बरींच पुस्तकें मोठ्या टाइपांत छापलीं जात आहेत, ही स्पृहणीय गोष्ट आहे. पूर्वींचीं कांहीं पुस्तकें इतकी वाईट छापलेलीं असत कीं, डोळ्याला ताण पडल्याशिवाय राहाणेंच शक्य नसे. तसेंच या पुस्तकांना वाईट कागद वापरल्यास शाई फुटून अक्षरें स्पष्ट दिसत नाहींत, व वाचतांना मुलांना फार त्रास होतो. सबब कागद व टाईप याबद्दल विशेष काळजी घ्यावयास लावणें अत्यंत जरूर आहे.

याशिवाय लहान मुलांना घरीं करावयास दिलेला अभ्यास एक अगर दोन तासांहून जास्त वेळ लागेल असा नसावा. होतां होईल तों त्यांचा बराच अभ्यास शाळेंतील वेळांत घेतला जावा. घरचा वेळ त्यांचा स्वच्छंदानें फिरण्यास मोकळा ठेवावा. त्यांना घरीं करण्यास अवघड वाटणारा अगर जास्त अभ्यास दिल्यास मुलें रात्रीं दिव्याशीं बराच वेळ घालवितात, व त्यामुळें त्यांच्या डोळ्यांना अपाय होण्याची भीति जास्त असते. रात्रीं मुलांनीं बिलकूल अभ्यास करूं नये, याबद्दल उलट शिक्षकांनीं त्यांना शाळेंत सूचना द्यावी. शिक्षकांबद्दल मुलांच्या मनांत फार पूज्यबुद्धि असून ते सांगतील तें ब्रह्मवाक्य असतें, त्यामुळें या गोष्टीचें महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवून होतां होईल तों रात्रीं अभ्यास न करण्याबद्दल त्यांस सांगावें. त्यांना कधीं रात्रीं अभ्यास करावा लागला तर अभ्यास संपल्यावर डोळे थंड पाण्यानें चांगले धुवावे, व नंतर त्यांनीं निजत जावें; ( अशा रीतीनें थकलेल्या डोळ्यांकडे पुन्हा रक्ताचा प्रवाह वाहूं लागून डोळ्यांची झीज भरून येईल )

किंवा डोक्याच्या पुढील भागावर थोडेसें गार पाणी ध्यावें म्हणजेंही डोळे पुन्हा ताजेतवाने होतील.

ज्यांचे डोळे अधू आहेत त्यांनीं डोळे सुधारण्यासाठीं रात्रीं निजतांना कानांत खोबरेल घालावें म्हणजे फार मदत होते, असें कांहीं डॉक्टरांचें म्हणणें आहे.

अशा रीतीनें सर्व आयुष्य सुखकर व्हावें म्हणून डोळ्यांची काळजी घेणें किती जरूर आहे, हें निराळें सांगावयास पाहिजे असें नाहीं. या बाबतींत लहानपणापासून काळजी घेतल्यास पुष्कळ वर्षांपर्यंत डोळे सुस्थितींत राहातील, यांत शंका नाहीं.

---

# कीटकसृष्टि.

चाल—साधी पदाची अथवा कटावाची

कीटकसृष्टी चतुराईची देवानें ही निर्मियली
सुंदर रंगित काया देउनि बुद्धि तयांना बहु दिधली
कौशल्यानें घरें बांधिती पाहुनि होई गुंग मती
उद्योगी हे दंग राहुनी अन्न सदा ते सांठविती
पुन्हा पुन्हा ते यत्न करोनी कार्य आपुलें साधीती
रेशिम विणती सूत कातती कोश रम्य ते बनवीती
शत्रूलागीं कदा न भीती शौर्यानें ते बहु लढती
उद्योगामधिं काळ आपुला सुखांत सारा ते नेती
जमीन करती सुपीक कांहीं, कांहीं बेटें बनवीती
मधू मेण तें रेशिम देउनि मनुजाला ते सुखवीती
कांहीं कीटक त्रास देति ते, परंतु दुसरे बहु असती
उपयोगीं ते पडावयाला काया अपुली झिजवीती
किती राहती कीटक जगतीं कोण तयांची करि गणती
अंगीं त्यांच्या बहु गुण असती नसे तयांना मुळीं मिती

---

**तीन बक्षिसें**:—या कवितेंत ज्या ज्या किड्यांचें वर्णन आहे त्यांचीं नांवें बरोबर देणाऱ्या दहा वर्षांच्या आंतील पहिल्या तीन मुलींना बक्षीस देण्यांत येईल. हीं नांवें शिक्षकाच्या अगर पालकाच्या मार्फत आमच्याकडे १५ दिसेंबरपर्यंत धाडावीं.

# अफगाणिस्तान.

---:o:---

**अफगाण**—आपणां सर्वांना पठाण लोक माहीत आहेत, व त्यांची शरीरयष्टिही पण सर्वांच्या परिचयाची आहे. त्यांच्या पायांतील जाड चढाव, पायांतील झोळदार विजारी, आंगांतील मोठा लांब सदरा, वर पुष्कळ जवळ जवळ गुंड्या असलेलें जाकीट, डोक्यावरील उभट टोकदार टोपी अगर मोठा थोरला फेटा व हातांतील सोटा असें काबुली मनुष्याचें शब्दचित्र रेखाटतां येईल.

हा एवढा सशक्त कां व हिंदुस्तानांतील बहुतेक लोक त्या मानानें अशक्त कां दिसतात? असे प्रश्न आपल्या पुढें उभे राहातील. पण यांस जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं त्यांच्या देशाची रचना व हवामान हीं दोन मुख्य कारणें आहेत.

**हिंदुस्तानांत येण्याचें कारण**—हिंदुस्तानाच्या वायव्य कोपऱ्यांत पेशावर वरून अफगाणिस्तानांत जाणारी खैबर नांवाची एक खिंड आहे. या खिंडींतून पलीकडे गेलें म्हणजे आपण अफगाणिस्तानांत शिरतों. याशिवाय सिंध प्रांतांतून बोलन मार्गानेंही य देशांत जातां येतें. आतां या दोनही ठिकाणीं रेल्वे रस्ते झाले आहेत, व खैबर खिंडींतून मोटारीही चालू असतात. कोंकणांतून लोक देशावर कां आले? मारवाडी आपला देश सोडून हिंदुस्तानभर कां पसरले? या प्रश्नांना जीं उत्तरें येतील तींच उत्तरें अफगाण लोक हिंदुस्तानांत कां आले? या प्रश्नाला देतां येतील.

**देश रचना**—त्यांच्या देशाच्या रचनेकडे लक्ष दिल्यास असें दिसेल कीं, तो फार डोंगराळ आहे, व समुद्र सपाटीच्या बराच वर आहे. त्यामुळें तेथील हवाही जात्या फार थंड आहे. असें असलें तरी कांहीं भाग सखल असल्यानें तेथें उष्णताही विलक्षण असते. असें सांगतात कीं, काबूलच्या उत्तरेस दोन तासांत जातां येईल इतक्या अंतरावर सतत बर्फाच्छादित डोंगर आढळतात, तर तितक्याच वेळांत जातां येईल अशा दक्षिणेच्या भागांत कधींच बर्फ सांपडत नाहीं, असें बाबरनें आत्मचरित्रांत लिहिलें आहे. खुद्द काबूल शहरांत उन्हाळ्यांत संध्याकाळीं फार जोराचा वारा सुटतो. त्याचा वेग तासी ११० मैल असतो.

दिवसा १९० पर्यंत उष्णतामान असलें तरी रात्रींच्या वेळीं तें कधीं कधीं ४० अंशांपर्यंत एकदम खालीं जातें. त्यामुळें किती कडक थंडी असते यांची कल्पना करा. एकदां असें सांगतात कीं, '१८ व्या शतकांत इराणवर स्वारी करण्यास गेलेलें १८००० अफगाण सैन्य परत येत असतां विलक्षण थंडीनें गारठून जाऊन ठार झालें. इतक्या काटक लोकांची ही स्थिति; मग इतरांची काय कथा!

**नद्याः**—अफगाणिस्तानांत काबूल ही काय ती मोठी नदी. ही काबूल शहराच्या मध्यभागांतूनच वाहात गेली आहे. या नदीचें पाणी शेतीस उपयोगांत आणल्यानें बहुतेक पाणी काबूल शहराचे वरील बाजूसच संपून जातें, व काबूलजवळ तिच्यांत फारसें पाणी शिल्लक राहात नाहीं. तरी कातड्यांच्या होड्या (यांना 'मसक ' असें म्हणतात. ) करून या नदींतून काबूलच्या आसपास बरेंच दळणवळण चालतें. ही नदी खैबरखिंडींतून बाहेर पडून अटकजवळ पेशावर व रावळपिंडीच्या दरम्यान सिंधू नदीस मिळते. या नदीशिवाय अफगाणिस्तानांत हेलमंड, हरीरूड या नद्या महत्त्वाच्या आहेत. हेलमंड नदी वाहात जात जात शेवटीं वाळवंटांत नाहींशी होते. तेथें सीस्तान हमून नांवाची खारी दलदल तयार झाली आहे. हेलमंड नदीसुद्धां हिरात शहराजवळून वाहात जाऊन काराकुम वाळवंटांत नाहींशी होते. उत्तरेस ओक्सस ऊर्फ अमुदारिया ही नदी अफगाणिस्तानची हद्द आहे. अफगाणिस्तानांत एकाद्या माणसास ओक्सस नदी कोठें आहे म्हणून प्रश्न केल्यास तो म्हणेल,—' ही नदी अफगाणिस्तानांत मुळींच नाहीं!—' कारण ओक्सस हें नांव अमुदारिया नदीस ग्रीक लोकांनीं प्राचीन काळीं दिलें आहे.

**पिकें:**—या नद्यांशिवाय या देशांत पाणी फारसें नाहीं. कांहीं भागांत बर्फ पडतें म्हणून फारसें पीक होत नाहीं. तरी कांहीं ठिकाणीं जेथें डोंगरांत पाणी सांपडतें, तेथून शेतकरी तें मोठ्या काळजीनें सखल भागांत बांधून आणतात, व त्यावर गहूं पिकवितात. नद्यांच्या कांठीं कलिंगडें फार पिकतात, व तीं फारच मधुर असतात असें म्हणतात. काबुली द्राक्षें तर आपल्या देशांत मुंबईस विकावयास येतात. तीं लांबट व जाड ' इयररिंग ' सारखीं ( कर्णभूषणांसारखीं ) दिसतात. याशिवाय इकडील डोंगरांत बदाम, पिस्ते, अक्रोड वगैरे पदार्थांचीं झाडें हवीं तितकीं उगवतात, व ते पदार्थ वाटेल तितके तेथील लोकांस खावयास सांपडतात. यांना आपण मेवा म्हणतों. अफगाणिस्तानांतून बराचसा हिंग आपलेकडे येतो. पुष्कळदां 'हिराहिंग' घ्या 'हिराहिंग' असें रस्त्यांतून ओरडतांना तुम्हीं ऐकलें असेल. हा पदार्थ एका झाडाचा चीक असतो.

**उद्योगधंदे:**—अफगाणिस्तानांत बरीच खनिज संपत्ति असावी असें तज्ज्ञांचें मत आहे. अलीकडे तेथील अमीरसाहेबांनीं रॉकेलच्या खाणी शोधून काढिल्या आहेत. पण हा खाणींचा धंदा परदेशीय लोकांच्या हातीं जाऊं न देण्याचा त्यांचा विशेष कटाक्ष आहे. येथील लोकांचा मुख्य धंदा मेंढ्या बाळगून त्यांची लोकर काढणें व लोकरीचा कपडा, गालिचे वगैरे सामान तयार करणें हा आहे. त्याच्या खालोखाल शेती. याशिवाय म्हणण्यासारखे इतर धंदे नाहींत. ' काबूल 'या शब्दाचा मूळचा अर्थ ' मेंढवाडा 'असा आहे. यावरून या देशच्या मूळच्या धंद्याची चांगली कल्पना येईल. अलीकडे येथील अमीर-साहेबांचा मुख्य उद्देश आपल्या देशांत घरगुती धंद्यांची जोरांत वाढ करणें हा आहे. त्यासाठीं ते अविश्रांत श्रम करीत असतात. या देशांतून उत्तम प्रकारचे गालिचे व मेवा हे जिन्नस आपल्या देशांत फार विकावयास येतात.

**कांहीं शहरें:**—या देशांत सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें फार मोठाल्या शहरांचा भरणा फार कमी आहे. काबूलप्रमाणें कंदाहार व हिरात हीं दक्षिण व पश्चिम सरहद्दीवरील दोन महत्त्वाचीं शहरें आहेत. इतर देशांप्रमाणें येथें खाने-सुमारी होत नाहीं, तरी अदमासानें काबूल येथें सुमारें ५० हजार लोकवस्ती असावी. त्याच्या खालोखाल कंदाहार व हिरात येथें अनुक्रमें ३० व २० हजार वस्ती असावी. याशिवाय इतिहासांत ऐकूं येणारीं शहरें गझनी व ज़लालाबाद हीं अनुक्रमें काबूलच्या दक्षिणेस व पूर्वेस असून यांची वस्ती १० हजारांहूनहीं कमी आहे.

**काबूलचें वर्णन**—हें शहर काबूल नदीच्या दोन्ही तीरांवर वसलें आहे. एका बाजूला मुख्य बाजार पेठ व एका बाजूला राजवाडा व लष्करी इमारती आहेत. या नदीवरून एका बाजूकडून दुसरीकडे जाण्यास सुमारें १० पूल आहेत. नदीकांठानें पाहिलें तर येथील घरें २ मजली उंच असून धाब्याचीं असतात, पण या घरांना आपल्याप्रमाणें फारशा खिडक्या, दारें नाहींत. आंत अंधाराची समृद्धि आढळेल ! उन्हाळ्यांत जेव्हां उष्णता फार असते, तेव्हां लोक घरांच्या धाब्यावरून निजतात. ज्या शहराला बाहेरून कोट नाहीं असें मध्य आशियांतील हेंच एक शहर आहे. याच्या दोन्ही बाजूला डोंगर असून यांवरून एक लहानशी भिंत बांधलेली दिसते. ही पाहिली असतां चीनच्या प्रसिद्ध भिंतीची कल्पना येईल.

हें शहर ज्या खिंडींत वसलें आहे, त्या जागेचा घेर ६ चौरस मैलांहून जास्त नाहीं.

बाजार पेठेंत एक मोठा चौक असून तेथें अतिशय रहदारी असते. तेथें अनेक देशाचे लोक व्यापार निमित्तानें आलेले दिसतात. उझबेग, किलझीबाश, गिलझाई, चक्करऐमक मोंगल, तुर्क, ग्रीक, इराणी, रशियन, हिंदी वगैरे अनेक जाती त्या गर्दीमध्यें आपल्या नजरेस पडतील.

या शहरांत रस्ते अतिशय अरुंद असल्यानें मोटारी, ट्रामगाड्या वगैरे कोणतींही वाहनें जाणें शक्य नाहीं. तसेंच या शहरांत चहापानगृहें, सिनेमा, वाचनालयें, बँका ( पेढ्या ) वगैरे आपलेकडे सर्वत्र आढळणाऱ्या गोष्टी बिलकूल दिसत नाहींत, पण कोठें कोठें ज्यांना आपण धर्मशाळा म्हणतों अशा प्रकारच्या प्रवाशांच्या राहाण्याच्या उपयोगाच्या जागा दिसतात. अमीर साहेबांनीं काढलेल्या नवीन नाण्याशिवाय येथील सर्व नाणीं ठेचून थबकट झालेल्या शिशाच्या गोळीप्रमाणें दिसतात.

आपण या शहरांत फिरावयास निघालों तर आपणांस मोच्यांचीं दुकानें (जोडे व बूट बनविणारे) लागतात. हे लोक दिवसभर काम करतात व वेळ आनंदानें जावा म्हणून तोंडानें गाणें गुणगुणत असतात! पुढें हिंदी व्यापाऱ्यांचीं रेशमी मालाचीं दुकानें आहेत. यांत ते गाद्यांवर ऐटींत बसलेले दिसतील. चौकाजवळील भागांत पुणें येथील मोतीचौकाप्रमाणें सराफ कट्टा आहे. हा भाग रस्त्यापासून बराच उंच असा बांधला आहे. नंतर पुढें लोकरीच्या मालाचीं दुकानें लागतात. हे लोक चांगले गलेलठ्ठ असून उंची बिछायतीवर हुक्का पीत बसलेले असतात, व गिऱ्हाइकीबद्दल यांना फारशी परवा आहे, असें दिसत नाहीं. तेथून पुढें एका बाजूस खाटकांचीं दुकानें आहेत. खाण्यासाठीं हे लोक दररोज सुमारें ३००० मेंढ्यांचा फन्ना उडवतात, पण गाय अगर बैल यांना बिलकूल हात लावीत नाहींत. एका बाजूला कासार, सोनार यांच्या आळ्या असून पलीकडे फळबाजार आहे.

**लोकांच्या चालीरीति व राहाणीः**—रस्त्यांतून गारुडी, सरबत विकणारे, लोकांना गुडगुडी ओढावयास देणारे लोक आपापले उद्योग रस्त्यांतच चालू ठेवतात. त्यामुळें अगोदरच अरुंद अशा रस्त्यांत अधिकच गर्दी होते. एकानें

ओढलेली गुडगुडी दुसऱ्यानें न धुंतां ओढणें अगर एकानें प्यालेल्या भांड्यानें दुसऱ्यानें सरबत पिणें आरोग्य दृष्ट्या वाईट आहे याची त्यांना कल्पना सुद्धां येत नाहीं. शहरांतील दुकानांतून विशेष स्वच्छता दिसत नाहीं, व रस्तेही विशेष स्वच्छ नसतात. तेथें जाऊन पाहिल्यास अशी खरीच वस्तुस्थिति आहे असें दिसेल. पण अलीकडे अमीर साहेबांनीं लोकांचा कल संभाळून हळू हळू या बाबतींत सुधारणा करण्यास सुरुवात केली आहे यांत शंका नाहीं.

या देशांतील बहुतेक लोक मेंढ्या बाळगून त्यांवर आपली उपजीविका करतात असें मागें सांगितलेंच आहे.ह्या मेंढ्यांचा निर्वाह उत्तम रीतीनें करितां यावा म्हणून त्यांना चारा मिळेल तेथें फिरत जावें लागतें.गवत आढळेल तेथें तंबू ठोकून ते मेंढ्या चारणीस लावतात, व लोकर कातून घरांतील सर्व माणसें तिचे कपडे विणतात. वाटेनें कोणी प्रवासी जात असला व त्याला मदतीची जरूर असली तर हे लोक त्याचें उत्तम आदरातिथ्य करतात. यांची राहाणी अगदीं साधी असते. पुरुषांचा पोशाख कसा असतो हें आपणांस माहीत आहे. बायका मुसलमानी धर्माप्रमाणें बुरखा घेतात. डोळ्यांनीं पाहातां यावें म्हणून झरोका ठेवतात. हिंदुस्तानांत बुरख्याची चाल मुसलमानी अमलापासून आली, असें पुष्कळांचें मत आहे, पण ती चाल त्यापूर्वीपासून हिंदुस्तानांत रूढ होती असें अलीकडे कांहीं संशोधकाचें म्हणणें आहे. या देशांतील लोकांना कडक अशा सृष्टिदेवतेशींच नेहमीं संबंध ठेवावा लागत असल्यानें त्यांचें स्वस्थ बसून चालत नाहीं. प्रत्येकाला चांगलें हातपाय हालवावे लागतात. याशिवाय थंड हवा व मांसाशन यामुळें तेथील लोक काटक व धिप्पाड बनले आहेत.

# 'लीलावती' व तिचा अल्प परिचय.

( लेः—काशीनाथ परशुराम साने, शिक्षक, घोडें, जि. पुणें. )

प्रीतिं भक्तजनस्य यो जनयते विघ्नं विनिघ्नस्मृत-
स्तं वृंदारकवृंदवंदितपदं नत्वा मतंगाननं ।
पाटीं सद्गणितस्य वच्मि चतुरप्रीतिप्रदां प्रस्फुटां
संक्षिप्ताक्षरकोमलामलपदैर्लालित्य लीलावतीं ॥

( अर्थ—जो आराधक लोकांचे मनोरथ सिद्धीस नेतो, ज्याचें स्मरण केलें असता तो प्रसन्न होऊन विघ्नांचा नाश करितो, ज्याचे पद देवसमूहांनीं वंदन केले आहेत अशा गजाननास वंदन करून ज्ञात्यास आवडणारें, अगदीं सोपें, ज्यांत व्यर्थ अक्षर नाहीं अशा मधुर व शुद्ध शब्दांनीं सुंदर असें 'लीलावती' गणित सांगण्यास आरंभ करतों. )

—लीलावती—भास्कराचार्य.

आजपर्यंत हिंदुस्तानांत जे नामांकित ज्योतिषी व गणिती होऊन गेले, त्यांत भास्कराचार्यांची योग्यता सर्वांत श्रेष्ठ समजली जाते. ज्योतिषी म्हणून भास्कराचार्यांची जशी ख्याति आहे तशीच गणिती म्हणूनही आहे, कारण गणितशास्त्र हेंच ज्योतिषशास्त्राचा पाया होय. ज्योतिर्विषयक ज्ञानसंपादनासाठीं गणितविषयक सोपपत्तिक ज्ञानाची अत्यंत जरुरी असल्यानें भास्कराचार्य हे नामांकित गणिती म्हणूनही प्रसिद्धीस आले. भास्कराचार्यांचें चरित्र मराठी क्रमिक सातव्या पुस्तकांत दिलेलें आहे.

भास्कराचार्यांनीं गणितविषयक लिहिलेला मुख्य ग्रंथ म्हणजे सिद्धांतशिरोमणि हा असून तो त्यांनीं इ० स० ११५० त म्हणजे आपल्या वयाच्या ३६ वे वर्षीं लिहिला. या ग्रंथाचेच लीलावती, बीजगणित, गणिताध्याय व गोलाध्याय असे ४ भाग आहेत. हे चारी भाग गणित-संबंधाचेंच असून त्यांची रचना फार उत्तम आहे. तथापि प्रस्तुत लेखांत वाचकांस फक्त लीलावतीचाच अल्प परिचय करून देण्याचा हेतु आहे.

आधुनिक अंकगणित ग्रंथाच्या दृष्टीनें पाहतां लीलावतींत अंकगणित व महत्त्वमापन यांचा सर्व भाग आला असून त्यांची मांडणी संक्षिप्त पण अत्यंत व्यवस्थित

रीतीनें केली आहे. लीलावती ग्रंथांत संख्याप्रकरण, परिकर्माष्टक ( बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, वर्गमूळ, घन, घनमूळ ), सर्व प्रकारचीं विविध परिमाणांचीं कोष्टकें, व्यवहारी अपूर्णांक, त्रैराशिक व बहुराशिकाचे सर्व प्रकार, इष्टकर्म, विषमकर्म, मूलप्रकरण, श्रेढि, अंकपाश, कुट्टक ( कूटगणित ), महत्त्वमापन ( क्षेत्रफळ, घनफळ ), छायाव्यवहार इत्यादि व्यक्तगणिताचे ( अंकगणित व महत्त्वमापन ) सर्व प्रकार सांगितले आहेत. आचार्यांनीं ग्रंथाचे शेवटीं या गणिताचा 'पाटीगणित' या नांवानें उल्लेख केला आहे, तो असा:—

" इति श्री भास्करीये सिद्धांतशिरोमणौ लीलावती संज्ञः पाट्यध्यायः समाप्तः "

तथापि या भागाचें " पाट्यध्याय " असें नामाभिधान न करितां आचार्यांनीं आपली कन्या 'लीलावती' हिला उद्देशून हा सर्व भाग लिहिला असल्यानें सदरील भागास " लीलावती " असें नांव दिलें आहे. यावरून आचार्यांनीं हें गणित आपली कन्या लीलावती हिलाही शिकविलें असावें ही गोष्ट उघड होते. गणित हा विषय बुद्धीला रमविणाराच असल्यामुळें त्या विषयांतील सर्व लीलाच आचार्यांनीं या ग्रंथांत स्पष्ट केल्या आहेत !

कित्येक ठिकाणीं या ग्रंथांत शृंगाररसपर भाषणांनीं संबोधिलें असून कित्येक ठिकाणीं "कांते" या संबोधनाचा उल्लेख केला असल्यानें 'लीलावती' ही आचार्यांची मुलगी नसावी असेंही कित्येकांचें मत आहे. तथापि 'लीळावती' ही आचार्यांची कन्या असावी हीच गोष्ट हल्लीं बहुजन संमत आहे.

लीलावती ग्रंथांत आधुनिक गणितांत आलेले सर्व प्रकार पूर्णत्वानें दिलेले आहेत. यावरून ७–८ शें वर्षांपूर्वींच हिंदुस्तानांत गणितशास्त्र किती पूर्णतेस पोहोंचलें होतें याची चांगली कल्पना येते. इतकेंच नव्हे, तर त्याच्या रचनेवरून हा ग्रंथ अगदींच अलीकडच्या काळांत लिहिला आहे कीं काय अशी भ्रांति वाटूं लागते! हल्लींच्या गणितग्रंथांत समाविष्ट न केलेले असे कित्येक गणित प्रकारही लीलावतींत पाहावयास मिळतात.

आचार्यांच्या या गणितग्रंथाची इतकी अपूर्व व परिपूर्ण रचना झालेली आहे कीं, तो गणितशास्त्रांत अत्यंत प्रिय व प्रमाणग्रंथ समजला जातो. भरतखंडास

गणितासंबंधीं मान मिळण्यास बहुंशीं हाच ग्रंथ कारण होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हा ग्रंथ आचार्यांनीं संस्कृतांत लिहिला असून या ग्रंथांत भिन्न भिन्न प्रकारचीं १९० वर गणितसूत्रें ( गणितरीति ) असून त्यांची रचना संस्कृतांत निरनिराळया वृत्तांतून केली आहे. कित्येक उदाहरणांचीही रचना वृत्तांतूनच केली आहे. एकंदर पद्यें सुमारें २७८ असून मधून मधून उदाहरणांचें स्पष्टीकरण वगैरे गद्यांत केलेलें आहे. पूर्वी गद्यग्रंथ लिहिण्याचा प्रचार अगदींच क्वचित असल्यानें सर्व प्रकारचे विषय पद्यग्रंथांतूनच लिहिले जात. त्यास अनुसरून आचार्यांनीं या तत्कालीन गणितग्रंथाचीही बहुतेक पद्यरूपच रचना केली आहे.

आचार्यांनीं या गणितग्रंथासारख्या गहन विषयांतही भाषामाधुर्य ओतून त्याची रचना मनोरम केली असल्यामुळें त्यांतील सूत्रें व उदाहरणें स्मरणांत राहाण्यास सोपें पडून त्यांतील चमत्कारिक व मनोरंजक प्रश्न सोडवितांना एक प्रकारचा आनंद वाटतो.

लीलावतीचें फारशी भाषांतर अकबर बादशहानें इ. स. १५८७ मध्यें करविलें. त्याचप्रमाणें कोलब्रुक नांवाच्या ग्रंथकारानें इ. स. १८१७ मध्यें तिचें इंग्रजीमध्यें भाषांतर करून छापिलें. मराठींतही लीलावतीचीं भाषांतरें झालीं आहेत.

आचार्यांच्या सिद्धांतशिरोमणि ग्रंथांवर पुष्कळ प्राचीन ग्रंथकारांनीं टीका लिहिल्या असून, केवळ लीलावतीवरही केलेल्या अनेक ग्रंथकारांच्या निरनिराळ्या नांवानें असलेल्या अनेक टीका प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं गणितामृतसागरी, बुद्धिविलासिनी, लीलावतीभूषण, लीलावती निवृत्ति, लीलावतीविवरण इ. मुख्य असून इतरही अनेक आहेत.

लीलावती—गणित पठण केल्यानें झाडावरचीं पानें व फळें मोजणें, कोणतेंही फळ फोडल्यावांचून त्याच्या आंतील बियांची गणना करणें, शरिरावरील केसांची गणना करणें, धान्यराशींतिल धान्यकणांची बिनचूक मोजदाद करणें इत्यादि असामान्य गणनाप्रकारही साध्य होऊन गणितसंबंधीं अद्भुत ज्ञान प्राप्त होतें अशी जुनी गतानुगतिक समजूत कित्येक लोकांच्या सांगण्यांत येते; परंतु त्यांत तथ्यांश नसून ती अतिशयोक्ति आहे. या दंतकथेवरून लीवावती हा असामान्य व परिपूर्ण गणितग्रंथ आहे एवढी गोष्ट सिद्ध होऊन भारतीयांची त्यावरील पूज्यबुद्धि व्यक्त होते.

प्राचीन ग्रंथांतून ग्रंथाच्या शेवटीं ग्रंथपठणापासून होणारी फलश्रुति व स्वतःचें नांव याचा उल्लेख करण्याची प्राचीन ग्रंथकारांची रीत होती. त्या रिवाजास अनुसरून आचार्यांनीं लीलावतीची फलश्रुति सांगितली आहे ती अशी—

"येषां सुजातिगुणवर्गविभूषितांगी
शुद्धाखिलव्यवहृतिः खलु कंठसक्ता ।
लीलावतीह सरसोक्तिमुदाहरंती
तेषां सदैव सुखसंपदुपैति वृद्धिम् ॥"

( अर्थ—अनेक प्रकारचे गुणाकार, वर्ग इत्यादिकांनीं जिचे भाग सुशोभित झाले आहेत, जिचीं मिश्रव्यवहारादि सर्व प्रकरणें स्पष्ट समजण्यासारखीं आहेत व जींत मधुर भाषणानें उदाहरणें सांगितलीं आहेत अशी ही लीलावती ज्याला निश्चयेंकरून चांगली अवगत होईल त्याची सुखसंपत्ति नेहमीं वृद्धि पावेल. )

त्याचप्रमाणें स्वतःसंबंधीं ओळख करून देतांना आचार्य आत्मविश्वासानें लीलावतींत म्हणतातः—

अष्टौ व्याकरणानि षट्च भिषजां व्याचष्ट ताः संहिताः
षट् तर्कान् गणितानि पंच चतुरो वेदानधीते स्म यः ।
रत्नानां त्रितयं द्वयं च बुबुधे मीमांसयोरंतरं
सद्ब्रह्मैकमगाधबोधमहिमा सोऽस्याः कविर्भास्करः ॥

( अर्थ—जे आठ व्याकरणें, सहा वैद्यक संहिता, सहा तर्कशास्त्रें, पांच गणितें, चार वेद, तीन रत्नें, दोन मीमांसा व एक ब्रह्म हीं इतकीं जाणत असत, अशा प्रकारची ज्यांची जाणण्याची शक्ति अपार असे ते, हा लीलावती-ग्रंथकर्ते श्री भास्कराचार्य होते. )

यावरून श्री भास्कराचार्यांची विद्वत्ता व सर्वशास्त्रपारंगतता स्पष्ट दिसून येते.

हल्लींच्या आपल्या शालोपयोगी गणित-पुस्तकांतून लीलावतींतील कांहीं उदाहरणें दिलेलीं आहेत, तथापि तिच्यांतील आणखी कांहीं विशेष गणितप्रकार जिज्ञासूंसाठीं यथावकाश देण्याचा विचार आहे.

# पोंच व अभिप्राय.

**बालवसंत**—हें पाक्षिक पत्र अमळनेर येथें रा. नरहर हणमंत देशपांडे ह्यांचें संपादकत्वाखालीं प्रौढ विद्यार्थी व विद्यार्थिनी ह्यांचेकरितां प्रसिद्ध होत आहे. प्रत्येक अंकांत कांहीं कविता देण्यांत येतात. चालू अंकांत 'खरी दिवाळी केव्हा ?' 'ज्ञानदीप' 'कृपेची पांखर' वगैरे कविता दिल्या आहेत. वसईचे संग्रामावर दिलेली कविता मुलांना आवडण्यासारखी आहे. ह्यांशिवाय निबंध, कोडीं वगैरे दिलेलीं आहेत.

**मुलांचें मासिक**—संपादक व प्रकाशक रा. रा. बालकृष्ण रामचंद्र मोडक बी. ए. एल्. टी. ह्या मासिकाचा दुसरा अंक आमचेकडे आला आहे. ह्यांतील विषय वरचे इयत्तेंतील मुलांस समजण्यासारखे आहेत. चालू अंकांत 'अभ्यास कसा करावा' हा निबंध चांगला असून संपादकीय विहारही वाचनीय आहे. जमशेटपूर व चंपूची फजीती हे लेखही मुलांना आवडण्यासारखेच आहेत. वर्गणी २। रु.

---

# सरकारी जाहिरात

मुंबई सरकारचे ता. ३।११।१९२७ चे सरकारी गॅझेटांतील भाग १ पा. २५१९ वर प्रसिद्ध झालेला सरकारी ठराव एज्यु. डिपार्टमेंट नं. २६३६ ता. २९।१०।२७ प्रमाणें चालू सालापासून मुलींच्या व्ह. फायनल परीक्षेस बसणाऱ्या प्रत्येक मुलीस रु. ३ फी ठेवण्यांत आली आहे. ही फी सन १९२८ च्या एप्रिलमध्यें होणाऱ्या परीक्षेपासून वसूल करण्यांत येईल, व ती फी परीक्षेच्या सुरुवातीचे दिवशीं वसूल केली जाईल.

V. V. SATHAYE,
For E.I. C. D. Poona.

# ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

## सर्टिफिकेट परीक्षांचा निकाल.

१९२७.

नवीन दुसरें वर्ष.

### ट्रे. कॉलेज फॉर वुइमेन.

| | नांव. | शें. मार्क. | जिल्हा. |
|---|---|---|---|
| १ | बाळाबाई वेळापूरकर | ७२.७ | सातारा. |
| २ | कृष्णाबाई एकमकर | ६५.३ | ,, |
| ३ | शांताबाई कदम | ६३ | पुणें. |
| ४ | गोदूबाई सोनवणे | ६२.६ | नाशिक. |
| ५ | आऊबाई दामले | ६२.३ | रत्नागिरी. |
| ६ | चंद्राबाई भोसले | ५९.२ | ,, |
| ७ | रंगूबाई जोशी | ५७.५ | सोलापूर. |
| ८ | अंबूबाई पावसकर | ५७.२ | पुणें. |
| ९ | यमुनाबाई शारंगपाणी | ५५.९ | अहमदनगर |
| १० | शरणाबाई झंपले | ५१.४ | सोलापूर. |
| ११ | अन्नपूर्णाबाई बाम | ५१.१ | रत्नागिरी. |

### यू. एफ. सी. मिशन, पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | हन्नाबाई नायडू | ६२ |
| २ | इंदिराबाई निर्मळ | ५५.१ |
| ३ | ग्रेसबाई उडदे | ५३.९ |
| ४ | ग्रेसबाई केदार | ५३.२ |
| ५ | ताराबाई साठे | ५३.१ |

# ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें.

ता.........२२६

## सीनियर वर्ष १ लें.

---

### ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

| | नांव. | शें. मार्क. | जिल्हा. |
|---|---|---|---|
| | अनसूयाबाइ वाघ | ६०.५ | नाशिक. |
| २ | कृष्णाबाई पूर्णपात्रे | ५९.६ | प. खानदेश. |
| ३ | रत्नाबाई बुगटे | ५८.४ | सातारा. |
| ४ | जानकीबाई जोशी | ५७.७ | ,, |
| ५ | गंगूबाई इनामदार | ५७. | पुणें. |
| ६ | इंदिराबाई कान्हेरे | ५६.९ | प. खानदेश. |
| ७ | सुभद्राबाई पाठक | ५६.४ | सातारा. |
| ८ | पार्वतीबाई ठोंबे | ५५.३ | पुणें. |
| ९ | उमाबाई दातार | ५३.४ | ,, |
| १० | बारूबाई सोनार | ५३.२ | पूर्व खानदेश. |
| ११ | कृष्णाबाई मुजुमदार | ५३. | मुंबइ सबर्बन. |
| १२ | मथुराबाई शारंगपाणी | ५२.५ | नगर. |
| १३ | यमुनाबाई पोतदार | ५२. | सातारा. |
| १४ | यमुनाबाई कस्तुरे | ५१. | नगर. |
| १५ | यशोदाबाई चांदोरकर | ४९.८ | नाशिक. |
| १६ | वत्सलाबाई आंवळेगांवकर | ४९.६ | कुलाबा. |
| १७ | लक्ष्मीबाई साने | ४९.४ | पुणें. |
| १८ | चंपूबाई एकबोटे | ४८.९ | ,, |
| १९ | बचीबाई पिचर | ४८.७ | नगर. |
| २० | मंजिराबाई विध्वंस | ४८.७ | रत्नागिरी. |
| २१ | मथूबाई चौबळ | ४८.४ | ठाणें म्युनिसि. |
| २२ | गोदूबाई उनवणे | ४७.९ | सोलापूर |
| २३ | चंपूबाई डावरे | ४७.८ | नगर. |
| २४ | रुक्मिणीबाई आठवले | ४७.७ | अमळनेर म्यु. |
| २५ | पार्वतीबाई कुळकर्णी | ४७.६ | पूर्व खानदेश. |
| २६ | रुक्मिणीबाई क्षीरसागर. | ४७.४ | नाशिक. |
| २७ | गंगूबाई कदम | ४७.३ | सातारा. |
| २८ | मुक्ताबाई कुंभार | ४५.८ | पुणें. |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | यमुनाबाई शास्त्री | ४५·६ | नाशिक. |
| ३० | मिर्यमबाई सॅम्युएल | ४५·६ | मुंबई. |
| ३१ | शांताबाई राजे | ४५·३ | थाणें म्यु. |
| ३२ | सरस्वतीबाई टापरे | ४४·९ | सातारा. |
| ३३ | भीमाबाई कळमकर | ४४· | पुणें म्युनिसि. |

## सेवासदन, पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | दुर्गाबाई राजवाडे | ५०·८ |
| २ | कमलाबाई चेंद्रे | ४८·१ |
| ३ | पार्वतीबाई सोहोनी | ४८· |
| ४ | राधाबाई शामभाग | ४६·६ |
| ५ | राजसबाई मिसाळ | ४६·१ |
| ६ | काशीबाई फडणीस | ४६· |
| ७ | सिंधूबाई ओक | ४५·५ |
| ८ | सोनूबाई अभंग | ४४·७ |
| ९ | यमुनाबाई खरे | ४३·७ |
| १० | सोनूबाई पवार | ४१·६ |
| ११ | गोदूबाई ओक | ४०·४ |

## सेवासदन मुंबई.

| | | |
|---|---|---|
| १ | विठाबाई सरदेसाई | ५३· |
| २ | मालतीबाई परचुरे | ५१·८ |
| ३ | शांताबाई वागळे | ४८·६ |
| ४ | सरस्वतीबाई शिंदे | ४८·४ |
| ५ | सुंदराबाई शारंगपुरे | ४८·४ |
| ६ | शांताबाई चौधरी | ४५·८ |

## यु. एफ. सी. मिशन, पुणें.

| | | |
|---|---|---|
| १ | चंद्रिकाबाई वाघमारे | ६१·६ |
| २ | साराबाई रणमिसे | ५७·९ |
| ३ | रूबीबाई रणनवरे | ५७·३ |
| ४ | माणकबाई पगारे | ५५·९ |
| ५ | शांताबाई मुनशी | ५५·३ |
| ६ | कुसूमबाई वाघचौरे | ५४·४ |
| ७ | मार्थाबाई अब्राहाम | ५३·६ |

| | | |
|---|---|---|
| ८ | शांताबाई महापुरे | ५२· |
| ९ | लीलावतीबाई साळवे | ५१·६ |
| १० | हिराबाई चोपडे | ५१·४ |
| ११ | सुवार्ताबाई बेलगल | ४८·९ |
| १२ | आकूबाई महापुरे | ४८·५ |
| १३ | राजसबाई नवगिरे | ४४·६ |

## सेंट मोनिका मिशन, नगर.

| | | |
|---|---|---|
| १ | मार्थाबाई रड्डी | ६१·८ |
| २ | लीलावतीबाई मगर | ५९·७ |
| ३ | कांशीबाई वर्डे | ५८·३ |
| ४ | चंपाबाई सोनवणे | ५४·६ |
| ५ | इंदिराबाई त्रिभुवन | ५४·१ |
| ६ | फुलवंतीबाई गायकवाड | ५२·१ |
| ७ | प्रेसबाई केदारी | ५१·९ |
| ८ | रोझीबाई कदम | ४८·६ |
| ९ | नलिनीबाई झावळे | ४८·६ |
| १० | मालतीबाई ससाणे | ४७·३ |
| १२ | सुंद्राबाई मांढरे | ४६·५ |
| १२ | अवंतिकाबाई वार्से | ४५·२ |

## बाहेरून बसलेल्या विद्यार्थिनी.

१ लीलावतीबाई चव्हाण
२ द्वारकाबाई देवधर
३ सरस्वतीबाई चक्रनारायण
४ हन्नाबाई सॅम्युएल
५ सरूबाई केदारी
६ चंपूबाई जोगळेकर

# ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन, पुणें.

## ज्यूनियर वर्ष १ लें.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | रेणुकाबाई नाईक | ७३.७ | रत्नागिरी. |
| २ | गंगूबाई मच्छे | ७२.६ | सोलापूर. |
| ३ | शांताबाई घोगरे | ६९.७ | धुळें म्यु. |
| ४ | गयाबाई परदेशी | ६४.५ | नाशिक म्यु. |
| ५ | हिरकोरबाई ठाकूर | ६२.८ | पुणें. |
| ६ | जनाबाई नलावडे | ६२.५ | रत्नागिरी. |
| ७ | चंद्राबाई करंबेळकर | ६२. | सातारा. |
| ८ | पुंजाबाई शेजवळ | ६१.४ | नाशिक. |
| ९ | जनाबाई करवीरकर | ५९.९ | " |
| १० | मनोरमाबाई कुळकर्णी | ५९.८ | कुलाबा. |
| ११ | कृष्णाबाई क्षीरसागर | ५९.५ | नाशिक. |
| १२ | मंजुळाबाई परुळेकर | ५९.२ | पुणें. |
| १३ | कौसल्याबाई इनामदार | ५७.१ | " |
| १४ | लक्ष्मीबाई फडके | ५६.७ | सातारा. |
| १५ | क्षमाबाई नवले | ५६.६ | पुणें. |
| १६ | अंबूबाई बिडवाई | ५६.१ | नाशिक. |
| १७ | गोपिकाबाई पाटील | ५४.९ | पूर्व खानदेश. |
| १८ | लक्ष्मीबाई सोहोनी | ५४.४ | रत्नागिरी. |
| १९ | ताराबाई जोगळेकर | ५४.२ | पुणें. |
| २० | शांताबाई दाणी | ५३.६ | नाशिक. |
| २१ | सोनूबाई सोनार | ५३.५ | सातारा. |
| २२ | सोनूबाई सपकाळ | ५३.१ | सोलापूर. |
| २३ | कमळाबाई दातार | ५२.५ | प. खानदेश. |
| २४ | आनंदीबाई बर्डे | ५१.५ | पुणें. |
| २५ | भागीरथीबाई चौधरी | ५०.९ | पूर्व खानदेश. |
| २६ | नर्मदाबाई माळी | ५०.९ | सातारा. |
| २७ | रूथबाई डेव्हिड | ४९.१ | कराची म्युनि. |
| २८ | पद्मिनीबाई सोनार | ४९. | बार्शी म्युनि. |
| २९ | मथूबाई लोहार | ४७.७ | सातारा. |
| ३० | गंगूबाई गुजर | ४६.९ | " |
| ३१ | शांताबाई आंग्रे | ४५. | " |
| ३२ | सुंद्राबाई कुळकर्णी | ४४. | प. खानदेश. |
| ३३ | राधाबाई गुजराथी | ४२.३ | पूर्व खानदेश. |

## वर्गणीदारांस विनंति.

चालू सालचा नववा अंक वर्गणीदारांकडे जात आहे तरी चालूसालची वर्गणी लवकर पाठविण्याची तजवीज करावी. ज्यांची वर्गणी येणार नाहीं त्यांजकडे पुढील महिन्याचा अंक व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल. तरी व्ही. पी. चा स्वीकार करावा.

**मॅनेजर.**

---


**कमिशन शें. १५ टक्के. मुलींचे वाळवेकर यांना लिहा**

**व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेची**

छापून तयार किं. ८॥ आणे. पानें. सु. १००. ] **प्रश्नोत्तरमाला.** [ तिकिटें १०॥ आण्याचीं

**(१९२४ ते १९२७)**

उत्तरें थोडक्यांत व मुद्देसूद. छपाई सुबक. मिळण्याचीं ठिकाणें-(१) **को. ना. वाळवेकर. बुकसेलर नवीपेठ अहमदनगर (२) सेवासदन ट्रे. कॉ. विद्यार्थिनी-सहकार-मंडळाची ग्रंथशाला पुणें. बुधवार ५९५ पुणें.**

---

**इ. ४, ५ व ६ करितां** ] **घरगुती जमाखर्च.** [ **किं. ३ आणे कमि. शें. २०**

लेखकः—**द. ज. गोखले बी. ए.** हेडमास्तर प्रॅ. स्कूल ट्रे. कॉ. पुणें.

मुलींच्या व्ह. फायनल परीक्षेला योग्य असें घरगुती जमाखर्चावर एकही पुस्तक नव्हतें; ती उणीव या पुस्तकानें दूर केली आहे. यांत जमाखर्चाची सामान्य माहिती योग्य अशा चित्राचे आधारानें दिली असून पुढें एका कुटुंबाची वर्षाची कीर्द व खतावणी व्यवहारांसह दिली असून शेवटीं परीक्षेच्या धोरणास धरून ५० वर प्रश्न आहेत.

**मिळण्याचें ठिकाण**—ल. ना. गोडबोले, बुकसेलर, पुणें.

Registered No. B 1195

# पुष्कळ शाळांत सुरू झाल्या ! तुम्हीही सुरू करा ! !

## अगदीं सुधारलेल्या पद्धतीनें भूगोल विषय शिकविण्याकरितां

अत्यंत उपयुक्त

इयत्ता २ ते ७ च्या अभ्यासपत्रकाप्रमाणें तयार केलेल्या.

# आराखड्यांच्या वह्या.

इयत्ता ३ ते ७ व इंग्रजी १ ली ते ७ वी च्या वह्या पुष्कळ दिवस चालू आहेतच. शिवाय मराठी इयत्ता २ करितां **महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांच्या वह्या तयार झाल्या !** अमुक वह्यांची आर्डर आली व अगाऊ पैसे आले तरच वह्या तयार करून देऊं अशी अट नाहीं. कोणत्याही तालुक्याची एक सुद्धां वही मिळं शकेल. शिवाय शिक्षकांस शेंकडा २५ प्रमाणें कमिशन मिळेल.

| इयत्ता | आराखड्यांची संख्या. | किंमत |
|---|---|---|
| २ दुसरी...... | तालुक्याचे ४, आणि जिल्हा १ | १ आणा |
| ३ तिसरी..... | जिल्ह्याचे ६, आणि महाराष्ट्र २ | १ आणा |
| ४ चौथी....... | इलाख्याचे ६, आणि हिंदुस्थान २ | १॥ आणा |
| ५ पांचवी...... | हिंदुस्थानचे ६, आणि आशियाचे २ | १॥ आणा |
| ६ सहावी...... | जगाचे २, आशियाचे ३, हिंदुस्थानचे ५ युरोपचे ५ | ३ आणे |
| ७ सातवी...... | जगाचे २, दक्षिण अमे. २ उत्तर अमे. २; आफ्रिका २, आस्ट्रेलिया २, हिंदुस्थान ५. | ३ आणे |

**या वह्यांच्या साहाय्यानें भूगोल विषय पाठ न करितां सहज तयार होतो असा शिक्षक या नात्यानें १२ वर्षांचा अनुभव आहे.**

**वह्या मिळण्याचीं ठिकाणें**

प्रकाशकः—**व्ही. के. सामक आणि कंपनी**, बुधवार पेठ पुणें.

**लक्ष्मण नारायण गोडबोले** बुकसेलर्स लक्ष्मीरोड पुणें व प्रसिद्ध बुकसेलर्सकडे.
**केळकर** कंपनी. नाशिक.
**श्रीराम** कंपनी. धुळें.
**भुंजे ब्रदर्स** कोरेगांव ( जि० सातारा )
**जी. के. वैद्य** वांई ( जि० सातारा. )
**भ. मा. गोसावी** फलटण (जि० सातारा)

# कन्याशिक्षक.

वर्ष १३ वें. ] डिसेंबर १९२७ व जानेवारी १९२८ [ अंक १० व ११

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व **मिस् आर. नवलकर**, बी. ए., **लेडी सुपरिन्टेन्डेन्ट** ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | या अंकाची |
| ट. हां. सह १॥ रुपया. | किंमत ८ आणे. |

१२ फेब्रुवारी १९२८.

# अनुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| १ नेक नामदार सर लेस्ली वुइल्सन ... ... | २२५–२२६ |
| २ खेडेगांवच्या मुलींची शाळा ... ... | २२७–२३२ |
| ३ देवाची दया ... ... ... ... | २३२–२३४ |
| ४ गुलाब ... ... ... ... | २३५–२३८ |
| ५ मुलांकरितां कविता ... ... ... | २३८–२४० |
| ६ कुरकुरें कोंकरूं ... ... ... | २४०–२४२ |
| ७ आधुनिक भूगोल त्याची उत्पत्ति व व्याप्ति ... | २४३–२४६ |
| ८ बुलबुल संघ ... ... ... ... | २४६–२४९ |
| ९ साध्वी मीराबाई ( कविता ) ... ... | २५०–२५४ |
| १० अफगाणिस्थान ... ... ... | २५४–२५६ |
| ११ लहान देवदूत... ... ... ... | २५७–२६१ |
| १२ प्राथमिक शाळांतील वैद्यकीय तपासणी व शारीरिक शिक्षण | २६१–२६४ |
| १३ कोलंबस ... ... ... ... | २६५–२६७ |
| १४ पुणें ते क्वेटा ... ... ... ... | २६७–२७१ |
| १५ मुलींच्या व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेचा कार्यक्रम सन १९२८... | २७२ |
| १६ सरकारी जाहिराती ... ... ... | |
| १७ गणिताचा नवीन अभ्यासक्रम. ... ... ... | १–६ |


## बक्षिसांचा निकाल.

मागील अंकांत दिलेल्या कवितेंतील कीटकांचीं नांवें लिहून पाठविणाऱ्या मुलींपैकीं खालील मुलींस बक्षिसें मिळालीं आहेत. तीं बुकें पोस्टानें रवाना होतील.

१ शकुंतला शंकर देशमुख, पिंपळनेरकर.

२ दुर्गा रंगनाथ कुळकर्णी, विंचूर.

३ सुमती मराठे, देवरूख.

33 3/21
2
153/25



नेक नामदार सर लेस्ली वुइलसन.



लेडी वुइल्सन.

# कन्याशिक्षक.

पुस्तक १३ वें. ] डिसेंबर, १९२७ व जानेवारी, १९२८. [ अंक १०, ११ वा

## नेक नामदार सर लेस्ली वुइल्सन.

आपले हल्लींचे गव्हर्नर सर लेस्ली वुइल्सन हे १९२३ सालीं हिंदुस्तानांत येऊन आपल्या जागेवर रुजू झाले. यांच्या एकंदर ५ वर्षांच्या कारकीर्दींपैकीं सुमारें ४ वर्षें झालीं आहेत. यांचें छायाचित्र सोबत जोडलें आहे.

हे इंग्लंडांत १८७६ सालीं जन्मले. लहानपणीं यांचें शिक्षण सेंटपॉल शाळेंत झालें. नंतर त्यांनीं सैन्यांत नोकरी पत्करली तेथें ते दुय्यम लेफ्टनंट, लेफ्टनंट व कॅप्टन या निरनिराळ्या हुद्यांवर चढत गेले. १८९९ ते १९०१ पर्यंत दक्षिण आफ्रिकेंत बोअर लोकांबरोबर युद्ध सुरू असतां हे त्या लढाईंत हजर होते व तींत त्यांना बऱ्याच जखमा झाल्या. ही लढाई संपल्यावर ऑस्ट्रेलियांत न्यूसाउथवेल्सच्या गव्हर्नरचे हे ए. डी. सी. बनले. नंतर १९०९ सालीं कॅप्टन सर चार्लस् स्मिथ यांच्या कन्येशीं यांचा विवाह झाला. गेल्या महायुद्धांत प्रथम ते तुर्कस्तानाविरुद्ध चाललेल्या गॅलिपोली येथील लढाईंत लढत होते, पण पुढें ब्रिटिश सरकारनें तेथें लढण्याचें बंद ठेवल्यावर यांची फ्रान्सच्या रणक्षेत्रावर नेमणूक झाली. तेथें त्या घनघोर रणसंग्रामांत त्यांना जबर जखमा झाल्या होत्या. पण त्यांतून ते मोठ्या शिकस्तीनें वांचले. त्यांनीं रणक्षेत्रांत गाजविलेल्या पराक्रमांबद्दल त्यांजला अनेक पदव्या मिळाल्या आहेत.

१९१८ सालीं युद्धसमाप्तीनंतर त्यांनीं पार्लमेंटच्या वतीनें लष्करी व आरमारी खात्यांत महत्त्वाच्या जागेवर काम केलें. पुढें १९२१ ते १९२३ च्या दरम्यान पार्लमेंटांत सभासद म्हणून यांची निवडणूक होऊन त्यांनीं युनियनिस्ट पक्षाच्या वतीनें चांगली कामगिरी बजावली. त्यांच्या आंगचें शौर्य, धैर्य, धोरण व व्यवहार कुशलता लक्षांत घेऊन त्यांची मुंबई इलाख्यासारख्या महत्त्वाच्या जागेवर गव्हर्नर म्हणून नेमणूक करण्यांत आली.

मुंबई इलाख्यांत आपल्या जागेवर रुजू झाल्यावर या प्रांतांतील लोकस्थिति समजून घेण्यास त्यांनीं सुरवात केली व त्यासाठीं अनेक भागांत प्रवास केला. लहान मोठे संस्थानिक व जहागिरदार यांच्या निमंत्रणांस मान देऊन त्यांच्या भेटी

घेतल्या व परस्परांत स्नेहभाव वृद्धिंगत केला. तसेंच निरनिराळ्या जातींत सलोखा राहावा म्हणूनही त्यांनीं प्रयत्न केला.

देशांत आबादानी नांदावी यासाठीं पाण्याचा ठिकठिकाणीं पुरवठा होणें जरूर आहे. विशेषतः हिंदुस्तानांत असे भाग बरेच आहेत. यांच्या कारकीर्दीच्या पूर्वी सुरू झालेल्या सक्कर धरणाचें काम यांनीं नेटानें सुरू ठेविलें व आपल्या कारकीर्दींत भंडारदरा येथील प्रवरेच्या धरणांतून लोकांना शेतीसाठीं पाणी देण्यास सुरुवात केली.

शेतकरी वर्गानें नवीन सुधारणांचा व आउतांचा उपयोग करण्यास शिकावें, रासायनिक खतें वापरावीं, जनावरांची योग्य काळजी घ्यावी व फावल्या वेळांत घरगुती धंद्यांत लक्ष घालून आपली सांपत्तिक स्थिति सुधारावी यासाठीं यांच्या कारकीर्दींत पुणें येथें प्रचंड असें पहिलेंच शेतकी प्रदर्शन भरलें. तें पाहाण्यास गांवोगांवचे शेतकरी लोटले होते. अशा तऱ्हेचें प्रदर्शन दरसाल भरविण्याचें ठरलें आहे,पण गत वर्षींच्या गुजराथेंतील जलप्रलयामुळें अहमदाबाद शहरीं भरणारें प्रदर्शन तहकूब ठेवण्यांत आलें. चालू सालीं तें अहमदाबाद शहरींच भरेल असें म्हणतात.

वरील दोन गोष्टींप्रमाणेंच लोक निरोगी राहाणें हें देशाच्या सुस्थितीच्या दृष्टीनें अत्यंत आवश्यक आहे. म्हणून त्यांच्या औषधपाण्याची योग्य तजवीज होणें जरूर आहे. या कामीं आपल्या गव्हर्नरसाहेबांनीं लक्ष घातलें आहे इतकेंच नाहीं, तर तें त्यांनीं आपल्यापुढें एक ध्येय म्हणून ठेविलें आहे. सन १९२७ सालीं नवीन कौंसिलच्या प्रास्ताविक भाषणांत ते म्हणाले, 'मी या इलाख्यांत आल्यापासून वैद्यकीय शिक्षण सुधारण्याचा व इस्पितळें स्थापण्याचा प्रयत्न करीत असून त्या कामीं बरेंच यश येईल असें वाटतें.' नुकतेंच यांच्या हस्तें मुंबईस एक मोठें इस्पितळ उघडण्यांत आलें. यावरून या दिशेनें त्यांचे प्रयत्न सुरू असल्याचें दिसेल.

. यांच्या कारकीर्दींत शेतकी प्रदर्शनाप्रमाणेंच अखिल मुंबई इलाख्यांतील मुलींचें हातकामाचें पहिलेंच प्रचंड प्रदर्शन भरलें. तसेंच त्यांनीं नवीन कॉलेजें व शाळा यांच्या कोनशिला बसवून त्यांबद्दल सहानुभूति व्यक्त केली. बालवीर संघाच्या चळवळींत लक्ष घातलें, व्यायामविषयक संस्थांना व संघांना उत्तेजन दिलें व मदत केली; गुजराथेंतील जलप्रलयासारख्या आपत्तींत लोकांच्या हाकेस ओ देऊन त्यांनीं सढळ हातानें सरकारी मदत दिली, खासगी प्रयत्नांस उत्तेजन दिलें व आपली सहानुभूति दाखविली.

लेडी वुइल्सन या गव्हर्नरसाहेबांना योग्य पत्नी लाभल्या आहेत. त्यांच्यापासून त्यांना हरएक प्रकारच्या जबाबदारीच्या कामांत मदत होते. या इलाख्यांतील स्त्रीवर्गाला सर्व प्रकारें मदत करण्यास त्या फार उत्सुक असतात.

अशा प्रकारें लोकांच्या वाढत्या आकांक्षांना प्रोत्साहन देऊन उभयतांनीं आपणांस लोकादरास पात्र केलें आहे.

# खेडेगांवच्या मुलींची शाळा.

## लेखांक १ ला.

ले. महेश्वर शिवराम निमकर.

पुण्यांतील हुजूरपागा व कन्याशाळा वगैरे मुलींचीं हायस्कुलें, म्युनिसिपालिटीनें मुलींकरितां चालविलेल्या प्राथमिक शाळा, सेवासदन व मिशनरी संस्था पाहिल्या तर स्त्रीशिक्षणांत आम्ही फार प्रगति करीत आहोंत अशी कल्पना होते. परंतु पुणें अगर मुंबई सारखीं शहरें सोडलीं आणि अवाढव्य पसरलेल्या बाहेरील भागांमध्यें गेलों म्हणजे आपणांला काय दिसेल ? सुधारणेच्या कोणत्या पायरीवर आपणांला उभें राहावें लागेल ? अगदीं खालीं आपण उभे असून सुधारणारूपी शिडी तरी आमच्या हाताला लागली आहे किंवा नाहीं हेंहीं आपणांला निश्चितपणें सांगतां येणार नाहीं !

कुटुंबांत पाहावें किंवा खानेसुमारीचे आंकडे पाहावे तर स्त्रियांची संख्या पुरुषांच्या बरोबरीनें असलेली दिसते. परंतु मुलींच्या शाळांची संख्या १०:१ ह्या प्रमाणांतही नाहीं. जिल्ह्यांत ५०० प्राथमिक शाळा असल्या तर त्यांपैकीं ५० ही मुलींच्या असण्याचा संभव नाहीं. ही परिस्थिति बदलेल अशीही तूर्त आशा नाहीं. कारण आमचा समाजच या बाबतींत थोडा बेफिकीर आहे. हल्लीं समाजसुधारणेच्या ज्या निरनिराळ्या चळवळी चालल्या आहेत, त्यांत स्त्रीशिक्षणाला प्राधान्य मिळावें तसें मिळालें नाहीं. खरें म्हटलें असतां स्त्रीशिक्षणाला प्राधान्य मिळाल्यानेंच सामाजिक सुधारणा लवकर होणार आहे. समाजाच्या सुधारणेचीं कौटुंबिक आरोग्य व मुलांचें शीलसंवर्धन हीं दोन मुख्य अंगें आहेत.

अजाण स्त्रीपेक्षां सुजाण स्त्रीला घरामध्यें भरपूर हवा खेळती ठेवण्याची जरूरी, उन्हामध्यें कपडे तापत ठेवल्यापासून होणारे फायदे, सांथींना प्रतिबंध करणाऱ्या स्वल्प आयासाच्या गोष्टी, बारीक सारीक दुखण्यांवर लागणाऱ्या औषधांची माहिती, शरिरांतील रक्ताभिसरण, अन्नपचन, श्वासोच्छ्वास वगैरे क्रियांचे नियम, दूधदुभत्याची माहिती वगैरेसंबंधीं चांगलें ज्ञान असतें. म्हणून आपल्या घरांतील माणसांचें संगोपन सुशिक्षित स्त्री सुखानें करूं शकते.

मुलाचें शील तर सर्वतोपरी आईच्या शिक्षणावरच अवलंबून असतें. शंभर शिक्षकांना एका चांगल्या आईची बरोबरी करतां येणार नाहीं, असें एका इंग्रजी लेखकानें म्हटलें आहे. आईचें शिक्षण श्रद्धायुक्त असून तीं मुलांच्या अंतःकरणाला वळण लावते. मुलांमध्यें चांगल्या भावना उत्पन्न करून ती त्यांना सद्गुणी करते. जगामधील सर्व महात्मे आपण पाहिले तर त्यांचें माहात्म्य त्यांच्या बौद्धिक शक्तीपेक्षां त्यांच्या थोर अंतःकरणांत असलेलें दिसून येईल व हें थोर अंतःकरण आईच्या उदात्त शिक्षणाचें फळ आहे असें आढळेल.

आईचें हें महत्त्व ओळखूनच पुणें म्युनिसिपालिटींत सात वर्षांपूर्वी मुलांना सक्तीचें शिक्षण अगोदर कीं मुलींना अगोदर हा वाद चालला असतां मुलींनाच अगोदर सक्ति करा, म्हणजे पुढील पिढींत मुलांना त्यांच्या साक्षर आया आपण होऊनच शिक्षण देतील असें प्रतिपादन करणारा एक जोरदार पक्ष निघाला होता. परंतु पुढें या बाबतींत जास्त जागृति करावयास पाहिजे होती ती झाली नाहीं, म्हणूनच गेल्या सात वर्षांत मुलांच्या शिक्षणापेक्षां मुलींचें शिक्षण जास्त रेंगाळत राहिलें आहे असें कोणालाही कष्टानें कबूल करावें लागेल.

खेडेगांवांतील मुलींच्या शाळांची चांगली वाढ होत नाहीं याचें मुख्य कारण पालकांचा बेफिकीरपणा हें होय. साधारणतः मोठ्या गांवांमध्येंच मुलींचा वर्ग अगर शाळा असते. शाळेवर मुलींच्या संख्येप्रमाणें एक किंवा अधिक शिक्षकिणी असतात. मुलींच्या मानानें म्हणजे त्यांच्या हजेरीच्या मानानें शिक्षकिणींची संख्या कमी नसते. परंतु ती वर्गाच्या मानानें फार कमी असते. म्हणजे बऱ्याच शिक्षकिणींना एकाच वेळेला अनेक इयत्ता शिकवाव्या लागतात. शिक्षकिणींच्या मार्गांतील मोठी अडचण हीच आहे. यामुळें त्यांच्या मानसिक शक्तीला विशेष ताण बसतो. सर्व वर्ग एकाच वेळेला गुंतवून ठेवण्याचें शास्त्र त्यांना इन्स्पेक्टर लोक लवकर माहीत करून देतात. परंतु तेवढ्यानें काम होत नाहीं. एकाच वेळेला अनेक वर्ग शिकविण्याची कला हस्तगत झाली पाहिजे. पण ती बऱ्याचजणींना होत नाहीं. कांहीं वर्ग रिकामे राहातात. त्या वर्गांतील मुली गडबड करतात. ती कांहींना असह्य होते आणि मस्तकावर तिचा परिणाम झाला म्हणजे एकाद्या वर्गाचें काम व्हावें तेंही होत नाहीं.

एकाच वेळेला अनेक वर्ग शिकवावे लागतात ही खेडेगांवांतील शिक्षकिणींच्या मार्गांतील मुख्य अडचण सांगितली. हिला तोड म्हणून कित्येक लोक दुबार

पद्धतीची योजना सुचवितील. चार वर्ग सहा तास शाळेमध्यें रखडून बसावयाचे व तुरळक तुरळक मिळणाऱ्या प्रत्येक वर्गाच्या शिक्षणाची बेरीज केली तर ती दोन तासही होत नाहीं. यापेक्षां दोन वर्ग पहिले तीन तास बोलवावयाचे, व दुसरे दोन वर्ग नंतरच्या तीन तासांमध्यें शिकवावयाचे ही दुबार पद्धति बरी होय. या पद्धतीमुळें मुलींना थोडक्या वेळांत शिक्षण मिळून त्यांना घरगुती कामाला फुरसत मिळते व शिक्षकिणीला चार वर्गांच्या ऐवजीं दोन वर्ग शिकविणें सोपें जातें. शिवाय शाळेला जागा थोडी असली तरी चालते. परंतु लोकांमध्यें या पद्धतीचा बोलबाला विशेष नाहीं; कारण त्यांना थोड्या वेळांत पूर्वीइतकें शिक्षण देतां येईल ही गोष्ट कबूल नाहीं. शिवाय तज्ज्ञ लोकांचा सुद्धां या पद्धतीला थोडासा विरोध आहेच. त्यांच्या मतें मुलींना व्यवसाय कसा करावा हें सांगण्यापेक्षां तो करवून घेणें हेंच शिक्षणाचें मुख्य अंग आहे. अर्थात् मुलींकडून अभ्यास करवून घेणयस जास्त वेळ लागणार. दुबार पद्धतीमुळें आधुनिक शिक्षणवाल्यांनीं केलेल्या शोधांना जलसमाधि मिळणार आहे, असें विधान एका तज्ज्ञानें केलें होतें. यांत थोडी अतिशयोक्ति असेल, परंतु तें थोडेंसें सार्थ आहे हें खरें. दुबार पद्धतीच्या मार्गांतील आणखी मोठी अडचण म्हणजे हजेरीची. थोड्या वेळांत शिक्षण द्यायचें तर तेवढा वेळ मुली हजर पाहिजेत. परंतु तास अर्धा तास मुलींना यायलाच उशीर झाला तर बाईनीं काय करावें ?

गैरहजेरी व अनियमित हजेरी हे दोन जबर राक्षस खेडेगांवच्या शाळेबाहेर आपला भयंकर जबडा पसरून उभे असतात; आणि त्यांच्या भक्ष्यस्थानीं शिक्षकिणींची किती तरी मेहनत पडून व्यर्थ जाते. मुलींच्या शाळेची वार्षिक सरासरी हजेरी शेंकडा ५० असत. म्हणजे वर्गांत मुली १८ असल्या तर साधारणपणें ९ हजर असणार आणि त्यांपैकीं ४।५ च फार तर रोजच्या रोज नियमितपणें हजर राहाणाऱ्या असणार. अशा वर्गाला ठराविक पाठ देणार कसा ? वर्गांतील शें. ७५ मुलींचा मागील कोणताना कोणता तरी दुवा तुटलेला असणार. ते दुवे जसविण्यांतच वेळ गेल्यानें पुढील प्रगति थांबून राहाते.

खेडेगांवांतील पांढरपेशे व कांहीं शेतकरी लोक एवढेच काय ते आपल्या मुली शाळेंत घालतात. हे लोकसुद्धां जितकें आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देतात तितकें मुलींच्या शिक्षणाकडे देत नाहींत. मुलींच्या शिक्षणाला पूर्वीप्रमाणें ते आतां विरोध करीत नाहींत इतकेंच, याला कारण त्यांच्या स्त्रीशिक्षणासंबंधीच्या गैरसमजुतीचें निरसन होत आहे

हें होय. बऱ्याच शिक्षकिणी व इतर शिकलेल्या स्त्रियांचें चांगलें वर्तन खेडेगांवांतील लोकांनाही दिसून येऊं लागलें आहे, यामुळें शिक्षणामुळें—निदान प्राथमिक शिक्षणामुळें तरी मुली विघडत नाहींत अशी त्यांची खातरी होऊं लागली आहे. मग मुलगे व मुली यांत ते फरक कां करतात ? याचें कारण शिक्षणाची व्यापक दृष्टि त्यांना नसते. शिवाय हे लोक मोठे स्वार्थी असतात. मुलगा ठोंब्या झाला तर त्याला आपणांला जन्मभर पोसावा लागेल आणि तोच शिकला सवरला तर त्याच्याकडून आपल्या प्रपंचाला उलटी मदत होईल, या भावनेनें ते मुलांच्या शिक्षणाची काळजी घेतात. अलीकडे मुलीच्या लग्नाच्या वेळीं ती शिकलेली नसली तर थोडें नडतें; पण तीही वेळ कांहीं थोड्या लटपटी करून निभावून नेतां येते. मुलीला वाचतां येत असलें म्हणजे दडपून इतक्या इयत्ता झाल्या आहेत म्हणून सांगतां येतें; नाहीं तर मोठा आव आणून आमच्या घरांत हीं सोंगें ढोंगें नाहींत, आम्ही मुलींना शाळेंत घालण्याच्या विरुद्ध आहोंत, मुलीला दहा माणसांचा स्वयंपाक करितां आला म्हणजे झालें, हेंच आमचें शिक्षण; असा कांगावा करतां येतो. इतरांपेक्षां या राजेश्रींनीं गृहशिक्षण देण्याची तरी जास्त काळजी घेतलेली असते असेंही नाहीं.

एवंच स्त्रीशिक्षणाला या खेडेगांवांतील लोकांची मदत म्हणजे एवढीच समजावयाची कीं त्यांचा विरोध नसतो. मुलापेक्षां मुलीचे अभ्यास चांगले दिसले म्हणजे जगाच्या राहाटीमध्यें कांहीं तरी बिघडलें आहे असें वाटल्यामुळें कीं काय परमेश्वराच्या विचित्र बेफिकीरपणाबद्दल ते सखेदाश्चर्य प्रकट करितात. तरी पण आपल्या मुलीचें थोडें कौतुक करण्यास ते कमी करीत नाहींत. आई काळजी घेणारी असली तर मुलींचें शाळेंत येणें वेळेवर घडतें. परंतु मुलीची खरी मदत आईलाच घरच्या कामांत व मुलें संभाळण्याच्या कामीं होत असते; म्हणून त्यांच्याकडून मुली शाळेंत पाठविण्याच्या बावतींत हेळसांड होते. शिकलेली बाई म्हणजे नुसती लहानपणीं शाळेंत गेलेली नव्हे, तर चार पांच पुस्तकें झालेली असेल तर ती मात्र स्वतः आंग मोडून काम करते त्यामुळें मुलींचा शाळेचा वेळ फुकट जात नाहीं. पण अशा आयांची संख्या मोठाल्या गांवांतूनही अद्यापि बोटांनीं मोजण्याइतकीच असते.

विद्येंत मागासले लोक मुलगे शिकले तर त्यांना नोकऱ्या मिळतील, आपल्यासारखा त्यांना नांगर हाकावा लागणार नाहीं, असल्या विचित्र कल्पनेनें पण थोड्या स्वार्थबुद्धीनें मुलांना शाळेंत पाठवूं लागले आहेत. अर्थात् मग मुलींना

शाळेंत पाठविण्याचें त्यांनां कांहीं कारणच राहिलें नाहीं. कारण मुली शिकून फार तर स्त्री शिक्षक बनतील, मामलेदार अगर मुनसफ थोड्याच बनणार आहेत! पाटील अगर पंच मंडळीच्या तगाद्यामुळें या लोकांना कधीं मुलींचीं नांवें शाळेंत घालणें भाग पडतें; परंतु य पैकीं एकादीलाच शिक्षणाची आवड लागते; अगर बाईचा ळळा लागतो आणि त्यामुळें ती नित्य नियमितपणें हजर राहाते: परंतु बाकीच्या मुली म्हणजे निव्वळ खोगीरभरती. हजेरीबुकामध्यें त्यांची नांवें लिहिण्याची व्यर्थ तसदी मात्र घ्यावी लागते. अनेक शाळांमधून पटावरील सरासरी व हजेरीची सरासरी यांमध्यें फार अंतर दिसून येतें, याचें कारण ही खोगीरभरतीच होय!

मुलींच्या शाळेंत मुली बोलाविण्याकरितां एक बाई नेमलेली असते. ह्या बाईचा वेळ इतर कामांत जास्त जात असतो आणि मुली बोलाविण्याचें काम त्या मानानें त्यांच्याकडून कमी होऊं लागतें म्हणून कांहीं ठिकाणीं या बाईकडे मुलांच्या शाळेचें झाडसारवणही देण्यांत येतें. मुलांची शाळा साधारणपणें मोठी असते आणि ब-याच इमारती गैरसोयीच्या व एकमेकांपासून तुटक असतात. एकाच बाईवर दोन अधिकाऱ्यांची हुकमत चालते. ही द्विदल राज्यपद्धति मोठी मनोरंजक झाली आहे. हिच्यामुळें हेडमास्तर व हेडमास्तरीण यांच्यामध्यें नेहमीं तंटा चालत असतो. हेडमास्तरांना प्रकरणें चांगली करतां येतात. प्रत्यक्ष शिकविण्याचें काम अल्प असल्यामुळें अगर मुलींच नसल्यामुळें रिकामाच वेळ पुष्कळ, हातांखालीं मदतनीस फार आणि अधिकाऱ्यांशीं थोंड वजन, इतक्या गोष्टी अनुकूल असल्यामुळें हेडमास्तरांचें पारडें थोडें जडच होतें. थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे मुली बोलावणारी बाई हें नांव असलें तरी शेणपोतेरें घालण्यापलीकडे या बाईला फारसें काम नसतें आणि याबद्दल कोणी हळहळही करूं नये. या बायांचा मुली बोलावण्याच्या कामीं विशेष उपयोग होतो असें कोणाचेंच मत नाहीं. मग यापेक्षां तिच्याकडून दुसरें हमालीचें काम करून घेतात हें एक प्रकारें बरेंच म्हटलें पाहिजे.

हजेरी वाढविण्याच्या कामीं खरा उपयोग शिक्षकिणींचा होतो. मुलींच्या आयांशीं दळणवळण ठेवून त्यांच्यावर आपल्या वर्तनानें छाप पाडून मुलींना शाळेंत धाडण्यास त्यांना लावतां येईल. या कामीं मोठी अडचण येते ती ही कीं, शिक्षकिणींचा मुलींच्या घरीं जाण्याचा प्रघात नाहीं. असें करणें हें शिष्टाचाराला सोडून आहे असें कित्येकांचें म्हणणें पडतें. पुरुष शिक्षकांनीं अद्यापपर्यंत हजेरी वाढविण्याचे प्रयत्न केले ते पालकांना भेटूनच. यान्या इतका दुसरा हजेरी

वाढविण्याचा अद्यापि यशस्वी मार्ग सांपडला नाहीं. आणि हाच मार्ग जर स्त्रीशिक्षकिणींना मोकळा होत नसेल तर स्त्रीशिक्षणाला अनुकूल परिस्थिति येण्याची इतक्यांत आशा नकोच. सर्रास वाटेल त्या पालकांची ओळख शिक्षकिणीनें करावी असें कोणाचें म्हणणें नाहीं. थोडा तारतम्य भाव पाहिजे. परंतु शिक्षकिणीनें गांवांतील सर्व भावी स्त्रियांच्या सुधारणेकरितां सरकारनें अगर परमेश्वरानें नेमलेली मिशनरी म्हणून आपली जबाबदारी ओळखली पाहिजे व गांवांतील झाडून सर्व मुली आपल्या कक्षेंत आणण्याचा सतत प्रयत्न करीत राहिलें पाहिजे.

खेडेगांवची परिस्थितिही झपाट्यानें बदलत आहे. पूर्वीप्रमाणें शिकली सवरलेली, पायांत जोडा व हातांत छत्री घेऊन चालणारी बाई पाहून लोकांना आश्चर्य वाटेनासें झालें आहे. आतां अशा बायांची हेटाळणीही ते करीत नाहींत. मात्र शिकूनसवरून सुद्धां बाईचें वर्तन साधें असेल तर प्रसंगविशेषीं ते तिची प्रशंसा करितात. म्हणूनच साध्या राहाणीच्या व सहनशील स्वभावाच्या बायांकडून खेडेगांवांत जास्त कामगिरी होण्याचा संभव आहे. मात्र या कामगिरीचें क्षेत्र व्यापक केलें पाहिजे. जे वर्ग मुलींच्या शाळेचा फायदा करून घेण्यास तयार नाहींत अशा वर्गांकडेच म्हणजे अस्पृश्य व विद्येंत मागसलेले मराठे, मुसलमान वगैरे लोकांमधून हें काम करण्याचें मनावर घेतलें पाहिजे.

---

# देवाची दया.

पाऊस पडला

जानू पाटलानें शेतांत बाजरी पेरली.

जानू पाटलानें शेतांत मूग पेरले.

जानू पाटलानें शेतांत धणे पेरले.

कांहीं दिवसांनीं शेतांत बाजरी उगवली.

शेतांत मूग उगवले.

शेतांत धणेही उगवले

सां.........

जानूचें शेत हिरवेंगार दिसूं लागलें.
मग जानूला आनंद झाला.
पण पुढें पाऊस पडला नाहीं.
आठ दिवस गेले, तरी पाऊस पडला नाहीं,
दहा दिवस गेले, तरी पाऊस पडला नाहीं.
वीस दिवस गेले, तरी पाऊस पडला नाहीं.
मग बाजरीचें रोप वाळूं लागलें.
मुगाचें रोप वाळूं लागलें.
धण्याचें रोप वाळूं लागलें.
मग जानूला फार वाईट वाटलें.
जानू म्हणाला, आतां शेतांत बाजरी पिकणार नाहीं.
मूगही पिकणार नाहींत.
धणेही पिकणार नाहींत.
मग मी काय खाऊं?
माझीं मुलें काय खातील?
माझीं गुरें काय खातील?
देवा, तुला दया येऊं दे,
तूं पाऊस लवकर पाड.
आभाळांत एक चिमुकला ढग होता.
चिमुकल्या ढगानें जानूचें बोलणें ऐकलें.
चिमुकला ढग बोलला
'मी जानूचे शेतावर पाऊस पाडीन'
शेजारीं दुसरा ढग होता.

तो बोलला, 'मी जानूचे शेतावर पाऊस पाडीन'
पलीकडे तिसरा ढग होता.
तो बोलला, 'मी जानूचे शेतावर पाऊस पाडीन'
पहिला ढग पाऊस पाडूं लागला.
दुसरा ढग पाऊस पाडूं लागला.
तिसरा ढग पाऊस पाडूं लागला.
पलीकडचे ढग पाऊस पाडूं लागले.
धो धो धो पाऊस पडूं लागला.
मग जानूची बाजरी चांगली पिकली.
जानूचा मूगही चांगला पिकला.
जानूचे धणेही चांगले पिकले.
जानूला फार आनंद झाला.
जानूचे बायकोला फार आनंद झाला.
जानूचे मुलांना फार आनंद झाला.
जानूचे जनावरांनाही फार आनंद झाला.
जानू बोलला, देव किती दयाळू आहे,

साकी.

देव दयाळू भारी आहे सकलांना तो पाळी
पाउस पाडुनि शेत पिकवितो सकलांना सांभाळी. ॥

# गुलाब.

एक लहान मुलगी होती.
तिचें नांव गुलाब.
गुलाब गुलाबी पोलका घाली.
ती गुलाबी परकर नेसे.
आई गुलाबला म्हणाली,
'गुलाब, हा घे लाडूंचा डबा.
रानाचे पलीकडे मावशीचें घर आहे.
मावशीचे घरीं जा.
मावशीला लाडू दे.
मावशी आजारी आहे.
मावशीचे घरीं लवकर जा.'
आईनें गुलाबला लाडूंचा डबा दिला.
आई बोलली, 'गुलाब रानांतून नीट जा.
वाटेनें गमूं नको.
कोणाशीं बोलूं नको.
रानांत फुलें तोडूं नको.
फुलांचा गजरा करूं नको.
फार वेळ घालवूं नको'.
गुलाब रानांतून नीट चालली.
ती वाटेंत गमली नाहीं.
ती कोणाशीं बोलली नाहीं.

तिनें फुलें तोडलीं नाहींत.

तिनें फुलांचा गजरा केला नाहीं.

तिनें वेळ घालविला नाहीं.

मग तिला वाटेंत लांडगा भेटला.

लांडगा बोलला, 'गुलाब तूं किती सुंदर आहेस.

तुझा परकर किती सुंदर आहे.

तुझा पोलका किती सुंदर आहे.

तुझे केस कसे काळे आहेत.

हीं फुलें पहा कशीं चांगलीं आहेत.

हीं फुलें तोड.

सुंदर गजरा कर.

व आपल्या केसांत घाल.'

गुलाब फुलें तोडूं लागली.

गुलाब गजरा करूं लागली.

गुलाब वेळ गमवूं लागली.

लांडगा मावशीचे घरीं गेला व हळूच बोलला,

'मावशी मावशी' मी गुलाब आलें आहें.

मावशी बोलली, 'मी आजारी आहें.

मला उठवत नाहीं.

मला दार उघडवत नाहीं.

तूं खिडकींतून ये.'

लांडगा खिडकींतून आंत गेला.

त्यानें मावशीला खाऊन टाकलें.

आपण तिचें पांघरूण घेतलें
व तिचे बाजेवर निजला.
गुलाब दारीं आली.
गुलाब बोलली, 'मावशी, मी गुलाब आलें आहें'.
लांडगा बोलला, 'गुलाब मी आजारी आहें.
मला उठवत नाहीं.
मला दार उघडवत नाहीं.
तूं खिडकींतून ये.'
गुलाब खिडकींतून आंत आली.
गुलाब बोलली, 'मावशी, तुझे कान मोठे कां झाले ?'
लांडगा बोलला 'तुझें बोलणें ऐकायाला.'
गुलाब बोलली, 'मावशी तुझे डोळे मोठे कां झाले ?'
लांडगा बोलला, 'तुझा पोशाक व गजरा पाहावयाला.'
गुलाब बोलली, 'मावशी, तुझे दांत मोठे कां झाले ?'
लांडगा बोलला, 'तुला खायाला.'
लांडग्यानें पटकन उडी मारली.
फाडकन एक बंदुक वाजली.
खिडकींतून एक गोळी सूं सूं करीत आली.
लांडगा धाडकन मरून पडला.
गुलाबचा बाप आंत आला.
गुलाबनें बापाला मिठी मारली.
बाप म्हणाला, 'गुलाब, तूं आईची आज्ञा मोडलीस
तूं वाटेनें गमलीस.

तूं लांडग्याशीं बोललीस.

तूं फुलें गोळा केलींस.

तूं गजरा करीत बसलीस.

म्हणून लांडग्यानें तुला फसविलें.

लांडग्यानें मावशीला खाऊन टाकलें.'

गुलाब रडत रडत म्हणाली,

'आतां कधीं मी आईची आज्ञा मोडणार नाहीं,

आईचें बोलणें मी ऐकेन.

आई सांगेल तशी मीं वागेन.'

मग गुलाब व तिचा बाप दोघें घरीं गेलीं.

---

## मुलांकरितां कविता.

### दिंडी.

#### चिऊताईचीं मुलें.

गवत पानें जमवोनि चिऊताई
उंच वृक्षीं घर बांधुनियां राही
त्यांत होतीं तीं तिचीं तीन बाळें
लहान भारी त्यां पंख न ते आले १

नये उडण्याला चालतां न येई
अंग नाजुक चिमुकलें किती पाही
माय त्यांची काळजी नित्य घेई
दूर त्यांना सोडोनि कधिं न जाई २

भक्ष्य आणी मउ खावयास त्यांना
चोंचिनें तें भरवीत ती पिलांना
मधुर चिव चिव ते शब्द त्या पिलांचे
ऐकुनीयां मन मुदित होय तीचें ३

दोन महिने तेव्हांच निघुन गेले
बालकांना ते पंख रम्य आले
घराबाहिर येउनी तरुवरी तीं
खेळ खेळति मौजेंत किती गाती ४

खेळतांना तीं एकदिनीं बाळें
एक बालक तें उंच उडुनि गेलें
वृक्ष शिखरावरि उंच बसुनि पाही
मौज सारी आनंद तया होई ५

'भाउ ताई या, उडुनि बसा एथें
रम्य दिसतें हें रान दूर मातें
पहा झाडी ही शोभते मजेची
नदी वाहे ही मौज पहा तीची' ६

तिथें पाहति त्या उंच तरुवरोनी
दूर रानाची मौज ती बघोनी
फार झाला आनंद बालकांला
निघति बाळें त्या रानिं जावयाला ७

चिऊताई इतुक्यांत तिथें आली
बालकें तीं तिजवळ तदा गेलीं
'थोर आतां जाहलों किती आई
उंच उडण्याला अम्हां छान येई ८

दूर जाऊं रानांत सुखें राहूं
फळें रानांतिल गोड गोड खाऊं.
चैन नाहीं पडणार अम्हां एथें
म्हणुनि जातों राहण्या दूर माते ' ९

असें बोलोनी उडुनि पिलें गेलीं
माय चित्तीं ती खिन्न फार झाली
तिला करमेना गळा भरुनि येई
स्वस्थ तरुवरि बैसली चिऊताई १०

तिचा शेजारी कावळा बघे तें
जवळ येउनियां बोलला तियेतें
' काळजी तूं सोडोनि सर्व देई
देव राखिल बालकें तुझी बाई, ' ११

---

## कुरकुरें कोंकरूं.

फार फार प्राचीन काळीं देवता, माणसें, व जनावरें एकत्र राहात असत; एकमेकांशीं गप्पा गोष्टी करीत असत. तेव्हां एक कोंकरूं एका खेड्यांत राहात होतें. त्याची एक सुंदर बाग होती. त्या बागेंत त्यानें मुळे, काकड्या, कांदे, वांगीं, बटाटे लावले होते. जाई, जुई, शेवंती वगैरे फुलझाडें होतीं. अशी ती बाग मोठी सुंदर होती. आपल्या त्या बागेंत तें कोंकरूं दिवसभर मेहनत करीत असे. कधीं तें गवत खुरपी, वाफे करी, झाडांना पाणी घाली, कुंपण करी, अशीं निरनिराळीं कामें नेहमीं करीत असे. त्याच्या बागेंतील फळांसारखीं फळें व भाज्यांसारख्या भाज्या कोठें मिळत नसत, अशी जगभर कीर्ति झाली होती. एके दिवशीं तें कोंकरूं उन्हांत काम करीत असतांना खूप त्रासलें व कंटाळून म्हणालें, नको ही बाग व नको ही कटकट ! ह्याच्यापेक्षां एकादा सोपा धंदा करून पोट भरूं या. असें म्हणून तें कोंकरूं आपलें घर व गांव सोडून निघालें. जातां जातां त्याला एक अरण्य लागलें. त्या अरण्यांत एक झोपडी होती. झाडी खूप दाट

१५३४१

होती. तें कोंकरूं झाडींतून जात असतां त्याला एक अतिशय सुंदर गाणें ऐकूं आलें. कोंकराला गाण्याची मोठी चटक होती. एवढ्या रानांत कोण गात आहे हें पाहूं या, म्हणून तें त्या झोपडीजवळ गेलें, तों एक मांजर हातांत फिडल घेऊन वाजवीत बसलें आहे, असें दिसलें. तें पाहातांच कोंकराला वाटलें, हा धंदा बरा सोपा आहे. हें आपण वाजवायाला तेव्हांच शिकूं, व त्यावर पोटाला पैसे मिळतील. असा विचार करून तें मांजराला म्हणालें, मनूताई, नमस्कार. मला एवढें वाजवावयाला शिकवितां का? तसें मनूताई म्हणाली, ठीक आहे. हा गज हातांत घेऊन तारेवरून फिरव, व सूर काढ. कोंकरानें गज घेतला व सुरवात केली, तेव्हां त्यांतून ट्वांय् ट्वांय् असा विचित्रच सूर निघूं लागला. केव्हां कर्कश तर केव्हां रडका, तर केव्हां घोगरा असे कांहीं तरी आवाज निघूं लागले. गोड गाणें कांहीं गातां येईना! तेव्हां कोंकरू म्हणालें, हें असं कसं? कांहीं गाणं नाहीं. त्यावर मनूताई म्हणाली, हें गाणं नाहींच. पण बाबा, बरेच दिवस मेहनत केल्याशिवाय यायचं नाहीं. त्याला मेहनत केली पाहिजे. बरेच दिवस शिकलं पाहिजे. एका दिवसांत यायचं नाहीं. तेव्हां कोंकरूं म्हणालें, छे बोवा. हें नाहीं आपल्या कामाचें. माझा हात तर आतांच दुखून आला. काम तर यापेक्षां सोपं पाहिजे, व पैसे तर पोटाला पुष्कळ मिळाले पाहिजेत. यापेक्षां माझी बाग काय वाईट? असें म्हणून तें पुढें निघालें. जातां जातां त्या कोंकराला उसाचें गुऱ्हाळ लागलें. तेथें एक मोत्या कुत्रा रस कढईंत घालून त्याचा गूळ करीत होता. कढईच्या खालीं जाळ लाविला होता, व मोत्या वर आलेली मळी वरचेवर काढीत होता. तें पाहातांच कोंकराला आनंद झाला. तें म्हणालें, हा धंदा सोपा. येथें ऊस खाऊं, रस पिऊं, गोड गोड गूळ खाऊं व गूळ विकून पुष्कळ पैसे मिळतील. असा विचार करून तें मोत्याला म्हणालें, मित्रा, मला हा धंदा शिकव. तुझे माझ्यावर उपकार होतील. त्यावर मोत्या म्हणाला, ठीक आहे. ये. येथें उभा राहा व वर आलेली मळी सारखी काढीत राहा. तसें कोंकरूं जाऊन उभें राहिलें, व त्यानें मळी काढण्यास सुरवात केली. थोड्याच वेळांत त्याचें आंग विस्तवानें तापलें. ऊन वाफांचे अंगाला चटके बसावयास लागले, व मळी काढायचें संपेना. कोंकरूं तर दमलें, व विसावा घेण्यासाठीं खालीं बसलें; तेव्हां मोत्या म्हणाला, हें रे काय? मध्यें असं बसायचं नाहीं; नाहीं तर सगळा गूळ बिघडेल. विसावा न घेतां शेवटपर्यंत असें काम केलें पाहिजे. असें करून कसें चालेल? तेव्हां कोंकरूं म्हणालें, छे बोवा. ही

दगदग आपल्यां हातून व्हायची नाहीं. या विस्तवाजवळ माझा जीव नकोसा झाला आहे. मला वाटलें हा धंदा सोपा. यापेक्षां माझ्या बागेंतलें काम किंवा फिडल वाजविणें काय वाईट ? नमस्कार, मी जातों. असें बोलून कोंकरूं निघालें. जातां जातां तें डोंगराजवळ आलें, तेथें खूप झाडी होती. तेथें त्या कोंकराला एक भिल्ल भेटला. तो भिल्ल एका झाडावरचें मधमाशांचें मोहोळ काढीत होता. तें पाहातांच कोंकराला आनंद झाला. तें मनांत म्हणालें, वा ! हा धंदा मात्र सर्वांत उत्तम. गोड गोड मध खायला मिळेल, व राहिलेला मध विकून बरेच पैसे मिळतील व काम तर चुटकीसरसें. कांहीं दगदग नाहीं. असा विचार करून कोंकरूं त्या भिल्लाला म्हणालें, नमस्कार, मित्रा, मला तुझा हा धंदा शिकव. तसा भिल्ल म्हणाला, छान झालें. मलाही कोणाची तरी मदत पाहिजेच होती. ये इकडे असा. हा घोंगडीचा बुरखा घे, आणि मी सांगतों तसें मोहोळ काढ. कोंकरानें बुरखा घेतला. तें झाडावर चढलें, आणि मोहोळ काढायला लागलें. मोहोळाला हात लावतांच हजारों माशा उठल्या. कित्येक घोंगडीच्या आंत शिरल्या, व त्यां कोंकराचे हात, पाय, पाठ, पोट, कान, नाक, डोळे यांना कडकडा चावायला लागल्या. तेव्हां कोंकराचा जीव घाबरा झाला. तें ओरडायला लागलें. ते म्हणालें, मित्रा, माझा तर प्राण जायची वेळ आली. माशा कांहीं सोडीत नाहींत, व माझा जीव कांहीं राहात नाहीं. तेव्हां तो भिल्ल म्हणाला, वा ! अरे माशा ह्या डसायच्याच. तें सहन केलेंच पाहिजे. नाहींतर मध कोठला मिळणार ? ज्याला मोहोळ काढायचें त्यानें एवढें सहन केलेंच पाहिजे. तसें कोंकरूं म्हणालें, छे बोबा, हें नाहीं आपल्या कामाचें. कोणताही धंदा घेतला तरी त्यांत कांहींना कांहीं दुःख आहेच, असें दिसतें. फिडल वाजवावें तर हात दुखतो. गूळ करावा तर आंग भाजतें, व मध काढावा तर या माशा मला खायला उठल्यात !! मग यापेक्षां माझ्या बागेंतलें काम काय वाईट ? मग तें तरी मीं कां सोडावें ? मी आतां आपल्या बागेंतच जातों. असें म्हणून तें कोंकरूं आपल्या गांवीं आलें, व आपल्या बागेंत काम करावयास लागलें. काम करितांना तें आनंदानें गात असे. मुळे, काकड्या, कांदे, वांगीं, बटाटे, संत्रीं, मोसंबीं, अंजीर, द्राक्षें, जाई, जुई, शेवंती, गुलाब वगैरे निरनिराळ्या जिनसा त्यानें बागेंत लाविल्या. त्याला खूप पैसे मिळूं लागले. त्याच्या बागेंतल्या फळांना बाजारांत चौपट किंमत येऊं लागली व प्रदर्शनांत त्याला पहिल्या नंबरचें बक्षीस मिळालें. सणावाराचे दिवशीं मनी मांजर, मोत्या कुत्रा व तो भिल्ल हे त्याच्या येथें पाहुणे म्हणून येत व सर्वजण आनंदांत वेळ घालवीत. अशा रीतीनें त्या कोंकराचे राहिलेले दिवस त्या बागेंत सुखानें गेले.

# आधुनिक भूगोल. त्याची उत्पत्ति व व्याप्ति.

( मागील अंकावरून )

मानवी सुधारणेची वाढ व प्रगति ह्या दोन्ही गोष्टी भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात. विशेषतः पृथ्वीचें कवच फोडणाऱ्या, व त्यांत निरनिराळे फरक घडवून आणणाऱ्या, तसेंच भूपृष्ठावरील वनस्पतींची विलक्षण वाढ करण्यास मदत करणाऱ्या हवामानावर जास्त अवलंबून असतात. भौगोलिक परिस्थितीची अनुकूलता असेल त्याच ठिकाणीं मानवी सुधारणेचें पाऊल झपाट्यानें पुढें पडतें याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे प्राचीन काळचा ईजिप्त देश होय. कित्येक शतकांपूर्वी यूरोपखंडांतील व आफ्रिकेच्या इतर भागांतील लोक शुद्ध रानटी स्थितीचा अनुभव घेत असतांना नाईल नदीच्या खोऱ्यांतील रहिवाशी सुसंघटित रीतीनें राहात असत. या संघटनेचा परिणाम पश्चिमेकडे सहारा वाळवंटांतील लोकांवर, दक्षिणेकडे सूदानमधील रहिवाशांवर व पूर्वेकडे अरबस्तान व पॅलेस्टाईन यांतील माणसांवर चांगला दिसूं लागला. ईजिप्त देशांतील लोक संपन्न व प्रगमनशील होते. अलीकडील स्थापत्यविशारद इंजिनीयर लोकांना थक्क करून सोडणाऱ्या इमारती त्यांनीं बांधल्या, कालवे खणले व शेतकीची सुधारणा केली. त्यांनीं आपल्या भाषेकरितां लिपी शोधून काढली व वाङ्मय वाढविलें. त्या देशांतील शास्त्रज्ञ लोक पृथ्वी, तिचा आकार, महत्त्व, आकाशांतील इतर ग्रहांशीं तिचा संबंध वगैरे संबंधीं आपलीं अनुमानें जाहीरपणें सांगूं लागले. इतकेंच नव्हे तर पहिले भूगोल शास्त्रज्ञ ईजिप्तमधूनच पुढें आले. मोठमोठीं शहरें व अर्धवट सुधारलेले व्यापारी लोक, नाईल नदीच्या किनाऱ्यावर विशेषतः तिच्या मुखाशीं प्रथमतः आढळूं लागले. आणि तेथूनच व्यापारी व लढवय्ये लोक तत्कालीन माहीत असलेल्या प्रदेशांकडे जाऊं लागले. तेव्हां याच ठिकाणीं मानवी सुधारणा सुरू होण्याचें कारण भौगोलिक कारणांचें आनुकूल्य होय असें म्हणणें भाग पडतें. प्राचीन ईजिप्त म्हणजे नाईल नदीच्या दोन्ही कांठचा अरुंद प्रदेश होय. या प्रदेशाच्या ईशान्येस व आग्नेयीस पुष्कळ लहान मोठीं बेटें असलेले व शांत असे समुद्र होते, त्यामुळें साहसी लोकांना प्रयत्न करण्यास उत्तेजन मिळे. उलटपक्षीं वायव्य बाजूला व पश्चिमेस उजाड व नापीक असा प्रदेश असल्यामुळें साहाजिकच ते लोक जास्त सुपीक अशा पॅलेस्टाईनकडे वळले. ईजिप्तचें हवामान मेसॅपोटेमियांतील हवामानासारखेंच होतें. हिंवाळ्यांत तेथील हवा धान्य पिकविण्यास

पुरेशी ऊवदार अशी असे. थंडीच्या दिवसांत पाऊस पडे, पण तो बेताचाच असे. उन्हाळ्यांत तो देश फार उष्ण वाटे, परंतु जून ते सप्टेंबरपर्यंत नाईल नदीला येणाऱ्या पुरांनीं, थंडीच्या दिवसांत पडणाऱ्या पावसाची कमतरता भरून निघे. त्यामुळें पाण्याचा भरपूर पुरवठा वर्षभर असे. मात्र तें पाणी धरणांत अडवून ठेवावें लागे. तसेंच पुराबरोबर धुपून आलेल्या गाळाचे थर आजूबाजूच्या प्रदेशांत पसरल्यामुळें तेथें होणाऱ्या पिकांनीं श्रमांचा मोबदला उत्तम प्रकारें मिळत असे. भौतिक सुधारणेला अवश्य लागणाऱ्या तिन्ही गोष्टी ईजिप्तमध्यें होत्या. तेथील **हवा** प्रकृतीला मानवणारी व तरतरीतपणा देणारी होती. दुसऱ्या देशांशीं **दळणवळण ठेवण्यास लागणारीं साधनें** तेथें भरपूर होतीं व लोकांच्या प्रयत्नांना उत्तेजन देण्यास व जास्ती कमाई होण्यास उपयुक्त असे **नाईल नदीला पूर** दरसाल येत असत. त्यामुळें तेथील लोकांना आपल्या **अकलेचा उपयोग करण्याची संधि** मिळे. जास्त शोधक तसेंच बुद्धि व कल्पनाशक्ति यांचा उपयोग करणारास **मोठं बक्षीस** मिळे; तसेंच हस्तकौशल्य, बुद्धिकौशल्य व वरचढपणाची हांव या गुणांची वृद्धि होण्यास लागणारी स्थिति तेथें होती.

मानवी प्रगति व भौगोलिक परिस्थिति यांचा निकट संबंध हल्लींच्या काळीं सुद्धां स्पष्टपणें दृष्टीस पडतो. मात्र वाहतुकीच्या साधनांच्या कमी जास्त वाढीमुळें निरनिराळ्या देशांतील सुधारणेंतील फरक कमी जास्त झालेला आढळतो. कारण कोणत्याही एका देशाला स्वतांच्या साधनांवर अवलंबून न राहातां दुसऱ्या देशाच्या साधनांचा फायदा घेतां येतो. अलीकडील भूगोलशास्त्रज्ञांचें लक्ष प्रादेशिक परिस्थितीच्या मानवी हालचालींवर होणाऱ्या परिणामाकडे वेधलें जात आहे. त्यांच्या मनोरंजक शोधांपैकीं कांहीं शोध म्हटले म्हणजे पर्वतांवर राहाणारे लोक, लहान द्वीपसमूहांवर आढळणारे लोक अगर भरगच्च वस्तीपासून तुटक भागांतील किनाऱ्यांवर जेथें आगगाड्या अगर आगबोटी अगर इतर वाहतुकीचीं साधनें अनुकूल नाहींत अशा ठिकाणीं राहाणारे लोक यासंबंधीं होत. उत्तर अमेरिकेंतील ब्रिटिश कोलंबियाच्या व्हँकूवर बेटाच्या उत्तरेस कांहीं अंतरावर फ्रेझर नदीच्या किनाऱ्यावर एक रेड इंडियन लोकांची टोळी राहात असे. या ठिकाणचा किनारा दंतुर व लहान बेटांनीं भरलेला असा होता. रॉकी पर्वताच्या उंच डोंगरांच्या रांगांवरून वाहाणाऱ्या नद्या खालीं जोरानें उड्या टाकीत पॅसिफिक महासागरास मिळत असत. त्या ठिकाणीं खरोखर लागवडीस योग्य अशी सपाट जागा नव्हती. तेथील हवामान सुखकारक व समशीतोष्ण

होतें. थंडीच्या दिवसांत पुष्कळ थंडी व वर्षांतील एकंदर पाऊस पुष्कळ अशी स्थिति होती. त्यामुळें पर्वताच्या उतारावर सीडारसारखे गगनचुंबित वृक्ष दाट वाढत असत. हीं जंगलें, नद्या व समुद्र या साधनांचा फायदा त्या लोकांनीं भरपूर घेतला. ते शिकारीचा व मासे पकडण्याचा धंदा करूं लागले. पण आचारविचार व चालीरीति यांत बिलकूल फरक पडला नाहीं. त्यांच्या सर्व गरजा रॉकी पर्वतांतील जंगलें, नद्या व समुद्र यांतून भागत असत. सीडार झाडापासून घर शाकारणें, सर्पण, दिवाबत्ती, अंग झाकणें वगैरे गोष्टी त्यांना करतां येत; तसेंच माशांच्या व इतर प्राण्यांच्या मांसापासून उदरनिर्वाहाचें साधन व कातड्यांपासून कपडे त्यांस मिळत असत. एकंदरींत किनाऱ्याजवळ राहाणारे लोक, त्यांचे धंदे व आचारविचार भौगोलिक परिस्थितीवर अवलंबून असतात असें म्हणणें भाग पडतें.

आधुनिक लोकांची स्थिति व विचार हीं भौगोलिक कारणांवरच अवलंबून असतात हें दाखविण्यास अनेक उदाहरणें देतां येतील. मर्यादित जमिनीचा प्रदेश, अनुकूल हवामान, समुद्रसान्निध्य वगैरे कारणांनीं इंग्लिश लोकांची स्थिति कशी बदलली हें सर्वांस माहीत आहेच. राणी इलिझाबेथच्या कारकीर्दींत दर्यासारंग ड्रेक व रॅले यांसारखीं धाडसी माणसें नवीन प्रदेश शोधून वसाहतींची स्थापना करूं लागलीं; तसेंच व्यापारी जहाजें व लष्करी आरमार यांच्या वाढीमुळें आज जगांतील प्रमुख राष्ट्रांमध्यें इंग्लंडला अग्रस्थान मिळालें आहे. समुद्रामुळेंच युरोप खंडांतील राष्ट्रांना भांडणाच्या वेळीं आंग्लभूमीवर पाय सुद्धां ठेवितां आला नाहीं, इतकेंच नव्हे तर वुइल्यम धि कॉंकररच्या वेळेनंतर आजपर्यंत इंग्लंडच्या भूमीला कोणाही परकीय शत्रूचे पाय लागले नाहींत, व त्यामुळेंच इंग्रजांना आपल्या व्यापाराची वाढ करण्याकडे लक्ष देतां आलें. लोकांना धंदेशिक्षण मिळालें, उद्योगधंदे व कारखाने वाढले, व त्यामुळें व्यापारी शहरांच्या जागा निश्चित झाल्या. समुद्रसान्निध्य व कच्चा माल परदेशांतून आणविण्याची व पक्का माल परदेशांत पोहोंचविण्याची उत्तम सोय, यामुळें इंग्लंडप्रमाणेंच अमेरिकन संयुक्त संस्थानांचीही भरभराट झाली आहे, व अशा भौगोलिक परिस्थितीमुळेंच राष्ट्राराष्ट्रांत व्यापारी स्पर्धा उत्पन्न झाली आहे.

मानवी आयुष्यक्रमांतील अनेक गोष्टींचा उगम भौगोलिक परिस्थितींतच असतो, हें उघड आहे. भौगोलिक कारणांच्या परिणामांना न जुमानतां जगांत

राहाणें जवळ जवळ अशक्य होईल. या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम केवढा मोठा व जोरदार असतो, हें समजून घेण्यास संशोधनाची फार मोठी जरूर आहे. या कार्याकरितां आयुष्य वाहिलेले भूगोलशास्त्रज्ञ पुष्कळच नवीन माहिती मिळवीत आहेत; तेव्हां प्रत्येक मनुष्यानें भूगोल विषयाचा अभ्यास जरूर करावा. त्याचें ज्ञान फार आवश्यक व उपयुक्त आहे, व त्यामुळेंच मानवी प्राण्यांना आपली सुधारणा करून जगांतील सुशिक्षित म्हणविल्या जाणाऱ्या लोकांशीं बरोबरी करतां येईल, व त्याची ज्ञानामृतलालसाही तृप्त होईल.

---

# बुलबुल संघ.

या वर्षीच्या दुसऱ्या जोडअंकांत कन्यासंघ या संस्थेचे उद्देश व नियम आणि घटना यांजबद्दल माहिती दिली आहे. त्या अंकांतच कन्यासंघाचा ' सायंकालचा प्रदीप्त अग्नि ' या विधीचें सविस्तर वर्णन केलें आहे. कन्यासंघ हा ११ वर्षांपेक्षां जास्त वयाच्या मुलींकरितां असतो. कन्यासंघाचे उद्देश व ध्येय लक्षांत ठेवून ११ वर्षांपेक्षां लहान वयाच्या मुलींकरितां 'बुलबुल संघ' नांवाची संस्था स्थापन केलेली आहे. 'बालवीर, कन्यासंघ व बुलबुल संघ' या तिन्ही संस्थांचे उद्देश व ध्येय हीं एकच आहेत. मुलांना व मुलींना नैतिक, शारीरिक व व्यावहारिक शिक्षण देणें, पुढील आयुष्यांत त्यांना जीं कर्तव्यें करावयाचीं आहेत तीं करण्याची पात्रता त्यांचे अंगीं उत्पन्न करणें, परोपकार, कर्तव्यनिष्ठा, उद्योगप्रीति हे गुण त्यांना लावणें हेच उद्देश तिन्ही संस्थेचे आहेत. आजच्या अंकांत ' बुलबुल संघाची घटना व नियम यांची साधारण माहिती आम्ही देत आहों. या कॉलेजमध्यें कन्यासंघाचें शिक्षण घेतलेल्या विद्यार्थिनी सध्यां प्राथमिक शाळांतून शिक्षक म्हणून काम करीत आहेत. आपल्या बाल विद्यार्थिनींना हें शिक्षण द्यावें अशी त्यांना इच्छा आहे. त्यांना पुढील माहितीचा चांगला उपयोग होईल.

## बुलबुलांचा कळप.

### नियम.

१ ब्ल्यूबर्डच्या संघाला बुलबुल हें नांव द्यावयाचें आहे.

२ कहूं, कुहूं, कूहूं हा त्यांचा खुणेचा शब्द असावा.

३ बुलबुलांच्या सर्व कळपांवर एक सर्वाधिकारी नेमावा. ह्यास कोकीळ हें नांव द्यावें.

४ त्याला मदतनीस म्हणून एक सरदार असावा.

५ सहा बुलबुलांचा एक कळप असावा.

६ ह्या सहापैकींच एक पुढारी नेमून त्याला 'नाईक' ही संज्ञा द्यावी.

७ अकरा वर्षांच्या आंतल्या कोणत्याही मुलीला बुलबुल होतां येतें. मात्र तिनें ह्या संघाच्या प्रतिज्ञा व नियम उत्तम प्रकारें पाळण्यास झटलें पाहिजे.

८ प्रत्येक कळपानें एकेका पक्ष्याचें नांव आपल्या कळपाला घ्यावें. उ०— मोर, मैना, कबुतर, पोपट, चिमणी, पीलक, नीलकंठ.

९ सर्व बुलबुलांचे कपडे सारख्या रंगाचे असावे. प्रत्येक कळप ओळखतां यावा म्हणून ज्या पक्ष्याचें नांव त्या कळपाला मिळालें असेल, त्या रंगाची टेप खुणेदाखल उजव्या हाताच्या दंडाला बांधावी; किंवा सेफ्टीपिन्नें लाविली असतां चालेल.

उ०— मोराच्या कळपानें हिरवा व निळा रंग घ्यावा.
मैनेच्या कळपानें करडा रंग घ्यावा.
पोपटाच्या कळपानें हिरवा व तांबडा रंग घ्यावा.
चिमणीच्या कळपानें तपकिरी रंग घ्यावा.
कबुतराच्या कळपानें काळा व पांढरा रंग घ्यावा.
पीलकाच्या कळपानें पिवळा रंग घ्यावा.
नीलकंठाच्या कळपानें निळा रंग घ्यावा.
हंसाच्या कळपानें पांढरा रंग घ्यावा.

१० प्रत्येक कळपाला आपल्या पक्ष्याचें ज्यांत नांव येईल, अशी अगदीं लहान कविता पाठ असावी. सर्व कळप एकत्र होतात, त्या वेळीं ती म्हणतां आली पाहिजे.

११ सर्व कळपांना एकत्र म्हणण्याकरतां बुलबुल हें नांव येईल, अशा तऱ्हेची एक लहान कविता पाठ म्हणतां आली पाहिजे.

१२ कोणत्याहीं ठिकाणीं अगर एकाद्या जमावांत एक बुलबुल दुसरीस भेटली तर आपण दोघीही बुलबुल आहोंत हें कळविण्यासाठीं उजव्या हाताचीं दोन बोटें आपल्या खांद्याकडे वळवून त्यांनीं एकमेकींस प्रणाम करावा. हीं दोन बोटें म्हणजे बुलबुलांनीं पाळावयाच्या वचनांची खूण आहे.

१३ खालील वचनें व नियम प्रत्येक बुलबुलाला ठाऊक असून ते त्यांना पाठ असलेच पाहिजेत व त्याप्रमाणें वागण्याबद्दल त्यांनीं शपथ घेऊन तसें वागलेंच पाहिजे.

### ह्या संघाच्या प्रतिज्ञा.

( १ ) मी शपथपूर्वक सांगतें कीं, देव व राजा यांजविषयींचें माझें कर्तव्य मी करीन व या संघाचे नियम मनापासून पाळीन.

( २ ) दुसऱ्यांना— विशेषेंकरून—कुटुंबांतील माणसांना मी मनापासून मदत करीन.

### संघाचे नियम.

( १ ) "या संघांतील प्रत्येक सभासद वडील माणसाचें ऐकतो."

( २ ) " या संघातील प्रत्येक सभासद आपल्या लहरीप्रमाणें वागत नाहीं."

१४ 'हात भार लावा' हा प्रत्येक बुलबुलाचा मुख्य बाणा व मंत्र आहे.

खेळाच्या शेवटीं अगर एकाद्या विशिष्ट प्रसंगाच्या शेवटीं कांहीं ठराविक आवाज सर्वांनीं काढावा. त्याचा अर्थ 'हात भार लावा' हें तत्त्व आम्हांस माहीत आहे असा असावा.

१५ सर्व बुलबुलांचें मंगलाचिन्ह 'स्वस्तिक' आहे.

१६ ज्या ज्या प्रसंगीं सर्व बुलबुल एकत्र जमतील, अगर आपल्या अधिकाऱ्याजवळ कांहीं विशेष गोष्टीकरतां जमतील, त्यावेळीं वर्तुळाच्या मध्यावर 'स्वास्तिकाकार' चिन्ह अवश्य असावें.

१७ सर्व बुलबुल कोणत्याही विशेष कामासाठीं आपल्या कोकिळेभोंवतीं जमतील, तेव्हां त्यांनीं वर्तुळाकारच जमावें. ह्या वर्तुळास 'गप्पा मंडळ' म्हणावें.

### बुलबुल संघाचीं गाणीं

### सर्व बुलबुल.

चाल—( यादव राया राणि.)

**खेळाया या । साजणी, चला गे या या ॥ धृ. ॥**

बुलबुल आनंदी आम्हांला।
कामाचा मुळीं ना कंटाळा।
तयार राहूं साह्य कराया।
खेळा या या। साजणी, चला गे या या॥ १॥

एकेका पक्ष्याचें गाणें

चाल—(शिक्षण शाले.)

### पोपट

विठ्ठल विठ्ठल शब्द कठिण जरि पोपट आम्ही ते शिकतों,
जनमनरंजन करण्यासाठीं आम्ही आनंदें झटतों.

### साळुंक्या

गडबड गडबड करितांना जरि आम्ही साळुंक्या दिसतों,
हितकर, सुखकर गोष्ट कोणती चटकन आम्ही ओळखतों.

### मोर

आनंदी दिलदार खिळाडू आम्ही असतों मोर जरी,
नीट नेटकेपणा स्वच्छता अंगीं आमुच्या बहुत बरी.

### चिमण्या

चिंव, चिंव, चिंव, चिंव दिवसभरी जरी चिमण्या आम्ही या करितों,
मनापासुनी काम आपलें आनंदानें संपवितों.

### सुतार

टक, टक, टक, टक, तरुवरि बसुनी सुतार आम्ही ते करितों,
दक्षपणानें काम कराया कंटाळा कधिं नच करितों.

# साध्वी मीराबाई.

( लेखकः—**काशीनाथ परशुराम साने**, शिक्षक घोडें, जि. पुणें. )

[ क्रमिक वाचन–पुस्तकाच्या आधारानें ]

चाल—**किती प्रभूची थोर कृपा ही०...**

साध्वी मीरा जगीं जन्मुनी ही धन्या झाली
निजकुला[1] उद्धरूनि गेली ॥ ध्रु० ॥

जन्म घेतला, पावन[2] केलें, राजस्थानाला
तसें या [3]आर्यावर्ताला ।
राठोडांची, रावकुलाची राजस्थानाची
कन्यका ही भारतभूची ।
धन्य तिचा तो पिता जाहला रतनसिंग राणा
सुकन्या मिळे भाग्यपूर्णा[4] ।
ही मीरा बहु रूपवती
हो राजस्थानीं ख्याती
" गुणवती " गाजली कीर्ती
रूपगुणांची जोड[5] घालुनी विधिनें[6] नवलाई
दाविली मीरेच्या ठायीं ॥ १ ॥ साध्वी० ॥

बाला असुनी साधु संगती, कृष्ण भजन तिजला
आवडे, करि [7]तद्भक्तीला ।
आला साधू एक घेउनी कृष्णमूर्ति छानशी
दाविली प्रेमें मीरेसी ।
मीरा बोले " बाबाजी, ही मूर्ति बहुत सुंदरा
द्या मला कृष्णसखा [8]साजिरा " ।
साधु तो म्हणे मीरेला
" अज्ञान असासि तूं बाला
खेळणें न हें खेळाला
परि झाला दृष्टांत तयासी, द्यावी मूर्ति तुवां
मिळे ती मीरेला तेधवां ॥ २ ॥ साध्वी० ॥

---

१ आपल्या कुळाला. २ पवित्र. ३ हिंदुस्तानाला. ४ पूर्ण भाग्यशाली. ५ सांगड. ६ ब्रह्मदेवानें. ७ कृष्णभक्तीला. ८ सुंदर,

थोर घराणें, रूप देखणें, मीरा गुणखाणी[1]
पाहिजे अधिक काय याहुनी ? ।
झाली उपवर[2] मीरा हिजला पती पहावा वरा
वाटलें रतनसिंग नृपवरा ।
क्वचित् गांठ अनुरूप[3] देतसे विधि पतिपत्नींची
रीत ही जगीं दिसत त्याची ।
परि अपवाद विधीनें आणिला
लंघुनि[4] या निज-नियमाला
मिळे, अनुरूप पति मीरेला
कन्यादानें, तोष पावला रतनसिंग नृप मनीं
वसे जणु रत्न-योग्य कोंदणीं ॥३॥साध्वी०॥

मेवाडींचा प्रसिद्ध राणा संग शूर साचा
प्रतापी भोज पुत्र त्याचा ।
तरुण, सुशिल, सद्गुणी भोज जो बच्चा शूराचा
असे जणु पेटा[5] सिंहाचा ।
भोज नृपतिसम पती लाधला[6] साध्वी मीरेला
पावला प्रभु तद्भक्तीला[7] ।
विधिघटना विचित्र असते
मानवांस ती ना कळते
भवचक्र[8] उलटही फिरतें
विपरित तैसा मीरेवरि कीं प्रसंग ओढवला
ईश तो तिजवरि हो ! कोपला.॥४॥साध्वी.॥

पतिच असे हो सतीस दैवत, सेवा करण्याला
अन्य नच देव-देवता तिला ।
सत्त्व वधाया मीरेचें तें मृत्यु सज्ज[9] जाहला
घातला भोजावरि घाला ।
अशनिपात[10] हा साध्वीच्या जणु शरिरावरि जाहला
जाहली ओस मेदिनी[11] तिला ।

---

१ फार गुणवान्. २ लग्नास योग्य. ३ योग्य. ४ मोडून. ५ सिंहाचा बच्चा. ६ मिळाला. ७ तिच्या भक्तीला. ८ संसाररूपी चाक. ९ तयार. १० वीज पडणें. ११ पृथ्वी.

दुःखमग्न मीरा झाली
प्रभुलागिं म्हणूं लागली
" असो, ही प्रभु, मर्जी आपुली
दीन-जनांचा वाली[१] ना कुणी प्रभु तुजवांचोनी
हीच का अशी तुझी करणी? ॥ ५ ॥ साध्वी० ॥

दोष परी कां तुजसी द्यावा आम्ही अज्ञ पामरें
घडे तें पूर्वसंचितें[२] खरें।
पति-देवाला तव चरणाशीं [३]अढळ स्थान जें दिलें
तेंचि दे, ईशा मज चांगलें।
अन्य न आतां मला कामना[४] तव सेवेवांचुनी
आण[५] ही घेतें तव चरणीं।
प्रभु, मीरेनें आळविला[६]
निज-भक्तीनें वळविला
सद्बोध जना कळविला
कोकिलसम मधु, भक्तिपूर्ण तद्गानें जन मोहिले
'साध्वी' नांव तिचें गाजलें ॥६॥ साध्वी० ॥

पूर्ण कसोटी लावुनि पाही प्रभु निजभक्तांना
देत मग अक्षय सुख त्यांना।
आपत्ति, छल, दुःख, संकटें नच बाधिति ज्यांना
लागला साचा कस[७] त्यांना।
नणंद, सासू, दीर, आप्तजन मीरेला गांजिती
'दुष्टा', 'कुलटा'[८] तिज बोलती।
" लाज आणुनि मातृकुलाला[९]
कां बट्टा आत्मकुलाला[१०]
लावितेस? सांगें मजला
साधुसंगती, भजनपुजन तें सोड, रक्षिं कीर्तिला "
बोले नणंद, सासू तिला ॥ ७ ॥ साध्वी० ॥

---

१ कैवारी, रक्षक. २ पूर्वी जें केलें त्याप्रमाणें. ३ कायमचें, अक्षय टिकणारें. ४ इच्छा. ५ शपथ. ६ विनविला. ७ कसोटी. ८ दुराचारी. ९ माहेरास. १० आपल्या घराण्यास.

मीरा बोले " वन्से, आतां न जा तुम्ही सासरा
मजसवें प्रभुमहिमा[1] गा वरा ।
सासूबाई, भजनप्रभूचें भवाब्धि[2] तें तरण्या
योग्य हो ! वृद्धपणीं आपणा " ।
ईशभक्ति नच मीरा सोडी ' बोल फोल[3] होती '
वाटलें दीरनणंदेप्रती ।
दीर विक्रमाजित त्यानें
विष-चषक[4] भरुनि हस्तानें
तिज बोले बहु क्रोधानें
"ईश तुझा ना वाली म्हणसी ? पी, हा विषप्याला
पाहतों राक्षि कसा तो तुला " ॥ ८ ॥ साध्वी०॥
हासुनि मीरा घेई हातीं विषप्याला झडकरी
बोलली " धावे, गिरिधारी " ।
प्राशूनि[5] म्हणे " प्रसाद प्रेमें दिधला तूं श्रीहरी.
अहाहा ! अमृत सम माधुरी[6] " ।
विष अमृतासम पचवुनि, साध्वी लागे हरिभजना
प्रभो, तव धन्य-नाममहिमा[7] ! !
ही साध्वी मीरा हिजला
छळुनि व्यर्थ कीं दोष दिला
ही भूषण आत्मकुलाला
मृत्युलोकिं ही देवी आली दर्शन देण्याळा
वाटलें आप्तजनां सकलां ॥ ९ ॥ साध्वी० ॥
वदती " आम्हां कळला महिमा नच ह्या साध्वीचा
खरोखर, वाली ईश तिचा ।
साध्वी मीरे, दर्शन देउनि पुनित[8] जना केलें
दोन्हीं[9] कुलां उद्धरिलें " ।
बोले मीरा " प्रभुलीला ही तुम्ही न दोषी खरे
दावितो प्रभु कौतुक सारें ।

---

१ मज बरोबर. २ संसार-समुद्र. ३ फुकट, व्यर्थ. ४ विषाचा पेला. ५ पिऊन. ६ गोडी. ७ नामस्मरणाची थोरवी. ८ पवित्र. ९ सासरच्या व माहेरच्या.

आतां विनति एक परिसावी
गुणगीतें प्रभुचीं गावीं
तत्सेवा भक्ति करावी
'मीरा के प्रभु गिरिधर नागर' उद्धरूनि सकलां
देई चिर सुखशांतीला " ॥१०॥ साध्वी० ॥

---

# अफगाणिस्तान.

( मागील अंकावरून. )

**राहणी व आचारविचार**—आपल्याकडे मुलगा पैसा मिळवूं लागला म्हणजे प्रथम त्याच्या डोक्यांत संसार थाटण्याच्या कल्पना सारख्या घोळूं लागतात; त्याप्रमाणें पैसे मिळूं लागल्याबरोबर प्रत्येक अफगाणाच्या मनांत घोडा व बंदूक विकत घेण्याची कल्पना घोळूं लागते. त्या देशांत फिरतांना कोणाही मनुष्यानें आपल्याबरोबर बंदूक अगर पिस्तूल बाळगतां उपयोगी नाहीं, कारण प्रत्येक अफगाण मनुष्याला तो जिन्नस हवासा वाटत असल्यानें त्यासाठींच ते प्रवाशांस दगा केल्याशिवाय राहाणार नाहींत. अफगाणासाठीं फक्त अफगाणिस्तान आहे, ही कल्पना अगदीं लहानपणापासून त्यांच्या मनावर बिंबविली जाते. त्यांना परतंत्र बनविण्याचा प्रयत्न केल्यास ते लोक शत्रूचा सूड उगविल्याशिवाय कधींही राहाणार नाहींत. स्वातंत्र्यदेवतेलाच फक्त त्यांच्या हृदयसिंहासनावर बसण्याचा हक्क आहे. हे लोक धार्मिक बाबतींत फार कडवे आहेत. मुसलमानी धर्माप्रमाणें ते नियमानें ५ वेळां नमाज पढल्याशिवाय राहाणार नाहींत. देशाला स्वातंत्र्य असेल तरच स्वस्थपणें स्वधर्माचरण करितां येईल अशी त्यांची ठाम समजूत आहे असें दिसेल. काबूल शहरीं जी भव्य मशीद आहे, तेथें रमजानच्या सणाचे वेळीं स्वतः अमीरसाहेब प्रार्थनेस येतात, व लोकांना उपदेश करतात. त्या प्रसंगीं लांबून आलेल्या २०।२२ हजार लोकांची मशीदीबाहेर गर्दी होते, व सर्वांची राजदर्शनाबद्दल मोठी उत्कंठा दिसते.

**राजा व राज्यव्यवस्था**—हल्लीं अफगाणिस्तानच्या गादीवर दुराणीवंशाचा अमानुल्लाखान नांवाचा अमीर आहे. हा १९१९ सालीं गादीवर आला. याच्या पूर्वी हबीबउल्ला या नांवाच्या अमीराचा खून झाला.

तो व त्याचा बाप अबदूल रहिमान हे ब्रिटिशांशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागत असत. हल्लींचे अमीर आपल्या देशाची सुधारणा करण्याचे शक्य ते उपाय योजीत आहेत. त्यांनीं देशांतील लष्करी व्यवस्थेंत सुधारणा केली असून विमानें सुद्धां आणविलीं आहेत. स्वतांच्या देशांत होणारा कपडाच सर्वांनीं वापरला पाहिजे असा त्यांचा सक्त हुकूम आहे. एकाद्या सरदारानें परदेशी कापडाचा कपडा वापरलेला आढळल्यास त्याला वठणीवर आणण्याची त्यांनीं एक मजेची युक्ति काढली आहे. ते स्वतःजवळ उत्तम धारेचा एक चाकू बाळगतात, व ज्या माणसानें परदेशी कपडा वापरला असेल त्याच्या मागें हळूच जाऊन तो फाडून टाकतात. असें केलें म्हणजे न बोलतां सर्वांना चांगली जरब बसून रावापासून रंकापर्यंत स्वदेशी कपडा वापरण्याची प्रवृत्ति सुरू होते ! अशा रीतीनें गाजावाजा न करितां देशांत उद्योगधंद्यांची वाढ व जोपासना करण्याचा मार्ग त्यानीं स्वीकारला आहे. तसेंच त्यांनीं परदेशांत शिकलेले असे बरेच लोक आपल्या पदरीं बाळगिले असून त्यांच्या साहाय्यानें ते युरोपियन लोकांपासून शिकण्यासारख्या गोष्टींचा आपल्या देशांत प्रसार करीत आहेत. ब्रिटिशांसारख्यांना सुद्धां आपल्या व्यापाराची वृद्धि व्हावी म्हणून ब्रिटिश मालच फक्त विकत घ्या, अशा प्रकारच्या जाहिराती काढणें व निरनिराळ्या संस्था स्थापून त्यांमार्फत स्वराज्यभर आपल्या मालाला गिऱ्हाईक मिळविणें याबद्दल प्रयत्न करावा लागतो, तर या चिमुकल्या राष्ट्राला जगाच्या चढाओढींत केवळ जगण्यासाठीं तरी वरील प्रकारच्या गोष्टी करणें अपरिहार्यच आहे, असें कोणीही कबूल करील.

या देशातील सर्व कारभार एकतंत्री आहे. राजा म्हणेल ती पूर्वदिशा ! अशा देशांत राजपद धारण करणारा माणूस फार धोरणी व निग्रही असावा लागतो. इतर देशांपेक्षां येथील राजाची जागा फार धोक्याची आहे. क्षुल्लक गोष्टीवरून एकाद्याचें डोकें बिथरलें तर अमीराची केव्हां व कशी चटणी उडेल याचा नेम नसतो. अफगाणिस्तानांत असे राजांचे खून पुष्कळदां झाले आहेत. त्यामुळें राजरक्षणासाठीं गुप्त रीतीनें पुष्कळ लोक नेमलेले असतात. कारणाशिवाय राजाशीं कोणी लगट करतांना दिसल्यास कोठून गोळी सूंसूं येऊन त्या माणसाच्या

हृदयाचा ठाव पाहील याचा नेम नसतो. एकंदरीनें राजपद म्हणजे विंचवांचें आंथरूण म्हणणें वावगें होणार नाहीं.

येथील राज्यव्यवस्था एकतंत्री आहे. तथापि निरनिराळ्या खात्यावर अनुभवी माणसें नेमिलीं असून त्यांच्या सल्ल्यानें अमीर सर्व गोष्टी करतात. दरसाल परदेशांत शिक्षणासाठीं पुष्कळ विद्यार्थी पाठविण्याचा क्रम यांनीं आपल्या कारकीर्दीच्या सुरुवातीपासून चालू ठेविला आहे. त्यामुळें देशाची सुधारणा करण्यास कशाची जरूरी आहे, याची जाणीव होत चालली आहे. दळणवळणाचीं साधनें वाढत आहेत, शस्त्रास्त्रांची सुधारणा व आयात सुरू आहे, शिक्षणाचा प्रसार होऊं लागला आहे, व त्यामुळें नवजीवन येऊं लागलें आहे. देशांत मुसलमानवस्तीप्रमाणें हिंदूंचीही वस्ती आहे. पण प्रजेचें पालन करणें या न्यायास अनुसरून त्यांच्या हक्कांना व धर्मभावनांना योग्य मान देण्यांत येत असतो. देशांतील निरनिराळ्या अधिकारांवर हिंदूंची नेमणूक होते. यांच्या वैमानिक दलांतील अधिकाऱ्यांत श्रीयुत पटवर्धन हे एक ब्राह्मण गृहस्थ आहेत, हें सांगितलें असतां या गोष्टीची सत्यता पटेल.

नुकतेच अमीरसाहेब हिंदुस्थानांत येऊन ईजिप्त वगैरे देश पाहात इटलींत गले आहेत व पुढें जर्मनी, फ्रान्स वगैरे देश पाहात जाण्याचा त्यांचा विचार आहे. हिंदुस्तानाप्रमाणेंच ईजिप्त व इटली या देशांत त्यांचें विलक्षण थाटाचें स्वागत झालें व इतर देशांतही जारीनें स्वागताची तयारी चालूच आहे.

अशा रीतीनें लहान पण स्वतंत्र अशीं आशियांतील राष्ट्रें कशीं खडबडून जागीं होत चाललीं आहेत, हें समजून येईल.

---

# लहान देवदूत.

फार वर्षांपूर्वी एका गांवांत एक माळी राहात असे. गांवाच्या जवळ त्याचा एक लहानसा बाग होता. त्या बागेंत त्याचें लहानसें घर होतें. त्यांतच तो राहात असे. हा माळी भारी मेहनती असे. तो सकाळपासून रात्र पडेपर्यंत सारखें काम करीत असे. त्याची बायकोही त्याच्यासारखीच गरीब व मेहनती होती. हीं नवरा बायको भारी आनंदी असत. त्यांना दोन मुलें होतीं. मुलाचें नांव हैबती व मुलीचें नांव सगुणा असें होतें. हैबती ११ वर्षांचा होता व सगुणा ९ वर्षांची होती.

हीं मुलें आईबापांचीं फार लाडकीं होतीं. त्या मुलांवर आईबापांचा फार जीव असे. लहानपणीं आईबाप त्या मुलांना कांहीं काम सांगत नसत. तीं सारा दिवस खेळत असत. पण तीं मुलें जेव्हां मोठीं झालीं तेव्हां त्यांनीं कांहीं तरी काम करावें व आपणांस मदत करावी असें आईबापांना वाटूं लागलें. पण मुलें मुळींच काम करीत नसत. त्यांना कामाचा भारी कंटाळा असे.

हैबतीला एक दिवस बापानें मळ्यांतील वांगीं तोडून आणण्यास सांगितलें, पण तो जागेवरून मुळींच हलला नाहीं. सगुणेला आईनें वासराला पाणी पाजावयास सांगितलें, पण ती मुळींच हलली नाहीं. आई म्हणाली, 'मुलांनो, तुम्ही आम्हांला मुळींच मदत करीत नाहीं हें चांगलें नाहीं. आम्ही दिवसभर काम करितों व थकून जातों. तुम्ही खुशाल सारा दिवस खेळतां.' आईच्या या बोलण्याकडे मुलांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं.

दुसरा दिवस उजाडला. हैबती व सगुणा सारा दिवस खेळत होतीं. पण त्या दिवशीं त्यांचे आईबाप नेहमींप्रमाणें त्यांच्याशीं प्रेमानें बोलले नाहींत. यामुळें त्या मुलांनाहीं त्या दिवशीं बरें वाटलें नाहीं. तिसरा दिवस उजाडला. हैबती व सगुणा पुन्हा खेळांत गुंतलीं. पण आज सकाळपासून आई त्यांच्याशीं मुळींच बोलली नाहीं यामुळें त्या दोघांही मुलांना चैन पडेना. सगुणा म्हणाली, ' दादा, आपण एकसारखे खेळतों हें बरें नाहीं. आपण आईला व बाबांना कांहीं तरी मदत केली पाहिजे.' हैबती म्हणाला, ' खरेंच ताई, मलाही असें वाटतें.'' असें बोलून तीं मुलें पुन्हा खेळूं लागलीं.

रात्रीं आंगणांत शेकोटी पेटवून बाप व मुलें शेकत बसलीं. आईही घरांतलें काम आटोपून तेथें येऊन शेकत बसली. दोघेंही काम करून थकलीं होतीं. हैबतीचा बाप म्हणाला, ' मी जेव्हां लहान होतों तेव्हां माझ्यावर व माझ्या भावंडांवर माझ्या आईबापांची भारी माया असे. माझे बाबा व आई उठण्याच्या पूर्वींच आमच्या घरांतलें काम पुष्कळ आटपत असे, यामुळें माझ्या बाबाचें व आईचें बरेंच काम हलकें होई. ' हैबती म्हणाला, ' बाबा, तुमच्या घरांतलें काम कोण करीत असे ? ' बाप म्हणाला, ' हैबती, त्यावेळीं ज्यांच्या घरांत आनंद असे व आळस नसे त्यांच्या घरीं अगदीं सकाळींच लहान लहान देवदूत येत व झट-पट काम उरकून कोणाला न दिसतां निघून जात. ' सगुणेची आई म्हणाली, ' मी व माझीं भावंडें माझ्या आईला व बाबाला भारी मदत करीत असूं. आमच्याही घरीं लहान देवदूत सका-ळींच येत व कोणाला न कळतां मदत करीत.'

हैबतीचा बाप म्हणाला, ' आमच्या या भागांत लोक नेहमीं म्हणतात—

आळस घरिं ज्या मुळींच नाहीं
मुलें माणसें आनंदितही
देवदूत ते लहान तेथें
येउनि करिती साह्य तयांतें '

सगुणा म्हणाली, 'बाबा, असले लहान देवदूत आतां नाहीं कांहीं येत? आपल्या घरीं नाहीं काहो ते येणार?'

सगुणेची आई म्हणाली, 'आपल्या घरीं कसे ते येणार? आपल्या घरीं आळस पुरा भरलेला आहे!'

हैबती म्हणाला, 'बाबा, ते लहान देवदूत कोठें राहातात हें तुम्हांला माहीत आहे काय?'

हैबतीचा बाप म्हणाला, 'मला कांहीं माहीत नाहीं. पण नदीचे कांठीं पलीकडे एक झोपडी आहे तेथें एक साधु राहातो; त्याला हें माहीत आहे.'

दुसऱ्या दिवशीं तीं मुलें सकाळीं उठलीं व न्याहारी करून आईला किंवा बापाला न सांगतां त्या साधूच्या झोपडीकडे निघालीं. ती झोपडी एका रानांत होती. तेथें गेल्यावर झोपडींत त्यांना तो साधु दिसला. त्याला त्यांनीं नमस्कार केला. त्या साधूनें मोठ्या प्रेमानें त्यांना बसविलें. हैबतीनें आपली सगळी हकीकत त्याला सांगितली व ते लहान देवदूत कोठें आहेत म्हणून त्या साधूला विचारलें. साधु म्हणाला, 'ते पहा पलीकडे आंब्याचें झाड, त्या झाडावर एक मोर आहे, त्याला तुम्ही विचारा म्हणजे तो तुम्हांला सांगेल.'

तीं मुलें त्या झाडाखालीं गेलीं. झाडावर एक सुंदर मोर बसला होता. मुलें त्याला म्हणालीं 'मोरा मोरा, लहान देवदूत

आम्हांला कोठें दिसतील ? आम्हांला त्यांना भेटावयाचें आहे.' मोर म्हणाला, 'मिआव मिआव मिआव,

नदिचे कांठीं जाउनियां
डोकावुनियां आंत पहा
देवदूत ते दिसतील,
तुम्हांसवें ते बोलतील.

तीं मुलें पळतच नदीचे कांठीं गेलीं. स्वच्छ पाण्यांत त्यांनीं डोकावून पाहिलें. सगुणा म्हणाली, 'दादा, मला तुझा व माझाच चेहरा दिसतो.' हैबती म्हणाला, 'होय ताई, मला तुझा व माझा चेहरा दिसतो. व आपण दोघेंच बोलतांना दिसतों.' तीं दोन मुलें उठलीं व त्या साधूजवळ आलीं. साधु म्हणाला, 'दिसलेना तुम्हांला देवदूत?' मुलें म्हणालीं, 'आम्हांला आमचेच चेहेरे दिसले.' साधु म्हणाला, 'मुलांनों, तुम्हीच देवदूत आहांत, आई-बापांचे उपयोगीं पडण्याचा व चांगलें वागण्याचा तुम्हीं निश्चय केला आहे म्हणून तुम्ही देवदूत झालां आहां. जा आतां, देवदूताप्रमाणें वागा.'

तीं मुलें घरीं आलीं. दुसऱ्या दिवशीं आईबाप उठण्याचे पूर्वींच तीं मुलें उठलीं व घरांतील बरेंच काम आटोपून तीं पुन्हा निजलीं. आपलें काम उरकलेलें पाहून त्यांचे आईबापांना आश्चर्य वाटलें. तिसऱ्या दिवशीं पुन्हा तसेंच झालें. त्या दिवशीं रात्रीं शेकोटीजवळ ती सगळी मंडळी शेकत होती, तेव्हां सगुणाची आई म्हणाली, 'अलीकडे आपल्या घरीं लहान देवदूत येऊन आपणांला मदत करूं लागले आहेत.' हैबतीचा बाप म्हणाला,

'आळस ज्या घरिं मुळींच नाहीं
मुलें माणसें आनंदितही

देवदूत ते लहान तेथें
येउनि करती साह्य तयांतें,

हें ऐकून ती सर्व मंडळी आनंदानें हसूं लागली. प्रत्येक घरीं असे लहान देवदूत आईबापांना मदत करणार नाहींत काय?

---

# प्राथमिक शाळांतील वैद्यकीय तपासणी व शारीरिक शिक्षण.

( डॉ. मिस् जरबानू इ. मिस्त्री एल्. एम्. एस्. यांच्या व्याख्यानाच्या आधारें. )

भौतिक उत्कर्ष अगर संख्याबळ यावर राष्ट्राचा मोठेपणा अवलंबून नसून तो तेथील लोकांचें शरीरसामर्थ्य कसें आहे यावरून ठरविला पाहिजे.लहान मुलांच्या प्रकृतीची अगर आरोग्याची काळजी घेणें हा सार्वजनिक आरोग्याचा व राष्ट्रीय उन्नतीचा पाया आहे हें तत्त्व सुधारलेल्या देशांत दिवसें दिवस जास्त प्रमाणावर मान्य होत चाललें आहे. शरीर निरोगी असलें म्हणजे मनुष्याला आपल्या बौद्धिक व शारीरिक शक्तींची भरपूर वाढ करितां येऊन आपल्या ठिकाणीं असलेल्या मानसिक शक्तींचा पूर्ण उपयोग करून दाखवितां येतो. शरीरसामर्थ्यावांचून केवळ पुस्तकी ज्ञानाचे मदतीनें आयुष्यांतील कर्तव्यकर्मे व जबाबदारीचीं कामें पार पाडणें अशक्य आहे असें दिसून येईल. आरोग्यसंपादन करण्यास सृष्टिनियमांचें नुसतें ज्ञान असणें उपयोगीं पडत नसून त्या नियमांप्रमाणें प्रत्येकानें वागण्यास सुरुवात करणें अत्यंत आवश्यक आहे.

स्त्रियांना शिक्षण देणें हें समाजसुधारकांचें महत्त्वाचें काम आहे पण स्त्रियांचे शिक्षणाचे बाबतींत अहित होऊं नये याकडे त्यांनीं लक्ष दिलें पाहिजे. मुलांच्या धर्तीवर मुलींना शिक्षण देण्यापासून विशेष फायदा झाला आहे असें दिसत नाहीं. सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या शरिरांकडे पाहिलें तर हल्लींचें बौद्धिक शिक्षण संपादन करितांना शरीरसंवर्धनाची पूर्ण हेळसांड होत आहे असेंच म्हणावें लागेल.

मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवितांना त्यांच्या शिक्षणक्रमांत पाकशास्त्र,शिवण, आजाऱ्याची शुश्रूषा, बालसंगोपन, गृहविषयक व सामाजिक आरोग्यशास्त्र वगैरे विषय अवश्य असावे. शरीरसामर्थ्यासंबंधीं विचार करावयाचा म्हटला तर ज्या शिक्षणपद्धतीनें सुदामदेव तयार होतात ती केव्हांही त्याज्य होय. शिक्षणपद्धति सुधारावयास पाहिजे असेल–व ती अवश्य सुधारली पाहिजे–तर इंग्लंडप्रमाणें मुलांचें आरोग्य व शरीरसामर्थ्य वाढविणें या गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

शाळेंत जाणाऱ्या मुलांपैकीं बहुतेक मुलें निस्तेज, फिकट,खुजीं, पुरेसें खाण्यास न मिळणारीं, व लहानपणाची स्वाभाविक तरतरी नसलेलीं अशीं आढळतात. वाईट घरें, कोंदट शाळागृहें, घरीं व शाळांत मुलांवर लादलेला अभ्यासाचा बोजा,शरीर-वाढीची हेळसांड, मोकळ्या हवेंतील व्यायामाचा अभाव,अपुरें अन्न व क्षयासारखे आनुवंशिक रोग वगैरे अनेक कारणांनीं शारीरिक दौर्बल्य उत्पन्न झालें आहे. शाळेंत जाणाऱ्या ३/४ मुलांची ही स्थिति असून आमचे शिक्षणशास्त्रज्ञ त्याबद्दल मुळींच विचार करीत नाहींत !

सरकार,म्युनिसिपालिट्या व आरोग्यसंस्था यांनीं लोकांचे रोग बरे करण्यासाठीं इस्पितळें व दवाखाने काढण्याऐवजीं लोकांचें आरोग्य कसें राखावें या गोष्टीकडे जास्त लक्ष दिलें पाहिजे. निरोगी मनुष्य हा देशाला जास्त उपयोगीं पडणारा असून रोगी माणसाच्या मानानें देशाला त्याजबद्दल फार थोडा खर्च करावा लागतो. मनानें दुर्बल, भिकारी, पांगळे, गुन्हेगार वगैरेंच्या शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा खर्च हा सामान्य निरोगी माणसाच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चाच्या मानानें कितीतरी पट जास्त असतो. म्हणून शहर म्युनिसिपालिट्या व त्या प्रकारच्या इतर संस्था यांनीं औषधावांचून शहरवासियांचें आरोग्य सुधारण्याबद्दल शक्य तितके उपाय अमलांत आणण्याची काळजी घ्यावी. हीच गोष्ट माझ्या प्रस्तुत निबंधाचा विषय आहे. या विषयाचे मी दोन भाग पाडून प्रत्येकाचा विचार करणार आहें.

( १ ) शाळेंत जाणाऱ्या मुलांची वैद्यकीय तपासणीः— मुलांची शक्य तितकी जोरानें वाढ व्हावी. त्यांना आरोग्य प्राप्त व्हावें, सुखाची वृद्धि व्हावी व लहानपणीं होणाऱ्या रोगांनीं जे शरीरदोष उत्पन्न होतात ते टळावे हा वैद्यकीय तपासणीचा मुख्य उद्देश आहे. हिंदुस्तानांत या गोष्टीबद्दल काळजी घेणें फार जरूर आहे, कारण येथें अडाणी व जुन्या चालीरीतींनाच बहुधा चिकटून राहाणाऱ्या स्त्रियांच्या हातीं बालसंवर्धनाचें काम येतें.

ठराविक मुदतीनें शारीरिक तपासणी केल्यानें वरून निरोगी दिसणारें मूल खरोखरच निरोगी आहे कीं काय हें ठरवितां येऊन क्षुल्लक तक्रारी असल्यास त्यांकडे वेळींच लक्ष देतां येतें व पुढील आयुष्यभर भोगाव्या लागणाऱ्या आपत्ति दूर करितां येतात. लहानपणींच क्षय व त्यासारखे आनुवंशिक रोग आढळून आल्यास त्यांजवर वेळींच औषधयोजना करतां येते व तीं मुलें पुढें इतर मुलांच्या बरोबरीनें उद्योग करूं शकतात. देवी, क्षय, इन्फ्ल्युएन्झा वगैरे रोगांनीं होणाऱ्या संहाराकडे आपलें लक्ष जोरानें वेधलें गेल्यानें दातांचे रोग, गळ्यांतील गांठींची वाढ, दृष्टी व कर्णदोष यांसारख्या प्रथम क्षुल्लक दिसणाऱ्या व्याधींपासून किती लोक अकालीं मरतात याची आपणांस दादच नसते! या रोगांनीं त्या त्या अवयवांनाच कमीपणा येतो असें नाहीं, तर हे इतर मोठ्या रोगाचें मूळ असतें. दवाखाने स्थापन करण्याचा व डॉक्टर नेमण्याचा उद्देश मोठ्या रोगांचा प्रतिकार करणें हा आहे. पण ते रोग उत्पन्न करणाऱ्या इतर लहान रोगांचा उच्छेद केल्याशिवाय मोठे रोग होणें बंद होणार नाहीं. अशा प्रकारें उद्योग करण्यास बराच पैसा खर्च होईल ही गोष्ट खरी; पण त्याबरोबर हीही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं सुधारलेल्या राष्ट्रांत असे प्रयोग होऊन त्यापासून इष्ट परिणाम होतात असें आढळून आलें आहे. अशा रीतीनें खर्च केलेला पैसा अनाठायीं होणार नाहीं. योग्य देखरेखीखालीं जर वैद्यकीय तपासणीचें काम चालेल तर तिजपासून विलक्षण फायदा दिसल्यावांचून राहाणार नाहीं.

योग्य प्रकारची शारीरिक तपासणी व्हावयास पाहिजे असल्यास ती शास्त्रीय पद्धतीनें, हल्लींच्या सर्व साधनांचा उपयोग करून वारंवार ठराविक मुदतीनें झाली पाहिजे व त्या दिवशीं मुलांच्या पालकांस जातीनें हजर राहाण्यास सांगून त्या तपासणींत आढळून येणाऱ्या दोषांबद्दल त्यांनीं डॉ. च्या सल्ल्याप्रमाणें ताबडतोब इलाज करण्यास तयार असलें पाहिजे. अशा प्रकारें सहकार्य न झाल्यास डॉ. च्या तपासणीचे कागद शाळेच्या फळ्यांवर धूळ खात पडून राहातील व मुलांना या तपासणीचा बिलकूल फायदा होणार नाहीं.

योग्य पद्धतीनें तपासणी करावयाची झाल्यास शिक्षणखात्यानें अनुभविक, आपल्या धंद्यांत वाकबगार असे बरेच डॉक्टर—विशेषतः स्त्री डॉक्टर—या कामासाठीं नेमून महिन्यांतून अगर दर तिमाहीस एकदां मुलांची शारीरिक तपासणी करवावी व त्या दिवशीं पालकांना हजर राहाण्यास सांगून मुलांसंबंधीं

पूर्ण माहितीचा रिपोर्ट मुख्याध्यापकाचे स्वाधीन करून आलेल्या पालकास मुलां-संबंधीं व्यक्तिशः योग्य तो सल्ला द्यावा. एखादा रोग असल्याचें या तपासणींत आढळून आल्यास पालकांनीं तो बरा करण्याची डॉक्टरानें सांगितल्याप्रमाणें उपाययोजना करावी व पालक या गोष्टी करितात किंवा नाहीं याकडे मुख्याध्यापकानेंही थोडेंसें लक्ष ठेवावें. कांहीं तज्ज्ञ डॉक्टरांनीं गरीब मुलांच्या बाबतींत आढळणारे नाक, कान, डोळे, घशांतलि गांठी वगैरेसंबंधीं रोगांवर फुकट उपचार करण्याची व्यवस्था करावी. पुष्कळ मुलांच्या ठिकाणीं दृष्टिदोष आढळतात, तेव्हां अशांना फुकट औषधाप्रमाणेंच फुकट चष्मे देण्याचीही व्यवस्था झाली पाहिजे. या बाबतींत पैसे खर्च करणाऱ्या कांहीं पालकांप्रमाणें ही व्यवस्था करणाऱ्या खात्यानेंही कांहीं मुलांच्या बाबतींत खर्च करण्यास तयार झालें पाहिजे.

शाळेंत प्रत्येक मुलाच्या नांवचें एक कार्ड ठेवून त्यांत प्रत्येक तपासणीची नोंद केली जावी. व मुलगा अगर मुलगी शाळा बदलील त्यावेळीं त्याच्या दाखल्याबरोबर हें कार्ड पाठवून द्यावें. अशा रीतीनें शाळेंतील शिक्षणक्रम संपेतोंपर्यंत शारीरिक तपासणीचे बाबतींत संगति राहील.

वैद्यकीय तपासणीच्या कार्यक्रमांत शाळेंतील शिक्षक व विद्यार्थी या दोघांकरितां सोप्या भाषेंत (१) आरोग्यशास्त्राचीं मूलतत्त्वें (२) खाण्याच्या बाबतींत पाळावयाचे नियम (३) कपड्यांचा योग्य उपयोग (४) खेळासाठीं मोकळ्या मैदानांची आवश्यकता (५) निजतांना हवा खेळावी म्हणून खिडक्या उघड्या ठेवण्याची जरूरी (६) घरीं करावयास बराच अभ्यास देण्याच्या विरुद्ध उपदेश (७) शरीरबल वाढविण्याची जरूरी अशा प्रकारचे विषयांवर व्याख्यानांची योजना करावी.

तसेंच ज्या शाळागृहांत मुलें आपले लहानपणचे बरेचसे दिवस घालवितात त्यांची आरोग्यशास्त्रदृष्ट्या तपासणी झाल्याशिवाय एकंदर वैद्यकीय तपासणीचा कार्यक्रम पुरा झाला असे म्हणतां यावयाचें नाहीं. हीं शाळागृहें आधुनिक शास्त्रीय पद्धतीप्रमाणें बांधलेलीं असावीं, तेथें हवेचा भरपूर पुरवठा होत असावा. शौचकूप चांगले असावे, जेवणाची जागा स्वच्छ व विस्तृत असावी, व पिण्याच्या स्वच्छ पाण्याचा भरपूर पुरवठा असावा. ज्या हौदांत पिण्याचें पाणी सांठविलें जातें तो हौद जर ६।६ महिने धुतला जात नसेल तर ती सांठविण्याची पद्धति बंद केली पाहिजे. (अपूर्ण)

# कोलंबस.

सुमारें चारशें वर्षांपूर्वी लोकांना आजच्याइतका पृथ्वीचा भाग माहीत नव्हता. त्या वेळीं आपण राहातों तें आशियाखंड, युरोपखंड व आफ्रिकेचा थोडा भाग एवढेंच जग माहीत होतें. अमेरिका सांपडल्यावर वरील भागास जुनें जग म्हणूं लागले व अमेरिकेस ' नवें जग ' हें नांव मिळालें.

त्यावेळीं युरोपांत इटली, स्पेन व पोर्तुगाल ह्या देशचे लोक समुद्रावर प्रवास करण्यांत फार हुशार होते. आपली पृथ्वी वाटोळी आहे, ही गोष्ट त्यांना माहीत नव्हती,तसेंच त्या वेळचीं जहाजेंही फारच लहान असत,त्यामुळें लांबचा व अज्ञात प्रवास करण्यास कोणी धजत नसत. हळू हळू छापण्याची कला माहीत होऊन पुस्तकें स्वस्त मिळूं लागलीं. पृथ्वी वाटोळी असावी असें शहाण्या लोकांचें मत बनत चाललें. दिशा दाखविणाऱ्या होकायंत्रांत बऱ्याच सुधारणा झाल्या, व त्यानंतर लोक लांबच्या सफरी करूं लागले, तेव्हां अमेरिकेचा शोध लागला.

हें खंड कोलंबसानें शोधून काढलें. हा इटली देशांत सन १४३७ सालीं जिनोआ शहरीं जन्मला. याचें नांव ' ख्रिस्तोफर '. बापाची गरीबी होती तरी त्यानें आपल्या मुलाला चांगलें शिक्षण दिलें. त्याचें गांव समुद्रकांठीं असल्यानें त्याला नेहमीं बंदरांत येणारीं व जाणारीं जहाजें पाहाण्याचा व खलाशांच्या तोंडून त्यांच्या प्रवासाच्या गोष्टी ऐकण्याचा फार नाद असे. तसेंच त्यानें ' मार्को-पोलो ' याच्या प्रवासाचीं उठावदार वर्णनेंही वाचलीं होतीं; त्यामुळें त्याच्या मनांत समुद्रप्रवासाची इतकी आवड उत्पन्न झाली कीं, सोळा वर्षांचा असतांनाच त्यानें जहाजावर नौकरी पत्करली. त्यानें इंग्लंडच्या उत्तरेस आइसलंडपासून आफ्रिकेंतील गिनीच्या किनाऱ्यापर्यंत सफरी केल्या. अशा रीतीनें त्यानें सुमारें तीस वर्षें समुद्रावर शिक्षण संपादन केलें; पण त्याच्या डोक्यांत कोणता तरी नवीन देश शोधून काढण्याचे विचार मात्र सतत घोळत असत.

भूगोल व खगोल हे त्याचे आवडते विषय असत. तो नकाशा काढण्यास शिकला; त्यानें अनेक लोकांच्या तोंडून प्रवासांच्या हकीगती ऐकल्या होत्या व वर्णनें वाचलीं होतीं, व स्वतः समुद्रावर दूरचे प्रवास केल्यानें त्याला अनेक प्रसंगांची प्रत्यक्ष ओळख झाली होती. इतक्या शिक्षणानंतर आपली बरीच तयारी

झाली असें त्यास वाटलें. तो चांगला विद्याव्यासंगी, शूर योद्धा व कुशल कर्णधार बनला होता.

पृथ्वी वाटोळी असावी, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री झाली होती. त्यामुळें युरोपच्या पश्चिम दिशेस एकसारखें जात राहिल्यास आपणांस खात्रीनें पूर्वेकडील देश ( आशिया ) लागतील, अशी त्यास खात्री वाटत असे. कारण समुद्रावर प्रवास करितांना त्या दिशेनें मनुष्यवस्ती दाखविणाऱ्या खुणा समुद्रांतून युरोपच्या किनाऱ्याकडे वाहात आलेल्या त्यास आढळल्या होत्या.

तेव्हां ते अज्ञात भाग शोधण्यास आपणांस कोणी जहाजें व पैसा देईल तर पाहावें, म्हणून तो पोर्तुगालच्या राजाकडे गेला; पण त्यास तेथें मदत मिळाली नाहीं. तेव्हां तो स्पेनला गेला. तेथील राणी इसाबेला हिनें त्यास भरपूर मदत केली, तेव्हां कोलंबस सफरीवर निघाला.

त्याचा प्रवास सुमारें दोन महिने चालू होता, पण जमिनीचें नांव नाहीं! बरोबरचे खलाशी अगदीं भेदरून गेले होते. कांहीं तर बंड करून उठले, व कोलंबसास जलसमाधि देण्याचा त्यांनीं बेत केला. कारण येथून परत गेलों तर निदान दोन महिन्यांनीं तरी स्पेन देशास आपले पाय लागतील, असें त्यांना वाटे. या वेडे पिराबरोबर आपण कशाला आलों, असें त्यांना झालें होतें, पण करतात काय?

कोलंबस कांहीं लेचापेचा नव्हता. त्यालाही जगाचा चांगला अनुभव होता. या वेळीं खलाशांना थोडा धीर दिला पाहिजे, असें त्याला वाटलें, व कधीं लवकर सांपडणारी जमीन व तेथील सोनें यांचें काल्पनिक चित्र काढून, तर कधीं धाकदपटशा दाखवून त्यानें एकेक दिवस पुढें ढकलण्याचा क्रम चालू ठेविला होता. असें होतां होतां एके दिवशीं पहांटे एकदांची जमीन दिसली!! मग आनंदास काय विचारतां? जो तो टोपी उडवूं लागला. व आरोळ्यांनीं त्यांनीं सर्व आकाश दणाणून सोडलें. लहान नावा पाण्यांत टाकल्या व ते किनाऱ्याकडे जाऊं लागले. जमीन आल्यावर प्रथम कोलंबसानें जमिनीवर पाय ठेवला.

जमीन दिसूं लागल्याबरोबर कोलंबसानें भारी किंमतीचा पोशाख चढविला होता. त्याच्या कमरेस तरवार लटकत होती. त्याच्या मागोमाग त्याच्या बरोबरचे इतर लोक उतरले. खालीं उतरल्यावर त्यानें स्पेनचें निशाण तेथें रोवलें, व त्याच्या खालीं बसून ज्या परमेश्वरानें आपणांस ही नवीन जमीन दाखविली, त्याचे अंतःकरणपूर्वक आभार मानले.

पुढें ही सांपडलेली जमीन एक बेट आहे असें त्यांना आढळलें. त्यांचा त्यानें स्पेनच्या नांवानें ताबा घेतला. नंतर आजूबाजूंचीं कांहीं बेटें शोधून त्या शोधाची मांहिती स्पेनच्या राजाराणीस कळविण्यासाठीं तो परत निघाला. खूण म्हणून त्यानें तेथील कांहीं रानटी लोक, तेथें सांपडणारे कांहीं प्राणी, तसेंच इतर मूल्यवान वस्तु व सोनें हे जिन्नस आपल्याबरोबर घेतले.

अशा रीतीनें एवढा लांबचा प्रवास करून यश संपादन केल्याबद्दल परत आल्यावर स्पेन देशांत त्याचा विलक्षण गौरव झाला. नंतर कोलंबसास त्या प्रांताचा गव्हर्नर नेमण्यांत आलें. तेथें त्यानें दोन तीन सफरी केल्या. त्याला पुढें जमिनीचा मुख्य भाग सांपडला, पण त्या खंडास अमेरिका म्हणूं लागले. मुलांनो, तें खंड कोलंबसानें शोधून काढलें, म्हणून त्यास काय नांव द्यावयास पाहिजे होतें बरें?

---

# पुणें तें क्वेटा.

आम्ही मुंबईस जाण्याकरितां पुण्याहून सकाळीं मोटार गाडींतून निघालों. घाटांतलि प्रवास आल्हादकारक वाटला. तळेगांवच्या पुढें गेल्यावर हवा थंडगार लागूं लागली, व घाट उतरत असतांना चांगली तरतरी आली. घाटामध्यें प्रथम सौम्य चढ व नंतर सरळ उतार लागतो. आम्हीं मोटार गाडींतून मुंबईचा प्रवास करण्यापूर्वीं पुणें समुद्रसपाटीपासून किती उंच आहे, याची आम्हांला कल्पना नव्हती. घाटांत मोठमोठीं वळणें आहेत. या वळणांच्या कोपऱ्यांवरून जातांना एका बाजूला अगदीं रस्त्याच्या कडेला मोठमोठे तुटलेले कडे व पाताळासारख्या खोल दऱ्या पाहून अंगावर कांटा येतो, तर उलट दुसरे बाजूस हिरव्यागार वृक्षवनस्पतींनीं व गवतांनीं गजबजलेल्या टेकड्यांमधून झर झर वाहणारे झरे व कोठें कोठें दिसणारे धबधबे असा एकवटलेला देखावा मोठा रमणीय दिसतो. दोन तासांत मनुष्य घाट उतरून सपाट रस्त्यावर येतें. पायथ्याशीं आल्याबरोबर हवेंत झालेला बदल एकदम दृष्टीस पडतो. हवा जरी अद्याप थंड असते, तरी तिच्यांतील शिरशिरी नाहींशी होऊन तिच्यांत असलेला दमट ओलसरपणा भासूं लागतो. पायथ्यापासून मनुष्य दोन तासांत मुंबईस येतें.

आम्हीं मुंबईहून अहमदाबादचा प्रवास रात्रीं केला, परंतु हा प्रदेश सर्वांच्याच परिचयाचा असल्यामुळें त्याचें वर्णन करण्याची जरुरी नाहीं. अहमदाबादेस गाडी बदलावी लागते, व अरुंद रुळावरील गाडींतून प्रवासाला सुरवात होते. गाडींतून जातांना आसपास हिरव्यागार झाडांची गर्दी व धान्याचीं शेतें पाहावयास सांपडतात. जसजसा अबूचा पाहाड जवळ येऊं लागतो, तसतशी हवा विशेष मोकळी व थंड भासूं लागते; परंतु नंतर तात्काळ तिच्यांत बदल होऊन ती रुक्ष व कोरडी होते. अबू सोडल्यानंतर भोंवतालच्या देखाव्यामध्यें हळूहळू फरक पडत चालला. भोंवतालचा प्रदेश सपाट असून तो हिरव्यागार शेतांनीं आच्छादिलेला दिसतो. मध्येंच कोठेंतरी मोठमोठाले खडक एकावर एक रचल्यासारखे पाहावयास सांपडतात. मधून मधून तांबड्या विटांचीं घरें दृष्टीस पडतात. या घरांना माळवदी घरांप्रमाणें वर सपाट गच्ची केलेली असते, व बाहेरील भिंतींना कमानदार दरवाजे केलेले दिसतात. तेथून पुढें वालुकामय प्रदेशास सुरवात होते; अर्थात् हिरवींगार शेतें फारशीं कोठें दिसत नाहींत. आमची गाडी जेव्हां मारवाडांत आली तेव्हां जयपूर संस्थानांतून जातांना तांबड्या व रुक्ष वाळवटांचा जो देखावा दृष्टीस पडला, त्याची आम्हांला आठवण झाली. लाल कुरुंदी दगडाचीं धाब्याचीं घरें कमानदार दरवाजे दिसत होते. हैद्राबाद येईपर्यंत सर्व रात्रभर आमची गाडी त्या वाळवंटांतून चालली होती. सकाळीं हैद्राबादच्या अलीकडे मिरपूरखास स्टेशनवर व स्टेशनच्या आसपास वड, पिंपळ, शिरस व कण्हेर हीं झाडें पाहून आम्हांला मोठें कौतुक वाटलें.

हैद्राबाद शहर दिवसेंदिवस सुधारत आहे. येथील घरें तांबड्या दगडांचीं असून वस्तीही मोठी आहे. हैद्राबाद स्टेशनमधून बाहेर पडल्यापासून संध्याकाळपर्यंत गाडीच्या दोहीं बाजूंस क्षितिजापर्यंत पांढऱ्या वाळूशिवाय शण्थेला कांहीं दिसत नव्हतें. जिकडे तिकडे वाळूचे ढीगच ढीग होते. व समुद्रावर वादळ सुटलें असतांना जशा लाटा उत्पन्न होतात, तशा सोसाट्याच्या वाऱ्यानें त्यामध्यें लाटाच उत्पन्न होत आहेत कीं काय असें वाटे. केव्हां केव्हां बाभळीचीं, शेराचीं वगैरे झाडें दिसत. कोठें विशेष ओलसर जागा असल्यास उंच वाढलेलें गवतही दिसे. केव्हां केव्हां ज्वारी व बाजरीचीं शेतें चांगलीं पिकलीं आहेत व शेतामध्यें माळा घालन शेतकरी आपल्या गोफणीनें पाखरांना हाकून लावीत आहे, असा देखावा दृष्टीस पडे. परंतु एकंदरींत अशा ह्या रुक्ष व वालुकामय प्रदेशाकडे पाहातांना आफ्रिकेंतील सहारा

वाळवंट कसें असेल व त्यांतून प्रवास करणें किती रुक्ष व कंटाळवाणें असलें पाहिजे याची अंधुक कल्पना येते. या वालुकामय प्रदेशांत सूर्य क्षितिजाखालीं हलके हलके न जातां एकदम मावळतो व आपल्याइकडे सूर्यास्तानंतर रम्य असा संधिप्रकाश जसा पाहावयास सांपडतो. तसें तेथें कांहीं नसतें. नाहीं म्हणावयास आकाश किंचित् तांबूस दिसतें.

दुर्दैवानें आम्ही सक्करला रात्रीं पोहोंचलों. मोठमोठे पहाड व खडकाचे उंच गेलेले सुळके, मोठमोठ्या खिंडी व त्या खिंडींतून नागमोडी वळणें घेत जाणारे रस्ते; तसेंच जागोजाग विजेच्या दिव्यांचा लखलखाट; सिंधू नदीच्या विस्तीर्ण पात्रावर घातलेला तो लोखंडी भव्य पूल; नदीच्या दोन्ही तीरांवर, तिच्या पात्रांत, आमच्या अगदीं जवळ व कित्येक मैल दूर अशा असंख्य विजेच्या दिव्यांचा लखलखाट; असा हा सर्व एकवटलेला देखावा त्या वेळच्या निबिड अंधकारांत अपूर्व व विलक्षण असा दिसला. सिंधूवरील पूल पाहून आम्हांला इंग्लंडमधील फोर्थ नदीवरील पुलाची आठवण झाली. शिकारपूर, जाकोबाबाद या शहरांवरून आम्ही मध्यरात्रीं गेलों, व पहाटे तीन वाजतां आम्ही जागे होऊन पाहातों तों जिकडे तिकडे उंचच उंच पर्वत असून आमची गाडी बोलन घाटांतील बोगद्यांतून चालली आहे असें दिसलें. त्या वेळची हवा गार होती व आतां ते वाळूचे ढीगही कोठें दिसत नव्हते. त्या रुक्ष वाळवंटांतून बाहेर पडल्यामुळें आम्हांलाही बरें वाटलें. आम्ही सकाळीं ७ वाजतां मच येथें पोहोंचलों. तेथें खिडकी उघडून बाहेर पाहातों तों अत्यंत भिन्न असा भूप्रदेश दृष्टीस पडला. शपथेला एकदेखील झाड दिसत नव्हतें. जिकडे तिकडे वाळू व दगड यांचे एकावर एक थर दिल्याप्रमाणें पांढऱ्या सफेत टेकड्या, तर कोठें कोठें त्या टेकड्यांतील दगड भले जंगी दिसत. टेकड्यांचे थरही कित्येक ठिकाणीं तांबूस होते. गवत फारसें कोठें दिसतच नव्हतें; पण कोठें तें दिसलें तर कसें तरी आपण जिवंत आहों याची तें साक्ष पटवीत होतें! कदाचित् हिंवाळ्याचे दिवस असल्यामुळें हा प्रकार असेल. वसंत ऋतूंत तेथें वनश्री जास्त खुलत असेल. महाराष्ट्रांतील लोकांना नेहमीं हिरवळ टेकड्या पाहाण्याची संवय असल्यामुळें हा देखावा आपल्या डोळ्यांना मोठा विलक्षण दिसतो. हे उघडे पर्वत पाहून वृक्षवनस्पतींचें, लताकुंजांचें व चित्रविचित्र फुलांनीं शोभायमान झालेलें हिरवेंगार वस्त्र परमेश्वरानें यांच्या अंगावर घालण्यापूर्वी हे नुकतेच निर्माण केले आहेत कीं काय अशी कल्पना मनांत येते.

या स्थानापासून आमची गाडी क्वेट्यापर्यंत हळूहळू पर्वतप्रदेश चढत गेली व शेवटीं आम्ही क्वेट्याला पोहोंचलों.

क्वेटा हें हिंदुस्तान नव्हे. तें हिंदुस्तानाहून कांहींतरी भिन्न आहे असें पाहाणारास वाटतें. भौगोलिक दृष्टीनें तें शहर हिंदुस्तानचा भाग नव्हे; तरीपण तें दुसऱ्या कोणत्याही देशांत मोडत नाहीं. त्या शहरांत अफगाण, बलूची, गुरखे व थोडे हिंदू असे सर्व धर्मांचे लोक चोहोंकडे पसरलेले दिसतात. त्या शहरच्या रस्त्यांतून हिंडतांना सरहद्दीवर राहाणारे उंच व धिप्पाड पठाण, तसेच गुटगुटीत गुरखे जागोजाग दृष्टीस पडतात. हिंदुस्तानांतील माणसांप्रमाणें सडपातळ अशी एकही व्यक्ति येथें दिसत नाहीं. ख्रिश्चियन व खालच्या वर्गांतील स्त्रिया यांखेरीज रस्त्यांत एकही स्त्री फिरकतांना दिसावयाची नाहीं. शहरांतील एकंदर सर्व वातावरण लष्करी बाण्याचें दिसतें.

क्वेटा व आसपासचा प्रदेश रुक्ष, नापीक व भयाण असून जिकडे तिकडे धूळच धूळ दृष्टीस पडते. शहराच्या भोंवतीं सर्व बाजूंनीं टेकड्यांचा गराडा आहे. परंतु त्या टेकड्यांवर गवताची एक हिरवीगार काडीसुद्धां दिसत नाहीं. लष्करी हद्दींतील रस्त्यांच्या दोन्हीं बाजूंना चिनार व कांहीं शिरस लावलेले दिसतात. परंतु काश्मीरमधील चिनारप्रमाणें तीं झाडें सुंदर दिसत नाहींत. कोठें एखाद्या ठिकाणीं भरपूर पाणी मिळाल्यास हिरवागार बगीचा दिसतो; व तेथें फळांचे घोस लटकलेले दृष्टीस पडतात. परंतु बलुचिस्तानांत पाऊस अल्प व नद्यांचा अभाव यामुळें तेथें पाण्याचा फारच तुटवडा आहे. कोठें गाटेगोटे यांतून वाहात असलेला झरा दृष्टीस पडतो. परंतु त्या झऱ्याचा गार देखावा व भोंवतालचा रुक्ष देखावा यांमध्यें जमीन अस्मानचें अंतर पडतें. अमुक एका ठिकाणीं झरा आहे हें वाहात असलेल्या पाण्यावरून नव्हे, तर कांठांवर उगवलेल्या सुंदर झाडांवरून ओळखतां येतें. कारण झऱ्यांतील पाणी डोळ्यांना दिसत नाहीं. आम्ही तेथें नोव्हेंबर महिन्यांत गेलों असल्यामुळें त्यावेळीं झाडांच्या पानांना तांबडा व पिवळा रंग होता व त्यामुळें तीं सुंदर दिसत होतीं. तीं झाडें पाहून आम्हांला इंग्लंडमधील ग्रीष्मऋतूची आठवण झाली.

सायंकाळीं आकाश निरभ्र असतें त्यावेळीं मावळत्या सूर्याचे सोनेरी तांबूस किरण भोंवतालच्या टेकड्यांवर पडले म्हणजे त्या रुक्ष टेकड्यादेखील त्या

वेळीं फारच सुंदर दिसतात. वृक्षवनस्पतींनीं गजबजलेल्या प्रांतांत आम्ही राहाणारे असल्यामुळें आमच्या डोळयांना कित्येक वेळां क्वेटा एथील प्रदेश अत्यंत रुक्ष व भयाण असा वाटला. अशा वेळीं एकादें हिरवेंगार लहान मोठें झाड दृष्टीस पडलें म्हणजे आम्हांला आनंद वाटे. पहाडी, रुक्ष व भयाण प्रदेश व त्यांत राहाणारीं धिप्पाड, तढेजवान व उग्र चेहऱ्याचीं माणसें पाहिलीं म्हणजे भूप्रदेश व हवामान यांचा मनुष्याच्या शरिरावर केवढा मोठा परिणाम होतो याचें मूर्तिमंत चित्र डोळयांपुढें दिसतें.

## परत येतांना सक्कर येथें दिसलेला प्रभातकालचा देखावा.

आपल्या महाराष्ट्रांतील कोणत्याही शहराची उपमा सक्करला देतां येणार नाहीं. जरूशलेम, दमास्कस अथवा कायरो या शहरांच्या चित्राप्रमाणें तें दिसतें. पांढऱ्या सफेत टेकड्या व त्याभोंवती पांढऱ्या अथवा तांबड्या विटांनीं बांधलेल्या धाब्यांच्या घरांचा गराडा, तसेंच घरांच्या लहान लहान खिडक्या असा देखावा दुरून दृष्टीस पडतो. लांब अंतरावर दगडी इमारतीही दिसतात. त्या सरकारी कचेऱ्या असाव्यात. सिंधूच्या पात्रावर सक्कर येथें एक व रोहरी येथें दुसरा असे दोन भव्य लोखंडी पूल घातले आहेत. पुलांवरून जातांना सिंधूचें तें विस्तीर्ण पात्र दोन्ही बाजूंस लांबवर पसरलेलें दिसतें. उजव्या तीरावर सूर्योदयाचा देखावा अत्यंत रम्य असा आम्हांला दिसला. क्षितिजांतून वर येतांना सूर्यप्रकाश सिंधूच्या त्या विस्तीर्ण पात्रावर पडलेला मोठा मनोहर दिसतो. त्यावेळीं पाण्यावर गुलाबी रंगाची झाक मारते. नदीच्या तीरावर कांहीं ठिकाणीं हिरवींगार नारळीचीं झाडें उंच गेलेलीं दिसतात. नदीमध्यें सूर्यप्रकाशांत चमकत असलेलें सुंदर बेट आणि कांहीं नांगरून पडलेल्या, तर कांहीं तिच्या त्या विस्तीर्ण पात्रावर इकडून तिकडे संचार करीत असलेल्या बोटी असा हा एकवटलेला देखावा मोठा रम्य दिसला.

## मुलींच्या व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेचा कार्यक्रम—सन १९२८

| दिवस, तारीख | वेळ | विषय |
|---|---|---|
| मंगळवार १०–४–१९२८ | १० ते ११ | उमेदवारांचीं नांवें नोंदणें व फी वसूली |
| | ११–३० ते २–३० | भाषा—सदर १ लें. ब, क |
| | ३ ते ५ | भाषा—सदर २ रें. अ, ब (निबंध, लेखन व शुद्धलेखन) |
| बुधवार ११–४–१९२८ | ११ ते १ | इतिहास—सदर ५ वें |
| | २ ते ४ | आरोग्यशास्त्र—सदर ६ वें |
| गुरुवार १२–४–१९२८ | ११ ते २ | अंकगणित आणि घरगुती जमाखर्च—सदर ३ रें |
| | ३ ते ५ | भूगोल—सदर ४ थें |
| शुक्रवार १३–४–१९२८ | ७–३० ते १०–३० | शिवण—सदर ७ वें |
| | ३ ते ५ | ऐच्छिक विषय—सदर ८ वें. ड्रॉइंग, सृष्टिनिरीक्षण किंवा गायन |

टीप—तोंडी परीक्षा (सदर १ अ आणि ड या विषयांत) लेखी परीक्षा चालू असतांना घेतली जाईल.

२—ऐच्छिक विषयांपैकीं उमेदवारांनीं परीक्षेकरितां एक विषय घेतलाच पाहिजे.

R. NAVALKAR,

**चेअरमन, मुलींची व्ह. फॉ. परीक्षा कमेटी, पुणें.**

# जाहीरपत्रक.

—:o:—

( मेहेरबान डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट साहेब बहादूर यांनीं प्रसिद्ध केलेलें. )

## रस्त्याचा नियम.

( पायीं चालणारांस व गाडीवानांस सूचना. )

### १. "प्रत्येक वस्तूकरितां ठरलेली जागा, आणि प्रत्येक वस्तु नेमक्या जागीं."–

अशी एक इंग्रजी म्हण आहे. हा नियम पाळल्यास प्रत्येक वस्तु सांपडणें किती सोपें आहे व हा नियम मोडल्यास तीच वस्तु सांपडणें किती कठीण आहे हें तुम्हीच सांगू शकाल. एखादी वस्तु नेमक्या जागीं सांपडली नाहीं, तर आपणांस फार त्रास होतो ! हा नियम ज्याप्रमाणें शाळेंत अगर घरांत लागू आहे, त्याप्रमाणें बाहेर रस्त्यासही लागू आहे. रस्त्याचा नियम गाड्या व मोटारगाड्या यांनीं पाळला नाहीं, तर आपणांस असाच त्रास होतो. अपघात टाळावयाचे असतील तर रस्त्याचा उपयोग करणाऱ्या प्रत्येक इसमानें रस्त्याचा नियम पाळला पाहिजे. " डाव्या बाजूनें गाडी हांकावी, " यालाच 'रस्त्याचा नियम' असें म्हणतात. हा नियम प्रत्येक गाडीवाल्यानें काळजीपूर्वक पाळला, तर समोरून येणाऱ्या गाडीवाल्यास अगर पायीं चालणाऱ्यास यत्किंचितही धक्का लागण्याचा संभव नाहीं.

### २. पायीं चालणारांनीं खालील नियम लक्षांत ठेवावेः—

(१) रस्त्याच्या कांठानें चालावें. गाड्या व मोटारींकरितां रस्ता मोकळा ठेवावा.

(२) रस्त्याच्या मध्य बाजूस कधींहि चालूं नये.

(३) रस्ता ओलांडतांना रस्त्याच्या दोन्ही बाजूंस पाहून तडक रस्त्याच्या दुसऱ्या बाजूस जावें; मध्यें घुटमळूं नये, थांबूं नये अगर धावूं नये. प्रथम उजवे बाजूस पाहून अर्धा रस्ता ओलांडावा, नंतर डावे बाजूस पाहून अर्धा रस्ता ओलांडावा.

(४) तुम्हांस तुमच्या स्नेह्याशीं गप्पा मारीत रस्त्यांत उभें रहावयाचें असल्यास रस्त्याच्या एका बाजूस उभें रहावें; मध्यें उभे राहूं नये.

### ३. गाडीवाल्यानें खालील नियम लक्षांत ठेवावेः—

(१) डाव्या बाजूनें गाडी हाकावी.

(२) तुमच्या पुढें चालणाऱ्या गाडीस मागें टाकून पुढें जावयाचें असल्यास तुमची गाडी उजव्या बाजूनें पुढें हांकावी.

(३) तुम्हांस तुमची गाडी थांबवावयाची असेल अगर वळवावयाची असेल तर तसा इशारा हाताच्या खुणेनें मागील गाडीवाल्यास द्यावा.

(४) रस्ते मिळतात अशा ठिकाणीं रस्त्याच्या कोपऱ्यावर अगर वाकणावर गाडी हांकतांना फार काळजी घ्यावी.

(५) सूर्यास्तानंतर दिवा लावल्यावांचून गाडी हाकूं नये.

४. गाडीवाल्यांनीं अगर पायीं चालणारांनीं रस्त्याच्या रहदारीचे नेयम करणाऱ्या पोलीस अमलदाराचे हुकूम विनशर्थ पाळले गाहिजेत.

५ रस्त्याच्या कांठास पायीं चालणारा, त्याच्या पलीकडे बैल गाडी अगर घोड्याचे टांगे आणि त्याच्या पलीकडे मोटारगाडी, अशा शिस्तीनें रहदारीचे नियम पाळल्यास अपघात होण्याचा संभव रहात नाहीं.

डेप्युटी. चिटणीस डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट.

---

# मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परिक्षा.

ता.१ आक्टोबर १९२५चें मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ पानें २५४४ ते २५४८ ह्यांत प्रसिद्ध झालेला शाळा खात्याचा सरकारी ठराव नं. २६३६ ता. १८ आगष्ट १९२५ आणि मुंबई सरकारचें गॅझेट भाग १ पानें १२५८ व २५१९ ह्यांत अनुक्रमें ता १९ मे १९२७व ता.३नवंबर१९२७रोजीं प्रसिद्ध झाल्याप्रमाणें शाळाखात्याच्या सरकारी ठराव नं. २६३६ ता. १२ मे १९२७ व ता. २९ आक्टोबर १९२७ बरहुकूम मुलींची व्हर्न्याक्युलर फायनल परिक्षा मध्यभागांतील सर्व जिल्ह्यांत मंगळ वारीं ता. १० एप्रील १९२८ रोजीं व पुढील दिवशीं होईल. या भागांत अहमदनगर, धुळें, जळगांव, पुणें व सातारा व सोलापूर हे परीक्षेचे सेंटर आहेत.

( २ ) प्रत्येक सेंटरला परीक्षा स्थानिकपरीक्षा कमिटीकडून घेतली जाईल. पुणें एथें लेडी सुपरिन्टेंडंट ट्रेनिंग कॉलेज फॉर वुईमेन व सातारा, सोलापूर जळगांव व धुळें या ठिकाणच्या स्थानिक कमिट्यांचे हायस्कूलचे हेडमास्तर हे अध्यक्ष नेमले आहेत. अहमदनगर येथें अँग्लो व्हर्न्याक्युलर मुलींच्या मिडलस्कूलच्या हेडमिस्ट्रेस या स्थानिक कमिटीच्या अध्यक्ष आहेत.

( ३ ) उमेदवारांनीं या परीक्षेस बसण्यासंबंधीं अर्ज ठराविक छापील नमुन्यावर आपापल्या जिल्ह्याच्या स्थानिक कमिटीच्या अध्यक्षाकडे १ मार्च १९२८ रोजीं अगर त्यापूर्वीं पोहोंचतील अशा बेतानें पाठवावे. अर्जाचे नमुने त्या त्या जिल्हा कमिटीच्या अध्यक्षाकडे फुकट मिळतील.

( ४ ) प्रत्येक उमेदवारास परीक्षेची ३ रु. फी. पडेल.

( ५ ) परीक्षेस लागणाऱ्या पुस्तकांची यादी १४ एप्रिल १९२७ रोजीं प्रसिद्ध झालेलें मुंबई सरकारचें गॅझेट भाग २ ग पान ८८७ मध्यें प्रसिद्ध झाली आहे.

( ६ ) मुसलमान मुलींची उर्दू व्हर्न्याक्युलर फायनल परिक्षा वर दिलेल्या ठिकाणींच होईल.

के. जी. जोशी.

ए. इ. मध्यभाग, पुणें.

पुणें ता. २२ दिसेंबर १९२७

# गणिताचा नवीन अभ्यासक्रम.

## बालवर्ग.

### अंकगणित.

( १ ) **अंक मोजणें:**—१०० पर्यंत अंक मोजणें, वाचणें व लिहिणें ( वस्तूंच्या साह्यानें अंक मोजणें. )

( २ ) **वस्तूंचे गट तयार करणें:**—दोन दोन, तीन तीन, चार चार, पांच पांच आणि दहा दहा वस्तूंचा एक एक असे गट करणें.

( ३ ) **तोंडी बेरीज:**—पांच पर्यंत कोणतीही संख्या १०० पर्यंतच्या कोणत्याही संख्येंत मिळविणें. परंतु ज्यांत हातचा दशक अगर शतक येतो, अशा बेरजा घेऊं नयेत. ७०–२८ आणि ४; ९८ आणि ५. आरंभीं कांहीं दिवस मुलांनीं आपलीं उत्तरें बरोबर आहेत कीं नाहींत, हें प्रत्यक्ष वस्तु मोजून पहावें.

### भूमिति.

( १ ) **आकार:**—घन, चिति, गोल ( चेंडू ) यासारख्या घनाकृतींचीं नांवें, त्यांच्या बाजू, कडा, कोपरे, वक्रता यांची मुलांस ओळख व्हावी म्हणून असले पदार्थ मुलांच्या हातीं द्यावेत.

( २ ) **गिरवणें:**—या वस्तूंचे फळ्यावर किंवा पाटीवर काढलेले आकार गिरवणें.

( ३ ) **कागदास घड्या घालणें:**—चौरस व काटकोन चौकोन.

## इयत्ता १ ली.

### अंकगणित.

( १ ) **संख्या:**—१००० पर्यंत संख्यालेखन व संख्यावाचन. एकक, दशक व शतक ह्यांचें ज्ञान. 'शून्याचा' उपयोग.

( २ ) **चार कृत्यें:**—(अ) १०० च्या आंतील कोणत्याही संख्येंत १० चे आंतील कोणतीही संख्या तोंडी मिळविणें किंवा वजा करणें. सोप्या व व्याव-

हारिक उदाहरणांत येणाऱ्या दोन अंकी संख्यांची बेरीज व वजाबाकी लेखी करणें. पैशासंबंधीं साध्या उदाहरणांतील बेरीज व वजाबाकी करणें.

( **ब** ) **तोंडी गुणाकारः**—(१) एका संख्येंत तीच संख्या अनेकदां मिळविणें. जसें तिही तिहींचे ३ गट = ९

( २ ) गुणणें. जसें–३ वेळां ३ = ९

( **क** ) **तोंडी भागाकारः** —एक संख्या दुसऱ्या संख्येंत किती वेळां येते हें मोजून पाहाणें. जसें ' आठांत २ हे किती वेळां येतात ? '

( **३** ) **पाढेः**—प्रत्यक्ष वस्तूंच्या साहाय्यानें १०×१० पर्यंत पाढे तयार करणें व ज्यांत त्यांचा उपयोग होईल अशीं तोंडी उदाहरणें करणें.

( **४** ) **देशी नाणींः**—देशी चालू नाण्यांची व त्यांच्या कोष्टकांची माहिती, रोजच्या व्यवहारांतील हिशेबांत या माहितीचा उपयोग करितां येणें.

**टीपः**— पहिल्या इयत्तेंतील लेखी काम शक्य तितक्या सोप्या स्वरूपाचें असावें.

### भूमिति.

( **१** ) **नक्षीः**—सरळ रेषांच्या अथवा ठिपक्यांच्या आकृतींनीं चौरस व काटकोन चौकोन भरणें.

( **२** ) **चित्रकलाः**—पेट्या, चौकटी, चौरस, काटकोनचौकोन, काटकोनाकृति कोपरे इत्यादिकांच्या साधारण आकृति काढतां येणें.

---

## इयत्ता २ री.

---

### अंकगणित.

( १ ) **संख्याः**—एक लक्षापर्यंत संख्यालेखन व संख्यावाचन.

( २ ) **चार कृत्यें**:—( अ ) १०,००० पर्यंत संख्यांची बेरीज व वजाबाकी. + व – या चिन्हांचा उपयोग.

( ब ) दोहोंपेक्षां जास्त आंकडे नसलेल्या संख्येनें १०,००० पर्यंतच्या संख्येस गुणणें ( गुणकांतील डावीकडील आंकड्यानें गुणाकाराला आरंभ करणें हें जास्त चांगलें होईल. )

( क ): —(१) वाटे करणें. ४।४ चा एक वाटा असे १६ त किती वाटे होतील ? म्हणजे १६ त किती ४ आहेत ?

( २ ) हिस्सा काढणें. उदा० ' १६ चा चौथा हिस्सा किती ' ? ह्या दोन कल्पनामधील संबंध. ज्याचा पाढा मुलांना येत आहे अशा भाजकानें दोहोंपेक्षां जास्त आंकडे नसलेल्या १०,००० पर्यंतच्या संख्येस भागणें.

×, ÷ ह्या चिन्हांचा उपयोग करणें.

( ३ ) **पाढे व कोष्टकें**:—२०×१०=२०० पर्यंतचे पाढे; वेळ, लांबी, वजन व माप यांचीं स्थानिक कोष्टकें व त्यावरून होणारीं सोपीं उदाहरणें ( मुलांनीं आपल्या हातांनीं वजनें व मापें करावीं, आणि त्यांना अंदाजानें मापें व वजनें सांगतां यावीं )

( ४ ) **अपूर्णांक**:—अर्धा, पाव, पाऊण, सव्वा, दीड इत्यादि साध्या अपूर्णांकांचा अर्थ व ते लिहिण्याची देशी (रेघी) पद्धति.

**सूचना**:—रोजच्या व्यवहारांतील हिशेब करण्याला ज्यांचा उपयोग होईल अशीं वरील सर्व विषयांवर तोंडी उदाहरणें.

## भूमिति.

( १ ) **नक्षी**:—पहिल्या इयत्तेंतील अभ्यासक्रम पुढें चालू.

( २ ) **चित्रकला**:—खिडक्या, शाळेंतील खोल्या वगैरे काटकोन चौकोनाकृति पदार्थांचे आराखडे, आखणी व गुण्या यांचा बिनचूक उपयोग. आराखड्यावर पदार्थांच्या जागा ठरविणें.

---

# इयत्ता ३ री.

---

## अंकगणित.

( १ ) **संख्या**:—एक कोटीपर्यंत संख्यालेखन व संख्यावाचन.

( २ ) **चार कृत्यें**:—बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार यांचीं अधिक अवघड उदाहरणें

( अ ) ज्यांत पैशांचे व्यवहार येतील, अशीं लांब गुणाकाराचीं उदाहरणें.

( ब ) **संक्षिप्त भागाकार**:—संख्येला अगर रकमेला एक अंकी संख्येनें भागणें.

( क ) लांब भागाकाराची संक्षिप्त भागाकाराशीं तुलना.

( ड ) अर्थदर्शक परिमाणांची भांजणी.

( ई ) रेषीबेरीज, वजाबाकी आणि विविध परिमाणांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार.

( ३ ) **पाढे व कोष्टकें**:—( अ ) पूर्वींच्या इयत्तांतील अभ्यासाची उजळणी व गुजराथी शाळांत २४, ३०, ३२, ४० चे पाढे.

( ब ) इंग्रजी नाण्यांचीं कोष्टकें.

( ४ ) अपूर्णांकाचीं कृत्यें पुढें चालू:—

$\frac{1}{2} = \frac{3}{6} = \frac{5}{10}$ अपूर्णांकाची किंमत सारखीच आहे ही कल्पना देणें. साध्या अपूर्णांकाची बेरीज व वजाबाकी.

( ५ ) **प्रमाण**—एकमानपद्धति. एकमानपद्धतीनें समप्रमाणाचीं सोपीं उदाहरणें.

**सूचना**—रोजच्या व्यवहारांत उपयोगीं पडतील अशीं वरील सर्व विषयांवरील तोंडी उदाहरणें.

## भूमिति.

( १ ) **चित्रकला**:—दिलेल्या प्रमाणांत आकृति काढणें, वर्तुळ काढणें, लंब गोलाकृति डब्या बनविणें.

( २ ) **कागदास घड्या घालणें**:—वर्तुळास घड्या घालणें.

---

# इयत्ता ४ थी.

---

## अंकगणित.

( १ ) **संख्या**:—अवयव. संख्येचे मूळ अवयव काढणें. उदाहरणार्थ ३६० = २ × २ × २ × ३ × ३ × ५ अवयव पाडणें.

**अंकगणित विषयक कृत्यें**:—थोडक्यांत करण्याची रीति. उदाहरणार्थ—५१ अथवा ४९ नीं गुणणें असल्यास ५० नें गुणून आलेल्या गुणाकारांत गुण्य मिळविणें अथवा वजा करणें.

२५ व १२५ यांनीं गुणणें आणि भागणें.

( २ ) **अपूर्णांक**:—(अ) अपूर्णांकांची बेरीज व वजाबाकी यांचीं सोपीं व सरळ उदाहरणें.

( ब ) ‘ चे ’ चें कृत्य. अपूर्णांकानें अपूर्णांकास भागणें. विषम अपूर्णांक.

( क ) संक्षेप—जरूर दिसेल तेथें अपूर्णांकास संक्षेप देणें.

( ३ ) **प्रमाण**:—एकमानपद्धति. एकमानपद्धतीनें साध्या व संयुक्त प्रमाणांचीं सोपीं व्यावहारिक उदाहरणें सोडविणें.

( ४ ) **व्याज–सरळव्याज**—( अ ) फक्त व्याज काढणें.

( ब ) देशी पद्धतीप्रमाणें म्हणजे कच्च्यांवरून व्याजाचे हिशेब करणें.

( ५ ) **महत्त्वमापन** ( अ ) काटकोन चौकोनाचें क्षेत्रफळ काढणें ( हा भाग शिकवितांना मुलांना प्रत्यक्ष मोजमाप घेऊन क्षेत्रफळ काढण्यास लावावें. ) काटकोन चौकोनाच्या क्षेत्रफळाचीं उदाहरणें व फरसबंदी करणें, रंग देणें इत्यादिकांच्या किंमती काढण्याबद्दलचीं उदाहरणें. क्षेत्रपरिमाणें व घनपरिमाणें.

( ब ) घनफळाचीं सोपीं उदाहरणें. घनपरिमाणें

**जमाखर्च**—घरगुती साध्या व्यवहारांचा सोपा जमाखर्च लिहिणें. ( जमा व खर्च यांच्या मूलभूत सामान्य कल्पना ) शाळेंतील विद्यार्थ्यांनीं चालविलेल्या स्टेशनरी सामानाच्या दुकानाचा जमाखर्च विद्यार्थ्यांकडून लिहवावा.

## भूमिति.

( १ ) **वर्तुळें**—कोनाची कल्पना. वर्तुळाचे अंशात्मक भाग; होकायंत्राचे तबकडीवरील वर्तुळाचे भाग.

( २ ) **क्षेत्रफळ**—काटकोन चौकोनाचें क्षेत्रफळ. जसें—

चौकोनाचें क्षेत्रफळ=लांबी × रुंदी.

त्रिकोणाचें क्षेत्रफळ=$\frac{1}{2}$पाया× उंची.

( **घनफळ**—पदार्थाचें घनफळ:—बाजूस सारलेल्या पाण्यावरून आणि गणितानें पदार्थाचें घनफळ ठरविणें.

**सूचना**:—गणिताच्या तासाला लेखी उदाहरणांपूर्वी तोंडी उदाहरणें घ्यावीं. मुलांना झटकन आंकडे मोडतां यावेत हा तोंडी उदाहरणें सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. तोंडी उदाहरणें सोपीं व रोजच्या व्यवहारासंबंधाचीं असावीं. शक्य तोंपर्यंत उदाहरणें निवळ भाववाचक संख्यांचीं नसावीं मुलांच्या अनुभवाच्या व माहितीच्या व्यवहारासंबंधाचीं उदाहरणें घ्यावीं. लांबलचक आणि गुंतागुतीचीं उदाहरणें घेऊं नयेत.

# कोष्टकांचा तक्ता ( मुंबई भाग व मध्यभाग ह्यांकरितां )

## अर्थदर्शक.

| | | |
|---|---|---|
| ३ पै | = | १ पैसा |
| ४ पैसे किंवा १२ पै | = | १ आणा |
| १६ आणे | = | १ रुपाया |

## भारदर्शक.

| | | |
|---|---|---|
| ५ तोळे | = | १ छटाक |
| २ छटाक | = | १ अद्पाव |
| २ अद्पाव | = | १ पावशेर |
| २ पावशेर | = | १ अच्छेर |
| २ अच्छेर | = | १ शेर |
| ५ शेर | = | १ पासरी |
| २ पासऱ्या | = | १ धडा |
| ४ धडे | = | १ मण |
| २० मण | = | १ खंडी |

## कालदर्शक.

| | | |
|---|---|---|
| ६० सेकंद | = | १ मिनिट |
| ६० मिनिटें | = | १ तास |
| २४ तास | = | १ दिवस |
| ७ दिवस | = | १ आठवडा |
| ३६५ दिवस | = | १ वर्ष |

| | | |
|---|---|---|
| ६० पळें | = | १ घटका |
| ६० घटका | = | १ दिवस |
| ३० दिवस | = | १ महिना |
| १२ महिने | = | १ वर्ष |

## कैली.

| | | |
|---|---|---|
| ४ चिपटी किंवा ४ पावशेर | = | १ शेर |
| ४ शेर | = | १ पायली |
| १२ अगर १६ पायली | = | १ मण (स्थानिक वहिवाटप्रमाणें ) |
| ( २ पौंड | = | १ शेर ) |

## लांबी मोजण्याचें कोष्टक.

| | | |
|---|---|---|
| १२ इंच | | १ फूट |
| ३ फूट | = | १ यार्ड |
| १७६० यार्ड | = | १ मैल |
| २ मैल | = | १ कोस (सुमारें) |

| | | |
|---|---|---|
| २ अंगुलें | = | १ तसू |
| १२ तसू | = | १ हात |
| ७० तसू | = | १ काठी |
| २४ ३/४ इंच | = | १ आणा |
| १६ आणे अगर ३३ फूट | = | १ साखळी (चेन) |

## क्षेत्रमापन

| | | |
|---|---|---|
| १२×१२ अगर १४४ चौरस इंच | = | १ चौरस फूट |
| ३×३ अगर ९ चौरस फूट | = | १ चौरस यार्ड |
| १२१ चौरस यार्ड | = | १ गुंठा |
| ४० गुंठे | = | १ एकर |
| २ १/२ गुंठा | = | १ आणा |
| १ चौरस चेन | = | १ गुंठा |
| २ १/२ गुंठा | = | १ आणा |
| ४० गुंठे | = | १ एकर |
| ३४ १/३६ चौरस हात | = | १ चौरस काठी |
| २०५९ काठ्या | = | १ पांड |
| २० पांड | = | १ बिघा |
| १२० बिघे | = | १ चाहूर |

## घनमापन.

| | | |
|---|---|---|
| १२×१२×१२ अगर १७२८ घन इंच | = | १ घनफूट |
| १०० घनफूट | = | १ ब्रास |

## सोने चांदी इत्यादि तोलण्याचें कोष्टक

| | | |
|---|---|---|
| ८ गुंजा | = | १ मासा |
| १२ मासे | = | १ तोळा |
| २४ तोळे | = | १ शेर |

**सरकारनें प्रा. शाळा, हायस्कूल्स व ट्रे. संस्थांसाठीं मंजूर केलेल्या**

# भौगोलिक आराखड्यांच्या वह्या "

ह्या इ. २ ते ७ पर्यंतच्या भौ. अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केल्या असून किंमती १ आण्यापासून २॥ आण्यापर्यंत ठेविल्या आहेत. वह्यांचा उपयोग करण्यासंबंधीं अनुभविक सूचना, कोणत्या वर्गांत काय भरून घ्यावें यासंबंधाची योजना व भरलेले नमुने मोफत पाठविले जातील. सर्वप्रकारचे सुटे आराखडेही मिळतील.

मि. ठिकाणें—प्रकाशकः—**पांडुरंग दादाजी प्रभु.** एम्. एम्. फोरासरोड स्कूल, मुंबई नं. ८

**नवीन किताबखाना पुणें. परचुरे, पुराणिक मंडळी;** तु. पुं. शेट्ये व लक्ष्मीवैभव बुकडेपो मुं. नं. ४

---

**कमिशन शें. १५ टक्के. मुलींचे वाळवेकर यांना लिहा**

**व्हर्न्याक्युलर फायनल परीक्षेची**

छापून तयार किं. ८॥ आणे. पानें. सु. १००. ] **प्रश्नोत्तरमाला.** [ तिकिटें १०॥ आण्याचीं

**(१९२४ ते १९२७)**

उत्तरें थोडक्यांत व मुद्देसूद. छपाई सुबक. मिळण्याचीं ठिकाणें—(१) **को. ना. वाळवेकर. बुकसेलर नवीपेठ अहमदनगर (२) सेवासदन ट्रे. कॉ. विद्यार्थिनी-सहकार-मंडळाची ग्रंथशाला पुणें. बुधवार ५९५ पुणें.**

---

**इ. ४, ५ व ६ करितां** ] **घरगुती जमाखर्च.** [ **किं. ३ आणे कमि. शें. २०**

लेखकः—**द. ज. गोखले बी. ए.** हेडमास्तर प्रॅ. स्कूल ट्रे. कॉ. पुणें.

मुलींच्या व्ह. फायनल परीक्षेला योग्य असें घरगुती जमाखर्चावर एकही पुस्तक नव्हतें; ती उणीव या पुस्तकानें दूर केली आहे. यांत जमाखर्चाची सामान्य माहिती योग्य अशा चित्रांचे आधारानें दिली असून पुढें एका कुटुंबाची वर्षाची कीर्द व खतावणी व्यवहारांसह दिली आहे. शेवटीं परीक्षेच्या धोरणास धरून ५० वर प्रश्न आहेत.

**मिळण्याचें ठिकाण**—ल. ना. गोडबोले, बुकसेलर, पुणें शहर.

Registered No. B 1195

# पुष्कळ शाळांत सुरू झाल्या ! तुम्हीही सुरू करा ! !

## अगदीं सुधारलेल्या पद्धतीनें भूगोल विषय शिकविण्याकरितां

अत्यंत उपयुक्त

इयत्ता २ ते ७ च्या अभ्यासपत्रकाप्रमाणें तयार केलेल्या.

# आराखड्यांच्या वह्या.

इयत्ता ३ ते ७ व इंग्रजी १ ली ते ७ वी च्या वह्या पुष्कळ दिवस चालू आहेतच. शिवाय मराठी इयत्ता २ करितां **महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांच्या वह्या तयार झाल्या !** अमुक वह्यांची आर्डर आली व अगाऊ पैसे आले तरच वह्या तयार करून देऊं अशी अट नाहीं. कोणत्याही तालुक्याची एक सुद्धां वही मिळं शकेल. शिवाय शिक्षकांस शेंकडा २५ प्रमाणें कमिशन मिळेल.

| इयत्ता | आराखड्यांची संख्या. | किंमत |
|---|---|---|
| २ दुसरी...... | तालुक्याचे ४, आणि जिल्हा १ | १ आणा |
| ३ तिसरी...... | जिल्ह्याचे ६, आणि महाराष्ट्र २ | १ आणा |
| ४ चौथी...... | इलाख्याचे ६, आणि हिंदुस्थान २ | १॥ आणा |
| ५ पांचवी...... | हिंदुस्थानचे ६, आणि आशियाचे २ | १॥ आणा |
| ६ सहावी...... | जगाचे २, आशियाचे ३, हिंदुस्थानचे ५ युरोपचे ५ | ३ आणे |
| ७ सातवी...... | जगाचे २, दक्षिण अम. २ उत्तर अमे. २, आफ्रिका २, आस्ट्रेलिया २, हिंदुस्थान ५. | ३ आणे |

**या वह्यांच्या साहाय्यानें भूगोल विषय पाठ न करितां सहज तयार होतो असा शिक्षक या नात्यानें १२ वर्षांचा अनुभव आहे.**

**वह्या मिळण्याचीं ठिकाणें**

प्रकाशकः—व्ही. के. सामक आणि कंपनी, बुधवार पेठ पुणें.

**लक्ष्मण नारायण गोडबोले** बुकसेलर्स लक्ष्मीरोड पुणें व प्रसिद्ध बुकसेलर्सकडे.
**केळकर** कंपनी. नाशिक.
**श्रीराम** कंपनी. धुळें.

**भुंजे ब्रदर्स** कोरेगांव ( जि० सातारा )
**जी. के. वैद्य** वांई ( जि० सातारा. )
**भ. मा. गोसावी** फलटण (जि० सातारा)

# कन्याशिक्षक.

वर्ष १३ वें ] फेब्रुवारी १९२८ [ अंक १२

पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत **अनंत विनायक पटवर्धन** यांनीं छापिलें व **मिस् आर. नवलकर**, बी. ए., **लेडी सुपरिन्टेन्डेन्ट** ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन पुणें यांनीं पुणें येथें प्रसिद्ध केलें.

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | या अंकाची |
| ट. हां. सह १॥ रुपया. | किंमत ४ आणे. |

१६ एप्रिल १९२८.


# अनुक्रमणिका.

| विषय. | पान. |
| --- | --- |
| १ निवेदन ... ... ... | ... २७३ |
| २ मुलांची पहिली पांच वर्षे ... ... | ...२७४–२७९ |
| ३ श्रीयुत महादेव काशीनाथ कारखानीस बी. ए. | ...२८०–२८२ |
| ४ मुलांकरितां खेळ ... ... | ...२८२–२८४ |
| ५ खोडकर भाऊ ... ... ... | ...२८५–२९७ |
| ६ पोंच व अभिप्राय ... ... | ...२९७–२९९ |
| ७ मुलींचे खेळ ... ... ... | ...२९९ |
| ८ वनितासमाजाचा वार्षिक समारंभ ... | ...३०० |



**नेक नामदार लॉर्ड अर्विन.**

( हिंदुस्तानचे व्हाइसरॉय व गव्हर्नर जनरल. )



लेडी अर्विन.

# कन्याशिक्षक.

जरि असेल रसज्ञपणा पुरा । जरि परोपकृतीच मनोहरा ।
जरि असे चतुरत्व, तरी मुला । शिकविण्यासम छंद नसे भला ॥

पुस्तक १३ वें.] फेब्रुवारी, १९२८. [अंक १२ वा


## निवेदन

सन १९१५ चे आरंभीं 'कन्या शिक्षक मंडळ' ही संस्था स्थापन झाली तिनें विशेषत: स्त्री-शिक्षकांना शिक्षणाचे बाबतींत मदत व्हावी व नवीन पद्धतीची माहिती व्हावी म्हणून अनेक प्रकारचे कार्यास सुरवात केला; त्यापैकीं महत्त्वाचें कार्य म्हणजे कन्याशिक्षक मासिक प्रसिद्ध करण्याचें ठरविलें हें होय. ह्या मासिकाचा पहिला अंक सन १९१५ चे फेब्रुवारींत प्रसिद्ध झाला. आज तेराव्या वर्षाचा शेवटचा अंक वाचकांकडे जात आहे. गेल्या तेरा वर्षांत ह्या मासिकानें केलेली कामगिरी वाचकांपुढें आहेच. आतां कामाचे सोईसाठीं 'कन्याशिक्षक' व 'मराठी शिक्षक' हीं मासिकें एकत्र करून "प्राथमिक शिक्षण" ह्या नांवानें नवीन मासिक सुरू करण्याचें ठरलें आहे. ह्या मासिकाचें संपादकत्व लेडी सुपरिन्टेन्डन्ट, ट्रेनिंग कॉलेज फार वुइमेन आणि प्रिन्सिपाल ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन पुणें, ह्या उभयतांकडे आहे.

ह्या नवीन व्यवस्थेमुळें मासिकाचे पूर्वीचे धोरणांत मुळींच बदल होणार नाहीं; उलट तें प्रतिमासीं नियमानें प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. शिवाय मासिक ४८ पानांचें निघणार असून वर्गणी मात्र बिलकूल वाढविलेली नाहीं पूर्वीप्रमाणें दीड रुपायाच वार्षिक वर्गणी ठेविली आहे. तेव्हां चालू सालापासून वाचकांना तितक्याच किंमतींत दुप्पट पानें मिळतील हें उघड आहे.

या पुढें वर्गणी, अंकाबद्दल चौकशी ह्यासंबंधानें पत्रव्यवहार करावयाचा तो 'एडिटर, प्राथमिक शिक्षण, ट्रेनिंग कॉलेज फार मेन पुणें" ह्या पत्त्यावर करावा. परंतु एकादा लेख प्रसिद्धीसाठीं पाठविणें असेल तर तो पूर्वीप्रमाणेंच लेडी सुपरिन्टेन्डन्ट, ट्रे. कॉ. फार वुइमेन, वेलेस्ली रोड, पुणें. ह्या पत्त्यावर पाठवावा.

# मुलांचीं पहिलीं पांच वर्षें

लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्
प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रे मित्रे समाचरेत्

सुभाषित

'पहिल्या पांच वर्षांत मुलांचे लाड करावे. नंतर दहा वर्षें त्यांना ठोक द्यावा. व मुलाला सोळावें वर्ष लागलें कीं त्याला मित्र समजून त्यांप्रमाणें त्याच्याशीं वागणूक ठेवावी, असें वरील सुभाषितांत सांगितलें आहे. या सुभाषितांतील उपदेशाप्रमाणेंच बहुतेक मातापितरांची आपल्या मुलांशीं वागणूक असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. आईबाप आपल्या मुलांचे तीं सहा सात वर्षांचीं होऊन शाळेंत जात तोंपर्यंत अत्यंत लाड करितात ही गोष्ट खरी आहे. मूल हें लहानपणीं अत्यंत पराधीन असतें. त्यांचें संगोपन होणें हें सर्वस्वीं त्यांच्या आईबापांवर अवलंबून असतें. म्हणूनच परमेश्वरानें मातापित्यांच्या हृदयांत मुलांच्या बद्दल उत्कट प्रेम ठेविलेलें असतें. या प्रेमामुळें आपल्या मुलांकरितां आईबाप वाटेल ते कष्ट करितात. लहान मुलें हीं अत्यंत रम्य असतात व तीं वडील माणसांना आपल्या लीलांनीं मोहून टाकीत असतात. मुलांचे वाऱ्याबरोबर खेळणारे केश, त्यांचें निष्कारण मधुर हास्य, जाईच्या नाजूक कळ्यांशीं स्पर्धा करणाऱ्या त्यांच्या दंतकळ्या, त्यांचे अस्पष्ट पण मधुर आलाप इत्यादि सर्वच गोष्टी मोहक असतात. अशा या गृहरत्नांच्या संगतींत आईबापांना धन्य वाटावें हें साहजिक आहे. कालिदासानें दुष्यंताचे तोंडीं घातलेले पुढील उद्गार किती यथार्थ आहेत !

साकी

मुलींच कांहीं कारण नसतां मंदहास्य करितात
त्यायोगानें थोड्या थोड्या दंतकळ्या दिसतात
बोल बोबडे मधुर बोलुनी रमविति मानस फार
अंकावरती बैसायाची उत्कंठा अनिवार
मांडीवरि कटिखांद्यावरि वा करीं अशा तनयास
खेळवितांना मलिन यदंगें धन्य होति ते खास

लेले—मराठी शाकुंतल

## मुलांची पहिली पांच वर्षे.

मुलांबद्दलचें स्वाभाविक प्रेम व त्यांचा मोहकपणा यामुळें मुलांचे लाड करावे अशी आईबापांची साहाजिक प्रवृत्ति होते. मुलांचीं पहिलीं पांच वर्षे हा त्यांना लाडानें व प्रेमानें वागविण्याचा काळ आहे. यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ करावयाचा ही समजूत चुकीची आहे. मुलांच्या शिक्षणाला सुरवात सहाव्या वर्षी होत नसून ती अगदीं पहील्या दिवसापासून होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. यावरून पाहातां पहिलीं पांच वर्षे हा मुलांच्या शिक्षणाचा फार महत्त्वाचा काळ आहे. शिक्षणाला पाटी, पेन्सिल व पुस्तक पाहिजे ही कल्पना चुकीची आहे. या पांच वर्षांत मूल आपल्या ज्ञानांत किती तरी भर टाकीत असतें. आपल्या भोंवतीं पसरलेल्या विशाल व आश्चर्यांनीं भरलेल्या सृष्टीकडे तें कौतुकानें पाहात असतें व त्याची जिज्ञासा तीव्र असल्यामुळें स्वपरिश्रमानें व वडील माणसांच्या साहाय्यानें तें एकसारखें ज्ञान मिळवीत असतें. त्याचें भाषाशिक्षण एकसारखें चालू असतें. व नवीन नवीन शब्दांचा संचय करण्याचें त्याचें काम अव्याहत चाललेलें असतें. हात पाय, नेत्र व कर्ण यांची चपलता वाढविण्याचें कामही चालू असतें. या सर्वांपेक्षां अतिशय महत्त्वाची गोष्ट म्हटली म्हणजे मुलांना जडणाऱ्या संवयी ही होय. मूल ज्या वडील माणसांच्या सहवासांत वाढत असतें त्यांच्या वागणुकीनें मुलांना इष्ट अगर अनिष्ट संवयी जडतात. मुलांच्या आचरणाला व विचाराला न कळत वळण लागतें व पुढील आयुष्यांत तें कायम राहाण्याचा फार संभव असतो. पहिल्या पांच वर्षांचा मुलांचा काळ फुकट जात नाहीं. हा अतिशय महत्त्वाचा काळ असतो व यांत मूल बौद्धिक, शारीरिक व नैतिक शिक्षण घेण्याचें काम एकसारखें करीत असतें.

मुलाला प्रेमानें वागवावें ही गोष्ट खरी आहे, पण प्रेम करणें म्हणजे लाड करणें नव्हे. मुलाचे वाटेल ते हट्ट पुरविणें, मुलांना दागदागिन्यांनीं भरवून टाकणें, मुलांना सदा सर्वदा कडिखांद्यावर वागविणें. त्यांना सतत मेवामिठाई खावयास देणें, त्यांना नेहमीं रेशमी व मखमलीचे बहुमोल कपडे शिवणें इत्यादि मुलांच्या लाडांचे प्रकार त्यांजवरील खऱ्या प्रेमाचे निदर्शक खात्रीनें नाहींत. या सर्व प्रकारांत आईबापांची हौस व वेडगळपणाच दिसून येतो. मुलांना रेशमी व जरीचे कपडे घातले व खूप डागिने घातले कीं त्यांजपासून त्यांना कोणत्याही प्रकारें सुख होत नाहीं, पण आपली श्रीमंती दृष्टीस पडल्यामुळें आईबापांच्या डोळ्यांना मात्र समाधान वाटत असतें. ज्या आईबापांचें आपल्या मुलांवर खरें प्रेम असतें तीं मुलांच्या सुखाचा व कल्याणाचाच विचार आपल्या दृष्टीपुढें सतत ठेवितात.

लाड केल्यानें मुलांना सुख होतें ही भ्रामक कल्पना त्यांच्या मनाला कधींही शिवत नाहीं.

लहानपणीं मुलांच्या शरिराची जोपासना नीट झाली नाहीं, तर पुढें हा शरिराचा दुर्बळपणा कायम राहातो. तिरळें पाहाणें वगैरे ज्या शारीरिक संवयी या वयांत मुलांना जडतात त्या पुढें सतत त्यांस आयुष्यभर चिकटतात व त्या काढून टाकण्यास अत्यंत कष्ट पडतात. हाच नियम मानसिक संवयींनाही लागू पडतो. प्रेमळ व सदाचारी आईबापांच्या सहवासांत मुलाचीं पहिलीं पांच वर्षें गेलीं कीं मुलाच्या पुढील सर्व आयुष्यावर या सहवासाचा इष्ट परिणाम दिसून येतो. उलट पक्षीं ज्या कुटुंबांतील माणसें नेहमीं एकमेकांशीं भांडत आहेत, एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढींत आहेत, जेथें सुख व समाधान कधींच नांदत नाहीं अशा कुटुंबांतील मुलें पुढील आयुष्यांत भांडखोर व असमाधानी निपजणार यांत कांहीं शंका नाहीं. या वयांत लहान मुलांना आपले विचार जरी बोलून दाखवितां येत नाहींत, तरी भोंवतालीं असणाऱ्या माणसांच्या वर्तनाचा त्यांचेवर जोरदार परिणाम होतो ही गोष्ट अगदीं खरी आहे. मुलांचा स्वभावही याच वयांत बनला जातो. या वयांत मुलांचे मनावर भोंवतालच्या परीस्थितीचा व सभोंवलताच्या कुटुंबांतील माणसांच्या सहवासाचा इष्ट अगर अनिष्ट व चिरकाल टिकणारा असा परिणाम होतो.

बालपणाचा हा काल शिक्षणाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा आहे. या कालांतील शिक्षक आईबाप व घरांतील माणसें हीं होत. या सर्व माणसांनीं विशेषतः आईबापांनीं मुलाच्या शिक्षणाची फार काळजी घेतली पाहिजे. प्रथमतः आपण मुलाच्या शारीरिक शिक्षणाचा किंवा जोपासनेचा विचार करूं. मुलाला वेळेवर खाऊं घालणें, त्याला साधें व पचेल असें ताजें अन्न देणें, त्याला वेळेवर स्नान घालणें, त्याचे आंगावर अवश्य तेवढेच साधे कपडे घालणें, त्याला यथेच्छ खेळूं देणें, त्याच्या शरीरप्रकृतीची काळजी घेणें, विनाकारण त्याजवर औषधाचा मारा न करणें वगैरे किती तरी गोष्टी आईबापांनीं लक्षपूर्वक केल्या पाहिजेत. निष्काळजीपणानें किंवा फाजील लाडानें यांत कांहीं चूक झाली, तर तिचा परिणाम मुलाचे शरीरप्रकृतीवर होतो. मुलाला वेळेवर खाऊं घालणें, वेळेवर स्नान घालणें इत्यादि गोष्टी जरी अगदीं साध्या दिसतात तरी त्यांच्या योगानें मुलाला नियमितपणाच्या संवयी लागतात. अगदीं लहान मुलाच्या बाबतींतही आईनें नियमितपणाची काळजी घेतली

पाहिजे. जी आई ठरलेल्या वेळींच मुलाला पाजते तिचें मूल सहसा किरकीर करीत नाहीं. पण जरा मूल रडलें कीं, त्याला घ्यावयाचें व पाजावयाचें, असें जर आईनें केलें, तर पिण्याकरितां साऱ्या दिवस रडण्याची त्याला संवय लागते, त्याच्या पचनक्रियेंत घोटाळा होतो व अनियमितपणाची व हट्ट करण्याची संवय त्याला जडते. मूल जसजसें मोठें होईल तसतशा या संवयी जास्त जोरदार होतील. याचप्रमाणें मूल रडतें म्हणून तासचे तास त्याला मांडीवर घेऊन बसणें किंवा एकसारखें त्याला कडेखांद्यावर वागविणें हीही चूकच आहे. मुलें एकसारखीं हातपाय हालवीत असतात व स्वतांशींच खेळत असतात. यायोगानें त्यांना कितीतरी व्यायाम होतो व इंद्रियांना इच्छेनुरूप चलन देण्याचें सामर्थ्य त्यांचें अंगीं येतें. मुलांना सतत मांडीवर किंवा कडेखांद्यावर बाळगिल्यानें त्यांना व्यायाम तर होत नाहींच; पण आपल्या सुखाकरितां दुसऱ्याला त्रास देण्याची संवय लागते.

जसजसें मूल मोठें होत जाईल तसतसें त्याला स्वावलंबनाची संवय आईबापांनीं लाविली पाहिजे. ३ वर्षांच्या मुलाला भरविणें, त्याला जिना चढूं उतरूं न देणें. मूल खेळत असतां जी कृति त्याला करावीशी वाटते. ती आपणाच त्याचेकरितां करणें या गोष्टी वाईट आहेत. या योगानें मुलाचें नुकसान होतें; व बालपणापासून दुबळेपणानें दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची त्याला संवयलागते. मुलाला मोकळेपणानें खेळूं दिलें पाहिजे व त्याला खेळतांना कांहीं आपाय होणार नाहीं एवढी खबरदारी घेतली पाहिजे.

मुलाला आईबापांनीं नेहमीं घरांतच कोंडून ठेवितां कामा नये. त्यांना बाजार, देऊळ, यात्रा वगैरे ठिकाणीं आपल्याबरोबर नेलें पाहिजे. त्यांना गांवाचे बाहेर आपल्या बरोबर हिंडावयास नेऊन झाडें, वेली, फुलें फळें, पानें, कळ्या, निरनिराळ्या प्रकारचे पक्षी, पशु, किडे, डोंगर, नदी, झरा, टेकडी वगैरे अनेक गोष्टी दाखविल्या पाहिजेत.

या योगानें मुलांच्या जिज्ञासेची वाढ होते. त्यांच्या प्रश्नांचीं शक्य असेल, तर उत्तरें दिलीं पाहिजेत. मुलांना लहान लहान मजेदार गोष्टी सांगितल्या पाहिजेत. मजेदार गोष्टी सांगण्याची कला आईबापांना अवश्य आली पाहिजे.

मुलाच्या नैतिक शिक्षणाचे बाबतींतही आईबापांनीं फार काळजी घेतली पाहिजे. मलाच सर्व खाऊ मिळावा, माझेच लाड आईबापांनीं पुरवावे, अशी

मुलाची जी स्वार्थी भावना असते ती आईबापांनीं वाढूं देतां उपयोगी नाहीं. आपला हट्ट आईबाप चालूं देणार नाहींत ही गोष्ट एकदां मुलाला समजली कीं तें सहसा भलताच हट्ट करण्याचे भानगडींत पडत नाहीं. या बाबतींत आईबापांला प्रथम जरा कठोरपणा दाखवावा लागतो. मत्सर, पोकळ गर्व, आपलपोटेपणा वगैरे ज्या भावना कांहीं प्रौढ माणसांतही दृष्टीस पडतात, त्यांची वाढ त्यांचे लहानपणीं झालेली असते. एका गृहस्थानें लिहिलें आहे ' मी पांच वर्षांचा होईपर्यंत घरांतील सर्व मंडळी माझे फार लाड करीत असत. पांचव्या वर्षी मला एक भाऊ झाला. तें लहान व गोजीरवाणें मुल पाहून मला फार आनंद वाटला. पण घरची मंडळी म्हणू लागली, आतां तुला कोण विचारतो ? तूं आतां आम्हांला मुळींच आवडत नाहींस. आमचें बाळ किती चांगलें आहे ! आई व बाबा तुला आतां घेणार नाहींत. तुम्ही बसा आतां एकीकडे. ' हे त्यांचे शब्द ऐकून मला फार वाईट वाटलें व त्या निरपराधी गोजीरवाण्या बाळाचा मला फार मत्सर वाटूं लागला व घरांतील मंडळीच्या चिडविण्यानें हा मत्सर दिवसानुदिवस वाढत गेला. माझा स्वभाव मत्सरी बनला व मोठेपणीं माझ्या मनांतील ही दुष्ट भावना नाहींशी करण्यास फार त्रास पडला. अशा प्रकारें घरांतलि मंडळीच्या वागणुकीनें मत्सर, द्वेष, आप्पलपोटेपणा, पोकळ गर्व वगैरे अनेक दुष्ट भावना मुलांचे आंगीं जडण्याचा संभव असतो; म्हणून आईबापांनीं या बाबतींत फार काळजी घेतली पाहिजे. दुसऱ्या एका गृहस्थानें आपणांविषयीं म्हटलें आहे. 'लहानपणीं मी फार अशक्त असें व फार मंदबुद्धीचा असें; पण माझ्या आईबापांना मी फार आवडत असल्यामुळें ते ज्याला त्याला सांगत कीं आमचा मुलगा अत्यंत बुद्धिमान आहे. इतर मुलांपेक्षां त्याची बुद्धिमत्ता फार विलक्षण आहे. या त्यांच्या शब्दांचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम झाला व आपण खरोखरच कोणीतरी अद्वितीय बुद्धीचे आहोंत असें मला वाटूं लागलें, व माझे अंतःकरणांत पोकळ गर्व मात्र भरपूर भरला व पुढील वयांत तो तसाच कायम राहिला. '

बालपणीं मुलांच्या भावना फार तीव्र असतात, कारण त्यांच्यावर विचारशक्तीचें दडपण नसतें, त्यामुळें मूल ज्या वातावरणांत व परिस्थितींत वाढतें त्यांचा चिरकालिक परिणाम त्याच्या स्वभावावर होतो. प्रेमळ किंवा तिरसट वृत्ति, पूज्य बुद्धि अथवा अनादर, ममता किंवा निष्ठुरपणा वगैरे सर्व गुणांचें किंवा दुर्गुणांचें बीज याच वयांत पेरलें जातें व त्याचा जोरदार वृक्ष पुढें फोफावतो. बालपणा-

चा हा मुलांचा काळ सुखांत व प्रेमात जावा ही गोष्ट अत्यंत इष्ट आहे. कारण याजवरच पुढील आयुष्य पुष्कळ अंशीं अवलंबून आहे. तो भलभलत्या लाडांत मात्र जाऊं नये.

मनुष्याला वशीकरणानें मोहनिद्रा आणली असता ज्या पूर्वकालीन गोष्टी दीर्घकाळामुळें त्याला जागेपणीं आठवत नाहींत त्या या निद्रेंत त्याला चांगल्या आठवतात व सांगतां येतात. जेव्हां एकाद्या शारीरिक किंक मानसिक रोगाचें निदान डॉक्टर लोकांना बरोबर करितां येत नाहीं तेव्हां ते रोग्यावर वशीकरण करून त्याला मोहनिद्रा आणतात व त्याच्या स्मृतीचा उपयोग करून रोगाचें मूळ शोधण्याचा प्रयत्न करितात. अलीकडे डॉक्टर लोकांची खात्री होत चालली आहे कीं मनुष्याच्या बऱ्याच रोगांचें कारण त्याजवर अगदीं लहानपणीं आलेल्या प्रसंगामुळेंच उत्पन्न झालेलें असतें. एका गृहस्थाला दुधाचा अत्यंत तिटकारा असे. दूध त्याचे समोर नेलें कीं ओकारी येत असे. डॉक्टरनें त्याजवर वशीकरणाचा प्रयोग करून त्याला मोहनिद्रा आणली. तेव्हां डॉक्टरला असें कळलें कीं बाळपणीं त्याला दुधांत डॉक्टरनें कडू औषधाची पूड दिली व तो ती घेईना म्हणून त्याचें तोंड वनाक दाबून धरलें. तेव्हां तो गुदमरून बेशुद्ध पडला व तेव्हांपासून त्याला दुधाची इतकी शिसारी बसली कीं तें पाहिल्याबरोबर त्याला ओकारी येत असे. तो जागृतावस्थेंत आल्यानंतर त्याला डॉक्टरनें ही गोष्ट समजावून सांगितली. तेव्हांपासून दुधाबद्दल असलेला त्याचा तिटकारा पूर्ण नाहींसा झाला. आपण आनुवांशिक समजतों अशा शारीरिक दोषांपैकीं बरेच दोष व मानसिक प्रवृत्तींपैकीं बऱ्याच प्रवृत्ति यांचा उगम बालपणींच्या पहिल्या पांच वर्षांत असतो असें वैद्यशास्त्रानें दाखविलें आहे.यावरून या वयांत मुलाची शारीरिक व मानसिक जोपासना करण्याचें काम किती कठीण व जबाबदारीचें आहे याची कल्पना होईल.

एका इंग्लिश मानसशास्त्रज्ञानें म्हटलें आहे, 'ज्यांना आनुवंशिक म्हणतात त्यांपैकीं बऱ्याच मानसिक व शारीरिक रोगांचा उगम बाळपणीं होतो ही गोष्ट आतां वैद्यशास्त्रानें पूर्णपणें सिद्ध केली आहे. अर्थातच बरेचसे शारीरिक व मानसिक दोष बाळपणींच्या योग्य शिक्षणानें टाळतां येतील.

मुलांच्या बाळपणाचीं पहिलीं पांच वर्षें हा अति महत्त्वाचा काळ आहे याची जाणीव हळू हळू आईबापांस होत चालली आहे. हा काल मुलांचें लाड करण्याचा नव्हे, तर त्यांना शिक्षण देण्याचा आहे ही गोष्ट जितकी आईबापांचे मनांत बिंबेल तितकें मुलांना शिक्षण देण्याचें काम त्यांचें हातून चांगलें होईल.

---

# श्रीयुत महादेव काशीनाथ कारखानीस बी. ए.

आज अठरा वर्षें अविच्छिन्नपणें या संस्थेंत काम केल्यानंतर श्री० कारखानीस यांची बदली येथील 'ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन' या संस्थेंत व्हाइस प्रिन्सिपालचे जागीं होऊन ते तिकडे गेले आहेत. हें कॉलेज हुजूर पागेंतील 'हायस्कूल फॉर इंडियन गर्लस' या संस्थेंतून निराळें होण्याचे पूर्वीपासूनच रा. कारखानीस यांचा कालेजशीं संबंध होता. ज्यावेळीं मिस् न्यूलंड यांनीं ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षणांत सुधारणा करण्याचा विचार केला त्यावेळीं कोणते शिक्षक या कॉलेजकरितां मोठ्या उत्सुकतेनें व अंतःकरणपूर्वक मेहनत करून झटतील हें त्यांनीं सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें व शिक्षकांची निवड केली. रा. कारखानीस हे त्या निवडक शिक्षकांपैकीं एक होत. मिस् न्यूलंड यांनीं त्यांची जी निवड केली ती अगदीं योग्य ठरली. शिक्षणविषयक गोष्टींचा बारिक रीतीनें मनाशीं विचार करणें, तदनुरूप एखादी योजना तयार करणें व ती प्रत्यक्ष अमलांत आणणें या गोष्टी आज सतत तेरा वर्षें रा. कारखानीस करीत होते. हे कॉलेज एक नमुनेदार संस्था करून दाखविण्याच्या कामीं त्यांनीं आपल्या जिवाकडे यत्किंचितही पाहिलें नाहीं. कॉलेजच्या लेडी सुपरिंटेंडंट यांनीं शिक्षणाविषयक एकादा नवीन योजना त्यांना सुचविण्याचा अवकाश कीं, त्यांनीं ती तावडतोब आत्मसात् केलीच म्हणून समजावें ! अशा एकाद्या योजनेंतील रहस्य जाणणें, विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन तिच्यामध्यें योग्य ते फरक व सुधारणा करणें आणि शेवटीं ती योजना अमलांत आणून यशस्वी करून दाखविणें वगैरे गोष्टींत रा० कारखानीस यांचा हातखंडा असे. या गोष्टींशिवाय ज्यांच्या योगानें या कॉलेजची दिवसेंदिवस भरभराट होईल व कॉलेजांतील अभ्यासक्रम मनोरंजक होऊन भावी स्त्रीशिक्षकांच्या आयुष्यांत सुधारणा घडून येईल अशा नव्या नव्या गोष्टी शोधून काढण्याचे कामीं ते नेहमीं अगदीं टपून असत.

कॉलेजमधील या अनेकविध कामाशिवाय, या कॉलेजचें 'कन्याशिक्षक' मासिक चालवणें, कॉलेजांतील शिक्षक व विद्यार्थिनी, तसेंच प्रॅक्टिसिंग स्कूल व पुणें शहरांतील मुलींच्या शाळा यांमधील स्त्रीशिक्षक यांचेसमोर-

कन्याशिक्षकमंडळामार्फत एकाद्या विषायवर व्याख्यान देणें किंवा धडा शिकवून दाखविणें वगैरे अनेक कामें त्यांना करावीं लागत व तीं मोठ्या हौसेनें करीत.

रा. कारखानीस यांनीं आजपर्यंत कन्याशिक्षक मासिकांत अंकगणित, वाक्यरचना, व्याकरण, शिक्षण व मानसशास्त्र वगैरे अनेक विषयांवर शेंकडों लेख लिहिले आहेत. प्रत्येक अंकांत अगदीं नियमानें कोणत्याना कोणत्या तरी विषयावर त्यांचे एक दोन महत्त्वाचे लेख असावयाचेच. शिवाय लहान मुलांकरितां सोपे धडे, गोष्टी, कविता याही प्रत्येक अंकांत यावयाच्याच.त्यांनीं आजपर्यंत 'कन्याशिक्षकांत' कोणकोणत्या विषयांवर लेख लिहिले व ते लेख एकत्र करून कोणतीं पुस्तकें प्रसिद्ध केली याची एक स्वतंत्र यादी या लेखाच्या शेवटीं दिली आहे. ती आमच्या वाचकांनीं जरूर पहावी. त्यांनीं लहान मुलाकरितां लिहिलेलें शिशुपाठ माला हें पुष्कळ शाळांतून सुरू झालें आहे. त्या पुस्तकाच्या योगानें मुलांना वाचनाची फार गोडी लागते. त्यांच्या कविता तर इतक्या सोप्या व स्वाभाविक असतात कीं लहान मुलांना त्या वरचेवर म्हणण्यांत फारच आनंद वाटतो.

या छोट्या लेखांत रा. कारखानिस यांच्या कामगिरीचें अगदीं थोडक्यांत विहंगम दृष्टीनें अवलोकन केलें आहे त्यांनीं या संस्थेवर आजपर्यंत अपत्यवत् प्रेम केलें व तिच्या कल्याणाकरतां ते कायावाचामनें अहर्निश झटले. शिक्षणकार्याला सर्वस्वीं वाहून घेणारीं रा. कारखानीस यांचेसारखीं माणसें फारच विरळा ! शेवटीं परमेश्वरकृपेनें त्यांस पुष्कळ आयुष्य लाभावें व उत्तरोत्तर अशीच वाढत्या प्रमाणांत त्यांचें हातून जनसेवा घडावी अशी इच्छा प्रदर्शित करून आम्ही हे दोन शब्द पुरे करतों.

रा. कारखानिस यांनीं ज्या विषयांवर लेख लिहिले त्यांची यादी.

| | |
|---|---|
| १ शिक्षण व मानसशास्त्र | २ अंकगणित |
| ३ लहान मुलांकरितां कविता | ४ वाक्यरचना |
| ५ इतिहास | ६ ज्योतिःशास्त्र |
| ७ लहान मुलांकरतां सोपे धडे | ८ गोष्टी |
| ९ कांहीं चरित्रें | १० वनितासमाजाकरितां नाटकें व गाणीं |
| ११ खेळ व सोपीं गाणीं | १२ व्याकरण |
| १३ किरकोळ | |

हे लेख एकत्र करून छापलेलीं त्यांचीं पुस्तकें.

१ शिक्षक व शिक्षण
२ अंकगणित कसें शिकवावें.
३ अध्यापन
४ लहान मुलांकरतां कविता.
५ वाक्य—रचना
६ शिशुपाठमाला
७ सुशीला
८ कृष्णाकुमारी
९ मनोरंजक सोपे धडे.

---

# मुलांकरितां खेळ.

## फुलांची माळ.

या खेळाकरितां ६ किंवा जास्त मुलें घ्यावीं. वर्गांतील मुलांनीं गुडघे टेकून फुलझाडांप्रमाणें डुलावें. एक मुलगी बागेंत येते व फुलांकडे पाहून पुढील गाणें म्हणते.

पद

( विठूचा गजर हरि नामाचा या चालीवर )

डोलूं या। मजेंत बघ खेळूं या। पुष्पें डोलती
झोके हे। मजेंत बघ घेऊं या। पुष्पें खेळती
जाइ जुई। गुलाब नव शेवंती। चाफा खेळती
मुलें फुलें। खेळति बहु हीं मोदें। देवा आवडती

( आज भेटली ताई ही या चालीवर )

फुलें किती हीं सुंदर फुलती
झाडांवरतीं मजेंत डुलती
जमवुनि आतां फुलें मजेचीं
माळ करिन मी सुंदर त्यांची

मुलगी पहिल्या फुलाजवळ येते व पुढील ओळ म्हणते.

## गुलाब सुंदर हा घेतें

गुलाब खुडण्याची ती कृति करिते. गुलाब झालेलें मूल तिचा हात धरतें. मग तीं दोन्ही मुलें दुसऱ्या झाडाजवळ येतात व मग मुलगी दुसरी ओळ म्हणते.

## शेवंती ही मी खुडतें

मग ती शेवंती खुडण्याची कृति करते. शेवंती झालेलें मुल गुलाबाचा हात धरितें. मग तीं तिसऱ्या फुलाजवळ जातात. याप्रमाणें फुलें खुडावयाची कृति चालू होते.

फुलें खुडतांना म्हणावयाचें गाणें

गुलाब सुंदर हा घेतें
शेवंती ही मी खुडतें
चाफा सोन्याचा घेतें
गोड मोगरा वेचीतें
ही जाई
तशी जुई

मधुर मालती छान पहा
वास फुलांचा गोड अहा ॥ २ ॥

फुलांची ओळ सरळ एकमेकांचा हात धरून अंतर सोडून उभी राहाते. मग पहिलें मूल नागमोडी गतीनें मुलांच्या डावीकडून व उजवीकडून शेवटपर्यंत जातें. मग दुसरें मग तिसरें याप्रमाणें हीं मुलें फुलें गुंफण्याची कृति करून दाखवितात. माळ तयार होत असतांना खालील गाणें म्हणावयाचें

पद

( विठूचा गजर हरिनामाचा या चालीवर )

**मौजेची। माळ गुंफिली साची। फूल गुंफिलें**
**दुसरें हें। सुंदर गुंफुनि झालें। तिसरें गुंफिलें**
**चवथें हें। छान किती बघ बसलें। नवीन गुंफिलें**

या पुढें मुलें असल्यास

**मौजेची। माळ किती ही साची। फूल गुंफिलें**

हा चरण म्हणतात.

पहिल्या ओळींतील मुलें ओळींतून निघून एक वर्तुळ तयार करितात. आतां ही माळ तयार झाली. मुलें वर्तुळांत फिरतात व पावलें ठेक्यावर टाकतात. फिरतांना तीं पुढील पद म्हणतात.

पद

( भाक्ति ग वेणी। माझि गुंफीग साजणी या चालीवर )

**फुलांची माळा। सुखविते किती नयनाला**
**फुलें मुलें हीं सुंदर असती**
**देवाजीला बहु आवडती**
**काळजी त्याला। तो नित्य जपतसे त्यांना.**

---

२८५

# खोडकर भाऊ.

## प्रवेश १ ला.

( अमला, विमला, कमला, सरला, चपला, चंचला, वगैरे मुली शाळेतील दिवाणखान्यांत गाण्याचे तालावर टिपऱ्या खेळत आहेत )

### पद.

( ' आनंदाचा कंद ' या चालीवर )

**प्रेमें केलें रम्य भुवन हें ईशें सारें चातुर्यें ।**
**नयना सुखवी हृदया हलवी चिंता भुलवी सौंदर्यें**
**गगनीं वसती सदा विहरती गाती तारा बाला या ।**
**आनंदानें प्रेमभरानें ईशमाय ती पाहि तयां ।**
**नाना सरिता प्रियतम दुहिता नाचति खेळति त्या गाती ।**
**कोमल सुस्वर गायन ऐकुनि जगन्माय हो हर्षित ती ।**
**नाचति वेली गुंजति हे अलि क्रीडति लहरी वायूच्या ।**
**लपंडाव हीं सुमें खेळती विहग हासती वरि तरुच्या ।**
**फुलें मुलें या लता विहरती खेळति तारा तरु सरिता ।**
**जगन्माय ही खेळ मुलांचे पाही होई बहु मुदिता ।**

### पद.

( चाल चामर वृत्ताची )

**मंदमंद दे सुगंध वात शांतवी मना**
**गोड गोड गान तेविं फार मोहवी जना**
**बाल चंद्रकोर शांत फार तोषवी मना**
**बाल बोल गोड गोड मोद देत सज्जना**

**कमलाः**—मुलींनो, आपला खेळ तर चांगला बसला. बाई आल्या कीं, पुन्हा हा आपण त्यांना करून दाखवूं म्हणजे त्यांना फार आनंद होईल.

**चपलाः**—कमले, आपला परवांचा बक्षीससमारंभ मोठ्या थाटाचा होणार आहे. बक्षीससमारंभाला गांवांतील पुष्कळ थोर मंडळी येणार आहेत, असें कोणसं म्हणत-होतं.

**अमलाः**—अग, बाईंनीं गांवांतील बहुतेक स्त्रियांना पत्रें धाडलीं आहेत. श्रीमती सौभाग्यवती विदुषी काय बरं त्यांचें नांव ! मोठें चमत्कारिकच आहे बरं का—

हो हो ! विद्युल्लताबाई धांद्रगांवकर या बक्षिसें वांटणार आहेत. या बाई फार शिकलेल्या आहेत हो. फाड फाड बोलतात. परवांचे दिवशीं आम्ही त्यांचें भाषण ऐकायला गेलों होतों. अशा फाड फाड बोलल्या कीं आम्हांला त्याचं बोलणं मुळींच समजलं नाहीं. आपल्या बाईनीं त्यांची फार स्तुति केली हो. आम्ही घरीं बाईला विचारलें, बाई, या विद्युल्लताबाई काय बरं बोलल्या.बाई म्हणाल्या, मला देखील कळल नाहीं. अग् विद्वान् स्त्रियांची भाषणं कधींच कोणाला कळत नाहींत. कळल्यावर त्या विद्वान् कसल्या ! या बाई शाळेंतही भाषण करणार आहेत. आपल्याला त्यांतलं कांहीं कळलं नाहीं, तरी मोठ्यानें टाळ्या वाजवावयाच्या बरं का !

**कमलाः**—बरं मुलींनो, बक्षीस घ्यावयाला कसें जावयाचं, परत जागेवर कसं यावयाचं हें आपण आतां पाहूं.

**अमलाः**—थांबा मुलींनो, मी या खुर्चीवर बसतें. मी श्रीमती सौभाग्यवती विदुषी विद्युल्लताबाई धांद्रगांवकर आहें. ( खुर्चीवर बसते ) अध्यक्ष आतां खुर्चीवर बसले. हं चालूं द्या सभेचें काम.

**चंचलाः**—मी जशी कांहीं बाई होतें हो. आज रोजीं अध्यक्षस्थान श्रीमती चपला सौभाग्यवती विद्वान् सरला—

**चपलाः**—हो हो विदुषी—कोण बरं.

**सरलाः**—विद्युत्प्रभाबाई.

**विमलाः**—नव्हे, विद्युल्लताबाई

**चंचलाः**—विद्युल्लताबाई यांनीं हें केलं आहे. नव्हे, नव्हे, काय बरं ! साळंकृत केलं आहे.

( मुली टाळ्या वाजवितात व हसतात. )

**विमलाः**—अग साळंकृत नव्हे.; अलंकृत. हें का लग्न आहे म्हणून साळंकृत होईल ?

**चंचलाः**—हो हो अलंकृत केलें आहे. त्यांना मी मुलींना बक्षिसें वांटण्याची विनंती करितें.

**अमलाः**—( उठून भाषण करिते. ) आज तुम्हीं सर्वांनीं मला जो मान केला आहे. नाहीं दिला आहे त्याजबद्दल मी आपली ही आपली ही काय बरं ही आहें. आतां मुलींनो, मी तुम्हांला आनंदानें बक्षिसें वांटतें.

**चंचलाः**—कुमारी विमला देशपांडे हिला हातकामाबद्दल बक्षीस.

**चपलाः**—सरंच चिमटे घेणें, थपडा मारणें, शाई सांडणें इत्यादि हातकामांत विमलेचा हात कोणीही धरणार नाहीं. तिला हातकामाबद्दल अवश्य बक्षीस पाहिजे. ( विमला बक्षीस घेते व तशीच अध्यक्षांकडे पाठ करून जाते. )

**कमला**:—अग विमले, असं का बक्षीस घेतात ! हें पहा, मी दाखवितें कसें बक्षीस घ्यावें तें. अमला कमलेला बक्षीस देते. ती खालीं वाकून तिला नमस्कार करते व एका बाजूनें जाऊन बसते.

**चंचला**:—आतां दुसरें बक्षीस. कु. चपला

**चपला**:—हलवायाच्या घरावर तुळशीपत्र. माझंच बुक मला बक्षीस देतात. वाहवारे वाहवा ! मुलींनो, अध्यक्षबाईंचे आभार मानण्याकरितां टाळ्या वाजवा.

( मुली जोरानें टाळ्या वाजवितात. इतक्यांत बाई येतात. )

मुली शांतपणानें जागेवर बसतात.

**बाई**:—मुलींनो, आज काय हा गोंगाट केला आहे ! सारी शाळा तुम्हीं डोक्यावर घेतली आहे.

**चपला**:—बाई, ती आम्ही डोक्यावर कशी घेऊं ! ती आमच्या डोक्यावरच आहे. आम्ही परवांचे खेळ करून पाहात होतों. आमचे खेळ किनई फार चांगले बसले आहेत.

**बाई**:—बरं ठीक आहे. उद्यां शाळेला सुट्टी आहे. परवां तुम्ही चांगले कपडे घालून एथें बारा वाजतां या. बक्षीस समारंभास चार वाजतां प्रारंभ होणार आहे. उद्यां आणखी एकदां खेळ बसवून पहा.

**कमला**:—मुलींनो, उद्यां तुम्ही माझे घरीं या. आपण आणखी एकदां आपले खेळ बसवून पाहूं. दुपारीं चार वाजतां सर्वजणी या बरं.

**बाई**:—कमला, तुझ्यावर माझी सारी भिस्त आहे. तूं हे सर्व खेळ चांगले बसव बरं. तें स्वागताचं गाणं कसं काय बसलं आहे म्हणून दाखवा बरें ! सर्व मुली ओ-ळीनें उभ्या राहातात व म्हणतात.

## पद.

( राग भैरवी, ताल त्रिताल. )

**अजि मुदित मन बहु झालें**
**नेत्राहि धाले ॥ ध्रु० ॥**
**बालक विनती ऐकुनि आले**
**प्रेमें सारे जन हे जमले ॥ ध्रु० ॥**
**सुजना सकला आनंदानें**
**स्वागत करूं या मुदित मनानें ॥ ध्रु० ॥**

**बाई**:—वा छान बसलें हो.

**चंचला**:—बाई, हें पद केव्हां म्हणावयाचें ! सगळा समारंभ आटोपल्यावर उभें राहून हें सर्व शाळेनें म्हणावयाचें ना !

**चपला**:—अग तें राष्ट्रगीत. हें गाणं. हें स्वागताचें गाणं अगदीं आरंभीं म्हणावयाचं. नाहीं हो बाई!

**बाई**:—मुलींनो, तुम्हा काय कराल कोण जाणे. मला तुमची भारी भीति वाटते. तुम्ही माझी व शाळेची आयत्या वेळीं फजीती कराल, भलत्याच ठिकाणीं टाळ्या वाजवाल, भलतेंच पद भलत्याच वेळीं म्हणाल.

**सरला**:—बाई, तसं कसं होईल! आम्ही इतक्या का वेड्या आहोंत? बाई, तुम्हीं आम्हांला किती किती शिकवलं बरं! आमच्या शाळेची फजीती आम्ही कशी होऊं देऊं. तुम्हीं खूण केली कीं आम्ही टाळ्या वाजवूं. नाहीं तर अगदीं गप्प बसूं.

**बाई**:—कमला, तूं उद्यां पुन्हा खेळ बसव. परवां अगदीं छान तयारी झाली पाहिजे. बरं आतां तुम्ही जा, मला पुष्कळ लिहावयाचें आहे. जा शाळा सुटल्याची घंटा वाजवा. चांगला पोशाख करून परवां या, बरं. आईला यावयाला सांगा बरं, विसरूं नका. (मुली जातात.)

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

—:०:—

### कमलाच घर.

(तिचा चुलत भाऊ बंडू अभ्यास करीत बसला आहे.)

**बंडू**:—आज सहा महिने झाले मला येथें येऊन. येथें आल्यापासून माझा वेळ फार आनंदांत चालला आहे. आतां मी इंग्रजी शिकत आहें. वडगांवची आठवण झाली कीं, मला अजून हसें येतें. आमच्या बाबांची आरडाओरड सकाळपासून सुरू व्हावयाची. माझ्यावर बाबांचा फार लोभ. सकाळपासून एकसारखे धम्मक लाडू ते द्यावयाचे. आईचाही माझ्यावर कांहीं कमी लोभ नव्हता. तीही साऱ्या दिवसभर पोटभर चापटपोळ्या द्यावयाची. लाडू पोळ्या खातां खातां मला जीव नकोसा होई. शाळेंतील आमचे गुरुजीही फार सज्जन, शाळेंत गेल्याबरोबर म्हणावयाचे. 'बंडोबा खुर्ची घ्या.' कधीं कधीं आम्हांला माझे विद्यार्थी बंधु व शिक्षक मिळून घोडीवर बसवायाचे. नको नको म्हटलें तरी ते ऐकावयाचे नाहींत. येथें आल्यापासून लाडू चुकले, पोळ्या चुकल्या, घोडी चुकली, खुर्चीही गेली. सगळें ठीक आहे, पण मला अभ्यासाचा मात्र भारी कंटाळा येतो. काय करावें! माझ्या या बथ्थड डोक्यांत अभ्यास कांहीं शिरत नाहीं. तें कांहीं नाहीं (दोन्ही कान ओढून) बंडोबा, आतां

अभ्यास करावयाला लागा. परीक्षा नापास झाली तर काका देतील हाकून, आतां पहिल्यानें गणित करूं या. ( वाचतो ) ४ पुरुष अथवा तीन बायका एक काम २४ दिवसांत करितात, तर तेंच काम ६ पुरुष व ९ बायका किती दिवसांत करतील ? अरे बापरे, हे काय लचांड आहे! हें उदाहरण करावयाचें तरी कसें बुवा. हो हो, आतां आठवलें. मास्तर म्हणले, सान्या पुरुषांच्या बायका करून टाकाव्या म्हणजे हें उदाहरण तेव्हांच येतें. ताईच्या बाई म्हणाल्या, बायकाचं पुरुष केले म्हणजे हें उदाहरण येतें. मग आतां करूं तरी काय ? पुरुषांच्या बायका. छे, तें नाहीं आपल्याला करितां येणार. बायकांचे पुरुष तेही मला नाहीं करितां येणार. जाऊं द्या, कमलाताईनें हीं उदाहरणें केलीं आहेत तींच आपण उतरून घेऊं म्हणजे झालें.

( आंतून शब्द येतो बंडू, बंडू, )

आलीच कमळाताई. गोडी गुलाबीनं घेतलें पाहिजे, नाहींतरं ती वही नाहीं द्यावयाची.

## कमला येते.

वाहवा ! बंडोबा, आज आपली स्वारी अभ्यास करावयास बसली आहे.

**बंडोबाः**—ताई, मी आजपासून मनापासून अभ्यास करावयाला लागलों आहें. तूं मला मदत करशीलना ?

**कमलाः**—हो हो, मी तुला वाटेल ती मदत करीन. तूं अभ्यास कर, पास हो बाबांना किती तरी आनंद होईल तूं पास झालास म्हणजे.

**बंडूः**—ताई, मला हीं उदाहरणें अगदींच सुटत नाहींत. तुझी वही दे म्हणजे मी तिजवरून उतरून घेईन.

**कमलाः**—अरे, असें करून तुला गणित कसें येईल? माझ्या वहीवरून तूं उदाहरणें उतरून तूं आपल्या गुरुजींना दाखविणार व त्यांना फसविणार; असें करणें बरें नाहीं. बरें बंडू, आज मजकडे मुली येणार आहेत. मी त्यांना फराळाला बोलाविलें आहे. आम्ही उद्यांच्या समारंभाचे खेळ बसविणार आहोंत. बागेच्या मागील माडींत आम्ही खेळणार आहोंत. तूं मला फराळाचें न्यावयास मदत करशील ना ? परवां मी तुला सगळीं उदाहरणें समजावून देईन.

**बंडूः**—हो हो ताई, मी तुला चांगली मदत करीन.

**कमळाः**—बरें तर. मी माडी झाडून बसावयास घालण्यास माळ्याला सांगतें ( जाते. )

**बंडूः**—आतां इतिहास तरी करावा.

हुमायून बादशाहा इ. स. १५५६ सालीं मरण पावला. हुमायून बादशहा इ. स. पंधराशें इ. स. पंधराशें सालीं मरण पावला. सालीं मरण पावला, सालीं मरण पावला.

कोण मेला बरं. हुमायून आणि कधीं मरण पावला. देव जाणे. हे बादशहा मधीं आधींच का मेले कोणाला ठाऊक? प्रत्येक शतकाचे शेवटीं एक बादशहा जन्मला असता व एक मेला असतां तर आम्हां विद्यार्थ्यांचा किती त्रास चुकला असता? हुमायून बादशहा १६०० त मरण पावला व त्याचा मुलगा १६०० त जन्मला, त्याचा मुलगा कोण बरं (पुस्तकांत पाहातो) हो हो, अकबर, अकबर १६०० त जन्मला व १७०० त मरण पावला. त्याचा मुलगा सेलीम १७०० त जन्मला तो १८०० त मेला व त्याचा मुलगा शहाजहान १८०० त जन्मला व १९०० त मेला. वा काय मजा झाली असती, पण ही युक्तिच कोणाचे डोक्यांत आली नाहीं!

(पडद्यांत आवाज होतो. बंडू बंडू, घरांत आहेस का)

**बंडूः**—आज मी अभ्यास करावा असं देवाच्या मनांतच नाहीं. हे पहा आमचे वडगांवचे जानी दोस्त गणपतराव आले.

**गणपतीः**—कां बंडोबा, आज अभ्यासांत अगदीं गुंग झालांत. पहिला नंबर आणावयाचा वाटतं?

**बंडोबाः**—शेवटून पहिला नंबर तर आहेच. तो कोण घेणार आहे? पण गड्या आतां अभ्यास केला पाहिजे. नापास झालों तर काका देतील हांकून, बाबा झोड झोड झोडतील. आई बोल बोल बोलेल, आणि लोक हास हास हासतील. पण गड्या, माझ्या या डोक्यांत तर कांहीं शिरत नाहीं. या मुली बघ कशा भराभर अभ्यास करतात.

**गणपतीः**—कायरे, या शहरांतल्या कितीतरी मुली शाळेंत जातात. इंग्रजी शिकतात. कॉलेजांत जातात. या पुढें काय नोकऱ्या करणार?

**बंडोबाः**—आणि मग यांचे नवरे काय करतील? नवरे भाजतील भाकऱ्या आणि बायका करतील नोकऱ्या. आमचे बाबा म्हणत होते, या कलियुगांत असंच व्हावयाचें व शेवटीं दुनिया बुडावयाची दुनिया.

**गणपतीः**—आपलं वडगांव कसं छान! काय बिशाद आहे, एक मुलगी शाळेंत जाईल? पण बंडोबा, यंदां पास झालें पाहिजे. तुझे काका मला दरमहा ५ रुपये शाळेकरितां मदत करितात. ते मला म्हणाले, तूं नापास झाला तर मी तुझी मदत बंद करीन. मग आमचे बाबा आपल्या गांवाकडे मला शेतावर धाडतील, पण काय करावं अभ्यास तर कांहीं होत नाहीं. मी आतांच व्याकरणाचे काळ करीत होतों, पण मला कसचे पाठ होतात. भूत काळाचे पांच प्रकार आहेत. भूत, अपूर्णभूत, भूतभूत. शेवटीं मी कंटाळलों. हीं भूतं माझ्या कांहीं लक्षांत राहिनात; मग दिलें व्याकरण फेकून.

**बंडोबाः**—गड्या, तुझ्या या भुतानें एक गंमत माझ्या लक्ष्यांत आली आहे. फार मजेदार गंमत होईल. पण मला तुझी मदत पाहिजे. फार दिवसांत आपण

कांहींच गंमत केली नाहीं. आजची ही मौज पण मौज होईल. काकाही घरीं नाहींत. पण तूं मदत करशील ना ?

**गणपती**:--हें का सांगायला पाहिजे. हें घे तुला वचन. बोल तुला काय माझी मदत पाहिजे ? मी तुला मदत करावयाला एका पायावर तयार आहें.

**बंडोबा**:—हें पहा, आज मुली त्या पलीकडच्या बंगल्यांत दुपारीं ४-५ वाजतां खेळ खेळणार आहेत. फराळ करणार आहेत. कांहीं गाणीं गाणार आहेत. आपण देऊं त्यांची गंमत करून; मग या उद्यांच्या समारंभांत कशीं भाषणें करतील तें पाहूं.

**गणपती**:—पण तूं काय करणार तें तर सांगशील.

**बंडोबा**:— हें पहा, युक्ति पण युक्ति आहे, पण कोणाला कळतां उपयोगी नाहीं, हं. नाहीं तर तुझीं व माझीं शंभर वर्षें पुरीं भरलीं. हें पहा, मुली खेळावयाला लागल्या कीं मी तुला मागल्या जिन्यानें माळ्यावर आणून बसवतों. त्या जिन्यानें कोणीही कधीं जात नाहीं. माळा मी स्वच्छ झाडून ठेवितों. आमचे आजोबा वारल्याला झालीं १० वर्षें. तूं हो आमचा आजोबा, व आंतून ओरड ' ही माझी माडी, एथून तुम्ही सगळ्या चालत्या व्हा. ' मी आधींच मुलींना घाबरवून टाकतों. त्यांना सांगतों येथें आजोबा कधीं कधीं येतात. मग मुली घाबरून धूम पळतील. मग आपण त्यांचें फराळाचें यथास्थित खाऊं, व मागल्या बाजूनें नदीवर हवा खाण्यास जाऊं. काकीनें विचारलें, तर सांगेन मांजर ओरडत होतें व मुली उगीच भ्याल्या. आज मुलींनीं पाठ केलें नाहीं तर त्यांना उद्यां गाणीं म्हणतां येणार नाहींत. आणि त्यांची उद्यां खूप फजीती होईल. या मुलींची अशीच खोड मोडली पाहिजे. आहेना युक्ति कबूल ?

**गणपती**:—ठीक ठीक, नामी युक्ति. पण जरका फसली, तर बाबा मार मार मारतील आणि पाठ मोडून टाकतील.

**बंडोबा**:—अरे फसते कशानें ? तूं व मी असल्यावर युक्ति फसण्याची गोष्ट कशाला पाहिजे ? चला आतां वेळ फार झाला. मला आतां आंघोळ करावयाची आहे. आज काका घरीं नाहींत तेव्हां देवपूजा मला केली पाहिजे.

**गणपती**:—बरें मीही जातों. मला चार वाजतां तुझी तयारी झाली कीं हाक मारावयास ये.

**बंडोबा**:—हो हो, तूं त्याची कांहीं काळजी करूं नकोस. गंमत पण गंमत होईल. ( दोघेही हसतात व जातात.)

( कमला पडद्यांतून बाहेर येते. )

**कमला**:--वाहवा ! वाहवा ! बंडोबा, तुम्ही आज आमची गंमत करणार काय ? आईला जाऊन सांगूं का ही सगळी हकीगत ? पण नको. आधींच ती या बंडूच्या

सोडयांला कंटाळली आहे व तिला ही हकीगत? कळली कीं ती बाबांना सांगून देईल त्याला परत धाडून. मग कशाचा त्याचा अभ्यास ? तसें नको. आम्ही मुलीच या दोघांची गंमत करूं. पाहूं कोण कोणाची गंमत करतें तें.

जाते.

---

## प्रवेश तिसरा.

---

( बागेच्या माडींत सर्व मुली जमल्या आहेत. )

**कमलाः**—मुलींनो, तुम्ही अगदीं वेळेवर आलांत. आतां आधीं आपण खेळाला सुरुवात करूं या. सर्व खेळ व गाणीं अगदीं नीट बसवूं. चला पहिलें पद कोणतें म्हणतां ? पण मुलींनो, आधीं मजजवळ या. तुम्हांला एक गंमत सांगावयाची आहे. गंमत पण गंमत आहे. पण अगदीं नीट झाली पाहिजे. ( मुली तिच्याजवळ येतात. ती सर्वांशीं हळूहळू बोलते ) का कळलं ना सर्वांना ?

**चंचलाः**—बरं पाहूं पाहूं, मुलगे हुशार असतात का मुली असतात ? आह्मांला भिवविण्याचा बेत केला आहे का ? आतां पाहूं, खरी भागूबाई कोण आहे ती

**कमलाः**—अग मोठ्यानें बोलूं नकोस. बंडूनें ऐकलं तर सगळीच गंमत फुकट जायची. बंडू आतां येईल. आतां जशा कांहीं त्या गांवच्याच नाहीं अशा रहा पाहूं. चला आतां खेळाला सुरुवात करूं. चला या घागरी घ्या. आपण नदीला जाण्याचें गाणें म्हणूं व कृति करूं.

( सगळ्या मुली घागरी घेऊन उभ्या राहातात, नंतर गाणें म्हणतात व गाण्याप्रमाणें कृति करितात. )

### पद

( अभिनव मधुलोलुप हे या चालीवर. )

जल नदिचें भरण्याला जाउं या चला
अरुण किरण पसरित रवि हसत पातला
मंद मंद शीत वात
वाहुनि हा सुखवि बहुत
काल शांत हा प्रभात
जाउं या चला
जल नदिचें भरण्याला जाउं या चला ॥ १
घट घेऊं एक शिरीं
दुसरा तो घेउं करीं

ताप सकल वायु हरी
जाउं या चला
जल नदिचें भरण्याला जाउं या चला २

जल नदिचें बहुत शांत
विमल मधुर जणु अमृत
घट बुड बुड शब्द करित
पूर्ण तो भरा
जल नदिचें भरण्याला जाउं या चला ३

घट घेऊं एक शिरीं
दुसरा तो घेउं करीं
वायू हा ताप हरी
जाउं या घरा
जल नदिचें भरुनी हें जाउं या घरा ४

शांत काल हा प्रभात
जाउं चला गीत गात
ईश गुणा प्रेमभरित
जाउं या घरा
जल नदिचें भरुनी तें जाउं या घरा ५

(मुली थांबतात.)

**कमलाः**—गाणें तर छान बसलें. अजून बंडू कसा आला नाहीं? बंडू, बंडू.

बंडू येतो.

बंडू, घरांत जा. आईनें फराळाचें केलें असेल तें एथें घेऊन ये. आम्ही आधीं फराळ करूं व मग राहिलेले खेळ करूं.

**चपला.**—बंडू येईतोंपर्यंत आपण आणखी एक गाणें गाऊं.

**अमलाः**—हो हो, चला गाऊं या.

( मुली गातात व तालावर टिपऱ्या खेळतात. )

**पदः**—गुजराथी गाण्याची चाल.

या वेली फुलती सुमेंही डुलती उपवन शोभविती ॥
हीं बाळें अपुल्या मातापितया गृहांत सुखवीती
हीं विहगबालकें चिव चिव करिती तरूंस भूषविती
या तारा बाला नील नभाला शोभा बहु देती

हीं हरण बालकें मजेंत रमती वनास खुलवीती
या बाल बालिका सकल जगाला मोहकता देती
( चाल बदलून ) हरि सदा तया जपतो
करि दया तयांवरि तो
( चाल बदलून ) या बाल बालिका देवाजीला भारी आवडती
या जगास साऱ्या सुखवुनि भारी सौंदर्या देती ॥ ध्रु ॥

( पलीकडच्या माडीन धबकन आवाज होतो मुली एकमेकींना खुणावतात. )

**अमलाः**—कमल, पलीकडल्या माडींत कसला धबकन् आवाज झाला ?

**कमलाः**—अग ती माडी बंद आहे. असेल मांजर बिंजर ( आणखी आवाज होतो. )

बंडू, अरे बंडू,
( बंडू येतो. फराळाचें कोपऱ्यांत ठेवतो. )
अरे हा पलीकडल्या माळ्यांत आवाज कशाचा होत आहे?

**बंडूः**—( घाबरून ) ताई, होतो आहे खराच. असाच एथें आवाज होतो. मीं माळ्याला विचारलें हा कशाचा आवाज होतो ?

**अमलाः**—मग तो काय म्हणाला ?

**बंडूः**—मी नाहीं सांगत तुह्मांला. तुम्ही घाबराल.

**अमलाः**—अरे बंडू, आम्हांला सांग तर खरं. खरंच मला बाई भारी भीति वाटते.

**चपलाः**—बंडू, असं रे काय करतोस ? सांग पाहूं.

**कमलाः**—सांग पाहूं बंडू.

**बंडुः**—तो म्हणाला, तुमचे आ-आ-आ पण मी नाहीं सांगत तुम्हांला, तुम्हांला भीति वाटेल.

**कमलाः**—सांगना रे बंडू, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे.

**बंडूः**—सांगतों तर. तो म्हणाला तुमचे आजोबा येथें येतात. तुम्ही येथें बसूं नका.

पुन्हा आवाज होतो.

पहा हे येथें आले,आपल्या आजोबाला वारून १० वर्षें झालीं तरी ते येथें येतात.

**अमलाः**—कमला, चला आपण जाऊं चला,पळा एथून; अग बाई, नको ग बाई एथें बसायला.

**सरलाः**—छे छे छे, नकोग बाई एथें खेळावयाला. चला पळा, फराळाचें एथेंच पडूं दे.

**कमलाः**—थांबा मुलींनो, माझे आजोबा फार प्रेमळ होते. माझी आई म्हणते, त्यांना मुली भारी आवडत, मुलींवर त्यांचा भारी जीव. आपला खेळ पाहून त्यांना फार समाधान होईल.

( आंतून आवाज होतो. मुलींनो, एथून निघून जा. )

**कमलाः**—अग चपला, आमचे आजोबा बोलूं लागले. बंडू, आजोबाला मुलगे अगदीं आवडत नसत. तूं आपला पळ एथून. मुलींनो, आजोबांना मी एथें आणतें. आपण त्यांना आपला खेळ दाखवूं.

**सरला व अमलाः**—बरें तर, चल कमले, आम्हीही तुझ्या आजोबांना आणावयाला येतों.

**बंडूः**—नका नका, मुलींनों, तिकडे जाऊं नका. माझ्याकडे कांहीं नाहीं बरं आपल्या कानीं सात बाळ्या.

**सरलाः**—बंडू, बाळ्या कानांत घालून तुला मुलगी व्हावयाचं वाटतं, मग आम्ही तुला बंडी म्हणूं चल. कमले चल, आपण आजोबांना आणूं.

( मुली जातात व घाबरलेल्या गणपतीला घेऊन येतात )

**कमलाः**—मुलींनो, हे पहा आमचे आजोबा. अरे हा तर शेजारचा गणपती. गणपती, तूं आमचा आजोबा कसा झालास ?

**सर्व मुलीः**—हुर्यो, आजोबाची हुर्यो.

( कमलाची आई शांताबाई येते. )

**शांताबाईः**—मुलींनो, काय मांडलं हें. काय हा आरडा, काय हा दंगा. असे का शाळेंत तुम्ही खेळ करणार आहां ?

**कमलाः**—नाहीं. आई, तुला एक आनंदाची बातमी सांगणार आहे. तुझे सासरे, तुझे मामंजी. बाबांचे बाबा, माझे आजोबा येथें आले आहेत. म्हणून आम्हांला आनंद झाला.

**शांताबाईः**—चल वेडी कुठली. कांहीं तरी बोलते. मुलींनो, ही काय भानगड आहे ?

**सरलाः**—काकू, हा गणपती आजोबा होऊन माळ्यावर लपून बसून आम्हांला भिवडवीत होता व हा बंडू त्याला मदत करीत होता. हा बंडू म्हणाला, पळा, पलीकडे आजोबा आले आहेत. हा आमच्या खेळाचा विध्वंस करीत होता.

**शांताबाईः**—गणू, तुला चांगले कान फुटले. थांब, तुझ्या बापाला सांगून तुझी पाठ मऊ करवितें.

**गणूः**—( घाबरून ) काकू काकू, मीं कांहीं केलं नाहीं. या चंडूनें मला असें करावयाला सांगितलं. तो म्हणाला, या पोरींची खोड मोडूं.

**शांताबाईः**—अस्सूं अस्सूं. बंडोबा, तुम्हीं फार शहाणे झालां. उद्यां तुम्ही वडगांवाला चालते व्हा. पुरे झाला तुमचा अभ्यास. भावोजींना तुमचा हा सगळा पराक्रम कळवितें.

गणू कोपऱ्यांत उभा राहातो व डोळे पुसतो.

मुलींनो, चालूं द्या तुमचा खेळ, मी येथें बसतें.

**कमलाः**—आई आतां आमचीं थोडींच गाणीं राहिलीं आहेत तीं तूं ऐक.

( टिपऱ्या वाजवीत म्हणतात. आनंदाचाकंद या चालीवर )

**जन्मभूमि तूं धर्मभूमि तूं प्रियतम अमुची भारती**
**जोंवरि आयू तोंवरि गाऊं सेवूं तुजसी भारती**
**पूर्वज अमुचे तुज सेवाया दक्ष सदा ते राहिले**
**तन-मन-धन तव चरणीं अर्पुनि धन्य जनीं ते जाहले**
**विद्याभ्यासा संपवुनीयां जगतामाजी अम्ही शिरूं**
**प्रेमळ पावन मंगल तव ही मूर्ती हृदयीं सदा धरूं**
**तव कल्याणा साधायाला प्रेमें आम्ही झटूं सदा**
**निराश विन्मुख होऊं न कधीं आल्या जरि त्या बहु विपदा**
**प्रियतम प्रेमळ पावन मंगल तुजसम कोणी नच जगतीं**
**जोंवरि आयू तोंवरि गाऊं सेवूं तुजसी भारती**

**कमलाः**—आई, आपल्या भारतीमातेचें हें स्तुतीचें पद्य तुला कसें काय आवडलें !

**शांताबाईः**—खरोखर, हें फारच गोड आहे. आपल्या भारतीमातेची योग्यताच तशी आहे. तिच्यावर प्रत्येकानें प्रेम केलेंच पाहिजे. चला, झाला तुमचा खेळ. आतां संध्याकाळ झाली आहे. तुम्ही घरांत चला. मी तिकडेच तुम्हांला फराळाला वाढतें.

**कमलाः**—आई, आतां आमचं अगदीं शेवटचं एक गाणं राहिलं आहे. चला मुलींनो, ओळींत उभ्या रहा व हात जोडा. आपण शेवटची प्रार्थना म्हणूं.

**पद**

( राग झंपा. )

**नियत कालीं जला वर्षुनी मेघमाला**
**सजल सफला करू आर्यभूला ॥ ध्रु० ॥**
**आधिव्याधी कदा तापवो ना जना**
**ज्ञानप्राप्ती सदा आवडो ती मना ॥**
**ईशपादीं करूं विनति बाला अम्ही**
**दीर्घ आयूस दे भूपतीला ॥ नियत कालीं ॥**

**कमला**:—आई, संपला आमचा खेळ–आमची तयारी चांगली झाली. उद्यां आमचा खेळ पाहून आमच्या बाईंना समाधान वाटेल. पण आई, तूं आमच्या खेळाला येशील ना?

**शांताबाई**:—मुली, हें का विचारावयाला हवं? तुम्हीं मुलींनीं एवढी मेहनत घेऊन खेळ केला तो कशाकरतां? तर त्याचं उत्पन्न गरीब व अनाथ मुलांना द्यावं ह्मणून. या तुमच्या खेळाला हजर राहून प्रत्येक आईनें मदत केली पाहिजे. मी अवश्य येईन बरं. चला आतां सगळ्या, घरांत चला फराळ करा व मग घरीं जा. गणपतराव, तुम्ही आपल्या घरीं निघून जा. तुमच्या बापाला बोलावून मी सगळी हकीगत सांगतें म्हणजे ते तुमची पाठ मऊ करतील व वडगांवाला शेतावर परत धाडतील. बंडोबा, उद्यां सकाळीच तुमच्या जाण्याची तयारी करा, पुरे झालं तुमचं शिक्षण.

**कमला**:—आई, माझ्याकरितां एक वार बंडूला क्षमा कर. तो पुन्हा असें कधीं करणार नाहीं.

**सरला**:—काकू, करा त्याला क्षमा आमच्याकरितां. त्या दोघांला क्षमा करा. आमच्या करितां त्यांना शिक्षा झाली; तर उद्यांचा खेळ देखील आम्हांला गोड लागणार नाहीं.

**बंडू**:—काकू, मी आतां असें कधीं करणार नाहीं. मला घरीं धाडूं नका. तुमच्या पायां पडतों.

**शांताबाई**:—बरें तर, एकवार तुह्मांला क्षमा करितें. चला मुलांनो, आतां फराळास चला.

---

# पोंच व अभिप्राय.

**गृहलक्ष्मी-शिशुअंक**:—या अंकांत पुरुष लेखकांपेक्षां स्त्रीलेखकांचेच लेख जास्त आहेत. ते नेहमीं प्रमाणेंच लहान पण मननीय आहेत. सुंदर कागदावर इतकीं व विविध प्रकारचीं मुलांचीं चित्रें जमवून प्रसिद्ध करणें हा या

अंकाचा विशेष आहे. हें काम खर्चाचें आहे तथापि इतकीं चित्रें घालून अंकाची किंमत(रु. १) फारच कमी ठेविली आहे. अंक संग्रहणीय आहे. यांत शंका नाहीं.

**सन १९२५ सालचें मराठी वाङ्मयः**—हें पुस्तक व्हर्न्याक्युलर ट्रान्सलेशन सोसायटीचे चिटणीस श्रीयुत म. का. कारखानीस बी. ए. यांनीं लिहिलें असून त्यास प्रो. पोतदार यांची सुंदर प्रस्तावना जोडली आहे. या पुस्तकांत १९२५ साली प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या विषयांवरील पुस्तकांची वर्गवार माहिती दिली असून या वर्षांतील वाङ्मयाचें पहिल्या ४० पानांत पर्यालोचन केलें आहे. या विवेचनावरून यावर्षी प्रसिद्ध झालेलीं चांगलीं पुस्तकें कोणतीं हें सहज समजं शकेल. या पुस्तकास शेवटीं सूचि असल्यानें माहिती पाहाण्याची साय झाली आहे. या पुस्तकास जनतेनें व वाङ्मयप्रेमी संस्थांनीं उदार आश्रय देऊन ग्रंथकाराच्या श्रमांचें चीज करावें म्हणजे पुन्हा असाच प्रयत्न करण्यास त्यांस प्रोत्साहन मिळेल. पुस्तकाची किंमत १ रुपाया.

**याला कारण शिक्षणः**—लेखक श्रीयुत नारायण हरी आपटे. मुलांना लहानपणीं चांगलें शिक्षण मिळणें अगर न मिळणें यावर त्यांचें भावी आयुष्य कसें अवलंबून असतें याचें चित्र रेखाटाण्याचा कादंबरींत प्रयत्न केला असून तो बराच साधला आहे. पान १८३ वर प्राथमिक शिक्षकांवर केलेली टीका अतिशयोक्तिपूर्ण वाटते. पण पुस्तक वाचनीय आहे यात शंका नाहीं:—मि. ठिकाण—नरेंद्रबुकडेपो. **दादर**—किंमत १॥ रुपाया.

**कथा—सरित्सागर सार व विचारः**—लेखक श्रीमुत म. का. कारखानीस पुस्तकांतील सारांश प्रथम देऊन शेवटीं,ग्रंथकारानें. ग्रंथांतलि पात्रें, त्या वेळची समाजिक व धार्मिक स्थिति, ग्रंथकार व ग्रंथाचा काल वगैरे गोष्टींचा शोधक बुद्धीनें विचार केला आहे. केवळ करमणुकीखातर वाचीत असतां आपल्या वाचनाचा इतरांना कसा फायदा देतां येतो याचें हें उदाहरण आहे. पुस्तक संग्राह्य आहे. मि. ठिकाण नवीन किताबखाना पुणें—किंमत ८ आणे.

**स्त्रियांचा ज्ञानकोशः**—लेखिका सौ. कमलाबाई दांडेकर—यांत मुलींनी उपयुक्त असे उखाणे दिले आहेत—किंमत २॥ आणे.

**नवीन अंकगणितः**—लेखक श्रीयुत गजानान महादेव देशमुख बी. ए. बी.एस सी.हें पुस्तक मराठी चौथ्या इयत्तेकरितां सुधारलेल्या अभ्यासक्रमास धरून

लिहिलें आहे. या वर्गाला क्षेत्रफळ, घनफळ, सोपा जमाखर्च व सरळ व्याज हे भाग नवीन नेमले आहेत. सुलभ रीतीनें विषय समजावा अशी पुस्तकांत मांडणी केली आहे. पुस्तकांतील उदाहरणें व्यवहाराला धरून असून भाषा सोपी आहे. शाळांतून वापरण्यास हें पुस्तक योग्य आहे. मिळण्याचें ठिकाण—नवीन किताबखाना पुणें—किंमत ५ आणे.

**नवीन भूगोलः**—पुस्तक १ लें—लेखक श्री. धा. मु जोगळ व द. बा. पेणकर—पुस्तक मुलांच्या चवथ्या व मुलींच्या ५ व्या इयत्तेकरितां लिहिलें आहे. पण हा भाग मुलींच्या ५व्या इयत्तेकरितां नाहीं असें अभ्यासपत्रकावरून दिसून येतें. पुस्तकांत नकाशे भरपूर व चांगले असून चित्रेंही घातलीं आहेत. पुस्तकाची रचना पाठात्मक व मुलांना आवश्यक इतकीच माहिती पुस्तकांत दिली आहे. त्यामुळें पुस्तक मुलांच्या हातीं देण्यास योग्य आहे.—किंमत ६ आणे. नवीन किताबखाना पुणें.

**रिपोर्टः**—अहमदनगर म्युनिसिपल स्कूलबोर्डाचा गेल्या २॥ वर्षांच्या कामाचा अहवाल पोहोंचला. त्यावरून शिक्षणाच्या बाबतींत बरीच सुधारणा चालू असल्याचें दिसतें. त्यांत प्रसिद्ध झालेला भाग वाचनीय आहे.

वरील पुस्तकें पाठविणारांचे आभारी आहों.

---

# मुलींचे खेळ

दरसालप्रमाणें गेल्या फेब्रुवारी महिन्यांत मुलांच्या सेवासंघामार्फत ‘ विलिंग्डन स्पोर्ट्स क्लब ’ चे मैदानावर लेडी वॉकर यांचे अध्यक्षतेखालीं निरनिराळ्या शाळांतील मुलींचे प्रेक्षणीय खेळ झाले. हे खेळ जुळवून आणण्याच्या कामीं संघाच्या उपाध्यक्ष मिसेस लोरी यांनीं विशेष परिश्रम घेतले होते. सायंकाळच्या रम्य वेळीं तें प्रशस्त मैदान मुलींनीं अगदीं फुलून गेलें होतें. निरनिराळ्या प्रकारचे दहा बारा खेळ झाले. शेवटीं ट्रेनिंग कॉलेजमधील मुलींनींच पहिला नंबर पटकावल्यामुळें लेडी वॉकर यांचे हस्तें या संस्थेतील मुलींना ‘ शील्ड ’ देण्यांत आलें. गुदस्तांही याच संस्थेनें ‘ शील्ड ’ मिळविलें होतें. या समारंभाच्या वेळीं अध्यक्ष लेडी वॉकर यांचें मुलींना उत्तेजनपर असें भाषण झालें, शेवटीं मे० डिरेक्टर साहेब मि० लोरी यांनीं लेडी वॉकर यांचे आभार मानल्यावर हा समारंभ आटोपला.

---

# वनिता समाजाचा वार्षिक समारंभ

गेल्या ता. १७ मार्च रोजीं या कॉलेजांतील वनितासमाजाचा वार्षिक समारंभ प्रसिद्ध विदुषी सौ० सरलाबाई नाईक यांचे अध्यक्षतेखालीं मोठ्या थाटानें पार पडला. त्या प्रसंगीं कॉलेजांतील पटांगण चित्रविचित्र रंगाच्या तोरणांनीं व लतापल्लवांनीं शृंगारलें होतें. या समारंभाला शहरांतील स्त्रीपुरुषसमाज बराच जमला होता, तसेंच या कॉलेजांतून उत्तीर्ण होऊन गेलेल्या कित्येक विद्यार्थिनीही या समारंभास मुद्दाम आल्या होत्या. सुटून गेलेल्या कांहीं विद्यार्थिनींनीं वनिता समाजाला उदार अंतःकरणानें देणग्या दिल्या. अध्यक्ष सौ.सरलाबाई यांचें शिक्षक, परीक्षक व पालक यांच्या कर्तव्यासंबंधीं उपदेशपर भाषण झालें. नंतर या समारंभाकरतां रा. कारखानीस यांनीं मुद्दाम रचलेलें 'सीता' व 'मीराबाई' हे प्रवेश झाले. मुलींनीं आपापल्या भूमिका उत्तम वठविल्या. त्यांतले त्यांत 'मत् प्रियकांता श्रीरघुनाथा निरोप द्या मजला' हें करुणरसाचें जानकीचें शेवटचें पद ऐकून श्रोतृवृंद तर गहिंवरलाच !! तसेंच 'मधुर मुरली अधरीं धरूनी वाजवीत जाई' हें मीराबाईचें भक्तिपद ऐकून प्रेक्षक तल्लीन झाले !! सायंकाळची रम्य व शांत वेळ, जानकी व मीराबाई यांसारख्या साध्वी स्त्रियांचे प्रवेश, मुलींचा योग्य अभिनय व त्यांचा मधुर कंठ यामुळें हा समारंभ फारच गोड झाला.

---

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर
सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

सुधारलेल्या अभ्यासक्रमास धरून लिहिलेलें
( शालोपयोगी )

पृष्ठें १६८ ] **नवीन अंकगणित.** [ किंमत पांच आणे.

लेखक
**ग. म. देशमुख.**

देशमुख यांच्या या अंकगणितासंबंधीं
## विद्वान् लोक काय बोलतात ?

**संपादक, मराठी शिक्षकः**—........विषयाची क्रमवार **पद्धतशीर मांडणी**, पूर्णपणें **व्यावहारिक व विविध प्रकारचीं उदाहरणें** आणि अगदीं **सोपीं** पण विषयाची **उत्तम समजूत पटविणारीं स्पष्टीकरणें** इत्यादि हरएक बाबतींत पुस्तक **उत्कृष्ट** झालें असून त्याची छपाईही सुबक आहे आणि **१६८** पृष्ठांच्या पुस्तकाची ८५ **किंमतही फारच माफक आहे** (अंक–फेब्रुवारी १९२८)

**रा. रा. द. ग. वाडेकर.** ( माजी ॲड्. ऑफिसर, म्यु. बोर्ड, **अहमदनगर** ...देशमुख यांचें अंकगणित **स्वयंप्रभ** आहे...... शिक्षकांनाहीं शिकवावयाचा विषय अत्यंत सुलभ भाषेंत शिकवितां येऊन व्यवहारांतील विविधप्रसंग शोधून काढण्याचे त्यांचे श्रम वांचतील ! या पुस्तकांत उपपत्ती निराळी दिली नाहीं. तथापि सर्व विषय असेच समजावून दिले आहेत कीं, "**हें असें कां ?**" हें त्या समजुतींतच समजलें जात आहे. अर्थात् **उपपत्ती म्हणजे दुसरें काय ?** १२-२-२८

---

**रा० के. म. जोशी, कार्यकारी अध्यक्ष, इलाखा शिक्षकसंघ,** पो. नारायणगांव, पुणें:–इयत्ता ४ थी करितां आतांपर्यंत जीं अंकगणिताचीं पुस्तकें उपलब्ध आहेत, त्या सर्वांत रा. देशमुख यांचें अंकगणित **अग्रभागीं** शोभेल ! हल्लींच्या काळीं मुलांना काय पाहिजे व शिक्षकांनीं किती शिकवावें तसेंच **अंकगणित व व्यवहार** यांची **सांगड कशी घालतां येते** याचा **नमुना** म्हणून हें पुस्तक मानण्यास हरकत नाहीं. सध्यांच्या बदललेल्या परिस्थितींत अशा तऱ्हेच्या पुस्तकाची भासणारी उणीव **रा. देशमुख** यांनीं भरून काढली आहे. पत्र ता. २२।२।२८

---

**नमुन्याची प्रत आजच मागवून घ्या.**
हें पुस्तक वाचल्यावर
चवथ्या इयत्तेकरितां असलेल्या इतर कोणत्याही अंकगणितापेक्षां
## यांत कांहीं विशेषच केलें आहे, असें दिसेल !

* **मराठी शाळेंतील इयत्ता ४ थी करितां सरकारनें टेक्स्टबुक म्हणून मंजूर केलें.**
( इं. पत्र. S. 66 B. S. १६ ३-१९२. )

**नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें शिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.**

---

आरोग्यशास्त्रकर्ते रा० ग० म० देशमुख
यांनीं तयार केलेलें

( शालोपयोगी ) सरकारनें मंजूर केलेलें ( शालोपयोगी )

**सोपें अंकगणित** — ( मराठी इयत्ता २ री करितां ) किंमत २॥ आणे.

**सोपें अंकगणित** — ( मराठी इयत्ता ३ री करितां ) किंमत ३। आणे.

१. पुस्तकें **सरकारनें मंजूर केलेल्या नवीन अभ्यासक्रमास** धरून लिहिलेलीं आहेत.

२. लहान मुलांकरितां लिहिलेलीं पुस्तकें **मोठ्या टाईपांत** असावीं, या नियमाप्रमाणें सदर पुस्तकांत **मोठा टाईप** व **ठळक आंकडे** वापरले आहेत.

३. सदरहू पुस्तकांत उपपत्तीचा भाग स्वतंत्र असा बिलकुल दिलेला नाहीं. तथापि प्रत्येक रीतीची स्पष्ट समजूत होईल अशी मांडणी केली आहे.

४. सुरवातीला नमुना म्हणून बरींच उदाहरणें सोडवून दाखविलीं आहेत. नंतर त्याच प्रकारचीं बरीचशीं **तोंडीं** व **लेखी** उदाहरणें खालीं दिलीं आहेत.

५. सर्व उदाहरणें **व्यवहाराला धरूनच** रचलेलीं आहेत. अशक्य कोटींतलीं उदाहरणें घेतलीं नाहींत. प्रथम सोपीं व मग हळूहळू कठीण उदाहरणें दिलीं आहेत.

६. उदाहरणांची **भाषा** लहान मुलांना कळेल अशी अगदीं **साधी** व **सोपी** आहे. त्यांना कळणार नाहीं असा एकही शब्द वापरला नाहीं.

७. हा विषय खेडेगांवांतील तसेंच शहरांतील मुलांना शिकावयाचा असतो म्हणून दोघांच्या पाहाण्यांतले किंवा ऐकण्यांतले व्यवहारच घेतलेले आहेत.

८. उदाहरणांमध्यें **विविधता** असल्यामुळें तीं मुलांना कंटाळवाणीं वाटत नाहींत.

---

**मराठी पांचव्या इयत्तेकरितां सरकारनें मंजूर केलेलें**

**किंमत ) व्यावहारिक अंकगणित. ( १० आणे**

**भाग दुसरा.**

लेखक—**ह. कु. कुलकर्णी.** शिक्षक, नू. म. वि. हायस्कूल, पुणें.

जुन्या पद्धतीप्रमाणें अंकगणित विषय शिकविण्यांत येत असल्याकारणानें यांत्रिक पद्धतीप्रमाणें मुलें फक्त उदाहरणांची उत्तरें कढण्यापलिकडे त्यांतील व्यहार डोक्यांत घेत नाहींत, म्हणून तीं या विषयांत कच्चीं राहातात. गणित विषयाचा व्यवहारांत उपयोग होत असतो ही भावना दृढमूल न झाल्याकारणानें ही उणीव विद्यार्थ्यांत राहाते. ती नाहींशी व्हावी, व या विषयाचा अभ्यास करितां करितां व्यवहारांतील शेंकडों घडामोडी मुलांच्या लक्ष्यांत याव्या या हेतूनें प्रस्तुत पुस्तक तयार केलें आहे.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

---

हल्लींच्या बालबोध प्रायमरप्रमाणें चालविण्यास
सरकारनें मंजूर केलेलें पहिलेंच पुस्तक !

मोठ्या आकाराचीं ४४ पृष्ठें. ] **शिशु-पाठमाला.** [ ७८ सुबक व मनोवेधक चित्रें.

**लेखक—म. का. कारखानीस. बी. ए.**

या पुस्तकांत गटांचीच पद्धत स्वीकारून चित्रांच्या साहाय्यानें मुलांस अक्षरओळख होतांच वाचनास सुरवात कशी करतां येईल, हें दाखविलें आहे. यांत अगदीं सोपे धडे दिले आहेत. बोजड व कृत्रिम वाक्यें मुळींच नाहींत. पुस्तकाचा

**आकार मोठा, टाईप ठळक, चित्रें भरपूर व सुंदर, मनोरंजक धडे, सोपीं व मनोहर गाणीं, सुबक छपाई**

यांमुळें **सध्यांच्या मराठी प्रायमरच्या ऐवजीं हेंच पुस्तक वर्गांत वाचवावें** असें प्रत्येकास वाटेल. **किंमत २॥ आणे.**

(मराठी पहिल्या इयत्तेचें सचित्र—वाचनपुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल !

---

बालवर्गाकरितां आणखी एक पुस्तक

पृष्ठें ३२ चित्रें९० ] **बालबोध-बालपुस्तक.** [ किंमत दीड आणा.

( लेखक, यशवंत गणेश फफे. )

बालवर्गांत **"लहान मुलांचें पुस्तक"** अगदींच अपुरें पडतें. ही उणीव शाळांत चालविण्यास मंजूर झालेल्या या नवीन पुस्तकानें दूर झाली आहे. यांत

( १ ) अक्षरांचे गट वाचनाच्या दृष्टीनें नवीन तत्त्वावर केले आहेत.

( २ ) **चित्रांतच अक्षर दिसेल अशी विशेष कौशल्याची योजना केली आहे.** यामुळें चित्रें पाहतां पाहतां आपोआप अक्षर ओळखूं लागतें !

( ३ ) **प्रत्येक अक्षर लहान-मोठ्या पांच आकारांत थाटलें आहे,** यामुळेंही अक्षराची ओळख पटण्यास मोठी मदत झाली आहे.

( ४ ) आकार, इकार इत्यादि समजून देण्याचें कामही सुंदर चित्रांच्याच द्वारा केलें असून खालीं एकेक मनोरंजक धडा दिला आहे.

( ५ ) वाचनासाठीं आणखी मनोरंजक धडे व सोप्या कविता दिल्या आहेत.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

# बालवाङ्मय

मुलांच्या हातीं देण्याजोगीं अत्यंत उत्कृष्ट पुस्तकें हींच आहेत. अतिशय सुबक व भरपूर चित्रें, ठळठळीत टाईप, आकार मोठा, कागद मोहरेदार इत्यादिकांमुळें अंतरंगाप्रमाणेंच यांचें बाह्यांगही अत्यंत मोहक झालें आहे.

| (मिस्) आर्. नवलकरकृत. | | रा. कारखानीसकृत | |
|---|---|---|---|
| अद्भुत कथा. | ८६ | मनोरंजक सोपे पाठ | ८४ |
| कामाला लाग व इतर गोष्टी. | ८२ | मुलांकरितां कविता | ८८ |
| | | सुशीला | ८१॥ |
| | | कृष्णाकुमारी | ८२ |

## रा. रा. हरि कृष्ण दामले यांचीं

### सरकारनें मंजूर केलेलीं मुलांचे हातांत देण्यायोग्य पुस्तकें.

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षणसार | ८७ | नीतिबोध | ८६ |
| नऊ रत्नें | ८२ | मुलांस नवी देणगी | ८२ |
| गलिव्हरचा वृत्तांत भाग १ | ८५ | थोरांच्या आख्यायिका | ८१८६ |
| ,, भाग २।३ प्रत्येकी | ८५ | सुबोध गोष्टी भाग १ | ८२ |
| ,, भाग ४ | ८६ | ,, भाग २ | ८२ |
| सायंकाळची करमणूक | ८६ | ,, भाग ३ | ८२ |
| डा. स्विफ्ट याचें चरित्र | ८२ | पार्वतीप्रकोप | ८१ |
| इसापनीति भाग १।२ प्र० | ८६ | इसापनीति भाग १।२ एकत्र | ८१४ |

## रा. कृ. भा. बाबर

### हेडमास्तर शाळा म्हसवड, जि. सातारा यांचीं पुस्तकें.

**एक नमुनेदार विद्यार्थी**: अत्यंत हीन स्थितींतील जन्म असूनही शिक्षणाची तळमळ असल्यामुळें नाना प्रकारचे क्लेश सोसून मोठ्या पदास कसें चढतां येतें, हें **बुकर टी. वॉशिंगटन** याच्या चरित्राचा आधार घेऊन दाखविलें आहे. किं० ८५

**विद्यार्थ्यांचा आरसा**:—बृहस्पतिपुत्र **कच** याच्या चरित्रावरून उत्तम विद्यार्थी कसें व्हावें व ब्रह्मचर्य कसें पाळावें हें दाखविलें आहे. ८२८६

**थोरांचा थोरपणा**:—यांतील गोष्टी बालविद्यार्थ्यांस फारच आवडतील. ८२

## छापत आहेत !

**नमुनेदार बालवीर**:—बालवीरांच्या चळवळीचा संक्षिप्त इतिहास, बालवीरांची कर्तव्यें वगैरे माहिती थोडक्यांत दिली आहे.

**विद्यार्थी सीताराम**:—महत्वाकांक्षा असली म्हणजे कोणत्याही प्रतिकूल स्थितीस न जुमानतां केवळ मनःसामर्थ्यानें ती पुरी करतां येते—याचें "विद्यार्थी सीताराम" हें प्रत्यक्ष उदाहरणच होय. अडचणी आणि संकटें यानीं निराश झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यानें हें पुस्तक वाचावें.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

# मोडी वाचनमाला.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रायमर | ०—१—६ | दुसरें—सुधारलेलें | ०—४—० |
| पहिलें—सुधारलेलें | ०—३—० | तिसरें—सुधारलेलें | ०—६—० |

[ लेखकः—रा. ब. सी. वि. पटवर्धन.] हीं सर्व पुस्तकें मोहरेदार कागदावर आणि नवीन ब्लाक करून छापलीं आहेत.

---

सरकारनें शाळांसाठीं मंजूर केलेलें

## पृष्ठें ३२ ) शुद्धलेखनशिक्षण. ( किं. ८२८३.

[लेखक—यशवंत गणेश फफे.] शुद्धलेखन कसें शिकवावें, मुलांकडून कोणत्या चुका विशेष घडतात, त्या कशा निवाराव्या आणि इयत्तावार शुद्धलेखन कसें शिकवावें, या सर्व गोष्टींचा विचार ज्यांत सुबोधपणें केलेला आहे, असें हें एकच पुस्तक आहे.

---

शालेय

सुधारलेली आवृत्ति. } **पद्यार्थमंजरी.** { किंमत बारा आणे.

**क्रमिक १—७ या पुस्तकांतील संपूर्ण पद्यांचें सुबोध विवेचन.**

[ लेखक—य. ग. फफे.] हें एकच पुस्तक कोणतीही इयत्ता शिकवितांना शिक्षकांस बहुमोल मदत करील व त्यांच्या पद्यविषयक सर्व शंकांचें निरसन करील. **शाळांसाठीं मंजूर झालेलें या जातीचें हें एकच पुस्तक होय.** व्ह. फा. चे उमेदवार यांस हें पुस्तक अत्यंत उपयुक्त झालें आहे.

---

( शालेय )

नवी आवृत्ति टाईप मोठा } **व्युत्पत्तिदीपिका.** { किंमत पांच आणे.

**( मराठी इयत्ता ६ व ७ करितां )**

**[ लेखक—य. ग. फफे ]** भाषेंत मूळ शब्द थोडे व साधित शब्दच फार असतात. म्हणून साधित शब्द कसे बनतात याचें ज्ञान संपादणें हाच **भाषेचा राजमार्ग** होय. **व्युत्पत्ति म्हणजे मुख्यत्वें शब्दांची साधनिकाच**; केवळ अपभ्रंश नव्हे. शब्दांचें खरें रूप व खरा अर्थ कळून त्यांची समर्पक योजना करतां यावी हा व्युत्पत्ति शिकण्याचा उद्देश होय व तो साध्य होईल अशीच या पुस्तकाची रचना आहे.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

## घोकंपट्टीची हकालपट्टी करा !

( १ ) विद्यार्थ्यांस अर्थाचीं निर्दोष, सुंदर व उपयुक्त पुस्तकें मिळावीं, व
( २ ) भिकार, प्रश्नोत्तररूप पुस्तकांनीं होणारा दुष्परिणाम टळावा, म्हणून

**ट्रेनिंग कॉलेजांतील अनुभाविक शिक्षक**
**रा. यशवंत गणेश फके**

यांचे देखरेखीखालीं तयार करविलेलीं खालील पुस्तकेंच विद्यार्थ्यांचे हातीं द्या.

# गद्यपद्यार्थमंजरी

| | | | |
|---|---|---|---|
| गद्यपद्यार्थमंजरी ७ वी | किं. ०१० | गद्यपद्यार्थमंजरी २ री | किं. ०२ |
| गद्यपद्यार्थमंजरी ६ वी | ,, ०७ | गद्यपद्यार्थमंजरी १ ली | ०१ |
| गद्यपद्यार्थमंजरी ५ वी | ,, ०५ | कन्यावाचन— | |
| गद्यपद्यार्थमंजरी ४ थी | ,, ०४ | गद्यपद्यार्थमंजरी १ ली | ,, ०४०६ |
| गद्यपद्यार्थमंजरी ३ री | ,, ०३ | गद्यपद्यार्थमंजरी २ री | ,, ०४०६ |

**या गद्यपद्यार्थमंजरींतील विशेष गोष्टी:—**

[ १ ] धड्यांतील मुख्य कल्पना.
[ २ ] अर्थ **निर्दोष, व्युत्पत्तीस** धरून व वाक्यांत लागू पडेल असा.
[ ३ ] **व्याकरणविषयक** महत्त्वाची सर्व **माहिती.**
[ ४ ] **कवि, लेखक, ग्रंथ, प्रसंग व स्थलें** यांची आवश्यक ती सर्व माहिती.

इत्यादि सर्व गोष्टी या पुस्तकांत आल्या आहेत. यास्तव हीं पुस्तकें

**मुलांप्रमाणें शिक्षकांसही बहुमोल मदत करितात !**

## धोक्याची सूचना—

कित्येक दुकानदार "**गद्यपद्यार्थमंजरी**" मिळत नाहींत, असें खोटेंच सांगून या मंजरीच्या धर्तीवरील दुसरीं भिकार व नकली पुस्तकें गिऱ्हाइकांचे गळीं बांधतात म्हणून "**गद्यपद्यार्थमंजरीच पाठवा, अर्थाचीं इतर पुस्तकें नकोत**" असें मागणी करतांना स्पष्ट लिहा. अथवा प्रत्यक्ष आम्हांकडेच मागवा. **कमिशन भरपूर !**

मॅनेजर—**नवीन किताबखाना, पुणें शहर.**

**किं० २॥ आणे ] मुलांसाठीं पाठांतर. [ कमिशन भरपूर**

**सम्पादक:—धोंडो सखाराम कुलकर्णी,** शिक्षक, प्रॅ. स्कूल, ट्रे. कॉ. पुणें. ]

बालपणीं थोडेंबहुत पद्यवाङ्मय पाठ करविणें हा वाणी व मन सुसंस्कृत करण्याचा सर्वोत्तम मार्ग होय. हें कार्य या पुस्तकानें चांगलें होईल. यांत

१ ईशस्तुतिपर निवडक श्लोक. २ सोपे संस्कृत श्लोक. ३ राष्ट्रगीतें. ४ भूपाळ्या. ५ निवडक आरत्या. सूर्याचे नमस्कार. धर्मतत्वें व इतर माहिती दिली आहे.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसाशानें विकत मिळतील.

---

मराठी चौथ्या इयत्तेकरितां

# महाराष्ट्राचा शालेय इतिहास.

[ लेखक य. ग. फफे. ] या पुस्तकांतील विशेषः—

( १ ) भाषा **चटकदार** व **सोपी**, वर्णनें **स्फूर्तिदायक** म्हणूनच थोर पूर्वजांविषयीं **आदर** व **अभिमान** उत्पन्न होईल.

( २ ) इतिहास आजवरच्या माहितीनें निश्चित झालेला व **खरा साधार**.

( ३ ) स्वच्छ कागद, सुंदर छपाई, सुबक बांधणी, **ऐतिहासिक पुरुषांचीं चित्रें आणि उपयुक्त लहानमोठे नकाशे** यांच्या योगानें अंतरंगाइतकेंच पुस्तकाचें बहिरंगही मोहक. **आवृत्ती ७ वी. किंमत ३ आणे.**

---

कै० रा० चिंतामण गंगाधर गोगटेकृत

# हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास.

**टाईप मोठा, पृष्ठें सुमारें ३२०, चित्रें ६० चे वर.**

( १ ) अत्यंत परिश्रमपूर्वक केलेला व शाळाखात्याच्या पूर्ण कसोटीला उतरलेला शालोपयोगी वाङ्मयांतील **हाच पहिला इतिहास** आहे.

( २ ) अज्ञातकालापासून इ. सन १००० पर्यंतची माहिती उपोद्घातरूपानें दिली आहे. अर्वाचीन इतिहास **मुसलमानी अमल, मराठी अंमल व ब्रिटिश अंमल** अशा तीन भागांत विभागून दिला आहे. यामुळें शिकतांना **विद्यार्थ्यांचा गोंधळ** होत नाहीं.

( ३ ) प्रसिद्ध **व्यक्ती** व **स्थलें** यांचीं ६० चे वर सुंदर चित्रें देऊन अनेक **उपयुक्त नकाशे** जोडले आहेत.

( ४ ) मुलांस विशेष मदत व्हावी म्हणून शेवटीं **राजवंशावळींत** सर्व गव्हर्नर जनरल यांचे कारकीर्दीसह **स्मरणीय गोष्टींचे काल, युद्धें** वगैरे सनांसह दिलीं आहेत.

**किं. फक्त ०१२**

---

मराठी ६-७ व ट्रेनिंग कॉलेज यांतील विद्यार्थांसाठीं

# निबंध-मंजरी.

**लेखक—गं. गो. पारखी, शिक्षक, शाळा चाकण, जि. पुणें:—**

यांत वेगवेगळे विषय घेऊन त्यांवर सोप्या, सरळ भाषेंत नमुनेदार निबंध लिहून दाखविले आहेत. विषयांची **विविधता फार गोड साधली** आहे. काल्यांच्या कोरीवलेण्यापासून तो अस्पृश्यतानिवारणापर्यंत सर्व विषय विचारांत घेतले आहेत.

**किंमत ०७** **कमिशन २५ टक्के.**

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील

व्ह० फा० चे विद्यार्थी यांस बिनमोल मदत करणारा !

सरकारनें टेक्स्ट म्हणून मंजूर केलेला

किंमत १० आणे) **हिंदुस्तानचा राज्यकारभार.** (कमिशन भरपूर !

[ **लेखक—गणपत महादेव घुले**-हेडमास्तर, कोल्हार, जि. **अहमदनगर** ]

या पुस्तकांत:—( १ ) कंपनीसरकारपासून आजवर राज्यकारभारांत झालेले फरक व ( २ ) आजच्या राज्यकारभाराची संपूर्ण माहिती दिलेली आहे.

सरकारनें मंजूर केलेलें

**नाशिक जिल्ह्याचें भूवर्णन.**

[ लेखक—**कृ. दा. सावकार** ] नाशिक जिल्ह्यामधील मराठी शाळांच्या **तिसऱ्या** इयत्तेकरितां भूगोलाची माहिती प्रवासवर्णनात्मक पद्धतीनें अत्यंत **आटपशीर मनोरंजक** व **चित्ताकर्षक** अशी दिली आहे. नाशिक जिल्ह्याचा **सुंदर नकाशा** जोडला आहे. थोड्याच अवधींत हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें आहे. **किंमत ॰३.**

सुधारलेल्या पद्धतीनें लिहिलेला

किंमत ] **नवीन भूगोल.** [ सहा आणे

**पुस्तक १ लें.**

( **मुलांची** ४ थी व **मुलींची** ५ वी ह्या इयत्तांकरितां. ) [ लेखक—**धा. मु. जोगल** व **द. बा. पेणकर**, शिक्षक, प्रॅक्टिसिंग स्कूल, ट्रेनिंग कॉलेज, पुणें. ]

( १ ) चौथ्या इयत्तेच्या अभ्यासक्रमास जरूर ती सर्व माहिती दिली आहे.
( २ ) साधारण एका तासांत विषय पुरा होईल, असे ३१ पाठ पाडले आहेत.
( ३ ) विषय मनोरंजक व तुलनात्मक रीतीनें सांगितला आहे.
( ४ ) मराठी जिल्हे, मुंबई इलाखा व हिंदुस्तान यांचे **रंगीत व सुंदर नकाशे** व आणखीही अनेक **उपयुक्त नकाशे** व **चित्रें** जागजागीं दिलीं आहेत.

मे. **आर. एस्. दीक्षित, व्ही. डी. घाटे**, ॲड. ऑफिसर, स्कूलबोर्ड, जि. **पुणें व नगर, रा. ग. बा. बोरवणकर** वगैरे अनेक तज्ज्ञांचे उत्तम अभिप्राय.

सामक आणि कंपनीच्या

**आराखड्याच्या वह्या इयत्ता २ ते ६**

| | | | |
|---|---|---|---|
| इयत्ता २ री–५ आराखडे | ॰१ | इयत्ता ५–आराखडे ८— | ॰१॰६ |
| ,, ३ री–८ ,, | ॰१ | ,, ६– ,, | १५–॰३ |
| ,, ४ थी–८ ,, | ॰१॰६ | ,, ७– ,, | १५–॰३ |

या सर्व आराखड्यांच्या साहाय्यानें भूगोलविषय पाठ करण्याची दगदग वांचते. नुसत्या आराखड्यापेक्षां ह्या वह्या फारच उपयुक्त व स्वस्तही आहेत. कमिशन २५ ट.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीच्या भावानें मिळतील.

रा. नित्सुरे आणि घाटे,

शिक्षक, ट्रे० कॉ० धुळें यांनीं लिहिलेला

आवृत्ति २ री ] **प्रश्नोत्तरसंग्रह** [ पृष्ठें २७५ सुमारें

**किंमत बारा आणे.**

परीक्षेकरितां सपाटून अभ्यास करूनही अनेक वेळां पद्धतशीर उत्तरें वेळेवर लिहितां आल्यामुळें बरेचसे विद्यार्थी नापास होतात असा हल्लींचा अनुभव येतो. म्हणून कठीण प्रश्नांचीं उत्तरें थोडक्यांत व व्यवस्थेशीर लिहिण्याची कला या पुस्तकांत विशद करून दाखविली आहे. या पुस्तकाच्या साहाय्यानें नापास होण्याची भीति राहणार नाहीं. परीक्षेच्या तयारीकरितां इतर अनेक पुस्तकें घेण्यापेक्षां हें एकच पुस्तक विद्यार्थ्यांस भरपूर मदत करील.

**व्ह. फा परीक्षेस** नेमिलेल्या **इतिहास, भूगोल, गणित विषय, मराठी भाषा** [ गद्यपद्यासह ], **व्याकरण, व्युत्पत्ति, छंदःशास्त्र, निबंधलेखन, पदार्थविज्ञान, आरोग्यशास्त्र** इत्यादि विषयांवरील अलीकडील दहा बारा वर्षीतील परीक्षेत पडलेले **प्रश्न उत्तरांसह** संग्रहीत केलेले आहेत. विशेष हें कीं, परीक्षेंत उत्तरें जशीं लिहावयास पाहिजेत तशीं पद्धतशीर रीतीनें या पुस्तकांत लिहून दाखविलीं आहेत. तसेंच विद्यार्थ्यांना अधिक सोईचें व्हावें म्हणून या नव्या आवृत्तींत

**जाड अक्षरांत प्रश्न व लगेच त्याच्या खालीं त्याचें उत्तर**

असा क्रम ठेविला असून शिवाय सन १९२७ सालच्या परीक्षेच्या सर्व विषयांच्या प्रश्नांचा उत्तरांसह या नव्या पुस्तकांत संग्रह केला आहे.

---

**मराठी इयत्ता ५–७ या विद्यार्थ्यांसाठीं मुद्दाम लिहिलेला**

**भूगोलाचा सोबती** **इतिहासाचा सोबती.**

**किंमत ५ आणे.** **किंमत ७ आणे.**

इतिहास-भूगोलाच्या पुस्तकांवरून विषयाचें ज्ञान पूर्णपणें करून घेतलें तरीहि परीक्षेच्या वेळीं प्रश्नांचीं उत्तरें **मुद्देसूद, पद्धतशीर** व **थोडक्यांत** कशीं लिहावीं, हें पुष्कळ विद्यार्थ्यांस समजत नाहीं, म्हणून परीक्षेत अपयश येतें. या कामीं मदत व्हावी, म्हणून **रा. घाटे** व **नित्सुरे** यांनीं हीं पुस्तकें लिहिलीं आहेत. इतिहास-भूगोल या विषयांवरील **वेचक, महत्त्वाचे** व **कांहीं जास्त अवघड** असे प्रश्न निवडून काढून त्यांचीं उत्तरें पद्धतशीर लिहून दाखविलीं आहेत, व शेवटीं सामान्य विषयाचें एक प्रकरणही जोडलें आहे. पुस्तकांची भाषा सोपी असून विषयाचें विवेचन विद्यार्थ्यांच्या गरजा व व शक्ति यांकडे लक्ष्य देऊन केलें आहे. **कमिशन भरपूर**

**आतां इतर कोणतींही प्रश्नोत्तररूप पुस्तकें विद्यार्थ्यांस देऊं नका!**

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

---

व्हर्नाक्युलर फायनल परीक्षेच्या विद्यार्थ्यांकरितां
शास्त्रीय विषयांवरील भरपूर माहितीचें.

**सरकारनें मंजूर केलें!!!**

किंमत ०८. ) **सृष्टि-शास्त्र-प्रवेश** ( किंमत ०८.

लेखकः—**केशव महादेव जोशी**. शास्त्रीय–शिक्षणकर्ते
हेडमास्तर, शाळा नारायणगांव जि० पुणें.

व्ह. फा. परीक्षा व शेतकी अभ्यासक्रमाचे व्ह. फा. चे वर्ग यांतील विद्यार्थ्यांस क्रमिक ३ ते ७ पुस्तकांतील शास्त्रीय धड्यांची माहिती असावी लागते. ती सर्व आणि तिच्या अनुरोधानें आणखीही पुष्कळ माहिती या सचित्र प्रश्नोत्तररूप पुस्तकांत ग्रथित केली असून विषय सुबोध व्हावा म्हणून ठिकठिकाणीं

**बरींच चित्रें व आकृतीही**

घातल्या आहेत. शिवाय सर्व शास्त्रीयप्रश्नांचीं संगतवार उत्तरें लिहून दाखविलीं असल्यानें शिक्षकांस व विद्यार्थ्यांस हें पुस्तक फारच प्रिय झालें आहे. या पुस्तकांत—उष्णता, प्रकाश, विद्युत, यंत्रशास्त्र, रसायन, आणि खगोल–भूगोल इत्यादि सर्व विषयांवर व्ह. फा. परिक्षेंत गेल्या १० वर्षांत जे प्रश्न पडलेले आहेत, त्या सर्वांची थोडक्यांत व खुलासेवार दिलेलीं आयत्या वेळीं

**जरूर त्या प्रश्नांचीं झटपट उत्तरें**

मिळावीं म्हणून स्वतंत्र सूचीही जोडली आहे. व्ह. फा. परीक्षेंत नापास होण्याची भीति दूर व्हावी, म्हणून हें पुस्तक जरूर विकत घ्या.

---

## गोसावी यांचीं परीक्षोपयोगी पुस्तकें.

परीक्षेच्या तयारीचा भूगोल ०५.
हिंदुस्थानचा सोपा इतिहास ०७.
व्याकरणशिक्षक ०४.
निबंधरत्नावलि ०१०.
प्रश्नोत्तर आरोग्यशास्त्र— ०५.
प्रश्नोत्तर सृष्टिशास्त्र— ०५.
गणिताचा राजमार्ग— ०१२.
भाषेचा राजमार्ग ०१४.
हिंदुस्थानच्या राजव्यवस्थेचा तक्ता— ०३.
आशियाचा सोपा भूगोल ०१०६
युरोपखंडाचा सोपा भूगोल ०२.
मुसलमानी अमलाचा सोपा इतिहास—इयत्ता ५ साठीं ०२०६.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

व्हरनाक्युलर फायनल परीक्षेस नेमलेलें
( शालोपयोगी )

भाग १ ला. कि. ०१० ] आरोग्यशास्त्र [ भाग २ रा. कि. ०४

[लेखक. रा. ग. म. देशमुख ] व्हरनाक्युलर फायनल परीक्षेच्या "आरोग्य" या विषयासाठीं **हेंच उत्तम पुस्तक** अशी तज्ज्ञांसह सर्वांची खात्री झाल्याकारणानें मुंबईसरकारानें ग्याझीट ता. ३१।७।१९२४ मध्यें नं. ३१४१ अन्वयें **सदर पुस्तक व्हरनाक्युलर फायनल परीक्षेस नेमल्याचें जाहीर केलें आहे.** तरी ज्यांनीं अद्याप हें पुस्तक शाळांत सुरू केलें नसेल, त्यांनीं ताबडतोब सुरू करावें अशी आमची सूचना आहे. या **आरोग्यशास्त्राचीं** सर्व भाषांत भाषांतरें झालीं आहेत. ( उर्दू—कि. १ रु. )

रा. देशमुख यांच्या वरील पुस्तकामुळें आरोग्य हा विषय विशेष विस्तृत रीतीनें अभ्यासक्रमांत आल्यामुळें या विषयाची थोडक्यांत सुलभ व मनोरंजक रीतीनें माहिती करून देणारें असें एकादें छोटेंसें व सुटसुटीत पुस्तक खालच्या वर्गांत म्हणजे **मुलींच्या** ३–४ व **मुलांच्या** ४–५ या इयत्तांत उपयोगांत आणण्याजोगें असावें, अशी सूचना अनेक अनुभवी शिक्षकांनीं केल्यावरून **रा० ग. म. देशमुख यांनीं**

**अगदीं नवीन धर्तीवर**

चित्रें २० किंमत ०३ ) **आरोग्यप्रवेश** ( पृष्ठें ५२. टाईप मोठा.

हें पुस्तक लिहिलें आहे, व तें खालच्या इयत्तांत **चालविण्यास सरकारनें मंजूरही केलें आहे.** याची

**१ भाषा फार सोपी. २ माहिती थोडक्यांत.**
**३ पारिभाषिक शब्द नाहींत. ४ गोष्टीसारखें मनोवेधक.**

यांत मोठ्या पुस्तकांतील सर्व विषय संक्षिप्त रीतीनें आले असून शाळाखात्यानें प्राथमिक शाळांकरितां आंखलेल्या कोर्सप्रमाणें हें पुस्तक लिहिलें आहे. यामुळें मराठी पांच इयत्तांपर्यंत "**आरोग्यावर**" कोणतें पुस्तक लावावें ही काळजीच उरली नाहीं!

**प्रा० शाळांतील इ० ४ ते ७ व ट्रेनिंग संस्था यांतील विद्यार्थ्यांकरितां. सरकारांतून मंजूर झालेलें शास्त्रीय विषयाचें वाचनपुस्तक**

**प्राथमिक शालेय**

पृष्ठें १६० कि. ०१२ ] **सुलभ शास्त्रीय विज्ञान** [ सुबक १०० चित्रें

**लेखकः—देवीदास श्रीधर जोशी.**

सदर पुस्तक क्लासांत सुरूं करून शास्त्रीय विषय व्यवस्थित करून घ्या.
सदर पुस्तकावर तज्ज्ञांचे व अनुभविक प्राथमिक शिक्षकांचे उत्तम अभिप्राय आहेत.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

---

## रा. रावजी मोरेश्वर देवकुळे यांचीं पुस्तकें.

**तोंडचे हिशेब भाग १ ला:—** प्राथमिक शाळांतील मुलांमुलींची इयत्ता २–५ करितां.

या पुस्तकांत शिक्षणाचे सोईकरितां चार भाग केले असून त्यांचा अनुक्रम खालील-प्रमाणें आहे. [ १ ] बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, यांवरील हिशेब. [ २ ] किंमत दाखविणाऱ्या परिमाणांचीं कोष्टकें व हिशेबाच्या सोईसाठीं दुसरें इच्छित रूप देण्याचे व तोंडानें सहज करितां येण्यासारखे आडाखे. [३] वजनी परिमाणांविषयींच्या तोंडी हिशेबांच्या आडाख्यांच्या चाली. **किंमत ८।८३.**

**तोंडचे हिशेब भाग २ रा:—** मराठी चौथी व पांचवी या इयत्तांसाठीं सरकारनें मंजूर केलेले.

या पुस्तकांत शिक्षणोपयोगी व व्यवहारांत हरघडी जरूर असलेली माहिती खालील प्रमाणें आहे. [ १ ] मोठाल्या बेरजा, वजाबाक्या, गुणाकार, भागाकार तोंडानें करितां येण्याकरितां विशेष प्रकारच्या चालीं. [ २ ] गुणोत्तर व कसर यांवरील चाली व आडाखे. [ ३ ] सरळव्याजाच्या तोंडी हिशेबाच्या चाली व त्यांवरील हिशेब व उपपत्ति आणि सूचना. **किं. ८४.**

**महत्त्वमापन.** विद्यार्थ्यांच्या सोईकरितां जरूर त्या खालीलप्रमाणें गोष्टी दिल्या आहेत. [ १ ] तसू, हात, काठी इत्यादिक मराठी रेषापरिमाणें व त्यांवरून ठरलेलीं क्षेत्रपरिमाणें व घन परिमाणें, तसेंच त्यांचे इंग्रजी परिमाणाशीं संबंध दाखवून त्यांवरील नवीन प्रश्नही दिलेले आहेत. [ २ ] सरूप त्रिकोणांविषयीं एक दोन कृत्यें, वर्तुळांत परस्परांस छेदणाऱ्या रेषासंबंधानें एक कृत्य व शंकूचें पृष्ठफल काढण्याचें कृत्य हींही या ग्रंथांत दिलेलीं आहेत. **किंमत ८ आणे.**

---

सरकारनें मंजूर केलेलें टेक्स्टबुक

द. भ. लोखंडेकृत

**हिंदुस्तानची संक्षिप्त राज्यव्यवस्था.**

व्ह. फा. च्या विद्यार्थ्यांस पुरेशी माहिती देणारें हें एकच पुस्तक आहे असा तज्ज्ञांचा अनुभव आहे. **किं. ४ आणे.**

---

दे. श्री. जोशी व द. भ. लोखंडेकृत

## हिंदुस्तानचा इतिहास.

अत्यंत सोपी भाषा, मुद्देसूद मांडणी व मनोहर बाह्यांग यामुळें हें पुस्तक प्राथमिक शाळांस उपयुक्त झालें आहे **किं. १२ आणे.**

**नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.**

---

# मुलींच्या शाळांची मोठी गैरसोय दूर झाली !

आकृत्यांसह माहिती देणारें

# शिवणकाम भाग १ ला.

लेखिकाः—**जानकीबाई प्रधान.**

मुलींच्या शिक्षणक्रमांत " **शिवणकाम** " हा एक आवश्यक विषय आहे. परंतु त्या विषयावर विद्यार्थ्यांच्या दृष्टीनें त्यांस समजण्यासारखीं सोपीं पुस्तकें अद्याप उपलब्ध नाहींत. विद्यार्थिनींना व शिक्षकांना हें उपयुक्त व्हावें व क्रमिक पुस्तकासारखा याचा उपयोग व्हावा अशा रीतीनें **प्राथमिक शाळा, मुलींचीं हायस्कुलें,** व **स्त्रियांचें ट्रेनिंग कॉलेज** यांतील अभ्यासक्रमास धरून हें पुस्तक लिहिलें आहे. हें पुस्तक लिहितांना हा विषय शिकवितांना कोणत्या अडचणीं येतात याचा फार बारकाईनें विचार केला आहे. येथील फीमेल ट्रेनिंग कॉलेजाच्या लेडी सुपरिटेंडेंट ( मिस् ) **आर्. नवलकर,** बी. ए., यांनीं हस्तलिखित प्रत वाचून केलेल्या सूचना अमलांत आणल्या आहेत. या पुस्तकाची—

( १ ) भाषा **अगदीं सोपी. लहान मुलींना** सहज **समजण्यासारखी.**

( २ ) पारिभाषिक शब्दांचा उपयोग जवळ जवळ नाहींच.

( ३ ) यांत वेगवेगळ्या सुमारें **४३ आकृत्या** देऊन कपडे बेतणें, फाडणें, शिवणें या संबंधीं सूचना केल्या आहेत. साध्या हातरुमालापासून तों **गलुतें, झबलीं, फ्रॉक, पोलकीं** वगैरे **स्त्रियांचे नित्योपयोगी** कपडे कसे शिवावे, याची सविस्तर माहिती दिली आहे. यामुळें

**स्त्रियांच्या सर्व शिक्षणसंस्थांस हें पुस्तक अत्यंत जरूरीचें झालें आहे !**

**किंमत अवघी ०।१०. कमिशन भरपूर.**

वरील पुस्तकावरील निवडक असे दोनच अभिप्राय !

**जानकीबाई भट,** लेडीसुपरिटेंडेंट, **सेवासदन, पुणें,**

" हें पुस्तक शाळांतून मुलींच्या व स्त्रियांच्या फारच उपयोगी आहे. मराठी भाषेंत अशा पुस्तकाची फार जरूरी होती." ५-१२-१९२७.

**कमलाबाई देशपांडे**—लेडी सुपरिटेंडेंट, **कन्याशाळा,** सातारा:—

" आपलें पुस्तक मी वाचून पाहिलें. मला तें आवडलें. त्याचा उपयोग चांगला होईलसें वाटतें. " २७-११-२७.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

सरकारनें मंजूर केलेलें

प्रत्येक मराठी शाळेच्या लायब्ररींत ठेवण्याजोगें अत्यंत महत्वाचें

# प्राणिशास्त्रावरील भरपूर माहितीचें पुस्तक !

# पशू, पक्षी व इतर प्राणी.

**लेखक प्रो. गोखले आणि देशपांडे, शेतकी कॉलेज, पुणें.**

**क्राऊन साईज पृष्ठें २४० ! किंमत १॥८**

मनोवेधक १३४ चित्रें !

सदर पुस्तकांत प्रथम सर्व पशु-पक्षी आणि इतर प्राणी यांची **उत्क्रांति, उत्पत्ति व वाढ** आणि त्यांचें वर्गीकरण सोप्या भाषेंत केलें आहे. नंतर या विषयाचे तीन भाग करून दरएक भागांत त्यांतील प्राण्यांची शरीररचना, त्यांच्या सर्व सामान्य संवयी, त्यांचीं विशेष लक्षणें व तीं ओळखण्याची रीति, हें सांगितलें आहे. एकंदर निरनिराळ्या प्रकारचे **४७ पशु, ३३ पक्षी व ५० इतर प्राणी** यांसंबंधीं संपूर्ण माहिती जागोजाग **भरपूर चित्रें देऊन** सांगितली आहे, म्हणून मुलांना वाचतांना फारच मौज वाटेल. कांहीं प्राणी आपणांस अन्नद्रव्यें पुरवितात, कांहीं आपले नोकर बनतात, कांहीं पाळीव होतात तर कांहीं रोग उत्पन्न करणारे, विषारी व भीतिदायक असे असतात. तेव्हां या सर्वांसंबंधानें आपणांस यथातथ्य ज्ञान असावें, असें कोणास वाटणार नाहीं ? कारण अशा ज्ञानापासून हरएक प्रसंगीं आपला फायदाच असतो.

हें पुस्तक प्रत्येक घरीं, प्रत्येक **शाळेच्या लायब्ररींत**, प्रत्येक मुलाच्या हातांत असण्याची आवश्यकता आहे. मोठ्यापासून लहानापर्यंत प्रत्येकास याची जरूर आहे. अनेक विद्वानांनीं हें पुस्तक वाचून आपले उत्तमोत्तम अभिप्राय दिले आहेत.

---

**शेतकी व प्राथमिक शाळांकरितां**

प्रो. वा. ग. देशपांडेकृत. ) **कीटक-शास्त्र.** ( पृष्ठें ९९. चित्रें. ६१. किं० ॥८

प्राथमिक शाळा व ट्रेनिंग कॉलेजें यांमधून सृष्टिनिरीक्षण या सदराखालीं कीटकाविषयीं माहिती दिली जाते; परंतु या विषयासंबंधीं सुसंबद्ध आणि शास्त्रीय परिभाषा वगळून सोप्या भाषेंत लिहिलेलें पुस्तकच नव्हतें ! ही अडचण वरील पुस्तकानें दूर केली आहे. शेतकी विषयास धरून शेवटीं तीन चार प्रकरणें जोडली असल्यामुळें शेतकी व प्राथमिक शाळा आणि ट्रेनिंग कॉलेजें यांस हें पुस्तक अत्यंत उपयोगाचें आहे.

नवीन किताबखाना, बुकसेलर, पुणें सिटी, यांजकडे खालील व इतर सर्व पुस्तकें कसोशीनें विकत मिळतील.

शाळाखान्यानें शाळांत चालविण्यास नवीन मंजूर केलेले
कृष्णाजी महादेव गोखले शिक्षक म्यु. मराठी स्कूल, केळेवाडी, गिरगांव, मुंबई
यानीं लिहिलेले

# सुंदर मोडी किते.

इयत्ता २ ते ५. प्रत्येकीं किंमत अर्धा आणा.

**या कित्त्यांत विशेष काय आहे?**

(१) प्रस्तुत सर्व कित्त्यांत व कोणत्याही कित्त्यांत सर्व ठिकाणीं **प्रत्येक अक्षराचें एकच वळण सर्वत्र सारखें आढळेल.** हातास **एक शुद्ध वळण लागण्यास** या गोष्टीचा विशेष उपयोग होतो.

(२) शिक्षणशास्त्राप्रमाणें अक्षरांचे गट वळणांच्या साम्यास अनुसरून केले असून एकेका ओळींत अशीं समान वळणांचीं अक्षरें आणिलीं आहेत व वळणाचा अनुक्रम **प्रथम सोपीं** व **उत्तरोत्तर अवघड** असा लाविला आहे.

(३) सर्व प्रकारचे जोड व सोप्या लपेटीही वरील कित्त्यांत आणिल्या आहेत.

(४) मोडी अक्षरांचीं अनेक वळणें आहेत पण त्यांत सर्वोत्कृष्ट असें वळण कोणतें असेल तर तें **फडनिशी** वळण होय. नाना फडनिसांचे अमदानींत फडावरील कारकूनमंडळांत जें वळण तयार झालें, तें फडनिशी वळण होय. हें वळण प्रस्तुत कित्त्यांत पहावयास मिळेल.

(५) या कित्त्यांपैकीं **इ० ५ चा कित्ता** म्हणजे फडनिशी वळणांतील एक तत्कालीन अस्सल पत्रच आहे! अर्थात् खरें शुद्ध वळणच या कित्त्यांत आहे, याचा हा प्रत्यक्ष पुरावाच होय.

(६) उत्तम हस्ताक्षर हा एक अलंकार आहे. योग्य व सतत परिश्रमानें **रा. गोखले** यांनीं आपलें हस्ताक्षर कसें सुंदर केलें याचा प्रत्यक्ष नमुना म्हणजे रा. य. ग. **फफे** यांचें **"मोडी वाचनपाठ-दुसरें व तिसरें पुस्तक"** हा होय. हा पाहिल्यावर प्रत्येक शिक्षकास आपल्या विद्यार्थ्यांचें हस्ताक्षर इतकें सुंदर व्हावें असें वाटेलच वाटेल.

सारांश, मुलांचे **अक्षरास खरें शुद्ध वळण** लागावें आणि तें थोड्या श्रमांत व **अल्पकाळांत बाळसेदार व्हावें**, अशी इच्छा असेल तर ती **गोखले** यांचे **किते वापरल्यानेंच** पूर्ण होईल.

अनुभवानें खात्री करून घ्या.

# मोडीवाचनपाठ.

## लेखक—यशवंत गणेश फफे
( शिक्षक—ट्रेनिंग कॉलेज फॉर मेन, पुणें. )

**पहिलें पुस्तक** ( पहिल्या इयत्तेकरितां )–**टेक्स्ट म्हणून मंजूर** कि. ६२
**दुसरें पुस्तक** ( दुसऱ्या इयत्तेकरितां ) मंजुरीस गेलें आहे कि. ६३
**तिसरें पुस्तक** ( तिसऱ्या इयत्तेकरितां ) ,, ,, ,, ,, ६३
**चवथें पुस्तक** ( चवथ्या इयत्तेकरितां ) तयार होत आहे ... ...

**मोडी लिपि** हा मराठीचा व महाराष्ट्राचा अलंकार आहे. महाराष्ट्राचें सारें ऐतिहासिक लिखाण याच लिपींत आहे. सर्व प्रकारचा खाजगी, व्यापारी व कोर्टें कचेऱ्या यांचा पत्रव्यवहार याच लिपींत होतो. या **लिपीचें सौंदर्य, सुवाच्यत्व** व विशेषतः **लेखनसौकर्य** फार आश्चर्यकारक आहे. दुर्दैवानें अलीकडे इची फार उपेक्षा होत आहे. याचें मुख्य कारण म्हणजे

**सुंदर मोडी पुस्तकांचा अभाव**

हें होय; वरील पुस्तकांत हें कारण शक्य तितकें दूर करण्याचा प्रयत्न केला आहे, यांतील विशेष:—

( १ ) उत्तम **मोहरेदार** कागदावर **अत्यंत स्वच्छ** व **सुबक छपाई** केली आहे.
( २ ) सर्व धडे सोपे, मनोरंजक, बोधपर व सामान्य माहितीनें भरलेले आहेत.
( ३ ) प्रत्येक अक्षर **अत्यंत वळणदार** व **अगदीं प्रमाणशुद्ध** आहे.
( ४ ) अक्षरांचीं निरनिराळीं प्रसिद्ध तीन वळणें घेतलीं आहेत.
( ५ ) प्रत्येक धडा अगदीं बेताचा म्हणजे नेमका दोन पृष्ठांचा बनविला आहे.
( ६ ) **न-ज, क–ला, मा–या** इत्यादि ज्या मोडी अक्षरांत फार साम्य आहे; त्यांतील सूक्ष्म भेदही सर्वत्र काळजीपूर्वक राखला आहे—इतका कीं, कोठेंही एका अक्षराचे ऐवजीं दुसरें वाचलें जाण्याचा संभवच उरूं दिला नाहीं—म्हणून

**हीं पुस्तकें दृष्टीस पडल्यावर कोणीही हींच पसंत करील! अनुभव पहा!**

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

पुणें:—**लक्ष्मण नारायण गोडबोले.**
,, **नवीन किताबखाना.**
धुळें. **जी. जी. नित्सुरे**–गल्ली नं. ५
मुंबई:–**परचुरे पुराणिक आणि मंडळी.**
,, **कृ. म. गोखले.** ठाकुरद्वार रोड, झावबाची वाडी, चाळ नं. ४.

याशिवाय ठिकठिकाणच्या बुकसेलरकडे विकत मिळतील. तथापि न मिळाल्यास **य. ग. फफे**, ६०२, भांबुर्डा, पुणें, येथें मागवावीं.

मोडी वाचनपाठ पुस्तक दुसरें सरकारनें दुसऱ्या इयत्तेकरितां टेक्स्टबुक मंजूर केलें.
( इं. पत्र S 66 B. S. १६-३-१९२८ )

सरकारनें प्रा. शाळा, हायस्कूलें व ट्रे. संस्थांसाठीं मंजूर केलेल्या

## भौगोलिक आराखड्यांच्या वह्या "

या इ. २ ते ७ पर्यंतच्या भौ. अभ्यासक्रमाप्रमाणें तयार केल्या असून किंमती १ आण्यापासून २॥ आण्यापर्यंत ठेविल्या आहेत. यांचा उपयोग करण्यासंबंधीं अनुभविक सूचना, कोणत्या वर्गांत काय भरून द्यावें यासंबंधाची योजना व भरलेले नमुने मोफत पाठविले जातील. सर्वप्रकारचे सुटे आराखडेही मिळतील.

मि. ठिकाणें-प्रकाशकः-**पांडुरंग दादाजी प्रभु**. एम्. एम्. फोरासरोड स्कूल, मुंबई नं. ८

**नवीन किताबखाना पुणें. परचुरे, पुराणिक मंडळी**; तु. पुं. शेट्ये व लक्ष्मीवैभव बुकडेपो मुं. नं. ४

---

टेक्स्ट म्हणून मंजूर झालेले

इ. ४, ५ व ६ करितां ] **घरगुती जमाखर्च.** [ किं. ३ आणे कमि. शें. २०

लेखकः—**द. ज. गोखले** बी. ए. हेडमास्तर प्रॅ. स्कूल ट्रे. कॉ. पुणें.

मुलींच्या व्ह. फायनल परीक्षेला योग्य असें घरगुती जमाखर्चावर एकही पुस्तक नव्हतें; ती उणीव या पुस्तकानें दूर केली आहे. यांत जमाखर्चाची सामान्य माहिती योग्य अशा चित्रांचे आधारानें दिली असून पुढें एका कुटुंबाची वर्षाची कीर्द व खतावणी व्यवहारांसह दिली आहे. शेवटीं ५० वर प्रश्न आहेत.

**मिळण्याचें ठिकाण**—ल. ना. गोडबोले, बुकसेलर, पुणें शहर.

Registered No. B 119

# पुष्कळ शाळांत सुरू झाल्या ! तुम्हीही सुरू करा ! !

## अगदीं सुधारलेल्या पद्धतीनें भूगोल विषय शिकविण्याकरितां

अत्यंत उपयुक्त

इयत्ता २ ते ७ च्या अभ्यासपत्रकाप्रमाणें तयार केलेल्या.

# आराखड्यांच्या वह्या.

इयत्ता ३ ते ७ व इंग्रजी १ ली ते ७ वी च्या वह्या पुष्कळ दिवस चालू आहेतच. शिवाय मराठी इयत्ता २ करितां **महाराष्ट्रांतील सर्व जिल्ह्यांतील सर्व तालुक्यांच्या वह्या तयार झाल्या !** अमुक वह्यांची आर्डर आली व अगाऊ पैसे आले तरच वह्या तयार करून देऊं अशी अट नाहीं. कोणत्याही तालुक्याची एक सुद्धां वही मिळं शकेल शिवाय शिक्षकांस शेंकडा २५ प्रमाणें कमिशन मिळेल.

| इयत्ता | आराखड्यांची संख्या. | किंमत |
|---|---|---|
| २ दुसरी...... | तालुक्याचे ४, आणि जिल्हा १ | १ आणा |
| ३ तिसरी...... | जिल्ह्याचे ६, आणि महाराष्ट्र २ | १ आणा |
| ४ चौथी...... | इलाख्याचे ६, आणि हिंदुस्थान २ | १॥ आणा |
| ५ पांचवी...... | हिंदुस्थानचे ६, आणि आशियाचे २ | १॥ आणा |
| ६ सहावी...... | जगाचे २, आशियाचे ३, हिंदुस्थानचे ५ युरोपचे ५ | ३ आणे |
| ७ सातवी...... | जगाचे २, दक्षिण अमे. २ उत्तर अमे. २; आफ्रिका २, आस्ट्रेलिया २, हिंदुस्थान ५. | ३ आणे |

**या वह्यांच्या साहाय्यानें भूगोल विषय पाठ न करितां सहज तयार होतो असा शिक्षक या नात्यानें १२ वर्षांचा अनुभव आहे.**

**वह्या मिळण्याचीं ठिकाणें**

प्रकाशकः—**व्ही. के. सामक आणि कंपनी,** बुधवार पेठ पुणें.

**लक्ष्मण नारायण गोडबोले** बुकसेलर्स लक्ष्मीरोड पुणें व प्रसिद्ध बुकसेलर्सकडे.
**केळकर** कंपनी. नाशिक.
**श्रीराम** कंपनी. धुळें.
**भुंजे ब्रदर्स** कोरेगाव ( जि० सातारा )
**जी. के. वैद्य** वांई ( जि० सातारा. )
**भ. मा. गोसावी** फलटण (जि० सातारा)

[illegible]
[illegible]

कलम २७ मध्यें सरकारला असे नियम करतां येतात असें कोठेंही सांगितलें नाहीं. यानंतर सरकारनें ता. १२ मार्च १९२६ व ता. ३१ मे १९२७ रोजींचे दोन ठराव काढले. चालू सालांत सरकारनें आपल्या क्षेत्रांतील प्राथमिक शाळांना एकंदर जितक्या ग्रँट्स् दिल्या असतील त्यांतून या शाळांना म्युनिसिपालिटीनें सन १९२४-२५ सालीं दिलेल्या ग्रँटस्ची निम्मे रक्कम वजा करून बाकीची रक्कम म्युनिसिपालिटीला ग्रँट म्हणून द्यावयाची असें त्यांत म्हटलें आहे. हाही नियम म्युनिसिपालट्यांना बाधकच आहेत. कारण १९२४-२५ सालानंतर म्युनिसिपालिटीनें ज्या अधिक ग्रँटस् दिल्या असतील त्यांचा विचार झालेला नाहीं; त्याचप्रमाणें स्थानिक संस्थांकडूनच ज्या शाळांना मदत मिळते, पण सरकारकडून मदत मिळत नाहीं अशा शाळांचाही विचार यांत केला नाहीं. कायदा होण्यापूर्वी सरकार एडेड स्कूलसना प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा विवक्षित भाग ग्रँट्च्या रूपानें देत असे. पण, आतां प्रत्येक मुलाचा खर्च १० किंवा १२ किंवा ४ किंवा ६ धरून त्याच्या निम्मेच ग्रँट द्यावयाची अशी सरकारनें शिरत ठेविली आहे. ह्या सर्व हकीगतीवरून हें ध्यानांत येईल कीं, म्युनिसिपालिट्यांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळांच्या खर्चाचा निम्मे भाग सरकारकडून त्यांना मिळावा असें जरी कायद्यांत कलम आहे तरी मदत घेणाऱ्या शाळांच्यासंबंधांत पुष्कळ म्युनिसिपालिट्यांना शेंकडा ३० ग्रँटही मोठ्या मारामारीनें मिळते. म्हणजे या बाबतींत सरकारचा खर्च कमी झालेला आहे. आणि त्याचप्रमाणें म्युनिसिपालिटीचा वाढला आहे.

## शाळेच्या इमारती.

शाळेकरितां इमारती बांधण्यासाठीं स्थानिक संस्थांना ग्रँट देण्याच्या बाबतींत सरकारनें अलीकडे फारच कुंजूषपणाचें धोरण स्वीकारलेलें आहे. ता. १ सप्टेंबर १९२३ रोजीं मुंबई सरकारचा २३१ नंबरचा जो ठराव प्रसिद्ध झाला आहे त्यांत असें स्पष्टपणें कबूल केलें आहे कीं, शाळेच्या सोयीची इमारत बांधण्यास सरकारी पब्लिक वर्कस खात्याला दर विद्यार्थ्यामागें १०० ते १५० रु. इतका खर्च येतो. शाळेच्या इमारतीसाठीं जो खर्च येतो. त्यांतील निम्मा खर्च देण्याला सरकार कायद्यानें बांधलें गेलें आहे. असें असतांही ता. २६ मे १९२६ रोजीं सरकारनें वरील ठरावाशीं विसंगत असा एक ठराव काढला आहे. स्थानिक संस्थांना शाळेच्या इमारतींसाठीं प्रत्यक्ष किती खर्च येतो, त्याचा विचार न करतां दर मुलामागें ४० रु. हा वट खर्च धरून निम्मा म्हणंजे २० रु. एवढीच ग्रँट देण्यांत